# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

**सभा क्र.०२/२०१८** **दिनांक ०२.०२.२०१८**
**स्थळ- साईनिवास अतिथीगृह, शिर्डी** **वेळ- दुपारी १२.०० वाजता**

श्री साईबाबा संस्थान व्यवस्थापन समितीची सर्वसाधारण सभा शुक्रवार दिनांक ०२.०२.२०१८ रोजी दुपारी १२.०० वाजता संस्थानचे शिर्डी येथील साईनिवास अतिथीगृहामध्ये आयोजित करण्यात आली असलेबाबत, इकडील जा.नं.एसएसएस/ वशी-०४/ ५७१९/ २०१८, दिनांक २५ जानेवारी, २०१८ रोजीचे पत्राने सर्व मा.सदस्यांना कळविण्यात आले होते. त्यानुसार सदरहू सभा शुक्रवार दिनांक ०२.०२.२०१८ रोजी दुपारी १२.०० वाजता संस्थानचे शिर्डी येथील साईनिवास अतिथीगृहामध्ये मा.श्री.सुरेश काशिनाथ हावरे यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आली.

०१. मा.श्री.सुरेश काशिनाथ हावरे, अध्यक्ष ०२. मा.श्री.चंद्रशेखर लक्ष्मणराव कदम, उपाध्यक्ष
०३. मा.ॲड. मोहन मोतीराम जयकर, सदस्य ०४. मा.श्री.प्रताप सखाहारी भोसले, सदस्य
०५. मा.श्री.भाऊसाहेब राजाराम वाकचौरे, सदस्य ०६. मा.श्री.बिपीनदादा शंकरराव कोल्हे, सदस्य
०७. मा.सौ.योगिता अभय शेळकेपाटील, सदस्या

मा.श्रीमती रुबल अग्रवाल, भा.प्र.से.
मुख्यकार्यकारी अधिकारी

सभेच्या सुरुवातीस श्री साईबाबांची प्रार्थना करणेत आली.

सदरहू सभेस काही अपरिहार्य कारणास्तव उपस्थित राहू शकत नसलेबाबत, समिती सदस्य मा.डॉ.राजेंद्र राजाबाली सिंग यांनी ई-मेलद्वारे कळविले होते, याची समितीने नोंद घेऊन, त्यांना अनुपस्थित राहण्याची अनुमती दिली.

त्याचप्रमाणे मा.डॉ.मनीषा कायंदे, सदस्या यांनी ई-मेलव्दारे कळविले आहे की, श्री साईबाबा संस्थान व्यवस्थापन समितीच्या दि.०२.०२.२०१८ रोजी होणाऱ्या बैठकीचे पत्र मिळाले. परंतु या बैठकीस मी हजर रहाणार नाही. हया संदर्भात शिवसेना सचिव श्री.अनिल देसाई व मा.पर्यावरण मंत्री श्री.रामदास कदम यांनी मा.मुख्यमंत्री श्री.देवेंद्र फडणवीस यांच्याशी चर्चा केली होती व मा.मुख्यमंत्र्यांनी शिवसेनेला व्यवस्थापन समितीचे उपाध्यक्ष पद देण्यास संमती दिली होती. परंतु याबाबत कोणतीही कार्यवाही झालेली नसल्याने, त्याचा खेद वाटत आहे. त्यामुळे या बैठकीत उपस्थित राहण्यास मला स्वारस्य नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

मा.श्री.रविंद्र गजानन मिर्लेकर, सदस्य यांनी ई-मेलव्दारे कळविले आहे की, श्री साईबाबा संस्थान व्यवस्थापन समितीच्या दि.०२.०२.२०१८ रोजी होणाऱ्या बैठकीचे पत्र मिळाले. या बैठकीस माझ्यासकट शिवसेनेचे तीनही सदस्य हजर राहणार नाहीत. कृपया याची नोंद घ्यावी. धन्यवाद.

मा.श्री.अमोल गजानन कीर्तिकर, सदस्य यांनी ई-मेलव्दारे कळविले आहे की, श्री साईबाबा संस्थान व्यवस्थापन समितीच्या दि.०२.०२.२०१८ रोजी होणाऱ्या बैठकीचे पत्र मिळाले. या बैठकीस शिवसेनेचे तीनही सदस्य हजर रहाणार नाहीत. हया संदर्भात शिवसेना सचिव श्री.अनिल देसाई व मा.पर्यावरण मंत्री श्री.रामदास कदम यांनी मा.मुख्यमंत्री श्री.देवेंद्र फडणवीस यांच्याशी चर्चा केली होती व मा.मुख्यमंत्र्यांनी शिवसेनेला व्यवस्थापन समितीचे उपाध्यक्ष पद देण्यास संमती दिली होती. याबाबत अजुनपर्यंत कोणतीही कार्यवाही झालेली नसल्यामुळे खेद वाटत आहे. त्यामुळे या बैठकीत उपस्थित राहणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी. धन्यवाद.

सभेस आवश्यक गणपुर्ती नसल्यामुळे विधी व न्याय विभागाकडील दि.१३ जुलै, २०१७ रोजीचे अधिनियम दुरुस्तीतील कलम ३ (क) पोटकलम (२) मधील तरतूदीनुसार तीस मिनीटाकरीता सभेचे कामकाज तहकुब करणेत येऊन, त्यानंतर दुपारी १२.३० वाजता मा.अध्यक्ष महोदय यांनी विषयपत्रिकेवरील विषयांवर चर्चा सुरु केली.

---

**विषय नं.०१** **दिनांक ०८.०१.२०१८ रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**

**निर्णय क्र.७५** दिनांक ०८.०१.२०१८ रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समिती सभेच्या इतिवृत्ताच्या प्रती सर्व मा.सदस्यांना सभेत पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात येऊन, सदरहू इतिवृत्त वाचून कायम करत असताना खालीलप्रमाणे दुरुस्त्या करण्यात आल्या, त्यास मान्यता देण्यात आली.

**(१) निर्णय क्र.३९-**

यावर सविस्तर चर्चा होऊन, पालखी/ पदयात्रींच्या सोयीसाठी औरंगाबाद ते शिर्डीपर्यंत संस्थानमार्फत पालखी थांबे उभारणेकामी देणगी स्वरुपात जमीन/ जागा मिळणेकरीता संस्थानचे संकेतस्थळावर व स्थानिक वर्तमानपत्रामध्ये जाहिरात प्रसिध्द करणेत यावी, असे ठरले. (कार्यवाही- प्र.अधिक्षक, मालमत्ता विभाग)

<u>याऐवजी खालीलप्रमाणे वाचण्यात यावे.</u>

**यावर सविस्तर चर्चा होऊन, पालखी/ पदयात्रींच्या सोयीसाठी शिर्डीकडे येणाऱ्या चारही दिशांच्या रस्त्यांवर (मुंबई-शिर्डी, औरंगाबाद ते शिर्डी, पुणे- शिर्डी, मनमाड-शिर्डी, भंडारदरा-अकोला-संगमनेर-शिर्डी) प्रत्येकी ३०-४० कि.मी. अंतरावर संस्थानमार्फत पालखी थांबे उभारणेत यावे. यासाठी आवश्यक असलेली जमीन/ जागा देणगी स्वरुपात मिळणेकरीता संस्थानचे संकेतस्थळावर व स्थानिक वर्तमानपत्रामध्ये जाहिरात प्रसिध्द करणेत यावी. विशिष्ट कालावधीमध्ये देणगी स्वरुपात जमीन/जागा न मिळाल्यास, समिती सदस्यांनी पालखी थांब्यांसाठीच्या गावांची निवड करुन द्यावी व निवड केलेल्या गावातील जमीन/ जागा पालखी थांब्यासाठी खरेदी करणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, मालमत्ता विभाग)

---

(२) निर्णय क्र.४१-

यावर सविस्तर चर्चा होऊन, साईचरित्राच्या जाणकारांच्या अभिप्रायाचा विचार करता, श्रीसाईसच्चरित्राचा आधार घेऊन सदर स्क्रिप्टमधील अनावश्यक पात्रे, संवाद व प्रसंग कमी करणेत येऊन, "अगाध महिमा साईचा" या मराठी नाटकाचे संस्थानमार्फत आयोजन करणेत यावे, असे ठरले.

(कार्यवाही- समाधी शताब्दी कक्षप्रमुख)

<u>याऐवजी खालीलप्रमाणे वाचण्यात यावे.</u>

**यावर सविस्तर चर्चा होऊन, साईचरित्राच्या जाणकारांच्या अभिप्रायाचा विचार करता, श्रीसाईसच्चरित्राचा आधार घेऊन सदर स्क्रिप्टमधील अनावश्यक पात्रे, संवाद व प्रसंग कमी करणेत येऊन, "अगाध महिमा साईचा" या मराठी नाटकाचे संस्थानमार्फत आयोजन करणेत यावे, असे ठरले.**

**यावर अशी चर्चा झाली की, साईचरित्राचा अभ्यास असणारे साईलीला द्वैमासिकाचे माजी संपादक विद्याधर ताठे तसेच पवार काका, पुणे हे ही साईचरित्राचे जाणकार असून, आवश्यक प्रसंगी यांचाही अभिप्राय घेण्यात यावा, अशा सुचना केल्या.** (कार्यवाही- समाधी शताब्दी कक्षप्रमुख)

---

(३) निर्णय क्र.४७-

यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रवरा मेडिकल ट्रस्ट, लोणी यांचेकडून, त्यांचे ट्रस्टमार्फत अकोले या आदिवासी तालुक्यातील चालु असलेल्या आरोग्यविषयक कामाचा सविस्तर अहवाल मागविण्यात यावा. तसेच त्यांना किती अनुदान अपेक्षति आहे, त्याचा तपशील प्राप्त करुन घ्यावा व त्यानुसार सुधारीत प्रस्ताव व्यवस्थापन समितीसमोर सादर करावा, असे ठरले. (कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)

<u>याऐवजी खालीलप्रमाणे वाचण्यात यावे.</u>

**यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवास प्रारंभ झालेला असून मा.मुख्यमंत्री महोदय यांचे अध्यक्षतेखालील कृती आराखडा समितीने या महोत्सवासाठी एकूण रु.३०२३ कोटी मात्रच्या कृती आराखडयास मान्यता दिलेली आहे. परंतु सदरहू निधी अद्याप प्राप्त नाही. या महोत्सवामध्ये विविध कार्यक्रमांचे आयोजन करणे व साईभक्तांना पायाभूत सोयी-सुविधा पुरविणेकामी संस्थानचा मोठया प्रमाणावर निधी खर्च होणार असून संस्थानला निधीची कमतरता भासू शकते. अशा पार्श्वभूमीवर प्रवरा मेडिकल ट्रस्ट, लोणी यांना अकोला तालुक्यातील अदिवासी रुग्णसेवेसाठी अत्याधुनिक रुग्णवाहिका व ७५ केव्हीए जनरेटर सेट खरेदीसाठी अनुदान देणे उचित होणार नाही. सबब उपरोक्त प्रस्ताव अमान्य करणेत आला.**

(कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)

---

(४) निर्णय क्र.४८-

यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, प्रवरा मेडिकल ट्रस्ट, लोणी संचलित प्रवरा ग्रामीण रुग्णालय यांनी मागणी केलेल्या हृदय शस्त्रक्रियेकरीता लागणाऱ्या यंत्रसामुग्रीच्या विवरणाची मागणी त्यांचेकडून करणेत यावी. (कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)

<u>याऐवजी खालीलप्रमाणे वाचण्यात यावे.</u>

**यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवास प्रारंभ झालेला असून मा.मुख्यमंत्री महोदय यांचे अध्यक्षतेखालील कृती आराखडा समितीने या महोत्सवासाठी एकूण रु.३०२३ कोटी मात्रच्या कृती आराखडयास मान्यता दिलेली आहे. परंतु सदरहू निधी अद्याप प्राप्त नाही. या महोत्सवामध्ये विविध कार्यक्रमांचे आयोजन करणे व साईभक्तांना पायाभूत सोयी-सुविधा पुरविणेकामी संस्थानचा मोठया**

**प्रमाणावर निधी खर्च होणार असून संस्थानला निधीची कमतरता भासू शकते. अशा पार्श्वभूमीवर प्रवरा मेडिकल ट्रस्ट, लोणी संचलित प्रवरा ग्रामीण रुग्णालय यांना ह्दय शस्त्रक्रियेकरीता लागणाऱ्या यंत्रसामुग्री (कॅथलॅब) खरेदीसाठी रक्कम रु.४ कोटी अनुदान देणे उचित होणार नाही. सबब उपरोक्त प्रस्ताव अमान्य करणेत आला.**

(कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)

---

(५) निर्णय क्र.४९-

यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, प्रवरा मेडिकल ट्रस्ट, लोणी संचलित प्रवरा ग्रामीण रुग्णालय यांनी मागणी केलेल्या ह्दय शस्त्रक्रियेकरीता लागणाऱ्या यंत्रसामुग्रीच्या विवरणाची मागणी त्यांचेकडून करणेत यावी. (कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)

**याऐवजी खालीलप्रमाणे वाचण्यात यावे.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवास प्रारंभ झालेला असून मा.मुख्यमंत्री महोदय यांचे अध्यक्षतेखालील कृती आराखडा समितीने या महोत्सवासाठी एकूण रु.३०२३ कोटी मात्रच्या कृती आराखडयास मान्यता दिलेली आहे. परंतु सदरहू निधी अद्याप प्राप्त नाही. या महोत्सवामध्ये विविध कार्यक्रमांचे आयोजन करणे व साईभक्तांना पायाभूत सोयी-सुविधा पुरविणेकामी संस्थानचा मोठया प्रमाणावर निधी खर्च होणार असून संस्थानला निधीची कमतरता भासू शकते. अशा पार्श्वभूमीवर अहमदनगर जिल्हयातील नविन अंगणवाडी केंद्र बांधकाम अपुर्ण अंगणवाडी केंद्र इमारत व अंगणवाडी केंद्र दुरुस्तीसाठी रक्कम रु.३० कोटी निधी देणे उचित होणार नाही. सबब उपरोक्त प्रस्ताव अमान्य करणेत आला.**

(कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)

---

(६) निर्णय क्र.७४-

पादुका दर्शन सोहळयासाठी प्राप्त होणाऱ्या अर्जांची छाननी करणेसाठी मा.व्यवस्थापन समितीच्या दिनांक २० ऑगष्ट, २०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.६८७ मध्ये ठरलेनुसार गठीत करणेत आलेली समिती आजचे सभेत रद्द करणेत आली व पादुका दर्शन सोहळयाचे आयोजनासाठी येणाऱ्या अर्जांची छाननी यापुढे स्थानिक उपसमिती सभेसमोर करणेत यावी, असे ठरले. (कार्यवाही- समाधी शताब्दी कक्षप्रमुख)

**याऐवजी खालीलप्रमाणे वाचण्यात यावे.**

**आजचे सभेत सदरहू निर्णय क्र.७४ रद्द करणेत आला व पादुका दर्शन सोहळयासाठी प्राप्त होणाऱ्या अर्जांची छाननी मा.व्यवस्थापन समितीच्या दिनांक २० ऑगष्ट, २०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.६८७ मध्ये ठरलेनुसार पुढील कार्यवाही करणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही- समाधी शताब्दी कक्षप्रमुख)

---

विषय नं.०२ **दिनांक २२.०१.२०१८ रोजी शिर्डी येथे झालेल्या स्थानिक उपसमिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**

निर्णय क्र.७६ दिनांक २२.०१.२०१८ रोजी शिर्डी येथे झालेल्या स्थानिक उपसमिती सभेच्या इतिवृत्ताच्या प्रती सर्व मा.सदस्यांना सभेत पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात येऊन, या इतिवृत्तातील खालील शिफारशींना पुष्टी देण्यात आली.

०१ **श्री साई समाधी शताब्दी महोत्सव २०१७-१८ करीता श्री साई मंदिर, मंदिर परिसरात विद्युत रोषणाई व लाईट इफेक्ट देणेसाठी मटेरीअल खरेदी करणेकामी उघडण्यात आलेल्या निविदांवर चर्चा/ वाटाघाटी करुन निर्णय होणेबाबत.**

अधिनियम २००४ मधील तरतूद क्र.२१-१ (क) नुसार समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा नियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही एक प्रयोजनासाठी करण्यात येईल :-

(क). मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन.

वरील अधिनियमास अनुसरुन खालीलप्रमाणे प्रस्ताव सादर करीत आहोत.

**प्रस्ताव:-** मा.व्यवस्थापन समितीचे दि.२५-०७-२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.५८१ अन्वये “श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव” २०१७-२०१८ करीता मंदिर व मंदिर परिसराच्या सर्व महाव्दारांवर समाधी शताब्दी कालावधीमध्ये संस्थानमार्फत लाईट इफेक्ट करण्यात यावे. यासाठी आवश्यक असलेले साहित्य खरेदी करणेकामी विहित पध्दतीने ई-निविदा मागविणेस व त्याकामी येणा-या सर्वसमावेशक खर्चास मान्यता देण्यात आली. (अंदाजे रक्कम रु. ९२,६९,५००/-)

त्यानुसार सदर कामाचे ऑनलाईन निविदा मागविणेकामी वर्तमानपत्रात जाहिरात देणेसाठी जनसंपर्क विभागामार्फत महाराष्ट्र शासनाच्या माहिती तंत्रज्ञान विभागाकडे (महाटेंडर) कळविण्यात आले होते. महाराष्ट्र शासनाच्या माहिती तंत्रज्ञान विभागामार्फत दि.१३-०९-२०१७ रोजी दै.पुढारी, पुणे व मुंबई, लाईफ ३६५, पुणे व हिन्दुस्थान टाईम्स, पुणे या वर्तमानपत्रात जाहिरात देण्यात आली होती. तसेच संस्थानचे संकेतस्थळावर दि.०७-०९-२०१७ रोजी जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली होती. त्याबाबत माहिती तंत्रज्ञान विभागाने दि.०७-०९-२०१७ रोजी वर्कशिट नंबर-५०० ई-मेलव्दारे कळविला आहे. तसेच ३७ ठेकेदारांना संस्थानमधून ई-मेल व्दारे दि.२१-०९-२०१७ रोजी जाहिरात पाठविण्यात आली होती. तसेच महाराष्ट्र शासनाच्या www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाईन निविदा मागविणेकामी टेंडर नोटीस व टेंडर डाक्युमेंट दि.१२-०९-२०१७ रोजी अपलोड करण्यात आले होते. निविदा ऑनलाईन डाऊन लोडींगसाठी दि.१४-०९-२०१७ रोजी सकाळी ११.०० वाजेपासून उपलब्ध करण्यात आली होती. तसेच निविदा ऑनलाईन दाखल करण्याची अंतिम मुदत दि. २७-०९-२०१७ रोजी सायं ०५.०० वाजेपर्यंत ठेवण्यात आली होती.

दि.२७-०९-२०१७ रोजी संध्याकाळी ई-टेंडर सिस्टिममध्ये ई-निविदेची संख्या ई.डी.पी.ई-टेंडरींग विभागामार्फत चेक केली असता ई-टेंडर सिस्टिममध्ये ०१ ई-निविदा अपलोड केल्याचे आढळून आलेले होते. परंतू दि.०१-१२-२०१६ रोजीचे शासन खरेदी नियमावलीतील मुद्दा क्र.४.४.३.१ नुसार निविदा स्पर्धात्मक होणेसाठी कमीत-कमी तीन निविदाकार असणे आवश्यक आहे. त्यामुळे विद्युत विभागाचे दि.०४-१०-२०१७ रोजीचे मंजूर टिपणीन्वये सदर कामासाठी पहिले वेळेस फेर ई-निविदा मागविण्यात आलेल्या होत्या. महाराष्ट्र शासनाच्या माहिती तंत्रज्ञान विभागामार्फत दि.१२-१०-२०१७ रोजी दै.पुण्यनगरी, पुणे व दै.सामना, पुणे या वर्तमानपत्रात जाहिरात देण्यात आली होती. तसेच संस्थानचे संकेतस्थळावर दि.१६-१०-२०१७ रोजी जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली होती. त्याबाबत माहिती तंत्रज्ञान विभागाने दि.१६-१०-२०१७ रोजी वर्कशिट नंबर-६०४ ई-मेलव्दारे कळविला आहे. दि.१३-१०-२०१७ व दि.१६-१०-२०१७ रोजी ३७ ठेकेदारांना संस्थानमधून ई-मेलव्दारे जाहिरात पाठविण्यात आली होती. तसेच महाराष्ट्र शासनाच्या www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाईन निविदा मागविणेकामी टेंडर नोटीस व टेंडर डाक्युमेंट दि.१२-१०-२०१७ रोजी अपलोड करण्यात आले होते. निविदा ऑनलाईन डाऊन लोडींगसाठी दि.१६-१०-२०१७ रोजी सकाळी १०.०० वाजेपासून उपलब्ध करण्यात आली होती. तसेच निविदा ऑनलाईन दाखल करण्याची अंतिम मुदत दि. २६-१०-२०१७ रोजी सायं ०५.०० वाजेपर्यंत ठेवण्यात आली होती.

दि.२६-१०-२०१७ रोजी संध्याकाळी ई-टेंडर सिस्टिममध्ये ई-निविदेची संख्या ई.डी.पी.ई-टेंडरींग विभागामार्फत चेक केली असता ई-टेंडर सिस्टिममध्ये ०१ ई-निविदा अपलोड केल्याचे आढळून आलेले होते. त्यामुळे विद्युत विभागाचे दि.३०-१०-२०१७ रोजीचे मंजूर टिपणीन्वये तिसरे वेळेस फेर ई-निविदा मागविणेकामी महाराष्ट्र शासनाच्या माहिती तंत्रज्ञान विभागामार्फत दि.२१-११-२०१७ रोजी दै.सामना, मुंबई, लाईफ ३६५, पुणे व दै.पुढारी, पुणे या वर्तमानपत्रात जाहिरात देण्यात आली होती. तसेच संस्थानचे संकेतस्थळावर दि.२०-११-२०१७ रोजी जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली होती. दि.१३-११-२०१७, दि.२०-११-२०१७ तसेच दि.३०-११-२०१७ रोजी ४० ठेकेदारांना संस्थानमधून ई-मेल व्दारे जाहिरात पाठविण्यात आली होती. तसेच महाराष्ट्र शासनाच्या www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाईन निविदा मागविणेकामी टेंडर नोटीस व टेंडर डाक्युमेंट दिनांक १६-११-२०१७ रोजी अपलोड करण्यात आले होते. निविदा ऑनलाईन डाऊन लोडींगसाठी दि.२०-११-२०१७ रोजी सकाळी १०.०० वाजेपासून उपलब्ध करण्यात आली होती. तसेच निविदा ऑनलाईन दाखल करण्याची अंतिम मुदत दि.०४-१२-२०१७ रोजी सायं ०५.०० वाजेपर्यंत ठेवण्यात आली होती. दि.०४-१२-२०१७ रोजी संध्याकाळी ई-टेंडर सिस्टिममध्ये ई-निविदेची संख्या ई.डी.पी.ई-टेंडरींग विभागामार्फत चेक केली असता ई-टेंडर सिस्टिममध्ये ०२ ई-निविदा अपलोड केल्याचे आढळून आलेले होते. त्यामुळे विद्युत विभागाचे दि.०५-१२-२०१७ रोजीचे मंजूर टिपणीन्वये तिसरे वेळेस बोलविणेत आलेले फेर ई-निविदेस दि.०५-१२-२०१७ ते दि.१२-१२-२०१७ अखेर पहिले वेळेस मुदतवाढ देण्यात आली होती. तसेच संस्थानचे संकेतस्थळावर दि.०५-१२-२०१७ रोजी जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली होती. त्याबाबत माहिती तंत्रज्ञान विभागाने दि.०५-१२-२०१७ रोजी वर्कशिट नंबर-७५३ ई-मेलव्दारे कळविला आहे. दि.०५-१२-२०१७ रोजी ४२ ठेकेदारांना ई-मेल व्दारे जाहिरात पाठविण्यात आली होती. दि.१२-१२-२०१७ रोजी संध्याकाळी ई-टेंडर सिस्टिममध्ये ई-निविदेची संख्या ई.डी.पी.ई-टेंडरींग विभागामार्फत चेक केली असता ई-टेंडर सिस्टिममध्ये ०३ ई-निविदा अपलोड केल्याचे आढळून आलेले होते.

ऑनलाईन अपलोड करण्यात आलेल्या तीन निविदाधारकांचे तांत्रिक ई-निविदा दि.१९-१२-२०१७ रोजी मा.खरेदी समितीचे सभेत उघडून निविदाधारकांच्या निविदा फी, बयाणा रक्कम तसेच कागदपत्राची तपासणी संस्थानचे अंतर्गत लेखापरिक्षण विभागामार्फत करण्यात आलेली असून तीनही निविदाधारक पात्र झालेले आहे.

**मागणी:-** "श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव" २०१७-२०१८ करीता श्री साई मंदिर, मंदिर परीसरात विद्युत रोषणाई व लाईट इफेक्ट देणेसाठी मटेरियल खरेदी करणेकामी दि.१९-१२-२०१७ रोजी खरेदी समितीचे सभेत उघडण्यात आलेल्या पात्र तांत्रिक निविदाधारकांचा तपशील खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | निविदाधारकाचे नांव | शेरा |
|---|---|---|
| १ | मे.एनडीएस आर्ट वर्ल्ड प्रा.लि., मुंबई | पात्र. |
| २ | मे.निकिता एसबीएस को-ऑपरेटिव्ह सोसायटी लि., औरंगाबाद | पात्र. |
| ३ | मे.श्री बनशंकरी एन्टरप्राईजेस, डोंबिवली (ई) | पात्र. |

उपरोक्तप्रमाणे "श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव" २०१७-२०१८ करीता श्री साई मंदिर, मंदिर परीसरात विद्युत रोषणाई व लाईट इफेक्ट देणेसाठी मटेरियल खरेदी करणेकामी तांत्रिक निविदेमध्ये पात्र झालेल्या ०३ ई-निविदा (कमर्शियल बीड) दि.११-०१-२०१७ रोजी मा.खरेदी समितीचे सभेसमोर उपस्थित निविदाधारकासमक्ष उघडणेत येऊन यामधील मूळ दरांचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आलेला आहे.

| अ.क्र. | निविदाधारकाचे नांव | निविदाधारकाने ई-निविदेत दिलेले दर |
|---|---|---|
| १ | मे.निकिता एसबीएस को-ऑपरेटिव्ह सोसायटी लि., औरंगाबाद | रु. २,२५,०४,६००/- |
| २ | मे.एनडीएस आर्ट वर्ल्ड प्रा.लि., मुंबई | रु. १,३८,५७,३००/- |
| **३** | **मे.श्री बनशंकरी एन्टरप्राईजेस, डोंबिवली (ई)** | **रु. ८७,२६,१५०/-** |

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत:-** "श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव" २०१७-२०१८ करीता श्री साई मंदिर, मंदिर परीसरात विद्युत रोषणाई व लाईट इफेक्ट देणेसाठी मटेरियल खरेदी करणेकामी दि.११-०१-२०१८ रोजी झालेल्या मा.खरेदी समितीचे सभेत उघडण्यात आलेल्या ई-निविदा (कमर्शियल बीड) नुसार मे.श्री बनशंकरी एन्टरप्राईजेस, डोंबिवली (ईस्ट) यांचे दर न्युनतम येत असून त्यांचेशी मा.स्थानिक उप समितीचे सभेत चर्चा/ वाटाघाटी करुन निर्णय होणेस विनंती.

**श्री साई समाधी शताब्दी महोत्सव २०१७-१८ करीता श्री साई मंदिर, मंदिर परिसरात विद्युत रोषणाई व लाईट इफेक्ट देणेसाठी मटेरीअल खरेदी करणेकामी राबविणेत आलेल्या ई-निविदा प्रक्रियेमधील निम्नतम दरधारक श्री.बनशंकरी एन्टरप्राईजेस, डोंबिवली (ईस्ट) हे आजचे स्थानिक उपसमिती सभेसमोर चर्चेसाठी उपस्थित होते. ई-निविदेच्या तुलनात्मक तक्त्यामध्ये अ.नं.५ चे (PVC Copper Unarm Cable) बंडलसाठी त्यांनी प्रती नग रु.४७,९५२/- मात्र दर दिलेले आहेत. हे दर बाजारभावापेक्षा अनेक पटीने जास्त आहेत याबाबत विचारणा केली असता, ई-निविदेमधील अ.नं.१ ते अ.नं.१० पर्यंतच्या सर्व साहित्यांसाठीच्या ए.एम.सी. चे दर अ.नं.५ च्या साहित्यामध्ये समाविष्ठ केलेले असल्याचे त्यांनी सभेसमोर सांगितले व चर्चेअंती एकत्रित मुळ दरावर २% सुट देऊ केली.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साई समाधी शताब्दी महोत्सव २०१७-१८ करीता श्री साई मंदिर, मंदिर परिसरात विद्युत रोषणाई व लाईट इफेक्ट देणे व मटेरीअल खरेदी करणेकामी श्री.बनशंकरी एन्टरप्राईजेस, डोंबिवली (ईस्ट) यांचे एकत्रित रु.८५,५१,६२७/- मात्र अंतीम दर स्विकारणेत यावे. तसेच श्री रामनवमी उत्सव-२०१८ पुर्वी सदरहू काम पुर्ण होणेचा उपसमितीचा मानस असल्यामुळे, संबंधीतास तात्काळ कार्यादेश देण्यात यावा व यास व्यवस्थापन समितीची कार्योत्तर मान्यता घेण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- विद्युत विभागप्रमुख)

---

०२ **सन २०१७-१८ करीता मोतीचुर लाडू, सुटी बूंदी व बर्फी प्रसाद बनविणेकामी मागविण्यात आलेल्या ई-निविदांमधील न्युनतम दरधारकांसोबत (L1) चर्चा वाटाघाटी करुन अंतीम कार्यादेश देणेकामी मान्यता मिळणेबाबत.**

**अधिनियम २००४ मधील तरतुद- २१(१) (घ)-** सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४ (भाग-४) मध्ये महाराष्ट्र विधान मंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रस्तावित केलेले अध्यादेश व केलेले विनियममधील २१ (१घ) नुसार भक्तांना जेवण पुरविणे आणि अन्नछत्र चालविणे.

**प्रस्ताविक-** श्री साईभक्तांना प्रसादरुपी वितरण करण्यात येणारे मोतीचुर लाडु, मंदिर दर्शन रांगेत वाटप करण्यात येणारी सुटी बुंदी तसेच प्रसादालयात भोजनात व अन्नपाकीटामध्ये मिष्ठान्न म्हणुन देण्यात येणारी बर्फी प्रसाद बनविणेकामी सन २०१७-१८ करीता ऑनलाईन फेर ई-निविदा मागविण्यात आल्या आहेत. त्यानुसार खालील तपशिलाप्रमाणे एकुण तीन ई निविदा प्राप्त झालेल्या होत्या.

१. रणजीत हॉस्पिटॅलिटी सर्व्हीसेस, व्दारा श्री प्रमोद रामचंद्र सोनवणे, पुणे

२. श्री साई केटरर्स, व्दारा शकुंतला नामदेव शिंदे, श्रीरामपूर

३. दि यशोधरा महीला सहकारी औद्योगिक उत्पादक संस्था मर्या, व्दारा सौ.संगिता अनिल दशपुते, नासिक

उपरोक्तप्रमाणे संस्थानला प्राप्त झालेल्या तीनही निविदाधारकांच्या ई निविदांचे तांत्रिक लिफाफे (Technical Bid) दि.११/०१/२०१८ रोजीचे खरेदी समितीच्या सभेत उघडण्यात आली. त्यामधे प्राप्त झालेल्या तीनही ई- निविदाधारकांच्या कागदपत्रांची पडताळणी केली असता, उपरोक्त सर्व निविदा तांत्रिक दृष्टया पात्र ठरल्या आहेत.

सदरहु पात्र झालेल्या तिनही निविदाधारकांची व्यापारी दरपत्रके (Commercial Bid) दि.१७/०१/२०१८ रोजीचे खरेदी समितीच्या सभेत उघडण्यात येऊन न्युनतम दर असलेल्या निविदाधारकास सन २०१७ -१८ करीता कार्यादेश देता येईल.

उपरोक्तप्रमाणे पात्र निविदाधारकांची व्यापारी दरपत्रके (Commercial Bid) दि.१७/०१/२०१८ रोजीचे खरेदी समितीचे सभेसमोर व उपस्थित निविदाधारकांसमक्ष उघडणेत आली असुन, त्यामधील मुळ दरांचा तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला आहे. त्याचा तपशील खालीलप्रमाणे—

| अनं. | तपशील | दि यशोधरा महिला सह.उत्पा.औद्यो. संस्था, नाशिक | रणजीत हॉस्पिटॅलिटी सर्व्हीसेस, पुणे | श्री साई केटरर्स, श्रीरामपुर |
|---|---|---|---|---|
| | | निविदेमधील दर रूपये | | |
| १ | गावरान तुपातील मोतीचुर बुंदीचे प्रसाद लाडू तयार करुन सुकविणे, पॅकिंग करणे इ. चा दर प्रती १००० नग लाडुस (५० ग्रॅम वजनाचा एक लाडु) हाताने पॅकींग करणे. | ३५९/- | ३८५/- | <u>२७१/-</u> |
| २ | गावरान तुपातील मोतीचुर बुंदीचे प्रसाद लाडू तयार करुन सुकविणे, पॅकिंग करणे इ. चा दर प्रती १००० नग लाडुस (५० ग्रॅम वजनाचा एक लाडु) मशिनने पॅकींग करणे. | ३२३/- | ३३२/- | <u>२२१/-</u> |
| ३ | गावरान तुपातील सुट्टी बुंदी प्रसाद तयार करुन सुकविणे, पॅकिंग करणे इ. चा दर प्रती १००० नग पाकीटांस (अंदाजे ५० ग्रॅम वजनाचे एक पाकीट) हाताने पॅकींग करणे | ३७७/- | ३९९/- | <u>२८८/-</u> |
| ४ | गावरान तुपातील सुट्टी बुंदी प्रसाद तयार करुन सुकविणे , पॅकिंग करणे इ. चा दर प्रती १००० नग पाकीटांस (अंदाजे ५० ग्रॅम वजनाचे एक पाकीट) मशिनने पॅकींग करणे. | ३५९/- | ३६८/- | <u>२२१/-</u> |
| ५ | वनस्पती तुपातील रवा, खोबरा बर्फी तयार करणे (०१ क्विंटल साखरेचे) | <u>२७८/-</u> | ४६८/- | ३१४/- |

**विभागाचा स्पष्ट अभिप्राय-** सन २०१७-१८ मध्ये साईभक्तांना प्रसादरूपी वितरीत करण्यात येणारे मोतीचुर बुंदीचे लाडू, दर्शन रांगेतील साईभक्तांना मोफत वाटप करण्यात येणारी सुटी बुंदी तसेच प्रसादालयात

भोजनात मिष्ठान्न म्हणुन बनवुन देण्यात येणारी बर्फी बनविणेकामी उपरोक्तप्रमाणे नमुद केलेल्या तुलनात्मक तक्त्यामधील गडद व आधोरेखीत केलेल्या न्युनतम दरधारकांबरोबर चर्चा-वाटाघाटी करणेसाठी बोलाविणेस व अंतीम दर ठरवुन त्यावर निर्णय होऊन, त्यानुसार न्युनतम दरधारकांस अंतीम कार्यादेश देणेकामी मान्यता मिळणेसाठी सदरचा प्रस्ताव मा.उपसमितीच्या सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**सन २०१७-१८ करीता मोतीचुर लाडू, सुटी बूंदी व बर्फी प्रसाद बनविणेकामी निम्नतम दरधारक श्री साई केटरर्स, श्रीरामपूर व दि यशोधरा महिला सह. उत्पा.औद्यो.संस्था, नाशिक हे आजचे स्थानिक उपसमिती सभेसमोर चर्चेसाठी उपस्थित होते, सभेने त्यांचेशी दर कमी करणेबाबत चर्चा केली असता त्यांनी दर कमी करणेस असमर्थता दर्शविली.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, सन २०१७-१८ करीता मोतीचुर लाडू, सुटी बूंदी व बर्फी प्रसाद बनविणेकामी उपरोक्त तुलनात्मक तक्त्यामधील अ.नं.१ ते ४ करीता श्री साई केटरर्स, श्रीरामपूर व अ.नं.५ करीता दि यशोधरा महिला सह. उत्पा. औद्यो. संस्था, नाशिक यांचे गडद व अधोरेखीत केलेले निम्नतम दर स्विकारणेत येऊन त्यांना कार्यादेश देणेत यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही-प्र.अधिक्षक, लाडू व बर्फी प्रसाद निर्मिती विभाग)

---

०३ **श्री साई प्रसादालयामार्फत मनुष्यबळाव्दारे आऊटसोर्सिंग पध्दतीने चपात्या (स्वामी नारायण पोळी) पुरी तयार करणेबाबत प्राप्त निम्नतम दरधारकास कार्यादेश देणेबाबत.**

**अधिनियम २००४ मधील तरतुद** :- सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रं १४.(भाग ४) मध्ये महाराष्ट्र विधान मंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रस्तावित केलेले अध्यादेश व केलेले विनीयम मधील २१ (१ घ ) नूसार भक्तांना जेवण पुरविणे व अन्नछत्र चालविणे.

**प्रास्तविक** :- मा.व्यवस्थापन समिती सभा दि.२०/०८/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.७४३ नूसार, "सन २०१७-२०१८ करीता मनुष्यबळाव्दारे चपाती/पुरी तयार करुन घेणेसाठी राबविणेत आलेल्या ई-निविदा प्रक्रीयेमधील चपाती तयार करणेकामीचे निम्नतम दरधारक दि.यशोधरा महिला सह.औद्यो.उत्पा.संस्था, नाशिक या संस्थेने सदरचे काम मक्तेदारी पध्दतीने घेतलेले आहे, त्यामुळे किमान वेतन कायद्याप्रमाणे कामगारांना वेतन देणे शक्य होणार नाही, असे नमूद करुन सदर काम करणेस असर्थतता व्यक्त केलेली होती. सबब सदरहु ई-निविदा प्रक्रिया रद्द करुन मनुष्यबळाव्दारे चपाती व पुरी तयार करुन घेणेकामी एकत्रित फेर ई-निविदा प्रक्रिया राबविणेत यावी, असे ठरलेले होते.

श्री साई प्रसादालयात भक्तांना प्रसादभोजनामध्ये मनुष्यबळाव्दारे चपातीपुरी तयार करुन पुरविणेच्या उपरोक्त कामासाठी ई-निविदा जाहीरात दि.२०/११/२०१७ रोजी प्रसिध्द केल्यानंतर विहीत मुदत कालावधी दि.२९/११/२०१७ पर्यंत फक्त ०२ टेंडर प्राप्त झालेले होते. परंतू शासन नियमानूसार कमीत कमी ०३ ई निविदा पात्र असणे गरजेचे असल्यामुळे आणखी ई-निविदा प्राप्त होण्यासाठी टेंडर भरणेच्या विहीत कालावधीमध्ये ऑनलाईन टेंडर भरणेच्या मुदतीत पुन्हा दि.०८/१२/२०१७ रोजीपर्यंत दुस-यांदा मुदतवाढ देण्यात आली. तरी देखील फक्त ०२ टेंडर प्राप्त होते. त्यामुळे टेंडर प्राप्त होणेसाठी सदर कालावधीमध्ये पुन्हा तिस-यांदा दि.१३/१२/२०१७ रोजीपर्यंत मुदतवाढ देण्यात आली. तरी देखील फक्त ०२ टेंडर प्राप्त होते.

सदरच्या प्राप्त ०२ ई-निविदांचे तांत्रिक कोटेशन मा.खरेदी समिती दि.१९/१२/२०१७ रोजीचे खरेदी समिती सभेत उघडणेत असून त्यामध्ये पात्र निविदाधारकांच्या निविदा (दरपत्रक) दि.११/०१/२०१८ रोजीचे मा.खरेदी समिती सभेपुढे उघडणेत आलेले आहेत. त्यात उपरोक्त निविदाधारक यांनी खालीलप्रमाणे दर दिलेले आहेत.

| अ. नं. | कामाचा तपशिल | संख्या तपशिल | श्री साई केटरर्स, श्रीरामपूर | दि.यशोधरा महिला सह. औद्योगिक उत्पा. संस्था, नाशिक |
|---|---|---|---|---|
| १. | श्री साई प्रसादालयात मनुष्यबळाव्दारे आऊटसोर्सिंग पध्दतीने चपात्या (स्वामी नारायण पोळी)/पुरी तयार करुन देणेकामी प्रति क्विं.कोरडा गहु आटा +मैदा करीता जीएसटी सह सर्व करांसहीत मजुरी दर रुपये | प्रति ०१ क्विंटल | रु.१२२१/- | रु. १९१६/- |
| | **प्रति एक क्विंटल कोरडा गहुआटा+मैदा करीता जीएसटीसह सर्व करांसहीत एकूण मजुरी रक्कम रुपये =** | | रु.१२२१/- | रु.१९१६/- |

**मागणी:-** उपरोक्त प्रास्तविक मधील दराचे तुलनात्मक तक्त्यानूसार, श्री साई प्रसादालयात मनुष्यबळाव्दारे आऊटसोर्सिंग पध्दतीने चपात्या (स्वामी नारायण पोळी)/पुरी तयार करणेकामी श्री साई केटरर्स, श्रीरामपूर यांचे प्रति क्विंटल आटा +मैदा करीता जीएसटी सह सर्व करांसहीत मजुरी रक्कम रुपये १,२२१/- (अक्षरी रु.एक हजार दोनशे एकवीस मात्र) असे निम्नतम L1 दर दिलेले आहेत. त्यामुळे वर तक्तयात दर्शविलेप्रमाणे श्री साई प्रसादालयात मनुष्यबळाव्दारे आऊटसोर्सिंग पध्दतीने चपात्या (स्वामी नारायण पोळी)/पुरी तयार करणेकामी श्री साई केटरर्स, श्रीरामपूर यांना मा.व्यवस्थापन उपसमिती सभेपुढे बोलावून निम्नतम दरधारकास कार्यादेश देणेकामी चर्चा/वाटाघाटी करावी लागणार आहेत.

**संस्थान अधिनियम ठराव यानूसार अनुमान/:-** आर्थिक

**विभागाचा स्पष्ट अभिप्राय/ मत:-** तरी प्रास्तविक व मागणी नूसार, श्री साई प्रसादालयात मनुष्यबळाव्दारे आऊटसोर्सिंग पध्दतीने चपात्या (स्वामी नारायण पोळी)/पुरी तयार करणेकामी श्री साई केटरर्स, श्रीरामपूर यांचे प्रति क्विंटल आटा +मैदा करीता जीएसटी सह सर्व करांसहीत मजुरी रक्कम रुपये १,२२१/- (अक्षरी रु.एक हजार दोनशे एकवीस मात्र) असे निम्नतम L1 निम्नतम आलेले आहेत. त्यामुळे श्री साई केटरर्स, श्रीरामपूर यांना मा.व्यवस्थापन उपसमिती सभेपुढे बोलावून चर्चा/वाटाघाटी करुन कार्यादेश देणेकामी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन उपसमिती सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**श्री साई प्रसादालयामार्फत मनुष्यबळाव्दारे आऊटसोर्सिंग पध्दतीने चपात्या (स्वामी नारायण पोळी) पुरी तयार करणेकामी राबविणेत आलेल्या ई-निविदा प्रक्रियेमधील निम्नतम दरधारक श्री साई केटरर्स, श्रीरामपूर हे आजचे स्थानिक उपसमिती सभेसमोर चर्चेसाठी उपस्थित होते, सभेने त्यांचेशी दर कमी करणेबाबत चर्चा केली असता त्यांनी दर कमी करणेस असमर्थता दर्शविली.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साई प्रसादालयामार्फत मनुष्यबळाव्दारे आऊटसोर्सिंग पध्दतीने चपात्या (स्वामी नारायण पोळी) पुरी तयार करणेकामी श्री साई केटरर्स, श्रीरामपूर यांचे प्रति क्विंटल आटा+मैदा करीता जीएसटी सह मजुरी रक्कम रु.१,२२१/- मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देणेत यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, प्रसादालय विभाग)

---

०४ **श्री साई प्रसादालयातील चपाती मशिनवर मनुष्यबळ पुरवून चपाती तयार करुन देणेबाबत प्राप्त निम्नतम दरधारकास कार्यादेश देणेबाबत.**

**अधिनियम २००४ मधील तरतुद:-** सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रं १४.(भाग ४) मध्ये महाराष्ट्र विधान मंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रस्तावित केलेले अध्यादेश व केलेले विनीयम मधील २१ (१ घ ) नूसार भक्तांना जेवण पुरविणे व अन्नछत्र चालविणे .

**प्रास्तविक:-** मा.व्यवस्थापन समिती सभा दि.२५/०७/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.५९१ नूसार, "श्री साई प्रसादालयामध्ये चपाती मशिनव्दारे चपाती तयार करणेकामी "ठेकेदारामार्फतच चपाती मशिन चालविणे संस्थानचे हितावह आहे. करीता यापुर्वी झालेल्या ठरावाबाबत फेरविचार होवून ई-निविदा प्रक्रीया करणेस व सदर प्रक्रिया पुर्ण होवून कार्यादेश देईपावेतोच्या कालावधीसाठी आहे त्याच ठेकेदारास पुर्वीचेच मंजूर दरात व निविदेतील/ करारनाम्यातील अटी/शर्तीस अधिन राहून मुदतवाढ देणकामीचे 'अ' प्रमाणे प्रस्तावास मान्यता देण्यात आलेली आहे."

श्री साई प्रसादालयातील चपाती मशिनवर मनुष्यबळ पुरवून चपाती तयार करुन पुरविणेच्या कामासाठी ई-निविदा जाहीरात दि.२०/११/२०१७ रोजी प्रसिध्द करण्यात आलेली होती. त्यानूसार विहीत मुदत कालावधीत दि.२९/११/२०१७ पर्यंत ०३ ई- टेंडर प्राप्त झालेले होते. परंतू शासन नियमानूसार कमीत कमी ०३ ई निविदा पात्र असणे गरजेचे असल्यामुळे व प्राप्त ३ टेंडरमध्ये एखादी निविदा अपात्र होण्याची शक्यता येत नसल्यामुळे आणखी ई-निविदा प्राप्त होण्यासाठी टेंडर भरणेच्या विहीत कालावधीमध्ये ऑनलाईन टेंडर भरणेच्या मुदतीत पुन्हा दि.०८/१२/२०१७ रोजीपर्यंत दुस-यांदा मुदतवाढ देण्यात आली. तरीदेखील फक्त ०३ टेंडर प्राप्त होते. त्यामुळे टेंडर प्राप्त होणेसाठी सदर कालावधीमध्ये पुन्हा तिस-यांदा दि.१३/१२/२०१७ रोजीपर्यंत मुदतवाढ देण्यात आली. तरी देखील फक्त ०३ च टेंडर प्राप्त होते.

सदरच्या प्राप्त ०३ ई-निविदांचे तांत्रिक कोटेशन मा.खरेदी समिती दि.१९/१२/२०१७ रोजीचे खरेदी समिती सभेत उघडणेत असून त्यामध्ये ०२ ई-निविदा पात्र ठरलेल्या आहेत. उपरोक्त ०२ पात्र निविदाधारकांच्या निविदा (दरपत्रके) दि.११/०१/२०१८ रोजीचे मा.खरेदी समिती सभेपुढे उघडणेत आलेले आहेत. त्यात उपरोक्त निविदाधारक यांनी खालीलप्रमाणे दर दिलेले आहेत.

| अं. नं. | कामाचा तपशिल | संख्या तपशिल | श्री साई केटरर्स, श्रीरामपूर | दि.यशोधरा महिला सह. औद्योगिक उत्पा. संस्था, नाशिक |
|---|---|---|---|---|
| १. | चपाती मशिनवर चपाती तयार करुन देणेकामी प्रति क्विंटल कोरडा गहु आटा +मैदा करीता जीएसटी सह सर्व करांसहीत मजुरी दर रुपये | प्रति ०१ क्विंटल | रु.३६१/- | रु.८००/- |
| | **प्रति एक क्विंटल आटा+मैदा करीता जीएसटीसह सर्व करांसहीत एकूण मजुरी रक्कम रुपये =** | | रु.३६१/- | रु.८००/- |

**मागणी:-** उपरोक्त प्रास्तविक मधील दराचे तुलनात्मक तक्त्यानूसार, श्री साई प्रसादालयात चपाती मशिनवर आऊटसोर्सिंग पध्दतीने मनुष्यबळ पुरवून चपात्या तयार करणेकामी श्री साई केटरर्स, श्रीरामपूर यांचे प्रति क्विंटल कोरडा गहु आटा +मैदा करीता जीएसटी सह सर्व करांसहीत मजुरी रक्कम रुपये ३,६१/- (अक्षरी रु.तीनशे एकसष्ट मात्र) असे निम्नतम L1 दर दिलेले आहेत. त्यामुळे वर तक्तयात दर्शविलेप्रमाणे श्री साई प्रसादालयात चपाती मशिनवर चपाती तयार करणेकामी श्री साई केटरर्स, श्रीरामपूर यांना मा.व्यवस्थापन उपसमिती सभेपुढे बोलावून कार्यादेश देणेकामी चर्चा/वाटाघाटी करावी लागणार आहेत.

**संस्थान अधिनियम ठराव यानूसार अनुमान/:-** आर्थिक

**विभागाचा स्पष्ट अभिप्राय/मत:-** तरी प्रास्तविक व मागणी नूसार, श्री साई प्रसादालयात चपाती मशिनवर आऊटसोर्सिंग पध्दतीने मनुष्यबळ पुरवून चपात्या तयार करणेकामी श्री साई केटरर्स, श्रीरामपूर यांचे प्रति क्विंटल कोरडा गहुआटा +मैदा करीता जीएसटी सह सर्व करांसहीत मजुरी रक्कम रुपये ३,६१/- (अक्षरी रु.तीनशे ऐकसष्ट मात्र) असे निम्नतम L1 निम्नतम आलेले आहेत. त्यामुळे श्री साई केटरर्स, श्रीरामपूर यांना मा.व्यवस्थापन उपसमिती सभेपुढे बोलावून चर्चा/वाटाघाटी करुन कार्यादेश देणेकामी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन उपसमिती सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**श्री साई प्रसादालयातील चपाती मशिनवर मनुष्यबळ पुरवून चपाती तयार करुन देणेकामी राबविणेत आलेल्या ई-निविदा प्रक्रियेमधील निम्नतम दरधारक श्री साई केटरर्स, श्रीरामपूर यांचे प्रतिनिधी आजचे स्थानिक उपसमिती सभेसमोर चर्चेसाठी उपस्थित होते, सभेने त्यांचेशी दर कमी करणेबाबत चर्चा केली असता, त्यांनी दर कमी करणेस असमर्थता दर्शविली.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साई प्रसादालयातील चपाती मशिनवर मनुष्यबळ पुरवून चपाती तयार करुन देणेकामी निम्नतम दरधारक श्री साई केटरर्स, श्रीरामपूर यांचे प्रति क्विंटल कोरडा गहु आटा +मैदा करीता जीएसटी सह मजुरी रक्कम रु.३६१/- निम्नतम दर स्विकारणेत येऊन त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, प्रसादालय विभाग)

---

०५ **श्री साईबाबा रुग्णालयातील ओ.पी.डी. विभागाकरीता 2D इको मशिन खरेदीकामी तिसऱ्यांदा प्राप्त झालेल्या वाणिज्यीक प्रस्तावांवर निर्णय होणेबाबत.**

सदरहू प्रस्ताव सभेसमोर प्राप्त झाला नाही, याकरीता तो पुढील उपसमिती सभेसमोर सादर करणेत यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

०६ **साईआश्रम भक्तनिवास, साईआश्रम धर्मशाळा, साईउद्यान व साईबाबा भक्तनिवासस्थान, व्दारावती भक्तनिवासस्थान, साईप्रसाद निवासस्थान गेस्ट हाऊस, साईबाबा हॉस्पिटल व साईनाथ हॉस्पिटल इमारत येथील सौर उर्जा सयंत्रणेचे सन २०१८-२०१९ या वर्षाकरीता वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रक्ट (AMC) देणेकामी उघडण्यात आलेल्या ई-निविदांवर पुढील कार्यवाही होणेबाबत.**

मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक २३रोजीचे सभेतील निर्णय क्र २०१७/१०/. ८७९ अन्वये साई आश्रम भक्तनिवास, साई धर्मशाळा, साईउदयान व साईबाबा भक्तनिवासस्थान, द्वारावती भक्तनिवासस्थान, साईप्रसाद निवासस्थान गेस्ट हाऊस, साईबाबा हॉस्पीटल व साईनाथ हॉस्पीटल इमारत येथील एकुण ५११००० लिटर क्षमतेचे सौर उर्जा सयंत्रणेचे एक वर्षाकरीता वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट (AMC) देणेकामी तसेच ६ नग नविन टँक खरेदी करणेकामी येणा-या रक्कम रूपये १६,१४,८९७/- मात्रचे खर्चास मान्यता देणेत आलेली आहे. सदर मान्यते नुसार महाराष्ट्र शासनाच्या www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर ई-निविदा ऑनलाईन डाऊन लोडींगसाठी दिनांक ०६/१२/२०१७ रोजी सकाळी ११:०० वाजेपासून उपलब्ध करणेत आली होती. ई-निविदा

डाऊनलोड करून अपलोड करणेची अंतिम मुदत दिनांक १७/१२/२०१७ रोजी सायंकाळी ०५:०० वाजे पर्यंत देणेत आली होती. त्यानुसार खालील प्रमाणे ईनिविदा प्राप्त झाल्या.

| अ.नं. | ई-निविदाधारकांचे नांव | अ.नं. | ई-निविदाधारकांचे नांव |
|---|---|---|---|
| 1. | M/s. Jain Irrigation System Ltd., Jalgaon | 3. | M/s. Novus Remedies Pvt. Ltd., Mumbai |
| 2. | M/s. Sai Agencies, Shirdi | 4. | M/s. Anu Solar Power Pvt. Ltd., Bengaluru |

वरील प्राप्त ४ ई-निविदेतील तांत्रिक बीड दिनांक २१/१२/२०१७ रोजी खरेदी समितीचे सभेपुढे उघडणेत आलेले आहेत. त्यातील CGST/SGST, PAN, कंपनीचा वार्षिक उलाढाल, सध्या काम करत असलेल्या पुरवठा आदेशासह कामांची यादी, कंपनीचे रजिस्ट्रेशन सर्टिफिकेट, टेंडर फी व ई.डी.एम., अंडर टेकींग सर्टिफिकेट इत्यादी बाबी तपासल्या असून, त्यात वरील ४ तांत्रिक निविदा पात्र झालेल्या आहेत. पात्र निविदांचे आर्थिक (Financial) बीड दिनांक ११/०१/२०१८ रोजी मा. खरेदी समितीचे सभेपुढे उघडणेत आल्या असून, त्यात खालीलप्रमाणे दर प्राप्त झालेले आहेत :

| Sr. No. | Description | Anu Solar Power Private Limited, Bengaluru | Jain Irrigation Systems Limited, Jalgaon | Novus Remedies Pvt. Ltd., Mumbai | **Sai Agencies, Shirdi** |
|---|---|---|---|---|---|
| 1. | Annual Maintenance Contract of Solar hot water system installed in Shri Saibaba Sansthan Trust, Shirdi | 16,17,900/- | 20,09,165/- | 18,54,050/- | **12,82,600/-** |

उपरोक्त आर्थिक (Financial Bid) बीडमधील दरानुसार साई आश्रम भक्तनिवास, साई धर्मशाळा, साईउदयान व साईबाबा भक्तनिवासस्थान, द्वारावती भक्तनिवासस्थान, साईप्रसाद निवासस्थान गेस्ट हाऊस, साईबाबा हॉस्पीटल व साईनाथ हॉस्पीटल इमारत येथील सौर उर्जा सयंत्रणेचे एक वर्ष कालावधीकरीता वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट (AMC) देणे व नविन ६ टॅंक खरेदी करणेकामी मे .साई एजन्सी, शिर्डी यांचे दर रक्कम रुपये १२,८२,६००/- मात्र निम्नत्तम आहे.

तरी साई आश्रम भक्तनिवास, साई धर्मशाळा, साईउदयान व साईबाबा भक्तनिवासस्थान, द्वारावती भक्तनिवासस्थान, साईप्रसाद निवासस्थान गेस्ट हाऊस, साईबाबा हॉस्पीटल व साईनाथ हॉस्पीटल इमारत येथील सौर उर्जा सयंत्रणेचे पुढील एक वर्ष कालावधीकरीता वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट (AMC) देणेकामी निम्नत्तम दरधारक मे. साई एजन्सी, शिर्डी यांचेशी दराबाबत चर्चा वाटा / घाटी करून पुढील कार्यवाही करणेकामी सदरचा प्रस्ताव मा. स्थानिक उप-समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**प्रस्तावितकामी राबविणेत आलेल्या ई-निविदा प्रक्रियेमधील निम्नत्तम दरधारक मे. साई एजन्सी, शिर्डी यांचे प्रतिनिधी आजचे स्थानिक उपसमिती सभेसमोर चर्चेसाठी उपस्थित होते, सभेने त्यांचेशी दर कमी करणेबाबत चर्चे केली असता त्यांनी दर कमी करणेस असमर्थता दर्शविली.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, साईआश्रम भक्तनिवास, साईआश्रम धर्मशाळा, साईउद्यान व साईबाबा भक्तनिवासस्थान, व्दारावती भक्तनिवासस्थान, साईप्रसाद निवासस्थान गेस्ट हाऊस, साईबाबा हॉस्पिटल व साईनाथ हॉस्पिटल इमारत येथील सौर उर्जा सयंत्रणेचे सन २०१८-२०१९ या वर्षाकरीता वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रक्ट (AMC) करणेकामी मे.साई एजन्सी, शिर्डी यांचे एकत्रित रु.१२,८२,६००/- मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- मेकॅनिकल विभागप्रमुख)

---

०७ **श्री साई प्रसादालय व श्री साईआश्रम येथे असणाऱ्या साईटेक प्रोजेक्ट करीता बसविणेत आलेल्या ए.सी. यंत्रणेचे एक वर्षाकरीता वार्षिक सर्व्हिस कॉम्प्रेंसीव्ह कॉन्ट्रॅक्ट (CAMC) देणेकामी उघडण्यात आलेल्या ई-निविदांवर पुढील कार्यवाही होणेबाबत.**

दिनांक ०४.१२.२०१७ रोजीचे मेकॅनिकल विभागाकडील मंजुर टिपणी नुसार श्री साई प्रसादालय व साईआश्रम भक्त निवास येथे असणा-या साईटेक प्राजेक्टकरीता बसविण्यात आलेल्या ए.सी यंत्रणेचे एक वर्षाकरीता वार्षिक कॉम्प्रेसिव्ह सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट (CAMC) देणेकामी येणा-या रक्कम रूपये– ३,९०,८१६/- मात्रचे खर्चास मान्यता देणेत आलेली आहे. सदर मान्यते नुसार महाराष्ट्र शासनाच्या www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर ई-निविदेची जाहीरात अपलोड करण्यात आली होती. यामध्ये ई-निविदा ऑनलाईन डाऊन लोडींगसाठी दिनांक ०६ डिसेंबर, २०१७ रोजी सकाळी ११:०० वाजेपासुन उपलब्ध करण्यात आली होती. तसेच ई-निविदा डाऊनलोड करून, अपलोड करणेसाठी दिनांक १४ डिसेंबर, २०१७ रोजी सायंकाळी ५:०० वा अंतिम मुदत देणेत आली होती. सदर मुदतीत दोनच निविदा प्राप्त झाल्याने निविदेस दिनांक १५ डिसेंबर, २०१७ ते २२ डिसेंबर, २०१७ अखेर मुदत वाढ देणेत आलेली होती. त्यानुसार खालील प्रमाणे ई-निविदा प्राप्त झाल्या.

| अ.नं. | ई-निविदाधारकांचे नाव |
|---|---|
| 1. | M/s. Kailas Refrigeration Works, Mumbai |
| 2. | M/s. Heramb Enterprises, Jalgaon |
| 3. | M/s. Shree Venkateshwara Turnkey Project Solution Pvt Ltd., Pune |

वरील प्राप्त ३ ई-निविदेतील तांत्रिक निविदा (Technical Bid) दिनांक ११ जानेवारी, २०१८ रोजी मा. खरेदी समितीचे सभेपुढे उघडणेत आलेले आहेत. त्यातील CGST/SGST, PAN, कंपनीचा वार्षिक उलाढाल, सध्या काम करत असलेल्या पुरवठा आदेशासह कामांची यादी, कंपनीचे रजिस्ट्रेशन सर्टिफिकेट, टेंडर फी व ई.एम.डी., अंडर टेकींग सर्टिफिकेट इत्यादी बाबी तपासल्या असुन, त्यात वरील तिनही तांत्रिक निविदा पात्र झालेल्या आहेत. या पात्र झालेल्या निविदाधारकांच्या ई-निविदांचे आर्थिक (Financial) बीड दिनांक १७ जानेवारी, २०१८ रोजीचे मा. खरेदी समितीचे सभेपुढे उघडणेत आल्या असुन, त्यात खालीलप्रमाणे दर प्राप्त झालेले आहेत:

| Sr. No. | Description | **Kailas Refrigeration Works, Mumbai** | Heramb Enterprises, Jalgaon | Shree Venkateshwara Turnkey Project Solution Pvt Ltd., Pune |
|---|---|---|---|---|
| 1. | Comprehensive Annual Maintenance Contract of Precision Type A.C. & Split A.C. Installed in Saitech Data Centre of Shri Saibaba Sansthan Trust, Shirdi | 3,48,300/- | 3,78,400/- | 3,66,969/- |
| | **शेरा :** | L1 | L2 | L3 |

उपरोक्त आर्थिक (Financial Bid) बीडमधील दरानुसार श्री साई प्रसादाल व साईआश्रम भक्त निवास येथे असणा-या साईटेक प्राजेक्टकरीता बसविण्यात आलेल्या ए.सी यंत्रणेचे एक वर्षाकरीता वार्षिक कॉम्प्रेसिव्ह सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट (CAMC) देणेकामी मे .कैलास रेफ्रिजरेशन वर्क्स, मुंबई यांचे दर रक्कम रुपये ३,४८,३००/- मात्र निम्नतम आहेत .

तरी श्री साई प्रसादाल व साईआश्रम भक्त निवास येथे असणा-या साईटेक प्राजेक्टकरीता बसविण्यात आलेल्या ए.सी यंत्रणेचे एक वर्षाकरीता वार्षिक कॉम्प्रेसिव्ह सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट (CAMC) देणेकामी निम्नत्तम दरधारक मे.कैलास रेफ्रिजरेशन वर्क्स, मुंबई यांचेशी दराबाबत चर्चा/ वाटाघाटी करून पुढील कार्यवाही करणेकामी सदरचा प्रस्ताव मा. स्थानिक उप-समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**श्री साई प्रसादालय व श्री साईआश्रम येथे असणाऱ्या साईटेक प्रोजेक्ट करीता बसविणेत आलेल्या ए.सी. यंत्रणेचे एक वर्षाकरीता वार्षिक सर्व्हिस कॉम्प्रेसीव्ह कॉन्ट्रॅक्ट (CAMC) देणेकामी राबविणेत आलेल्या ई-निविदा प्रक्रियेमधील निम्नतम दरधारक मे.कैलास रेफ्रिजरेशन वर्क्स, मुंबई हे उपसमिती सभेसमोर चर्चेसाठी अनुपस्थित होते. परंतु त्यांनी ई-निविदेमध्ये दिलेल्या मुळ दरांवर सुट देण्यास ई-मेलद्वारे असमर्थता दर्शविली आहे.**

यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साई प्रसादालय व श्री साईआश्रम येथे असणाऱ्या साईटेक प्रोजेक्ट करीता बसविणेत आलेल्या ए.सी. यंत्रणेचे वार्षिक सर्व्हिस कॉम्प्रेंसीव्ह कॉन्ट्रॅक्ट (CAMC) देणेकामी मे.कैलास रेफ्रिजरेशन वर्क्स, मुंबई यांचे एकत्रित रु.३,४८,३००/- मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही- मेकॅनिकल विभागप्रमुख)

---

०८ **संस्थानचे भक्तनिवास, रुग्णालये, श्री साई प्रसादालय येथे लिफ्टचे वार्षिक सर्व्हिस कॉम्प्रेंसीव्ह कॉन्ट्रॅक्ट (CAMC) देणेकामी उघडण्यात आलेल्या ई-निविदांवर पुढील कार्यवाही होणेबाबत.**

मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक २०/०८/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ७१७ अन्वये संस्थानचे भक्तनिवास, रुग्णालये, श्री साई प्रसादालय येथील लिफ्टचे वार्षिक कॉम्प्रेसिव्ह सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट (CAMC) देणेकामी येणा-या रक्कम रु.१४,८६,८००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली आहे. सदर मान्यतेनुसार दिनांक १३/१०/२०१७ रोजी महाराष्ट्र शासनाच्या www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर ई-निविदेची जाहीरात अपलोड करण्यात आली होती. यामध्ये ई-निविदा ऑनलाईन डाऊन लोडींगसाठी दिनांक १३/१०/२०१७ रोजी सकाळी ११:०० वाजेपासून उपलब्ध करण्यात आली होती. तसेच ई-निविदा डाऊनलोड करून, अपलोड करणेसाठी दिनांक २५/१०/२०१७ रोजी सायंकाळी ५:०० वा अंतिम मुदत देणेत आली होती. सदर कालावधीत दोनच निविदा प्राप्त झालेने निविदा कालावधीस दिनांक २६.१०.२०१७ ते दि. २/११/२०१७ अखेर मुदत वाढ देणेत आली. मात्र याही कालावधीत दोनच निविदा प्राप्त असल्याने दिनांक ३/११/२०१७ ते दि. १०/११/२०१७ अखेर दुस-यांदा मुदतवाढ देणेत आली. याकालावधीत चार ई निविदा प्राप्त झाल्या. प्राप्त झालेल्या ई निविदा टेक्नीकल बीड दिनांक २८/११/२०१७ रोजीचे मा. खरेदी समितीचे सभेमध्ये उघडणेत आले. परंतु मे. एअरझो इंजिनिअरींग प्रा. लि. मुंबई यांचे टेक्नीकल बीड मध्ये व्हायरस असलेने सदरचे डाक्युमेंट ओपन झाले नाही.

त्यामुळे www.mahatenders.gov.in वेबसाईट चे प्रतिनिधि यांनी पाठविलेले ईमेल व दिनांक ८.१२.२०१७ रोजीचे मंजूर टिपणीनुसार दिनांक १४/१२/२०१७ रोजी फेर ई निविदा प्रसिद्ध करणेत आली. ई-निविदा ऑनलाईन डाऊन लोडींगसाठी दिनांक १४/१२/२०१७ रोजी सकाळी ११:०० वाजेपासून उपलब्ध करण्यात आली होती. तसेच ई-निविदा डाऊनलोड करून, अपलोड करणेसाठी दिनांक २२/१२/२०१७ रोजी सायंकाळी ५:०० वा अंतिम मुदत देणेत आली होती. सदर कालावधीत दोनच निविदा प्राप्त झालेने निविदा कालावधीस दिनांक २३/१२/२०१७ ते दि. २९/११/२०१७ अखेर मुदत वाढ देणेत आली. त्यानुसार खालील प्रमाणे तीन ई-निविदा प्राप्त झाल्या.

| अ.नं. | ई-निविदाधारकांचे नांव |
|---|---|
| 1. | M/s. Victora Lifts Pvt. Ltd., Mumbai |
| 2. | M/s. Golden star Elevators Pvt. Ltd., Pune |
| 3. | M/s. Supreme Elevators Pvt. Ltd., New Delhi |

वरील प्राप्त ३ ई-निविदेतील तांत्रिक निविदा (Technical Bid) दिनांक ११/०१/२०१८ रोजी मा. खरेदी समितीचे सभेपुढे उघडणेत आलेले आहेत. त्यातील CGST/SGST, PAN, कंपनीचा वार्षिक उलाढाल, सध्या काम करत असलेल्या पुरवठा आदेशासह कामांची यादी, कंपनीचे रजिस्ट्रेशन सर्टिफिकेट, टेंडर फी व ई.एम.डी., अंडर टेकींग सर्टिफिकेट इत्यादी बाबी तपासल्या असून, M/s. Golden Star Elevators Pvt. Ltd., Pune यांनी अनुभव सर्टिफिकेट जोडलेले नसल्याने त्यांना अपात्र ठरवण्यात आले. महाराष्ट्र शासन खरेदी नियमावली मधील तरतुद क्र. ४.४.३.१(ब) नुसार पात्र दोन निविदाधारकांचे कर्मशियल बीड दिनांक १७/०१/२०१८ रोजीचे मा. खरेदी समितीचे सभेपुढे उघडणेत आल्या असून, त्यात खालीलप्रमाणे दर प्राप्त झालेले आहेत:

| Sr. No. | Description | **Victora Lifts Pvt. Ltd., Mumbai** | Supreme Elevators Pvt. Ltd., New Delhi |
|---|---|---|---|
| 1. | Comprehensive Annual Maintenance Contract of 28 Lift Installed in Shri Saibaba Sansthan Trust, Shirdi | 11,40,000/- | 13,89,900/- |
| | **शेरा** | L1 | L2 |

उपरोक्त आर्थिक (Financial Bid) बीडमधील दरानुसार संस्थानचे भक्तनिवास, रुग्णालये, श्री साई प्रसादालय येथील लिफ्टचे वार्षिक कॉम्प्रेसिव्ह सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट (CAMC) देणेकामी मे. व्हिक्टोरा लिफ्ट प्रा. लि., मुंबई यांचे रक्कम रुपये ११,४०,०००/- मात्र दर निम्नत्तम आहेत.

तरी संस्थानचे भक्तनिवास, रुग्णालये, श्री साई प्रसादालय येथील लिफ्टचे वार्षिक कॉम्प्रेसिव्ह सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट (CAMC) देणेकामी निम्नत्तम दरधारक मे. व्हिक्टोरा लिफ्ट प्रा. लि., मुंबई यांचेशी दराबाबत चर्चा / वाटा घाटी करून पुढील कार्यवाही करणेकामी प्रस्ताव मा. स्थानिक उप-समितीचे सभेमध्ये निर्णयार्थ सादर.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे भक्तनिवास, रुग्णालये व श्री साई प्रसादालय येथील लिफ्टचे वार्षिक सर्व्हिस कॉम्प्रेसीव्ह कॉन्ट्रॅक्ट (CAMC) देणेकामी मे.व्हिक्टोरा लिफ्ट प्रा.लि., मुंबई यांचे निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- मेकॅनिकल विभागप्रमुख)

---

०९ **श्री साईबाबा मंदिर व परिसराचे 3D मॉडेल तयार करणेकामी प्राप्त ई-निविदांचे वाणिज्यीक देकारांवर निर्णय होणेबाबत.**

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, (शिर्डी) अधिनियम- २००४ मधिल तरतूद:-** अधिनियमाच्या कलम २१ मधील पोटकलम (१) च्या. खंड (क) अन्वये, मंदिराची व विश्वस्तमालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन करण्याचे प्रयोजनासाठी विश्वस्तव्यवस्थेचा निधी समितीकडून खर्च करण्याची तरतूद आहे.

**प्रस्तावना:-** श्री साईबाबा मंदिर व परिसरात अचनाक आपतकालीन परिस्थीती उद्भवल्यास त्या परीस्थीतीचा सामना करण्यासाठी सुरक्षेच्या दृष्टीकोनातून संभाव्य परिस्थीती योग्य पध्दतीने हताळण्या करिता श्री साईबाबा मंदिर व परिसरांचे श्री डी मॉडेल ची आवश्यकता असल्याने दोन सेटअपमध्ये तयार करुन मिळणेबाबत शिर्डी पोलीस स्टेशन, शिर्डी यांनी त्यांचे दि.२२/०५/२०१७ रोजीचे पत्रान्वये कळविले होते. त्यानुसार श्री साईबाबा मंदिर व परिसराचे एकूण ०३ श्री डी मॉडेल तयार करुन घेणेसाठी येणा-या खर्चास मान्यतेस्तव मा. व्यवस्थापन समितीचे दि. १५/०६/२०१७ रोजीचे सभेपुढे प्रस्ताव सादर करणेत आला होता. सदरहु सभेतील निर्णय क्र. ५०० अन्वये खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे.

*“यावर सविस्तर चर्चा होऊन, श्रीसाईबाबा मंदिरपरिसराचे प्रस्तावातील पर्यायक्र.०२ प्रमाणे०२ नग श्रीडी मॉडेल तयार करुन घेण्यात यावे, असे ठरले. तसेच त्याकामी विहीत पध्दतीने ई-निविदांची मागणी करणेस व याकामी येणाऱ्या अपेक्षीत खर्चास मान्यता देण्यात आली.*

*त्याचबरोबर श्री साईबाबा मंदिर परिसराचे संगणकीय प्रणालीमध्येही श्रीडी मॉडेल तयार करुन घेण्यात यावे, असेही चर्चेअंती ठरले.”*

सदरहू निर्णयानुसार याकामी वर्तमान पत्रात व संस्थानचे संकेतस्थाळावर फेर ई-निवीदा सुचना (Third Call) प्रसिद्ध करणेत आली होती. तृतीय मागणी ई निविदा सुचना प्रसिध्द केलेली असतांना खालील दोन ठेकेदारांनी दि. २०/१२/२०१७ अखेर पर्यंतचे मुदतीत ई-निविदा अपलोड केल्या होत्या.

| अ.न. | ठेकेदाराचे नाव |
|---|---|
| १. | भागीरथ मॉडेल, पुणे |
| २. | कमल मॉडेल्स प्रा.लि., नवी दिल्ली |

सदरहु प्राप्त ई-निविदांचा तांत्रिक माहितीचा लिफाफा मा. खरेदी समितीच्या दि.११/०१/२०१८ रोजीच्या सभेपुढे उघडणेत आला. ठेकेदार यांनी सादर केलेल्या कागदपत्रांची छाननी केली असता, तांत्रिक छाननी अहवालानुसार उपरोक्त ठेकेदारांपैकी कमल मॉडेल्स प्रा.लि. नवी दिल्ली हे एकच ठेकेदार पात्र झाले आहे.

सार्वजनिक बांधकाम विभागाच्या ई निविदा प्रक्रियेअंतर्गत निविदा प्रसिध्दी, निविदा लिफाफे उघडणे आणि निविदा तपासणी व स्विकृती याबाबत शासन निर्णय क्र.सीएटी२०१७/प्रक्र८/इमा-२ दि.१२/०४/२०१७ अन्वये सुधारित आदेश निर्गमीत करण्यात आले असून तृतीय ई निविदा मागणीचे वेळी एकच निविदा प्राप्त झाल्यास अवलंबवायच्या कार्यप्रणाली बाबत खालीलप्रमाणे नमुद करण्यात आले आहे.

“*तृतीय वेळेस मागविलेली निविदा ही जर एकच निविदा प्राप्त झाली व ही निविदा कमी दराची अथवा अंदाजीत दरा इतकी असेल ती स्विकारणेत यावी. प्रचलीत दरसुची पेक्षा जास्त् दराची निविदा प्राप्त झाल्यास याबाबत लगतच्या वरिष्ठ स्तरावर पुर्ण समर्थनासह निविदा मंजूरी करीता सादर करावी.*”

त्यानुसार ठेकेदार यांनी सादर केलेल्या ई निविदेचा वाणिज्यीक लिफाफा दि.१७/०१/२०१८ रोजीचे खरेदी समितीचे सभेपुढे उघडणेत आला असून त्यांनी सादर केलेल्या दराचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं. | ठेकेदाराचे नांव/गांव | निविदेत नमुद केलेले दर |
|---|---|---|
| १. | कमल मॉडेल्स प्रा.लि., नवी दिल्ली | रु. ९,४४,०००/- |

उपरोक्तकामी ठेकेदार कमल मॉडेल्स प्रा.लि., नवी दिल्ली यांनी देऊ केलेले रु.९,४४,०००/- दर हे अंदाजपत्रकीय दर रु.१०,६६,९००/- पेक्षा ११.५२% कमी येत असल्याने, श्री साईबाबा मंदिर व परिसराचे श्री डी मॉडेल तयार करणेकामी ठेकेदार कमल मॉडेल्स प्रा.लि., नवी दिल्ली यांना कार्यादेश देणेसाठी मा. व्यवस्थापन समितीकडे शिफारस करणेकामी निर्णयार्थ सादर.

**प्रस्तावितकामी राबविणेत आलेल्या ई-निविदा प्रक्रियेमधील निम्नतम दरधारक कमल मॉडेल्स प्रा.लि., नवी दिल्ली हे आजचे उपसमिती सभेसमोर चर्चेसाठी उपस्थित होते. चर्चेअंती त्यांनी मुळ दरावर रु.५०,०००/- मात्र सुट देऊन, रु.८,९४,०००/- मात्र अंतीम दर देऊ केले.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा मंदिर व परिसराचे 3D मॉडेल तयार करणेकामी कमल मॉडेल्स प्रा.लि., नवी दिल्ली यांचे रु.८,९४,०००/- मात्र अंतीम दर स्विकारणेत यावेत. परंतु कमल मॉडेल्स प्रा.लि., नवी दिल्ली यांचेकडून प्रथम प्रारुप आराखडयाचे सादरीकरण घेण्यात येऊन, त्यास अंतीम स्वरुप देण्यात यावे व त्यानंतर कमल मॉडेल्स प्रा.लि., नवी दिल्ली यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग)

---

१० **श्री साईनाथ माध्यमिक विद्यालयाचे इमारतीचे नांदुर्खी रस्त्यालगतचे संरक्षक भिंतीचे बांधकाम करणेकामी प्राप्त झालेल्या दरांवर निर्णय होणेबाबत.**

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुद:** अधिनियम कलम २१ (१) अन्वये समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही प्रयोजनांसाठी करणेबाबत तरतुद आहे. त्यातील पोटकलम (क) अन्वये मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन या प्रयोजनांसाठी करण्यात येईल अशी तरतुद आहे.

**मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय:** मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक दि.२५/०७/२०१७ रोजीचे सभेत निर्णय क्र.५३६ खालील प्रमाणे संमत करणेत आलेला आहे.

*''..यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ माध्यमिक विद्यालय इमारतीचे नांदुर्खी रस्त्यालगतचे संरक्षक भिंतीचे प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे बांधकाम करणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेस व त्याकामी येणा-या अंदाजे रु.३,७१,४१०/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.''*

**प्रस्तावना:** उपरोक्त निर्णयानुसार श्री साईनाथ माध्यमीक विद्यालयाचे इमारतीचे संरक्षणाचे दृष्टीने नांदूर्खी रोडचे बाजूने असलेल्या दगडी बांधकामातील पायावर सुमारे ६५ मी. लांबीचे संरक्षक भिंतीचे २३० मि.मी. रुंदी, १.५०मि. उंचीचे बांधकाम, त्यावर ०.९ मी. उंचीची चेनलिंक फेन्सिंग, एम.एस. गेट बसविणे व सिमेंट पेंटने भिंतीस रंगकाम करणे इत्यादि कामासाठी दि.१३/०९/२०१७ अखेर प्रथम व दि.०१/११/२०१७ अखेर द्वितीय निविदा मागणीचेवेळी एकही निविदा प्राप्त न झाल्याने, दि.२४/११/२०१७ रोजीचे टिपणी अन्वये, याकामी तृतीय ई-निविदा सूचना प्रसिध्द करुन दि.०२/०१/२०१८ अखेर ई-निविदा मागविणेत आल्या असून, याकामी खालील ०४ निविदा प्राप्त झाल्या.

| Sr. No. | Name of Tenders |
|---|---|
| 01. | Kasam Iliyas Kacchi, Manmad |
| 02. | Sai Ganesh Creators, Shirdi |
| 03. | D.B.Phopse, Vaijapur |
| 04. | Vikrant Rajendra Sonawane, Kopargaon |

सदरच्या प्राप्त ई-निविदेचा लिफाफा क्र.०१ (Technical bid) दि.११/०१/२०१८ रोजीचे मा. खरेदी समितीचे सभेत उघडण्यात आल्या. त्यांचा छाननी अहवाल केला असता, त्यामध्ये खालील दोन ठेकेदारांनी पात्रता निकष पुर्ण केलेले असल्याने, त्यांचे निविदेचा वाणिज्यीक लिफाफा (Commercal bid) दि.१७/०१/२०१८ रोजीचे मा. खरेदी समितीचे सभेत उघडणेत आले असून, त्यांचे दरांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| Sr. No. | Name of Tenders | Quoted Percentage (+ / -) | Amount |
|---|---|---|---|
| 01. | Sai Ganesh Creators, Shirdi | -2% | Rs.363981.99 |
| 02. | **D.B.Phopse, Vaijapur** | **-5.95%** | **Rs.349311.28** |

सार्वजनिक बांधकाम विभागाच्या ई निविदा प्रक्रियेअंतर्गत निविदा प्रसिध्दी, निविदा लिफाफे उघडणे आणि निविदा तपासणी व स्विकृती याबाबत शासन निर्णय क्र.सीएटी२०१७/ प्रक्र८/ इमा-२ दि.१२/०४/२०१७ अन्वनये सुधारित आदेश निर्गमीत करण्यात आले असून तृतीय ई निविदा मागणीचे वेळी एकच निविदा प्राप्त झाल्यास अवलंबवायच्या कार्यप्रणालीबाबत खालीलप्रमाणे नमुद करण्यात आले आहे.

"*तृतीय वेळेस मागविलेली निविदा ही जर एकच निविदा प्राप्त झाली व ही निविदा कमी दराची अथवा अंदाजीत दरा इतकी असेल ती स्विकारणेत यावी.*" असे नमूद आहे.

**प्रस्ताव:** वरीलप्रमाणे श्री साईनाथ माध्यमिक विद्यालयाचे इमारतीचे नांदुर्खी रस्यालगतचे संरक्षक भिंतीचे बांधकाम करणे कामासाठी तृतीय ई-निविदा मागणीचेवेळी वरीलप्रमाणे प्राप्तर झालेले दरामध्येष ठेकेदार डी. बी. फोपसे, वैजापूर यांनी देऊ केलेले दर निम्नतम (L-1) स्वरुपाचे (रु.३,४९,३११/-) आहेत. तरी त्यांचे दर स्विकरणेत येऊन, त्यांना कार्यादेश देणेस मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीकडे शिफारस करणेकामी निर्णयार्थ सादर.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ माध्यमिक विद्यालयाचे इमारतीचे नांदुर्खी रस्त्यालगतचे संरक्षक भिंतीचे बांधकाम करणेकामी डी.बी. फोपसे, वैजापूर यांचे एकत्रित रु.३,४९,३११/- मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग)

---

११ **संस्थानचे मौजे शिर्डी येथील स.नं.१२४ (पैकी) व १२६ (पैकी) चे बाजुने चेनलिंक फेन्सिंग करणेकामी प्राप्त झालेले दरांबाबत निर्णय होणेबाबत.**

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम, २००४ मधिल तरतुद:-** अधिनियमाच्या कलम २१ मधिल पोटकलम (१) च्या खंड (क) अन्वये मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन करण्याचे प्रयोजनासाठी समितीकडून विश्वस्तव्यवस्थेचा निधी वापरणे अथवा खर्च करण्याची तरतुद आहे.

**मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय:-** मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक १६/०६/२०१७ रोजीचे सभेत निर्णय क्र.४८७ खालीलप्रमाणे झालेला आहे.

".. यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे मौजे शिर्डी येथील स.नं.१२४ (पैकी) व १२६ (पैकी) चे बाजुने प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे चैनलिंक फेन्सिंग करणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेस व त्याकामी येणा-या अंदाजे रु.९,४१,४८०/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली."

**प्रस्तावना:-** मौजे शिर्डी येथील स.नं. १२४ पैकी क्षेत्रामधील चिकूचा बाग तसेच स.नं. १२६ पैकी नांदूर्खी रस्त्याचे कडेला असलेल्या पाण्याचे टाकी (ESR) लगतचे संस्थानचे क्षेत्रास चैनलींक जाळीचे कंपाउंड करणेस मान्यता देण्यात आली आहे. त्यासाठी सन २०१६-१७ चे जिल्हादरसूचीनुसार तयार करणेत आलेले अंदाजपत्रकानुसार रु.११,७७,४७४/- मात्र इतका खर्च अपेक्षित आहे. जा.नं. ३६२१/२०१७ दि.०६/०१/२०१७ रोजीचे परिपत्रकानुसार येणा-या अंदाजपत्रकीय रक्कम २०% ते ३०% कमी करणेत यावी असे नमूद केले आहे. त्यासार याकामी २०% कपात करुन रु.९,४१,४८०/- इतकी रक्कम येते.

मा. व्यवस्थापन समितीचे उपरोक्त निर्णयानुसार दि.१८/०८/२०१७ अखेर प्रथम निविदा मागणीचे वेळी एक निविदा प्राप्त झाली असल्याने, दि.०१/११/२०१७ द्वितीय निविदा मागणी प्रसिध्द करणेत आली त्यावेळी एकही निविदा प्राप्त झाली नाही. तदनंतर दि.२७/१२/२०१७ अखेर तृतीय ई-निविदा प्रसिध्द करणेत आली असून, याकामी खालील दोन ठेकेदारांनी ई-निविदा अपलोड केलेल्या आहेत.

| Sr.No. | Name of Tenders |
|---|---|
| 01. | Akruti Construction, Kopargaon |
| 02. | Santosh Panditrao Jondhale, Nimgaon jalle |

सदरच्या प्राप्त ई-निविदेचा लिफाफा क्र.०१ (Technical bid) दि.११/०१/२०१८ रोजीचे मा. खरेदी समितीचे सभेत उघडण्यात आल्या. त्यांचा छाननी अहवाल केला असता, त्यामध्ये खालील एकच ठेकेदारांनी पात्रता निकष पुर्ण केलेले असल्याने, त्यांचे निविदेचा वाणिज्यीक लिफाफा (Commercal bid) दि.१७/०१/२०१८ रोजीचे मा. खरेदी समितीचे सभेत उघडणेत आले असून, त्यांचे दरांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| Sr.No. | Name of Tenders | Quoted Percentage (+ / -) | Amount |
|---|---|---|---|
| 01. | Akruti Construction, Kopargaon | +21% | Rs.1139190.22 |

सार्वजनिक बांधकाम विभागाच्या ई निविदा प्रक्रियेअंतर्गत निविदा प्रसिध्दी, निविदा लिफाफे उघडणे आणि निविदा तपासणी व स्विकृती याबाबत शासन निर्णय क्रमांक सीएटी/२०१७/प्र.क्र.०८/इमा-२ दि.२९/०६/२०१७ अन्वये सुधारित आदेश निर्गमीत करण्यात आले असून तृतीय ई निविदा मागणीचे वेळी एकच निविदा प्राप्त झाल्यास अवलंबवायच्या कार्यप्रणाली बाबत खालीलप्रमाणे नमुद करण्यात आले आहे .

" *याबाबत सदर शासन निर्णयामध्ये Single Tender बाबत प्रस्तावीत केलेली कार्यप्रणाली लक्षात घेता निदान तिस-या वेळेस कमी किमतीची अथवा समान किंमतीची निविदा सक्षम प्राधिका-याच्या पुर्वमान्यतेने स्विकारण्यात यावी. जास्त किमतीची निविदा प्राप्त झाल्यास, सुधारीत प्रशासकीय मान्यता प्राप्त करवून नव्याने स्वतंत्रपणे निविदा प्रक्रीया कार्यान्वित करण्यात यावी.*" असे नमूद केलेले आहे.

**प्रस्ताव** : वरीलप्रमाणे संस्थानचे मौजे शिर्डी येथिल स.नं. १२४ (पैकी) व १२६ (पैकी)चे बाजूने चेनलिंक फेन्सिंग करणे कामासाठी तृतीय ई-निविदा मागणीचेवेळी वरीलप्रमाणे प्राप्त झालेले दरामध्ये ठेकेदार Akruti Construction, Kopargaon यांनी अंदाजपत्रकीय रकमेपेक्षा + २१% (रु.११,३९,१९०/-) देऊ केलेले दराबाबत चर्चा होऊन निर्णय होणेसाठी सदरचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीकडे शिफारस करणेकामी निर्णयार्थ सादर.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे मौजे शिर्डी येथील स.नं.१२४ (पैकी) व १२६ (पैकी) चे बाजुने चेनलिंक फेन्सिंग करणेकामी प्राप्त झालेले निम्नतम दर हे अंदाजपत्रकीय रकमेपेक्षा २१ % जादा असल्यामुळे सदरहू ई-निविदा प्रक्रिया रद्द करणेत यावी व संस्थानचे मौजे शिर्डी येथील स.नं.१२४ (पैकी) व १२६ (पैकी) चे जागांना भिंतीचे कपांऊंड तयार करणेत यावे. तसेच याकामी येणाऱ्या खर्चास व विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेस मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग)

---

१२ **द्वारावती भक्तनिवास इमारतीचे दक्षिण व पश्चिम बाजूने रस्त्यालगत संरक्षक ग्रील बसविणेकामी प्राप्त झालेले दरावर निर्णय होणेबाबत.**

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम, २००४ मधिल तरतुद:-** अधिनियमाच्या कलम २१ मधिल पोटकलम (१) च्या खंड (क) अन्वये मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन करण्याचे प्रयोजनासाठी समितीकडून विश्वस्तव्यवस्थेचा निधी वापरणे अथवा खर्च करण्याची तरतुद आहे.

**मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय** : मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक २५/०२/२०१७ रोजीचे सभेत सभेत निर्णय क्र.९४ खालीलप्रमाणे झालेला आहे.

"..यावर सविस्तर चर्चा होऊन, द्वारावती भक्तनिवास इमारतीचे दक्षिण व पश्चिम बाजूने रस्त्यालगत संरक्षक ग्रील बसविणेकामी प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे कार्यवाही करणेस मान्यता देण्यात आली."

**प्रस्तावना:-** द्वारावती भक्तनिवास इमारतीचे दक्षिण व पश्चिम बाजूने (लांबी-२००मी.) बाजूने १.२४५ मी. उंचीचे एमएस ग्रील बसविणे, सरकते गेट बसविणे तसेच दक्षिणोत्तर (लांबी-४९.२० मी.) भिंतीवर चेनलिंक फेन्सिंगमध्ये संरक्षक ग्रील बसविणे याकामांसाठी अंदाजपत्रकीय रक्कम रु.५,७९,४१९/- मात्र मधून २०% कपात करुन रु.४,६३,५३५/- इतक्या रकमेची ई-निविदा मा. व्यवस्थापन समितीचे उपरोक्त निर्णयानुसार प्रथम, द्वितीय व तृतीय निविदा सुचना प्रसिध्द करुन निविदा मागविणेत आल्या असता प्रत्येक वेळी फक्त एकच निविदा प्राप्त झाली. त्यामुळे दि.२७/११/२०१७ रोजीचे टिपणी अन्वये चौथ्यांदा ई-निविदा सूचना प्रसिध्द करुन दि.३०/१२/२०१७ अखेर निविदा मागविणेत आल्या असून, सदरचे मुदतीत खालील ०३ ठेकेदारांनी ई-निविदा अपलोड केल्या आहेत.

| Sr.No. | Name of Tenders |
|---|---|
| 01. | Shri. Sherkar Hemant Balasaheb, Bel Pimpalgaon |
| 02. | Akruti Construction, Kopargaon |
| 03. | Santosh Panditrao Jondhale |

सदरच्या प्राप्त ई-निविदेचा लिफाफा क्र.०१ (Technical bid) दि.११/०१/२०१८ रोजीचे मा. खरेदी समितीचे सभेत उघडण्यात आल्या. त्यांचा छाननी अहवाल केला असता, त्यामध्ये खालील दोन ठेकेदारांनी पात्रता निकष पुर्ण केलेले असल्याने, त्यांचे निविदेचा वाणिज्यीक लिफाफा (Commercial bid) दि.१७/०१/२०१८ रोजीचे मा. खरेदी समितीचे सभेत उघडणेत आले असून, त्यांचे दरांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| Sr. No. | Name of Tenders | Quoted Percentage (+/-) | Amount | Remark |
|---|---|---|---|---|
| 01. | Shri. Sherkar Hemant Balasaheb, Bel Pimpalgaon | +9.99% | Rs.509842/- | L-1 |
| 02. | Akruti Construction, Kopargaon | +35% | Rs.625672/- | |

सार्वजनिक बांधकाम विभागाच्या ई निविदा प्रक्रियेअंतर्गत निविदा प्रसिध्दी, निविदा लिफाफे उघडणे आणि निविदा तपासणी व स्विकृती याबाबत शासन निर्णय क्रमांक सीएटी/२०१७/प्र.क्र.०८/इमा-२ दि.२९/०६/२०१७ अन्वये सुधारित आदेश निर्गमीत करण्यात आले असून तृतीय ई निविदा मागणीचे वेळी एकच निविदा प्राप्त झाल्यास अवलंबवायच्या कार्यप्रणाली बाबत खालीलप्रमाणे नमुद करण्यात आले आहे .

"*याबाबत सदर शासन निर्णयामध्ये Single Tender बाबत प्रस्तावीत केलेली कार्यप्रणाली लक्षात घेता निदान तिस-या वेळेस कमी किमतीची अथवा समान किंमतीची निविदा सक्षम प्राधिका-याच्या पुर्वमान्यतेने स्विकारण्यात यावी. जास्त किमतीची निविदा प्राप्त झाल्यास, सुधारीत प्रशासकीय मान्यता प्राप्त करवून नव्याने स्वतंत्रपणे निविदा प्रक्रीया कार्यान्वित करण्यात यावी.*" असे नमूद केलेले आहे.

**प्रस्ताव:** द्वारावती भक्तनिवास इमारतीचे दक्षिण व पश्चिम बाजूने रस्त्यालगत संरक्षक ग्रील बसविणेकामी वरीलप्रमाणे प्राप्त दरामध्ये Shri. Sherkar Hemant Balasaheb, Bel Pimpalgaon यांनी देऊ केलेले दर निविदा रकमेपेक्षा ९.९९% अधिक (रु.५,०९,८४२/-) हे निम्नतम आहेत. करीता सदरचे दराबाबत मा. उपसमितीचे सभेत चर्चा होऊन निर्णय होणेसाठी सदरचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीकडे शिफारस करणेकामी निर्णयार्थ सादर.

**द्वारावती भक्तनिवास इमारतीचे दक्षिण व पश्चिम बाजूने रस्त्यालगत संरक्षक ग्रील बसविणेकामी राबविणेत आलेल्या ई-निविदा प्रक्रियेमधील निम्नतम दरधारक Shri. Sherkar Hemant Balasaheb, Bel Pimpalgaon हे आजचे स्थानिक उपसमिती सभेसमोर चर्चेसाठी उपस्थित होते. त्यांनी चर्चेअंती एकत्रित मुळ दरावर १% सुट देऊ केली.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, द्वारावती भक्तनिवास इमारतीचे दक्षिण व पश्चिम बाजूने रस्त्यालगत संरक्षक ग्रील बसविणेकामी Shri. Sherkar Hemant Balasaheb, Bel Pimpalgao n यांचे एकत्रित रु.५,०४,७४४/- मात्र अंतीम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग)

---

१३ **श्री साईबाबा भक्तनिवास इमारतीचे संरक्षणाचे दृष्टीने दक्षिण व पुर्व बाजुने ग्रील व चेनलिंक फेन्सिंग बसविणेकामी प्राप्त झालेले दरावर निर्णय होणेबाबत.**

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम, २००४ मधिल तरतुद:-** अधिनियमाच्या कलम २१ मधिल पोटकलम (१) च्या खंड (क) अन्वये मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन करण्याचे प्रयोजनासाठी समितीकडून विश्वस्तव्यवस्थेचा निधी वापरणे अथवा खर्च करण्याची तरतुद आहे.

**मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय:** मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक २५/०२/२०१७ रोजीचे सभेत सभेत निर्णय क्र.९३ खालीलप्रमाणे झालेला आहे.

"..यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा भक्तनिवासस्थान (५०० रूम) इमारतीच्या बाजूचे फेन्सिंग करणे व संरक्षक ग्रील बसविणेकामी प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे कार्यवाही करणेस मान्यता देण्यात आली."

**प्रस्तावना:-** श्री साईबाबा भक्तनिवासस्थान (५०० रुम) इमारतीचे दक्षिण बाजूने साईश्रध्दा हौसींग सोसायटीकडे जाणारा सार्वजनिक वाहतूकीचा रस्ता असून, सदहू रस्त्याने मोठ्या प्रमाणात वाहतूक असते. त्यामुळे साईबाबा भक्तनिवास्थान इमारतीचे रस्त्यांवर व पार्किंगमध्ये बरेच अनधिकृत वाहने उभी राहत असलेने वाहतुक नियंत्रण व सरंक्षणाचे दृष्टीने पूर्व-पश्चिम (लांबी-२१८ मी.) व दक्षिणोत्तर (लांबी-१४९ मी.) बाजूने

संरक्षक ग्रील बसविणेस, उत्तरेकडील सध्याचे बार्बेड वायर फेन्सिंग (लांबी-३७८ मी.) ची दुरुस्ती करणे व पश्चिमेकडील पार्कींगचे उत्तर बाजू कंपाउंड (लांबी-९० मी.) वर ०.९० मी. उंचीचे चेनलिंक फेन्सिंग बसविणे इ. कामांसाठी जिल्हादरसूची सन २०१६-१७ नुसार रु.९,११,१७३/- मात्र इतक्या खर्च अपेक्षित आहे. जा. नं.३६२१/ २०१७ दि.०६/०१/२०१७ रोजीचे परिपत्रकात नमूद केलेनुसार याकामी २०% कपात करुन रु.७,२८,९३८/- इतकी रक्कम येते.

याबाबत मा. व्यवस्थापन समितीचे उपरोक्त निर्णयानुसार प्रथम, द्वितीय व तृतीय निविदा सुचना प्रसिध्द करुन निविदा मागविणेत आल्या असता प्रत्येक वेळी फक्त एक निविदा प्राप्त झाली. त्यामुळे दि.२७/११/२०१७ रोजीचे टिपणी अन्वये चौथ्यांदा दि.३०/१२/२०१७ अखेर फेरनिविदा मागविणेत आल्या असून, सदरचे मुदतीत खालील ०३ ठेकेदारांनी ई-निविदा अपलोड केल्या आहेत.

| Sr.No. | Name of Tenders |
|---|---|
| 01. | Shri. Sherkar Hemant Balasaheb, Bel Pimpalgaon |
| 02. | Akruti Construction, Kopargaon |
| 03. | Santosh Panditrao Jondhale |

सदरच्या प्राप्त ई-निविदेचा लिफाफा क्र.०१ (Technical bid) दि.११/०१/२०१८ रोजीचे मा. खरेदी समितीचे सभेत उघडण्यात आल्या. त्यांचा छाननी अहवाल केला असता, त्यामध्ये खालील दोन ठेकेदारांनी पात्रता निकष पुर्ण केलेले असल्याने, त्यांचे निविदेचा वाणिज्यीक लिफाफा (Commercial bid) दि.१७/०१/२०१८ रोजीचे मा. खरेदी समितीचे सभेत उघडणेत आले असून, त्यांचे दरांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| Sr. No. | Name of Tenders | Quoted Percentage (+ / -) | Amount | Remark |
|---|---|---|---|---|
| 01. | Shri. Sherkar Hemant Balasaheb, Bel Pimpalgaon | +9.99% | Rs.801759/- | L-1 |
| 02. | Akruti Construction, Kopargaon | +36% | Rs.991356/- | |

सार्वजनिक बांधकाम विभागाच्या ई निविदा प्रक्रियेअंतर्गत निविदा प्रसिध्दी, निविदा लिफाफे उघडणे आणि निविदा तपासणी व स्विकृती याबाबत शासन निर्णय क्रमांक सीएटी/२०१७/प्र.क्र.०८/इमा-२ दि.२९/०६/२०१७ अन्वये सुधारित आदेश निर्गमीत करण्यात आले असून तृतीय ई निविदा मागणीचे वेळी एकच निविदा प्राप्त झाल्यास अवलंबवायच्या कार्यप्रणाली बाबत खालीलप्रमाणे नमुद करण्यात आले आहे .

"*याबाबत सदर शासन निर्णयामध्ये Single Tender बाबत प्रस्तावीत केलेली कार्यप्रणाली लक्षात घेता निदान तिस-या वेळेस कमी किमतीची अथवा समान किंमतीची निविदा सक्षम प्राधिका-याच्या पुर्वमान्यतेने स्विकारण्यात यावी. जास्त किमतीची निविदा प्राप्त झाल्यास, सुधारीत प्रशासकीय मान्यता प्राप्त करवून नव्याने स्वतंत्रपणे निविदा प्रक्रीया कार्यान्वित करण्यात यावी.*" असे नमूद केलेले आहे.

**प्रस्ताव:** श्री साईबाबा भक्तनिवास्थान इमारतीचे सरंक्षणाचे दृष्टीने दक्षिण व पूर्व बाजूने ग्रील व चेनलिंक फेन्सिंग बसविणेकामी वरीलप्रमाणे प्राप्त दरामध्ये Shri. Sherkar Hemant Balasaheb, Bel Pimpalgaon यांनी देऊ केलेले दर निविदा रकमेपेक्षा ९.९९% अधिक (रु.८,०१,७५९/-) हे निम्नतम आहेत. करीता सदरचे दराबाबत मा. उपसमितीचे सभेत चर्चा होऊन निर्णय होणेसाठी सदरचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीकडे शिफारस करणेकामी निर्णयार्थ सादर.

**प्रस्तावित कामासाठी राबविणेत आलेल्या ई-निविदा प्रक्रियेमधील निम्नतम दरधारक Shri. Sherkar Hemant Balasaheb, Bel Pimpalgaon हे आजचे स्थानिक उपसमिती सभेसमोर चर्चेसाठी उपस्थित होते. त्यांनी चर्चेअंती एकत्रित मुळ दरावर १% सुट देऊ केली.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा भक्तनिवास इमारतीचे संरक्षणाचे दृष्टीने दक्षिण व पुर्व बाजुने ग्रील व चेनलिंक फेन्सिंग बसविणेकामी Shri. Sherkar Hemant Balasaheb, Bel Pimpalgaon यांचे एकत्रित रु. ७,९३,७४१/- मात्र अंतीम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग)

---

१४ **मे.लेजर व्हिजन लि., हाँगकाँग यांचे समवेत अर्बिस्ट्रेशन करणेविषयी ॲड संजय चौकीदार व अँड रमेश सोनी यांचेबरोबर चर्चा करणेबाबत.**

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम २००४ मधील तरतूद:-** अधिनियमाचे कलम २१ मधील पोटकलम (१)च्या खंड (ड) अन्वये श्री साईबाबांच्या शिकवणीचा प्रचार करणे अशी तरतूद आहे.

**प्रस्तावना:-** मौजे निमागांव कोऱ्हाळे येथील संस्थानचे गट नं.१९८, १९९, २०० व २०१ मध्ये मा. व्यवस्थापन समितीचे दि.१७/०२/२००७ रोजीचे सभेत साईगार्डन करण्याचे ठरले होते. या प्रकल्पातंर्गत श्री साईबाबांच्या जिवनावर अधारीत लेजर शो तयार करणेसाठी लेजर व्हिजन लि., हाँगकाँग यांना US$ ५५,००,००० मात्रचा कार्यादेश देणेत आला होता. लेजर व्हिजन लि., हाँगकाँग यांचेशी झालेल्या करारानुसार त्यांनी केलेल्या कामापोटी Payment Stages ०१ ते ०४ व ०७ ते ०८ करीता US$२१,४५,००० अदा करणेत आलेले आहे. लेजर व्हिजन लि., हाँगकाँग यांनी त्यांचे दि.०५/११/२०१२, दि.१७/१२/२०१२ व दि.२६/०२/२०१३ रोजीचे पत्रान्वये करारनाम्यातील Payment Schedule ०५ व ०६ नुसार US$१५,४०,००० ची बिले सादर केलेली होती.

मा.त्रिसदस्य समितीचे दि.१५/०३/२०१४ रोजीचे सभेतील नि.क्र.१८२ अन्वये मे.लेजर व्हिजन लि., हाँगकाँग यांचे बिल अदा करणेकामी संस्थान वकीलामार्फत अर्ज करणेत येऊन, मा. मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी, असे ठरले होते. त्यानुसार संस्थानचे वकील श्री. संजय चौकीदार यांनी CAST/८७०८/२०१४ दि.२५/०७/२०१४ अन्वये मा. मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठात सिव्हिल ॲप्लिकेशन दाखल केले होते.

प्रस्तुत प्रकरणी मे. लेजर व्हिजन लि., हाँगकाँग यांनी त्यांची Payment Schedule ०५ व ०६ नुसार US$१५,४०,००० ची बिले प्रलंबीत असल्यामुळे दि.०३/०३/२०१७ रोजीच्या (संस्थानकडे प्राप्त दि.२३/०३/२०१७) पत्रान्वये त्यांचेशी केलेले करारनाम्यातील अट क्र.२५ नुसार संस्थानला टर्मिनेशन नोटीस दिलेली होती. त्यास संस्थानचे वतीने दि.११/०४/२०१७ रोजीचे पत्राने उत्तर पाठविणेत आले आहे.

याप्रकरणी मा. उच्च न्यायालयाने नेमलेल्या तज्ञ समितीचे अहवालावर दि.०७/०४/२०१७ रोजी मा. उच्च न्यायालयाने खालीलप्रमाणे आदेश केला आहे.

"The learned AGP has placed on record a copy of the report submitted by the Committee. The same is taken on record.

2. We would like toknow the stand of the Committee in the matter. Stand over to 21.04.2017."

मा.उच्च न्यायालयाचे उपरोक्त आदेशानुसार प्रस्तुत प्रकरणी मा. व्यवस्थापन समितीचे म्हणणे न्यायालयात सादर करणेकामी दि.२८/०४/२०१७ रोजीचे सभेपुढे प्रस्ताव सादर करणेत आला होता. सदरहू सभेत निर्णय क्र.२७९ खालीलप्रमाणे संमत करणेत आला आहे.

".. मे.लिजर व्हिजन लि., हॉगकॉग संदर्भात मा.उच्च न्यायालयात समितीचे मत सादर करावयाचे आहे. या प्रकल्पाबाबत सविस्तर विषय चर्चेला ठेवणेत आलेला असून सदर प्रकल्प मे.लिजर व्हिजन लि., हॉगकॉग यांचेमार्फत पूर्ण करायचा की, सदर प्रकल्पाबाबत करारनामा रद्द करायचा याचा निर्णय समितीने घ्यायचा आहे. यापूर्वी मे.लिजर व्हिजन लि., हॉगकॉग यांना २१,४५,००० मात्र डॉलर्सचे बिल अदा करणेत आलेले असून त्यांनी पुढील कामाचे १५,४०,००० मात्र डॉलर्स बिलाची मागणी केलेली आहे. सदर बिले या प्रकल्पाचे आर्किटेक्ट श्री.कापरे यांनी प्रमाणित केलेली आहेत. तसेच मे.लिजर व्हिजन लि., हॉगकॉग यांना पुढील काम थांबविणेत यावे, असे पत्र दि.०७.०३.२०१३ रोजी संस्थानचे वतीने देणेत आले होते. त्यामुळे मे.लिजर व्हिजन लि., हॉगकॉग यांनी त्यानंतरचे काम थांबविले आहे. परंतू तत्पुर्वी त्यांनी केलेल्या कामाची व करारनाम्यातील Payment Schedule नुसार देय असलेल्या रकमेची मागणी केलेली आहे. सदर प्रकल्प व करारनामा रद्द झाल्यास त्यांना देय असलेल्या १५,४०,००० मात्र डॉलर्स रकमेबाबत संस्थानवर जबाबदारी पडण्याची शक्यता नाकारता येत नाही. सबब मे.लिजर व्हिजन लि., हॉगकॉग यांचेबरोबर चर्चा/ वाटाघाटी करुन सदर प्रकल्प पूर्ण करणेबाबत समितीने निर्णय द्यावा, अशी माहिती कार्यकारी अधिकारी यांनी समिती सदस्यांना दिली.

यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, साईगार्डन प्रकल्प लवकर कार्यान्वीत होणेकामी, तत्कालीन व्यवस्थापन समितीने लेझर शो उभारणी व त्यासाठी आवश्यक असलेले बांधकाम करणे ही दोन्ही कामे एकाच कंपनीला द्यायला हवी होती. तसेच लेझर शो उभारणीकामी मे.लेजर व्हिजन लि., हाँगकाँग या कंपनीचा करारनामा व त्यामधील बीले अदायगीसाठीची कलमे सदोष असल्याचे दिसून येते. याकरीता सदर करारनामा रद्द

करुन अर्बिस्ट्रेशनची प्रक्रिया सुरु करणेची कार्यवाही करणेत यावी. याचबरोबर गेल्या १० वर्षामध्ये तंत्रज्ञानामध्ये खुपच बदल झालेला असून इलेक्ट्रॉनिक वस्तूंच्या किंमतीही कमी झालेल्या आहेत. या सर्व बाबींचा विचार करता, मे.लेजर व्हिजन लि., हाँगकाँग यांचेबरोबरचा करारनामा रद्द करणेत येऊन, त्यांना अदा करण्यात आलेली बीलाची रक्कम वसूल करणेबाबत कायदेशीर कारवाई करणेत यावी व साईगार्डन प्रकल्पामधील लेझर शो उभारणीकामी विहीत पध्दतीने नवीन ई-निविदा प्रक्रिया राबविणेत यावी.

तसेच या प्रकरणाची निवृत्त न्यायमूर्तीमार्फत चौकशी करण्यासाठी निवृत्त न्यायमुर्तीची नेमणूक होणे व मे.लिजर व्हिजन लि., हॉंगकॉंग यांचेबरोबरचा करारनामा रद्द करणे यासाठी विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचे मार्गदर्शन घेणेकरीता त्यांचेकडे प्रस्ताव सादर करणेत यावा व शासनाचे मार्गदर्शनाप्रमाणे पुढील कार्यवाही करणेत यावी." असे ठरले.

उपरोक्त प्रमाणे झालेले निर्णयानुसार प्रस्तुत प्रकरणी विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचे मार्गदर्शन घेणेकामी त्यांचेकडे दि.१४/०७/२०१७ रोजी प्रस्ताव सादर करणेत आला आहे. मा. व्यवस्थापन समितीच्या उपरोक्त निर्णयाबाबत मा. उच्च न्यायालयास अवगत करावे लागणार आहे.

मे. लेजर व्हिजन लि., हॉंगकॉंग यांनी दि.१९/०६/२०१७ रोजीचे पत्रान्वये खालीलप्रमाणे कळविले आहे.

This is with reference to the captioned Agreement executed between us in respect of the proposed Saibaba Multimedia Theme Park, our letter dated 3rd March 2017 addressed to your Trust regarding termination of the said Agreement and your letter dated 11thApril 2017 in this regard.

As mentioned earlier, the Shri Saibaba Sansthan Trust (Trust) has failed inter alia to make payments due to us under the Agreement from a period as long as November 2012, amounting to a failure by the Trust in complying with their obligations under the Agreement. Moreover, even after having been notified of its default, the Trust failed to remedy its default and / or breach in the manner provided in the Agreement.

Without prejudice to the above, the alleged impediment for non-payment of our dues, cited in your letter dated 11th April 2017 and not admitted by us, was never notified to us promptly at the appropriate time. In fact, the Trust should clearly have been aware of any such alleged deficiency and/ or defects in its authority and/ or powers and/ or capacity at the time of engaging our services under the Agreement and consequently has also committed breach of warranty given under the Agreement.

In light of the above and particularly the Trust's failure to remedy its long-standing default, the Agreement stands terminated by virtue of the provision of Clause 25.2 of the Agreement reproduced herein below:

"Termination of the Agreement:

25.2 If either party fail to comply with the obligations set out in this Agreement and fails to remedy that failure within 20 Business Days of receiving written notice from the other party to do so, the party not failing to comply with its obligations under this Agreement may suspend Works or terminate this Agreement by written notice to the other party without prejudice to any other rights of action or remedies it may have under this Agreement."

Without prejudice to the above, Laservision Limited reserves all its rights, claims, demands and/ or remedies in law that may be available to them against the Trust and nothing contained herein above should be deemed a waiver thereof.

लेजर व्हिजन लि., यांचेशी दि.१२/०५/२०११ रोजी केलेल्या करारामधील अट क्र.३१- Mediation Followed by Arbitration (International) मध्ये खालीलप्रमाणे नमूद आहे.

31.1 A party claiming that a dispute has arisen must give written notice to the other parties within 10 business Days specifying the nature of the dispute.

31.2 On receipt of the notice specified, the parties to the dispute must within 30 Businesss Days of receipt must seek to resolve the dispute.

31.3 In the event of a dispute between Laservision and the Trust, the parties agree to first make every attempt to settle the matter by mediation. An independent and impartial mediator will be selected by agreement of both parties.

31.4 For the purpose of this Agreement and to avoid any misunderstanding between the parties, the parties agree to equally share all costs relating to the assistance provided by an independent mediator.

31.5 The language to be used in the arbitration, if it was to occur, will be English.

31.6 If the parties are unable to resolve the dispute through mediation then the matter may proceed to Arbitration.

31.7 In the occurrence of arbitration, for the avoidance of doubt, the High Court of Mumbai will be considered to have unilateral jurisdiction.

मे.लेजर व्हिजन लि., हाँगकाँग यांनी दिलेल्या टर्मिनेशन नोटीसवरनिर्णय घेणेबाबत तसेचत्यांचे समवेत अर्बिस्ट्रेशन करणेबाबत मा. व्यवस्थापन समितीचे दि.१४/११/२०१७ रोजीचे सभेत प्रस्ताव सादर करणेत आला होता. याबाबत सदरहू सभेत खालीलप्रमाणे निर्णय झालेले आहेत.

निर्णय क्र.९५६- यावर सविस्तर चर्चा होऊन, मे.लेजर व्हिजन लि., हाँगकाँग यांनी दिलेल्या टर्मिनेशन नोटीसवर संस्थान ॲडव्होकेट पॅनलवरील तज्ञ वकिलामार्फत याबाबत सल्ला मागविणेत यावा, असे ठरले.

निर्णय क्र.९५७- यावर सविस्तर चर्चा होऊन, मे.लेजर व्हिजन लि., हाँगकाँग यांचे समवेत अर्बिस्ट्रेशन करणेपुर्वी मा.उच्च न्यायालयामध्ये संस्थानचे वतीने काम पहाणारे ॲडव्होकेट संजय चौकीदार व सल्लागार परिषदेमधील सल्लागार ॲडरमेश सोनी यांना चर्चेसाठी पुढील उपसमिती सभेसमोर आमंत्रित करणेत यावे, असे ठरले.

तरी उपरोक्त निर्णय क्र.९५६ अन्वये संस्थान ॲड. पॅनलवरील ॲड. संजय चौकीदार यांना या प्रकरणाची सुरुवातीपासूनची माहिती असल्याने याकामी त्यांचा सल्ला मागविणेस तसेच निर्णय क्र. ९५७ अन्वये ठरलेप्रमाणे ॲड. चौकीदार व सललागार परिषदेमधील सल्लागार ॲड. रमेश सोनी यांचे समवेत चर्चा होणेस विनंती.

**उपरोक्त विषयावर चर्चा करणेसाठी आजचे सभेत, संस्थान ॲड.पॅनलवरील ॲड.संजय चौकीदार व सल्लागार परिषदेमधील सल्लागार ॲड. रमेश सोनी हे उपस्थित राहू शकले नाही. त्यामुळे मे.लेजर व्हिजन लि., हाँगकाँग यांचे समवेत अर्बिस्ट्रेशन करणेविषयी ॲड संजय चौकीदार व अँड रमेश सोनी यांचेकडून सध्या लेखी स्वरुपात मार्गदर्शन मागविणेत यावे. यथावकाश त्यांचे सोयीनुसार, त्यांना स्थानिक उपसमितीसमोर चर्चेसाठी आमंत्रित करणेत यावे, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग)

---

१५ **संस्थान निधीतुन बांधण्यात आलेल्या शिर्डी येथील सर्व्हे नं.१७१/१२ मधील बसस्थानक व भक्तनिवास इमारतीस अग्निशमन यंत्रणा बसविणेकामी उघडणेत आलेल्या ई-निविदांवर (Commercial Bid) निर्णय होणेबाबत.**

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूदः-** अधिनियमाचे कलम– १७ (१) अन्वये राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधिन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पुजा – अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितीची कर्तव्ये असतील.

अधिनियमाचे कलम २१ मधील पोटकलम (१) च्या खंड (त्र) अन्वये "भक्तांच्या निवासासाठी व त्यांच्या उपयोगासाठी विश्रामगृहे बांधणे व त्यांची देखभाल करणे," अशी तरतूद आहे.

**महाराष्ट्र शासन मान्यताः-** महाराष्ट्र शासन विधी व न्याय विभाग, शासन निर्णय क्र.सासंवि. २००६/ ६०७/ (८७) का. सोळा, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२ दि.१३/०१/२००९ अन्वये संस्थानमार्फत बस स्थानक बांधकामाकरीता रु.७,६५,५०,८९८/- मात्रचे खर्चास मान्यता देणेत आली आहे.

**मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णयः** *मा. व्यवस्थापन समितीचे दि.२३/०५/२०१७ रोजीचे सभेत निर्णय क्र.३९७ अन्वये शिर्डी बसस्थानक येथे अग्निशमन यंत्रणा बसविणेकामी येणारे अंदाजे रु.१०,२८,६५८/- मात्रचे खर्चास व सदरचे काम विहीत पध्दतीने ई– निविदा मागवून करुन घेणेस मान्यता देणेत आली आहे.*

**प्रस्तावनाः-** शिर्डी येथील सर्व्हे नं.१७१ पैकी मधील जागेत जुने बसस्थानक इमारतीचे जागेवर संस्थान निधीतून अद्ययावत बसस्थानक व भक्तनिवास इमारतीचे बांधकाम पूर्ण झालेले आहे. सदर इमारतीस अग्निशमन यंत्रणा बसविणेकामी वर्तमानपत्रात व संस्थानचे संकेत स्थळावर जाहिरात प्रसिध्द करुन दि.२१/११/२०१७ पर्यंत ई – निविदा मागविणेत आल्या होत्या. याकामी प्राप्त ई – निविदांचे तांत्रिक माहीतीचे लिफाफे दि.२७/११/२०१७ रोजीचे मा.खरेदी समितीचे सभेपुढे उघडणेत आले आहेत. उघडणेत आलेल्या ई – निविदांचे टेक्नीकल बीड मधील कागदपत्रांची छाननी केली असून, त्यानुसार पात्रतेबाबतचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.न. | निविदाधारकाचे नाव | शेरा |
|---|---|---|
| 01 | Arush Fire Systems Pvt.Ltd. | Qualify |
| 02 | Cease Fire Extinguishers & Systems India Pvt. | Qualify |
| 03 | Master Fire Engineering Pvt.Ltd., Pune | Does not Qualify |
| 04 | J & T Engineeing Works, Mumbai | Qualify |
| 05 | Acufire Systems Pvt.Ltd. Pune | Qualify |
| 06 | Nirmalahari Trading Co., Pune | Does not Qualify |
| 07 | Oasis Engineers | Qualify |
| 08 | Oriental Fire Tech Systems, Mumbai | Does not Qualify |

उपरोक्त पात्र ई – निविदाधारकांचे वाणिज्यीक (Commercial Bid) लिफाफा दि.०७/१२/२०१७ रोजीचे मा.खरेदी समितीचे सभेपुढे उघडणेत आलेला आहे. त्याचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं. | निविदाधारकाचे नाव | रक्कम | शेरा |
|---|---|---|---|
| 01 | Oasis Engineers, Kalyan (w) | 14,39,900.00 | L- 1 |
| 02 | J & T Engineeing Works, Mumbai | 14,56,410.00 | L- 2 |
| 03 | Arush Fire Systems Pvt.Ltd., Pune | 14,99,634.00 | L- 3 |
| 04 | Cease Fire Extinguishers & Systems India Pvt., Mumbai | 18,44,021.00 | L- 4 |
| 05 | Acufire Systems India Private Limited, Pune | 19,72599.00 | L- 5 |

शिर्डी येथील सर्व्हे नं.१७१/१२ मधील बस स्थानक व भक्तनिवास इमारतीस अग्निशमन यंत्रणा बसविणे कामी वरीलपैकी ओॲसिस इंजिनिअर्स, यांचे निम्नतम दरानुसार येणारे रक्कम रु.१४,३९,९००/- मात्रचे खर्चास तसेच याकामी त्यांना कार्यादेश देणेकरिता मा. व्यवस्थापन समितीकडे शिफारस करणेकामी सदरील विषय मा.उपसमितीचे दि.१६/१२/२०१७ रोजीचे सभेत निर्णयार्थ सादर करणेत आला होता. सदरहू सभेत उपरोक्त प्रस्तावावर निर्णय घेणेसाठी संस्थान नियुक्त फायर कन्सल्टंट व मेजर उंडे, श्रीरामपूर यांना उपसमिती सभेसमोर बोलविणेत यावे, तोपर्यंत सदरहू विषय स्थगित ठेवण्यात यावा, अशी शिफारस स्थानिक उपसमिती सभेमध्ये करण्यात आली आहे.

मा. स्थानिक उपसमितीचे शिफारशीस अनुसरुन संस्थान नियुक्त फायर कन्सल्टंट व मेजर उंडे, श्रीरामपूर हे आज रोचीचे मा. स्थानिक उपसमिती सभेपुढे उपस्थीत आहेत. तरी त्यांचेशी सदर प्रस्तावावर चर्चा करणेत येऊन, मा. व्यवस्थापन समितीकडे शिफारस करणेकामी सदरील विषय मा.उपसमिती सभेत निर्णयार्थ सादर.

**संस्थान नियुक्त फायर कन्सल्टंट मे.ग्राफीक्स व मेजर उंडे, श्रीरामपूर हे आजचे उपसमिती सभेसमोर उपस्थित होते. शिर्डी बसस्थानक येथे अग्निशमन यंत्रणा बसविणेबाबत सभेने त्यांचेबरोबर चर्चा केली असता, शिर्डी बसस्थानक येथे अग्निशमन यंत्रणा बसविणे अत्यावश्यक असलेचे त्यांनी सांगितले.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थान नियुक्त फायर कन्सल्टंट मे.ग्राफीक्स व मेजर उंडे, श्रीरामपूर यांचेकडून संस्थान निधीतुन बांधण्यात आलेल्या शिर्डी बसस्थानक व भक्तनिवास इमारतीस अग्निशमन यंत्रणा बसविणेकामीचे टेंडर डॉक्युमेंट तपासून घ्यावे व त्यांच्या अभिप्रायानुसार प्रस्तावित निम्नतम दरधारकास चर्चेसाठी पुढील उपसमिती सभेसमोर बोलविणेत यावे, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

**यावेळी श्री.उंडे यांच्या नियुक्तीसंदर्भात, त्यांचेबरोबर चर्चा झाली असता, त्यामध्ये श्री.उंडे हे फक्त फायर ॲण्ड सेफ्टीचे ऑपरेशन करु शकतात व संस्थान नियुक्त फायर कन्सल्टंट मे.ग्राफीक्स यांचे कामामध्येही त्याचा समावेश आहे, असे निदर्शनास आले.**

(कार्यवाही- कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग/ फायर ॲण्ड सेफ्टी विभागप्रमुख)

---

१६ **प्रसादालय विभागाकरीता भाजीपाला खरेदी करणेकामीच्या वाणिज्यीक प्रस्तावांवर निर्णय होणेबाबत.**

संस्थानचे प्रसादालयासाठी बटाटा, कांदा, आद्रक भाजीपाला खरेदीकामी ई ऑनलाईन- निविदा प्रक्रिया राबविणेत आली होती. यामध्ये खालीलप्रमाणे पाच ई-निविदा प्राप्त झाल्या होत्या.

१. सह्याद्री स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्था लि, अकोला
२. तिरूपती व्हेजिटेबल कंपनी, राहाता
३. साळुंके ट्रेडिंग कंपनी, पुणे
४. किसान ट्रेंडिंग कंपनी, कोपरगांव
५. जय मल्हार ट्रेंडिंग कंपनी, राहाता

वरील ५ निविदाधारकांच्या तांत्रीक निविदा (Technical Bid) दि.१९.१२.२०१७ रोजी उघडण्यात आल्या होत्या. हे सर्व ५ निविदाधारक तांत्रीक निविदेमध्ये पात्र ठरले होते. सदर पात्र ५ निविदाधारकांचे निविदेचे Commercial Bid दिनांक ११.०१.२०१८ रोजी मा.खरेदी समिती सभेत उघडण्यात आलेले आहेत.

त्याचा तपशील खालीलप्रमाणे –

| Sl. No | Description of Work / Item(s) | No.of Qty | Sahyadri Swayamrozgar Seva Sahakari Sanstha Ltd. | TIRUPATI VEGETABLE COMPANY | Salunke Trading Company | KISAN TRADING COMPANY | JAI MALHAR TRADING COMPANY |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | Rate | Rate | Rate | Rate | Rate |
| 1.00 | बटाटा - चांगल्या प्रतीचा व मोठा | 102174 किलो | 12.00 | 18.00 | 11.99 | 11.00 | **9.99** |
| 2.00 | कांदा - चांगल्या प्रतीचा व मोठा | 66459 किलो | **26.00** | 39.00 | 34.90 | 29.50 | 34.99 |
| 3.00 | आद्रक (आले) - चांगल्या प्रतीचे | 1725 किलो | 35.00 | 30.00 | **29.90** | 39.00 | 30.00 |

तरी उपरोक्त Online प्राप्त तुलनात्मक तक्त्यांतील गडद व अधोरेखित केलेल्या न्युनतम दराबाबत निर्णय होणेकामी सदरचा विषय मा.उपसमितीचे सभेत सादर.

**प्रसादालय विभागाकरीता भाजीपाला खरेदी करणेकामी राबविणेत आलेल्या ई-निविदा प्रक्रियेमधील निम्नतम दरधारक हे आजचे स्थानिक उपसमिती सभेसमोर चर्चेसाठी उपस्थित होते. सभेने त्यांचेशी दर कमी करणेबाबत चर्चा केली असता त्यांनी दर कमी करणेस असमर्थता दर्शविली.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रसादालय विभागाकरीता भाजीपाला खरेदी करणेकामी उपरोक्त तुलनात्मक तक्त्यामधील गडद व अधोरेखीत केलेले निम्नतम दर मार्च, २०१८ अखेर पर्यंत स्विकारणेत येऊन संबंधीतास तात्काळ कार्यादेश देण्यात यावा व यास व्यवस्थापन समितीची कार्योत्तर मान्यता घेण्यात यावी, तसेच पुढील वर्षाकरीता भाजीपाला खरेदीसाठी ई-निविदा प्रक्रिया त्वरीत सुरु करणेत यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, खरेदी विभाग/ प्रसादालय विभागप्रमुख)

---

१७ **श्री साई समाधी शताब्दी महोत्सवाच्या अनुशंगाने प्लॅस्टिक खुर्च्या खरेदी करणेकामीच्या वाणिज्यीक प्रस्तावांवर निर्णय होणेबाबत.**

संस्थानचे बांधकाम विभागासाठी निलकमल कंपनीच्या CHR-2135 या मॉडेलच्या प्लॅस्टिक खुर्च्या खरेदी करण्याचे ठरले होते. त्यास अनुसरुन खरेदी विभागाचे दिनांक १५.११.२०१७ चे टिपणीअन्वये रक्कम रु.४,३५,०००/- मात्रचे खर्चास मान्यता मिळाली होती.

याकामी ऑनलाईन ई-निविदा मागविण्यात आल्या होत्या. यामध्ये खालील सात ई-निविदा प्राप्त झाल्या होत्या.

१. संकल्प सेल्स, चंद्रपुर
२. रोहन एंटरप्रायजेस, अहमदनगर
३. क्लासिक स्टेशनर्स, मुंबई
४. श्री.ए.डी. एंटरप्रायजेस, ठाणे
५. एशियन सेल्स कॉर्पोरेशन, नाशिक
६. रोमन स्टेशनर्स अॅण्ड प्रिंटर्स, मुंबई
७. प्रायमा प्लॅस्टिक्स लिमीटेड, मुंबई

सदर ७ निविदाधारकांच्या तांत्रीक निविदा (Technical Bid) दि.१९.१२.२०१७ रोजी उघडण्यात आल्या होत्या. यापैकी अ.नं.१ ते ६ निविदाधारक तांत्रीक निविदेमध्ये पात्र ठरले होते. तर अ.नं.७ मे.प्रायमा प्लॅस्टिक्स लिमीटेड, मुंबई यांनी Prima Chairs साठी निविदा भरलेमुळे ते तांत्रिक निविदेमध्ये अपात्र ठरले होते. सदर पात्र ६ निविदाधारकांचे Commercial Bid दिनांक ११.०१.२०१८ रोजी मा.खरेदी समिती सभेत उघडण्यात आलेले आहेत.

त्याचा तपशील खालीलप्रमाणे –

| Sl. No | Description of Work / Item(s) | Roman Stationers Printers | CLASSIC STATION ERS, CO. | Asian Sales Corporation | Rohan Enterprises | SHREE A. D. ENTERPRISE | Sankalp Sales |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | Rate | Rate | Rate | Rate | Rate | Rate |
| 1 | PVC / Plastic Molded Chair with arms rest and made from 100% virgin Polymers. (Nilkamal Model No. CHR-2135 Coffee Colour) 600 Nos. | 884.00 | 888.00 | 698.00 | 656.00 | 799.00 | 571.50 |

तरी उपरोक्त Online प्राप्त तुलनात्मक तक्त्यांतील गडद व अधोरेखित केलेल्या न्युनतम दराबाबत निर्णय होणेकामी सदरचा विषय मा.खरेदी समितीचे सभेत सादर.

**श्री साई समाधी शताब्दी महोत्सवाच्या अनुशंगाने प्लॅस्टिक खुर्च्या खरेदी करणेकामी राबविण्यात आलेल्या ई-निविदा प्रक्रियेमधील निम्नतम दरधारक संकल्प सेल्स, चंद्रपुर हे आजचे स्थानिक उपसमिती सभेसमोर चर्चेसाठी उपस्थित होते. चर्चेदरम्यान त्यांनी, ई-निविदेत नमुद केलेल्या दरामध्ये G.S.T. चा समावेश केलेला नाही, G.S.T. दर वेगळा मिळावा, अशी विनंती केली. परंतु निविदेतील अटी/ शर्तीनुसार वेगळा G.S.T. देता येणार नाही व ई-निविदेतील नमुद निम्नतम दरानेच पुरवठा करणे बंधणकारक राहील, असे त्यांना सांगितले असता, त्यांनी सदरहू पुरवठा करणेस असमर्थतता दर्शविली.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साई समाधी शताब्दी महोत्सवाच्या अनुशंगाने प्लॅस्टिक खुर्च्या खरेदी करणेकामी जीएसटीसह दर मागविणेत आले होते. परंतु सदरहू ई-निविदा प्रक्रियेमधील निम्नतम दरधारक संकल्प सेल्स, चंद्रपुर यांनी, त्यांच्या दरांमध्ये जीएसटीचा समावेश केलेला नाही व वेगळया जीएसटीची मागणी केलेली आहे, याकरीता प्लॅस्टिक खुर्च्या खरेदी करणेकामी नामांकित कंपन्यांच्या प्लॅस्टिक खुर्च्यांच्या मानकाप्रमाणे, मानके निश्चित करुन, खरेदी करणेसाठी नव्याने ई-निविदा प्रक्रिया राबविणेत यावी. तसेच संकल्प सेल्स, चंद्रपुर यांनी ई-निविदेमधील निम्नतम दराने प्लॅस्टिक खुर्च्यांचा पुरवठा करणेस असमर्थता दर्शविली, यामुळे त्यांची बयाणा रक्कम जप्त करणेत यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, खरेदी विभाग)

---

१८ **पाणी पुरवठा विभागाकरीता प्लंबिंग मेंटेनन्स साहित्य खरेदी करणेकामीच्या वाणिज्यीक प्रस्तावांवर निर्णय होणेबाबत.**

संस्थानचे पाणी पुरवठा विभागासाठी प्लम्बींग साहित्य खरेदीकामी दुस-यांदा ऑनलाईन ई-निविदा मागविन्यात आल्या होत्या. यामध्ये खालील तीन ई-निविदा प्राप्त झाल्या होत्या.

१. एशियन सेल्स कॉर्पोरेशन, नाशिक

२. प्रसन्ना पाईप्स, कोपरगाव

३. जिजाऊ इन्फोटेक, औरंगाबाद

सदर ३ निविदाधारकांच्या तांत्रीक निविदा (Technical Bid) दि.१९.१२.२०१७ रोजी उघडण्यात आल्या होत्या. यामध्ये तीनही निविदाधारक तांत्रीक निविदेमध्ये पात्र ठरले होते. सदर पात्र ३ निविदाधारकांचे Commercial Bid दिनांक ११.०१.२०१८ रोजी मा.खरेदी समिती सभेत उघडण्यात आलेले आहेत.

त्याचा तपशील खालीलप्रमाणे –

| Sl.No | Description of Work / Item(s) | No.of Qty | Units | Asian Sales Corporation | Sanjay Premsukh Bumb | JIJAU INFOTECH |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | Rate | Rate | Rate |
| 1.00 | लॉग बॉडी कॉक (नं.5037 N) कंपनी - जग्वार | 78.00 | नग | 1038.00 | **935.00** | 940.00 |
| 2.00 | बेसीन पिलर कॉक (नं.CQT-231698) कंपनी - जग्वार | 28.00 | नग | 2884.00 | **2635.00** | 2990.00 |
| 3.00 | सी.पी.ॲंगल कॉक (नं.CQT-23.53) कंपनी - जग्वार | 78.00 | नग | 624.00 | **595.00** | 610.00 |
| 4.00 | वॉल हॅगिंग कमोड संडास भांडे कव्हर, जेटसह सफेद (नं.0298) कंपनी - पॅरिवेअर | 28.00 | नग | 4980.00 | **3900.00** | 6289.00 |
| 5.00 | ग्रेनाईट व्हाईट राऊंड बेसीन (नं.0448) कंपनी - पॅरिवेअर | 28.00 | नग | 4250.00 | **1750.00** | 3657.00 |
| 6.00 | फ्लश व्हॉल (नं.FLV 1095) कंपनी - जग्वार | 28.00 | नग | 2600.00 | **2380.00** | 2390.00 |
| 7.00 | हॅन्ड जेट स्प्रे कंपनी - जग्वार | 50.00 | नग | 786.00 | **720.00** | 1240.00 |
| 8.00 | 1/2" गेट व्हॉल कंपनी - लिडर | 50.00 | नग | **420.00** | 520.00 | 654.00 |
| 9.00 | 1" गेट व्हॉल कंपनी - लिडर | 25.00 | नग | **765.00** | 1095.00 | 1274.00 |

तरी उपरोक्त Online प्राप्त तुलनात्मक तक्त्यांतील गडद व अधोरेखित केलेल्या न्युनतम दराबाबत निर्णय होणेकामी सदरचा विषय मा.उपसमितीचे सभेत सादर.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, पाणी पुरवठा विभागाकरीता प्लंबिंग मेंटेनन्स साहित्य खरेदी करणेकामी उपरोक्त तुलनात्मक तक्त्यामधील गडद व अधोरेखीत केलेले निम्नतम दर स्विकारणेत येऊन, संबंधीतांना पुरवठा आदेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, खरेदी विभाग)

---

१९ **पाणी पुरवठा विभागाकरीता सन २०१७-१८ करीता वार्षिक साहित्य खरेदी करणेकामीच्या वाणिज्यीक प्रस्तावांवर निर्णय होणेबाबत.**

संस्थानचे पाणी पुरवठा विभागाकरीता सन २०१७-१८ वार्षिक साहित्य खरेदीकामी मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक २५.०९.२०१७ चे सभेतील निर्णय क्र.८३० अन्वये रक्कम रु.१,४४,८४,४५५/- मात्रचे खर्चास मान्यता मिळाली होती.

त्यास अनुसरुन ऑनलाईन ई-निविदा मागविन्यात आल्या होत्या. यामध्ये खालीलप्रमाणे चार ई-निविदा प्राप्त झाल्या होत्या.

१. एक्सल ट्रेडिंग कंपनी, मुंबई
२. युनियन ट्रेडिंग कंपनी, नाशिक
३. प्रसन्ना पाईप्स,कोपरगांव (श्री.संजय प्रेमसुख बंब)
४. जिजाऊ इन्फोटेक, औरंगाबाद

सदर ४ निविदाधारकांच्या तांत्रीक निविदा (Technical Bid) दि.१९.१२.२०१७ रोजी उघडण्यात आल्या होत्या. यामध्ये चारही निविदाधारक तांत्रीक निविदेमध्ये पात्र ठरले होते. सदर पात्र ४ निविदाधारकांचे ई-निविदेचे Commercial Bid दिनांक ११.०१.२०१८ रोजी मा.खरेदी समिती सभेत उघडण्यात आलेले आहेत.

त्याचा तपशील खालीलप्रमाणे –

| Sl.No | Description of Work / Item(s) | No.of Qty | Units | EXCEL TRADING COMPANY | Union Trading | Sanjay Premsukh Bumb | JIJAU INFOTECH |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | Rate | Rate | Rate | Rate |
| 1.00 | फायबर पुश कॉक - साईज - 1/2", कंपनी - सुप्रिम/प्रयाग/वॉटर टेक | 5000.00 | नग | 148 | 95 | 71 | 122.34 |
| 2.00 | फायबर बीब कॅाक (शॅाट बॅाडी) - साईज - 1/2", कंपनी - सुप्रिम/प्रयाग/वॉटर टेक | 1000.00 | नग | 167 | 108 | 90 | 139.33 |
| 3.00 | फायबर बीब कॅाक (लॅाग बॅाडी) - साईज - 1/2", कंपनी - सुप्रिम/प्रयाग/वॉटर टेक | 500.00 | नग | 240 | 150 | 130 | 191.16 |
| 4.00 | बिब कॉक - साईज - 1/2" कंपनी - प्लंबर/जग्वार/हिंदवेअर | 250.00 | नग | 0 | 425 | 495 | 980 |
| 5.00 | पिलर कॉक फायबर - साईज - 1/2", कंपनी - सुप्रिम/प्रयाग/वॉटर टेक | 300.00 | नग | 240 | 190 | 148 | 243.84 |
| 6.00 | पिलर कॉक फायबर - साईज - 1/2", कंपनी - सुप्रिम/प्रयाग/वॉटर टेक | 300.00 | नग | 240 | 189 | 148 | 243.84 |
| 7.00 | सी.पी.ॲंगल कॉक - साईज - 1/2" कंपनी - प्लंबर/जग्वार/हिंदवेअर | 300.00 | नग | 0 | 396 | 300 | 890 |
| 8.00 | फायबर ॲंगल कॉक - साईज - 1/2", कंपनी - सुप्रिम/प्रयाग/वॉटर टेक | 200.00 | नग | 197 | 118 | 100 | 146.13 |
| 9.00 | पितळी स्टॉप कॉक - साईज - 1/2", कंपनी - प्लंबर | 100.00 | नग | 0 | 396 | 0 | 240 |
| 10.00 | डॉक्टर कॉक - साईज - 1/2", कंपनी - प्लंबर | 20.00 | नग | 0 | 1097 | 1130 | 2200 |
| 11.00 | कुलपाचे नळ (नट असलेले) - साईज - 1/2" | 10.00 | नग | 59 | 260 | 75 | 180 |
| 12.00 | टी.जार.कॉक (चेक नट,बुशिंग वायसरसह) - साईज - 1/2" | 100.00 | नग | 0 | 560 | 140 | 250 |
| 13.00 | युरिनल पुश कॉक फायबर - साईज - 1/2", कंपनी - सुप्रिम/प्रयाग/वॉटर टेक | 200.00 | नग | 136 | 95 | 75 | 122.34 |
| 14.00 | बेसीन मिक्सर कॉक - साईज - 1/2" कंपनी - प्लंबर/जग्वार/हिंदवेअर | 30.00 | नग | 0 | 1780 | 1700 | 3190 |
| 15.00 | पिलरकॉक (सी.पी.दांडीचे) - साईज - 1/2", टाईप - AT-1121, कंपनी - प्लंबर | 50.00 | नग | 0 | 1116 | 1150 | 1340 |
| 16.00 | जी.आय. पाईप - साईज - 1/2", टाईप - C-Class, कंपनी - प्रकाश सुर्या/झेनिथ/स्वास्तिक | 1500.00 | फुट | 36 | 35 | 36 | 39.11 |
| 17.00 | जी.आय. पाईप - साईज - 3/4", टाईप - C-Class, कंपनी - प्रकाश सुर्या/झेनिथ/स्वास्तिक | 200.00 | फुट | 45 | 44.25 | 46 | 50.03 |
| 18.00 | जी.आय. पाईप - साईज - 1", टाईप - C-Class, कंपनी - प्रकाश सुर्या/झेनिथ/स्वास्तिक | 1000.00 | फुट | 62 | 64 | 65 | 71.54 |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 19.00 | जी.आय. पाईप - साईज - 1.1/4", टाईप - C-Class, कंपनी - प्रकाश सुर्या/झेनिथ/स्वास्तिक | 200.00 | फुट | 70 | 81.75 | 85 | 92.55 |
| 20.00 | जी.आय. पाईप - साईज - 1.1/2", टाईप - C-Class, कंपनी - प्रकाश सुर्या/झेनिथ/स्वास्तिक | 1000.00 | फुट | 95 | 96 | 98 | 107.62 |
| 21.00 | जी.आय. पाईप - साईज - 2", टाईप - C-Class, कंपनी - प्रकाश सुर्या/झेनिथ/स्वास्तिक | 1000.00 | फुट | 129 | 129 | 130 | 144.57 |
| 22.00 | जी.आय. पाईप - साईज - 2.1/2", टाईप - C-Class, कंपनी - प्रकाश सुर्या/झेनिथ/स्वास्तिक | 500.00 | फुट | 165 | 169 | 170 | 188.89 |
| 23.00 | जी.आय. पाईप - साईज - 3", टाईप - C-Class, कंपनी - प्रकाश सुर्या/झेनिथ/स्वास्तिक | 500.00 | फुट | 207 | 207 | 210 | 231.37 |
| 24.00 | जी.आय. पाईप - साईज - 4", टाईप - C-Class, कंपनी - प्रकाश सुर्या/झेनिथ/स्वास्तिक | 200.00 | फुट | 291 | 299 | 320 | 334.95 |
| 25.00 | जी.आय.सॉकेट - साईज - 1/2", टाईप - ISI/हेवी | 200.00 | नग | 12 | 10.5 | 11 | 27.4 |
| 26.00 | जी.आय.सॉकेट - साईज - 3/4", टाईप - ISI/हेवी | 50.00 | नग | 18.5 | 15 | 17 | 47 |
| 27.00 | जी.आय.सॉकेट - साईज - 1", टाईप - ISI/हेवी | 100.00 | नग | 25 | 18.8 | 21 | 64 |
| 28.00 | जी.आय.सॉकेट - साईज - 1.1/4", टाईप - ISI/हेवी | 20.00 | नग | 41 | 28.8 | 33 | 93 |
| 29.00 | जी.आय.सॉकेट - साईज - 1.1/2", टाईप - ISI/हेवी | 100.00 | नग | 48 | 37.4 | 42 | 118 |
| 30.00 | जी.आय.सॉकेट - साईज - 2", टाईप - ISI/हेवी | 100.00 | नग | 74 | 61 | 68 | 175 |
| 31.00 | जी.आय.सॉकेट - साईज - 2.1/2", टाईप - ISI/हेवी | 50.00 | नग | 123 | 98 | 110 | 301 |
| 32.00 | जी.आय.सॉकेट - साईज - 3", टाईप - ISI/हेवी | 75.00 | नग | 173 | 99 | 170 | 382 |
| 33.00 | जी.आय.सॉकेट - साईज - 4", टाईप - ISI/हेवी | 30.00 | नग | 295 | 245 | 270 | 690 |
| 34.00 | जी.आय.एलबो - साईज - 1/2", टाईप - ISI/हेवी | 300.00 | नग | 13 | 11.3 | 11.8 | 32.2 |
| 35.00 | जी.आय.एलबो (कन्सील) - साईज - 1/2", टाईप - ISI/हेवी | 100.00 | नग | 30 | 30 | 18 | 39 |
| 36.00 | जी.आय.एलबो - साईज - 1", टाईप - ISI/हेवी | 100.00 | नग | 34 | 27 | 31 | 76.3 |
| 37.00 | जी.आय.एलबो - साईज - 1.1/4", टाईप - ISI/हेवी | 20.00 | नग | 59 | 41 | 46 | 126 |
| 38.00 | जी.आय.एलबो - साईज - 1.1/2", टाईप - ISI/हेवी | 50.00 | नग | 71 | 55.3 | 62 | 157 |
| 39.00 | जी.आय.एलबो - साईज - 2", टाईप - ISI/हेवी | 50.00 | नग | 102 | 82 | 92 | 296 |
| 40.00 | जी.आय.एलबो - साईज - 2.1/2", टाईप - ISI/हेवी | 30.00 | नग | 187 | 161 | 180 | 465 |
| 41.00 | जी.आय.एलबो - साईज - 3", टाईप - ISI/हेवी | 30.00 | नग | 245 | 223 | 250 | 625 |
| 42.00 | जी.आय.एलबो - साईज - 4", टाईप - ISI/हेवी | 20.00 | नग | 501 | 380 | 430 | 1218 |
| 43.00 | जी.आय.रेड्युसर एलबो - साईज - 1"x1/2", टाईप - ISI/हेवी | 100.00 | नग | 34 | 30 | 35 | 85 |
| 44.00 | जी.आय.युनियन - साईज - 1/2", टाईप - ISI/हेवी | 150.00 | नग | 36 | 31 | 33 | 86.6 |
| 45.00 | जी.आय.युनियन - साईज - 1", टाईप - ISI/हेवी | 50.00 | नग | 66 | 55 | 62 | 194 |
| 46.00 | जी.आय.युनियन - साईज - 1.1/2", टाईप - ISI/हेवी | 75.00 | नग | 116 | 100 | 113 | 345 |
| 47.00 | जी.आय.युनियन - साईज - 2", टाईप - ISI/हेवी | 50.00 | नग | 181 | 154 | 175 | 446 |
| 48.00 | जी.आय.युनियन - साईज - 2.1/2", टाईप - | 10.00 | नग | 348 | 290 | 330 | 711 |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | ISI/हेवी | | | | | | |
| 49.00 | जी.आय.युनियन - साईज - 3", टाईप - ISI/हेवी | 10.00 | नग | 484 | 410 | 470 | 1082 |
| 50.00 | जी.आय.टी - साईज - 1/2", टाईप - ISI/हेवी | 200.00 | नग | 23 | 18.7 | 19.5 | 47 |
| 51.00 | जी.आय.टी - साईज - 1", टाईप - ISI/हेवी | 100.00 | नग | 46 | 35 | 40 | 105 |
| 52.00 | जी.आय.टी - साईज- 1.1/2", टाईप - ISI/हेवी | 50.00 | नग | 85 | 70 | 80 | 230 |
| 53.00 | जी.आय.टी - साईज - 2", टाईप - ISI/हेवी | 50.00 | नग | 136 | 107 | 125 | 377 |
| 54.00 | जी.आय.टी - साईज - 2.1/2", टाईप - ISI/हेवी | 20.00 | नग | 248 | 199 | 230 | 643 |
| 55.00 | जी.आय.टी - साईज - 3", टाईप - ISI/हेवी | 20.00 | नग | 352 | 290 | 340 | 826 |
| 56.00 | जी.आय.टी - साईज - 1" x 1/2", टाईप - ISI/हेवी | 100.00 | नग | 46 | 40.53 | 47 | 125 |
| 57.00 | जी.आय.टी - साईज -1. 1/2"x1", टाईप - ISI/हेवी | 25.00 | नग | 88 | 78 | 90 | 265 |
| 58.00 | जी.आय.टी - साईज -1/2" x 3/4", टाईप - ISI/हेवी | 25.00 | नग | 33 | 31 | 35 | 85 |
| 59.00 | जी.आय.टी - साईज -1" x 3/4", टाईप - ISI/हेवी | 20.00 | नग | 49 | 41 | 47 | 120 |
| 60.00 | जी.आय.टी - साईज -1.1/4"x1", टाईप - ISI/हेवी | 20.00 | नग | 66 | 59 | 70 | 245 |
| 61.00 | जी.आय.टी - साईज -3"x 2.1/2", टाईप - ISI/हेवी | 10.00 | नग | 348 | 329 | 380 | 860 |
| 62.00 | जी.आय.टी - साईज - 2"x 1", टाईप - ISI/हेवी | 10.00 | नग | 136 | 121 | 140 | 380 |
| 63.00 | जी.आय.टी - साईज - 2.1/2"x 2", टाईप - ISI/हेवी | 10.00 | नग | 233 | 219 | 260 | 655 |
| 64.00 | जी.आय. रेड्युसर - साईज - 1"x 1/2", टाईप - ISI/हेवी | 100.00 | नग | 25 | 21 | 24 | 65 |
| 65.00 | जी.आय. रेड्युसर - साईज - 1"x 3/4", टाईप - ISI/हेवी | 50.00 | नग | 25 | 21 | 24 | 75 |
| 66.00 | जी.आय. रेड्युसर - साईज - 1/2"x 3/4", टाईप - ISI/हेवी | 50.00 | नग | 19 | 16.6 | 20 | 48 |
| 67.00 | जी.आय. रेड्युसर - साईज - 1"x 1.1/2", टाईप - ISI/हेवी | 25.00 | नग | 53 | 41 | 48 | 120 |
| 68.00 | जी.आय. रेड्युसर - साईज - 1.1/2"x 1.1/4", टाईप - ISI/हेवी | 20.00 | नग | 53 | 41 | 48 | 115 |
| 69.00 | जी.आय. रेड्युसर - साईज - 2"x 1.1/2", टाईप - ISI/हेवी | 25.00 | नग | 79 | 67 | 80 | 185 |
| 70.00 | जी.आय. रेड्युसर - साईज - 3"x 2", टाईप - ISI/हेवी | 10.00 | नग | 177 | 163 | 190 | 395 |
| 71.00 | जी.आय. बेंड - साईज - 1.1/2", टाईप - ISI/हेवी | 40.00 | नग | 73 | 98 | 85 | 160 |
| 72.00 | जी.आय. बेंड - साईज - 2", टाईप - ISI/हेवी | 40.00 | नग | 112 | 165 | 135 | 210 |
| 73.00 | जी.आय. बेंड - साईज - 2.1/2", टाईप - ISI/हेवी | 30.00 | नग | 194 | 395 | 240 | 295 |
| 74.00 | जी.आय. बेंड - साईज - 3", टाईप - ISI/हेवी | 30.00 | नग | 283 | 439 | 345 | 395 |
| 75.00 | जी.आय. बेंड - साईज - 4", टाईप - ISI/हेवी | 10.00 | नग | 631 | 798 | 730 | 815 |
| 76.00 | जी.आय. शॉट बेंड - साईज - 3", टाईप - ISI/हेवी | 10.00 | नग | 461 | 995 | 210 | 360 |
| 77.00 | जी.आय. शॉट बेंड - साईज - 4", टाईप - ISI/हेवी | 10.00 | नग | 478 | 1190 | 400 | 750 |
| 78.00 | फ्लश व्हॉल - साईज - 1", टाईप - 0055, कंपनी - प्लंबर | 2500.00 | नग | 0 | 510 | 490 | 595 |
| 79.00 | फ्लश पुश व्हॉल - साईज - 1", टाईप - RX - 7103, कंपनी - प्लंबर | 100.00 | नग | 0 | 2130 | 2092 | 2469 |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 80.00 | फ्लश पुश व्हॉल - साईज - 1.1/4", कंपनी - जग्वार | 25.00 | नग | 0 | 2380 | 2380 | 2650 |
| 81.00 | फ्लश पुश व्हॉल-स्पिंडल - साईज - 1", टाईप - RX - 7103, कंपनी - प्लंबर | 150.00 | नग | 0 | 1650 | 0 | 2469 |
| 82.00 | गेट व्हॉल्व्ह - साईज - 1/2", टाईप - Class - 1, कंपनी - लिडर/झेलोटा | 100.00 | नग | 550 | 570 | 508 | 617 |
| 83.00 | गेट व्हॉल्व्ह - साईज - 3/4", टाईप - Class - 1, कंपनी - लिडर/झेलोटा | 75.00 | नग | 742 | 760 | 685 | 870 |
| 84.00 | गेट व्हॉल्व्ह - साईज - 1", टाईप - Class - 1, कंपनी - लिडर/झेलोटा | 100.00 | नग | 1114 | 997 | 1069 | 1202 |
| 85.00 | गेट व्हॉल्व्ह - साईज - 1.1/2", टाईप - Class - 1, कंपनी - लिडर/झेलोटा | 40.00 | नग | 2189 | 2101 | 2012 | 2360 |
| 86.00 | गेट व्हॉल्व्ह - साईज - 2", टाईप - Class - 1, कंपनी - लिडर/झेलोटा | 40.00 | नग | 3208 | 2953 | 2965 | 3455 |
| 87.00 | गेट व्हॉल्व्ह - साईज - 2.1/2", टाईप - Class - 1, कंपनी - लिडर/झेलोटा | 20.00 | नग | 4951 | 5163 | 4550 | 6008 |
| 88.00 | गेट व्हॉल्व्ह - साईज - 3", टाईप - Class - 1, कंपनी - लिडर/झेलोटा | 20.00 | नग | 7341 | 7600 | 6790 | 8977 |
| 89.00 | पट्टी व्हॉल - साईज - 1/2", टाईप - Class - 1, कंपनी - लिडर/झेलोटा | 100.00 | नग | 248 | 242 | 227 | 335 |
| 90.00 | पट्टी व्हॉल - साईज - 3/4", टाईप - Class - 1, कंपनी - लिडर/झेलोटा | 75.00 | नग | 342 | 332 | 313 | 436 |
| 91.00 | पट्टी व्हॉल - साईज - 1", टाईप - Class - 1, कंपनी - लिडर/झेलोटा | 75.00 | नग | 531 | 550 | 486 | 677 |
| 92.00 | पट्टी व्हॉल - साईज - 1.1/2", टाईप - Class - 1, कंपनी - लिडर/झेलोटा | 40.00 | नग | 1310 | 1195 | 1205 | 1157 |
| 93.00 | पट्टी व्हॉल - साईज - 2", टाईप - Class - 1, कंपनी - लिडर/झेलोटा | 30.00 | नग | 1888 | 2032 | 1735 | 1685 |
| 94.00 | बटर इनव्हरी हेवी स्टेनलेस स्टील नॉन रिटर्न व्हॉल्व - साईज - 3", कंपनी - नोनेमेक्स/किर्लोस्कर/बेन्डको | 10.00 | नग | 0 | 0 | 3140 | 9800 |
| 95.00 | बटर इनव्हरी हेवी स्टेनलेस स्टील नॉन रिटर्न व्हॉल्व- साईज - 4", कंपनी - नोनेमेक्स/किर्लोस्कर/बेन्डको | 10.00 | नग | 0 | 0 | 4570 | 15400 |
| 96.00 | बटर फ्लाय व्हाल - साईज - 3", कंपनी - नोनेमेक्स/किर्लोस्कर/बेन्डको | 6.00 | नग | 3895 | 1590 | 1780 | 10500 |
| 97.00 | बटर फ्लाय व्हाल - साईज - 4", कंपनी - नोनेमेक्स/किर्लोस्कर/बेन्डको | 4.00 | नग | 2962 | 2118 | 2350 | 16000 |
| 98.00 | नॉन रिटर्न व्हॉल पितळी - साईज - 2", कंपनी - नोनेमेक्स/किर्लोस्कर/बेन्डको | 6.00 | नग | 0 | 0 | 2250 | 3818 |
| 99.00 | फ्लॅंज टाईप व्हॉल - साईज - 3", कंपनी - नोनेमेक्स/किर्लोस्कर/बेन्डको | 15.00 | नग | 12237 | 3553 | 12200 | 7100 |
| 100.00 | फ्लॅंज टाईप व्हॉल - साईज - 4", कंपनी - नोनेमेक्स/किर्लोस्कर/बेन्डको | 6.00 | नग | 17110 | 5665 | 17300 | 15400 |
| 101.00 | नॉन रिटर्न व्हॉल - साईज - 3", कंपनी - नोनेमेक्स/किर्लोस्कर/बेन्डको | 10.00 | नग | 7080 | 4232 | 4750 | 7300 |
| 102.00 | नॉन रिटर्न व्हॉल - साईज - 4", कंपनी - नोनेमेक्स/किर्लोस्कर/बेन्डको | 3.00 | नग | 10561 | 5768 | 6400 | 9800 |
| 103.00 | फ्लॅंज टाईप फुट व्हॉल - साईज - 3", कंपनी - | 6.00 | नग | 2950 | 4626 | 3030 | 8000 |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | नोनेमेक्स/किर्लोस्कर/बेन्डको | | | | | | |
| 104.00 | जी.आय.बंद प्लग - साईज - 1/2" | 1000.00 | नग | 5 | 5 | 3 | 10 |
| 105.00 | फायबर बंद प्लग - साईज - 1/2" | 300.00 | नग | 5 | 5 | 2 | 4 |
| 106.00 | जी.आय.बंद प्लग - साईज - 1" | 50.00 | नग | 11.21 | 12.25 | 8 | 25 |
| 107.00 | जी.आय.बंद प्लग - साईज - 1.1/2" | 20.00 | नग | 21 | 26 | 15 | 40 |
| 108.00 | जी.आय.बंद प्लग - साईज - 2" | 20.00 | नग | 28 | 41 | 25 | 60 |
| 109.00 | हेक्सा ब्लेड - साईज - 1/2", टाईप - हायस्पीड, कंपनी - मिरींडा/जे.के. | 100.00 | नग | 50 | 37 | 50 | 4.5 |
| 110.00 | हेक्सा ब्लेड - साईज - 1/2, टाईप - साधे, कंपनी - मिरींडा/जे.के. | 300.00 | नग | 6 | 6.5 | 30 | 3.5 |
| 111.00 | होलटाईट 2017 पॅकींग - साईज - 200 ग्रॅम पॅक, कंपनी - होलटाईट | 5.00 | किलो | 327 | 316 | 0 | 350 |
| 112.00 | एम.सील 2017 पॅकींग - साईज - 100 ग्रॅम पॅक, कंपनी - होलटाईट | 5.00 | किलो | 319 | 285 | 270 | 240 |
| 113.00 | टेपलॉन टेप | 1500.00 | नग | 16 | 9 | 7.5 | 20 |
| 114.00 | व्हाईट सिमेंट - साईज - 1 किलो पॅक, कंपनी - जे.के./बिर्ला | 500.00 | किलो | 0 | 28 | 24 | 30 |
| 115.00 | इनलेट पाईप कोल्ड वॉटर - साईज - 1/2"x1.1/2", कंपनी - सुप्रिम/प्रयाग/वॉटर टेक | 200.00 | नग | 65 | 73 | 39 | 59.47 |
| 116.00 | इनलेट पाईप कोल्ड वॉटर - साईज - 1/2"x 2", कंपनी - सुप्रिम/प्रयाग/वॉटर टेक | 200.00 | नग | 77 | 63 | 44 | 67.97 |
| 117.00 | इनलेट पाईप हॉट वॉटर - साईज - 1/2"x 2" | 100.00 | नग | 118 | 67 | 54 | 70 |
| 118.00 | इनलेट पाईप हॉट वॉटर - साईज - 1/2"x 1.1/2' | 100.00 | नग | 100 | 60 | 49 | 80 |
| 119.00 | जी.आय. क्लीप - साईज - 1/2" | 500.00 | नग | 2 | 2 | 1.25 | 1.7 |
| 120.00 | जी.आय. क्लीप - साईज - 1" | 500.00 | नग | 2.5 | 3 | 1.75 | 2 |
| 121.00 | जी.आय. क्लीप - साईज - 1.1/2" | 200.00 | नग | 5 | 4 | 2.75 | 2.5 |
| 122.00 | जी.आय. क्लीप - साईज - 2.1/2" | 500.00 | नग | 5 | 5 | 4 | 3 |
| 123.00 | जी.आय. क्लीप - साईज - 4" | 500.00 | नग | 5 | 5 | 5 | 4 |
| 124.00 | न्हाणी ट्रॅप जाळी - साईज - 5" | 500.00 | नग | 14 | 20 | 22 | 60 |
| 125.00 | एम.एस फ्लॅंज - साईज - 2" | 75.00 | नग | 118 | 120 | 175 | 20 |
| 126.00 | एम.एस फ्लॅंज - साईज - 2.1/2" | 100.00 | नग | 140 | 156 | 210 | 25 |
| 127.00 | एम.एस फ्लॅंज - साईज - 3" | 100.00 | नग | 348 | 184 | 250 | 30 |
| 128.00 | एम.एस.फ्लॅंज - साईज - 4" | 60.00 | नग | 0 | 255 | 295 | 35 |
| 129.00 | सी.पी.एक्स नेपल - साईज - 1/2" | 5000.00 | नग | 0 | 11 | 13 | 28 |
| 130.00 | पिलर कॉक घुटकी - साईज - 1/2", टाईप - US-13, कंपनी - प्लंबर | 60.00 | नग | 0 | 0 | 0 | 320 |
| 131.00 | पिलर कॉक घुटकी - टाईप - DL-50116, कंपनी - प्लंबर | 70.00 | नग | 0 | 298 | 0 | 320 |
| 132.00 | पिलर कॉक घुटकी - साईज - 1/2", टाईप - EC-106, कंपनी - प्लंबर | 200.00 | नग | 0 | 170 | 0 | 320 |
| 133.00 | पिलर कॉक घुटकी - साईज - 1/2, टाईप - EC-101, कंपनी - प्लंबर | 100.00 | नग | 0 | 170 | 0 | 320 |
| 134.00 | मिक्सर कॉक घुटकी - साईज - 1", कंपनी - प्लंबर | 100.00 | नग | 0 | 0 | 0 | 320 |
| 135.00 | डॉक्टर कॉक घुटकी - साईज - 1/2", कंपनी - प्लंबर | 30.00 | नग | 0 | 435 | 0 | 480 |
| 136.00 | पिलर कॉक घुटकी (श्रीसाईप्रसादलय) - साईज - 1/2", कंपनी - जग्वार | 60.00 | नग | 0 | 0 | 0 | 500 |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 137.00 | बिब कॉक घुटकी ( ५००रुम) - साईज - 1/2", कंपनी - जग्वार | 100.00 | नग | 0 | 0 | 0 | 450 |
| 19.00 | राऊंड (गोल) २१"व्यास X ३"जाड MD | 20.00 | Nos | 1554.00 | 1840.00 | 820.00 |
| 20.00 | राऊंड (गोल) २१"व्यास X ४"जाड HD | 20.00 | Nos | 1998.00 | 1840.00 | 1053.00 |
| 21.00 | राऊंड (गोल) २४"व्यास X ४"जाड HD | 20.00 | Nos | 1998.00 | 2150.00 | 1328.00 |

तरी उपरोक्त Online प्राप्त तुलनात्मक तक्त्यांतील गडद व अधोरेखित केलेल्या न्युनतम दराबाबत निर्णय होणेकामी सदरचा विषय मा.उपसमितीचे सभेत सादर.

**पाणी पुरवठा विभागाकरीता २१ प्रकारचे आर.सी.सी. चेंबर कव्हर (फ्रेमसह) खरेदी करणेकामी राबविणेत आलेल्या ई-निविदा प्रक्रियेमध्ये २१ पैकी २० प्रकारच्या चेंबर कव्हरसाठी श्रीनिवास सिमेंट प्रॉडक्ट, कोपरगाव यांचे दर निम्नतम आहेत व फक्त अ.नं.१८ या एका प्रकारच्या चेंबर कव्हरसाठी ललित सिमेंट प्रॉडक्ट्स, जालना यांचे दर निम्नतम आलेले आहेत. सर्व चेंबर कव्हर एकाच पुरवठाधारकाकडून खरेदी करणे योग्य राहील, याकरीता अ.नं.१८ चे चेंबर कव्हर निम्नतम दरामध्ये पुरविणेची श्रीनिवास सिमेंट प्रॉडक्ट, कोपरगाव यांना विचारणा केली असता, त्यास त्यांनी सहमती दर्शविली.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, पाणी पुरवठा विभागाकरीता आर.सी.सी. चेंबर कव्हर (फ्रेमसह) खरेदी करणेकामी श्रीनिवास सिमेंट प्रॉडक्ट, कोपरगाव यांना ई-निविदेमधील निम्नतम दराने पुरवठा आदेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, खरेदी विभाग)

---

२८ **मा.सदस्यांच्या सुचनांबाबत.**

**आजचे स्थानिक उपसमिती सभेमध्ये विविध चर्चेच्या अनुषंगाने मा.अध्यक्ष महोदय यांचे मान्यतेने खालीलप्रमाणे शिफारसी करणेत आल्या.**

(१) साईबाबा भक्तनिवास व द्वारावती भक्तनिवास विभागांसाठी बेडशीट, उशी कव्हरसह खरेदी करणेकामी निम्नतम दरधारक बांठीया एन्टरप्रायजेस, पुणे यांना पुरवठा आदेश देण्यात आलेला आहे व पुरवठा आदेश दिल्यानंतर त्यांचेकडून प्राप्त बेडशीटचा नमुना आपल्या मागणीप्रमाणे आहे का, याची खात्री करणेसाठी वस्त्र समिती, वस्त्र मंत्रालय, भारत सरकार या प्रयोगशाळेमध्ये पाठविला होता. या प्रयोगशाळेच्या अहवालामध्ये सदरहू बेडशीटची साईज ६०"x९०" ऐवजी ५७"x९०" भरली आहे, असे नमुद आहे. याबाबत चर्चा करणेसाठी आजचे उपसमिती सभेसमोर बांठीया एन्टरप्रायजेस, पुणे यांचे प्रतिनिधी श्री.हर्षल बांठिया हे उपस्थित होते. त्यांना बेडशीटच्या साईजबद्दल विचारणा केली असता, त्यांनी सांगितले की, बेडशीटचा पन्हा ५७ ते ५८ इंच असतो, त्यामुळे कॉटन बेडशीटची रुंदी ६०" होऊ शकत नाही. परंतु बेडशीटची लांबी वाढविता येईल व मागणीपेक्षा २ ते ३ इंच लांबीच्या बेडशीटचा पुरवठा करु, अशी विनंती केली.

यावर सविस्तर चर्चा होऊन, बांठीया एन्टरप्रायजेस, पुणे यांची विनंती मान्य करणेत येऊन, त्यांचेकडून ५८" रुंद व ९२" लांबीचे बेडशीटचा पुरवठा स्विकारणेत यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही- प्र.अधिक्षक, खरेदी विभाग/ साईबाबा भक्तनिवासस्थान/ द्वारावती भक्तनिवासस्थान)

---

(२) दिनांक १३.०२.२०१८ रोजी श्री साई समाधी शताब्दी मंडपामध्ये निशुल्क मधुमेह चिकित्सा शिबीर आयोजित करणेत आलेले आहे. परंतु त्या कालावधीमध्ये सदरहू मंडपामध्ये भागवत कथा सप्ताहाचेही आयोजन करण्यात आलेले असल्यामुळे, दिनांक १३.०२.२०१८ रोजीचे निशुल्क मधुमेह चिकित्सा शिबीर श्री साईप्रसादालयाच्या वरील हॉलमध्ये घेण्यात यावे व या शिबीराच्या अनुशंगाने येणाऱ्या अपेक्षीत खर्चास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

(कार्यवाही- वैद्यकीय अधिक्षीका, श्री साईनाथ हॉस्पिटल)

---

**विषय नं.०३ संस्थानमध्ये चालू व प्रस्तावित असलेल्या महत्वाच्या प्रकल्पांचा आढावा घेणे.**

**प्रस्ताव- अ. चालू असलेले प्रकल्प –**

| अ. नं. | प्रकल्पाचे नांव | अंदाजित खर्च रु. | सद्यस्थिती |
|---|---|---|---|
| ०१ | नविन दर्शनरांग प्रकल्प | ११२.६७ कोटी | याकामी दि.२९/११/२०१७ रोजी बांधकाम परवानगी प्राप्त झाली असून दि.०८/१२/२०१७ रोजीचे मा. व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार याकामी सुधारीत अंदाजपत्रकानुसार येणा-या रु.११२.४१ कोटी खर्चास महाराष्ट्र शासन विधी व न्याय विभाग यांची प्रशासकीय मान्यता मिळणेकामी, त्यांचेकडील दि.२१/१२/२०१७ रोजीचे पत्रातील ०७ मुद्यांची पुर्तता करुन दि.२०/०१/२०१८ रोजी विधी व न्याय विभागाकडे मान्यतेसाठी फेर सादर करण्यात आला आहे. |
| ०२ | घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प | ७.१७ कोटी | प्लास्टिक श्रेडिंगकरीता शेड उभारणे व मौजे शिंगवे येथील नियोजीत घनकचरा प्रकल्पाचे शासन निर्णय रद्द करणे व मौजे निमगांव को-हाळे येथील गट नं. १८२ मधील जागेत नियोजीत प्रकल्पाचे उभारणी साठी येणारे रु. ४.५० कोटी खर्चाचे मान्यतेसाठी प्रस्ताव दि.१९/०९/२०१७ चे पत्राव्दारे शासनाकडे सादर करणेत आला होता. त्यानंतर निविदा प्रक्रियापुर्ण करण्यात आली असून एकमेव पात्र ठेकेदार मे.ऑरगॅनिक रिसायक्लींग सिस्टिम प्रा.लि., मुंबई यांची निविदेनुसार येणारा खर्च रु.७,१७,२१,०००/- ला मान्यता मिळणेसाठी दि.२६/१२/२०१७ चे पत्राव्दारे शासनाकडे मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. |

| अ. नं. | प्रकल्पाचे नांव | अंदाजित खर्च रु. | सद्यस्थिती |
|---|---|---|---|
| ०३ | स्वागत कमानी– दोन | १ कोटी | स्वागत कमानीचे बांधकामासाठी निधी वर्ग करणेसाठी मान्यता मिळणेकरीता दि.२९/०८/२०१७ रोजीचे पत्रान्वये मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग यांचेकडे प्रस्ताव सादर करणेत आला आहे. सदरचा रस्ता हा कार्यकारी अभियंता, राष्ट्रीय महामार्ग विभाग-०९ नाशिक यांचे अखत्यारीत असल्याने त्यांचे दि.२८/११/२०१७ रोजीचा ना-हरकत दाखला मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग यांना दि.०४/१२/२०१७ रोजीचे पत्राने पाठविणेत आलेला आहे. सा.बां.विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी सदरहू कामाचे नकाशे व अंदाजपत्रकात काहि दुरुस्त्या सुचविल्या असून त्यानुसार जागतिक बॅंक प्रकल्प (सा.बां.) विभाग यांना दि.२०/०१/२०१८ रोजी कळविणेत आले आहे. त्यांचेकडून सुधारीत अंदाजपत्रक प्राप्त झाल्यानंतर, मंजुरीसाठी शासनाकडे पाठविण्यात येईल.<br>दरम्यान मा.व्यवस्थापन समितीचे दि.०८/०१/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र.०४ (०३) नुसार स्वागत कमानी उभारणेकामी शासन मान्यता प्राप्त होईपर्यंत फायबरच्या आकर्षक कमानी तात्पुरत्या स्वरुपात उभारणेबाबत कार्यवाही चालु आहे. |
| ०४ | स्कायवॉक | १.३ कोटी | याकामी विहीत मुदतीत फक्त एकच ई-निविदा प्राप्त झालेली असल्याने दि.२९/०१/२०१८ अखेर फेरनिविदा मागविण्यात आल्या आहेत. दुस-यांदाही एकही निविदा प्राप्त झालेली नाही. फेर निविदा मागविणेबाबत कार्यवाही चालु आहे. |
| ०५ | साई आश्रम-१ येथे टेन्साईल फॅब्रिक शेड उभारणे | १.३६ कोटी | मा. प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग यांनी सदरहू प्रस्तावास दि.१९/१२/२०१७ रोजी मंजुरी दिली आहे. शिरडी नगरपंचायत यांची मान्यता घेऊन निम्नतम दराचे ठेकेदार सुभाष कन्स्ट्रक्शन यांना कार्यादेश देण्यात येत आहे. |
| ०६ | श्री साईबाबा समाधी मंदिर परिसरातील फ्लोअरींगचे नुतनीकरण करणे (दुसरा टप्पा) | २.७५ कोटी | ०१. ठेकेदार यांनी समाधी मंदिर, गुरुस्थान,शनिगेट, लेंडीबाग, दत्त मंदिर, गेट नं. ०२,०३,०४, प्रशासकीय कार्यालय, बुक स्टॉल, या परिसरातील फ्लोरींगचे काम पूर्ण केले आहे.<br>०२. सभाकुंड,पी.आर. ओ. गेट नं. ०५ जवळ, म्युझियम इ. ठिकाणचे परिसरातील काम प्रगतीत आहे.<br>०३. फ्लोरींगचे पॉलिशींग व लेदर फिनिशींग प्रगतीत आहे.<br>०४. ठेकेदार यांनीआजपावेतो ९०% काम पूर्ण केलेले आहे. |
| ०७ | साईनगर कर्मचारी वसाहत परिसरा-तील साईनगर, साईध्यान ०१ व ०२, समर्पण इमारतींचे आतिल व बाहेरील रंगकाम करणे. | ३६.९७ लक्ष | याकामी GST सह फेर ई-निविदा मागविणेबाबतच्या प्रस्तावास मान्यता मिळाली असून वर्तमानपत्रात जाहिरात देणेत येत आहे. |
| ०८ | साईनाथ रुग्णालयावर वाढीव मजल्याचे बांधकाम | ४.५ कोटी | सहायक संचालक, नगररचना विभाग, अ.नगर यांनी दि.२२/ ०१/२०१८ अन्वये त्रुटींची पुर्तता करणेबाबत शिर्डी नगरपंचायत यांना कळविले आहे. याबाबत संचालक, नगररचना विभाग, नाशिक रोड, नाशिक यांचेकडे शिर्डी नगरपंचायत यांचेमार्फत दि. २९/०१/२०१८ रोजी तीसरा मजला बांधकामासाठी सामासिक अंतराचे नियमात शिथिलता व रुग्णालय वापरास परवानगी मिळणेबाबत प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. |
| ०९ | नगरपालिका हद्दीतील रस्ता क्र.५ चे उर्वरीत काम पूर्ण करणे (टप्पा-१) | १.७० कोटी | ठेकेदार मे. एस. के. येवलेॲंड कं., संगमनेरयांना कार्यादेश देणेत आला असुन ठेकेदार यांनी आर.सी.सी.पाईप व खडी साईटवर उपलब्ध करुन कामास सुरुवात केलेली आहे. |

| अ. नं. | प्रकल्पाचे नांव | अंदाजित खर्च रु. | सद्यस्थिती |
|---|---|---|---|
| १० | मंदिर परिसरातील इमारतीचे आतील व बाहेरील रंगकाम करणे. | ६४ लक्ष | ठेकेदार यांची ६३,२२,२५१/- मात्र रकमेची निम्नतम निविदा स्विकारणेत आली आहे. अंदाजपत्रकीय रकमेपेक्षा २७ टक्के कमी असलेने शासन निर्णयानुसार रु. १५,५८,९११/- इतक्या रकमेची हमी बँक गॅरंटी प्राप्त झाली असून कार्यादेश देण्यात येत आहे. |
| ११ | साईनाथ रुग्णालयाशेजारी मोकळ्या जागेत रुग्णालयासाठी नविन ईमारतीचे बांधकाम करणे. | --- | सर्व्हे नं.१४८ मधील साईनाथ रुग्णालयाचे पश्चिमेकडील मोकळ्या जागेत नविन ईमारत बांधणेसाठी आर्किटेक्ट म्हणून Design Associates INC, Noida, UP यांची नेमणूक करण्यात आली असून प्लॅनबाबत सविस्तर चर्चा करणेसाठी दि.११/०१/२०१७ रोजी संबंधीतांची आर्किटेक्ट यांचेसमवेत बैठक आयोजित केली होती. सदर बैठकीतील झालेल्या चर्चेनुसार आर्किटेक्ट यांचेमार्फत आराखडयात सुधारणा करण्यात येत आहे. |

**ब. प्रस्तावीत असलेले प्रस्ताव -**

| अ. नं. | प्रकल्पाचे नांव | अंदाजित खर्च | सद्यस्थिती |
|---|---|---|---|
| ०१ | साईसृष्टी प्रकल्प | अंदाजे १४१ कोटी | या प्रकल्पासाठी प्रकल्प सल्लागार म्हणून श्री.संदिप शिक्रे, मुंबई यांना कार्यादेश देण्यात आला आहे. त्यांनी मा.व्यवस्थापन समितीचे सभेत दि.०८/१२/२०१७ रोजी सादरीकरण केले आहे. त्यावेळी त्यांना करण्यात आलेल्या सुचनांनुसार सुधारीत आराखडा आर्किटेक्ट यांनी तयार केला आहे. सुधारीत आराखडा मा.व्य.स. सदस्य यांना दि.०३/०१/२०१८ रोजी ई-मेल करणेत आले आहेत. तसेच मा.व्य.स. दि.०८/०१/२०१८ रोजीचे सभेतील निर्णयान्वये आर्किटेक्ट यांना दि.१२/०१/२०१८ रोजीचे पत्रान्वये मा. व्यवस्थापन समिती सभेत झालेल्या चर्चा अन्वये बदल करणेबाबत कळविण्यात आले आहे. |
| ०२ | साईबाबा भक्तनिवास (५०० रुम) नुतनीकरण | १८.५६ कोटी | शासन मान्यतेसाठी रु.१४.५३ कोटी इतक्या अंदाजपत्रकीय खर्चाचा प्रस्ताव दि.२२/११/२०१७ रोजी सादर करणेत आला होता. दरम्यान सार्वजनिक बांधकाम, महाराष्ट्र शासन यांचा एसएसआर-२०१७-२०१८ प्रसिध्द झाल्याने दि. २७/१२/२०१७ रोजी शासनाचे विधी व न्याय विभाग यांचे मान्यतेसाठी रु.१८.५६ कोटी रकमेचा सुधारीत प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. |
| ०३ | लाडू व बुंदी प्रोसेसिंग युनिट | १४.४१ कोटी | संस्थानचे सामान्य प्रशासन विभाग आदेश क्र. ३४२९ दि.०४/१२/२०१७ अन्वये सदरहू प्रकल्प पायाभूत स्वरुपाचा असल्याने त्यास शासनाची पूर्व मान्यता घेणे आवश्यक असल्याने त्यासाठी सविस्तर अंदाजपत्रक तयार करणेची कार्यवाही करणेत येत आहे. दि.२३/०१/२०१८ रोजी प्राप्त चलनानुसार संस्थानने एकूण रु.३२,९४,७२०/- इतका विकास शुल्क रकमेचा भरणा दि.२५/०१/२०१८ रोजी सहायक संचालक, नगररचना यांचेकेडे सादर केलेला आहे. |
| ०४ | साईप्रसादालय फरशी बदलणे | १.९० कोटी | निम्नतम दराचे ठेकेदार आ.के. सावंत, नाशिक यांचे दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देणेबाबत दि.२०/०८/२०१७ रोजीचे सभेतील निर्णयानुसार ठेकेदार यांना कार्यादेश देण्यात आला आहे. ठेकेदार यांना फरशी बसविणेकरीता नमुना मान्य करणेसाठी मा. व्यवस्थापन समितीचे दि.०२/०२/२०१८ रोजी उपलब्ध करण्यात आला आहे. |
| ०५ | साईप्रसादालय रंगकाम | ८५.८४ लक्ष | जीएसटी नंतरचे निविदा प्रक्रियेत एकच ठेकेदार पात्र होत असल्याने याकामी फेर निविदा मागविण्यात आली असुन निविदा सादर करणेची अंतीम मुदत दि.३०/०१/२०१८ पर्यंत ठेवण्यात आली होती. सदरहु मूदतीत ई-निविदा प्राप्त झाल्या आहेत. सदरहु निविदांचा तांत्रीक लिफाफा खरेदी समितीचे सभेत उघडण्यात येत आहे. |

| अ. नं. | प्रकल्पाचे नांव | अंदाजित खर्च | सद्यस्थिती |
|---|---|---|---|
| ०६ | नविन शैक्षणिक संकुल उभारणी | १२९ कोटी | मा.व्यवस्थापन समितीच्या दि.१४/११/२०१७ रोजीचे बैठकीत आर्किटेक्ट डी. ओ. निकम, पुणे यांनी सादरीकरण केले आहे. सदरहू सभेतील निर्णयानुसार आर्किटेक्ट यांनी नकाशामध्ये सुधारणा केली असून सुधारीत नकाशे सर्व समिती सदस्यांना ई-मेल व्दारे पाठविणेत आले आहेत. आर्किटेक्ट फी ठरविणेबाबत मा. व्यवस्थापन समितीचे सभेत प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. |
| ०७ | शिर्डी नगरपंचायत हद्दीतील DP Plan मधील (टप्पा-२) रस्त्यांचे भूसंपादन करणे. | १६३ कोटी | व्यवस्थापन समितीची मान्यता मिळणेकामी प्रस्ताव दि. १९/०१/२०१८ रोजीचे सभेत प्रस्ताव सादर करण्यात आला होता. त्यानुसार छाननी समिती अध्यक्ष सो मा. श्री. चांदीवाल यांनी दि.२०/०१/२०१८ रोजी समक्ष रस्त्यांचे स्थळ निरीक्षण केले आहे. |
| ०८ | नगर-मनमाड रस्ता दुरुस्ती व सुशोभिकरण | ३.२५ कोटी | ई-प्रस्ताव मसुद्यास मान्यता घेऊन आर्किटेक्ट नेमणूक करणेसाठी प्रस्ताव मागविण्यात येत आहे. |
| ०९ | साई आश्रम-१ रंगकाम व दुरुस्ती | ६.५० कोटी | मा. व्यवस्थापन समितीचे सभेत अंदाजपत्रकास मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार निविदा मागविणेबाबत कार्यवाही करणेत येत आहे. |
| १० | साईनिवासअतिथीगृह व मध्यवर्ती भांडार या इमारतींचे आतील व बाहेरील रंगकाम करणे. | २९.४२ लक्ष | याकामी ई-निविदा मागविणेकामी जाहिरात देण्यात येत आहे. |
| ११ | नविन भांडार इमारतीचे बांधकाम करणे | १३.७१ कोटी | ई-प्रस्ताव मसुद्यास मान्यता घेऊन आर्किटेक्ट नेमणूक करणेसाठी प्रस्ताव मागविण्यात येत आहे. |

**निर्णय क्र.७७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावावर खालीलप्रमाणे चर्चा होऊन निर्णय घेण्यात आले.**

**अ. चालू असलेले प्रकल्प –**

| अ. नं. | प्रकल्पाचे नांव | अंदाजित खर्च रु. | सद्यस्थिती | सभेमध्ये झालेली चर्चा |
|---|---|---|---|---|
| ०१ | नविन दर्शनरांग प्रकल्प | ११२.६७ कोटी | याकामी दि.२९/११/२०१७ रोजी बांधकाम परवानगी प्राप्त झाली असून दि.०८/१२/२०१७ रोजीचे मा. व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार याकामी सुधारीत अंदाजपत्रकानुसार येणा-या रु.११२.४१ कोटी खर्चास महाराष्ट्र शासन विधी व न्याय विभाग यांची प्रशासकीय मान्यता मिळणेकामी, त्यांचेकडील दि.२१/१२/२०१७ रोजीचे पत्रातील ०७ मुद्यांची पुर्तता करुन दि.२०/०१/२०१८ रोजी विधी व न्याय विभागाकडे मान्यतेसाठी फेर सादर करण्यात आला आहे. | नोंद घेण्यात आली. |
| ०२ | घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प | ७.१७ कोटी | प्लास्टिक श्रेडिंगकरीता शेड उभारणे व मौजे शिंगवे येथील नियोजीत घनकचरा प्रकल्पाचे शासन निर्णय रद्द करणे व मौजे निमगांव को-हाळे येथील गट नं. १८२ मधील जागेत नियोजीत प्रकल्पाचे उभारणी साठी येणारे रु. ४.५० कोटी खर्चाचे मान्यतेसाठी प्रस्ताव दि.१९/०९/२०१७ चे पत्राव्दारे शासनाकडे सादर करणेत आला होता. त्यानंतर निविदा प्रक्रियापुर्ण करण्यात आली असून एकमेव पात्र ठेकेदार मे.ऑरगॅनिक | नोंद घेण्यात आली. |

| अ. नं. | प्रकल्पाचे नांव | अंदाजित खर्च रु. | सद्यस्थिती | सभेमध्ये झालेली चर्चा |
|---|---|---|---|---|
| | | | रिसायक्लींग सिस्टिम प्रा.लि., मुंबई यांची निविदेनुसार येणारा खर्च रु.७,१७,२१,०००/- ला मान्यता मिळणेसाठी दि.२६/१२/२०१७ चे पत्राव्दारे शासनाकडे मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. | |
| ०३ | स्वागत कमानी– दोन | १ कोटी | स्वागत कमानीचे बांधकामासाठी निधी वर्ग करणेसाठी मान्यता मिळणेकरीता दि.२९/०८/२०१७ रोजीचे पत्रान्वये मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग यांचेकडे प्रस्ताव सादर करणेत आला आहे. सदरचा रस्ता हा कार्यकारी अभियंता, राष्ट्रीय महामार्ग विभाग-०९ नाशिक यांचे अखत्यारीत असल्याने त्यांचे दि.२८/११/२०१७ रोजीचा ना-हरकत दाखला मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग यांना दि.०४/१२/२०१७ रोजीचे पत्राने पाठविणेत आलेला आहे. सा.बां.विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी सदरहू कामाचे नकाशे व अंदाजपत्रकात काहि दुरुस्त्या सुचविल्या असून त्यानुसार जागतिक बॅंक प्रकल्प (सा.बां.) विभाग यांना दि.२०/०१/२०१८ रोजी कळविणेत आले आहे. त्यांचेकडून सुधारीत अंदाजपत्रक प्राप्त झाल्यानंतर, मंजुरीसाठी शासनाकडे पाठविण्यात येईल.<br>दरम्यान मा.व्यवस्थापन समितीचे दि.०८/०१/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र.०४ (०३) नुसार स्वागत कमानी उभारणेकामी शासन मान्यता प्राप्त होईपर्यंत फायबरच्या आकर्षक कमानी तात्पुरत्या स्वरुपात उभारणेबाबत कार्यवाही चालु आहे. | स्वागत कमानीची डिझाईन आपण तयार करुन देऊ, अशी चर्चा झाली व त्यासाठी या स्वागत कमानींचे 3D डिझाईन तयार करणेत यावे व त्यास समितीची मान्यता घेण्यात येऊन, ते अंतीम करणेत यावे, असे ठरले. |
| ०४ | स्कायवॉक | १.३ कोटी | याकामी विहीत मुदतीत फक्त एकच ई-निविदा प्राप्त झालेली असल्याने दि.२९/०१/२०१८ अखेर फेरनिविदा मागविण्यात आल्या आहेत. दुस-यांदाही एकही निविदा प्राप्त झालेली नाही. फेर निविदा मागविणेबाबत कार्यवाही चालु आहे. | स्काय वॉक तयार करणेकामी राबविणेत आलेल्या ई-निविदा प्रक्रियेस ठेकेदारांचा प्रतिसाद मिळत नाही, याकरीता Google व Just Dial यावरुन या क्षेत्रात काम करणाऱ्या कंपन्यांची माहिती घेऊन, नामांकित कंपन्यांना निविदेबाबत कळविणेत यावे. |
| ०५ | साई आश्रम-१ येथे टेन्साईल फॅब्रिक शेड उभारणे | १.३६ कोटी | मा. प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग यांनी सदरहू प्रस्तावास दि.१९/१२/२०१७ रोजी मंजुरी दिली आहे. शिरडी नगरपंचायत यांची मान्यता घेऊन निम्नतम दराचे ठेकेदार सुभाष कन्स्ट्रक्शन यांना कार्यादेश देण्यात येत आहे. | टेन्साईल फॅब्रिक शेड उभारणीकामी बांधकाम परवानगी न घेतल्यास ते अतिक्रमण सदरामध्ये येईल, अशी माहिती मुख्यकार्यकारी अधिकारी यांनी सभेस दिली.<br>यावर शिर्डी नगर-पंचायतीची बांधकाम परवानगी |

| अ. नं. | प्रकल्पाचे नांव | अंदाजित खर्च रु. | सद्यस्थिती | सभेमध्ये झालेली चर्चा |
|---|---|---|---|---|
| | | | | मिळणेसाठी पाठपुरावा करणेत यावा, असे ठरले. |
| ०६ | श्री साईबाबा समाधी मंदिर परिसरातील फ्लोअरींगचे नुतनीकरण करणे (दुसरा टप्पा) | २.७५ कोटी | ०१. ठेकेदार यांनी समाधी मंदिर, गुरुस्थान, शनिगेट, लेंडीबाग, दत्त मंदिर, गेट नं. ०२,०३,०४, प्रशासकीय कार्यालय, बुक स्टॉल, या परिसरातील फ्लोरींगचे काम पूर्ण केले आहे.<br>०२. सभाकुंड, पी.आर.ओ.गेट नं.०५ जवळ, म्युझियम इ. ठिकाणचे परिसरातील काम प्रगतीत आहे.<br>०३. फ्लोरींगचे पॉलिशींग व लेदर फिनिशींग प्रगतीत आहे.<br>०४. ठेकेदार यांनीआजपावेतो ९०% काम पूर्ण केलेले आहे. | मंदिर परिसरामधील गेट नं.०१ ते गेट नं.०५ यामध्ये व्हि.व्हि.आय.पी. मान्यवरांच्या गाडया येत असतात व त्यामुळे या ठिकाणी फरशी न टाकता, तेथे सिमेंटचे फ्लोअरींग असावे, असे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सभेस कळविले, त्यास सभेने मान्यता दिली व त्या ठिकाणच्या स्क्वे.मीटरचे काम आवश्यकतेनुसार इतरत्र करुन घेण्यास मान्यता देण्यात आली. |
| ०७ | साईनगर कर्मचारी वसाहत परिसरा-तील साईनगर, साईध्यान ०१ व ०२, समर्पण इमारतींचे आतिल व बाहेरील रंगकाम करणे. | ३६.९७ लक्ष | याकामी GST सह फेर ई-निविदा मागविणेबाबतच्या प्रस्तावास मान्यता मिळाली असून वर्तमानपत्रात जाहिरात देणेत येत आहे. | नोंद घेण्यात आली. |
| ०८ | साईनाथ रुग्णालयावर वाढीव मजल्याचे बांधकाम | ४.५ कोटी | सहायक संचालक, नगररचना विभाग, अ.नगर यांनी दि.२२/ ०१/२०१८ अन्वये त्रुटींची पुर्तता करणेबाबत शिर्डी नगरपंचायत यांना कळविले आहे. याबाबत संचालक, नगररचना विभाग, नाशिक रोड, नाशिक यांचेकडे शिर्डी नगरपंचायत यांचेमार्फत दि. २९/०१/२०१८ रोजी तीसरा मजला बांधकामासाठी सामासिक अंतराचे नियमात शिथिलता व रुग्णालय वापरास परवानगी मिळणेबाबत प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. | साईनाथ रुग्णालय सुरु असलेल्या इमारतीस, रुग्णालय चालू करणेसाठी आवश्यक असलेल्या परवानग्या घेण्यात आलेल्या नाही, याकरीता त्या त्रुटींची पुर्तता करणेसाठी पाठपुरावा करणेचे काम चालू असलेबाबत मुख्यकार्यकारी अधिकारी यांनी सभेस कळविले.<br>यावर रुग्णालयासाठी आवश्यक असलेल्या सर्व परवानग्या प्राप्त करुन घेण्यात याव्यात, असे ठरले. |
| ०९ | नगरपालिका हद्दीतील रस्ता क्र.५ चे उर्वरीत काम पूर्ण करणे (टप्पा-१) | १.७० कोटी | ठेकेदार मे. एस. के. येवलेॲंड कं., संगमनेरयांना कार्यादेश देणेत आला असुन ठेकेदार यांनी आर.सी.सी.पाईप व खडी साईटवर उपलब्ध करुन कामास सुरुवात केलेली आहे. | नोंद घेण्यात आली. |
| १० | मंदिर परिसरातील इमारतीचे आतील व बाहेरील रंगकाम करणे. | ६४ लक्ष | ठेकेदार यांची ६३,२२,२५१/- मात्र रकमेची निम्नतम निविदा स्विकारणेत आली आहे. अंदाजपत्रकीय रकमेपेक्षा २७ टक्के कमी असलेने शासन निर्णयानुसार रु. १५,५८,९११/- इतक्या रकमेची हमी बॅंक गॅरंटी प्राप्त झाली असून कार्यादेश देण्यात येत आहे. | नोंद घेण्यात आली. |

| अ. नं. | प्रकल्पाचे नांव | अंदाजित खर्च रु. | सद्यस्थिती | सभेमध्ये झालेली चर्चा |
|---|---|---|---|---|
| ११ | साईनाथ रुग्णालयाशेजारी मोकळ्या जागेत रुग्णालयासाठी नविन ईमारतीचे बांधकाम करणे. | --- | सर्व्हे नं.१४८ मधील साईनाथ रुग्णालयाचे पश्चिमेकडील मोकळ्या जागेत नविन ईमारत बांधणेसाठी आर्किटेक्ट म्हणून Design Associates INC, Noida, UP यांची नेमणूक करण्यात आली असून प्लॅनबाबत सविस्तर चर्चा करणेसाठी दि.११/०१/२०१७ रोजी संबंधीतांची आर्किटेक्ट यांचेसमवेत बैठक आयोजित केली होती. सदर बैठकीतील झालेल्या चर्चेनुसार आर्किटेक्ट यांचेमार्फत आराखडयात सुधारणा करण्यात येत आहे. | नोंद घेण्यात आली. |

**ब. प्रस्तावीत असलेले प्रस्ताव -**

| अ. नं. | प्रकल्पाचे नांव | अंदाजित खर्च | सद्यस्थिती | सभेमध्ये झालेली चर्चा |
|---|---|---|---|---|
| ०१ | साईसृष्टी प्रकल्प | अंदाजे १४१ कोटी | या प्रकल्पासाठी प्रकल्प सल्लागार म्हणून श्री.संदिप शिक्रे, मुंबई यांना कार्यादेश देण्यात आला आहे. त्यांनी मा.व्यवस्थापन समितीचे सभेत दि.०८/१२/२०१७ रोजी सादरीकरण केले आहे. त्यावेळी त्यांना करण्यात आलेल्या सुचनांनुसार सुधारीत आराखडा आर्किटेक्ट यांनी तयार केला आहे. सुधारीत आराखडा मा.व्य.स. सदस्य यांना दि.०३/०१/२०१८ रोजी ई-मेल करणेत आले आहेत. तसेच मा.व्य.स. दि.०८/०१/२०१८ रोजीचे सभेतील निर्णयान्वये आर्किटेक्ट यांना दि.१२/०१/२०१८ रोजीचे पत्रान्वये मा. व्यवस्थापन समिती सभेत झालेल्या चर्चा अन्वये बदल करणेबाबत कळविण्यात आले आहे. | साईसृष्टी प्रकल्प सल्लागार श्री.संदिप शिक्रे, मुंबई यांना वेळोवेळी कळवूनही ते साईसृष्टी प्रकल्पाचे अंतीम सादरीकरण देत नाहीत, याकरीता त्यांना अंतीम नोटीस देण्यात यावी. त्यानंतरही त्यांनी प्रतिसाद न दिल्यास सदरहूकामी नवीन सल्लगाराची नेमणूक करणेत यावी, असे ठरले. |
| ०२ | साईबाबा भक्तनिवास (५०० रुम) नुतनीकरण | १८.५६ कोटी | शासन मान्यतेसाठी रु.१४.५३ कोटी इतक्या अंदाजपत्रकीय खर्चाचा प्रस्ताव दि.२२/११/२०१७ रोजी सादर करणेत आला होता. दरम्यान सार्वजनिकबांधकाम,महाराष्ट्र शासन यांचा एसएसआर-२०१७-२०१८ प्रसिध्द झाल्याने दि. २७/१२/२०१७ रोजी शासनाचे विधी व न्याय विभाग यांचे मान्यतेसाठी रु.१८.५६ कोटी रकमेचा सुधारीत प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. | नोंद घेण्यात आली. |
| ०३ | लाडू व बुंदी प्रोसेसिंग युनिट | १४.४१ कोटी | संस्थानचे सामान्य प्रशासन विभाग आदेश क्र. ३४२९ दि.०४/१२/२०१७ अन्वये सदरहू प्रकल्प पायाभूत स्वरुपाचा असल्याने त्यास शासनाची पूर्व मान्यता घेणे आवश्यक असल्याने त्यासाठी सविस्तर अंदाजपत्रक तयार करणेची कार्यवाही करणेत येत आहे. दि.२३/०१/२०१८ रोजी प्राप्त चलनानुसार संस्थानने एकूण रु.३२,९४,७२०/- इतका विकास शुल्क रकमेचा भरणा दि.२५/०१/२०१८ रोजी सहायक संचालक, नगररचना यांचेकेडे सादर केलेला आहे. | नोंद घेण्यात आली. |
| ०४ | साईप्रसादालय फरशी बदलणे | १.९० कोटी | निम्नतम दराचे ठेकेदार आ.के. सावंत, नाशिक यांचे दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देणेबाबत | साईप्रसादालयामध्ये बसविणेत येणाऱ्या फरशीचा नमुना |

| अ. नं. | प्रकल्पाचे नांव | अंदाजित खर्च | सद्यस्थिती | सभेमध्ये झालेली चर्चा |
|---|---|---|---|---|
| | | | दि.२०/०८/२०१७ रोजीचे सभेतील निर्णयानुसार ठेकेदार यांना कार्यादेश देण्यात आला आहे. ठेकेदार यांना फरशी बसविणेकरीता नमुना मान्य करणेसाठी मा. व्यवस्थापन समितीचे दि.०२/०२/२०१८ रोजी उपलब्ध करण्यात आला आहे. | अंतीम करणेत आला. |
| ०५ | साईप्रसादालय रंगकाम | ८५.८४ लक्ष | जीएसटी नंतरचे निविदा प्रक्रियेत एकच ठेकेदार पात्र होत असल्याने याकामी फेर निविदा मागविण्यात आली असुन निविदा सादर करणेची अंतीम मुदत दि.३०/०१/२०१८ पर्यंत ठेवण्यात आली होती. सदरहु मूदतीत ई-निविदा प्राप्त झाल्या आहेत. सदरहु निविदांचा तांत्रीक लिफाफा खरेदी समितीचे सभेत उघडण्यात येत आहे. | नोंद घेण्यात आली. |
| ०६ | नविन शैक्षणिक संकुल उभारणी | १२९ कोटी | मा.व्यवस्थापन समितीच्या दि.१४/११/२०१७ रोजीचे बैठकीत आर्किटेक्ट डी. ओ. निकम, पुणे यांनी सादरीकरण केले आहे. सदरहू सभेतील निर्णयानुसार आर्किटेक्ट यांनी नकाशामध्ये सुधारणा केली असून सुधारीत नकाशे सर्व समिती सदस्यांना ई-मेल व्दारे पाठविणेत आले आहेत. आर्किटेक्ट फी ठरविणेबाबत मा. व्यवस्थापन समितीचे सभेत प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. | नोंद घेण्यात आली. |
| ०७ | शिर्डी नगरपंचायत हद्दीतील DP Plan मधील (टप्पा-२) रस्त्यांचे भूसंपादन करणे. | १६३ कोटी | व्यवस्थापन समितीची मान्यता मिळणेकामी प्रस्ताव दि. १९/०१/२०१८ रोजीचे सभेत प्रस्ताव सादर करण्यात आला होता. त्यानुसार छाननी समिती अध्यक्ष सो मा.श्री.चांदीवाल यांनी दि.२०/०१/२०१८ रोजी समक्ष रस्त्यांचे स्थळ निरीक्षण केले आहे. | समक्ष रस्त्यांची स्थळ पहाणी करणे हे छाननी समितीच्या कार्यक्षेत्रामध्ये येत नाही, ही बाब मुख्यकार्यकारी अधिकारी यांनी सभेच्या निदर्शनास आणून दिली.<br>याची नोंद घेण्यात आली. |
| ०८ | नगर-मनमाड रस्ता दुरुस्ती व सुशोभिकरण | ३.२५ कोटी | ई-प्रस्ताव मसुद्यास मान्यता घेऊन आर्किटेक्ट नेमणूक करणेसाठी प्रस्ताव मागविण्यात येत आहे. | नगर-मनमाड रस्त्याबरोबरच सुशोभित करावयाच्या इतर रस्त्यांसाठीही आर्किटेक्टची नेमणूक करणेत यावी, असे ठरले. |
| ०९ | साई आश्रम-१ रंगकाम व दुरुस्ती | ६.५० कोटी | मा. व्यवस्थापन समितीचे सभेत अंदाजपत्रकास मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार निविदा मागविणेबाबत कार्यवाही करणेत येत आहे. | सदरहूकामी निविदांची मागणी करतेवेळी अंदाजपत्रकापेक्षा २०% रक्कम कमी करणेत येऊन, ठोक रकमेचे टेंडर काढणेत यावे, असे ठरले. |
| १० | साईनिवासअतिथीगृह व मध्यवर्ती भांडार या इमारतींचे आतील व बाहेरील रंगकाम करणे. | २९.४२ लक्ष | याकामी ई-निविदा मागविणेकामी जाहिरात देण्यात येत आहे. | नोंद घेण्यात आली. |
| ११ | नविन भांडार इमारतीचे बांधकाम करणे | १३.७१ कोटी | ई-प्रस्ताव मसुद्यास मान्यता घेऊन आर्किटेक्ट नेमणूक करणेसाठी प्रस्ताव मागविण्यात येत आहे. | नोंद घेण्यात आली. |

**तसेच यावेळी असेही ठरले की, दिनांक ०८.०१.२०१८ रोजीचे सभेमध्ये चालू व प्रस्तावित असलेल्या कामाचा आढावा व उपरोक्त घेण्यात आलेला आढावा, यांची प्रत्येक महिन्यांची सद्यस्थिती, मागील सद्यस्थितीसह सभेसमोर सादर करणेत यावा.** (कार्यवाही- कार्यकारी अभियंता, बांधकाम)

---

**विषय नं.०४** **नियोजित शैक्षणिक संकुल बांधकाम आराखडे सादरीकरण व आर्किटेक्ट नेमणूक करणे.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूद-** अधिनियमाच्या कलम १७ मधील पोट कलम (१) च्या खंड (ढ) अन्वये सर्व प्रकारच्या धर्मनिरपेक्ष शिक्षणास चालना दईल किंवा तसे करण्यास सहाय्य करील, तसेच, शिर्डी येथे व अन्य ठिकाणी, शैक्षणिक संस्था स्थापन करील, अशी तरतूद आहे.

**मा. व्यवस्थापन समिती निर्णय-**

१) मा. त्रिसदस्य समितीचे दि.१३/१२/२०१३ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.९४१ खालील प्रमाणे संमत झालेला आहे.

"..यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली. तसेच, सदरहु कामी या क्षेत्रातील नामांकित व अनुभवी अशा आर्किटेक्टची नेमणूक करणेत यावी, असे ठरले."

२) मा. त्रिसदस्य समितीचे दि.०६/११/२०१४ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.९६४ खालील प्रमाणे संमत झालेला आहे.

"..यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा संस्थानचे वरिष्ठ महाविद्यालय (Senior College) सुरु करणेकरीता जागा निश्चित करणेत यावी व त्यानंतर वरीष्ठ महाविद्यालय सुरु करणेसाठी शासनास काय आवश्यक आहे, यासह सविस्तर फेरप्रस्ताव सादर करणेत यावा. तसेच तोपर्यंत शासनाचे बृहद आराखड्यामध्ये नोंद होणेसाठी ऑनलाईन अर्ज करणेस व याकामी येणा-या खर्चास मान्यता देण्यात आली.

३) मा. त्रिसदस्य समितीचे दि.२६/०४/२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.५३१ खालील प्रमाणे संमत झालेला आहे.

"..यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावितकामी संस्थान वकीलामार्फत अर्ज करणेत येऊन मा. मुंबई उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी व मा. खंडपीठाने निर्देशीत केलेप्रमाणे पुढील कार्यवाही करणेत यावी असे ठरले"

४) मा. व्यवस्थापन समितीचे दि.०९/१०/२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ७१२ खालीलप्रमाणे संमत झालेला आहे.

"..यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थान संचलित सध्याची शैक्षणिक संकुले तसेच भविष्यामध्ये नियोजित शैक्षणिक संकूलांची एकाच ठिकाणी उभारणी करणेत यावी, असे समितीचे मत झाले. सबब सदरहु प्रस्ताव तुर्त स्थगित ठेवणेत यावा, असे ठरले."

५) मा. व्यवस्थापन समितीचे दि.१४/११/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.९५५ खालीलप्रमाणे संमत झालेला आहे.

"..संस्थानसाठीनवीनअद्ययावतशैक्षणिकसंकुलाचीउभारणीकरणेकामीचेआर्किटेक्ट डी.ओ. निकम, पुणे हे आजचे सभेत सादरीकरण सादर करणेसाठी उपस्थित होते. सभेने सादरीकरणाच्या हार्डकॉपीज पाहिल्या व या शैक्षणिक संकुलामध्ये वरीष्ठ महाविद्यालयाचा समावेश करणेत यावा, ऑडीटोरीयम हॉल प्रवेशद्वाराशेजारी घेण्यात यावा व तो एक हजार क्षमतेचा असावा व सर्व प्रकारच्या खेळांची मैदाने तयार करणेत यावीत, तसेच आवश्यक वाढीव FSI शासनाकडून मंजूर करुन घ्यावा, अशासुचनाकेल्या.

यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थान मालकीचे गट नं. १८३ मधील ५ हेक्टर ४० आर जागेत संस्थानसाठी नवीन अद्ययावत शैक्षणिक संकुलाची उभारणी करणेत यावी. तसेच या शैक्षणिक संकुलाची उभारणी करणेकामीचे आर्किटेक्ट डी.ओ. निकम, पुणे यांना समक्ष देण्यात आलेल्या सुचनांचा अंतर्भाव करुन, सादरीकरणाची सॉफ्ट कॉपी सर्व समिती सदस्यांना पाठविण्यात यावी, असे ठरले."

**प्रस्तावना-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांचेतर्फे पुढीलप्रमाणे शैक्षणिक संस्था कार्यरत आहेत.१) श्री साईबाबा इंग्लिश मेडीअम स्कूल, शिर्डी २)श्री साईबाबा कन्या विद्या मंदीर, शिर्डी ३) श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालय, शिर्डी ४) श्री साईबाबा औद्योगिक प्रशिक्षण संस्था, शिर्डी यापैकी इंग्लिश मेडीयम, कन्या विद्या मंदीर व औद्योगिक प्रशिक्षण संस्था यांच्या इमारती शिर्डी सर्व्हे नं.१०८, १०९ मधिल संस्थान मालकीचे

जागेत आहेत. परंतु कनिष्ठ महाविद्यालयाला कायमस्वरूपी इमारत उपलब्ध नसल्याने त्याचे वर्ग सध्या मौजे निमगांव को-हाळे गट नं.१७२ मधील साईआश्रम भाग-२ चे एका इमारतीत भरविण्यात येत आहेत. तसेच सध्याचे शैक्षणिक संकुलातही वाढत्या विद्यार्थी संख्येमुळे वर्गांची संख्या अपुरी पडत आहे. त्यामुळे इंग्लिश मेडीअम स्कुलचे वर्ग दोन सत्रात भरवावे लागत आहेत. या बाबींचा विचार करून संस्थान संचलित सर्व शैक्षणिक संस्थांकरीता एकाच ठिकाणी कायम स्वरूपी असे अद्ययावत शैक्षणिक संकूल उभारणेसाठी संस्थानचेमौजे निमगांव को-हाळे येथिल गट नं.१८३ मधील जागा नियोजित शैक्षणिक संकुलासाठी निश्चित करणेत आली आहे.

सदरहुकामी दि.१२/०२/२०१४ रोजीच्या टिपणीव्दारे आर्किटेक्ट डि.ओ.निकम, पुणे यांचेकडुन प्राथमीक नकाशे व त्यांचे फि चा प्रस्ताव घेणेसाठी मान्यता मिळाली होती. त्यानुसार संस्थानचे जा.क्र.५३५८/२०१४, दि. २४/०२/२०१४ अन्वये आर्किटेक्ट डि.ओ.निकम यांना सदरहु प्रकल्पासाठी प्राथमीक आराखडे तयार करणेबाबत कळविणेत आले होते. त्यानुसार आर्किटेक्ट यांनी मा. त्रिसदस्य समितीचे दि. २६/०६/२०१४ रोजीचे सभेपुढे सादरीकरण केले. सदरहु सभेतील निर्णय क्र. ५३१ अन्वये याकामी संस्थान वकीलामार्फत अर्ज करणेत येऊन मा. मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेणेत यावी व मा. खंडपीठाने निर्देशीत केलेप्रमाणे पुढील कार्यवाही करणेत यावी, असे ठरले होते.तथापी, आर्किटेक्ट डी.ओ.निकम, पुणे यांची नेमणूक करण्यात आलेली नाही.

त्यानुसार याकामी मा. मुंबई उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद येथे मान्यतेसाठी सिव्हील अर्ज दाखल करणेत आला होता. सदर अर्जावर दि.०४/१२/२०१५ रोजी मा. उच्च न्यायालयाने खालीलप्रमाणे आदेश दिलेला आहे.

PER COURT:-

1. Vide the present application, the applicant committee is seeking permission to take appropriate decision with regard to construction of educational complex in survey no.183 situated at NimgoanKorhaleTq. Rahata and for that purpose, permit the committee to spend necessary amount required for the purpose of construction of educational complex.
2. We have heard the learned counsel for the respective parties.
3. Firstly, the committee will have to arrive at a conclusion about the expenditure that is required for the same. At present, we allow the applicant committee to take appropriate decision with regard to construction of an educational complex in survey no.183 situated at NimgaonKorhale. If the same is permissible as per plan and as per rules and regulations of the Grampanchayat, then the applicant shall seek necessary permission of appropriate authority, prepare lay out plan of the construction, thereafter appoint architecture and also the approximate expenditure that would be required and before proceeding with any work shall seek permission of this Court with regard to expenditure to be made.
4. Civil application is disposed of.

श्री साईबाबा संस्थान संचलित श्री साईबाबा इंग्लिश मेडीअम स्कुल, श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालय या शैक्षणिक संस्थांकरीता एकत्रित शैक्षणिक संकूलाचे बांधकाम मौजे निमगांव-को-हाळे येथील संस्थान मालकीचे गट नं.१८३ मधील ५ हेक्टर ४० आर जागेत करणेसाठी मान्यता मिळणेकरीता तसेच आर्किटेक्ट डी. ओ. निकम, पुणे यांचेमार्फत सदर प्रकल्पाच्या आराखड्यांचे सादरीकरण करणेसाठी सदरहू प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे दि.१४/११/२०१७ रोजीचे सभेपूढे सादर करणेत आला होता. सदरहू सभेतील निर्णय क्र.९५५ अन्वये आर्किटेक्ट डी.ओ.निकम, पुणे यांना समक्ष देण्यात आलेल्या सुचनांचा नकाशात अंतर्भाव करुन सादरीकरणाची सॉफ्ट कॉपी सर्व समिती सदस्यांना पाठविणेत यावी असे ठरले आहे.

त्यानुसार आर्किटेक्ट डी.ओ.निकम यांनी नकाशात सुधारणा केली असून त्यात खालील बाबींचा अंतर्भाव करण्यात आलेला आहे.

| SR. NO. | DESCRIPTION | CLASS ROOM / HALLS. | AREA in sq.m. | ESTIMATE |
|---|---|---|---|---|
| 1 | English Medium School. | 165 | 21300 | 41,10,90,000/- |
| 2 | KanyaVidyaMandir. | 101 | 13100 | 25,28,30,000/- |
| 3 | Junior & Senior College. | 101 | 13100 | 25,28,30,000/- |
| 4 | Auditorium – 1050 seats capacity. | 17 | 7350 | 22,05,00,000/- |
| 5 | Indoor Sport Facilities.<br>a. Badminton.<br>b. Table Tennis.<br>c. Gymnasium<br>d. Karate<br>e. Judo<br>f. Boxing<br>g. Pool.<br>h. Chess.<br>i. Carrom | 11 | 2000 | 3,86,00,000/- |
| 6 | Swimming Pool | 8 | 1000 | 1,00,00,000/- |
| 7 | Infrastructure Development: Roads, Water supply, ETP, STP, Electrification, Landscape, Play Fields, ETC.<br>Out door sports Facilities.<br>a. KhoKho.<br>b. kabbaddi.<br>c. Hockey,<br>d. Foot ball.<br>e. Volley ball.<br>f. 400 mtr. running track.<br>g. basket ball. | 2 | 54000 | 16,74,00,000/- |
| | **Total Cost of Project** | | | **1,35,32,50,000/-** |

आर्किटेक्ट डी.ओ. निकम, पुणे यांनी त्यांचे दि.१५/०१/२०१८ रोजीचे पत्राने सदरहू प्रकल्पासाठी Civil, Electrical, Plumbing, Mechanical, Landscaping, Acoustics, Air Conditioning, Interior works, Rain Water Harvesting etc. कामांसह प्रकल्पासाठी लागणा-या सर्व कामांना सेवा देणेसाठी प्रकल्प किंमतीच्या २.०७% अधिक GST इतक्या फीचा प्रस्ताव सादर केला आहे. सदरच्या फीमध्ये प्रामुख्याने खालील कामांचा समावेश असल्याचे त्यांनी प्रस्तावात नमूद केले आहे.

1. Architectural Design
2. Mechanical, Electrical & Plumbing Design.
3. Working Drawings.
4. Estimation.
5. Tender.
6. Bill Certification
7. Periodical site visits at every important stages and also fortnightly.
8. Obtaining of approval, plinth completion and Completion Certificate from competent authority.
9. Environment Clearance.

सामान्य प्रशासन विभागाचे जा.क्र.एसएसएस/साप्रशा/आस्था/३४२९/२०१७, दि. ०४/१२/२०१७ रोजीचे आदेशानुसार श्री साईबाबा संस्थानमार्फत राबविणेत येणा-या पायाभूत व धोरणात्मक प्रकल्पांस व त्यावरील खर्चास शासनाची पुर्व मान्यता घेतल्याशिवाय कामे सुरु करणेत येऊ नये. असे महाराष्ट्र शासन विधी व न्याय विभागाकडील दि.२३/०१/२०१३ रोजीचे पत्रास अनुसरुन निर्देशीत करण्यात आलेले आहे.

महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे शासन निर्णय क्र. टिपीएस -१६१७/ प्र.क्र.१४३/ २०१७/ नवि-९ दि.२९ जून, २०१७ रोजीचे अधिसूचने नुसार मौजे निमगांव-को-हाळे येथील संस्थान मालकीचे गट नं.१८३हे क्षेत्र शेती विभागातून वगळून रहिवास विभागात समाविष्ट करणेत आलेले आहे.

**प्रस्ताव:** श्री साईबाबा संस्थान संचलित शैक्षणिक संकूलाचे बांधकाम मौजे निमगांव-को-हाळे येथील गट नं.१८३ मधील जागेत करणेसाठीखालील बाबींवर निर्णय होणेअपेक्षित आहे.

१) आर्किटेक्ट डि.ओ.निकम, पुणे यांची अदयाप विहीत पध्दतीने नेमणूक केलेली नसल्याने त्यांचे नेमणूक व फी बाबत चर्चा करुन निर्णय घेणे अथवा आर्किटेक्ट नेमणूकीबाबत जाहीरात देऊन आर्किटेक्ट यांचेकडून प्रस्ताव मागविणे.

२) आर्किटेक्ट यांनी सादर केलेले सुधारीत आराखडे व अंदाजपत्रकानुसार रु.१३५,३२,५०,०००/- मात्र व आर्किटेक्ट फी सह येणारे खर्चास मान्यता देणे.

३) सदरहू प्रस्ताव मा. विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडे मान्यतेसाठी सादर करणे.

तरी श्री साईबाबा संस्थान संचलित शैक्षणिक संकूलाचे बांधकाम करणेसाठी उपरोक्त बाबींवर निर्णय होणेस विनंती.

निर्णय क्र.७८ **आर्किटेक्ट डि.ओ.निकम, पुणे हे आजचे सभेसमोर उपस्थित होते, त्यांनी नियोजित शैक्षणिक संकुलाचे सादरीकरण सादर केले व सभेने विचारलेल्या प्रश्नांची समर्पक उत्तरे दिली. यापुर्वी त्रिसदस्यीय समितीच्या दि.१३.१२.२०१३ रोजीचे सभेतील निर्णय क्र.१४१ अन्वये या कामासाठी नामांकित व अनुभवी आर्किटेक्टची नेमणूक करण्यात यावी, असे ठरले होते. त्यानुसार तत्कालीन कार्यकारी अधिकारी यांनी दि.२४.०२.२०१४ रोजीचे पत्रान्वये आर्किटेक्ट डि.ओ.निकम, पुणे यांना सदरहू प्रकल्पासाठी पग्राथमिक आराखडे तयार करणेबाबत कळविले होते. त्यानुसार श्री.निकम यांनी प्राथमिक आराखडे व त्यानंतर समिती सुचित करेल, त्याप्रमाणे वेळोवेळी सुधारित आराखडे तयार केलेले आहेत, ही वस्तुस्थिती विचारात घेऊन आर्किटेक्ट डि.ओ.निकम, पुणे यांच्या नियुक्तीला मान्यता देण्यात आली. आर्किटेक्ट डि.ओ.निकम, पुणे यांनी प्रकल्प किंमतीच्या २.०७% अधिक GST अशी आर्किटेक्चरल फीची मागणी केली होती. सभेने त्यांना प्रकल्प किंमतीच्या १.२६% अधिक GSTआर्किटेक्ट फी देण्यात येईल, असे सांगितले असता, त्यास आर्किटेक्ट डि.ओ.निकम, पुणे यांनी सहमती दर्शविली.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, नियोजित शैक्षणिक संकुल बांधकाम आराखडयांचे सादरीकरण अंतीम करणेत येऊन, याकामी आर्किटेक्ट म्हणून डि.ओ.निकम, पुणे यांची प्रकल्प किंमतीच्या १.२६% अधिक GST मात्र या फीवर नेमणूक करणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही- कार्यकारी अभियंता, बांधकाम)

---

विषय नं.०५ **श्री रामनवमी उत्सव- २०१८ कार्यक्रमांचे नियोजन व उत्सव साजरा करणेसाठी येणाऱ्या खर्चाचे अंदाजपत्रकास मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम, २००४ मध्ये कलम १७ समितीचे कर्तव्ये व अधिकार या शिर्षाखाली उपकलम (१) मध्ये खालील तरतुद आहे.

"राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास आधिन राहुन संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदीरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा– अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, भक्तांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे. ती उद्दिष्टे साध्य करण्यासाठी/ विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे. ही समितीची कर्तव्ये असतील."

उपरोक्त अधिनियमातील तरतुदीनुसार व पुर्वापार रुढी परंपरेनुसार संस्थान व्यवस्थापनामार्फत धार्मिक पुजा विधी, उत्सव साजरे केले जात आहेत.

श्री साईबाबांनी हयातीत, श्री क्षेत्र शिर्डी येथे श्री रामनवमी उत्सव सुरु केला. त्यास अनुसरुन मंदिर विभागाकडील दिनांक १२/०१/२०१८ रोजीचे मंजूर प्रस्तावानुसार श्री रामनवमी उत्सव शनिवार दिनांक

२४.०३.२०१८ ते सोमवार दिनांक २६.०३.२०१८ (चैत्र शु.७ शके १९४० ते चैत्र शु.१० शके १९४०) असा तीन दिवस साजरा करण्यात येणार आहे.

सन-२०१८ मध्ये साजरा करावयाचे श्री रामनवमी उत्सवासाठी पुढीलप्रमाणे नियोजन करावे लागणार आहे.

| अ.नं | तपशील | श्री रामनवमी -२०१८ चे उत्सवाचे अनुषंगाने करावयाचे नियोजन//कामे |
|---|---|---|
| ०१ | उत्सव निमत्रंण पत्रिका व उदीप्रसाद | भक्तमंडळाचे सामान्य, आजीव व आश्रयदाते सभासदांना तसेच मान्यवरांना उत्सवाच्या निमत्रंण पत्रिका पाठवाव्या लागतात. यंदाचे श्री रामनवमी उत्सवात सभासदांना, प्रतिष्ठीत व्यक्ती/ ग्रामस्थ यांना १,८०,००० पत्रिका छपाई करुन घ्याव्या लागतील. तसेच नेहमीप्रमाणे वर्तमान पत्रातून प्रेस नोट ( न्यूज अॅटम) म्हणून प्रसिध्दी देण्यात येईल. |
| ०२ | **अ) उत्सव व्यवस्था** | **कलाकार कार्यक्रम** |
| | प्रारंभ दिवस,शनिवार<br>दि.२४/०३/२०१८<br>चैत्र शु ७ शके १९४० | सायंकाळी ७.३० ते रात्रौ १०.३० पर्यत निमंत्रित कलाकारांचा कार्यक्रम साईनगर मैदान स्टेजवर आयोजित करणे. आपत्ती व्यवस्थापनाच्या दृष्टीकोणातून श्रीरामनवमी उत्सव व पुण्यतिथी उत्सवातील सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन ब-याच वर्षापासून मंदिर परिसरात न करता साईनगर मैदानावर केले जाते. |
| | मुख्य दिवस<br>रविवार दि.२५/०३/२०१८<br>चैत्र शु ८/९ शके १९४० | १) सायंकाळी ७.३० ते १०.३० पर्यत निमंत्रित कलाकारांचा कार्यक्रम (साईनगर मैदान स्टेजवर) आयोजित करणे. आपत्ती व्यवस्थापनाच्या दृष्टीकोणातून श्रीरामनवमी उत्सव व पुण्यतिथी उत्सवातील सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन ब-याच वर्षापासून मंदिर परिसरात न करता साईनगर मैदानावर केले जाते.<br>२) रात्रौ. १०.०० ते सकाळी ५.०० पर्यत (दि.२५/०३/२०१८) या वेळेत इच्छुक कलाकारांचा साईभजनांचा कार्यक्रम समाधी शताब्दी मंडप स्टेजवर हाईल. या मुख्य दिवशी समाधी मंदीर दर्शनासाठी रात्रभर उघडे राहिल. |
| | सांगता दिवस<br>सोमवार<br>दि.२६/०३/२०१८.<br>चैत्र शु.१० शके १९४० | सायंकाळी ७.३० ते १०.०० पर्यत निमंत्रित कलाकारांचा कार्यक्रम (साईनगर मैदान स्टेजवर) उत्सवांचे तीनही दिवसाकरीता निमंत्रित कलाकारांचे कार्यक्रम निश्चीत करावयाचे आहेत. निश्चिती झाल्यानंतर कार्यक्रम ठेवता येईल.<br>आपत्ती व्यवस्थापनाच्या दृष्टीकोणातून श्रीरामनवमी उत्सव व पुण्यतिथी उत्सवातील सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन ब-याच वर्षापासून मंदिर परिसरात न करता साईनगर मैदानावर केले जाते. |
| | **ब) कीर्तन कार्यक्रम** | संस्थानचे चालत आलेल्या परंपरेनुसार गोरटे प्रतिष्ठाण यांचेमार्फत दर श्री रामनवमी उत्सवाकरीता पाठविलेल्या कीर्तनकार कीर्तन करीत असतात. सदरची परंपरा ब-याच वर्षापासून चालत आलेली आहे. सदर परंपरेनुसार किर्तनकाराचे कार्यक्रम ठेवता येईल. पुण्यतिथी उत्सवात किर्तनकारास रु.१५००१/- बिदागी देण्यात आली होती. शताब्दी वर्षातील श्री.रामनवमी उत्सव असल्याने कीर्तनकारास थोड्याप्रमाणात वाढ करुन बिदागी/मानधन रु.२१००१/- मात्र द्यावी असे वाटते.याबाबत निर्णय व्हावा. |
| ०३ | श्री सत्यनारायण पूजा व अभिषेक पूजा | उत्सव काळात श्री साई सत्यव्रत पुजा व अभिषेक पूजा साईभकतांचा गर्दीचा अंदाज घेऊन चालू/बंद ठेवणेबाबत निर्णय घेता येईल. |
| ४ | अखंड पारायण व्यवस्था | उत्सव काळात दि.२४/०३/२०१८ रोजी सकाळी ५.१५ वाजता श्री व्दारकामाई मंदीरात श्री साईसच्चरिताचे अखंड पारायणास सुरुवात होईल. दि.२५/०३/२०१८ सकाळी ५.४५ वाजता त्यांची समाप्ती होईल. मा. व्यवस्थापन समितीचे सदस्य पहिले ०५ अध्याय वाचतील व राहिलेले ४८ अध्याय प्रत्येकी एक असे ४८ भक्त वाचतील. इच्छुक भक्तांची नावे दि.२३/०३/२०१८ रोजी मंदीर कार्यालयात नोंदविली जातील व त्याच दिवशी सायंकाळी त्यांच्या नावाच्या चिठ्ठया काढून पारायणाकरीता नावे निश्चित केली जातील. पारायणात भाग घेणा-या प्रत्येक भक्तास प्रसाद म्हणून एक श्रीफळ देण्यात येईल. अखंड पारायणाकरीता व्दारकामाई रात्रभर उघडी ठेवण्यात येईल. श्री रामनवमी उत्सवात पोथी,वीणा, प्रतिमा, अध्याय वाचन, रुद्राभिषेक,पाद्यपूजा या कार्यक्रमाकरीता मा.सदस्यांची नावे ठरविणे आहे. याबाबतची टिपणी स्वतंत्र मा.व्यवस्थापन समितीचे सभेत सादर करण्यात येईल. |

| | | |
|---|---|---|
| ०५ | पालखी व रथ मिरवणूक | उत्सवाचे पहिले दिवशी शनिवार दि.२४/०३/२०१८ रोजी रात्रौ ९.१५ वाजता श्रींचे पालखीचे गावातून मिरवणूक व मुख्य दिवशी मंगळवार दि.२५/०३/२०१८ रोजी सायंकाळी ५.०० वाजता रथाची गावातून मिरवणूक निघेल. |
| ०६ | कावडी व निशाणाची मिरवणूक | उत्सवाचे मुख्य दिवशी दिनांक २५/०३/२०१८ रोजी सकाळी ५.१५ वाजता श्रींचे कावडी व सायंकाळी ४.०० वाजता निशाणाची मिरवणूक राहील. श्री रामनवमीचे दिवशी परिसरातील गांवकरी व साईभक्त गोदावरी नदीचे पवित्र पाणी कावडीने घेऊन येतात. यासाठी समाधी मंदीराचे बाहेरील बाजूस दक्षिण गेटच्या समोर अभिषेक मुर्ती ठेऊन स्वतंत्र व्यवस्था करण्यात येते. कावडी धारकांना श्रीफळ प्रसाद दिला जातो. या वर्षीही तशी कार्यवाही करण्यात येईल. |
| ०७ | विद्युत रोषणाई | श्री रामनवमी उत्सवात विद्युत विभागामार्फत समाधी मंदीर, व्दाराकामाई, श्री चावडी, श्री गुरुस्थान व मंदीर परिसरात विद्युत रोषणाई करण्यात येईल. विद्युत रोषणाईचे कामासाठी येणा-या कर्मचा-यांची निवास, भोजन, चहा-नाष्टयाची व्यवस्था संस्थानमार्फत दरवर्षी विनामुल्य करण्यात येते. त्याप्रमाणे विनामुल्य करण्यात येईल. मात्र विद्युत रोषणाई चे सामान आणणे व नेणेकामीचे ट्रक भाडे व जाणे-येण्याचा खर्च देण्यात येतो. या उत्सवातही त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल. |
| ०८ | संरक्षण व्यवस्था | उत्सव काळात समाधी मंदीर व मंदीर परिसरात बंदोबस्त ठेवणेकामी संरक्षण विभागात ठेकेदारामार्फत नेहमीप्रमाणे जादा सुरक्षारक्षक नेमण्यात येतील. तसेच शांतता व सुव्यवस्था राखणेसाठी पुरेसा बंदोबस्त ठेवणेकामी मा.पोलीस अधिक्षक, अहमदनगर यांना संरक्षण विभागामार्फत विनंती करण्यात येईल. |
| ०९ | प्रसाद-भोजन व्यवस्था | उत्सव काळात प्रसादालयात मिष्टान्नासह भक्तांना मोफत प्रसाद भोजन दिले जाते. मा. व्यवस्थापन समितीचे सदस्य व त्यांचे कुटुंबिय तसेच निमंत्रित कलाकारांना स्वतंत्र प्रसाद भोजनाची व्यवस्था करण्यात येईल. पोलीस कर्मचारी व उत्सवात काम करणेकरीता मदतीसाठी येणा-या व्यक्तीची प्रसाद भोजनाची व्यवस्था नेहमीप्रमाणे केली जाईल. साईभक्तांचे सोयीसाठी अन्नपाकिटे, चहा, कॉफी, दूध व बिस्कीटे इत्यादी कॅटींनमध्ये २४ तास सुविधा उपलब्ध आहे. लाडू प्रसाद तसेच तीनही दिवस मिष्टान्न प्रसाद नेहमीप्रमाणे देण्यात येईल. उत्सव काळात लाडू प्रसाद विक्री जास्तीत जास्त ठिकाणी सुरु करणेत येईल. या सबंधीत विभागाकडुन नियोजन करणेस येईल.<br>सन २०१८ चे रामनवमी उत्सवात तिनही दिवसांचे प्रसाद भोजनात मिष्टांन्न पदार्थ ठरविणेबाबत मा. मुख्य कार्यकारी अधिकारी निर्णय घेतील. |
| १० | लिलाव | श्रींना अर्पण केलेल्या वस्त्रांची व इतर वस्तुंची नेहमीप्रमाणे प्रसाद रुपाने जाहीर लिलावाने उत्सवाचे तिनही दिवशी विक्री करण्यात येईल. |
| ११ | देणगी काऊंटर्स | उत्सवाचे मुख्य दिवशी मंदीर रात्रभर उघडे असल्याने देणगी काऊंटर्स तीन शिफ्टमध्ये सुरु ठेवण्यात येतील. तसेच उत्सवाचे इतर दिवशी देणगी काऊंटर्सची वेळ सकाळी ४ वा. ते रात्रौ ११ वा. पर्यत करण्यात येईल. |
| १२ | जादा कंत्राटी कर्मचारी | उत्सवाचे पूर्व तयारी करणेकामी व उत्सव पार पाडणेकरीता लागणारा जादा कर्मचारी वर्ग आवश्यकतेनुसार ज्या त्या खात्यात नेमण्यात येईल. |
| १३ | भक्तांची प्रासंगिक निवास व्यवस्था | संस्थानचे साईउद्यान, व्दारावती, भक्तनिवासस्थान इ. इमारतीमधून तसेच साई आश्रम, व साई धर्मशाळा परिसरात स्वतंत्र मंडप टाकून पालखी पदयात्रीसाठी व भक्तांची निवास व्यवस्था करण्यात येईल. उत्सवात समाधी मंदीर परिसर व इतर ठिकाणी तसेच आवश्यकतेनुसार मंडप/शामियाने व कलाकारांसाठी स्टेज इ. व उन्हाळी मंडपही टाकणेत येतील. आवश्यकतेनुसार व गरजेनुसार त्यात वाढ करता येईल याकामी बांधकाम विभागासह इतर संबंधीत विभागामार्फत नियोजन करणेत येईल. पालखी धारकांची आलेल्या पत्रानुसार सर्व निवासस्थाने एकत्रीत नियोजन करतील. |
| १४ | प्रथमोपचार केंद्र | मागील उत्सवात संस्थानमार्फत दिक्षीतवाडा येथे तीनही दिवशी तीन शिफ्ट मध्ये प्रसादालय परिसरात व पिंपळवाडी रोड वरील दर्शनरांग प्रवेशव्दार येथे पहिल्या व तिस-या दिवशी दोन शिप्ट मध्ये व मुख्य दिवशी तीन शिफ्ट मध्ये असे दोन ठिकाणी प्रथमोपचार केंद्र सुरु करण्यात आले होते. तसेच सुसज्ज अशी रुग्णवाहिका मंदीर परिसरात ठेवण्यात आली होती. त्याप्रमाणे या उत्सवात कार्यवाही करण्यात येईल. |

| | | |
|---|---|---|
| १५ | पालखी व्यवस्था | श्री रामनवमी उत्सवात मुंबई तसेच इतर ठिकाणाहून पालख्या येत असतात. उत्सवात येणा-या पालख्या ठेवण्याची व्यवस्था श्री साईबाबा धर्मशाळा येथे करण्यात येते. या वर्षीही नेहमीप्रमाणे ती व्यवस्था करण्यात येईल. त्याचप्रमाणे येणा-या पालख्यांनसाठी पिण्याचे पाण्याची व्यवस्था सिन्नर ते शिर्डी रस्त्यावर मागील श्री रामनवमी उत्सव प्रमाणे यंदाही करावी लागणार आहे. त्या सबंधी खर्चाची टिपणी पाणीपुरवठा विभाग तयार करुन मंजूरीसाठी सादर करत आहे. गरजेनुसार पालख्या मुक्कामाचे ठिकाणी खर्डी, लतीफवाडी, घाटनदेवी, खंबाळे, वेल्लोळी, नाशिक, शिंदे, सिन्नर (एम.आय.डी.सी), खोपडी, दत्तमंदीर, पांगरी, वावी, हॉटेल वनराई, पोहेगांव, दुशिंगवाडी, मलढोण फाटा, सायाळे, जवळके, डो-हाळे, इ. ठिकाणी पालखी मंडप, वीज व्यवस्था व पाणी व्यवस्था करणेत येईल. तसेच दोन वर्षापासून पालखीतील पदयात्री शिर्डी मध्ये आल्यावर त्यांना संस्थानतर्फे एकवेळचे भोजन प्रसाद म्हणून विनामुल्य देण्यात येते. त्यानुसार यावर्षीही एकवेळचे भोजन प्रसाद म्हणून विनामुल्य देण्यात येईल. |
| १६ | कुस्त्या हंगामा | श्री रामनवमी उत्सवात कुस्त्यांचा हंगामा गावक-यांमार्फत भरविण्यात येतो. सन २०१७ चे उत्सवात कुस्त्यांचे हंगामासाठी मुळ अंदाजपत्रकीय रक्कम रु.१०,००,०००/- मात्र मंजूर होती. त्यापैकी रुपये रु.९,०१,५००/-मात्र खर्च झालेला आहे.<br>शताब्दी वर्ष असल्याने कुस्त्या हगामासाठी या वर्षी अंदाजपत्रकीय तरतुदीत मागील वर्षापेक्षा वाढ करावी लागणार आहे. रु.१५,००,०००/-तरतुद दर्शविण्यात आलेली आहे. मा.व्यवस्थापन समितीचे मंजुरीनुसार सदर तरतुद कमी /जास्त करता येईल. |
| १७ | पाणीपुरवठा | पाटबंधारे खात्यास उत्सव काळात कॅनॉलला पाणी सोडणे बाबत विनंती करण्यात येईल. नियमित पाणीपुरवठा राहिल याची व्यवस्था करण्यात येईल. |
| १८ | खर्चाचे अंदाजपत्रक | श्री रामनवमी उत्सव-२०१७ करीता अंदाजपत्रकीय रक्कम रुपये ६५,००,०००/- ( रु. पासष्ट लाख ) मात्र इतक्या रकमेस मंजुरी देण्यात आली होती. प्रत्यक्ष खर्च रुपये ४७,९०,४८६.००/- (एकुण सत्तेचाळीस लाख नव्वद हजार चारशे शहाऐंशी ) मात्र इतका खर्च झाला होता.<br>श्री रामनवमी २०१८ करीता अंदाजपत्रकीय रक्कम रुपये ९८,१७,५९०.०० ( रु. अठ्ठयान्नव लाख सतरा हजार पाचशे नव्वद ) मात्र मंजूरीसाठी सादर केलेले आहे. |

**श्री रामनवमी उत्सव -२०१८ अंदाजपत्रक**

| अ.नं | तपशील | विभाग | श्री रामनवमी उत्सव-२०१७ | | श्री रामनवमी उत्सव-२०१८ |
|---|---|---|---|---|---|
| | | | अंदाजे खर्च | प्रत्यक्ष खर्च | तरतूद |
| ०१ | मंडप कमानी स्टेज | बांधकाम विभाग | १०,००,०००.०० | ७,१५,९२०.०० | ८,६३,९४७.०० |
| ०२ | कलाकार,कीर्तनकाराची बिदागी | मंदिर विभाग | ३,००,०००.०० | २,९०,८७४.०० | १५,००,०००.०० |
| ०३ | भक्तांना मिष्टान्न मजुरीसह | प्रसादालय विभाग | ८,००,०००.०० | ६,४५,८९६.०० | ८,४४,२४३.०० |
| ०४ | विद्युत रोषणाई | विद्युत विभाग | १०,००,०००.०० | ४,६२,१२८.०० | १०,५०,०००.०० |
| ०५ | निमत्रंण पत्रिका छपाई, पत्रिका उदीप्रसाद पाठविणेसह पोस्टेज व जाहिरात खर्च | वशी-५/८ | १४,००,०००.०० | ९,६४,२७७.०० | २०,००,०००.०० |
| ०६ | एल.ई.डी पडदा | सी.सी.टी.व्ही | ५०,०००.०० | ० | १५,०००.०० |
| ०७ | फुल सजावट | बगीचा | २,००,०००.०० | ० | २,००,०००.०० |
| ०८ | जादा कामगार | कामगार | ४,००,०००.०० | ५,४१,६७१.०० | ६,००,०००.०० |
| ०९ | पदयात्री,पालख्या,पिण्याचे पाणी.व्यवस्था<br>प्लंबींग साहित्य, कापडी व डिजीटल बॅनर, जनरेटर, भाडोत्री वाहन, डिझेल, पेट्रोल, रॉकेल इंधन खर्च आयत्या वेळचा प्रासंगिक खर्च (जादा टॅंकर भाडोत्री लावावयाचे झाल्यास) | पाणी पुरवठा | ३,००,०० ०.०० | २,३८,१२०.०० | ९,००,०००.०० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १० | कुस्ती हगामा | बांधकाम शताब्दी – कक्ष | १०,००,०००.०० | ९,०१,५००.०० | १५,००,०००.०० |
| ११ | इतर खर्च<br>टी.व्ही.ई.दुरुस्ती. हगामा व सांस्कृतिक कार्यक्रमाकरीता भाडोत्री साऊंड सिस्टीम, भाडोत्री मालवाहतुक / कार्यालयीन वाहन खर्च,भाडोत्री क्रेन खर्च | ध्वनिक्षेपण व टेलिफोन /वाहन विभाग | ५०,०००.०० | ३०,१००.०० | ३,४४,४००.०० |
| | | एकूण रुपये | ६५,००,०००.०० | ४७,९०,४८६.०० | ९८,१७,५९०.०० |

उपरोक्त अ.नं ७ मध्ये बगीचा विभागामार्फत मंदिर व मंदिर परिसरात करावयाच्या फुल सजावटीसाठी देणगीदार साईभक्तांचा प्रस्ताव प्राप्त न झाल्यास संस्थानमार्फत फुल सजावट करणेसाठी अंदाजीत खर्चासाठी नव्याने तरतूद करणेत आलेली आहे.

तरी श्री रामनवमी उत्सव-२०१८ साजरा करणेस याकामी वरीलप्रमाणे कार्यवाही करणेस व त्यासाठी येणा-या अंदाजे रुपये ९८,१७,५९०.००/- (रुपये अठ्ठयान्नव लाख सतरा हजार पाचशे नव्वद ) मात्रचे खर्चास मान्यतेसाठी सादर.

निर्णय क्र.७९ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री रामनवमी उत्सव- २०१८ या उत्सवाचे नियोजन करणेकामी प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे कार्यवाही करणेस व सदरहू उत्सव साजरा करणेसाठी येणाऱ्या रु.९८,१७,५९०/- मात्रचे अंदाजपत्रकास मान्यता देण्यात आली.**

**यावेळी श्री रामनवमी उत्सव- २०१८ चे अंदाजपत्रकाबाबत चर्चा झाली, त्यामध्ये मागील वर्षाच्या तुलनेने यावर्षीच्या उत्सवासाठी अंदाजपत्रक खुपच जास्त आहे. परंतु समाधी शताब्दी महोत्सव सुरु असल्यामुळे या उत्सवासाठी जादा खर्चाची तरतूद केलेली असलेची माहिती मुख्यकार्यकारी अधिकारी यांनी दिली.**

**प्रत्येक उत्सवाच्या निमंत्रण पत्रिका छपाई व पोस्टेज खर्च कमी करणेसाठी वर्षामधील सर्व उत्सवांचा उदी-प्रसाद एकदाच सर्व भक्तमंडळांना पाठविणेत यावा व ज्या भक्तमंडळ सभासदांचे ई-मेल प्राप्त आहेत, अशा भक्तमंडळ सभासदांना त्या-त्या उत्सवाच्या वेळेस निमंत्रण पत्रिका ई-मेलद्वारे पाठविणेत याव्यात. तसेच श्री रामनवमी उत्सवामध्ये प्रथे परंपरेप्रमाणे श्रींचे द्वारकामाईवर श्री.निमोणकर, अहमदनगर व श्री.रासणे, पुणे यांची निशाने लावली जातात. समाधी शताब्दीच्या निमित्ताने या मान्यवरांचा सत्कार करणेत यावा व त्यांची दर्शनाची तसेच प्रत्येकी ४ व्यक्तींसाठी आरतीची विनामुल्य व्यवस्था संस्थानमार्फत करणेत यावी.**

(कार्यवाही- समाधी शताब्दी कक्ष/ मंदिर विभागप्रमुख/ संरक्षण विभागप्रमुख/ जनसंपर्क अधिकारी)

---

विषय नं.०६ **श्री रामनवमी उत्सव- २०१८ मध्ये आयोजित करावयाच्या सांस्कृतिक कार्यक्रमाचे कलाकार व त्यांचे मानधन निश्चित करणेबाबत.**

प्रस्ताव- **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूद:-**

१. अधिनियमाचे कलम १७ मधील पोट कलम (१) अन्वये, राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दीष्टये साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितची कर्तव्ये असतील.

२. अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १(ख) रुढी व प्रथांनुसार, मंदिरातील धार्मिक विधी, पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करणे व पार पाडणे.

**मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय:-**

१) मा. व्यवस्थापन समितीचे दि.२०/०८/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.६८२ खालीलप्रमाणे,

"श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवात वर्षभर आयोजित करण्यात येणा-या विविध प्रस्तावित धार्मिक, सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रमाची सुधारीत रुपरेषा ठरविण्यात आली. तसेच शताब्दी महोत्सवामध्ये आयोजित करावयाच्या धार्मिक, सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रमासाठीचे कलाकार व त्यांचे मानधन याचे परिशिष्ट ब, क ड व ई सोबत सादर केलेले आहे. या यादीतील कार्यक्रम, कलाकार व त्यांचे मानधन स्थानिक

उपसमितीने छाननी करुन कार्यक्रम निश्चित करावे त्यामधील विनामुल्य सेवा करणा-या कलाकारांना प्राधान्य देण्यात येऊन, वर्षभर संधी देण्यात यावी. कार्यक्रमाची निश्चिती झाल्यानंतर त्यामध्ये गरजेनुसार/ परिस्थितीनुसार आवश्यक ते बदल करण्याचे अधिकार व्यवस्थापन समितीला राहतील, असे ठरले.

या निश्चित केलेल्या सर्व प्रकारच्या कार्यक्रमांसाठी, अपवाद वगळता मानधन व प्रवास असे सर्व मिळून प्रत्येकी एका कार्यक्रमासाठी जास्तीत जास्त रु.३ लाख मात्रचे खर्चास तसेच शताब्दी वर्षात आयोजीत केलेल्या कार्यक्रमांसाठी स्टेज, मंडप, साऊंड सिस्टीम, विद्युत रोषणाई, सीसीटीव्ही, सुरक्षा व्यवस्था, आवश्यक जादाचे मनुष्यबळ यावर होणारा खर्च व इतर अनुषंगिक खर्चासही मान्यता देण्यात आली.

२) मा. व्यवस्थापन समितीचे दि.०८/०९/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.७५० खालीलप्रमाणे,

"श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव २०१७-१८ या कालावधीत आयोजित करावयाचे विविध धार्मिक, सांस्कृतिक कार्यक्रम व पादुका दर्शन सोहळा कार्यक्रमांबाबत सविस्तर चर्चा होऊन त्यास अंतिम स्वरुप देण्यात आले."

**प्रस्तावना:-** श्री साईबाबा यांच्या समाधीस दि.१८ ऑक्टोबर २०१८ रोजी (विजयादशमी) १०० वर्षे पूर्ण होत आहेत. श्री साईबाबा संस्थानच्यावतीने दि.०१ ऑक्टोबर २०१७ ते दि.१८ ऑक्टोबर २०१८ हा कालावधी श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्ष म्हणून साजरा केला जात आहे. यासाठी शताब्दीचे संपूर्ण वर्षभरात वेगवेगळया धार्मिक, सांस्कृतिक, सामाजिक व प्रबोधनपर कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे. जेणेकरुन संपूर्ण वर्षभरात शिर्डीमध्ये भक्तीमय वातावरण राहून श्री साईबाबा समाधी शताब्दी सोहळा अविस्मरणीय होईल यादृष्टीने कामकाज चालू आहे.

**प्रस्ताव:-** श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्षात आयोजित करावयाचे धार्मिक, सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रमांचे प्रारुप वेळापत्रकास मा.व्यवस्थापन समितीचे दि.०८/०९/२०१७ रोजीचे सभेत निर्णय क्र.७५० अन्वये मान्यता मिळालेली आहे. या वेळापत्रकामध्ये सांस्कृतिक कार्यक्रमांतर्गत श्रीरामनवमी उत्सवाच्या पहिल्या दिवशी दि.२४/०३/२०१८ रोजी सायं.७ ते रात्री १० या वेळेत श्री.श्रीधर फडके यांचा 'गीत रामायण' हा कार्यक्रम प्रस्तावित करण्यात आला होता. तसेच मा.व्यवस्थापन समितीचे दि.१४/११/२०१७ रोजीचे सभेत श्री साईबाबांच्या जीवनावर आधारीत 'सबका मालिक एक है' या महानाट्याचे आयोजन करणेबाबतचा प्रस्ताव सादर करण्यात आला होता. त्यावर निर्णय क्र.९४१ अन्वये मान्यता मिळून 'सबका मालिक एक है' या महानाट्याचे आयोजन श्रीरामनवमी उत्सवाच्या पहिल्या दिवशी दि.२४ मार्च २०१८ रोजी करणेत यावे, असे ठरले.

तथापि, श्री.श्रीधर फडके यांचा 'गीत रामायण' हा कार्यक्रम आणि 'सबका मालिक एक है' हे महानाट्य या दोन्ही कार्यक्रमाच्या तारखा दि.२४ मार्च २०१८ या एकाच दिवशी येत असल्याने सदरचा विषय मा.स्थानिक उपसमितीचे दि.१६/१२/२०१७ रोजीचे सभेपुढे सादर करण्यात आला होता. त्यावर चर्चा होऊन दोघांना संपर्क करुन तारखा अंतिम करण्यात याव्यात असे ठरले. त्यानुसार श्री.श्रीधर फडके यांना दुरध्वनीवरुन संपर्क केला असता त्यांनी दि.२४/०३/२०१८ व दि.२५/०३/२०१८ या दोन्ही दिवशी आपण कार्यक्रमासाठी उपलब्ध होऊ शकत नाही, परंतु दि.२६/०३/२०१८ रोजी उपलब्ध असल्याबाबत कळविले आहे.

तसेच 'सबका मालिक एक है' या महानाट्याची स्क्रिप्ट तपासणी अहवालाचा विषय मा.व्यवस्थापन समितीचे दि.०८/०१/२०१८ रोजीचे सभेत सादर करण्यात आला होता. त्यावर निर्णय क्र.१३ अन्वये साईचरित्राच्या जाणकारांच्या अभिप्रायाचा विचार करता 'सबका मालिक एक है' या महानाट्याचे संस्थानमार्फत आयोजन करणे योग्य होणार नाही, असे ठरले आहे.

त्यामुळे श्रीरामनवमी उत्सव २०१८ मध्ये दि.२४, २५ व २६ मार्च २०१८ या तीनही दिवशी सांस्कृतिक कार्यक्रमांचे कलाकार व त्यांचे मानधन ठरविणे आवश्यक आहे. श्रीराम जन्म हा श्रीरामनवमी उत्सवाच्या मुख्य दिवशी (दि.२५/०३/२०१८) असल्याने 'गीत रामायण' हा कार्यक्रम श्रीरामनवमी उत्सवाच्या मुख्य दिवशी म्हणजेच दि.२५/०३/२०१८ रोजी घेणे संयुक्तिक ठरेल, असे नम्र मत आहे. 'गीत रामायण' कार्यक्रम सादरीकरणासाठी खालील तक्त्यात नमूद प्राप्त तीन प्रस्तावांमधून एकाची निवड करता येईल.

श्रीरामनवमी उत्सवात आयोजित करावयाच्या सांस्कृतिक कार्यक्रमाच्या निवडीसाठी प्रत्येक दिवसासाठी खालील तक्त्यात पर्याय नमूद केले आहेत. यामध्ये मानधन घेऊन कार्यक्रम सादर करणारे व मोफत कार्यक्रम सादर करणारे कलाकार यांची यादी नमूद केली आहे. या पर्यायांमधून प्रत्येक दिवसाचे कार्यक्रमांसाठी एका कलाकाराची निवड करता येईल.

| अ. नं. | वार, दिनांक व वेळ | प्रस्तावित कलाकाराचे नांव | ठिकाण | संपर्क | कलाप्रकार | कलाकार संख्या | मानधन रक्कम रु. | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | शनिवार, २४/०३/२०१८ सायं.७ ते ९.३० | श्रीमती विजया भारती | दिल्ली | ९८१००८२२८४<br>९९१०१५०११९ | लोकगीत | ०९ | मानधन व प्रवास खर्च ३,८०,०००/- | |
| | | अंध व अपंग कलाकारांचा आनंदयात्री ऑर्केस्ट्रा (संपर्क – श्रीमती श्रद्धा देसाई) | मुंबई | ९८७०११२४३७<br>९१६७८५३४६७ | ऑर्केस्ट्रा व ग्रुप डान्स | २२ | प्रवास खर्च ६५,०००/- | मा. विश्वस्त श्री.जयकर सो. यांची शिफारस |
| | | अनंत पांचाळ | मुंबई | ९९३०१२६३२७ | हिंदी साईभजन | १५ | प्रवास खर्च २५,०००/- | |
| | | अजय मोरे | ठाणे | ९८१९८७२३६४ | साई स्वरानंद | २० | प्रवास खर्च १८,०००/- | |
| | | निनाद ग्रुप – श्रीमती पद्मावती पारेकर | पुणे | ९६०४६१९५८४ | भक्तीगीत | १५ | मोफत | |
| | | मंगेश अमदुरकर | नागपूर | ८८८८१११८६ | साईभजन | २० | मोफत | |
| | | पं. मनिष शर्मा | आग्रा | ९२५८०२३८८२ | साईभजन | ३० | मोफत | |
| | | शैला आचार्य | ठाणे | ९९७५७३१५६१ | भक्तीगीत | २५ | मोफत | |
| ०२ | रविवार, २५/०३/२०१८ सायं.७ ते ९.३० | राजाराम श्रीराम शेंबेकर | चिपळूण | ९९२२७२९०२६ | गीत रामायण | ०६ | ६०,०००/- | |
| | | अमोल माधव पटवर्धन | सांगली | ९८८११०७१५१<br>९४०३००५३९३ | गीत रामायण | ०५ | ३०,०००/- | |
| | | स्वरप्रभा संगीत विद्यालय – श्रीमती नीला देशपांडे | नाशिक | ९४०४७८८८८४ | गीत रामायण | २५ | १५,०००/- | |
| ०३ | सोमवार, २६/०३/२०१८ सायं.७ ते ९.३० | रविराज नासेरी | मुंबई | ९८९२३०६१७३ | साईभजन | १४ | ४,००,०००/- | मा. विश्वस्त श्री.वाकचौरे सो. यांची शिफारस |
| | | श्रीधर फडके | मुंबई | ९८२१४१३९६० | गीत रामायण | ०९ | १,२५,०००/- + प्रवास खर्च (२ कारकरिता मुंबई ते शिर्डी व शिर्डी ते मुंबई) | |
| | | हरिष ग्वाला | मुंबई | ९८६७४९१४९९ | हिंदी साईभजन | १० | ४५,०००/- | |
| | | प्रशांत पेडणेकर | मुंबई | ८९७६३३१९३६ | भक्ती गीत | २१ | प्रवास खर्च २१,०००/- | |
| | | साई सावली भजन मंडळ – देवेंद्र गावंड | वडाळा, मुंबई | ८८९८९५६८३८<br>८७६७६४५५५३ | साईभजन | २० | मोफत | |
| | | अंचल शर्मा | रायपुर | ९८२७१८०९५० | साईभजन | १५ | मोफत | |
| | | साई बंधु- अजय सोनी व नविन खन्ना | लुधियाना | ८५६८९५१९६१ | साईभजन | १५ | मोफत | |
| | | टी.व्ही. हरीहरन | बंगळुरू | ९७४१०२६६५७ | साईभजन | २० | मोफत | |

आपत्ती व्यवस्थापनाचे दृष्टीकोनातून श्रीरामनवमी उत्सव व श्री साईबाबा पुण्यतिथी उत्सवातील सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन ब-याच वर्षांपासून मंदिर परिसरात न करता साईनगर मैदान येथे केले जाते.

श्रीरामनवमी उत्सव २०१८ चे खर्चाचे अंदाजपत्रक मा.व्यवस्थापन समितीच्या मान्यतेसाठी स्वतंत्ररित्या सादर करण्यात येत आहे. त्यामध्ये स्टेज, मंडप, विद्युत व्यवस्था, साऊंड सिस्टीम इ. बाबतचा तपशिल नमूद करण्यात आला आहे.

तरी श्रीरामनवमी उत्सव-२०१८ मध्ये आयोजित करण्यात येणा-या सांस्कृतिक कार्यक्रमांसाठी कलाकार व त्यांचे मानधन निश्चित करणे व त्यासाठी कलाकार पसंतीचे पर्याय क्र.१ व २ निवडणे तसेच सदर कार्यक्रमांचे साईनगर मैदान येथे आयोजन करणेबाबतचा प्रस्ताव निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.८०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्रीरामनवमी उत्सव- २०१८ मध्ये दिनांक २४.०३.२०१८ ते दिनांक २६.०३.२०१८ या कालावधीमध्ये खालील कलाकारांचे कार्यक्रम निश्चित करणेत आले.**

| अ. नं. | वार, दिनांक व वेळ | प्रस्तावित कलाकाराचे नांव | ठिकाण | संपर्क | कलाप्रकार | कलाकार संख्या | मानधन रक्कम रु. | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | शनिवार, २४/०३/२०१८ सायं.७ ते ९.३० | श्री.नितिन मुकेश | मुंबई | --- | ऑर्केस्ट्रा | --- | मानधन व प्रवास खर्च ४,००,०००/- + जी.एस.टी. | |
| ०२ | रविवार, २५/०३/२०१८ सायं.७ ते ९.३० | अंध व अपंग कलाकारांचा आनंदयात्री ऑर्केस्ट्रा (संपर्क – श्रीमती श्रद्धा देसाई) | मुंबई | ९८७०११२४३७ ९१६७८५३४६७ | ऑर्केस्ट्रा व ग्रुप डान्स | २२ | प्रवास खर्च ६५,०००/- | मा. विश्वस्त श्री.जयकर सो. यांची शिफारस |
| ०३ | सोमवार, २६/०३/२०१८ सायं.७ ते ९.३० | श्रीधर फडके | मुंबई | ९८२१४१३९६० | गीत रामायण | ०९ | १,२५,०००/- + प्रवास खर्च (२ कारकरिता मुंबई ते शिर्डी व शिर्डी ते मुंबई) | |

**दिनांक २४.०३.२०१८ रोजी श्री रामनवमी उत्सवाचा प्रथम दिवस असून, गर्दीची परिस्थिती पाहून समाधी मंदिर रात्रभर उघडे राहणार असल्यामुळे श्री.नितिन मुकेश, मुंबई यांच्या कार्यक्रमाची ऐनवेळी निश्चिती करणेत आली. तसेच वरील सर्व कार्यक्रम साईप्रसाद नं.१ व २ च्या ठिकाणी आयोजित करणेत यावा, असे ठरले.**

(कार्यवाही- समाधी शताब्दी कक्षप्रमुख)

---

**विषय नं.०७** **मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक २०.०८.२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.६८२ मधील मानधनाच्या मजकुराबाबत पुन:निर्णय होणेबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूद :-**

१. अधिनियमाचे कलम १७ मधील पोट कलम (१) अन्वये,राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दीष्टये साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितची कर्तव्ये असतील.

२. अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १(ख) रुढी व प्रथांनुसार, मंदिरातील धार्मिक विधी, पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करणे व पार पाडणे.

३. अधिनियमाचे कलम १७ मधील पोट कलम २(ठ) अन्वये, श्री साईबाबांचे जीवन, त्यांचे कार्य, त्यांच्या लीला व त्यांची शिकवण यांबाबतच्या उपयुक्त माहितीचा प्रचार व प्रसार करील आणि श्री साई साहित्य ग्रंथालय चालवील व त्याचा विस्तार करील.

**मा.व्यवस्थापन समितीच्या सभेतील निर्णय :-**

मा.व्यवस्थापन समितीचे दि.२०/०८/२०१७ रोजीचे सभेपुढे श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवात वर्षभर आयोजित करण्यात येणा-या विविध धार्मिक, सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रमाची रुपरेषा ठरविणे, कलाकार निश्चित करणे व त्यांचे मानधन/इतर विषयांवर चर्चा व धोरणात्मक निर्णय होणेसाठी विषय सादर करण्यात आला होता. त्यावर निर्णय क्र.६८२ खालीलप्रमाणे झाला आहे.

"श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवात वर्षभर आयोजित करण्यात येणा-या विविध प्रस्तावित धार्मिक, सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रमाची सुधारीत रुपरेषा ठरविण्यात आली. तसेच शताब्दी महोत्सवामध्ये आयोजित करावयाच्या धार्मिक, सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रमासाठीचे कलाकार व त्यांचे मानधन याचे परिशिष्ट ब, क ड व ई सोबत सादर केलेले आहे. या यादीतील कार्यक्रम, कलाकार व त्यांचे मानधन स्थानिक उपसमितीने छाननी करुन कार्यक्रम निश्चित करावे त्यामधील विनामुल्य सेवा करणा-या कलाकारांना प्राधान्य देण्यात येऊन, वर्षभर संधी देण्यात यावी. कार्यक्रमाची निश्चिती झाल्यानंतर त्यामध्ये गरजेनुसार/ परिस्थितीनुसार आवश्यक ते बदल करण्याचे अधिकार व्यवस्थापन समितीला राहतील, असे ठरले.

या निश्चित केलेल्या सर्व प्रकारच्या कार्यक्रमांसाठी, अपवाद वगळता मानधन व प्रवास असे सर्व मिळून प्रत्येकी एका कार्यक्रमासाठी जास्तीत जास्त रु.३ लाख मात्रचे खर्चास तसेच शताब्दी वर्षात आयोजीत केलेल्या कार्यक्रमांसाठी स्टेज, मंडप, साऊंड सिस्टीम, विद्युत रोषणाई, सीसीटीव्ही, सुरक्षा व्यवस्था, आवश्यक जादाचे मनुष्यबळ यावर होणारा खर्च व इतर अनुषंगिक खर्चासही मान्यता देण्यात आली."

**प्रस्तावना:-** श्री साईबाबा यांच्या समाधीस दि.१८ ऑक्टोबर २०१८ रोजी (विजयादशमी) १०० वर्षे पूर्ण होत आहेत. श्री साईबाबा संस्थानच्यावतीने दि.०१ ऑक्टोबर २०१७ ते दि.१८ ऑक्टोबर २०१८ हा कालावधी श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्ष म्हणून साजरा करीत आहे. यासाठी शताब्दीचे संपूर्ण वर्षभरात वेगवेगळ्या धार्मिक, सांस्कृतिक, सामाजिक व प्रबोधनपर कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे. जेणेकरुन संपूर्ण वर्षभरात शिर्डीमध्ये भक्तीमय वातावरण राहून श्री साईबाबा समाधी शताब्दी सोहळा अविस्मरणीय होईल यादृष्टीने कामकाज चालू आहे.

मा.व्यवस्थापन समितीचे उपरोक्त निर्णयानुसार दि.०१/१०/२०१७ ते दि.०१/०१/२०१८ अखेरपर्यंत विविध प्रकारचे धार्मिक, सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रमांचे यशस्वीपणे आयोजन करण्यात आलेले आहे. यामध्ये खालील कार्यक्रमांसाठी उपरोक्त नमूद केलेल्या मा.व्यवस्थापन समितीच्या सभेतील निर्णयात नमूद केलेल्या रकमेपेक्षा (रु.३ लाख) जास्त मानधन व प्रवास खर्च आदा करण्यात आलेला आहे.

| अ.नं. | कलाकाराचे नाव | कार्यक्रमाचे नांव | दिनांक व वेळ | कार्यक्रमाचे ठिकाण | मानधन रक्कम रु. |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | श्री.सुरेश वाडकर, मुंबई | साईभजन संध्या | ०१/१०/२०१७ सायं.७ ते ९.३० | श्री साईबाबा समाधी मंदिर शताब्दी मंडप | ५,००,०००/- |
| ०२ | श्री.रुपकुमार राठोड व सौ.सुनाली राठोड, मुंबई | साईभजन संध्या | २३/१२/२०१७ सायं.७ ते ९.३० | साईनगर मैदान | ३,९८,२५०/- |
| ०३ | श्री.अशोक हांडे, मुंबई | मराठी बाणा | २४/१२/२०१७ सायं.७ ते ९.३० | साईनगर मैदान | ११,८०,०००/- |

**प्रस्ताव:-** श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्षात यापुढेही नामवंत प्रवचनकार, किर्तनकार, कलाकार कार्यक्रम आयोजित करण्यात येणार आहेत. सदर कार्यक्रमासाठी उपरोक्त प्रस्तावनेत नमूद केलेप्रमाणे कलाकार मानधन व इतर अनुषंगीक बाबींसाठी रु.३ लाखांपेक्षा अधिक खर्च होण्याची शक्यता नाकारता येत नाही. आयोजित केलेल्या कार्यक्रमांचे प्रसिद्धी व स्वरुप पहाता मा.व्यवस्थापन समितीचे मान्यतेने रु.३ लाखांपेक्षा अधिक मानधन आदा करण्यात आलेले आहे.

तरी मा.व्यवस्थापन समितीचे दि.२०/०८/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.६८२ मधील मानधनाच्या मजकुराबाबत पुर्ननिर्णय होणेबाबत सदरचा विषय निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.८१** **यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्षानिमित्ताने यापुढेही साईभक्तांसाठी नामवंत प्रवचनकार, किर्तनकार, कलाकार कार्यक्रम आयोजित करण्यात येणार असून सदर कार्यक्रमासाठी उपरोक्त प्रस्तावनेत नमूद केलेप्रमाणे कलाकार मानधन व इतर अनुषंगीक बाबींसाठी रु.३ लाखांपेक्षा अधिक खर्च होण्याची शक्यता असल्यामुळे, मा.व्यवस्थापन समितीचे दि.२०/०८/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.६८२ मध्ये कलाकार मानधनाबाबत समिती वेळोवेळी निर्णय घेईल, त्याप्रमाणे मानधन आदा करणेत यावे, असा बदल करणेत यावा.**

(कार्यवाही- समाधी शताब्दी कक्षप्रमुख)

---

**विषय नं.०८** **संस्थान परिसरात साईभक्तांना श्रींचे दर्शनाचा लाभ सुलभतेने होणेकरीता LED Wall Screen लावणेसाठीची ठिकाणे निश्चित करणे व Specification ठरविणे, तसेच सदरहू खरेदीकामी येणाऱ्या खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम २००४ मधील तरतुद-** सन २००४ च्या महाराष्ट्र अधिनियम क्र. १४ मधील ३५६- १७(१) भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे.

**मा. व्यवस्थापन समितीचा ठराव क्र.**– १) दि. २५/०२/२०१७ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील विषय क्र. ४०, निर्णय क्र. ४०.

२) दि. २०/०८/२०१७ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील विषय क्र. ०२, निर्णय क्र.६७७.

**प्रास्ताविक-** श्री साईबाबा समाधी शताब्दी उत्सव-२०१८ मध्ये मध्ये साईभक्तांना श्रीं चे दर्शन सुलभ होण्यासाठी मोठया साईजचे LED Wall Screen मंदिर परिसरात व संस्थानचे विविध परिसरामध्ये १० ठिकाणी बसविणेकामी सदरचा प्रस्ताव दि.२५/०२/२०१७ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर केला असता, त्यावर सविस्तर चर्चा होवुन, "संस्थान परिसरामध्ये विविध ठिकाणी साईभक्तांना श्रीं चे लाईव्ह दर्शनाचा सुलभतेने लाभ होणेकरीता प्रस्तावातील १० ठिकाणी नविन LED Wall Screen विहित पद्धतीने खरेदी करणेस व याकामी येणा-या सर्व समावेशक अंदाजे रु.१,८९,२८,०००/- खर्चास मान्यता देण्यात आली. तसेच प्रस्तावातील १० ठिकाणां व्यतिरीक्त शिर्डी बसस्थानक, साईनगर रेल्वेस्टेशन व नगर-मनमाड रस्त्यावर अशा ०३ ठिकाणी असे एकुण १३ ठिकाणी सदर LED Wall Screen बसविणेस" मान्यता देण्यात आलेली आहे.

त्यास अनुसरुन १३ नग LED Wall Screen खरेदी करणेकामी पहिल्या वेळेस दि. २५/०५/२०१७ ते दि. २७/०६/२०१७ अखेर ई-निवीदा प्रसिद्ध करण्यात आलेली होती. त्यासाठी सहा निवीदाधारकांनी ऑनलाईन निवीदेमध्ये सहभाग घेतला होता. त्यामध्ये ०३ निवीदाधारक पात्र झालेले आहे. परंतु सदर ०३ निवीदाधारकांनी एकच कंपनीसाठी दर भरलेले असलेमुळे दि. २०/०८/२०१७ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील विषय क्र. ०२, निर्णय क्र.६७७ अन्वये "सदर LED Wall Screen खरेदी करणेकामी या क्षेत्रातील सर्व कंपन्यांचे स्पेसीफीकेशन देऊन, नव्याने फेर ई-निवीदा मागणी करणेत यावी" असा निर्णय घेण्यात आला.

सदर निर्णयास अनुसरुन निवीदेतील Specification मध्ये बदल करणेत येवुन दुस-या वेळेस दि.२१/०९/२०१७ ते दि.०५/१०/२०१७ अखेर ई-निवीदा प्रसिद्ध करण्यात आली होती. परंतु सदर ई-निवीदांचे दि. ५/०९/२०१७ रोजीचे प्री-बीड मिटींगमध्ये उपस्थित असणारे ०७ निवीदाधारकच्या कंपन्या हया आंतरराष्ट्रीय दर्जाच्या असल्याने त्यांनी उच्च दर्जाचे Specification दिलेले आहे. यामुळे सदर LED Wall Screen खरेदी करणेकामी मंजुर रक्कमेपेक्षा जास्त खर्च येणार असल्याने दुस-या वेळेस प्रसिद्ध करण्यात आलेली ई-निवीदा रद्द करण्यात आलेली आहे.

यासाठी सदर क्षेत्रातील नावजलेल्या राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय कंपन्यांकडुन दर मागविण्यात आले होते. परंतु सदर कंपन्यांनी कालावधी जास्त घेतल्यामुळे सदर प्रस्तावास विलंब झाला आहे.

यापुर्वी सादर केलेल्या LED Wall Screen चे प्रस्तावामध्ये खालीलप्रमाणे त्रृटी आढळुन आलेल्या आहेत -

१) उपरोक्त संदर्भ क्र. १ चे दि. २५/०२/२०१७ रोजीचे मा. व्यवस्थापन समितीचे सभेत मंजुर केलेली रक्कम रु. १,८९,२८,०००/- मात्र ही १० ठिकाणी LED Wall Screen बसविणेकामी मान्यतेस्तव सादर करण्यात आलेली होती. परंतु मा. व्यवस्थापन समितीने अतिरीक्त ०३ ठिकाणे वाढवुन एकुण १३ नग LED Wall Screen बसविणेकामी सदर खर्चास मान्यता दिलेली आहे. त्यामध्ये अतिरीक्त ०३ नग LED Wall Screen चे खर्चाचा समावेश सदर मंजुर खर्चात आलेला नाही.

२) सदरचा हा दर हा भारतीय ब्रँडचा असुन GST लागु होण्यापुर्वीचा आहे. तसेच उच्च दर्जाचे Specification चा विचार करता सदरची मंजुर रक्कम LED Wall Screen खरेदी करणेकरीता अपुरी होत आहे.

३) तसेच सदरचे LED Wall Screen खरेदी करणेकामी दोनही वेळेस प्रसिद्ध करण्यात आलेल्या ई-निवीदांतील प्री-बीडमध्ये निवीदाधारकांचे उच्च दर्जाचे Specification प्राप्त झालेले असुन त्यानुसार Specification मध्ये बदल करण्यात आलेला आहे. तसेच LED Wall Screen करीता लागणारे साहित्य,सॉफ्टवेअर, कंट्रोल युनिट, एअर कंडीशन इ. खरेदी करावे लागणार आहेत.

४) दि. ०८/०१/२०१८ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील विषय क्र.०४, निर्णय क्र.०४ मधील अ.नं. १९ अन्वये Outdoor LED Wall Screen नामांकित कंपनीकडून खरेदी करावे, यासाठी अचूक अंदाजपत्रक तयार करुन खर्चाचा प्रस्ताव व LED Wall Screen ची (Specification) मानके मंजुरीसाठी पुढील सभेसमोर सादर करावीत, असे ठरले.

याकरीता सदर LED Wall Screen खरेदी करणेकामी उपरोक्त त्रृटी व उच्च दर्जाचे Specification यांचा विचार करता खालीलप्रमाणे निर्णय होणे आवश्यक वाटत आहे.

**अ) सदर LED Wall Screen खरेदी करणेकामी प्रथमतः त्यांची स्थळे निश्चित करणे आवश्यक वाटत आहे. त्याचा तपशील खालीलप्रमाणे -**

| Sr.No. | Location | Screen |
|---|---|---|
| 1 | Chawadi | 1 |
| 2 | Program Area Mandir Premises | 1 |
| 3 | Museum Wall | 1 |
| 4 | Saibaba Bhaktniwas (500Rooms) | 1 |
| 5 | Dwarawati Bhaktniwas | 1 |
| 6 | Sai Dharmshala | 1 |
| 7 | Prasadalya | 1 |
| 8 | 16 Gunthe | 1 |
| 9 | Old Prasadalya | 1 |
| 10 | Saiashram 1 | 1 |
| 11 | Shirdi Bus Stand | 1 |
| 12 | Sainagar Railway Station | 1 |
| 13 | Nagar-Manmad Road | 1 |
| 14 | Shri Saibaba International Airport, Shirdi | 1 |
| 15 | Sai Knowledge Park | 1 |
| 16 | SSIAC Acadamy | 1 |
| | Total | 16 |

**ब) सदर LED Wall Screen चे व इतर आवश्यक असणा-या खालील साहित्याचे Specification निश्चीत करणे**

**1) LED Wall Specification –**

| Parameter | Specification |
|---|---|
| Full Colour LED Displayed with LED Controller, Power Distribution Unit, Auto Brightness Controller, Power cables & Signal Cable. | Preferred Makes : Samsung, Delta, Mitsubishi, Barco, LG, Leyard (planner), NEC, Synergy, Orion, Christie, Panasonic |
| Sizes of LED Wall As Required | 4.80m x 2.88m or Higher – Qty – 05 Nos.<br>6.72m x 3.84m or higher – Qty – 08 Nos. |
| Pixel Pitch | 6 mm ±5% |
| LED Configuration | R/G/B 3 in 1 SMD |
| Pixel Density | Minimum 27,777 per sqm+10% |
| Horizontal / Vertical Vieing Angle | H 140 deg / V90 deg or better |
| Refresh Rate | ≥2000Hz or better |

| | |
|---|---|
| Temp Range | -20 to +60Degrees or better |
| Gray Scale Processing | 16 Bit or better |
| Brighness (Calibrated) | 6000 cd/m$^2$ or better |
| Contrast Ratio (dynamic) | 1500:1 or better |
| Lifetime (Half Time) | Minimum 1,00,000 Hrs |
| Power Input | 100 ~ 240 VAC |
| Max power Consumption | ≤ 1000 W/sq mtr |
| Humidity | 10% ~ 90% |
| IP Level | Front IP65/Rear IP45 |
| Regulatory | BIS for both LED tiles as well as LED controller |
| Other International Certifiacations | CE, UL, CB & FCC Crtification |
| Brand | Preferred Makes : Samsung, Delta, Mitsubishi, Barco, LG, Leyard |
| LED Bulb | Cree, Nichia |
| Office | Manufacture Should Have Reg.Office service center in Maharashtra |

**2) Media Player -**

| Parameter | Specifications |
|---|---|
| Media Player | ➢ Built-in Wi-Fi and built-in internal storage<br>➢ Intuitive playlist creation;<br>➢ Scheduled playback;<br>➢ Network-based management<br>➢ Remote monitoring |
| Support | Windows® 7.0+,/Mac® 10.7+/Android |
| Storage | Internal: 8GB (5.1 GB User Availability)<br>External: microSD Card (up to 32GB), USB Flash Drive |
| Compatibility | All Display Devices with HDMI Input |
| Network Connectivity | Wi-Fi: 802.11 a/c (2.4 GHz & 5 GHz), Ethernet |
| Media | |
| Video | MP2, MP4, H.264, VC-1 (WMV) |
| Audio | MP3, WMA, AAC |
| Images | JPEG, PNG, GIF, BMP |
| Others | Scrolling Text with Custom Visual Effects |
| Input / Output Connection Ports | |
| USB 2.0 Type A, HDMI v1.4, micro SD Card, RJ45 (10/100 Ethernet) , micro USB Power Input (5V/2A) | |
| LED Indicator | Green: System Power on; Red: System in Standby; Blue: Network Activity with Re-set Button/Switch |
| Power | 100 ~ 240 V AC, 50/60 Hz, DC output: 5.35V and 2A. Power Consumption – 10W |
| Accessories | USB Power Adapter, HDMI Cable, Power Cable, Remote Control , Mounting Bracket |

**3) Outdoor Cabinet Air Conditioner -**

| Parameter | Specifications |
|---|---|
| Power Supply | 230VAC ±15% 50Hz/60Hz |
| Working Temperature Range | -40 to + 55 deg C |
| Max Noise Level | 60dB(A) |
| IP Grade | IP55 |
| Weight | < 16 Kg |
| Refrigerant | R134a for harsh conditions Or Higher |
| Dimensions | 550 x 320 x 175 mm( Hx WXD) |
| CE & ROHS Compliant | Yes |
| Surface treatment | Outdoor type power coating |
| Cooling Capacity | 500W@L35/L35 |
| Power Consumption | 210W@L35/L35 |
| Power Supply | 230±15% AV 50/60 Hz |
| Internal Airflow | 120 m³/h |
| Maximum Noise Level | 60dB(A) |
| Display Panel | Should be provided with a display panel to show parameters like cabinet temperature, indications for - cooling, running of external |

| | |
|---|---|
| | fans, flashing on alarm |
| Anti theft design | The mounting of the AC should have an anti theft design |
| Communication from AC | AC should be able to send diagnostic communication to remote location over IP |

**4) Rack Frame with Power Distribution Unit to be mounted Behind the Structure -**

| Parameter | Specifications |
|---|---|
| An IP 54 rack shall be provided to house the various components required to drive the Outdoor LED wall. The rack shall be at least 13 U high with a provision to mount 19" wide equipments. The equipments required to be installed inside the rack shall be as follows:-i) Power Distribution Unit for the LED wall with surge protection ii) Media Player iii) LED controller iv) Network switch or any other .The rack shall also have an air conditioner bolted on the door of the rack to keep the equipment inside the rack cool at all times. | |
| Front Door | 2 Hinges with Rack & Aircon bolted |
| Wall Mount Clamp | Welded on Rack frame rear side |
| 19" pillar front & 19" pillar rear | Bolted on rack side wall |
| Locking Arrangement | To be provided with a locking system |
| Limit Switch | The rack door to be provided with a limit switch |
| Earthing | Earthing studs should be provided in the rack for earthing purposes |
| Cable points | Cable entry and exit points should be provided in the rack |
| Smoke detector | A smoke detector should be installed inside the rack |
| Mounting | Should be possible to mount the rack either on a pole or on a wall with options of different mounting types |
| Rack Internal size | 13U 19" rack |
| Material | GI 120 gsm thickness 1.5 mm |
| IP rating | IP54 |
| AC input | 380V/220V |
| AC out put | 6 x 220V |
| AC Power Load Max | 35KW |
| AC power LoadMax Each Output | 5KW |
| Surge protection | Class C |
| Overtemperature protection | Selectable from 30 deg to 60 deg C |
| Remote Control | Power Distribution Unit can be controlled from remote location over IP |

**5) Servo Stabilizer -**

| Parameter | Specifications |
|---|---|
| Servo Type | 3 Phase + Neutral (4 Wire), suitable for Unbalanced Load & Supply. |
| Capacity | 10 KW (Three Phase) |
| Input Range | 340 ~ 480 V AC |
| Output | 400 V ± 1% |
| Cut Off | High-Low Voltage Cutoff Protection on Each Phase Using relays |
| Control Circuit | IC Based fully Automatic Circuit. |
| Wave Form Distortion | Nil |
| Modes | Auto or Manual |
| Ambient Temperature | 0 – 50 Degree C. |
| Outdoor Suitability | Offered Servo should be suitable for outdoor installation and use |
| Duty Cycle | Continuous on 100 % load |
| Voltage Adjustment | Provided. |
| Voltmeter | To read Input / Output voltages through toggle switch. |
| Output Line Regulation | ±1 % |
| Cooling Type | Air Cooled/Oil Cooled |

**6) Communication Interface Device -**

| Parameter | Specifications |
|---|---|
| **Ethernet Interface** | |
| Number of Ports | One 8 pin RJ45 |
| Speed | 10/100 Mbps, auto MDI/MDIX |

| | |
|---|---|
| **Serial Interface** | |
| Number of Ports | One |
| Serial Standards | RS-232 on DB 9 connector |
| **Serial Communication Parameters** | |
| Data Bits | 5, 6, 7, 8 |
| Stop Bits | 1, 1.5, 2 |
| Parity | None, Even, Odd, Space, Mark |
| Flow Control | RTS/CTS and DTR/DSR (RS-232 only), XON/XOFF |
| Baudrate | 110 bps to 230.4 kbps |
| **Serial Signals** | |
| RS-232 | TxD, RxD, RTS, CTS, DTR, DSR, DCD, GND |
| **Software** | |
| Network Protocols | ICMP, IPv4, TCP, UDP, DHCP, BOOTP, Telnet, DNS, SNMP V1, ARP, HTTP, SMTP |
| Configuration Options | Web Console, Serial Console, Telnet Console, Windows Utility |
| **Physical Characteristics** | |
| Housing | Metal |
| Weight | 340 g or less |
| Dimensions | With ears: 75.2 x 80 x 22 mm |
| **Environmental** | |
| Operating Temperature | 0 to 55°C |
| Ambient Relative Humidity | 5 to 95% (non-condensing) |
| **Power Requirements** | |
| Input Voltage | 12 to 48 VDC |
| Input Current | 128.7 mA @ 12 VDC |
| Certifications | |
| Safety | UL 60950-1 |
| EMC | EN 55022/24 |

**7) Network Switch – Qty –**

| Parameter | Specifications |
|---|---|
| Switching Capacity | 1 Gbps |
| No. of ports | 5 |
| Power Supply | DC 5 V / 0.55 A |
| Casing | Plastic |
| Maximum Packet Forwarding Rate | 148.8 kpps |
| 802.3x flow control | Yes |
| Auto MDI/MDIX | Yes |

**8) Content Manager for Control Room –**

| Parameter | Specifications |
|---|---|
| Signage & Content Manager (Software) | Of reputed manufacturers |
| Scaling Options | Should have three types of scaling options:<br>Fit Center: Fit the entire image within the region without changing the aspect ratio<br>Fit_XY: Stretch the entire image to fill the region. (Aspect ratio may be changed.)<br>Center Crop: Scale the image uniformly so that both dimensions (width and height) of the image will be equal to or larger than the corresponding dimension of the region. Aspect ratio of the image is not changed and the region is filled with the image |
| Playlist Automation | Creating a Playlist, Selecting or customizing a template, Placing and editing your content, Testing your Playlist, Setting user preferences, including language and playlist path |
| Key Features | Adding/Deleting new devices, Grouping multiple devices, and synchronizing their playback, Setting a specific playlist for a device or group, Setting a schedule for different devices or groups, Monitoring playback status of each signage device |

**9) Video Wall structure –**

| Parameter | Specifications |
|---|---|
| On Bipole /Unipole | • MS Structure to mount the LED modules with catwalk for maintenance, with housing for Media Player, LED controller, amplifier and Power Distribution Unit, Bipole for anchoring the structure to the ground and raising the base of the LED display to 10 feet above the ground , with lightning arrestor and required earthing<br>• The proposed solution should be capable of auto power On/Off on the pre-defined time slots |

**10) Sound System–**

| Parameter | Specifications |
|---|---|
| Weather proof / Outdoor application | • Speakers to be weather proof for outdoor installation with appropriate IP certifications<br>• Amplifier for the speakers with appropriate housing for outdoor installation |

**क)** उपरोक्त Specifications नुसार LED Wall Screen व इतर साहित्य खरेदी करणेकामी विविध कंपन्यांकडुन ई-मेलद्वारे दर मागविण्यात आलेले असुन काही नावाजलेल्या व स्थानिक कंपन्यांनी खालीलप्रमाणे १३ LED Wall Screen साठी दर कळविलेले आहे.

१) Alpha Digital (Delta) – २९ कोटी + GST
२) Samsang – २५.२ कोटी + GST
३) AGC, Mumbai – २८.५ कोटी + GST
४) सचिन जैन (PlayTechnologies) - २८ कोटी + Tax
५) Video Wall India Pvt.Ltd, Mumbai – १४.६ कोटी + GST

अ.नं. ५ मधील कंपनीचे दर वगळता उर्वरीत कंपन्यांनी दिलेले दर हे समतोल असुन त्यानुसार प्रति LED Wall Screen खरेदी करणेस अंदाजे रक्कम रु. १,५०,००,०००/- मात्र x १६ नगास रक्कम रु. २४,००,००,०००/- मात्र तसेच सर्व LED Wall Screen चे ऑपरेटींगकरीता एक Control Room तयार करणेस अंदाजे रु. ४०,००,०००/- मात्र खर्च येईल.

सबब, संस्थान परिसरात साईभक्तांना श्रीं चे दर्शनाचा लाभ सुलभतेने होणेकरीता उपरोक्त Specification नुसार उच्च दर्जाचे १६ नग LED Wall Screen खरेदी करावयाचे झाल्यास उपरोक्त संदर्भ क्र. १ चे दि. २५/०२/२०१७ रोजीचे मा. व्यवस्थापन समितीचे सभेमध्ये मंजुर केलेल्या रु. १,८९,२८,०००/- मात्र खर्चाचे रक्कमेमध्ये २० ते २२ पटीत वाढ होणार आहे. तसेच उपरोक्त तपशीलातील

**अ** - LED Wall Screen बसविणेची स्थळे निश्चित करणे.

**ब** - LED Wall Screen व उपरोक्त साहित्यांचे Specifications निश्चित करणे.

**क** - स्थळानुसार प्रति LED Wall Screen खरेदी करणेस अंदाजे रक्कम रु. १,५०,००,०००/- मात्र x १६ नगास रक्कम रु.२४,००,००,०००/- मात्र तसेच सर्व LED Wall Screen चे ऑपरेटींगकरीता एक Control Room तयार करणेस अंदाजे रु. ४०,००,०००/- मात्र येणा-या खर्चावर निर्णय होणे अपेक्षित आहे.

तरी, उपरोक्त तपशीलातील अनुक्रमे **"अ"**,**"ब"** व **"क"** प्रमाणे स्थळे व Specification निश्चित करणेस व उच्च दर्जाचे १६ नग LED Wall Screen खरेदी करणेस व Control Room तयार करणेकरीता येणा-या अंदाजे एकत्रित रक्कम रु.२४,४०,००,०००/- मात्र (अक्षरी रक्कम रुपये चोवीस कोटी चाळीस लाख) खर्चाचे निर्णयाकरीता शासनाची मान्यता घेणेस व ई-निवीदाद्वारे निवीदा मागविणेकामी सदरचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करता येईल.

**विभागाचा स्पष्ट अभिप्राय** - उपरोक्त प्रास्ताविकेत व मागणीमध्ये नमुद केल्याप्रमाणे संस्थान परिसरात साईभक्तांना श्रीं चे दर्शनाचा लाभ सुलभतेने होणेकरीता उपरोक्त तपशीलातील अनुक्रमे **"अ"**,**"ब"** व **"क"** प्रमाणे स्थळे व Specification निश्चित करणेस व उच्च दर्जाचे १६ नग LED Wall Screen खरेदी करणेस व Control Room तयार करणेकरीता येणा-या अंदाजे एकत्रित रक्कम रु.२४,४०,००,०००/- मात्र (अक्षरी रक्कम रुपये चोवीस कोटी चाळीस लाख) खर्चाचे निर्णयाकरीता शासनाची मान्यता घेणेस व ई-निवीदाद्वारे निवीद मागविणेकामी सदरचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर सादर करत आहे.

**संस्थान अधिनियम / ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान** - तांत्रिक व आर्थिक व कायदेशीर.

**मागणी** - उपरोक्त प्रास्ताविकेत नमुद केल्याप्रमाणे संस्थान परिसरात साईभक्तांना श्रीं चे दर्शनाचा लाभ सुलभतेने होणेकरीता

१) प्रस्ताव अ.नं. **"अ"** मधील LED Wall Screen बसविणेची स्थळे निश्चित करणे.

२) प्रस्ताव अ.नं. **"ब"** मधील LED Wall Screen व उपरोक्त साहित्यांचे Specifications निश्चित करणे.

३) प्रस्ताव अ.नं. **"क"**- स्थळानुसार प्रति LED Wall Screen खरेदी करणेस अंदाजे रक्कम रु. १,५०,००,०००/- मात्र x १६ नगास रक्कम रु. २४,००,००,०००/- मात्र तसेच सर्व LED Wall Screen चे ऑपरेटींगकरीता एक Control Room तयार करणेस अंदाजे रु. ४०,००,०००/- मात्र येणा-या खर्चावर निर्णय होणे अपेक्षित आहे.

४) प्रस्तावात दिलेले **"अ"**,**"ब"** व **"क"** चे एकुण रक्कम रु.२४,४०,००,०००/- मात्र खर्चास मान्यता मिळणेस.

५) सदर प्रस्तावास शासनाची मान्यता घेण्यास व ई-निवीदाद्वारे निवीदा मागविणेस मान्यता मिळणे.

तरी, सदर प्रस्तावातील उपरोक्त अ.नं. १ ते ५ मधील निर्णयाकरीता सदरचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सविनय सादर.

**निर्णय क्र.८२** **संस्थान परिसरात साईभक्तांना श्रींचे दर्शनाचा लाभ सुलभतेने होणेकरीता LED Wall Screen खरेदी करणेकामी खुप मोठया प्रमाणावर खर्च येणार आहे व सदरहू LED Wall Screen अथवा Digital Wall Screen मोकळया परिसरामध्ये लावण्यात येतात. त्यांचे आयुष्य जास्तीत-जास्त १० वर्षकालावधीचे असते. १० वर्षासाठी एवढा खर्च करणेऐवजी आवश्यक त्यावेळी प्राधान्याने भाडोत्री तत्वावर लावण्यात याव्यात. तसेच देणगी स्वरुपात साईभक्त देण्यास तयार असल्यास त्या स्विकारण्यात याव्यात, असे समिती सदस्यांनी सुचविले.**

**यावेळी मुख्यकार्यकारी अधिकारी यांनी सांगितले की, देणगी स्वरुपात देण्यास साईभक्त तयार आहेत, परंतु त्या स्क्रीनवर ते जाहिरात करण्याची विनंती करतात व आपण आजतागायत संस्थान परिसरामध्ये त्रयस्थांची जाहिरात केलेली नाही.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थान परिसरात साईभक्तांना श्रींचे दर्शनाचा लाभ सुलभतेने होणेकरीता LED Wall Screen खरेदी करणेचा प्रस्ताव तूर्त स्थगित ठेवणेत यावा व आवश्यक त्यावेळी भाडोत्री तत्वावर लावण्यात याव्यात. तसेच LED Wall Screen देणगी स्वरुपात मिळाल्यास त्या बसविणेत याव्यात व त्या स्क्रीनवर सौजन्य म्हणून सदरहू साईभक्तांना जाहिरात करणेसाठी एक स्ट्रीप ठेवणेस परवानगी देण्यात यावी. मात्र कोणत्याही परिस्थितीत सदरहू LED Wall Screen वर जाहिराती दाखविण्यात येऊ नये, असे ठरले.**

(कार्यवाही- सीसीटीव्ही कंट्रोल सेलप्रमुख)

---

**विषय नं.०९** **सेवेच्या कालावधीत साईसेवक म्हणून आलेल्या सेवेकऱ्यांचा अपघाती विमा उतरविणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबां संस्थान व्यवस्थापन समितीच्या निर्णयानुसार दि.२९ जुलै, २०१७ रोजी पासून संस्थानच्या विविध विभागात मोफत सेवा देणेकामी साईसेवक योजना सुरु करण्यात आलेली आहे. या साईसेवकांचा २१ व्यक्तींचा १ गट याप्रमाणे एक वर्षाकरीता एकूण ५२० गट तयार करण्यात आलेले असून, प्रत्येक आठवडयात १० गट (२१० साईसेवक) रविवार ते शनिवार अशी सेवा देत आहेत. दर आठवडयात सेवेच्या कालावधीत ७ दिवस सेवेसाठी आलेल्या २१० साई सेंवकांचा लेखाशाखेमार्फत अपघाती विमा उतरविणेकामी राष्ट्रीयकृत विमा कंपनीचे कोटेशन मागवून न्युनतम दराने साई सेवकांचा उपघाती विमा उतरविण्यात यावा. असा प्रस्ताव कामगार विभागामार्फत दि.१४ नोव्हेंबर, २०१७ रोजी झालेल्या मा.व्यवस्थापन समितीच्या समेसमोर निर्णयार्थ सादर करण्यात आलेला होता. त्यावर पुढीलप्रमाणे निर्णय झालेला आहे.

यावर सविस्तर चर्चा होऊन, सेवेच्या कलावधीत साईसेवक म्हणून आलेल्या सेवेक-यांचा प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे सामुहिक अपघाती विमा उतरविणेकामी राष्ट्रीयकृत विमा कंपन्यांकडून विहीत पध्दतीने दरपत्रेके मागविणेस व त्याकामी येणा-या खर्चास मान्यता देण्यात आली.

उपरोक्त निर्णयान्वये, दि.२९ डिसेंबर, २०१७ रोजी चारही राष्ट्रीयकृत विमा कंपन्यांच्या प्रतिनिधीना सदर प्रस्तावावर सविस्तर चर्चा करणेकामी दुपारी ३ वाजता उपजिल्हाधीकारी यांचे कक्षात बोलविण्यात आले होते. सदर चर्चेदरम्यान उपजिल्हाधिकारी, मुख्य लेखाधिकारी, लेखाधिकारी, कामगार विभागाचे प्रतिनिधी व चारही राष्ट्रीयकृत विमा कंपन्यांचे प्रतिनिधी उपस्थित होते. यावेळी साईसेवक म्हणून आलेल्या सेवेक-यांचा अपघाती विमा उतरविणे संदर्भात सविस्तर चर्चा करण्यात आली. चर्चेदरम्यान अशा प्रकारची सामुहिक विमा पॉलिसी ही नैसर्गिक मृत्यूसाठी उपलब्ध नसल्याने साई सेवकांसाठी जनता अपघाती विमा पॉलिसी घेता येईल, असे विमा कंपन्याच्या प्रतिनिधींनी सुचविले. त्यासाठी पुढीलप्रमाणे अटी असतील-

१. सदर अपघाती विमा पॉलिसी घेण्यासाठी साईसेवकाचे वय १८ वर्षापेक्षा कमी व ७० वर्षापेक्षा जास्त नसावे.

२. सदर अपघाती विमा पॉलिसीची मर्यादा रक्कम रुपये १,००,०००/- मात्र इतकी असेल.

३. सदर अपघाती विमा पॉलिसी एका व्यक्तीसाठी वार्षिक हप्ता रक्कम रु.६०/- भरावा लागेल.

४. अपघाती विमा पॉलिसी घेण्यासाठी प्रत्येक साईसेवकांचे नाव व वय दोन दिवस आगोदर विमा कंपनीला द्यावे लागेल.

५. सदर पॉलिसी ही ०१ वर्ष, ०६ महिने किंवा ०१ महिने अशा कालावधीसाठी घेता येईल. त्यासाठी प्रत्येक पॉलिसीसाठी पुढीलप्रमाणे हप्ते राहतील.

(अ) एक वर्षाकरीता- रु.६०/- (ब) ०६ महिन्याकरीता- रु.४५/- व (क) ०१ महिन्याकरीता- रु.१५/- मात्र साईसेवक योजना हि दि.२९ जुलै, २०१७ पासून सुरु करण्यात आलेली असून, यासाठी ५२० गट असून प्रत्येक गटात २१ साईसेवक याप्रमाणे १०९२० साईसेवक गृहीत धरलेले आहेत. परंतु, आतापर्यंत एकूण १८० गटातील एकूण ३२९७ साईसेवकांनी संस्थानला मोफत सेवा दिलेली आहे. म्हणजेच साधारणतः पाच महिन्यासाठी एकूण ३२९७ साईसेवक तर ०१ वर्षासाठी अंदाजे एकूण ७९१३ साई सेवक संस्थानला मोफत सेवा देतील. तथापि, ५२० गट गृहीत धरल्यास वर्षात एकूण १०९२० साईसेवक यामध्ये सामिल होतील, म्हणजेच महिन्याला ९१० साईसेवकांची जनता अपघाती विमा पॉलिसी घ्यावी लागेल. त्यासाठी ०१ वर्ष, ०६ महिने किंवा ०१ महिने अशा वेगवेगळया कालावधीसाठी जनता अपघाती विमा पॉलिसी घ्यावयाची झाल्यास पुढीलप्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

| अ.नं. | कालावधी | विमा हप्ता रककम रुपये | वार्षिक अपेक्षित खर्च | तीन महिन्याला अपेक्षित खर्च | एक महिन्याला अपेक्षित खर्च |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | ०१ वर्ष | ६०/- | ६,५५,२००/- | १,६३,८००/- | ५४,६००/- |
| ०२ | ०६ महिने | ४५/- | ४,९१,४००/- | १,२२,८५०/- | ४०,९५०/- |
| ०३ | ०१ महिने | १५/- | १,६३,८००/- | ४०,९५०/- | १३,६५०/- |

उपरोक्तप्रमाणे एक वर्षात साधारणतः १०९२० साईसेवकांच्या वेगवेगळया कालावधीकरीता जनता अपघाती विमा पॉलीसी घेणेसाठी उपरोक्त तक्त्यात दर्शविलेप्रमाणे महिन्याला खर्च अपेक्षित आहे. त्यासाठी चारही राष्ट्रीयकृत विमा कंपन्यांकडून डिस्काऊंडबाबत (विमा हप्त्यामध्ये सूट) निविदा मागविता येतील. व जी विमा कंपनी जास्तीत जास्त डिस्काऊंड देईल, त्यांचेकडून साईसेवकांसाठी जनता अपघाती विमा पॉलीसी घेता येईल. सदर पॉलिसी साईसेवकाचा सेवेचा कालावधी संपल्यानंतर तो परत त्याचे गावी जातांना कामगार विभागामार्फत त्याचेकडे सुपूर्त करता येईल.

त्याअनुषंगाने, दर आठवडयाला येणा-या साईसेवकांच्या विमा रकमेला मान्यता घेताना अडचणी आल्यास त्या आठवडयामधील साईसेवकांचा विमा उतरविणे अवघड होईल. त्यासाठी कामगार विभागाने पुढील तीन महिन्यांसाठी येणा-या साईसेवकांच्या नावाच्या (वयासह) यादीस मान्यता घेतानाच, उपरोक्त तक्त्यातील विमा हप्त्याप्रमाणे येणा-या विम्याच्या रकमेस मान्यता घेतल्यास, तेवढी रक्कम लेखाशाखेकडून विमा कंपनीकडे अगाऊ (In Advance) जमा केली जाईल. सदर रकमेतून पुढील तीन महिन्यासाठी दर आठवडयाला येणा-या साईसेवकांचा विमा उतरविता येईल. आगाऊ दिलेल्या रकमेचा दर तीन महिन्याला आढावा घेता येईल.

परंतु, प्रत्येक आठवडयात साईसेवकांची सेवा सुरु होण्याअगोदर कामगार विभागाने, त्या आठवडयात मोफत सेवा देणा-या व ज्या साईसेवकांची विमा पॉलिसी घ्यावयाची आहे त्या साईसेवकांची नांवे व वय दोन दिवस अगोदर विमा कंपनीला देणे आवश्यक आहे. त्याशिवाय विमा पॉलिसी करणे शक्य होणार नाही.

तरी, निर्णय क्र.९६२ अन्वये ठरल्यानुसार, साईसेवकाची टप्याटप्याने जनता अपघाती विमा पॉलिसी उतरविण्यास, दर आठवडयाला मोफत सेवा देण्यासाठी संस्थानकडे येणा-या साईसेवकांचे नावांची यादी कामगार विभागाकडून विमा कंपनीस देण्यास, सदर यादीप्रमाणे लेखाशाखेमार्फत विमा कंपनीस आगाऊ रक्कम अदा करणेस व त्याकामी येणा-या खर्चास स्थायी मान्यता मिळणेसाठी, तसेच संबंधीत साईसेवकाचा सेवा कालावधी पूर्ण झाल्यानंतर संस्थानमार्फत उतरविण्यात आलेली त्यांची विमा पॉलिसी त्याचेकडे सुपुर्द करणेस मान्यता मिळणेसाठी, तसेच साईसेवकांची जनता अपघाती विमा पॉलिसी किती कालावधीसाठी घेण्यात यावी, यावर निर्णय होणेकामी सदर प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर निर्णयार्थ सविनय सादर.

निर्णय क्र.८३ **यावर सविस्तर चर्चा होऊन, सेवेच्या कालावधीत साईसेवक म्हणून आलेल्या सेवेकऱ्यांचा विहीत कार्यपध्दतीने एक वर्षासाठी अपघाती विमा उतरविणेत यावा व यासाठी सेवेकऱ्यांच्या वयाची अट १८ ते ६० वर्ष ठेवणेत यावी, असे ठरले. तसेच याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी/ कामगार अधिकारी)

---

**विषय नं.१०** **सन २०१८-१९ या आर्थिक वर्षाचे मुळ अंदाजपत्रक व सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाचे सुधारित अंदाजपत्रकास मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** (अ) श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी चे कामकाज मा. व्यवस्थापन समिती पहात आहे. अधिनियमातील कलम १७ अन्वये समितीची कर्तव्ये व अधिकार मधील पोटकलम-(२) (क) नुसार वार्षिक अंदाजपत्रकाविषयीची पुढील प्रमाणे तरतुद आहेः "(समिती) विश्वस्तव्यवस्थेच्या जमा-खर्चाचा अंदाज देणारे वार्षिक अंदाजपत्रक तयार करील आणि त्याची एक प्रत राज्य शासनाकडे आणि धर्मादाय आयुक्तांकडे पाठवील."

सदर तरतुदीन्वये विषयांकित अंदाजपत्रक राज्य शासनाकडे आणि धर्मादाय आयुक्ताकडे पाठविणे आवश्यक आहे. सोबत सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाचे सुधारित अंदाजपत्रक व सन २०१८-१९ या आर्थिक वर्षाचे मुळ अंदाजपत्रक, रुग्णालय विभागासह तयार करण्यात आलेले असून त्यातील जमा – खर्चाच्या ठळक तरतुदी पुढीलप्रमाणे आहेतः

अ)

I. **संस्थान (रुग्णालये वगळून) जमेचे अंदाजपत्रक** (आकडे रुपयांत)

| अ.क्रं. | तपशिल | सुधारित अंदाजपत्रक २०१७-१८ | अंदाजपत्रक २०१८-१९ | | वाढ/ घट |
|---|---|---|---|---|---|
| | | | रक्कम | एकूणशी % | % (टक्के) |
| I | **प्रारंभीची शिल्लक** | **२२,०५,००,०००** | **२४,२५,५०,०००** | **२** | **१०** |
| १ | देणगीव्दारे मिळणारी अपेक्षित जमा | ३७१,६७,५०,००० | ४१८,८६,८५,००० | २६ | १३ |
| २ | अपेक्षित महसुली जमा | २०८,४४,५७,००० | २२८,६१,८०,००० | १४ | १० |
| II | **एकूण जमा (१+२) :-** | **५८०,१२,०७,०००** | **६४७,४८,६५,०००** | **४१** | **१२** |
| III | अपेक्षित निर्गंतवणूक | ४७३,३७,०२,५०० | ९२२,९५,८५,००० | ५८ | ९४ |
| | **एकूण अपेक्षित जमा (I+II+III) :-** | **१०७८,५४,०९,५००** | **१५९४,७०,००,०००** | **१००** | **४८** |

II. **संस्थान (रुग्णालये वगळून) खर्चाचे अंदाजपत्रक** (आकडे रुपयांत)

| अ.क्रं. | तपशिल | सुधारित अंदाजपत्रक २०१७-१८ | अंदाजपत्रक २०१८-१९ | | वाढ/घट |
|---|---|---|---|---|---|
| | | | रक्कम | एकूणशी % | %(टक्के) |
| १ | अपेक्षित भांडवली खर्च | ५९६,३९,२०,००० | ७६६,६४,६९,००० | ४८ | **२९** |
| २ | अपेक्षित महसुली खर्च | १३२,८४,५७,००० | १५८,०१,६६,००० | १० | १९ |
| ३ | अपेक्षित किरकोळ खर्च | ५१,९६,२,००० | ६१,१४,७००० | ०० | १८ |
| ४ | न्यासाच्या उदिष्टांवरील अपेक्षित खर्च | २४७,६५,६२,५०० | ५६१,२९,९१,००० | ३५ | १२७ |
| ५ | व्यवस्थापन निधीतील अपेक्षित खर्च | ८५,१५,५८,००० | ९०,१९,९२,००० | ६ | ६ |
| I | **एकूण खर्च (१ ते ५) :-** | **१०६७,२४,५९,५००** | **१५८२,२७,६५,०००** | **९९** | **४८** |
| II | अंतिम शिल्लक | ११,२९,५०,००० | १२,४२,३५,००० | १ | १० |
| | **एकूण अपेक्षित खर्च (I+II) :-** | **१०७८,५४,०९,५००** | **१५९४,७०,००,०००** | **१००** | **४८** |

ब)

I. रुग्णालय विभाग जमेचे अंदाजपत्रक (आकडे रुपयांत)

| अ.क्रं. | तपशिल | सुधारित अंदाजपत्रक २०१७-१८ | अंदाजपत्रक २०१८-१९ | | वाढ/घट |
|---|---|---|---|---|---|
| | | | रक्कम | एकूणशी % | %(टक्के) |
| I | **प्रारंभीची शिल्लक** | **२२,००,०००** | **२२,००,०००** | - | - |
| II | अपेक्षित महसुली जमा | १००,५९,०३,००० | १०१,०८,००,००० | ४१ | ०.५ |
| III | संस्थानकडून वर्ग (तुट) | १२३,४३,२३,५०० | १४६,२५,७०,००० | ५९ | १८ |
| | **एकूण अपेक्षित जमा (I+II+III) :-** | **२२४,२४,२६,५००** | **२४७,५५,७०,०००** | १०० | - |

II. रुग्णालय विभाग खर्चाचे अंदाजपत्रक (आकडे रुपयांत)

| अ.क्रं. | तपशिल | सुधारित अंदाजपत्रक २०१७-१८ | अंदाजपत्रक २०१८-१९ | | वाढ/घट |
|---|---|---|---|---|---|
| | | | रक्कम | एकूणशी % | %(टक्के) |
| १ | अपेक्षित भांडवली खर्च | ४०,६५,००,००० | ६८,२८,००,००० | २८ | ६८ |
| २ | अपेक्षित महसुली खर्च | ८५,७३,३१,५०० | ८७,५१,४०,००० | ३५ | २.०८ |
| ३ | अपेक्षित किरकोळ खर्च | १४,१५,००० | १४,१०,००० | ०.०६ | -०.४ |
| ४ | न्यासाच्या उदिष्टांवरील अपेक्षित खर्च | ९७,४९,८०,००० | ९१,४०,२०,००० | ३७ | -०.६ |
| I | **एकूण खर्च (१ ते ४) :-** | **२२४,०२,२६,५००** | **२४७,३३,७०,०००** | **१००** | |
| II | अंतिम शिल्लक | २२,००,००० | २२,००,००० | - | |
| | **एकूण अपेक्षित खर्च (I+II) :-** | **२२४,२४,२६,५००** | **२४७,५५,७०,०००** | - | |

**ब) अधिनियम २००४** चे कलम २२(२) मधील तरतुदींनुसार “व्यवस्थापन निधीत रक्कम उपलब्ध असल्यास, ती विचारात घेऊन विश्वस्तव्यवस्थेच्या लगतपुर्व वर्षातील अंदाजे स्थूल वार्षिक उत्पन्नाच्या दहा टक्क्यापेक्षा अधिक नसेल इतकी, समितीकडून निश्चित करण्यात येईल एवढी रककम, राज्य शासनाच्या मान्यतेने, दरवर्षी या निधीमध्ये जमा करण्यात येईल. राज्य शासनास, आवश्यक वाटले तर, कोणत्याही वर्षात विश्वस्तव्यवस्थापन निधीतून कोणत्याही अतिरीक्त रक्कमा या निधीत जमा करण्याबद्दल कोणत्याही वेळी निर्देश देईल.”

उपरोक्त तरतुदीप्रमाणे व्यवस्थापन निधीतून गतवर्षाच्या उत्पन्नाच्या १० टक्के खर्च अपेक्षित आहे. सन २०१८- १९ या अंदाजपत्रकामध्ये व्यवस्थापन निधितून होणारा संभाव्य खर्च या तरतुदीच्या अधिन राहून करता येईल.

सन २०१७-१८ व २०१८-१९ या आर्थिक वर्षासाठी व्यवस्थापन निधितून अपेक्षित वाढीव खर्च झाल्यास, शासनाकडे प्रस्ताव दाखल करावा लागेल.

**क)** संस्थानच्या विविध विभागामार्फत साईभक्तांना पुरविण्यात येणा-या पायाभुत सुविधेत वाढ करणे तसेच त्यांना दळणवळण्याच्या विविध सोयी उपलब्ध करुन देणे याकामी नगरपंचायती अंतर्गत कामास व इतर खर्चासाठी अनुदान या शीर्षाखाली खर्च प्रस्तावित केलेला आहे. श्री साईबाबा संस्थान अधिनियमातील कलम २१ अंतर्गत संबंधित विभागाकडून छाननी समितीच्या अभिप्रायानुसार शासनाकडून मंजुरी प्राप्त करुन घेण्याच्या अटीस अधीन राहून अंदाजपत्रकात अनुदान या शीर्षाखाली भरीव तरतुद दर्शविण्यात आली आहे.

**ड)** मा. व्यवस्थापन समितीच्या स्थापनेनंतर विविध मुलभूत व मोठया प्रमाणात भांडवली खर्च-तथा-योजना सुरु करणे प्रस्तावित आहे. आयकर कायदा १९६१ चे कलम १०(२३)(सी)(V) व ११ अन्वये संपुर्ण करमुक्त आहे. कलम ११(२) मधील तरतुदीनुसार प्रत्येक आर्थिक वर्षाच्या उत्पन्नापैकी ८५% उत्पन्न हे त्याच आर्थिक वर्षात खर्च करणे बंधनकारक आहे. तथापी, ते शक्य न झाल्यास शिल्लक राहीलेले अखर्चीत उत्पन्न पुढील पाच वर्षात खर्च करणे बंधनकारक आहे. मागील पाच वर्षातील अखर्चीत उत्पन्न रक्कम **रु.१,२५६ कोटी** इतकी आहे, त्याची आयकर कलम ११(५) अन्वये विहित पध्दतीने गुंतवणुक करण्यात आलेली आहे. शिल्लक अखर्चीत उत्पन्नाचे रुपांतर वेळोवेळी गुंतवणूकांमध्ये करण्यात आले आहे. हे अखर्चीत उत्पन्न चालू वर्षात वा अनुक्रमे पुढील पाच वर्षात खर्च होणे आवश्यक असल्याने भांडवली खर्चामध्ये मोठया प्रमाणात वाढ करणे क्रमप्राप्त झाले आहे.

तथापी, चालू वर्षाच्या उत्पन्नाच्या ८५% अखर्चीत उत्पन्नाचे खर्चाचे प्रमाण फारच कमी आहे. त्यामुळे सदरचे अखर्चीत उत्पन्न वेळेत खर्च न केल्यास त्यावर आयकर लागु होऊन तो भरणे क्रमप्राप्त होईल, अशा

आयकराची रक्कमही मोठी असेल. तरी कृपया याबाबत निर्णय होणे गरजेचे आहे. अपेक्षित जमा व खर्चाच्या अंदाजपत्रकाची विवरणे, परिशिष्ट " अ " व " ब " म्हणून सोबत जोडण्यात आली आहेत.

तरी, संस्थानचे रुग्णालय विभागासह सन २०१८-१९ या आर्थिक वर्षाचे प्रस्तावित मुळ अंदाजपत्रक व सन २०१७-१८ या सुधारित अंदाजपत्रक मान्यतेस्तव मा. व्यवस्थापन समितीच्या सभेसमोर सादर.

**निर्णय क्र.८४** **आजचे सभेसमोर मुख्यलेखाधिकारी यांनी संस्थानचे रुग्णालय विभागासह सन २०१८-१९ या आर्थिक वर्षाचे प्रस्तावित मुळ अंदाजपत्रक व सन २०१७-१८ या सुधारित अंदाजपत्रकाचे सादरीकरण दाखविले व त्याबाबतची माहिती दिली.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, अंदाजपत्रकाचा सखोल अभ्यास करण्यासाठी समिती सदस्यांना आणखी कालावधी देण्यात यावा. त्यामुळे अंदाजपत्रकावर पुढील सभेमध्ये निर्णय घेण्यात यावा.**

(कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)

---

**विषय नं.११** **साईधर्मशाळा विभागाचे उत्तर बाजुकडील मोकळया जागेत साईभक्तांना धार्मिक कार्यक्रमासाठी मंडप उभारणीकामी मान्यता देणे व त्याकामी सोबतचे नियमावलीस मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम २००४ मधील तरतुदः- २१(१) चा (ग)- भक्तांना मंदिरात देवतेच्या दर्शनासाठी व प्रार्थनेसाठी किंवा कोणतीही धार्मिक सेवा किंवा समारंभ करण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे.

प्रस्तावनाः- साईधर्मशाळा विभागात एकुण ६ इमारती असुन त्यापैकी १ इमारत साईबाबा संचलित कनिष्ठ महाविद्यालयास विद्यार्थांचे शैक्षणिक कामासाठी वापरण्यास देण्यात आलेली आहे. साईभक्तांचे निवासासाठी एका इमारतीत ३२ हॉल या प्रमाणे ५ इमारतीमध्ये एकुण १६० हॉल आहेत, त्यामध्ये हॉलमध्ये विद्यार्थांच्या सहली, ग्रुपने येणारे साईभक्त,अंध/अपंग तसेच हॉस्पीटलमधील रुग्णांचे नातेवाईक, जुने साईप्रसादालय परिसरातील साईभक्त इत्यादींची निवासव्यवस्था करण्यात येते.

साईभक्त श्री के.व्ही.रमणी, मॅनेजिंग ट्रस्टी, शिर्डी साई ट्रस्ट, चेन्नई यांनी श्रींच्या दर्शनासाठी येणा-या साईभक्तांची माफक दरात निवास व्यवस्था व्हावी यासाठी १९२ हॉल व येथे उतरणा-या भक्तांना श्रींचे भजन किर्तन व इतर धार्मीक कार्यक्रम करता यावे या उद्येशाने ए' व एफ' इमारतीचे समोरील बाजुस स्टेज देणगी रुपाने बांधून दिलेले आहे.

साई धर्मशाळा विभागामध्ये निवासासाठी आलेल्या साईभक्तांची आकडेवारी खालील प्रमाणे आहे.

| अ.नं. | साल | साई भक्तांची संख्या |
|---|---|---|
| १ | दि.१८/७/२०१३ ते ३१/०३/२०१४ | ३५८५७६ |
| २ | सन २०१४ ते २०१५ | ४८०८८२ |
| ३ | सन २०१५ ते २०१६ | ५९३२४६ |
| ४ | सन २०१६ ते २०१७ | ५३६८८३ |

**प्रस्तावः-** श्रींचे दर्शनासाठी येणारे साईभक्त निवासासाठी हॉलची मागणी करतात तसेच धार्मिक/ सांस्कृतिक कार्यक्रम करण्यासाठी ए' व एफ' इमारतीचे समोरील जागेत तसेच मोठया प्रमाणावर आलेल्या साईभक्तांचे भोजन तसेच धार्मिक/सांस्कृतिक कार्यक्रमाचे व्यवस्थेसाठी उत्तर बाजुचे मोकळया जागेत मंडप टाकण्यासाठी जागेची मागणी करतात.

दि.२८/११/२०१७ रोजी झालेल्या सभेमध्ये मा.मुख्य कार्यकारी अधिकारी साहेब यांनी साईभक्तांचे मागणी नुसार मंडप सुविधासाठी तसेच कार्यक्रमासाठी नियमावली तयार करुन मा. व्यवस्थापन समितीची मान्यता घेणेबाबत निर्देश दिलेले आहेत.

त्यानुसार धार्मिक कार्यक्रमासाठी मंडप व्यवस्था करणेसाठी ध्वनिक्षेपन, विद्युत, बांधकाम, संरक्षण, मंदिर, फायर ॲण्ड सेफ्टी, पाणीपुरवठा, आरोग्य या विभागाचा सहभाग येत असल्याने मंडपासाठी नियमावली तयार करण्यासाठी या विभागामार्फत दि.०२/१२/२०१७ रोजी पत्र देण्यात आले होते त्यानुसार ध्वनिक्षेपन, मंदिर, फायर ॲण्ड सेफ्टी, आरोग्य या विभागाकडुन नियमावली संदर्भात माहिती आलेली असुन ती नियमावलीत सामाविष्ट करण्यात आलेली आहे.

**विभागाचे स्पष्ट मत/अभिप्रायः-** श्रींचे दर्शना करीता येणा-या पालखी पदयात्रीतील साई भक्त तसेच ग्रुपने येणारे साईभक्तांची साई धर्मशाळा विभागामध्ये निवासव्यवस्था करण्यात येते. साईभक्तांनी धार्मिक कार्यक्रम करण्यासाठी 'ए' व 'एफ' इमारतीचे समोरील स्टेज व मोकळया जागेत मंडप तसेच परिसरातील उत्तर बाजुकडील मोकळया जागेत भोजन, धार्मिक/सांस्कृतिक कार्यक्रमाची व्यवस्था करण्यासाठी मंडप टाकण्याची

इच्छा व्यक्त केल्यास त्यांचे कडुन संस्थानचे विहीत नमुन्यातील फॉर्म भरुन घेऊन खालील दर्शविलेले जागे भाडे आकारुन नियमावली नुसार कार्यक्रम करण्यास परवानगी देता येईल.

**१) जागा भाडे व अनामत रक्कम तपशिल खालील प्रमाणे –**

| अ.नं | भक्त संख्या | जागा भाडे | अनामत रक्कम |
|---|---|---|---|
| १ | ५० ते २०० | ११००/- रुपये | ११००/- रुपये |
| २ | २०१ ते १००० | १५००/- रुपये | |
| ३ | १००१ ते २५०० | २५००/- रुपये | |
| ४ | २५०१ ते ५००० | ३५००/- रुपये | |
| ५ | ५००१ ते १०००० पर्यंत | ५०००/- रुपये | |

**टिप** – मंडप टाकण्यासाठी घेण्यात येणा-या जागाभाडे रक्कमेमध्ये प्रत्येक आर्थिक वर्षी ५% वाढ करता येईल. त्यानुसार आयोजका कडुन जागाभाडे व अनामत रक्कम घेता येईल. कार्यक्रम झाल्यानंतर अनामत रक्कम आयोजकास मागनी नुसार परत देता येईल.

तरी प्रस्तावीत केले नुसार वरील प्रमाणे मोकळया जागेत मंडप टाकण्यासाठी जागा भाडे व अनामत रक्कम घेण्यास मान्यता असावी.

**२) मंडप व्यवस्थे करीता नियमावलीः-**

१) संस्थान चल अचल मालमत्तेचे कोणत्याही प्रकारे खराबी किंवा नुकसान करु नये. या बाबत आयोजकाने काळजी घ्यावी अशाप्रकारे खराबी/नुकसान झाल्याचे संस्थान प्रतिनिधीस आढळल्यास त्याची नुकसान भरपाईची रक्कम आयोजकाकडुन खरेदी दरानुसार वसूल करण्यात येईल.

२) आयोजकास संस्थान नियमानुसार मंडप जागाभाडे ठरवुन दिल्यानुसार संस्थान कडे कार्यक्रमा आधी जमा करावे लागेल. तसेच संस्थानचे जागेत कार्यक्रम पुर्ण होईपर्यंत बिगरव्याजी अनामत रक्कम रु.११००/- जमा ठेवावी लागेल. कार्यक्रम रद्द झालेस अनामत रक्कम संस्थान खाती जमा होईल.

३) मंडपासाठी लागणारे साहीत्य आणणे, नेणे व उभारणी करते वेळी साईभक्तांना त्याचा त्रास अथवा त्यापासून इजा होणार नाही, याची काळजी आयोजकाने घ्यावयाची आहे. याबाबत काही अपघात झाल्यास त्यास सर्वस्वी आयोजक जबाबदार राहतील.

४) मंडप व इतर साहीत्य कार्यक्रमाच्यावेळी आणणे व कार्यक्रम संपल्यानंतर त्वरीत घेऊन जाणे ही आयोजकाची जबाबदारी राहील. याकामी संस्थानची व साईभक्तांची गैरसोय होणार नाही याची दक्षता घ्यावी.

५) फ्लोरिंगवर मंडपाकरीता होल्स घेऊ नये. सदर ठिकाणी संबंधीतांनी कार्यक्रमाकरीता आणलेला पंडाल/मंडप कार्यक्रम संपल्यानंतर त्वरीत काढून घ्यावयाचा आहे. परिसराची त्वरीत स्वच्छता करुन द्यावयाची आहे.

६) कार्यक्रमाचे पुर्वी कार्यक्रमाचे ठिकाणी संस्थान मार्फत साफसफाईची कामे करवून देण्यात येतील. कार्यक्रम चालु असतांना व कार्यक्रम संपल्यानंतर साफसफाईसाठी संबंधित ठिकाणी आयोजकाने साफसफाई करुन द्यावी. तसेच कार्यक्रमासह मंडप परीसरात स्वच्छता ठेवावी.

७) पत्रावळी/इतर कचरा हा कचरा कुंडीमध्ये टाकण्यात यावी तसेच कार्यक्रम पुर्ण झालेनंतर मंडपातील कचरा, खरकटे अन्न हे त्वरीत उचलुन त्याची विल्हेवाट लावणेची सर्वस्वी जबाबदारी आयोजकांची राहील.

८) कार्यक्रमाचे वेळी परिसरातील जनरल टॉयलेटचा वापर करणेत यावा.

९) मंडपामध्ये क्षमतेपेक्षा जास्त गर्दी होणार नाही याची आयोजकांनी दक्षता घ्यावी.

१०) मंडपाच्या बाहेरील भक्तांना ध्वनीक्षेपणाच्या आवाजाचा त्रास होणार नाही, तसेच नियमा प्रमाणे संरक्षण विभाग व शिर्डी पोलिस स्टेशन ठरवून देईल त्या क्षमतेपेक्षा (डेसिबल पेक्षा) जास्त आवाज असता कामा नये. याची खबरदारी आयोजकाने घ्यावी.

११) सदर ठिकाणी आणण्यात येणा-या वस्तू/साहीत्य आयोजकाने स्वतःच्या जबाबदारीवर सांभाळावे.

१२) पालखी पदयात्री साईभक्त यांनी मंडप व्यवस्था करतांना त्यांना सदर ठिकाणी साऊंड सिस्टीम व्यवस्था आवश्यक असल्यास स्वखर्चाने/स्वतः करावी.

१३) कार्यक्रमासाठी बॉक्स स्पिकरचा वापर करावा.

१४) कार्यक्रमाचे फोटे व व्हिडीओ चित्रीकरण संस्थान मार्फत केले जाणार नाही.

१५) मंडपा शेजारी फटाके तसेच इतर ज्वलनशिल वस्तुंचा वापर करु नये.

१६) कोणत्याही पालखीला समाधी मंदिर, श्रीव्दारकामाई अथवा संस्थानचे इतर कोणत्याही मंदिरात किंवा परिसरामध्ये प्रवेश देण्यात येणार नाही. पालखीची व्यवस्था मंदिराचे परिसराचे बाहेर करण्यात यावी. पालखीतील फोटो/पादुका यानांच मंदिर परिसरात प्रवेश देण्यात येईल.

१७) पायी येणा-या पदयात्री मंडळांनी संस्थानचे पुर्व परवानगी शिवाय कुठल्याही प्रकारचे धार्मिक/ सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करु नये.

१८) उत्सवाचे व गर्दीचे कालावधीमध्ये व्दारकामाई व मंदिर परिसरामध्ये प्रवेश दिला जाणार नाही. उत्सवामध्ये व गर्दीचे कालावधीत व्दारकामाई व समाधी मंदिर परिसरामध्ये जाण्याचा आग्रह धरु नये.

१९) आयोजकान श्रीं ची धुप आरती सुरु झाल्यापासुन संपेपर्यंत कार्यक्रम बंद ठेवावा व रात्रौ १०.३० चे अगोदर संपवावा आरती सुरु झालेनंतर संपेपर्यंतच्या कालावधीत कार्यक्रम बंद ठेवावा.

२०) ५ केव्हीए पेक्षा जास्त इलेक्ट्रीकल लोड असल्यास वीज पुरवठयाची पर्यायी व्यवस्था जनरेटर संच आणून आयोजकास स्वतः करावी लागेल.

२१) ५ केव्हीए पेक्षा कमी इलेक्ट्रीकल लोड घ्यावयाचा असल्यास वीजपुरवठयासाठी अनामत रक्कम रुपये ३०००/-मात्र संस्थानचे विद्युत विभाग/लेखाशाखेत जमा करुन अनामत रक्कम जमा केल्याची पावती विद्युत विभागाचे धर्मशाळा विभागाकडील कार्यालयात आणून दाखवावी व विद्युत पुरवठा जोडून घ्यावा. मिटर प्रमाणे होणारा विद्युत वापराचा सेवाआकार अनामत रकमेतुन वसुल केला जाईल.

२२) कार्यक्रमास संस्थान मार्फत कोणतीही लाईटची उपकरणे, लाईटचे साहित्य,वायरिंग मटेरीअल, शिडया वगैरे पुरविले जाणार नाही. आयोजकाने सदरची व्यवस्था स्वतःकरावयाची आहे.

२३) कार्यक्रमास वापरली जाणारी लाईटची उपकरणे तसेच ध्वनीक्षेपणाची उपकरणे ISI प्रमाणित व नामांकित कंपन्याची असावीत.

तसेच ती संबंधीत विद्युत पर्यवेक्षक यांचे नियत्रणानुसार जोडावीत. अर्थ लिकेज असलेली उपकरणे विद्युत प्रवाहास जोडु नयेत.

२४) सदर कार्यक्रमाचे वेळी कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी आयोजकाची राहील.

२५) सदर कार्यक्रमाचे वेळी मंडपात काही वाद उपस्थित झाल्यास तो राहाता कोर्टाचे न्यायकक्षेत राहील.

२६) उपरोक्त नियमावलीमध्ये बदल करणे, त्यामध्ये वाढ करणे किंवा अंशतः बदल करणे बाबतचा अधिकार संस्थान व्यवस्थापनाने राखून ठेवला आहे.

२७) आयोजकांची अथवा कार्यक्रमासाठी येणारांची वाहने संस्थानने नेमून दिलेल्या कार पार्किंगचे जागेतच पार्क करावी.

२८) कार्यक्रमासाठी आलेल्या व्यक्तींमधील काही उपद्रवी इसमांकडून साईभक्तांना त्रास झाल्यास कार्यक्रम ताबडतोब बंद करावा लागेल व त्याची जबाबदारी आयोजकाची राहील.

२९) संदर्भीत कार्यक्रमासाठी आवश्यक त्या सर्व परवानग्या तसेच पोलीस स्टेशनची परवानगी घेणेची जबाबदारी ही सर्वस्वी आयोजकावर राहील.

३०) आयोजकाचे मागणी नुसार मंडपासाठी जागा उपलब्ध करुन देणे अथवा न देणेचा अधिकार व हक्क संस्थान व्यवस्थापनाने राखून ठेवला आहे.

तरी या विभागात थांबणा-या/ उतरणा-या साईभक्तांना मंडपामध्ये कार्यक्रम करण्यास उत्तर बाजुकडील मोकळया जागेत भोजन, धार्मिक/ सांस्कृतिक कार्यक्रमासाठी मंडप व्यवस्था करणेकामी आयोजकास परवानगी देणे, त्यांचेकडुन अनामत रक्कम, तसेच जागाभाडे स्विकारणे व याकामी तयार केलेल्या नियमावलीस मा.व्यवस्थापन समितीची मान्यता घेणेकामी सदरचा विषय मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर.

**निर्णय क्र.८५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, साईधर्मशाळा विभागाचे उत्तर बाजुकडील मोकळया जागेत साईभक्तांना धार्मिक कार्यक्रमासाठी मंडप उभारणीकामी प्रस्तावित केलेल्या नियमावलीचे अवलोकन करणेत येऊन, त्यास मान्यता देण्यात आली. तसेच साईभक्तांकडून सदरहू जागेचे प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे जागेचा सेवाआकार व अनामत रक्कम स्विकारणेत यावे, असे ठरले.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, साईधर्मशाळा)

---

**विषय नं.१२** **मंदिर परिसरातील साफसफाईच्या कामांसाठी मशिनरी खरेदी करण्याऐवजी सदर कामे आऊटसोर्सिंग पध्दतीने करण्यास मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** आरोग्य विभागामार्फत साफसफाईचे काम ३ शिफ्ट मध्ये २४ तास चालू असते त्यामध्ये मंदिर व मंदिर परिसर, पिंपळवाडी रोड दर्शन रांग आतील बाजू, शांतीनिवास, भक्तीनिवास इमारत, साईप्रसाद निवासस्थान इमारत व परिसर, साईबाबा भक्त निवासस्थान इमारत व परिसर, वाहन विभाग परिसर, शैक्षणिक संकुले, साईउद्यान, मंगल कार्यालय इमारत व परिसर, शांतीनिकेतन, नव्याने संस्थानचे ताब्यात मिळालेल्या साईनिवारा निमगाव येथील इमारत तसेच कर्मचारी/अधिकारी निवासस्थाने परिसर या ठिकाणांची साफसफाई केली जाते. तसेच शिर्डी नगर पंचायत यांचे मागणीनुसार नगर पंचायत हद्दीतील पिंपळवाडी रोड (मनोजकुमार पथ) नगर-मनमाड रोड (लक्ष्मीनगर ते साईआश्रम पर्यंत) येथे कर्मचारी नेमून साफसफाई केली जाते.

दि. १६/०७/२०१६ रोजी तत्कालिन मा.का.अ.सो. यांनी मंदिर परिसरात राऊंड घेतला त्यावेळी मंदिर परिसररतील साफ सफाईची कामे आऊटसोर्सिंग पध्दतीने करणेबाबत सविस्तर प्रस्ताव सादर करावा, असे निर्देश दिले. त्यानुसार मंदिर परिसरातील साफसफाईची कामे आऊटसोर्स पध्दतीने करणेबाबतचा प्रस्ताव दि. ०९/१०/२०१६ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेमध्ये विषय नं. ३५ ने ठेवण्यात आला त्यावर निर्णय क्र. ७२२ ने सविस्तर चर्चा होऊन, मंदिर परिसरातील साफसफाईची कामे आऊटसोर्सिंग पध्दतीने करणेबाबतचा उपरोक्त प्रस्ताव अमान्य करण्यात आला. तसेच सध्या मनुष्यबळ व्यवस्थापनाचे काम चालू असून त्याबाबतचा अहवाल आल्यानंतर आवश्यकता भासल्यास फेर-प्रस्ताव सादर करणेत यावा असे ठरले.

सध्या मंदिर परिसरातील साफसफाईचे काम कर्मचा-यांमार्फत केले जात आहे. पुर्वीपेक्षा सध्या भक्तांच्या गर्दीचे प्रमाण जास्त आहे. मंदिर परिसरात फुलांच्या पाकळया, झाडांची पाने पडत असतात तसेच साईभक्तांसाठी दर्शनानंतर मोफत बुंदी प्रसाद मंदिर परिसरात वाटप केले जाते त्यामुळे मंदिर परिसारत फरशीवर बुंदी सांडून फरशी चिकट होत आहे. दर्शन रांगेत साईभक्तांना मोफत चहा-बिस्किटे वाटप करण्यात येत आहेत सदर ठिकाणची फरशी मार्बलची असल्याने ती चिकट होत आहे त्यामुळे स्वच्छता करताना वेळ लागतो. याबाबत मा. अध्यक्ष महोदय यांनी राऊंड घेतेवेळी मशिनरी खरेदी करणेबाबत सुचना दिलेल्या आहेत. या सर्व बाबींचा विचार करुन साईभक्तांना उच्च दर्जाची सेवा देणेकरिता मंदिर परिसर आतील व बाहेरील बाजु, दर्शनरांग तसेच ५०० रुम साफसफाईसाठी मशिनरी खरेदी करणेकामी सदरचा विषय मा. व्यवस्थापन समितीचे दि. २२/१२/२०१६ रोजीचे सभेपुढे विषय नं. १९ ने सादर करण्यात आला. त्यावर निर्णय क्र. ९२३ नुसार प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे अद्यावत मशिनरी खरेदी करणेकामी विहित पध्दतीने ई-निविदा मागविणेस व त्याकामी येणा-या सर्वसमावेशक खर्चास मान्यता देण्यात आली. सदर मशिनरीची खरेदी ही तांत्रिक स्वरुपाची असल्याने मॅकेनिकल विभागाचे मार्गदर्शनाने खरेदी विभागामार्फत ई-निविदा पध्दतीने खरेदीची पुढील कार्यवाही करणेकामी दि. ०३/०१/२०१७ रोजीचे पत्राने आवश्यक कागदपत्रासह खरेदीचा प्रस्ताव खरेदी विभागाकडे पाठविण्यात आलेला होता. खरेदी विभागाने दि. ३१/०३/२०१७ रोजी सदरचा प्रस्ताव (जाहिरात, ई-निविदा अटी शर्ती BOQ सह) मा. कार्यकारी अधिकारी महोदया यांचे मान्यतेसाठी सादर केला असता त्यावर मा. वरिष्ठांचे सुचनेनुसार एकाच कंपनीचे Specifications आहेत Common Specifications टाकुन सदर विषय मा. व्यवस्थापन समिती समोर सादर करावा व किमान ३ ब्रँड नमुद करावेत असे निर्देश झाले.

त्यासअनुसरुन उपरोक्त निर्देशाप्रमाणे पुर्तता करुन सदर विषय मा.व्यवस्थापन समितीचे दि. २५/०७/२०१७ रोजीचे सभेमध्ये विषय नं. ४४ ने फेर सादर करण्यात आला त्यावर निर्णय क्र. ५६४ ने सदरचे विषयास मान्यता देण्यात आली.

सदरहू मशिनरी खरेदी करणेस मा. व्यवस्थापन समितीची मान्यता मिळालेनंतर मशिनरीची ई-निविदा पध्दतीने खरेदीची कार्यवाही करणेकरिता खरेदी विभागाकडे प्रस्ताव सादर करण्यात आला. त्यास अनुसरुन खरेदी विभागामार्फत मंदिर परिसर, दर्शन रांग व साईबाबा भक्त निवासस्थान येथील साफसफाईकामी मशिनरी खरेदीसाठी ई-निविदा मागविणेकामी प्रस्ताव तयार करण्यात आला होता. तथापि खरेदी विभागाने सदर प्रस्ताव दि. १५/०९/२०१७ रोजीचे निविदा दस्तऐवज तयार करणेसाठीचे समितीत निविदा दस्तऐवजास मान्यता मिळणेकामी सादर केला असता. त्यावर चर्चा होऊन सदर मशिनरी खरेदीकामी येणारा खर्च, मशिन मेन्टेनन्स खर्च तसेच प्रशिक्षित कर्मचारी उपलब्धता वगैरे बाबी विचारात घेता सदर मशिनरी खरेदी करणेऐवजी ५०० रुम व मंदिर परिसराची स्वच्छता करणेसाठी outsource Agency नेमून त्या एजन्सीकडून मशिनरीव्दारे काम करुन घेणेबाबत प्रस्ताव सादर करण्याचे ठरले आहे. याबाबत जा.नं.एसएसएस/वशी-खरेदी/२८७३/२०१७ दि. १४/१०/२०१७ ने

खेरदी विभागाने कळविले आहे. त्यास अनुसरुन आऊटसोर्स पध्दतीने करावयाचे कामाबाबतचे तपशिलवार माहिति पुढील प्रमाणे आहे.

**आऊटसोर्स पध्दतीने करावयाचे कामाबाबत तपशिलवार विवरण खलीलप्रमाणे-**

| बांधकामाचे क्षेत्रफळ (१३५४०.७१ चौ.मी.) | मोकळया जागेचे क्षेत्रफळ(१४६०९.९७ चौ.मी.) |
|---|---|
| **मंदिर परिसरातील समाविष्ट ठिकाणे**<br>समाधी मंदिर, नंदी समोरील हॉल्स (सभामंडप ते नंदीपर्यंत) भुयारी दर्शनरांग, दर्शन हॉल (भक्ती निवास इमारत तळमजला, १ ला मजला, शांती निवास इमारत तळमजला, १ला मजला, २ मजला) लेखाशाखा कार्यालय (भ. नि. ३ रा मजला) , मंदिर परिसरातील मिटींग हॉल, सर्व काऊंटर्स व कार्यालये (टॉयलेट बाथरुम सह) | **मंदिर परिसरातील समाविष्ट ठिकाणे**<br>गुरुस्थान परिसर( समाधिमंदिर पश्चिम गेट ते ध्यानमंदिर पर्यंत) समाधि मंदिर उत्तर रोड, कारंजा पिरसर,लेंडीबाग परिसर, दत्त मंदिर परिसर, मिटींग हॉल परिसर, मुंजाबा रोड, देणगी काऊंटर नं.२ परिसर शांती निवास रोड, शनि<br>मंदिर रोड, जुनी मराठी शाळा रोड-१६ गुंठे मारुती मंदिर परिसर, चावडी परिसर,व्दारकामाई रोड ते गेट नं.४ पर्यंत, पिंपळवाडी रोड आतील बाजू<br>दर्शन रांग, (गेट नं. १ ते २ पर्यंतची दर्शन रांग) गेट नं. १ ते ५ पर्यंतचा फुटपाथ. |

**अ) आरोग्य विभागाकरिता मंजूर आकृतीबंध खालीलप्रमाणे आहे.**

| अ.नं. | पदनाम | मंजूर पदसंख्या | | भरलेली पदसंख्या | | | रिक्त पदसंख्या | | एकुण रिक्त पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | स्थायी | कंत्राटी | स्थायी | कंत्राटी | आऊटसोर्स | स्थायी | कंत्राटी | |
| १ | ३ | | ४ | | ५ | | | ६ | ७ |
| ०१ | विभाग प्रमुख | १ | - | - | - | - | १ | - | १ |
| ०२ | उप विभाग प्रमुख | १ | - | - | - | - | १ | - | १ |
| ०३ | कनिष्ठ पर्यवेक्षक | ५ | २ | १ | - | - | ४ | २ | ६ |
| ०४ | लिपीक-टंकलेखक | ३ | - | २ | - | - | १ | - | १ |
| ०५ | मुकादम | १० | १० | - | ४ | - | १० | ६ | १६ |
| ०६ | सफाई कामगार | १७३ | २९० | १४९ | २०१ | - | २४ | ८९ | ११३ |
| | **एकूण** | **१९३** | **३०२** | **१५२** | **२०५** | - | **४१** | **९७** | **१३८** |

सध्या आरोग्य विभागाकडे १४९ कायम कर्मचारी व २०१ कंत्राटी अकुशल व ४ कुशल कर्मचारी कार्यरत आहेत. मंजूर आकृतीबंधातील ज्या इमारतीची साफसफाईची कामे आऊटसोर्समार्फत चालू आहेत. ती कर्मचारी संख्या २१७+४ मुकादम अशी एकुण २२१ इतकी आहे. मंदिर व त्याजवळील परिसर साफसफाईकामी प्रतिदिनी १०७ कायम कर्मचारी कार्यरत असून त्यांचे रजा/सुट्टया सोडवणेकामी १८ असे एकुण १२५ कायम कर्मचारी कार्यरत आहेत. त्यांचे वेतनापोटी माहे सप्टेंबर २०१७ साठी खालीलप्रमाणे खर्च आला आहे.

**अ) १२५ कायम कर्मचारी वेतनावरील माहे सप्टेंबर २०१७ खर्च**

| अ.नं. | मंदिर व त्याजवळील परिसर फाईकामी नेमण्यात येणारी कर्मचारी संख्या | दरमहा वेतन (सप्टेंबर २०१७) | वेतनावरील वार्षिक खर्च १२+१ (सानुग्रह अनुदानासह ) |
|---|---|---|---|
| १. | १२५ | २६,८१,५३४/- | ३,४८,५९,९४२/- |
| | | एकुण रुपये | **३,४८,५९,९४२/-** |

**ब) मंदिर परिसर स्वच्छता साहित्य कामी आवश्यक वार्षिक खर्च**

| अ. नं. | तपशिल | वार्षिक खर्च |
|---|---|---|
| १. | मंदिर व त्याजवळील परिसर सफाईकामी वापरण्यात येणा-या साहित्याकामीचा अंदाजे खर्च | रु. ९, ०३,०००/- |

**अ+ ब मिळून एकुण खर्च**

| अ. नं. | तपशिल | एकुण खर्च |
|---|---|---|
| १. | अ) कर्मचारी वेतनावरील खर्च | ३,४८,५९,९४२/- |
| २. | ब ) स्वच्छता साहित्य कामीचा खर्च | ९, १३,०००/- |
| | **एकुण वार्षिक खर्च** | **३,५७,७२,९४२/-** |

एकुण वार्षिक खर्च रु. ३,५७,७२,९४२/- (अक्षरी रुपये तीन कोटी सत्तावन्न लाख बाहत्तर हजार नऊशे बेचाळीस मात्र) मंदिर परिसर, दर्शन हॉल्स व पिंपळवाडी रोडची दर्शन रांग येथील साफसफाईची कामे आऊटसोर्सिंग पध्दतीने करणे प्रस्तावित आहे. कामाचे पॉईंटनुसार सध्या प्रतिदिनी कायम कर्मचारी संख्या तपशिलवार तक्ता पुढीलप्रमाणे

| अ.नं. | कामाचे ठिकाण | ४ ते १२ | १२ ते ८ | ८ ते ४ | जनरल | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|
| | **अ) मंदिर परिसर** | | | | | |
| १. | समाधि मंदिर | ४ | ४ | २ | - | १० |
| २. | गुरुस्थान परिसर | २ | २ | १ | - | ५ |
| ३. | मेन रोड समाधि मंदिर उत्तर रोड | २ | २ | १ | - | ५ |
| ४. | नारळी गेट | १ | १ | - | - | २ |
| ५. | कारंजा परिसर | २ | २ | १ | - | ५ |
| ६. | लेंडीबाग | २ | २ | - | - | ४ |
| ७. | दत्त मंदिर परिसर | १ | १ | - | - | २ |
| ८. | मिटींग हॉल व परिसर | २ | २ | १ | - | ५ |
| ९. | गेट नं.१ ते ५ समोरील जाळी | १ | १ | - | - | २ |
| १०. | मुंजाबा परिसर | २ | २ | १ | - | ५ |
| ११. | देणगी काऊटंर नं. २ चा परिसर | १ | १ | - | - | २ |
| १२. | शांती निवास रोड | १ | १ | १ | - | ३ |
| १३. | शनि मंदिर रोड | १ | १ | - | - | २ |
| १४. | सरंजामे बाग/ अभिषेक हॉल | १ | १ | - | - | २ |
| १५. | जुनी मराठी शाळा रोड (१६ गुंठे) साई कॉम्लेक्स समोर | १ | १ | - | - | २ |
| १६. | मारुती मंदिर,चावडी व व्दा.रोड, सेवाधाम इमारत | ४ | ४ | २ | - | १० |
| १७. | कचरा वाहतुक (कचरा कुंडीतील कचरा गोळा करणे) | २ | २ | - | - | ४ |
| १८. | किटकनाशक औषध फवारणी | - | - | - | १ | १ |
| १९. | ॲसीड पावडर/ ड्रेनेज साफसफाई कामी | - | - | - | ३ | ३ |
| **ब** | **दर्शन रांग** | | | | | |
| | १)शांती निवास तळमाळा (टॉयलेट ब्लॉकसह) | ४ | ४ | १ | - | ९ |
| | २)शांती निवास १ ला माळा (टॉयलेट ब्लॉकसह) | १ | १ | - | - | २ |
| | ३)शांतीनिवास इमारत प्रशासकीय कार्यालय (टॉयलेट ब्लॉकसह) | २ | २ | - | - | ४ |
| | ४)भक्त निवास दर्शन रांग तळमाळा (टॉयलेट ब्लॉकसह) | २ | २ | १ | - | ५ |
| | ५)भक्त निवासदर्शन रांग १ ला माळा (टॉयलेट ब्लॉकसह) | १ | १ | - | - | २ |
| | ६)पिंपळवाडी रोड दर्शन रांग ( आतील बाजू) | ३ | ३ | - | - | ६ |
| | **एकुण -** | ४३ | ४३ | १२ | ४ | **१०२** |
| **क** | **मुकादम** | | | | | |
| | मुकादम अ करीता (अ. नं.१ ते १९) | १ | १ | १ | - | ३ |
| | मुकादम ब करीता (अ. नं.१ ते ६ ) | १ | १ | - | - | २ |
| | **एकुण -** | ४५ | ४५ | १३ | ४ | **१०७** |
| | **रजा/सुट्टया सोडवणे कामी प्रमाण ६.१** | | | | | **१८** |
| | **एकुण -** | | | | | **१२५** |

उपरोक्त प्रमाणे कामे आऊट सोर्सिंगने दिल्यास कर्मचा-यांचे वेतनावर खालील प्रमाणे खर्च येईल.

अ) कर्मचारी वेतन खर्च (सर्व करांसहित)

| अ.नं. | एकूण कुशल/अकुशल कर्मचारी | किमान वेतन दर प्रति दिन प्रती कर्मचारी | प्रति दिन वेतन खर्च | वार्षिक वेतन खर्च (३६५ दिवसांकरिता ) |
|---|---|---|---|---|
| १. | ५ कुशल कर्मचारी | ६०७.९९ | ३०३९.९५ | ११०९५८१.७५ |
| २. | १०२ अकुशल कर्मचारी | ५५०.४७ | ५६१४७.९४ | २०४९३९९८.१० |
| | | एकुण | | २१६०३५७९.८५ |
| | | | पुर्णांकित | **२,१६,०३,५८०/-** |

ब) कंत्राटदाराने स्वच्छतेकामी करावयाचा आवश्यक स्वच्छता साहित्य खर्च

| अ. नं. | तपशिल | वार्षिक खर्च |
|---|---|---|
| १. | स्वच्छता साहित्यावर येणारा अंदाजे वार्षिक खर्च | **९,१३,०००/-** |
| | **अंदाजे एकुण वार्षिक खर्च** | **९,१३,०००/-** |

कंत्राटदारास स्वच्छतेकामी आवश्यक लागणा-या यंत्रसामुग्रीचा अंदाजे खर्च खालीलप्रमाणे

क) स्वच्छतेकरिता आवश्यक मशिनरी खर्च (अंदाजे)

| अ.नं. | तपशील | कंपनीचे नाव | मशीन किंमत/ प्रति नग |
|---|---|---|---|
| १ | ऑटो स्क्रबर ड्रायर | ४५५ Taski | ३,३८,०००=०० |
| २ | स्मॉल ऑटो स्क्रबर | ३५० Taski | २,७०,०००=०० |
| ३ | हाय प्रेशर जेट | LMX | २,५०,०००=०० |
| ४ | वेट अॅण्ड ड्राय स्कबर | Taski | ६५,०००=०० |
| ५ | सिंगल डिस्क स्क्रब | Taski | १,७०,०००=०० |
| ६ | ड्राय व्हॅक्क्युम क्लिनर | Indian made | ५०,०००=०० |
| ७ | फ्लिपर | ureka Forbes | २५,०००=०० |
| | | **एकुण-** | **११,६८,०००=००** |

ड) मशिनरी साठी आवश्यक साहित्य खर्च (अंदाजे)

| अ.नं. | तपशील | कंपनीचे नाव | मशीन किंमत/ प्रति नग |
|---|---|---|---|
| १ | ग्लास क्लिनिंग किट | ०१ | १०००=०० |
| २ | टेलीस्कोपीक पोल | ०१ | ६,५००=०० |
| ३ | सेफ्टी लॅडर (३५ फुटी) | ०१ | ३०,०००=०० |
| ४ | गारबेज ट्रॉली | ०१ | ८,०००=०० |
| ५ | स्कॅब बिन्स (मोठे) | ०१ | १०००=०० |
| ६ | स्कॅब बिन्स (लहान) | ०१ | ८००=०० |
| | | **एकुण-** | **४७३००=००** |

**कंत्राटदाराला येणारा अ + ब + क + ड मिळून एकुण खर्च –**

| अ. नं. | तपशिल | एकुण खर्च |
|---|---|---|
| १. | अ) वेतनावरील खर्च | २,१६,०३,५८०/- |
| २. | ब) स्वच्छता साहित्यावर येणारा अंदाजे वार्षिक खर्च | ९,१३,०००/- |
| ३. | क) स्वच्छतेकरिता आवश्यक मशिनरी खर्च (अंदाजे) | ११,६८,०००/- |
| ४. | ड) मशिनरी साठी आवश्यक साहित्य खर्च (अंदाजे) | ४७,३००/- |
| | **एकुण खर्च** | **२,३७,३१,८८०/-** |

मंदिर परिसर, दर्शन हॉल्स व पिंपळवाडी रोडची दर्शन रांग येथील साफ सफाईची कामे करण्यासाठी सध्या येत असलेला खर्च व आऊटसोर्सिंग पध्दतीने केल्यास येणारा खर्च यांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

**एकुण खर्चाचा तुलनात्मक तक्ता**

| अ.नं. | सध्याचा एकुण खर्च वार्षिक | रुपये | आऊट सोर्सिंग नंतरचा एकुण खर्च (वार्षिक) | रुपये |
|---|---|---|---|---|
| १ | कायम कर्मचारी | ३,४८,५९,९४२/- | अ + ब + क + ड खर्च | २,३७,३१,८८०/- |
| २ | स्वच्छता साहित्य खर्च | ९,१३,०००/- | | |
| | एकुण- | ३,५७,७२,९४२/- | एकुण | २,३७,३१,८८०/- |

**वरील तक्त्याचे अवलोकन केले असता**

| अ. नं. | तपशिल | खर्च रक्कम रुपये |
|---|---|---|
| १. | संस्थान मार्फत साफसफाईची कामे केल्यास होणारा वेतनावरील खर्च | ३,५७,७२,९४२/- |
| २. | आऊट सोर्सिंगने दिल्यानंतर होणारा वार्षिक खर्च | २,३७,३१,८८०/- |

तरी सध्या मंदिर परिसर साफसफाईकामी कर्मचारी वेतनापोटी व साहित्य खर्च एकुण रुपये ३,५७,७२,९४२/- खर्च येतो. व सदर ठिकाणची साफसफाईची कामे आऊट सोर्सिंगला दिल्यास त्यासाठी रुपये २,३७,३१,८८०/-/-इतका खर्च येईल. म्हणजेच वार्षिक रु. १,२०,४१,०६२/- इतकी बचत होईल. तथापि सदर कामे आऊटसोर्सिंगने करावयाची झाल्यास या विभागाकडील मंदिर परिसर साफसफाई कामी नेमण्यात येणारे १२५ सफाई कर्मचारी इतर विभागाकडे वर्ग करावे लागतील. तसेच साईबाबा भक्त निवासस्थान (५०० रुम ) येथील साफसफाईची कामे करण्यासाठी outsource Agency नेमणेबाबतचा प्रस्ताव इतर विभागाप्रमाणे (व्दारावती, प्रसादालय, रुग्णालये, साईआश्रम १,२) साईबाबा भक्तनिवासस्थान यांना त्यांचेमार्फत स्वतंत्र प्रस्ताव सादर करावा लागेल तसेच तेथील कामासाठी वापरण्यात येणारे कंत्राटी अकुशल कर्मचारी इतर विभागाकडे वर्ग करावे लागतील.

मा. व्यवस्थापन समितीचे दि. २२/१२/२०१६ रोजीचे सभेत निर्णय क्र. ९२३ ने अद्यावत मशिनरी खरेदी करणेकामी विहित पध्दतीने ई-निविदा मागविणेस व त्याकामी येणा-या सर्वसमावेशक खर्चास मान्यता देण्यात आलेली असल्याने तसेच सदरचा विषय मा. व्यवस्थापन समितीचे दि. २५/०७/२०१७ रोजीचे सभेत फेर सादर करण्यात आला त्यावर निर्णय क्र. ५६४ ने सदरचे विषयास मान्यता देण्यात आलेली असल्याने सदरहू निर्णय क्र. ९२३ व ५६४ मा. व्यवस्थापन समितीचे सभेत रद्द करावे लागतील

**अ)** मंदिर परिसर व ५०० रुम येथील साफसफाई कामी मशिनरी खरेदी करणेबाबतचे मा. व्यवस्थापन समितीचे दि.२२/१२/२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ९२३ व दि. २५/०७/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ५६४ हे दोन्ही मशिनरी खरेदी करणेबाबतचे निर्णय मा.व्यवस्थापन समितीचे सभेत रद्द करावे लागतील.

**ब)** प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे कार्यालयीन कर्मचा-यां व्यतीरीक्त १२५ सफाई कर्मचारी आस्थापना/ कामगार विभागामार्फत इतर विभागात वर्ग करावे लागतील. तसेच साईबाबा भक्तनिवासस्थान यांचे मार्फत तेथील साफसफाईची कामे आऊटसोर्स पध्दतीने करणेबाबतचा प्रस्ताव सादर केलेनंतर तेथे साफसफाई करणेकामी लावण्यात येणारे कंत्राटी अकुशल कर्मचारीही इतर विभागाकडे वर्ग करावे लागतील.

**क)** मा. व्यवस्थापन समितीचे मान्यतेनंतर जनसंपर्क कार्यालयामार्फत जाहिरात वर्तमान पत्रात व संस्थानचे वेबसाईटवर प्रसिध्द करुन ई-टेंडर पध्दतीने निविदा मागवाव्या लागतील.

**ड)** आऊट सोर्स पध्दतीने कामे करुन घेणेस तथा त्यासाठी येणा-या वार्षिक अंदाजे रु. २,३७,३१,८८०/- (अक्षरी रुपये दोन कोटी सदोतिस लाख एकतीस हजार आठशे ऐंशी) मात्रचे खर्चास व नियमानुसार वेळोवेळी देय्य होणारे कर अदा करावे लागतील.

तरी उपरोक्त अ, ब, क, ड प्रमाणेचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समीतीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.८६** यावर सविस्तर चर्चा होऊन, **मंदिर परिसरातील साफसफाईच्या कामे विहीत कार्यपध्दतीचा अवलंब करणेत येऊन, आऊटसोर्सिंग पध्दतीने करुण घेण्यास व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रु.२,३७,३१,८८०/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली. तसेच मंदिर परिसरातील साफसफाईच्या कामांसाठी नवीन एजन्सीची नेमणूक केल्यानंतर तेथे सध्या कार्यरत असलेल्या सफाई कर्मचाऱ्यांच्या इतरत्र बदल्या करणेत याव्यात, असे ठरले.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक,आरोग्य विभाग)

---

**विषय नं.१३** **वाहन विभागाकडील ११० वाहनांचा वार्षिक विमा नुतनीकरण करणोकामी राष्ट्रीयकृत विमा कंपन्यांकडून दरपत्रके मागविणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम २००४ मधील तरतुदः-१७ (१)** मध्ये राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधिन राहुन संस्थान विश्‍वस्तव्यवस्थेची मालमत्तेची व कामाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, भक्तगंणांना आवश्यकत्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये, विश्‍वस्तव्यवस्थेचा कारभार  ज्या प्रयोजनार्थ चालववयाचा आहे, ती उद्दीष्टे सरध्य करणेसाठी विश्‍वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे ही समितीची कर्तव्ये असतील ," असे नमुद केलेले आहे.

**अधिनियम २००४ मधील तरतुदः-१७ (२) (झ)** मध्ये सर्वसाधारणपणे विश्‍वस्तव्यवस्थेची मालमत्ता व तिचे कामकाज यांचे योग्य प्रकारे व्यवस्थापन, देखभाल व प्रशासन करण्याच्या प्रयोजनांसाठी आवश्यक असतील अशा सर्व गोष्टी करील असे नमुद आहे.

**प्रस्ताविक:-** संस्थानचे १०६ वाहनांचा दि.०१/०४/२०१७ ते दि.३१/०३/२०१८ या कालावधीतील विमा नुतनीकरण करणे करीता राष्ट्रीयकृत विमा कंपन्यांकडुन दरपत्रके मागवून निम्नतम दर देणारे दि.न्यु.इंडिया इश्युरन्स कं. लि., श्रीरामपूर यांचेकडून संस्थान वाहनाचे वाहन विमा उतरविण्यात आलेला असुन या कामी एकुण रक्कम रु.२०,२८,२४४/- (अक्षरी रक्कम रु.वीस लाख अठ्ठावीस हजार दोनशे चव्वेचाळीस मात्र ) खर्च आलेला आहे.

सध्या वाहन विभागाकडील खालील तपशिला प्रमाणे विविध वाहनांचे पॉलिसी मुदत दि.३१.०३.२०१८ अखेर संपुष्टात येत असुन या वाहनांचा विमा नुतनीकरण करणे आवश्यक आहे.

| अ.नं. | वाहन प्रकार | संख्या |
|---|---|---|
| ०१ | कार्यालयीन वाहने | १४ |
| ०२ | रुग्णवाहीका वाहने | १५ |
| ०३ | सर्व बसेस | २४ |
| ०४ | आपत्कालीन व इतर वाहने | ०७ |
| ०५ | मालवाहतुक व इतर वाहने ( ट्रॅक्टर व ट्रेलर ) | २८ |
| ०६ | दुचाकी वाहने | ०८ |
| ०७ | बॅटरी कार वाहने | ०४ |
| ०८ | मोबाईल टॉयलेट | १० |
| | **एकुण वाहने** | **११०** |

**विभागाचा स्पष्ट अभिप्रायः-** दि.०१/०४/२०१८ ते दि.३१/०३/२०१९ अखेर एकवर्ष कालावधी करीता उपरोक्त प्रमाणे वाहन विभागाकडील ११० वाहनांचा वाहन निहाय विमा उतरविण्याचा असलेने राष्ट्रीयकृत विमा कंपन्याकडूनच बंद लिफाप्यामध्ये निविदा मागविणे आवश्यक आहे. कारण ई-निविदा प्रक्रिया राबविल्यास त्यास सर्व राष्ट्रीयकृत विमा कंपन्या प्रतिसाद देत नसलेने संस्थानला विमा पॉलिसीचे स्पर्धात्मक दर प्राप्त होत नाही. तसेच विमा कंपन्याचे दरात स्पर्धा ही होत नाही. हा अनुभव संस्थानच्या वाहनांचा दि.०१ एप्रील, २०१६ ते दि.३१ मार्च, २०१७ या कालावधीतीलविमा नुतनीकरण करतेवेळी आलेला आहे. संस्थान फक्त सर्व राष्ट्रीयकृत विमा कंपन्याकडुनच दरपत्रक मागवित असलेने ई-निविदेचे आवश्यकता नाही.

उपरोक्त ११० वाहनांचे विमा नुतनीकरण करणे कामी (जी.एस.टी.सह) अंदाजे रक्कम रु.२५,००,०००/- (अक्षरी रक्कम रु.पंचवीस लाख) मात्र खर्च अपेक्षीत आहे. वाहन विभागाचे सन-२०१८-२०१९ या आर्थिक वर्षाचे अंदाजपत्राकामध्ये विमा खर्चाकरीता रक्कम रु.२६,४०,०००/- मात्र खर्चाची तरतुद असुन सदरचा खर्च मोटारकार विमा खर्च या अंदाजपत्रकातुन करता येईल.

**मागणी:-** तरी संस्थानचे विविध प्रकारचे ११० वाहनांचा सन-२०१८-१९ करीता वाहनांचा वाहन निहाय विमा नुतनीकरण करणे कामी चार राष्ट्रीयकृत विमा कंपन्याकडून दरपत्रके मागविणेस व याकामी येणा-या अंदाजे खर्चास मान्यता मिळणे करीता सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर.

**निर्णय क्र.८७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, वाहन विभागाकडील ११० वाहनांच्या वार्षिक विम्याचे नुतनीकरण करणेकामी राष्ट्रीयकृत विमा कंपन्यांकडून विहीत पध्दतीने दरत्रपत्रके मागविणेस व त्याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, वाहन विभाग)

---

**विषय नं.१४** **सन २०१८-१९ करीता संस्थानचे विविध विभागासाठी किराणा माल खरेदी करणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेस व याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** संस्थानचे श्री साई प्रसादालय, कॅन्टीन, मंदीर व लाडू निर्मीती विभाग यांचे सन २०१८-१९ करिता किराणा माल मागणीचे प्रस्ताव इकडील विभागास प्रशासकिय मान्यतेसह प्राप्त झालेले आहेत. विभागांकडुन प्राप्त झालेले प्रस्ताव एकत्रित करुन सन २०१८-१९ करिता किराणा माल खरेदीचा एकत्रित प्रस्ताव तयार केलेला आहे.

यापुर्वी सन २०१७-१८ चे किराणा माल व गावरान तुपाचे खरेदी करिता एकूण रु. १,०७,२७,३६,०००/- पर्यंतचे खर्चास मा. व्यवस्थापन समितीची मान्यता मिळालेली होती.यामध्ये एप्रिल २०१७ ते डिसेंबर २०१७ अखेर गावरान तुप वगळता किराणा मालासाठी रु.२५,८७,२७,४३६/- एवढा खर्च झालेला आहे.

श्रींचे शताब्दी महोत्सव काळात भक्तांची संभाव्य वाढती गर्दी लक्षात घेता सन २०१८-१९ करिता किराणा माल खरेदीकामी अंदाजे रक्कम रु.५०,०२,००,०००/- (अक्षरी रुपये पन्नास कोटी दोन लाख मात्र)पर्यंतचा खर्च अपेक्षित आहे. सर्व विभागांनी दिलेल्या माहितीच्या आधारे खरेदी करावयाची संख्या व दर निश्चित करणेत आलेले आहेत, ते सोबतच्या परिशिष्ठाप्रमाणे सादर केले आहेत.

तरी सोबतचे परिशिष्ठाप्रमाणे संस्थानचे विविध विभागांसाठी आवश्यक किराणामाल खरेदी विभागामार्फत विहित पध्दतीने खरेदी करणेस व त्याकामी येणा-या अंदाजे रक्कम रु.५०,०२,००,०००/- (अक्षरी रुपये पन्नास कोटी दोन लाख मात्र) पर्यंतचे खर्चास मान्यता मिळणेकामी सदरचा विषय मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.८८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, सन २०१८-१९ करीता संस्थानचे विविध विभागासाठी आवश्यक असलेला किराणा माल खरेदी करणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु.५०,०२,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यता आली.** (कार्यवाही- अधिक्षक, भांडार विभाग)

---

**विषय नं.१५** **सन २०१८-१९ करीता विहीत पध्दतीने कोटेशन मागवून फुटाणे प्रसाद, विडयाची पाने, पावडर मुर्ती व ई-निविदा पध्दतीने द्वारकामाई धुनीकरीता खरेदी विभागामार्फत रानशेणी गोवरील खरेदी करणेस व त्याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) महाराष्ट्र शासन अधिनियम २००४ तरतुद-**

| अ.क्र | कलम/ तरतूद क्रमांक | कलम/ तरतूदीचे शीर्षक | पोटकल/उपकलम क्रमांक | तरतूद |
|---|---|---|---|---|
| ०१ | २१ | विश्वस्तव्यवस्था निधीचा विनीयोग | १(क) | मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन |
| ०२ | २१ | विश्वस्तव्यवस्था निधीचा विनीयोग | १(ख) | रुढीव प्रथांनुसार, मंदिरातील धार्मिक विधी, पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करणे व पार पाडणे. |
| ०३ | २१ | विश्वस्तव्यवस्था निधीचा विनीयोग | १ (ग) | भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे |

प्रस्तावना:- श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मंदिर विभागामार्फत प्रत्येक शुक्रवारी एकादशी वगळता साईभक्तांना धुपारतीनंतर फुटाणेप्रसाद वाटण्यात येतो, साईभक्तांकरीता श्रीसत्यनारायण पूजेमध्ये विड्याची पाने ठेवण्यात येतात, मान्यवरांचे सत्काराकरीता पावडर मार्बल मुर्ती तसेच अतिमहत्वाचे प्रसंगी प्युअर मार्बल मूर्ती व सर्व साईभक्तांना दर्शनरांगेत गंध लावणेकामी अष्टगंध खरेदी करण्यात येतात.

प्रस्ताव:- प्रति वर्षाप्रमाणे सन-२०१८-१९ (माहे-एप्रिल-२०१८ ते माहे-मार्च-२०१९) या आर्थिक वर्षासाठी मंदिर विभागाकरीता खालीलप्रमाणे साहित्य विहीत पद्धतीने खरेदी करणेस व त्याकामी येणा-या खर्चास मान्यता मिळणेस विनंती.

१) श्रींचे प्रत्येक शुक्रवारी एकादशी वगळता धुपारतीनंतरफुटाणेप्रसाद खरेदी व खर्चास मान्यता असावी.

२) श्रीसत्यनारायण पूजेकरीता विड्याची पाने खरेदी व खर्चास मान्यता असावी.

३) श्रींचे दर्शनासाठी येणारे मान्यवरांचे सत्काराकरीता व सेवानिवृत्त कर्मचा-यांचे सत्काराकरीता पावडर मार्बल मुर्ती खरेदी व खर्चास मान्यता असावी.

४) आवश्यकतेप्रमाणे वरिष्ठांचे सुचनेनुसार प्युअर/ मकराना मार्बल मुर्ती खरेदी करणेस व त्याकामीचे खर्चास मान्यता असावी.

५) मागील वर्षाप्रमाणे श्रींचे द्वारकामाई धुनीकरीता खरेदी विभागामार्फत ई-निविदा प्रक्रीयेद्वारे रानशेणी गोवरी खरेदी करणेस व त्याकामी होणारे खर्चास मान्यता मिळणेस विनंती.

**विभागाचा अभिप्राय:-**

०१) श्रींचे प्रत्येक शुक्रवारी एकादशी वगळता धुपारतीनंतरफुटाणेप्रसाद वाटण्याची प्रथा आहे. माहे-मार्च-२०१८ अखेर सध्याचे पुरवठादार यांची फुटाणे पुरविण्याची मुदत संपणार असल्याने, माहे-एप्रिल-२०१८ ते माहे-मार्च-२०१९अखेर या आर्थिक वर्षात शुक्रवारचे धुपारतीचे प्रसादासाठी एकादशीचे दिवस वगळता दर शुक्रवारी ९ किलो प्रमाणे अंदाजे वार्षिक खरेदीत अंदाजे ४५० किलो फुटाणे खरेदी करावे लागणार आहेत. माहे-एप्रिल-२०१७ ते माहे-डिसेंबर-२०१७ या कालावधीत एकूण ३३३ किलो फुटाणे प्रसाद दर रुपये २५/- प्रति किलो खरेदी करण्यात आले असून त्यासाठी एकूण रु.८,३२५/-मात्र खर्च झालेला आहे. तसेच पुढील वर्षाकरीता समाधी मंदिराचे उपबजेटमध्ये तरतूद करण्यात आलेली आहे. फुटाणे प्रसाद खरेदीकरणेसाठी कोटेशन्स मागविणेस व त्याकामी होणारे खर्चास मान्यता मिळणेस विनंती.

०२) श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थेमार्फत भक्तांकरीता मंदिर परिसरामध्ये दररोज श्रीसाईसत्यव्रत पूजा व भक्त अभिषेक पूजा करण्याची सुविधा आहे. प्रत्येक सत्यनारायणाच्या पूजेकरीता पूजेच्या चौरंगावर दोन विड्याची पाने ठेवण्यात येतात. पूजेकरीता वापरण्यात येणारी विड्याची पाने मंदिर विभागामार्फत खरेदी करण्यात येतात. सन-२०१७-१८ या आर्थिक वर्षाची विड्याची मुदत माहे-मार्च-२०१८ अखेर संपणार असल्याने माहे-एप्रिल-२०१८ ते मार्च-२०१९ अखेर या आर्थिक वर्षाकरीता श्रीसत्यनारायण पूजेकरीता प्रत्येकी ०२ विड्याची पाने याप्रमाणे वार्षिक खरेदी करणे आवश्यक आहे. श्रीसत्यनारायण पूजेकरीता माहे-एप्रिल-२०१७ ते माहे-नोव्हेंबर-२०१७ अखेर या कालावधीत एकूण ७९८६४नग विड्याची पाने दर रु.७०/- प्रति शेकडा प्रमाणे त्याकरीता एकूण रु.५५,९०४/-(रुपये पंचवन्न हजार नऊशे चार मात्र) खर्च झालेला आहे.तसेच अभिषेक पूजा चौरंग मांडणी करुन सत्यनारायण पूजेप्रमाणे करणे प्रस्तावित असल्याने भक्त अभिषेक पुजेकरीताही विड्याची पाने खरेदी करावे लागणार आहेत. त्याकरीता पुढील आर्थिक वर्षात सत्यनारायण पूजेकरीता विड्याची पाने खरेदी करावी लागणार आहेत पुढील वर्षाकरीता समाधी मंदिराचे उपबजेटमध्ये तरतूद करण्यात आलेली आहे.

०३) श्रीसाईबाबांच्या दर्शनासाठी देश-विदेशातुन अनेक सन्माननीय व्यक्ती येत असतात. या मान्यवर अतिथींचा संस्थानचे वतीने यथोचित सत्कार करण्यात येतो.

सत्कारामध्ये मा.अध्यक्ष, मा.उपाध्यक्ष, मा.विश्वस्त मंडळ, मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, मा.उपकार्यकारी अधिकारी, मा.प्रशासकीय अधिकारी व जनसंपर्क अधिकारी यांचे सुचनेनुसार मान्यवरांना आवश्यकतेप्रमाणे पावडर मार्बल मूर्ती देण्यात येते. तसेच संस्थान सेवेतुन सेवानिवृत्त होणारे कर्मचा-यांना संस्थानमार्फत पावडर मार्बल मूर्ती देऊन सत्कार करण्यात येतो.

त्याकरीता आवश्यकतेप्रमाणे पुरवठादारांकडुन पावडर मूर्ती नंबर ३, मूर्ती नंबर ४, मूर्ती नंबर ५ अशा पावडर मूर्ती खरेदी करण्यात येतात. माहे-मार्च-२०१८ अखेर मुर्ती खरेदीची मुदत संपणार आहे.त्यामुळे माहे- सन-२०१८-१९ या आर्थिक वर्षाकरीता पावडर मार्बल मूर्ती खरेदी करणे आवश्यक आहे.माहे-एप्रिल-२०१७ ते माहे-नोव्हेंबर-२०१७ अखेर या कालावधीत एकूण ३ नंबर मूर्ती-१५नग दर रु.९०/-एकूण रु.१३५०/-, ४नंबर मूर्ती-२६७ नग दर रु.१४०/- एकूण रु.३७,३८०/-, ५नंबर मूर्ती-३१नग दर रु.४३०/- एकूण रु.१३,३३०/- खरेदी करण्यात आलेल्या असून त्यासाठी एकूण रु.५२,०६०/- (अक्षरी रुपये बावन्न हजार साठ मात्र)मात्र खर्च झालेला आहे.तरी पुढील आर्थिक वर्षाकरीता पावडर व प्युअर मार्बल मुर्ती खरेदी करणेकामी समाधी मंदिराचे उपबजेटमध्ये तरतूद करण्यात आलेली आहे.

०४) त्याचप्रमाणे मा.महामहिम राष्ट्रपती, मा.उपराष्ट्रपती, मा.मुख्यमंत्री महोदय, मा.सुप्रिम कोर्ट व इतर कोर्ट, मा.खासदार किंवा व्ही.व्ही.आय.पी., देणगीदारसाईभक्त व इतर तत्सम महत्वाचे व्यक्ती मंदिरात दर्शनासाठी येत असतात. त्यांचा संस्थानचे वतीने शॉल,उदीदेऊन यथोचित सत्कार करण्यात येतो. काही व्यक्तींना वेळप्रसंगी वरिष्ठांचे सूचनेनुसार प्युअर/ मकराना मार्बल मूर्ती संस्थानमार्फत भेट म्हणून देण्यात येते. ती ऐनवेळी शिर्डीतील स्थानिक मार्केटमधुन थेट खरेदी करण्यात येते. अशा प्युअर मार्बल मूर्ती आवश्यकतेप्रमाणे थेट खरेदी कराव्या लागतात त्याची संख्या निश्चित नसते. काही अतिमहत्वाचे व्यक्तींना वेळप्रसंगी प्युअर मकराना मार्बल मूर्ती

संस्थानमार्फत भेट म्हणून देण्यात येते.माहे-एप्रिल-२०१७ ते माहे-डिसेंबर-२०१७ अखेर मंदिर विभागामार्फत ०२ नग प्युअर /मकराना मार्बल मुर्ती खरेदी करण्यात आल्या असुन मान्यवरांना देण्यात आलेल्या आहेत. याकरीता एकूण रु.१४,०००/- (अक्षरी रुपये चौदा हजार मात्र) खर्च झालेला आहे. तरी आवश्यकतेप्रमाणे प्युअर मार्बल मूर्ती थेट खरेदी करणेस व त्याकामी होणारे खर्चास मान्यता असावी. तसेच सदर बीलाची रक्कम लेखाशाखेमार्फत आदा होणेस मान्यता असावी, ही विनंती.

०५)श्रीसाईभक्तांना श्रीद्वारकामाईचे धुनीतील पवित्र उदीचे वाटप करण्यासाठी मंदिर विभागामार्फत प्रतिवर्षी श्रींचे द्वारकामाई धुनीकरीता गोवरी खरेदी करुन त्याचा वापर धुनी प्रज्वलीत राहणे व उदी निर्माण होणे याकामी करण्यात येतो. श्रीसाईभक्तांना पवित्र उदी मिळणे व श्रींची धुनी अखंड प्रज्वलीत राहणेकामी प्रतिवर्षी श्रींचे द्वारकामाई धुनीकरीता गोवरी खरेदी करावी लागते. सदर खर्च अंदाजे रुपये तीन लाखापेक्षा जास्त असल्याने त्याची सन-२०१७मध्ये खरेदी ई-टेंडर प्रक्रीयेद्वारे खरेदी विभागामार्फत करणेत आलेली आहे. तरी मागील वर्षाप्रमाणे खरेदी विभागामार्फत ई-टेंडर प्रक्रीया करणेस गोवरी खरेदीकामी होणा-या खर्चास मान्यता असावी, ही विनंती. त्याकामी मंदिर विभागाचे बजेटमध्ये तरतूद करण्यात आलेली आहे.

तरी खालीलतपशीलाप्रमाणे सन-२०१८-१९ या आर्थिक वर्षाकरीता साहित्य खरेदी करावे लागणार आहे-

| अ.क्र | तपशील | एप्रिल-१७ ते नोव्हेंबर-१७ खर्चसध्याचे दर व खर्च | | सन-१८-१९ची मागणी (अंदाजे) (आवश्यकतेप्रमाणे) | अंदाजे दर | | | अंदाजे खर्च रुपये | एकूण अंदाजे खर्च रुपये |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | दर रुपये | प्रमाण | | रुपये | पैसे | प्रमाण | | |
| ०१ | **फुटाणे प्रसाद** | २०/- | ३२४किलो | ४५० किलो | ६० | ०० | किलो | २७,०००/- | **२७,०००/-** |
| ०२ | विड्याची पाने | ०.७० पैसे | ७९८६४नग | २,००,००० नग | ०० | ८० | नग | १,६०,०००/- | **१,६०,०००/-** |
| ०३ | पावडर मूर्ती नं.३ | ९०/- | १५ नग | १०० नग | १०० | ०० | नग | १०,०००/- | १,२५,५००/- |
| | पावडर मूर्ती नं.४ | १४०/- | २६७ नग | ३०० नग | १६० | ०० | नग | ४८,०००/- | |
| | पावडर मूर्ती नं.५ | ४३०/- | ३१ नग | १५० नग | ४५० | ०० | नग | ६७,५००/- | |
| ०४ | प्युअर/ मकराना मार्बल मूर्ती | ११०००/-<br>३०००/- | ०१ नग<br>०१ नग | (आवश्यकतेप्रमाणे) | --- | --- | --- | १,००,०००/- | १,००,०००/- |
| ०५ | रानशेणी गोवरी | (खरेदी विभागामार्फत) | | २,००,००० किलो | ०६ | ०० | किलो | १२,००,०००/- | १२,००,०००/- |

उपरोक्त नमूद केल्यानुसार मागीलवर्षाप्रमाणे माहे- एप्रिल-२०१८ ते माहे मार्च-२०१९ अखेर या आर्थिक वर्षामध्ये

१) तकत्यामध्ये नमूद केल्याप्रमाणे अ.क्र.०१ ते ०३चे साहित्य रु.३,००,०००/-चे आत असल्याने विहीत पद्धतीने दरपत्रके मागवुन त्यातील न्युनतम दर धारकाचे दर मान्य करणेस व कार्यादेश देणेस तसेच त्याकामी होणारे सर्व समावेशक खर्चास मान्यता मिळणेस विनंती.

२) उपरोक्त तकत्यातील अ.क्र.०४मध्ये नमूद केल्यानुसार प्युअर/मकराना मार्बल मुर्ती आवश्यकतेप्रमाणे मंदिर विभागामार्फत थेट खरेदी करणेस व त्याकामी होणारे सर्व समावेशक खर्चास मान्यता मिळणेस विनंती.

३) त्याचप्रमाणे तक्त्यात नमूद केलेले अ.क्र.०५ ची रानशेणी गोवरीची खरेदी विभागामार्फत ई-निविदा प्रक्रीयाद्वारे खरेदी करणेस व त्याकामी होणारे सर्व समावेशक खर्चास मान्यता असावी, ही विनंती.

तरी उपरोक्त नमूद केल्याप्रमाणे प्रस्तावाबाबत निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.८९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, मंदिर विभागासाठी सन २०१८-१९ करीता विहीत पध्दतीने कोटेशन मागवून फुटाणे प्रसाद, विडयाची पाने, पावडर मुर्ती खरेदी करणेस तसेच ई-निविदा पध्दतीने द्वारकामाई धुनीकरीता रानशेणी गोवरी खरेदी करणेस व त्याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- मंदिर विभागप्रमुख)

---

**विषय नं.१६** **श्रींचे समकालीन साईभक्तांचे वंशजांकडे असलेल्या वस्तू साईभक्तांचे दर्शनाकरीता संस्थानकडे सुपर्द करणेसाठी आवाहन करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्रीसाईबाबांचे संपुर्ण जीवनकार्यामध्ये त्यांचा अनेक साईभक्तांशी विविध प्रकारे संपर्क आलेला श्री साईसच्चरितामध्ये उल्लेख अढळुन येतो. त्या-त्या वेळी श्रींनी विविध ठिकाणच्या साईभक्तांना वेगवेगळया प्रकारच्या वस्तू दिल्याचाही उल्लेख श्रीसाईसच्चरितामध्ये अढळुन येतो. आता श्रीसाईबाबांच्या समाधीस सन-२०१८ मध्ये १०० वर्षे पुर्ण होत असल्याने श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीमार्फत दि.०१ ऑक्टोबर,२०१७ ते दि.१८ ऑक्टोबर, २०१८ अखेर "श्रीसाईबाबा समाधी शताब्दी महोत्सव वर्ष" साजरा करण्यात येत आहे. त्याचे औचित्य साधुन श्रीसाईबाबांनी हाताळलेल्या वस्तूंच्या दर्शनाचा लाभ शिर्डी येथे येणा-या सर्व साईभक्तांना व्हावा यासाठी श्रीसाईबाबांच्या समकालीन भक्तांच्या वंशजांकडे असणा-या वस्तू संस्थानकडे सुपूर्द करण्याचे आवाहन करणेबाबतची सूचना आहे.

<u>प्रस्ताव</u>:- श्रींनी हाताळलेल्या व श्रींच्या समकालीन भक्तांचे वंशजांकडे असणा-या वस्तूंचा शिर्डीत येणा-या सर्व साईभक्तांना दर्शनाचा लाभ व्हावा याकरीता भारतातील सर्व साईभक्तांना व श्रींचे समकालीन भक्तांचे वंशजांना त्यांचेकडे असलेल्या श्रींनी हाताळलेल्या वस्तू श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीकडे सुपूर्द करणेकामी व त्या अनुषंगाने विविध बाबींचा विचार करुन त्याबाबत निर्णय घेणे व याबाबतचे जाहिर आवाहन करणेबाबतचे प्रस्तावास मान्यता मिळणेस विनंती.

<u>विभागाचा अभिप्राय</u>:- श्रीसाईबाबांनी हाताळलेल्या वस्तू साईभक्तांकडुन स्विकारतांना खालीलप्रमाणे नियोजन करणे गरजेचे आहे, असे नम्र मत आहे-

०१) श्रींनी हाताळलेल्या वस्तू संस्थानकडे सुपूर्द करणेकामी भारतातील सर्व प्रमुख वृत्तपत्र, वृत्तवाहिनी, महाराष्ट्रातील सर्व वृत्तपत्र, संस्थानची अधिकृत श्रीसाईलिला मासिक, वृत्तवाहिनींवर, संस्थानचे अधिकृत संकेत स्थळावरुन साईभक्त व श्रीसाईबाबांचे समकालीन साईभक्तांचे वंशजांना आवाहन करुन त्यांचेकडे असलेल्या वस्तू संस्थानचे ताब्यात घेता येतील. त्याचप्रमाणे याबाबत दर्शनरांग, सर्व निवासस्थाने, पालखी थांबे, इ. ठिकाणी बांधकाम विभागामार्फत बोर्ड लावुन आवाहन करणेस मान्यता असावी.

०२) साईभक्तांकडुन प्राप्त होणा-या वस्तू वैध आहेत की नाही? व याबाबत प्राप्त होणारे पुरावे व इतर बाबी विशिष्ट तज्ञ समिती स्थापन करुन समितीमार्फत शहानिशा करुन मगच अशा वस्तू ताब्यात घेता येतील. तरी याबाबत समिती स्थापन करणेस विनंती आहे.

०३) साईभक्तांकडुन प्राप्त होणा-या वस्तू घेतांना साईभक्तांना याबाबतचे आभारपत्र देऊन सदर वस्तू संस्थानकडेच कायम स्वरुपी घ्यावयाच्या की, श्रीसाईबाबा समाधी शताब्दी महोत्सवाचे नंतर संबंधीतांना त्या वस्तू परत करायच्या? सदर वस्तू संबंधीतास परत द्यावयाच्या असल्यास त्याबाबत त्यांचेकडुन संमतीपत्र घेणे आवश्यक आहे. तरी याबाबत निर्णय व्हावा.

०४) श्रींनी हाताळलेल्या वस्तू या अतिशय मौल्यवान असणार आहेत. त्याची देखरेख करणे संस्थानची जबाबदारी असणार आहे. याकरीता स्वतंत्र अद्ययावत असे म्युझियम तयार करुन त्याठिकाणी ठेवणे योग्य आहे. त्याकरीता बांधकाम विभागामार्फत जागा निश्चित करुन स्वतंत्र दालन तयार करणेबाबत आदेश व्हावा.

तरी उपरोक्त अ.क्र.०१ ते ०४ प्रमाणे सर्व बाबी विचारात घेऊन श्रींनी हाताळलेल्या वस्तू संस्थानकडे सुपूर्द करणेबाबत आवाहन करणेस व त्याकामी होणारे खर्चास मान्यता असावी, त्याचप्रमाणे याकामी प्राप्त होणारे अर्ज व वस्तूंची वैधता तपासणेकामी समिती नेमणेत यावी व श्रींनी हाताळलेल्या वस्तूंचे प्रदर्शनाची जागा निश्चित करुन अद्ययावत दालन तयार करणेबाबत निर्णयस विनंती.

निर्णय क्र.९० **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे, श्रींचे समकालीन साईभक्तांचे वंशजांकडे असलेल्या वस्तू साईभक्तांचे दर्शनाकरीता संस्थानकडे सुपर्द करणेसाठी आवाहन करणेस मान्यता देण्यात आली.**

**यावेळी अशीही चर्चा झाली की, श्री साईचरित्र व इतर समकालीन ग्रंथामधील उल्लेखांवरुन, कोण-कोणत्या साईभक्तांकडे श्रींच्या कोण-कोणत्या वस्तु आहेत, याचीही माहिती संकलित करणेत यावी.**

(कार्यवाही- मंदिर विभागप्रमुख)

---

विषय नं.१७ **श्री साईबाबांच्या म्युझियम हॉल येथील चांदीच्या फोटोला सोन्याचा मुलामा देणगीदाखल स्विकारणेस परवानगी मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** साईभक्त शामराव जयकर यांनी श्रीसाईबाबांच्या हयातीमध्ये श्रींना समक्ष ठेवुन स्वहस्ते त्यांचे तैलचित्र काढले आहे. याबाबतचा उल्लेख श्रीसाईसच्चरितामध्ये अढळुन येतो. या तैलचित्रास पुर्वीपासुन चांदीची फोटो फ्रेम लावण्यात आलेली आहे. पुर्वी साईभक्तांचे दर्शनाकरीता हा फोटो द्वारकामाई येथील मखरामध्ये ठेवण्यात आला

होता. त्याठिकाणी प्रचंड प्रमाणामध्ये उष्णता असल्याने हा फोटो आता साईभक्तांच्या दर्शनासाठी म्युझियम हॉलचे पहिल्या माळ्यावर ठेवण्यात आला आहे.

**प्रस्ताव:-** साईभक्त श्री.श्रीनिवास एन. कांचन, पंचवटी व्हाल्वस ॲण्ड फ्लँजेस प्रा.लि.नाशिक यांनी दि.२२/१२/२०१७चे पत्रान्वये म्युझियम हॉल येथील साईभक्त शामराव जयकर यांनी काढलेले फोटोचे चांदीच्या फ्रेमला सोन्याचा मुलामा देणगीदाखल देणेबाबत इच्छा प्रदर्शित केली आहे. तरी याबाबत निर्णय होणेस विनंती.

**विभागचा अभिप्राय:-** म्युझियम हॉल येथे ठेवण्यात आलेला श्रींचे हयातीमध्ये काढण्यात आलेला फोटो संस्थानकडे असलेली श्रीसाईबाबांची अतिशय दुर्मिळ वस्तु असुन अमुल्य असा आहे. हा फोटो अतिशय दुर्मिळ व पुरातन काळातील फोटो आहे, त्यामुळे त्यास अनन्य साधारण महत्व आहे. तरी या फोटोस सोन्याचा मुलामा लावणेची परवानगी द्यावयाची असल्यास खालीलप्रमाणे गोष्टींचा विचार होणे आवश्यक आहे-

०१. साईभक्त शामराव जयकर यांनी काढलेल्या म्युझियम हॉलमधील फोटोस सोन्याचा मुलामा लावण्याची परवानगी द्यावयाची असल्यास मंदिर अधिक्षक, पर्यवेक्षक यांचे देखरेखीखाली करणे आवश्यक आहे. श्रींचा फोटो अतिशय दुर्मिळ व अमुल्य असल्याने त्याचे व्यवस्थीत काम होणे आवश्यक आहे. सदर फोटो शिर्डी येथुन बाहेर पाठविण्यात येऊ नये, अथवा कोणाकडे देऊ नये असे नम्र मत आहे.

०२. लेखाशाखेने सोने-चांदीच्या वस्तु देणगी स्विकारणेबाबत नियमावली तयार केलेली आहे. त्यामध्ये सोन्याचे मुलाम्याचे मुल्यांकन करता येत नाही. त्याची देणगी पावती देता येत नाही, त्याऐवजी आभार पत्र द्यावे लागेल.

०३. समाधी मंदिरामध्ये लावलेल्या चांदीच्या खांबावरील सोन्याचा सोन्याचा मुलामा कालांतराने निघुन जातो आहे, असा अनुभव आहे. त्यामुळे कालांतराने या फोटोला लावलेला मुलामा निघुन गेल्यास फ्रेमची शोभा जाईल, असे नम्र मत आहे.

०४. सोन्याचे मुलाम्यामध्ये असलेल्या केमिकलमुळे श्रींचा फोटो किंवा फ्रेमला काही हानी होते का? याबाबत तज्ञांचे मत घ्यावे. त्यानंतर पुढील कामास सुरुवात करणे योग्य राहील.

०५. फोटोला मुलामा लावण्याचे संपुर्ण काम समाधी मंदिरामध्ये अथवा म्युझियम हॉल येथेच करण्यात यावे, असे वाटते.

उपरोक्त नमूद केलेल्या सर्व बाबींचा विचार करुन म्युझियम हॉलमध्ये असलेल्या साईभक्त शामराव जयकर यांनी श्रीसाईबाबांच्या हयातीमध्ये तयार केलेल्या चांदीच्या फोटो फ्रेमला सोन्याचा मुलामा देणेबाबत निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.९१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, म्युझियम हॉलमधील श्रींचा फोटो, श्रींचे हयातीमध्ये काढण्यात आलेला आहे व संस्थानकडे असलेली श्रीसाईबाबांची अतिशय दुर्मिळ वस्तु असुन अमुल्य व पुरातन काळातील फोटो आहे, त्यामुळे त्यास अनन्य साधारण महत्व आहे. याकरीता सदरहू फोटोच्या फ्रेमला सोन्याचा मुलामा लावण्यात येऊ नये व सदरहू देणगीदारांना त्यांची देणगी इतर ठिकाणी देणेबाबत विनंती करणेत यावी, असे ठरले.**

(कार्यवाही- मंदिर विभागप्रमुख)

---

**विषय नं.१८** **सन २०१८-१९ मधील संस्थानकडील दैनंदिन वापराने जमा होणाऱ्या निरोपयोगी/ भंगार/ सादिल स्वरुपाच्या साहित्याची विक्री करणेकामी ई-निविदा मागविणेबाबत.**

**प्रस्ताव-** **महाराष्ट्र अधिनियम २००५ तरतूद-** महाराष्ट्र अधिनियमातील कलम १४(२) (ग) व कलम १७ (४) ला अधिन राहून त्याप्रमाणे कार्यवाही करणेत येत आहे.

**मा.व्यवस्थापन समिती सभेतील ठराव व निर्णय-**

मा.व्यवस्थापन समिती दि.२४.०५.२००८ चे सभेतील निर्णय क्र.४७६. तसेच मागील आर्थिक वर्ष सन २०१७-१८ मध्ये मा.व्यवस्थापन समिती दि.२५.०२.२०१८ चे सभेतील निर्णय क्र.७९ नुसार, निरूपयोगी सादिल स्वरूपाचे भंगार साहित्याची विक्री/ विल्हेवाट करणेसाठी ई-निविदा प्रक्रीया राबवून वार्षिक उच्चत्तम दर ठरविणेत आलेले आहेत.

श्री साईबाबा संस्थानकडील दैनंदिन वापराने जमा होणा-या निरूपयोगी सादिल स्वरूपाच्या भंगार तसेच साहित्याची सन-२०१७-१८ या आर्थिक वर्षात ई-निविदा पध्दतीने तसेच वर्तमान पत्रात जाहीरात देवून उपरोक्त संदर्भ क्र.०१ चे मान्यतेनुसार दर मागविण्यात आलेले होते. त्याप्रमाणे प्राप्त झालेल्या उच्चतम दराने जमा झालेल्या निरूपयोगी भंगार साहित्याची विक्री करणेत आलेली आहे. आजपावेतो (माहे डिसेंबर-२०१७ अखेर)

अशा प्रकारच्या भंगार साहित्याचे विक्रीतून एकूण-२२,३०,३९५/- (अक्षरी बावीस लाख तीस हजार तिनशे पंच्यान्नव रूपये मात्र )रूपये संस्थान फंडात जमा करणेत आलेले आहे.

दरवर्षीचे प्रचलित पध्दतीनुसार महाराष्ट्र अधिनियम २००५ मधील कलम १४(२) (ग) व कलम १७(४) ला अधिन राहून रू.रू.५०,००० चे आतील दैनंदीन वापराने जमा होणारे निरूपयोगी डेडस्टॉक तसेच सादील स्वरूपाचे भंगार साहित्य जसे दुध पिशवी, प्लॉस्टिक भंगार, लोखंडी भंगार , रिकामा खोक्याचा पुठ्ठा, रिकाम्या पाण्याच्या बाटल्या, नारळाच्या शेंडया, काळे ऑईल, रिकामे तेलातूपाचे डबे, रिकामे बारदान गोण्या वगैरे साहित्य विक्रीचे तसेच मा.व्यवस्थापन समिती सभा दि.२४.०५.२००८ चे सभेतील निर्णय क्र.४७६ नुसार अशाप्रकारच्या दैनंदिन वापराने तयार होणा-या निरूपयोगी भंगार / डेडस्टॉक साहीत्याची विक्री करण्याचे अधिकार समितीने मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांना प्रदान केलेले आहेत.

सन २०१७-१८ या वर्षात नेमून दिलेल्या व्यापा-यांना भंगार साहित्य विक्रीची मुदत **दि.३१.०३.२०१८** रोजी पुर्ण होत आहे. करिता **सन २०१८-१९** या आर्थिक वर्षात संस्थानचे दैनंदिन वापराने जमा होणारे भंगार साहित्य विक्री कामी ई-निविदा मागविणेसाठी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समिती सभेपुढे मान्यतेसाठी सादर .

**मागणी-** उपरोक्तप्रमाणे प्रस्तावीत केलेनुसार **सन-२०१८-१९** या आर्थिक वर्षातील दैनंदिन वापराने जमा होणारे निरूपयोगी भंगार साहित्य विक्री कामी ई-निविदा प्रक्रीयेसाठी खालील दाखल प्रस्ताव...

१) निरूपयोगी भंगार/सादिल/ तसेच डेडस्टॉक साहित्याचे विक्रीबाबतच्या अटी व शर्तीचा मसुदा.

२) आयटी विभागामार्फत संकेतस्थळावर प्रसिध्दी करणे, ईडीपी विभागामार्फत शासकीय संकेतस्थळावर Online ई-निविदा मागविणे/अपलोड करणे, तसेच जनसंपर्क विभागामार्फत दैनिक वर्तमानपत्रात प्रसिध्दी करावयाचा जाहीरात मसूदा.

३) निरूपयोगी भंगार/सादिल स्वरूपाचे साहित्य तपशिलाचे दरपत्रक.

४) सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात बीड, भटूर या वस्तू जमा होत नसलेने मागील वर्षीचे भंगार यादीत समावेश नव्हता. परंतू साहित्य मंजूर झालेनंतर सदरील साहित्य विक्रीकामी संबंधीत विभागांनी कळविले जाते करीता त्यांचा चालू वर्षीचे(सन-२०१८-१९ चे) यादीत समावेश करणेबाबत...

उपरोक्त अ.नं.०१ ते ०४ प्रस्ताव मा.व्यवस्थापन समिती सभेपुढे मान्यतेसाठी सादर.

**विभागाचा अभिप्रायः-** सन-२०१७-१८ या आर्थिक वर्षामधील भंगार साहित्य विक्रीची मुदत दि.३१.०३.२०१८ रोजी पुर्ण होत असल्याने नाशवंत/भंगार साहित्य साठवू नये, त्याचे साठवणूकीतून साईभक्तांचे तसेच सार्वजनिक आरोग्यास धोका पोहचू नये, करिता अशाप्रकारचे साहित्य वेळीच विक्री/विल्हेवाट करणेसाठी वर्तमानपत्रात जाहीरात प्रसिध्द करून तसेच Online ई-निविदा मागविणेसाठी सादर.

**निर्णय क्र.९२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, सन २०१८-१९ मधील संस्थानकडील दैनंदिन वापराने जमा होणाऱ्या निरोपयोगी/ भंगार/ सादिल स्वरुपाच्या साहित्याची विहीत पध्दतीने विक्री करणेस व त्याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, अभिलेख कक्ष)

---

**विषय नं.१९** **संस्थानमधील कंत्राटी पध्दतीने कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांच्या पाल्यांचा सन २०१७-१८ या वर्षाचा शैक्षणिक शुल्क परतावा करणेबाबत.**

**प्रस्ताव-** संस्थानचे प्रचलित पद्धतीनुसार मा.कोर्ट रिसिव्हर यांचे काळापासून मा.व्यवस्थापन समितीचे मान्यतेने दरवर्षी संस्थान कर्मचा-यांना त्यांच्या पाल्याचा शैक्षणिक शुल्काचा परतावा दिला जातो.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.२१/०४/१९९६ चे सभेतील निर्णय क्र.८९ अन्वये मार्गदर्शक तत्वे वजा नियमावली ठरविण्यात आलेली आहे. सदरच्या मार्गदर्शक तत्वानुसार सध्या शैक्षणिक शुल्काचा परतावा देण्याची कार्यवाही चालु आहे. निर्णय क्र.८९ (१) शासनाने विद्यापीठांनी केवळ गुणवत्तेच्या निकाषावर (On Merit Basis) भरण्यात येणा-या (सुमारे ५० % पर्यंतच्या) जागांवर प्रवेश दिल्या जाणा-या विद्यार्थ्यांसाठी (निम्न दराने) निर्धारीत केलेल्या फी दर रकमेपर्यंतच, मर्यादीत असावा असे नमुद आहे. यास अनुसरुन शासकीय/शासन अनुदानित अभ्यासक्रमासाठी आकरण्यात येणा-या शुल्काच्या मर्यादेपर्यंत शैक्षणिक शुल्क रकमेचा परतावा दिला जातो. तसेच ज्यु.के.जी ते इ.१० वी (इंग्रजी माध्यम) व आयटीआय या अभ्यासक्रमांचा शैक्षणिक शुल्काचा परतावा संस्थानच्या शाळेतील फीचे मर्यादेपर्यंत अदा केला जातो.

शासन मंजुरी क्र.सासंवि २००७/२४२/(६०)-का.सोळा, मंत्रालय मुंबई दि.१६ जुलै, २००९ अन्वये विधी व न्याय विभाग मंत्रालय मुंबई यांनी सदर योजना मा.व्यवस्थापन मंडळाचे सन १९९६ चे सभेतील निर्णयाप्रमाणे संस्थान कर्मचा-यांना लागू आहे. त्याच धर्तीवर ती यापुढेही प्रचलीत पद्धतीने चालु राहील, अशी मंजुरी दिलेली आहे.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.३०.११.२०१६ चे सभेतील निर्णय क.८१० व मा.विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील क्र.सासंवि १०१६/७७७/प्र.क्र.१०४/का.१६ दि.१५ एप्रिल, २०१७ रोजीचे पत्रान्वये

१. श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्या आस्थापनेवरील स्थायी कर्मचा-यांना त्यांच्या पाल्यांच्या शैक्षणिक फीचा परतावा करण्यात येतो, त्याच धर्तीवर सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षाकरिता श्री साईबाबा संस्थानच्या विविध विभागात कार्यरत असलेल्या सर्व कंत्राटी कर्मचा-यांना (एकुण २७३६) पाल्यांचा शैक्षणिक फीचा परतावा करण्यास आणि त्याकरिता होणा-या अंदाजे ८० लक्ष इतक्या खर्चास शासन मान्यता देण्यात येत आहे.

२. सदर आदेशाच्या आधारे संस्थानच्या कंत्राटी कर्मचा-यांना इतर कोणताही सेवाविषयक किंवा आस्थापनाविषयक लाभ अथवा स्थायित्वाच्या अन्य सुविधांसाठी संस्थानवर दावा करता येणार नाही. याकरिता श्री साईबाबा संस्थानद्वारे सर्व कंत्राटी कर्मचा-यांकडून लेखी हमीपत्र घेण्यात येईल.

३. कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांनी उपरोक्त शासन आदेशाची अंमलबजावणी करुन झालेल्या खर्चाच्या विवरणपत्रासह कार्यपूर्तता अहवाल शासनास सादर करावा.

उपरोक्त नमुद केलेप्रमाणे मान्यता देण्यात आलेली आहे.

सदर मान्यतेनुसार संस्थानचे विविध विभागात कार्यरत कंत्राटी कर्मचारी यांना त्यांचे पाल्यांचा सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षाचा फी परताव्याकामी जा.क्र.एसएसएस/साप्रशा/वशी-०६/७३२/२०१७ दि.०८ मे, २०१७ अन्वये परिपत्रक पारित करण्यात आलेले आहे. सदर परिपत्रकान्वये कंत्राटी कर्मचा-यांना फॉर्म वाटप करुन, विहित नमुन्यात माहिती तयार करुन, सदरची माहिती तक्ते लेखाशाखा विभागाकडून तपासून घेण्यात आलेले आहेत. तसेच जा.क्र.एसएसएस/आस्था-वशी-०६/२१३१/२०१७ दि.०७ ऑगस्ट, २०१७ रोजीचे आदेशान्वये कंत्राटी कर्मचा-यांचा शुल्क परताव्याच्या मंजुर रक्कमा त्यांच्या पगाराच्या बँक खात्यावर वर्ग करणेस आदेशीत करण्यात आले.

त्यानुसार कंत्राटी कर्मचा-यांच्या पाल्यांचा सन २०१६-१७ या वर्षाचा शैक्षणिक शुल्क परतावा खालीलप्रमाणे आदा करण्यात आलेला आहे.

| अ.नं. | विभागाचे नांव | कर्मचारी संख्या | पाल्य संख्या | देय्य रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| ०१. | सामान्य प्रशासन विभाग | ०९ | १६ | ६८,५२०/- |
| ०२. | जनसंपर्क विभाग | ०३ | ०५ | १७,४८०/- |
| ०३. | लेखाशाखा | १२ | १४ | ६४,५१०/- |
| ०४. | कॅन्टीन विभाग | १६ | २४ | ८४,५८०/- |
| ०५. | बांधकाम विभाग | ०२ | ०२ | ९,५३०/- |
| ०६. | विद्युत विभाग | १० | १३ | ७०,१२०/- |
| ०७. | साईप्रसाद निवासस्थान | ०६ | ०७ | ३३,७५०/- |
| ०८. | बगीचा विभाग | ०१ | ०१ | ४,६७०/- |
| ०९. | माहिती तंत्रज्ञान विभाग | ०५ | ०८ | २७,२८०/- |
| १०. | प्रसादालय विभाग | ४९ | ६२ | २,०४,०२४/- |
| ११. | प्रकाशने विभाग | ०१ | ०१ | ४,०००/- |
| १२. | खरेदी विभाग | ०१ | ०१ | ३,६००/- |
| १३. | अभिलेख कक्ष | ०१ | ०२ | ७,०७०/- |
| १४. | द्वारावती विभाग | ०७ | ०७ | २४,५५०/- |
| १५. | आरोग्य विभाग | १९ | २६ | १,१९,७००/- |
| १६. | संरक्षण विभाग | ११५ | १४५ | ५,९७,४९४/- |
| १७. | ध्वनीक्षेपण व टेलिफोन | ०८ | १० | ३४,४२०/- |
| १८. | सी.सी.टी.व्ही.कंट्रोल सेल | ०३ | ०४ | १४,०१०/- |
| १९. | मंदिर विभाग | ०७ | १० | ३५,२२०/- |
| २०. | पाणीपुरवठा विभाग | ०५ | ०६ | २०,५६०/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २१. | मॅकेनिकल विभाग | १० | ११ | ३९,३५०/- |
| २२. | फायर अॅण्ड सेफ्टी | ०२ | ०३ | १०,६७०/- |
| २३. | लाडू व बर्फी निर्मिती विभाग | ०२ | ०२ | ६,९४०/- |
| २४. | साईबाबा भक्तनिवासस्थान | १७ | २६ | ९५,२३०/- |
| २५. | इ.मि.स्कुल | ११ | २१ | ८९,४३८/- |
| २६. | कनिष्ठ महाविद्यालय | ०२ | ०२ | ५१,१३०/- |
| २७. | कन्याशाळा | ०४ | ०५ | १८,९५०/- |
| २८. | औद्योगिक प्रशिक्षण संस्था | ०२ | ०३ | ३०,९०५/- |
| २९. | वाहन विभाग | १४ | २० | ६७,८८८/- |
| ३०. | श्री साईबाबा हॉस्पिटल | ८८ | १०७ | ४,१७,२७२/- |
| ३१. | श्री.साईनाथ रुग्णालय | २८ | ३४ | १,१८,६२५/- |
| | **एकुण** | ४६० | ५९८ | २३,९१,४८६/- |

म्हणजेच कंत्राटी कर्मचा-यांच्या पाल्यांचा सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षाचा शैक्षणिक फी परतावा करणेकामी एकुण रक्कम रु.२३,९१,४८६/- मात्र इतका खर्च आलेला आहे. सदरबाबत प्रथमतः अंदाजे खर्चाची माहिती देतांना (८०लक्ष) संस्थानमध्ये कार्यरत असलेल्या एकुण २७३६ कंत्राटी कर्मचारी यांचा विचार करण्यात आलेला होता. त्या तुलनेने अत्यंत कमी म्हणजे फक्त ४६० कंत्राटी कर्मचारी यांनी फी परताव्याचा लाभ घेतलेला आहे. तसेच कंत्राटी कर्मचारी यांना शैक्षणिक शुल्क परतावा करण्याची पहिलीच वेळ असल्याने, कागदपत्रांअभावी बरेच कर्मचारी अपात्र ठरलेले आहेत. त्याबरोबच फी परतावा मिळणेकामी वर्षभरात किमान २४० दिवस कामावर हजर असण्याची अट असल्याने त्यामध्येही बरचसे कर्मचारी अपात्र ठरलेले आहेत. त्यामुळे अंदाजे खर्चाचा तपशिल व प्रत्यक्षात झालेला खर्च यामध्ये मोठ्या प्रमाणावर तफावत दिसून येत आहे.

तरी सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षाकरिता कंत्राटी कर्मचा-यांच्या पाल्यांचा अदा करण्यात आलेल्या फी परताव्याबाबत महाराष्ट्र शासन यांचेकडील क्र.सासंवि १०१६/७७७/प्र.क्र.१०४/का.१६ दि.१५ एप्रिल, २०१७ रोजीचे पत्रातील परिच्छेद ३ नुसार मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांना विवरण कळविता येईल.

तसेच संस्थानमधील कंत्राटी कर्मचारी यांना सन २०१६-१७ प्रमाणेच सन २०१७-१८ या वर्षाकरिता पाल्यांचा शैक्षणिक फी परतावा करणेस व त्याकामी अंदाजे रक्कम रु.३५,००,०००/- (अक्षरी रुपये पस्तीस लाख) मात्रचे खर्चास मान्यता मिळणेकामी मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडे प्रस्ताव सादर करता येईल.

तरी उपरोक्त प्रस्तावाचे अवलोकन होऊन, नमुद केलेप्रमाणे कार्यवाही करणेस मान्यता मिळणेस विनंती.

निर्णय क्र.९३ **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे प्रचलित पद्धतीप्रमाणे संस्थानमधील कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या पाल्यांचा सन २०१७-१८ या वर्षाच्या शैक्षणिक शुल्काचा विहित पद्धतीने परतावा करणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रु.३५,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली. परंतु याकामी विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांची मान्यता घेण्यात यावी, असे ठरले.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, सामान्य प्रशासन)

---

विषय नं.२० **शैक्षणिक संकुलाकडील आकृतीबंध शिक्षणाधिकारी/ शिक्षण उपसंचालकांकडून मंजूर करण्यात येणाऱ्या शिक्षणसंचाप्रमाणे करण्यास मान्यता मिळणेबाबत.**

प्रस्ताव- विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील दि.०७.०८.२००९ चे शासन निर्णयानुसार श्री साईबाबा संस्थान विश्वस्व्यवस्था, शिर्डीचे विविध विभागांसाठी आकृतीबंध मंजुर केलेला आहे. त्यामध्ये शैक्षणिक संकुलाकडील श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुल, शिर्डी, श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालयासाठी देखील आकृतीबंध मंजुर करण्यात आलेला आहे. सदरवेळी सन २००९ मधील विद्यार्थी संख्या गृहीत धरुन आकृतीबंध मंजुर करण्यात आलेला आहे. मात्र त्यानंतर दरवर्षी विद्यार्थी संख्या वाढल्याने जादा तुकडयांची निर्मिती करावी लागत आहे. तसेच नैसर्गिक तुकडीवाढीनुसार तुकड्या वाढत आहे. परिणामी वाढलेल्या तुकडयांसाठी शिक्षकभरती करण्यात आलेली आहे.

सद्यस्थितीमध्ये शैक्षणिक संकुलाकडील मंजुर आकृतीबंध, मंजुर संचमान्यता व प्रत्यक्ष कार्यरत असलेले शिक्षक कर्मचारी यांचा तपशिल खालीलप्रमाणे

**०१. श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालय, शिर्डी**

| अ.क्र. | पदनाम | मंजुर आकृतीबंध | | शिक्षणधिकारी यांचे मान्यतेनुसार आवश्यक संच | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | कायम | कंत्राटी | २०१२-१३ | २०१३-१४ | २०१४-१५ | २०१५-१६ | २०१६-१७ |
| ०१. | प्राचार्य | ०० | ०० | ०१ | ०१ | ०१ | - | ०१ |
| ०२. | उपप्राचार्य | ०१ | ०० | ०१ | ०१ | ०१ | - | ०१ |
| ०३. | सहा.शिक्षक | २६ | ०४ | २१ | २१ | २७ | - | ३२ |
| ०४. | अर्धवेळ शिक्षक | ०० | ०० | ०६ | ०६ | ०३ | - | ०१ |
| ०५. | घड्याळी तास | ०० | ०० | ०३ | ०४ | ०३ | - | ०९ |
| ०६. | ग्रंथपाल | ०१ | ०० | ०० | ०० | ०० | - | ०० |
| ०७. | प्रयोगशाळा सहाय्यक | ०४ | ०० | ०४ | ०४ | ०२ | - | ०२ |
| ०८. | प्रयोगशाळा परिचर | ०० | ०० | ०४ | ०४ | ०२ | - | ०१ |
| | एकुण | ३२ | ०४ | ४० | ४१ | ३९ | | ४७ |

**सन २०१६-१७ चे संच मान्यतेनुसार अतिरिक्त आवश्यक पदे**

| अ.क्र. | पदनाम | मंजुर आकृतीबंध | | कार्यरत पदे | | सन १६-१७ संच मान्यता | सन १६-१७ चे संच मान्यतेनुसार आतिरिक्त आवश्यक पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | कायम | कंत्राटी | कायम | कंत्राटी | | |
| ०१. | प्राचार्य | ०० | ०० | ०० | ०० | ०१ | ०१ |
| ०२. | उपप्राचार्य | ०१ | ०० | ०० | ०० | ०१ | ०१ |
| ०३. | सहा.शिक्षक | २६ | ०४ | २६ | ११ | ३२ | ०६ |
| ०४. | अर्धवेळ शिक्षक | ०० | ०० | ०२ | ०० | ०१ | ०१ |
| ०५. | घड्याळी तास | ०० | ०० | ०० | ०० | ०९ | ०९ |
| ०६. | ग्रंथपाल | ०१ | ०० | ०१ | ०० | ०० | ०० |
| ०७. | प्रयोगशाळा सहाय्यक | ०४ | ०० | ०२ | ०० | ०२ | ०० |
| ०८. | प्रयोगशाळा परिचर | ०० | ०० | ०० | ०० | ०१ | ०१ |
| | एकुण | ३२ | ०४ | ३१ | ११ | ४७ | १९ |

उपरोक्त तक्त्यामध्ये दर्शविलेल्या पदांपैकी अ.क्र.०१, ०४, ०५ ही पदे संस्थानचे आकृतीबंधामध्ये मंजुर नाहीत. मात्र शिक्षण उपसंचालक, पुणे यांनी सन २०१६-१७ मध्ये मंजुर केलेल्या शिक्षक संच मान्यतेमध्ये दर्शविलेली आहेत.

श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालयामध्ये मंजुर आकृतीबंधानुसार ०१ प्राचार्य, ०१ उपप्राचार्य व ०२ प्रयोगशाळा सहाय्यक यांचे पदे रिक्त आहेत. तर ०१ अर्धवेळ शिक्षकाचे पद अतिरिक्त आहे. तसेच कंत्राटी सहा.शिक्षकांचे ०७ पदे अतिरिक्त आहेत. सन २०१६-१७ चे मंजुर संच मान्यतेनुसार ०१ प्राचार्य, ०१ उप प्राचार्य, ०६ सहा.शिक्षक व ०९ घड्याळी तास शिक्षकांची पदे रिक्त आहेत. तर ०१ अर्धवेळ शिक्षक व ०१ ग्रंथपाल ही पदे अतिरिक्त आहेत. तसेच कंत्राटी सहा.शिक्षकांचे ११ पदे अतिरिक्त आहेत.

**२. श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर, शिर्डी**

| अ.क्र. | पदनाम | मंजुर आकृतीबंध | | शिक्षणधिकारी यांचे मान्यतेनुसार आवश्यक संच | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | कायम | कंत्राटी | २०१२-१३ | २०१३-१४ | २०१४-१५ | २०१५-१६ | २०१६-१७ |
| ०१. | मुख्याध्यापक | ०१ | - | ०१ | ०१ | ०१ | ०१ | ०१ |
| ०२. | सहा.शिक्षक माध्यमिक | ०९ | - | ०५ | ०६ | ०८ | ०८ | ०८ |
| ०३. | सहा.शिक्षक प्राथमिक | ०८ | - | ०४ | ०३ | ०१ | ०१ | ०१ |
| ०४. | ग्रंथपाल | ०१ | - | ०० | ०० | ०१ | ०१ | ०१ |
| ०५. | संगीत शिक्षक | ०१ | - | ०० | ०० | ०० | ०० | ०० |
| ०६. | तबलजी | ०१ | - | ०० | ०० | ०० | ०० | ०० |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०७. | प्रयोगशाळा सहाय्यक | ०१ | - | ०० | ०० | ०० | ०० | ०० |
| ०८. | प्रयोगशाळा परिचर | - | ०१ | ०१ | ०१ | ०१ | ०१ | ०१ |
| | एकुण | २२ | ०१ | ११ | ११ | १२ | १२ | १२ |

**सन २०१६-१७ चे संच मान्यतेनुसार अतिरिक्त आवश्यक पदे**

| अ.क्र. | पदनाम | मंजुर आकृतीबंध | | कार्यरत पदे | | सन १६-१७ संच मान्यता | सन १६-१७ चे संच मान्यतेनुसार आतिरिक्त आवश्यक पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | कायम | कंत्राटी | कायम | कंत्राटी | | |
| ०१. | मुख्याध्यापक | ०१ | - | ०१ | ०० | ०१ | ०० |
| ०२. | सहा.शिक्षक माध्यमिक | ०९ | - | ०७ | ०१ | ०८ | ०१ |
| ०३. | सहा.शिक्षक प्राथमिक | ०८ | - | ०५ | ०३ | ०१ | ०० |
| ०४. | ग्रंथपाल | ०१ | - | ०१ | ०० | ०१ | ०० |
| ०५. | संगीत शिक्षक | ०१ | - | ०१ | ०० | ०० | ०० |
| ०६. | तबलजी | ०१ | - | ०१ | ०० | ०० | ०० |
| ०७. | प्रयोगशाळा सहाय्यक | ०१ | - | ०० | ०० | ०० | ०० |
| ०८. | प्रयोगशाळा परिचर | - | ०१ | ०० | ०० | ०१ | ०१ |
| | एकुण | २२ | ०१ | १६ | ०४ | १२ | ०२ |

उपरोक्त तक्त्यातील शिक्षणाधिकारी, अहमदनगर यांनी मंजुर केलेल्या संच मान्यतेमध्ये माध्यमिक व प्राथमिक असे विभाग न कता पदवीधर व अपदवीधर असे शिक्षक मंजुर केलेले आहेत. त्यानुसार प्राथमिक व माध्यमिक वर्गीकरण केलेले आहे.

श्री साईबाबा कन्या विद्या मंदिरचे मंजुर आकृतीबंधानुसार ०२ सहा.शिक्षक माध्यमिक, ०३ सहा.शिक्षक प्राथमिक, ०१ प्रयोगशाळा सहाय्यक व ०१ कंत्राटी प्रयोगशाळा परिचर ही पदे पदे रिक्त आहेत. तर ०१ कंत्राटी सहा.शिक्षक माध्यमिक व ०३ कंत्राटी सहा.शिक्षक प्राथमिक ही पदे अतिरिक्त आहेत.

सन २०१६-१७ चे मंजुर संच मान्यतेनुसार ०१ सहा.शिक्षक माध्यमिक शिक्षक व ०१ प्रयोगशाळा परिचर हे पदे रिक्त आहेत. तर ०४ सहा.शिक्षक प्राथमिक, ०१ संगती शिक्षक, ०१ तबलजी ही पदे अतिरिक्त आहेत. तसेच ०१ कंत्राटी सहा.शिक्षक माध्यमिक व ०३ कंत्राटी सहा.शिक्षक प्राथमिक ही पदे अतिरिक्त आहेत.

**३. श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुल, शिर्डी –**

| अ.क्र. | पदनाम | मंजुर आकृतीबंध | | शिक्षणधिकारी यांचे मान्यतेनुसार आवश्यक संच | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | कायम | कंत्राटी | २०१२-१३ | २०१३-१४ | २०१४-१५ | २०१५-१६ | २०१६-१७ |
| ०१. | प्राचार्य | ०१ | ०० | ०१ | ०१ | ०१ | ०१ | ०१ |
| ०२. | सहा.शिक्षक (माध्यमिक) | ०८ | ०० | ०४.०५ | ०४.०५ | ०४ | ०४ | ०४ |
| ०३. | संगणक शिक्षक (माध्यमिक) | ०१ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० |
| ०४. | मुख्याध्यापक (प्राथमिक) | ०१ | ०० | - | ०१ | ०१ | ०१ | ०१ |
| ०५. | उच्च प्राथमिक सहा.शिक्षक | ०४ | ०० | - | ०६ | ०२ | ०२ | ०२ |
| ०६. | प्राथमिक शिक्षक | १८ | ०० | - | २८ | १५ | १५ | १५ |
| ०७. | संगणक शिक्षक (प्राथमिक) | ०१ | ०० | - | ०० | ०० | ०० | ०० |
| ०८. | अंशकालीन निदेशक | ०० | ०० | - | ०३ | ०० | ०० | ०० |
| ०९. | पुर्व प्राथमिक सहा.शिक्षक | ०८ | ०० | - | ०० | ०० | ०० | ०० |
| | एकुण | ४२ | ०० | ०६ | ४४ | २३ | २३ | २३ |

**सन २०१६-१७ चे संच मान्यतेनुसार अतिरिक्त आवश्यक पदे**

| अ.क्र. | पदनाम | मंजुर आकृतीबंध | | कार्यरत पदे | | सन १६-१७ संच मान्यता | सन १६-१७ चे संच मान्यतेनुसार आतिरिक्त आवश्यक पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | कायम | कंत्राटी | कायम | कंत्राटी | | |
| ०१. | प्राचार्य | ०१ | ०० | ०१ | ०० | ०१ | ०० |
| ०२. | सहा.शिक्षक (माध्यमिक) | ०८ | ०० | ०७ | ०३ | ०४ | ०० |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ०३. | संगणक शिक्षक (माध्यमिक) | ०१ | ०० | ०१ | ०० | ०० | ०० |
| ०४. | मुख्याध्यापक (प्राथमिक) | ०१ | ०० | ०१ | ०० | ०१ | ०० |
| ०५. | उच्च प्राथमिक सहा.शिक्षक | ०४ | ०० | ०४ | ०० | ०२ | ०० |
| ०६. | प्राथमिक शिक्षक | १८ | ०० | १३ | १५ | १५ | ०० |
| ०७. | संगणक शिक्षक (प्राथमिक) | ०१ | ०० | ०१ | ०० | ०० | ०० |
| ०८. | अंशकालीन निदेशक | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० |
| ०९. | पुर्व प्राथमिक सहा.शिक्षक | ०८ | ०० | ०२ | ०८ | ०० | ०० |
| | **एकुण** | **४२** | **००** | **३०** | **२६** | **२३** | **००** |

उपरोक्त तक्त्यातील अ.क्र.०३, ०७ व ०९ चे पदांचा शिक्षक संच मान्यतेमध्ये उल्लेख नाही. मात्र आकृतीबंधामध्ये सदरची पदे मंजुर आहेत.

- आकृतीबंधानुसार अ.क्र.०२ चे पदांमध्ये ०१ पद रिक्त ठरते, तरे संच मान्यतेनुसार ०३ पदे अतिरिक्त ठरतात.
- संच मान्यतेनुसार अ.क्र.०५ चे पदांमध्ये ०२ पदे अतिरिक्त ठरतात.
- तसेच आकृतीबंधानुसार अ.क्र.०६ चे पदांमध्ये ०५ पद रिक्त ठरतात, तर संच मान्यतेनुसार ०३ पदे रिक्त ठरतात.
- याव्यतिरिक्त प्राथमिक विभागाकडे ०५ शिक्षक परिविक्षाधीन म्हणून कार्यरत आहेत.

शैक्षणिक संकुलाकडील संच मान्यता, मंजुर आकृतीबंध व प्रत्यक्षात कार्यरत असणारे शिक्षक कर्मचारी या सर्व बाबींची अवलोकन करता त्यामध्ये सुसुत्रता, समानता आढळून येत नाही. काही पदांवर संच मान्यतेपेक्षा अधिक / कमी शिक्षक कार्यरत आहेत. तर काही पदांवर आकृतीबंधापेक्षा अधिक/कमी शिक्षक कार्यरत आहेत. यामध्ये सुसुत्रता येणे अत्यंत गरजेचे आहे.

विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांनी दि.०७.०८.२००९ रोजी संस्थानकरिता मंजुर केलेल्या आकृतीबंधामध्ये अ.क्र.०६ मध्ये समितीला आकृतीबंधाबाहेर जाऊन पद भरती करता येणार नाही, असे नमुद आहे. मात्र शैक्षणिक संकुलाकडील सद्यस्थितीचे अवलोकन करता, श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुल विभागाकडे मंजुर आकृतींधापेक्षा ०५ अतिरिक्त शिक्षक कार्यरत आहेत तसेच ०५ अतिरक्त शिक्षक परिविक्षाधीन म्हणून कार्यरत आहेत. म्हणजेच एकुण १० अतिरिक्त शिक्षक कार्यरत आहेत. तसेच कनिष्ठ महाविद्यालयाकडे मंजुर आकृतीबंधानुसार पदसंख्या बरोबर असली तरी संच मान्यतेनुसार ०६ पदे रिक्त दिसतात.

संस्थानच्या शैक्षणिक संकुलातील शाळांसाठी दरवर्षी विद्यार्थी संख्येनुसार तुकडयांमध्ये वाढ होत व त्याप्रमाणे शिक्षक संच शिक्षणाधिका-यांकडून मंजूर केला जातो.

यास्तव शैक्षणिक संकुलातील शाळांसाठी शासनस्तरावरुन आकृतीबंध निश्चित न करता शिक्षणधिका-यांकडून दरवर्षी ज्याप्रमाणे शिक्षक संच मान्यता मिळेल त्याप्रमाणे आकृतीबंध असणेस मान्यता मिळणेस विनंती.

निर्णय क्र.९४ **यावर सविस्तर चर्चा होऊन, शैक्षणिक संकुलाकडील आकृतीबंध शिक्षणाधिकारी/ शिक्षण उपसंचालकांकडून मंजूर करण्यात येणाऱ्या शिक्षणसंचाप्रमाणे करण्यास मान्यता देण्यात आली. परंतु याकामी विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांची पुर्वपरवानगीसाठी प्रस्ताव सादर करणेत यावा, असे ठरले.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, सामान्य प्रशासन)

---

**विषय नं.२१ श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुल विभागाकडील सुधारीत आकृतीबंधाप्रमाणे कार्यवाही करणेबाबत.**

**प्रस्ताव-** (अ) श्रीमती भांगरे, कु.आभाळे, श्रीमती कुमावत, कु.गोर्डे व कु.खरमाळे (सर्व सहा.शिक्षिका परिविक्षाधीन प्राथमिक विभाग, श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुल) यांनी मा.कार्यकारी अधिकारी महोदया, यांना अग्रेषित केलेल्या दि.२४.०४.२०१७ रोजीचे पत्रान्वये "आम्ही सहा.शिक्षिका प्राथमिक या पदावर कार्यरत आहोत. आमचा तीन वर्षाचा परिविक्षाधीन कालावधी दि.०५-०६.०८.२०१५ रोजी संपुष्टात आला आहे. सदर विषय दि.०८.१०.२०१५ रोजीच्या मा.व्यवस्थापन समितीचे बैठकीत विषय क्र.७ नुसार निर्णय क्र.३२६ प्रमाणे निर्णय करण्यात आलेला आहे. सदर निर्णय होऊन १ वर्ष ४ महिने उलटले असून अजुनही निर्णयाप्रमाणे आम्हांस पदावर कायम करुन पदाची नियत वेतनश्रेणी देण्याचे आदेश प्राप्त झालेले नाहीत. ह्या संपूर्ण परिस्थितीत आम्ही सर्व मानसिक तणावाखालून जात आहोत. तरी सदर मा.व्यवस्थापन समितीच्या निर्णयाप्रमाणे पदावर कायम करणयाचे आदेश देऊन साईंची अविरत सेवा करण्याची संधी द्यावी" अशी विनंती केलेली आहे.

**सदरबाबत वस्तुस्थिती खालीलप्रमाणे -**

१. मा.व्यवस्थापन समितीचे मान्यतेने माहे मे-२०१२ मध्ये वर्तमानपत्रात जाहिरात देऊन प्राथमिक विभागासाठी ०७ सहाय्यक शिक्षक नेमणेकामी दि.२०.०६.२०१२ अखेर अर्ज मागणी करण्यात आलेले होते.

२. मुदतीअंती पात्र उमदेवारांच्या दि.१५.०७.२०१२ रोजी लेखी परिक्षा व लेखी परिक्षेस हजर असलेल्या उमदेवरांची दि.२५.०७.२०१२ रोजी मुलाखती घेण्यात आल्या. त्यांचा निकाल सिलबंद ठेवण्यात आलेला होता.

३. त्यानंतर मा.व्यवस्थापन समितीचे दि.२९.०७.२०१२ रोजीच्या सभेतील निर्णय क्र.६५४ नुसार श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुल प्राथमिक विभागाकडे खालीलप्रमाणे ०५ शिक्षक/शिक्षिकांची सहाय्यक शिक्षक - परिविक्षाधीन (प्राथमिक विभाग) म्हणून नेमणूक करण्यात आलेली आहे.

| अ.नं. | उमेदवाराचे नांव | जात प्रवर्ग | शैक्षणिक पात्रता | सेवेत रुजू दिनांक | वेतन/ मानधन |
|---|---|---|---|---|---|
| ०१. | कु.भांगारे रेश्मा दशरथ | महादेव कोळी (एस.टी.) | एच.एस.सी., डी.एड. | दि.०६.०८.२०१२ | रु.६,०००/- दरमहा |
| ०२. | कु.आभाळे सोनाली मच्छिंद्र | मराठा (खुला) | एच.एस.सी., डी.एड. | दि.०७.०८.२०१२ | रु.६,०००/- दरमहा |
| ०३. | श्रीमती कुमावत कविता राजू (बेलदार कविता प्रभू) | बेलदार (एन.टी.) | एच.एस.सी., डी.एड. | दि.०६.०८.२०१२ | रु.६,०००/- दरमहा |
| ०४. | कु.गोर्डे स्नेहल शिवनाथ | मराठा (खुला) | एच.एस.सी., डी.एड. | दि.०७.०८.२०१२ | रु.६,०००/- दरमहा |
| ०५. | कु.खरमाळे शुभांगी सुदाम | मराठा (खुला) | बी.ए., डी.एड. | दि.०६.०८.२०१२ | रु.६,०००/- दरमहा |

४. सदर शिक्षिकांचा तीन वर्षांचा परिविक्षाधीन कालावधी अ.क्र.१,३, व ५ यांचा दि.०५.०८.२०१५ रोजी व अ.क्र.२ व ४ यांचा दि.०६.०८.२०१५ रोजी संपुष्ठात येत असल्याने सदरचे शिक्षकांना "दि महाराष्ट्र एम्प्लॉईज ऑफ प्रायव्हेट स्कूल्स, कंडीशन ऑफ रेग्युलेशन ऍक्ट १९७७ व रुल्स १९८१ मधील कलम नं.५" मधील तरतुदीनुसार परिविक्षाधीन कालावधी संपलेच्या तारखेपासून वेतनबॅण्ड ५२००-२०२०० अधिक ग्रेड पे २८०० नुसार वेतनश्रेणी देऊन संस्थान सेवेत कायम करणेबाबतचा प्रस्ताव मा.व्य.समितीचे सभेत सादर करण्यात आलेला होता.

५. सदर प्रस्तावावर मा.व्य.समितीचे दि.०८.१०.२०१५ रोजीचे सभेतील निर्णय क्र.३२६ नुसार "श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुलमध्ये प्राथमिक विभागाकडील प्रस्तावात नमुद केलेल्या ०५ सहाय्यक शिक्षक/शिक्षिका यांना त्यांच्या परिविक्षाधीन कालावधी संपलेचे तारखेपासून संस्थान सेवेत कायम करणेसाठी कार्यकारी अधिकारी यांनी त्यांच्या गोपनीय अहवालाची प्रतवारी तपासून नियमास अनुसरुन निर्णय घ्यावा" असे ठरले.

६. मात्र विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील दि.०७.०८.२००९ चे शासन निर्णयानुसार श्री साईबाबा संस्थान विश्वस्व्यवस्था, शिर्डीसाठी मंजुर केलेल्या आकृतीबंधामध्ये श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुलचे उच्च प्राथमिक विभागाकरिता ०४ व प्राथमिक विभागाकरिता ०८ पदसंख्या असतांना प्रत्यक्षात प्राथमिक विभागाकडे एकुण १३ सहा. शिक्षकांच्या नेमणूका करण्यात आलेल्या आहेत. म्हणजेच मंजुर आकृतीबंधानुसार प्राथमिक विभागासाठी ०५ सहा.शिक्षकांची पदे अतिरिक्त भरलेली आहेत.

७. त्या व्यतिरिक्त उपरोक्त ०५ सहा.शिक्षकांची पदे कायम करावयाची आहेत, त्यामुळे प्राथमिक विभागाकडील आकृतीबंधात मंजुर पदांपेक्षा १० पदे अतिरिक्त होत आहेत.

८. विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील दि.०७.०८.२००९ चे शासन निर्णयातील **अ.क्र.०६ मध्ये समितीला आकृतीबंधाबाहेर जाऊन पद भरती करता येणार नाही, असे नमुद आहे.**

९. त्यामुळे मंजुर आकृतीबंधापेक्षा १० पदे अतिरिक्त होत असल्याने प्रथमतः विधी व न्याय विभागाची मान्यता घेणे क्रमप्राप्त होते. करिता श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुल विभागाडील विद्यार्थी संख्या, नैसर्गिक तुकडी वाढ या सर्व बाबींचे अवलोकन करुन, इकडील जा.क्र.एसएसएस/ साप्रशा/ आस्था/ ३००६/ २०१६ दि.१२.०६.२०१६ अन्वये मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडे श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुल विभागाकरिता २२ वाढीव शिक्षक पदांसह आकृतीबंध मंजुर करणेबाबत प्रस्ताव सादर करण्यात आलेला होता.

१०. सदर पत्रास अनुसरुन मा.विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी त्यांचेकडील क्र.सासंवि-१०१६/१५२४/प्र.क्र१९१/का.१६ दि.१० नोव्हेंबर, २०१६ रोजीचे पत्रान्वये पुढीलप्रमाणे कळविलेले आहे. 'आस्थापना विषयक बाबी आणि वेतनावर होणा-या खर्चाचा भार विचारात घेऊन नवीन पदे निर्माण न करता आवश्यक सेवा बाह्ययंत्रणेद्वारे करवून घेण्याचे शासनाचे धोरण आहे. सदर धोरणानुसार श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुलमध्ये आवश्यक असणा-या २२ शिक्षकांची सेवा बाह्य यंत्रणेद्वारे करवून घेण्याबाबत व्यवस्थापन समितीचे अभिप्राय तसेच २२ पदे नव्याने निर्माण करावयाची झाल्यास होणारा आवर्ती आणि अनावर्ती खर्चाबाबतचा तपशील या विभागास उपलब्ध करुन देण्यात यावा"

११. मा.विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र राज्य यांचे उपरोक्त अभिप्रायानुसार त्यांनी श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुलमध्ये आवश्यक असणा-या २२ शिक्षकांची सेवा बाह्य यंत्रणेद्वारे करवून घेणेबाबत अभिप्राय दिलेले आहेत. मात्र इंग्लिश मिडीयम स्कुलमध्ये सद्यस्थितीत मंजुर आकृतीबंधापेक्षा ०५ अतिरिक्त सहा.शिक्षकांची विहित वेतनश्रेणी देऊन नेमणूक करण्यात आलेली आहे. तसेच अर्जदार ०५ सहा.शिक्षिका यांना शासन निर्णयानुसार तीन वर्ष परिविक्षाधीन कालावधीसाठी नेमणूका दिलेल्या असून त्यांचा परिविक्षाधीन कालावधी ऑगस्ट-२०१५ मध्येच संपलेला असून, ते आजपावेतो त्याच मानधनावर (रु.६,०००/- दरमहा एकत्रित वेतन) कार्यरत आहेत.

१२. त्यामुळे श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुलचे आकृतीबंधात प्राथमिक विभागासाठी किमान १० सहा.शिक्षकाची वाढीव पदे निर्माण करणेकामी मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र राज्य यांचेकडे प्रस्ताव सादर करणेस मा.व्य.समितीचे दि.२५.०२.२०१७ चे सभेत मान्यता देण्यात आलेली होती.

१३. त्यानुसार इकडील जा.क्र.एसएसएस/साप्रशा-आस्था/६०८०/ २०१७ दि.०१ मार्च, २०१७ अन्वये मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, मंत्रालय मुंबई यांचेकडे प्रस्ताव सादर केलेला होता.

आता विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णय क्र.सासंवि १०१७/ ३७८/ प्र.क्र.१७/का.१६ दि.२० डिसेंबर, २०१७ रोजीचे पत्रान्वये श्री.साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुल विभागाकडे खालीलप्रमाणे आकृतीबंध मंजुर करण्यात आला आहे.

| अ.क्र. | पदनाम | पुर्वीची पदसंख्या | सुधारीत पदसंख्या | वेतनश्रेणी |
|---|---|---|---|---|
| ०१. | प्राचार्य | ०१ | ०१ | ९३००-३४८०० + ग्रेड पे ४८०० |
| ०२. | सहा.शिक्षक (माध्यमिक) | ०८ | ०८ | ९३००-३४८०० + ग्रेड पे ४३०० |
| ०३. | संगणक शिक्षक (माध्यमिक) | ०१ | ०१ | ५२००-२०२०० + ग्रेड पे २४०० |
| ०४. | उच्च प्राथमिक सहा.शिक्षक | ०४ | ०४ | ५२००-२०२०० + ग्रेड पे २८०० |
| ०५. | प्राथमिक सहा.शिक्षक | ०८ | १८ | ५२००-२०२०० + ग्रेड पे २८०० |
| ०६. | संगणक शिक्षक (प्राथमिक) | ०१ | ०१ | ५२००-२०२०० + ग्रेड पे १९०० |
| ०७. | पुर्व प्राथमिक सहा.शिक्षक | ०८ | ०८ | ५२००-२०२०० + ग्रेड पे १९०० |
| ०८. | वरिष्ठ लिपीक | ०१ | ०१ | ५२००-२०२०० + ग्रेड पे २४०० |
| ०९. | लिपीक टंकलेखक | ०१ | ०१ | ५२००-२०२०० + ग्रेड पे १९०० |
| १०. | मदतनीस (पुरुष) | ०९ | ०९ | ४४४०-७४४० + ग्रेड पे १३०० |
| ११. | मदतनीस (महिला) | ०४ | ०४ | ४४४०-७४४० + ग्रेड पे १३०० |
| १२. | शिपाई | ०१ | ०१ | ४४४०-७४४० + ग्रेड पे १३०० |

तसेच शासन निर्णय क्र.सासंवि २०१४/८०/प्र.क्र.२५/का.१६, दि.२५ सप्टेंबर, २०१४ नुसार श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुलच्या आस्थापनेवरील आकृतीबंधात प्राथमिक विभागासाठी मुख्याध्यापकाचे एक स्वंतत्र पद समाविष्ठ करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे.

उपरोक्त दि.२० डिसेंबर, २०१७ रोजीचे शासन निर्णयानुसार श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुल विभागाकडील आकृतीबंधामधील प्राथमिक विभागाकडील सहा.शिक्षकांच्या १० नवीन पदांचा समावेश करण्यात आलेला आहे. मा.व्य.स.चे दि.०८.१०.२०१५ रोजीचे सभेतील निर्णय क्र.३२६ नुसार पाचही परिविक्षाधीन सहा.शिक्षिका यांचे मागील तीन वर्षांचे गोपनीय अहवालाची प्रतवारी खालीलप्रमाणे

| अ.क्र. | सहा.शिक्षिकेचे नांव | गोपनीय अहवालाची प्रतवारी | | | ३ वर्षांची सरासरी प्रतवारी |
|---|---|---|---|---|---|
| | | सन २०१२-१३ | सन २०१३-१४ | सन २०१४-१५ | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ०१. | कु.भांगारे रेश्मा दशरथ | B+ | B+ | B+ | B+ |
| ०२. | कु.आभाळे सोनाली मच्छिंद्र | B+ | B+ | A | B+ |
| ०३. | श्रीमती कुमावत कविता राजू | B+ | B+ | B+ | B+ |
| ०४. | कु.गोर्डे स्नेहल शिवनाथ | B+ | B+ | B+ | B+ |
| ०५. | कु.खरमाळे शुभांगी सुदाम | B+ | B+ | A | B+ |

उपरोक्त पाचही परिविक्षाधीन सहा.शिक्षिका यांचे तीन वर्षांचे गोपनीय अहवालाची सरासरी प्रतवारी B+ अशी आहे. तसेच ०५ ही शिक्षिकांचे काम समाधानकारक असलेबाबत प्राचार्य, श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुल, यांनी अभिप्राय दिलेला आहे.

उपरोक्त शासन निर्णयातील मंजुर पदसंख्या, सबंधीत परिविक्षाधीन सहा.शिक्षक यांचे परिविक्षाधीन कालावधीमधील गोपनीय अहवालाची प्रतवारी, प्राचार्य, इंग्लिश मिडीयम स्कुल यांचा अभिप्राय या सर्वांचा विचार करता खालील तक्त्यात निर्देशीत केल्याप्रमाणे सबंधीत परिविक्षाधीन सहा.शिक्षक प्राथमिक यांना संस्थान सेवेत कायम करता येईल, असे नम्र मत आहे.

| अ.नं. | उमेदवाराचे नांव व जात प्रवर्ग | शैक्षणिक पात्रता | सेवेत रुजू दिनांक | परिविक्षाधी कालावधी संपल्यांची दिनांक | संस्थान सेवेत कायम करावयाची दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| ०१. | कु.भांगारे रेश्मा दशरथ<br>महादेव कोळी (एस.टी.) | एच.एस.सी., डी.एड. | दि.०६.०८.२०१२ | दि.०५.०८.२०१५ | **दि.२०.१२.२०१७** |
| ०२. | कु.आभाळे सोनाली मच्छिंद्र<br>मराठा (खुला) | एच.एस.सी., डी.एड. | दि.०७.०८.२०१२ | दि.०६.०८.२०१५ | **दि.२०.१२.२०१७** |
| ०३. | श्रीमती कुमावत कविता राजू<br>(बेलदार कविता प्रभू)<br>बेलदार (एन.टी.) | एच.एस.सी., डी.एड. | दि.०६.०८.२०१२ | दि.०५.०८.२०१५ | **दि.२०.१२.२०१७** |
| ०४. | कु.गोर्डे स्नेहल शिवनाथ<br>मराठा (खुला) | एच.एस.सी., डी.एड. | दि.०७.०८.२०१२ | दि.०६.०८.२०१५ | **दि.२०.१२.२०१७** |
| ०५. | कु.खरमाळे शुभांगी सुदाम<br>मराठा (खुला) | बी.ए., डी.एड. | दि.०६.०८.२०१२ | दि.०५.०८.२०१५ | **दि.२०.१२.२०१७** |

सबंधीत शिक्षिकांना सुधारीत आकृतीबंध मंजुर झाल्याचे दिवसापासून (दि.२०.१२.२०१७) संस्थान सेवेत कायम करुन, प्राथमिक विभागाकडील सहा.शिक्षक या पदाची वेतनश्रेणी ५२००-२०२०० + ग्रेड पे २८०० व सदर वेतनश्रेणीत अनुज्ञेय असणारे वेतन व भत्ते देता येईल. सदर वेतनश्रेणीमध्ये त्यांचे सुरुवातीचे दरमहा मुळवेतन रु.८५६०/- असे राहील.

**(ब)** जा.नं.एसएसएस/साप्रशा/आस्था/२५८१/२०१५ दि.०७.१०.२०१५ रोजीचे आदेशान्वये शैक्षणिक संकुलाकडील आस्थापना विषयक कामकाज सामान्य प्रशासन विभागाकडे वर्ग करण्यात आलेले आहे. त्यानंतर उपरोक्त परिच्छेद अ मध्ये नमुद केलेल्या परिविक्षाधीन शिक्षिका यांना संस्थान सेवेत कायम करणेबाबतचा विषय समोर आला असता, श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुल विभागाकडील मंजुर आकृतीबंधापेक्षा अतिरिक्त सहा.शिक्षकांची पदे संस्थान सेवेत कायम केले असल्याचे निर्देशनास आले. त्यामुळे उपरोक्त पाच परिविक्षाधीन शिक्षिका यांना संस्थान सेवेत कायम करण्याचा विषय स्थगित ठेऊन, आकृतीबंधापेक्षा जादा असणा-या पदांना प्रथम मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांची मान्यता घेण्यात आली, त्याबाबत उपरोक्त परिच्छेद अ मध्ये सविस्तर नमुद केलेले आहे. मात्र आकृतीबंधामध्ये जागा शिल्लक नसतांनाही कायम केलेल्या सहा.शिक्षकांचा तपशिल खालीलप्रमाणे -

| अ.नं. | उमेदवाराचे नांव | शैक्षणिक पात्रता | सेवेत रुजू दिनांक | संस्थान सेवेत कायम करुन वेतनश्रेणी लागू केल्याची दिनांक |
|---|---|---|---|---|
| ०१. | श्रीमती बोधक ज्योती अरुण | एच.एस.सी., डी.एड. | दि.०१.०९.२०१० | दि.०१.०९.२०१३ |
| ०२. | कु.ठोकळ सोनिया प्रकाश | एच.एस.सी., डी.एड. | दि.०७.०९.२०१० | दि.०७.०९.२०१३ |
| ०३. | श्री.राशिनकर रावसाहेब रामभाऊ | एच.एस.सी., डी.एड. | दि.२७.०९.२०१० | दि.२८.०९.२०१३ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ०४. | श्री.पवार शेखर गुलाब | बी.एस्सी., डी.एड. | दि.०१.१०.२०११ | दि.०१.१०.२०१४ |
| ०५. | श्रीमती गजरे वैजयंता निवृत्ती | एच.एस.सी., डी.एड. बी.ए. (मुक्त विद्यापीठ) | दि.११.११.२०११ | दि.११.११.२०१४ |

उपरोक्त शिक्षकांच्या नेमणूक करतांना विहित पद्धतीने वर्तमानपत्रात जाहिरात देऊन, मा.व्यवस्थापन समितीची मान्यता घेऊन नेमणूक करण्यात आलेल्या आहेत. तसेच त्यांचा परिविक्षाधीन कालावधी संपल्यानंतर त्यांना सदर पदाची विहित वेतनश्रेणी देऊन, संस्थान सेवेत कायम करतांना देखील मा.व्यवस्थापन समितीची मान्यता घेण्यात आलेली आहे. मात्र आकृतीबंधामध्ये पद शिल्लक नसतांनाही उपरोक्त ०५ सहा.शिक्षकांना प्रथम शिक्षणसेवक म्हणून ०३ वर्ष व त्यानंतर प्राथमिक विभाग सहा.शिक्षकाची विहित वेतनश्रेणी ५२००-२०२०० + ग्रेड पे २८०० देऊन संस्थान सेवेत कायम करण्यात आलेले आहे. आकृतीबंधामध्ये पदे शिल्लक नसतांनाही पदभरती करुन, त्यांना सदर पदांच्या विहित वेतनश्रेणी देऊन संस्थान सेवेत कायम करणे ही बाब शासन मान्य आकृतीबंधानुसार योग्य नाही.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्या व्यवस्थापनासाठी शासनाने पारित केलेल्या श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम – २००४ मधील कलम १३ (४) अन्वये संस्थान विश्वस्तव्यवस्थेचा कारभार कार्यक्षमतेने चालविण्यासाठी आणि या अधिनियमान्वये तिची कर्तव्ये व कामे पार पाडण्यासाठी आवश्यक वाटतील अशा अधिका-यांची आणि कर्मचा-यांची नेमणूक समितीला करता येते. परंतू ज्या अधिका-याला किंवा कर्मचा-याला दरमहा दोन हजार रुपयांहून अधिक वेतन देण्यात येत असेल किंवा द्यावयाचे असेल, अशा कोणत्याही अधिका-याची किंवा कर्मचा-यांची नेमणूक, समितीकडून असे पद शासनाने मान्य केलेल्या कर्मचारी आकृतीबंधानुसार मंजूर करण्यात येईपर्यंत केली जाणार नाही, अशी तरतुद करण्यात आली आहे.

तसेच श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम – २००४ च्या कलम ३० मधील तरतुदी नुसार संस्थान व्यवस्थापन समितीने आपल्या अधिकारांचे उल्लंघन करुन अथवा प्राप्त अधिकारांपेक्षा अधिक अधिकारांचा वापर करुन केलेला ठराव अथवा आदेश तहकुब किंवा खंडीत किंवा रद्द करण्याचा अधिकार राज्य शासनाला आहे.

या अधिकारानुसार विधि व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई शासन निर्णय क्र.सासंवि१०१७/ १६७/ प्र.क्र.१६/ का.१६ दि.१५ एप्रिल, २०१७ रोजीचे पत्रान्वये श्री साईबाबा संस्थानच्या तत्कालीन व्यवस्थापन समितीने दि.०५.११.२००५ रोजीच्या बैठकीत संस्थान रुग्णालयातील कर्मचा-यांना शासनाच्या पुर्व मान्यतेशिवाय नियुक्त करण्याबाबत व संबंधित अधिकारी आणि कर्मचा-यांना पुर्वलक्षी प्रभावाने सुधारीत वेतनश्रेणी लागू करण्याबाबत घेतलेला निर्णय क्र.६६७ हा संस्थान अधिनियमातील तरतूदींशी विसंगत असून व्यवस्थापन समितीने प्राप्त अधिकाराचा अधिक वापर करुन घेतला आहे. सदर ठराव अवैध तसेच नियमबाह्य असल्याने संस्थानच्या व्यवस्थापन समितीने संस्थान रुग्णालयातील अधिकारी व कर्मचारी यांना कर्मचारी आकृतीबंधास मान्यता मिळाल्यानंतर संबंधितांच्या हजर तारखेपासून वेतनश्रेणीवर नेमणूका देण्यास व देय होणारी फरकाची रक्कम अदा करण्याबाबत दि.०५.११.२००५ रोजी घेतलेला निर्णय क्र.६६७ (ब) हा श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम, २००४ च्या कलम ३० मधील तरतुदीनुसार रद्द करण्यात येत आहे. तसेच सदर शासन निर्णयाच्या प्रभावाने आवश्यक असणारी कार्यवाही कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्याद्वारे करण्यात येईल, असे नमुद केलेले आाहे.

त्यामुळे श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुल विभागाकडील प्राथमिक विभागाकडील आकृतीबंधापेक्षा अतिरिक्त नेमणूक केलेल्या ०५ सहा.शिक्षक पदांबाबत उपरोक्त शासन निर्णयामध्ये नमुद केलेप्रमाणे तसेच श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम – २००४ मधील कलम १३ (४) प्रमाणे तरतुदींची पालन करणे बंधनकारक आहे. त्यामुळे सदर सहा.शिक्षक यांना ज्या दिवशी (दि.२०.१२.२०१७) सुधारीत आकृतीबंध मंजुर झाला त्या दिवशीपासून संस्थान सेवेत कायम करुन, सदर पदाची विहित वेतनश्रेणी ५२००-२०२०० + ग्रेड पे २८०० अशी देता येईल. तसेच त्यांना यापुर्वी वेतनश्रेणीनुसार दिलेले वेतन समान हप्त्यामध्ये वसुल करणे योग्य होईल, असे नम्र मत आहे.

**(क)** तसेच विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील दि.०७.०८.२००९ अन्वये श्री साईबाबा संस्थान विश्वस्व्यवस्था, शिर्डीचे श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुलकरिता मंजुर केलेल्या आकृतीबंधामध्ये

तसेच विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील दि.२० डिसेंबर, २०१७ अन्वये मंजुर केलेल्या सुधारीत आकृतीबंधामध्ये संगणक शिक्षक (माध्यमिक) व संगणक शिक्षक (प्राथमिक) यांच्या नमुद केलेल्या वेतनश्रेणी व त्यांना सध्या देण्यात येत असलेल्या वेतनश्रेणीचा तपशिल खालीलप्रमाणे -

| अ.क्र. | पदनाम | पद संख्या | दि.०७.०८.२००९ व दि.२०.१२.२०१७ चे शासन निर्णयात नमुद वेतनश्रेणी | प्रत्यक्षात देण्यात येत असलेली वेतनश्रेणी | वेतनश्रेणी दिलेली दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| ०१. | संगणक शिक्षक (माध्यमिक) | ०१ | ४०००-६०००<br>५२००-२०२०० + ग्रेड पे २४०० | ९३००-३४८०० + ग्रेड पे ४३०० | दि.०१/०५/२०११ |
| ०२.. | संगणक शिक्षक (प्राथमिक) | ०१ | ३०५०-४५९०<br>५२००-२०२०० + ग्रेड पे १९०० | ५२००-२०२०० + ग्रेड पे २८०० | दि.०१/०५/२०११ |

महाराष्ट्र शासन शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, मंत्रालय मुंबई यांचेकडील क्रमांक इसैशा-२००६/ प्र.क्र.१७७/ माशि-७ दि.३० जून, २००९ रोजीचे निर्णयामध्ये सैनिकी शाळातील संगणक निदेशक व शिक्षण निदेशक यांना दि.०१.०१.२००६ पासून अनुक्रमे रु.९३००-३४८०० + ग्रेड वेतन ४३०० आणि रु.५२००-२०२०० + ग्रेड वेतन रु.२४०० ही सुधारीत वेतन संरचना लागू करण्यात आलेली आहे. यास अनुसरुन तत्कालीन प्रशासनाने सबंधीत संगणक शिक्षक उपरोक्त नमुद केलेप्रमाणे वेतनश्रेणी दिलेल्या आहेत.

सदर शासन निर्णय हा सैनिकी शाळांसाठी आहे, तसेच त्यामध्ये संगणक निदेशक व शिक्षण निदेशक यांच्या वेतनश्रेणीबाबत उल्लेख आहे. त्यामध्ये संगणक शिक्षक यांचे वेतनश्रेणीबाबत उल्लेख नाही. असे असतांनाही श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुलकडील संगणक शिक्षक यांना संस्थानचे मंजुर आकृतीबंधामध्ये नमुद केलेली वेतनश्रेणी न देता माध्यमिक विभागाकडील संगणक शिक्षकास माध्यमिक सहा.शिक्षक यांची वेतनश्रेणी व प्राथमिक विभागाकडील संगणक शिक्षक यांना प्राथमिक विभागाकडील सहा.शिक्षकाची वेतनश्रेणी देण्यात आलेली आहे. सदर वेतनश्रेणी देतांना मंजुर आकृतीबंधातील नियमानुसार विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांची मान्यता घेणे क्रमप्राप्त होते, मात्र सदरची मान्यता घेतलेली दिसून येत नाही.

सबब सदर शिक्षकांना देण्यात आलेली वेतनश्रेणी रद्द करुन, त्यांना संस्थानचे दि.०७.०८.२००९ रोजीचे मंजुर आकृतीबंधामध्ये नमुद केलेली वेतनश्रेणी देऊन, यापुर्वी जादा देण्यात आलेले वेतन समान हप्त्यामध्ये वसुल करता येईल, असे नम्र मत आहे.

तरी उपरोक्त परिच्छेद **"अ" "ब"** व **"क"** बाबत निर्णय होणेस विनंती.

निर्णय क्र.९५ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुल विभागाकडील सुधारीत आकृतीबंधाप्रमाणे प्रस्तावात नमुद केलेल्या "अ" "ब" व "क" प्रमाणे कार्यवाही करणेस मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, सामान्य प्रशासन)

---

विषय नं.२२ **स्टेट बँक ऑफ इंडीया, शाखा-शिर्डी यांना संस्थान मालकीची शिर्डी येथील सिटी स.नं.३२ मधील साईनाथछाया इमारतीतील पहिल्या मजल्यावरील वापरास दिलेल्या जागेस मुदतवाढ देणेबाबत.**

प्रस्ताव- **अधिनियमातील तरतुद-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी),अधिनियम २००४ मधील कलम १७(०३) मध्ये विश्वस्तव्यवस्थेमध्ये निहित झालेली कोणताही स्थावर मालमत्ता राज्य शासनाचे लेखी पुर्वमंजुरीने असेल त्या खेरीज समितीकडुन एका वर्षापेक्षा अधिक मुदतीकरिता भाडेपट्ट्याने देण्यात येणार नाही, किंवा गहाण टाकण्यात येणार नाही, विकण्यात येणार नाही, किंवा अन्यथा अन्य संक्रमीत करण्यात येणार नाही, अशी तरतुद आहे.

**प्रस्ताव-** स्टेट बॅंक ऑफ इंडीया,शाखा शिर्डी यांना संस्थान मालकीची शिर्डी येथील सिटी स.नं.३२ मधील साईनाथ छाया इमारतीतील पहिल्या मजल्यावरील वापरास दिलेल्या जागेस मुदतवाढ देणेबाबत

**प्रस्तावना-** स्टेट बॅंक ऑफ इंडीया शाखा,शिर्डी यांना संस्थान मालकीची शिर्डी येथील सि.स.नं.३२ मधील साईनाथछाया इमारतीमधील पहिल्या मजल्यावरील क्षेत्र् १६२.८८ चौ.मी.जागा वापरास मा. व्यवस्थापन समितीचे दि २५/०२/२०१७ रोजीच्या बैठकीतील निर्णय क्रं.८८ अन्वये दरमहा रक्कम रु.९०,०००/- मात्र व

मिटर रिडींगप्रमाणे विद्युत आकार वेगळा आकारुन लिव्ह ॲण्ड लायसन्स तत्वावर दि.११/११/२०१६ ते दि.१०/११/२०१७ या एक वर्षाचे कालावधीसाठी मुदतवाढ देण्यात आली आहे.

सदरची मुदत दि.१०/११/२०१७ रोजी संपुष्टात आलेली असल्याने मा. शाखाधिकारी स्टेट बॅंक इंडीया शाखा,शिर्डी यांनी त्यांचेकडील दि.२९/१२/२०१७ रोजीच्या पत्रान्वये उक्त मिळकत वापरण्यासाठी पुढील ११ महिन्यांसाठीची मुदत वाढवून मिळणेकामी विनंती केली आहे.

यापुर्वी मासिक भाड्याबाबत दि ०३/०२/२०१७ रोजी मा. शाखाधिकारी स्टेट बॅंक ऑफ इंडीया शाखा, शिर्डी यांचेशी समक्ष चर्चा केली असुन, त्यावेळेस सदरच्या चर्चेत शाखाधिकारी यांनी उक्त जागेचे दरमहा रु. ९०,०००/- मात्र् इतके भाडे देणेस कबुल केले असुन, त्यात यापुढे दरवर्षी १० टक्के वाढ करुन व मिटर रिडींग प्रमाणे विद्युत आकार वेगळा आकारुन करारनामा करुन देणेबाबत मान्य केलेले आहे.

**विभागाचा अभिप्राय-** स्टेट बॅंक इंडीया शाखा ,शिर्डी यांना दि.१०/११/२०१७ पासुन पुढे ११ महिन्यासाठी जागा वापराची मुदत वाढवून दिल्यास सदर जागेचा वापर १ वर्षापेक्षा जास्त कालावधीचा होत असल्याने यापुढे मुदतवाढ द्यावयाची झाल्यासश्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी अधिनियम २००४ मधील कलम १७(०३) चे तरतुदी नुसार शासनाची पुर्व परवानगी घेणे आवश्यक राहील.

तरी शाखाधिकारी, स्टेट बॅंक ऑफ इंडीया शाखा,शिर्डी याना संस्थान मालकीचे स.नं.३२मधील साईनाथछाया इमारतीतील पहिल्या मजल्यावरील क्षेत्र १६२.८८चौ.मी.ही जागा दि.११/११/२०१७ ते दि.१०/१०/२०१८ या ११ महिन्यांचे कालावधीसाठी मागील मासिक परवाना फी मध्ये १०%वाढ करुन म्हणजेच रु.९०,०००/- + रु.९,०००/-(१०%) =रु.९९,०००/- (अक्षरी रु.नव्यान्नव हजार मात्र ) इतके दरमहा मासिक भाडे व मिटर रिडींग प्रमाणे विद्युत आकार वेगळा आकारुन शासनाचे पुर्व परवानगीने मुदतवाढ देता येईल व लिव्ह ॲण्ड लायसन्स करारनामा करता येईल.

सदरचा प्रस्ताव मा.प्रधान सचिव,विधी व न्याय विभाग,महाराष्ट्र शासन,मंत्रालय,मुंबई यांचेकडेस मान्यतेसाठी सादर करणेसाठीच्या निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.९६ **यावर सविस्तर चर्चा होऊन, स्टेट बॅंक ऑफ इंडीया शाखा, शिर्डी याना स.नं.३२ मधील साईनाथछाया इमारतीतील पहिल्या मजल्यावरील क्षेत्र १६२.८८चौ.मी. जागा दि.११/११/२०१७ ते दि.१०/१०/२०१८ या ११ महिन्यांचे कालावधीसाठी मागील मासिक परवाना फी मध्ये १०% वाढ करुन रु.९९,०००/- मात्र दरमहा मासिक भाडे व मिटर रिडींग प्रमाणे विद्युत आकार वेगळा आकारुन शासनाचे पुर्व परवानगीने मुदतवाढ देण्यात यावी, असे ठरले.**
(कार्यवाही- प्र.अधिक्षक, मालमत्ता विभाग)

---

विषय नं.२३ **श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप. सोसायटी लि., शिर्डी यांना जनरल स्नानगृह (पिंपळवाडी रोडलगत) या व्यवसायास मुदतवाढ देणेबाबत.**

प्रस्ताव- **अधिनियमातील तरतूद** - संस्थान अधिनियम २००४ मधील कलम १७(३) मध्ये विश्वस्तव्यवस्थेमध्ये निहित झालेली कोणतीही स्थावर मालमत्ताराज्य शासनाच्या लेखी पूर्वमंजूरीने असेल त्याखेरीज समितीकडून एका वर्षापेक्षा अधिक मुदतीकरीता भाडेपट्टयाने देण्यात येणार नाही किंवा गहाण टाकण्यात येणार नाही,विकण्यात येणार नाही किंवा अन्यथा अन्य संक्रमित करण्यात येणार नाही.

**प्रस्ताव-** श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप.सोसायटी लि,शिर्डी यांना जनरल स्नानगृह (पिंपळवाडी रोडलगत) या व्यवसायास मुदतवाढ देणेबाबत..

**प्रस्तावना** - मा.त्रिसदस्यीय समितीचे दि.०९/१०/२०१४ रोजीचे सभेतील निर्णय क्र.९०३ अन्वये श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप.सोसायटी लि.शिर्डी यांना दि.०१/११/२०१४ ते दि.३१/१०/२०१५ अखेरे १२ महिने कालावधीसाठी इकडील जा.नं.एसएसएस/वशी/ वशी-विधी/३९३२/२०१४ दि.१८/११/२०१४ अन्वये मागिल परवाना फी रु.१०,०००/-मध्ये १०% वाढ करुन म्हणजे रु.११,०००/- व विद्युत बील मीटर रिडींगप्रमाणे वेगळे आकारुन मुदतवाढीचा आदेश देण्यात आलेला असुन, त्यांचेकडुन करारनामा करुन घेण्यात आलेला आहे. तसेच भक्तांकडुन गरम पाण्यासाठी प्रति बादली रु.३/- आकारणेबाबत सोसायटीस ठरवून दिलेले आहे. त्याची मुदत दि.३१/१०/२०१५ रोजी संपुषटात आलेली आहे.

श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को- ऑप सोसायटी लि. शिर्डी यांनी त्यांचेकडील जा.नं. श्रीसासंए क्रेकोऑसो/ १०९/ २०१५ दि.१८/०७/२०१५ रोजीचे पत्रान्वये संस्था साईभक्तांचे सेवेसाठी व सोयीसाठी संस्थानचे जनरल स्नानगृह (पिंपळवाडी रोडलगत) येथे चालवत असलेल्या स्नानगृह या व्यवयासाची मुदत

दि.३१/१०/२०१५ रोजी पुर्ण होत असल्याने साईभक्तांच्या सेवेसाठी व सोयीसाठी सदर व्यवसायास संस्थेस पुढील ०५ वर्षांकरीता चालविण्यास मुदतवाढ मिळावी, अशी विनंती केली आहे.

संस्थान अधिनियम २००४ मधील कलम १७(३) मध्ये विश्वस्तव्यवस्थेमध्ये निहित झालेली कोणतीही स्थावर मालमत्ताराज्य शासनाच्या लेखी पूर्वमंजूरीने असेल त्याखेरीज समितीकडून एका वर्षापेक्षा अधिक मुदतीकरीता भाडेपट्टयाने देण्यात येणार नाही किंवा गहाण टाकण्यात येणार नाही,विकण्यात येणार नाही किंवा अन्यथा अन्य संक्रमित करण्यात येणार नाही, अशी तरतूद आहे. तसेच त्यावेळेस त्रिसदस्यीय समिती असल्याकारणाने मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ, औरंगाबाद यांनी सिव्हील ॲप्लीकेशन नं.१२०५६/२०१२ पी.आय.एल.१८/२०११ मध्ये दि.१६ ऑक्टोंबर २०१२ रोजी समितीला खालीलप्रमाणे आदेश दिले आहे.

(6) We Direct that, without prior permission of this court, the committee

(a) Shall not take any steps in creating third party interest in the movable or immovable properties of the respondent no.2 trust

म्हणजेच मा.कोर्टाच्या परवानगीशिवाय संस्थानचे चल वा अचल मालमत्तेसंदर्भात कोणत्याही प्रकारे ति-हाईत व्यक्तीचा हक्क निर्माण होईल असे पाऊल उचलु नये असा आदेश झालेला आहे.

परंतु सिव्हील ॲप्लीकेशन नं.३६८६/२०१४ मधील मा.उच्च न्यायालयाचे दि.०२/०५/२०१४ रोजीचे आदेशास अनुसरुन (Considering day today management needs urgency in the matter we allow the committee to take such decision) लिव्ह ॲण्ड लायसन्स तत्वावर मा.त्रिसदस्य समिती सभेचे मान्यतेने मुदतवाढ देता येईल,असे नमूद आहे.

सदर बाबी विचारात घेता श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप.सोसायटी लि.शिर्डी यांचे उपरोक्त दि.१८/०७/२०१५ रोजीचे पत्रास अनुसरुन सोसायटीस जनरल स्नानगृह (पिंपळवाडी रोडलगत) पुढील एक वर्षोकरीता मागील मासिक परवाना रु.११,०००/- मध्ये १०% वाढ करुन (रु.११,०००/- + १०% रक्कम रु.१,१००/- = रु.१२,१००/-) (अक्षरी रु.बारा हजार शंभर मात्र) व विद्युत बील मीटर रिडींगप्रमाणे वेगळे आकारुन गरम पाणी पुरविणेचे व्यवसायास दि.०१/११/२०१५ ते दि.३१/१०/२०१६ या एक वर्षाचे कालावधीसाठी मुदतवाढ देणेबाबतचा प्रस्ताव मा.त्रिसदस्य समितीचे दि.२०/०८/२०१५ रोजीचे सभेपूढे सादर करणेत आला. त्यात निर्णय २७५ अन्वये खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे.

यावर सविस्तर चर्चा होऊन, सदरहू प्रस्ताव शासन मान्यतेसाठी पाठविणेत यावा.

तसेच श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप.सोसायटी लि.शिर्डी यांना स्नानगृह या व्यवसायास त्यांची मुदत संपलेपासून पुढे एक वर्ष कालावधीसाठी अथवा शासन आदेश येईपर्यंत यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत लिव्ह ॲण्ड लायसन्स तत्वावर मासिक परवाना फी मध्ये १०% वाढ करुन व विद्युत बील मीटर रिडींगप्रमाणे वेगळे आकारण्यात येऊन मागील अटी शर्तीवर मुदतवाढ देण्यास मान्यता देण्यात आली.

सदर निर्णयाप्रमाणे उक्त सोसायटी बरोबर दि.०९/१०/२०१५ रोजी दि.०१/११/२०१५ ते दि.३१/१०/२०१६ या कालावधीसाठीचा करारनामा करुन घेण्यात आलेला आहे. तसेच उपरोक्त निर्णयात नमूद केलेप्रमाणे इकडील पत्र जा.नं.एसएसएसटी/ मालमत्ता/४४७८/२०१५ दि.१०/११/२०१५ अन्वये सदर बाबतचा प्रस्ताव मा.प्रधान सचिव,विधी व न्याय विभाग,मंत्रालय,मुंबई यांचेकडेस सादर करणेत आला. त्यास अनुसरुन मा.कार्यासन अधिकारी,विधी व न्याय विभाग,मंत्रालय,मुंबई यांनी त्यांचेकडील उपरोक्त संदर्भ जा.क्रं.सासंवि-१०१५/१०१४/प्र.क्र.१८०/का.१६ दि.२०/०५/२०१७ अन्वये शिर्डी विभागाचे कार्यकारी अभियंता यांचेकडून भाडे निश्चित करुन घेवून त्याबाबतचे प्रमाणपत्र प्राप्त करुन घेण्यात यावे आणि विद्युत वापरासह इतर अटी व शर्तीसह प्रस्ताव फेरसादर करण्यात यावा, असेबाबत इकडेस कळविलेले आहे.

उक्त पत्राच्या अनुषंगाने इकडील जा.नं.एसएसएसटी/मालमत्ता/३७९१/२०१७ दि.१४/१०/२०१७ अन्वये उपअभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग,राहाता यांचेकडेस संस्थान मालकीच्या सर्वे नं.३ पै. जागेत बांधीव स्नानगृह व स्वच्छतागृह क्षेत्र २३८.६९ चौमी. या क्षेत्राचे भाडे निश्चित करुन मिळणेबाबत कळविले होते. त्यास अनुसरुन कार्यकारी अभियंता,सार्वजनिक बांधकाम विभाग,संगमनेर यांनी त्यांचेकडील जा.नं./ रेशा/ ८७२०/ २०१७ दि.२८/१२/२०१७ अन्वयेचे भाडे प्रमाणपत्र इकडेस सादर केले असून त्यात उक्त जागेचे दरमहा भाडे रु.३०,१८८/- स्थानिक कर वगळून ठरविण्यात आलेले असून सदरचे प्रमाणपत्र हे सदर इमारत ताब्यात घेतल्यापासून ते इमारत रिक्त करेपर्यंत ग्राहय राहील,असेबाबत नमूद केलेले आहे.

प्रस्तुत बाबतचा प्रस्ताव शासनाकडे सादर करणेत आलेला असलेने व शासनाकडून त्याबाबत इकडेस कोणतेही आदेश प्राप्त झालेले नसलेने सोसायटीस वापरास दिलेली जागा अद्यापही सोसायटीच्या वापरात आहे.

म्हणजेच पुढील दि.०१/११/२०१६ ते दि.३१/१०/२०१७ या १२ महीन्यांचा कालावधीदेखील संपुष्टात आलेला आहे. उक्त सोसायटीने त्यांचेकडील पत्र क्रं.श्रीसासंएक्रेएसो/१०३/२०१६ दि.३१/०८/२०१६ अन्वये दि.०१/११/२०१६ पासून पुढील ५ वर्षाकरीता उपरोक्त व्यवसायाकामी उक्त जागा वापरास मिळणेकामी विनंती केलेली आहे.

**विभागाचा अभिप्राय-** मा.कार्यासन अधिकारी, विधी व न्याय विभाग,मंत्रालय, मुंबई यांचेकडील दि.२०/०५/२०१७ रोजीचे पत्राचे अनुषंगाने उक्त सोसायटीकडून दि.०१/११/२०१६ ते दि.३१/१०/२०१७ या एक वर्षाचे कालावधीसाठी सार्वजनिक बांधकाम विभागाने निश्चित केलेल्या दरमहा भाडे रक्कम रु.३०,१८८/- व विद्युत बील मीटर रिडींगप्रमाणे वेगळे आकारता येईल. तसेच पुढील दि.०१/११/२०१७ ते दि.३०/०९/२०१८ या ११ महीन्यांच्या कालावधीसाठी वरीलप्रमाणेच दरमहा भाडे रु.३०,१८८/- व विद्युत बील मीटर रिडींगप्रमाणे वेगळे आकारुन शासनाचे पूर्वपरवानगी मुदतवाढ देता येईल.

तरी शासनाचे उपरोक्त दि.२०/०५/२०१७ रोजीचे पत्राचे अनुषंगाने सदरचा प्रस्ताव शासनाचे विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडेस सादर करणेकामीच्या व उक्त सोसायटीबरोबर उपरोक्त कालावधीसाठीचा करारनामा करुन घेणेच्या निर्णयार्थ सदरचा प्रस्ताव सादर.

**निर्णय क्र.९७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, मालमत्ता विभाग)

---

**विषय नं.२४** **श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप. सोसायटी लि., शिर्डी या संस्थेस संस्थान परिसरात पादत्राणेगृह, क्लोकरुम, मोबाईल कॅमेरा क्लोकरुन, प्रसाद, नॉव्हेल्टी, दुध व दुग्धजन्य पदार्थ, थंडपेय विक्री स्टॉलसाठी जागा/ गाळे उपलब्ध होऊन मिळणेकामी मा.चेअरमन, श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप. सोसायटी लि., शिर्डी यांचे दि.०६.०९.१७ रोजीचे पत्र.**

प्रस्ताव- **अधिनियमातील तरतूद**– श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम २००४ चे १७(३) मध्ये विश्वस्तव्यवस्थेमध्ये निहित झालेली कोणतीही स्थावर मालमत्ता राज्य शासनाच्या लेखी पूर्वमंजूरीने असेल त्याखेरीज समितीकडून एका वर्षापेक्षा अधिक मुदतीकरीता भाडेपट्टयाने देण्यात येणार नाही किंवा गहाण टाकण्यात येणार नाही, विकण्यात येणार नाही किंवा अन्यथा अन्य संक्रमित करण्यात येणार नाही, अशी तरतूद आहे.

**प्रस्ताव**– श्री साई संस्थान एम्लॉईज क्रेडीट को-ऑप.सोसायटी लि.शिर्डी या संस्थेस संस्थान मालकीच्या विविध ठिकाणच्या परिसरातील जागा/गाळे संस्थेला विविध प्रकारच्या व्यवसायासाठी भाडेतत्वावर उपलब्ध करुन देणेबाबत..

**प्रस्तावना-** मा.चेअरमन, श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप सोसायटी लि.शिर्डी यांनी त्यांचेकडीनल जा.नं. श्रीसासंएक्रेसो/१६२/२०१७ दि.०६/०९/२०१७ अन्वये संस्थान मालकीच्या विविध ठिकाणच्या परिसरातील जागा/गाळे पादत्राणेगृह,क्लोकरुम,मोबाईल कॅमेरा क्लोकरुम,प्रसाद,नॉव्हेल्टी,दूध व दुग्धजन्य पदार्थ,थंडपेय विक्री स्टॉलसाठी भाडेतत्वावर उपलब्ध होवून मिळणेसाठी इकडेस विनंतीपत्र सादर केलेले आहे.

त्यास अनुसरुन इकडील दि.०७/१०/२०१७ व दि.३०/१०/२०१७ रोजीचे पत्रान्वये संबंधीत विभागांकडून सोसायटीने मागणी केलेली जागा/गाळे सोसायटीस भाडेतत्वावर देणेकामीचे अभिप्राय मागविणेत आले.त्याप्रमाणे संबंधीत विभागांनी खालीलप्रमाणे इकडेस अभिप्राय सादर केलेले आहेत.

**परिशिष्ट अ**

| अ.नं. | सोसायटीने मागणी केलेले जागा/ गाळयाचे ठिकाण | जागा/गाळे वापराचे प्रयोजन | संबंधित विभागाचे नाव | उक्त सोसायटीस जागा/गाळे वापरासाठीचे विभागाचे अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| १. | साईआश्रम-०१ (H- विंगसमोर) | दुग्धजन्य पदार्थ,थंडपेय, व प्रसाद विक्री तसेच जनरल स्टोअर. | साईआश्रम-०१ (H- विंगसमोर) | साईआश्रम-१ या भक्तनिवास परिसरात ए ते जी या सात इमारत परिसरात सदर संस्थेस तीन गाळे भाडेतत्वावर दिलेले असुन पहाटे ०४ ते १२ या वेळेत सदर गाळयामध्ये निवासी परिसरात मोठया प्रमाणात साईभंक्ताची गर्दी असते. येथे सकाळचे वेळी एच ते एल या पाच इमारतीतील साईभक्तांना साबण, |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | | पिण्याचे पाणी,ब्रश,पेस्टइ.आवश्यक साहित्य वेळेवर उपलब्ध व्हावे या करीता तात्पुरत्या स्वरुपात एक स्टॉलची आवश्यकता आहे.तरी प्रशासकीय इमारतीचे (आर-ब्लॉक) दक्षिण बाजूस लांडू विक्री कांऊटर आहे.त्या शेजारील जागा संस्थान नियमाप्रमाणे प्रस्तावित केलेप्रमाणे सोसायटीचे मालकीचा एक स्टॉल वाढवावा. |
| २. | साईआश्रम-२ धर्मशाळा (श्री साईबाबा ज्यु.कॉलेजचे दक्षिण बाजूस) | दुग्धजन्य पदार्थ,थंडपेयविक्री स्टॉल | साईआश्रम धर्मशाळा | श्री साईबाबा ज्युनिअर कॉलेजचे दक्षिण प्रवेशव्दारा जवळ दुग्धजन्य पदार्थ, थंडपेय, विक्री स्टॉलसाठी पार्किंग परिसरामध्ये जागा उपलब्ध करुन देता येईल. |
| ३. | व्दारावती भक्तनिवासस्थान | नॉव्हेल्टी स्टोअर | व्दारावती | नॉव्हेल्टी स्टोअर बरोबरच क्लोकरुम सुविधा उपलब्ध करुन देणेत यावी. |
| ४ | साईबाबा भक्तनिवासस्थान | प्रसाद व नॉव्हेल्टी स्टोअर | भक्तनिवासस्थान | भक्तनिवास - डी गाळा नं.२,३, व ४ यामध्ये यापुर्वी सोसायटी मार्फत नॉव्हेल्टी स्टोअर व प्रसाद स्टोअर चालविले जात होते.सद्यस्थितीमध्ये सदर गाळयाचा वापर लाडू विक्री कांऊटर, सा.भ.नि. गादी स्टोअर व कॅन्टीन विभाग या विभागीय कामासाठी होत आहे.तथापी पर्यायी व्यवस्था करुन सोसायटीस देता येईल. |
| ५. | श्री साईप्रसादालय | प्रसाद विक्री स्टोअर | श्री साईप्रसादालय | प्रसाद विक्री स्टॉलसाठी श्री साईप्रसादालय IN गेटजवळ एक स्टॉल करिता जागा दिलेली असुन सदर स्टॉल साईभक्तांस अपुरा पडत असल्यांने प्रसादालय परिसरात वाढीव जागा देणेस हरकत नाही. |
| ६. | साईप्रसाद निवासस्थान (सेवाधाम इमारतीमधील प.कडिल रुम नं.५४,५५ व ५६ मध्ये किंवा कानिफनाथ मंदिरासमोर सध्या असलेल्या सेवाधाम इमारतीचे रुममध्ये) | प्रसाद, नॉव्हेल्टी ,थंडपेय व दुग्धजन्य पदार्थ. | साईप्रसाद निवास | सेवाधाम इमारतीचे पश्चिमेकडील रुम नं.५४ हा संस्थान कर्मचारी श्री.नाना गुरुव यांना निवासाकरीता देण्यात आला आहे.रुम नं.५५ श्री साईबाबा संस्थान कर्मचारी संघटना (श्री.राजेद्र जगताप) यांचे कार्यालयासाठी देण्यात आला आहे. रुम नं. ५६ श्री साईनाथ कर्मचारी गृह तारण संस्थेसाठी देण्यात आला आहे. तसेच कानिफनाथ मंदिरासमोरील रुम नं.६८ व ६९ श्री साईबाबा कर्मचारी संघटना (श्री.रामराव शेळके) यांना देण्यात आले आहे.रुम नं.७० होमगार्ड कार्यालय व रुम नं.७१ एम.एस.ई.बी |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | | कार्यालयास देण्यात आले आहे. |
| ७. | मंदिर परिसर शनिमहाराज जवळील (पुर्वी शनिअप्पा यांचेकडे असलेला जागा/गाळा) | तेल,रुईचा हार व प्रसाद विक्री | मंदिर विभाग | सदरची खोली सत्यनारायण महाप्रसादबनविणेकामी व प्रसाद सत्यनारायण हॉलपर्यंत पोहच करणेकामी सोईचे असल्याने तसेच सत्यनारायण प्रसाद बनविणेकामी जवळपास कुठलेही जागा उपलब्ध नसल्याने जागा देता येणार नाही. |
| ८. | मंदिर विभाग (अब्दुलबाबा समाधीचे मागील बाजूस असलेला जागा/गाळा ) | प्रसाद विक्री स्टॉल | मंदिर विभाग | अभिप्राय प्राप्त नाही. |
| ९. | शैक्षणिक संकुल | शालेय साहित्य अल्पदराने विक्री करणेसाठी | १.औ.प्र.संस्था, शिर्डी<br><br>२. इं.मि.स्कूल<br><br>३. कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालय | संस्थेच्या प्रांगणात एकही गाळा नाही. तथापि मोकळया जागेमध्ये गाळा सुरु करणेचे अनुषंगाने मुख्य गेटजवळ उपलब्ध जागेमध्ये सदर सोसायटीस जागा उपलब्ध करुन देता येईल.<br><br>शैक्षणिक संकुलाचे प्रवेशद्वार उत्तर बाजूचे भिंतीलगत पूर्व बाजूने स्टॉलसाठी जागा उपलब्ध करुन देता येईल.<br>प्रवेशद्वाराच्या डाव्या बाजूस जागा उपलब्ध करुन देण्यात येत आहे. |
| १०. | श्री साईनाथ रुग्णालय (रुग्णालय परिसरातील कॅन्टीनसमोरील रिकामे जागेत) | जनरल स्टोअर,दुगधजन्य पदार्थ,थंडपेय स्टोअर. | साईनाथ रुगणालय | श्री साईनाथ रुग्णालयात गाळा उपलब्ध नसुन चहा कॅन्टीन समोरच्या मोकळया जागेत सोसायटी स्टॉलसाठी जागा देता येईल. |
| ११ | साईनाथ मंगल कार्यालयाचे उत्तर पूर्व बाजूस | दुग्धजन्य पदार्थ व थंडपेय विक्री स्टॉल | लाडू व बर्फी निर्मिती विभाग | मंगल कार्यालयाचे आतमध्ये जागा उपलब्ध नाही. मात्र मंगल कार्यालयाचे पश्चिम बाजूस असणारी संरक्षक भिंत व मंगल कार्यालय यांच्यामध्ये लिंबाचे झाडाखाली साधारणत: अंदाजे ८फूट x १० फूटाची त्रिकोणी जागा उपलब्ध आहे. सदरील मोकळया जागेत साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप.सोसायटी,शिर्डी यांना दुग्धजन्य पदार्थ व थंडपेय विक्री स्टॉल सुरु करण्यास इकडील विभागाची कोणतीही हरकत नाही. |

**अ)** (१) उपरोक्त अ.नं.६ साईप्रसाद निवासस्थान या इमारतीत सोसायटीस वापरास देणेसाठी सध्यस्थितीत गाळा/जागा उपलब्ध नाही. (२) उपरोक्त अ.नं.७ व ८ मंदिर परिसरात सुरक्षेच्या कारणास्तव यापूर्वी दिलेली जागा/गाळे खाली करुन घेण्यात आलेले आहेत. त्यामुळे या बाबीचा पुन:श्च विचार करता येणार नाही.

**ब)** उपरोक्त अ.नं.१साईआश्रम भाग-१, अ.नं.२ साईआश्रम-२ (धर्मशाळा),अ.नं.३ द्वारावती भक्तनिवास,अ.नं.५ साईप्रसादालय विभाग, अ.नं.१० साईनाथ रुग्णालय, अ.नं.११ साईनाथ मंगल कार्यालय परिसरात प्रत्येकी सुमारे १०x१० ची मोकळी जागा आणि अ.नं.९ शैक्षणिक संकुलात एकूण तीन ठिकाणी १०x१० आकाराची मोकळी जागा तसेच अ.नं.४ साईबाबा भक्तनिवासस्थान मधील तीन गाळयांचे मा.कार्यकारी अभियंता,सार्वजनिक बांधकाम विभाग यांचेकडून भाडे निश्चिती करुन घेवून शासनाचे विधी व न्याय विभागाचे मान्यतेने ११ महीन्यांचे कराराने सोसायटीस वापरास देता येतील असेबाबतचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे दि.१४/११/२०१७ रोजीचे सभेपूढे निर्णयार्थ सादर करणेत आलेला होता. त्यात निर्णय क्रं.९६८ प्रमाणे खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे.

यावर सविस्तर चर्चा होऊन,श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप.सोसायटी लि.शिर्डी या संस्थेस संस्थान परिसरात पादत्राणेगृह,क्लोकरुम,मोबाईल कॅमेरा क्लोकरुम,प्रसाद,नॉव्हेल्टी,दुध व दुग्धजन्य पदार्थ,थंडपेय विक्री स्टॉलसाठी जागा/गाळे उपलब्ध करुन देणेबाबतचा उपरोक्त प्रस्ताव प्रथमत स्थानिक उपसमिती सभेसमोर सादर करणेत यावा, असे ठरले.

सदर निर्णयाप्रमाणे प्रस्तुतचा प्रस्ताव मा.स्थानिक उपसमितीचे दि.२१/१२/२०१७ रोजीचे सभेपूढे सादर करणेत आला. त्यात श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप.सोसायटी,शिर्डी यांचेकडे संस्थानचे किती गाळे वापरासाठी आहे व आता त्यांची किती गाळयांची मागणी आहे,याबाबतचे माहीतीसह प्रस्ताव सादर करणेबाबत उपसमितीने शिफारस केलेली आहे.

त्यास अनुसरुन मा.व्यवस्थापन समितीचे दि.०८/१२/२०१७ रोजीच्या सभेत आयत्या वेळचा विषय नं.१ दि.०६/१२/२०१७ रोजी शिर्डी येथे झालेल्या स्थानिक उपसमिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे, यातील निर्णय क्रं.१०५१(११) प्रमाणे खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे.

यावर सविस्तर चर्चा होऊन, "श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप.सोसायटी लि.शिर्डी या संस्थेकडे संस्थानचे किती गाळे वापरासाठी आहेत व आता त्यांची किती गाळयांची मागणी आहे, यासह सविस्तर प्रस्ताव पुढील सभेसमोर सादर करणेत यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली."

उपरोक्त निर्णयाच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे माहीती सादर करणेत येत आहे.

**परिशिष्ट ब**

सध्यस्थितीत उक्त सोसायटीस खालीलप्रमाणे गाळे/जागा वापरास देणेत आलेले आहेत.

| अ.नं. | सोसायटीस वापरास दिलेल्या जागा/गाळयांचे ठिकाण | जागा/गाळे वापराचे प्रयोजन | मासिक भाडे |
|---|---|---|---|
| १ | सुलभ | क्लोकरुम | ५,५००/- |
| २ | साईप्रसाद नं.१ (दक्षिणेस) | क्लोकरुम | ५,५००/- |
| ३ | साईप्रसाद नं.१ (रुम नं.१३) | क्लोकरुम | ५,५००/- |
| ४ | साईप्रसाद नं.१ (रुम नं.१४) | क्लोकरुम | ५,५००/- |
| ५ | साईप्रसाद | एस.टी.डी.(प्रसाद स्टोअर) | ५,५००/- |
| ६ | साईप्रसाद | दुध स्टॉल | ५,५००/- |
| ७ | साईप्रसाद नं.१ परिसर | मोबाईल कॅमेरा क्लोकरुम | ५,५००/- |
| ८ | साईउद्यान परिसर | मोबाईल कॅमेरा क्लोकरुम | ५,५००/- |
| ९ | साईप्रसाद नं.१ | पादत्राणेगृह | ५,५००/- |
| १० | साईउद्यान परिसर | पादत्राणेगृह | ५,५००/- |
| ११ | साईनाथछाया | क्लोकरुम व मोबाईल क्लोकरुम | ८,८५८/- |
| १२ | साईआश्रम भाग १ | थंडपेय स्टॉल (कियॉस्क) | ३,६३०/- |
| १३ | साईआश्रम भाग १ | कियॉस्क | ३,६३०/- |
| १४ | साईआश्रम भाग २ | कियॉस्क | ३,६३०/- |
| १५ | साईप्रसादालय परिसर | संस्थेचा स्टॉल | ३,६३०/- |
| १६ | द्वारावती परिसर | कियॉस्क | ३,६३०/- |
| १७ | साईउद्यान परिसर | कियॉस्क | ३,६३०/- |
| १८ | साईप्रसाद | संस्थेचा स्टॉल | ३,६३०/- |
| १९ | नवीन भक्तनिवास परिसर | कियॉस्क | ३,६३०/- |
| २० | साईआश्रम भाग १ | प्रसाद स्टोअर (कियॉस्क) | ३,६३०/- |

| | | | |
|---|---|---|---|
| २१ | द्वारावती परिसर | कियॉस्क | ३,६३०/- |
| २२ | साईउद्यान परिसर | संस्थेचा स्टॉल | ३,६३०/- |
| २३ | साईप्रसाद (नवीन भक्तनिवास परिसर) | कियॉस्क | ३,६३०/- |
| २४ | साईआश्रम भाग १ | जनरल स्टोअर (संस्थेचा स्टॉल) | ३,६३०/- |
| २५ | नवीन भक्तनिवास परिसर | संस्थेचा स्टॉल | ३,६३०/- |
| २६ | स्वागतकक्ष | स्वागतकक्ष क्लोकरुम | १,०३७/- |
| २७ | पिंपळवाडी रोडलगत | जनरल स्नानगृह | १२,१००/- |
| २८ | गुरुस्थान शेजारी | मोबाईल कॅमेरा क्लोकरुम | ४,८४०/- |

**विभागाचा अभिप्राय**-उपरोक्तप्रमाणे उक्त सोसायटीस सध्यस्थितीत गाळे/जागा लिव्ह ॲण्ड लायसन्स करारावर वापरास देण्यात आलेले आहेत. त्याव्यतिरिक्त उक्त सोसायटीने उपरोक्त **परिशिष्ट अ** मध्ये दर्शविलेप्रमाणे एकूण १३ ठिकाणी गाळे/जागा वापरास मागणी केलेली आहे.

तथापि उपरोक्त **परिशिष्ट अ** मधील अ.नं.६ मधील साईप्रसाद निवासस्थान या इमारतीत सोसायटीस वापरास देणेसाठी सध्यस्थितीत गाळा/जागा उपलब्ध नाही. तसेच अ.नं.७ व ८ मधील मंदिर परिसरात सुरक्षेच्या कारणास्तव यापूर्वी दिलेली जागा/गाळे खाली करुन घेण्यात आलेले आहे. यामुळे या बाबीचा विचार करता येणार नाही.

मात्र उपरोक्त **परिशिष्ट अ** मधील अ.नं.१ साईआश्रम भाग १, अ.नं.२ मधील साईआश्रम २ (धर्मशाळा), अ.नं.३ मधील द्वारावती भक्तनिवास, अ.नं.४ मधील साईबाबा भक्तनिवासस्थान मधील ३ गाळे, अ.नं.५ मधील साईप्रसादालय विभाग, अ.नं.९ मधील शैक्षणिक संकुलात एकूण ३ ठिकाणी १०x१० आकाराची मोकळी जागा, अ.नं.१० मधील साईनाथ रुग्णालय, अ.नं.११ मधील साईनाथ मंगल कार्यालय परिसरात प्रत्येकी सुमारे १०x१० ची मोकळी जागा इ.ठिकाणच्या जागांचे/गाळयांचे मा.कार्यकारी अभियंता,सार्वजनिक बांधकाम विभाग यांचेकडून भाडे निश्चिती करुन घेवून शासनाचे विधी व न्याय विभागाचे मान्यतेने ११ महीन्याचे लिव्ह ॲण्ड लायसन्स कराराने उक्त सोसायटीस वापरास देता येतील.

सदरचा प्रस्ताव निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.९८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेल्या परिशिष्ट अ मधील अ.नं.१ साईआश्रम भाग १, अ.नं.२ मधील साईआश्रम २ (धर्मशाळा), अ.नं.३ मधील द्वारावती भक्तनिवास, अ.नं.४ मधील साईबाबा भक्तनिवासस्थान मधील ३ गाळे, अ.नं.५ मधील साईप्रसादालय विभाग, अ.नं.९ मधील शैक्षणिक संकुलात एकूण ३ ठिकाणी १०x१० आकाराची मोकळी जागा, अ.नं.१० मधील साईनाथ रुग्णालय, अ.नं.११ मधील साईनाथ मंगल कार्यालय परिसरात प्रत्येकी सुमारे १०x१० ची मोकळी जागा इ.ठिकाणच्या जागांचे/गाळयांचे मा.कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग यांचेकडून भाडे निश्चिती करुन ११ महीन्याचे लिव्ह ॲण्ड लायसन्स कराराने श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप. सोसायटी लि., शिर्डी या संस्थेस जागा/ गाळे उपलब्ध करुन देण्यात यावे.**

**तसेच जुने साईप्रसादालय परिसरामध्ये फळे विक्रीचा व्यवसाय करणाऱ्या संबंधीत १४ फळ विक्रेत्यांचाही सहानुभूतीने विचार करणेत यावा, असे ठरले.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, मालमत्ता विभाग)

---

**विषय नं.२५** **मौजे रुई, ता.राहाता, जि.अहमदनगर येथील जमीन गट नं.२८८अ, २८८/ब, २८८/क व गट नं.२९४ पै. एकूण क्षेत १०.२३ हेक्टर क्षेत्र संस्थानला कायम खरेदी घेणेबाबतचा मा.व्यवस्थापन समितीचे दि.२४.०९.२०११ रोजीच्या सभेतील निर्णय क्र.७५९ प्रमाणे कार्यवाही करणेकामी शासनाची मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियमातील तरतूद**– श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम २००४ चे कलम १७(२)(ट) मध्ये विकास करण्याच्या व विश्वस्तव्यवस्थेच्या योजना राबविण्याच्या प्रयोजनासाठी तसेच विश्वस्तव्यवस्थेची उद्दिष्टे व प्रयोजने पार पाडण्यासाठी आवश्यक त्या जमीनी व इमारती संपादीत करील किंवा खरेदी करील,अशी तरतूद आहे.

**प्रस्ताव**– मौजे रुई,ता.राहाता,जि.अहमदनगर येथील जमीन गट नं.२८८अ,२८८/ब,२८८/क व गट नं.२९४ पै.एकूण क्षेत्र १०.२३ हेक्टर क्षेत्र संस्थानला कायम खरेदी घेणेबाबतचा मा.व्यवस्थापन समितीचे दि.२४/०९/२०११ रोजीच्या सभेतील निर्णय क्रं.७५९ प्रमाणे कार्यवाही करणेकामी शासनाची मान्यता मिळणेकामी अहवाल सादर करणे ..

**प्रस्तावना**–

**पूर्वपिठीका** – १) यापूर्वी राधा कालियनदास दर्यानानी चॅरिटेबल ट्रस्ट,मुंबई यांनी मौजे रुई शिवारामध्ये सुमारे ५४ एकर ११ गुंठे जमीन संस्थानला काही अटी व शर्तीवर दान म्हणून देण्याचे प्रस्तावित केलेले होते. त्यात त्यांचे नावावर प्रत्यक्षात असलेल्या खालील नमूद केलेल्या जमीनी बक्षिसपत्राने देवू केलेल्या होत्या.

**परिशिष्ट अ-**

| अ.नं. | गट नंबर | दर्यानानी ट्रस्टचे नावावर असलेले क्षेत्र |
|---|---|---|
| १ | २९३ | ०७ हे ३२ आर ०० चौमी |
| २ | २७५ | ०० हे ६९ आर ०० चौमी |
| ३ | २८० | ०० हे ६१ आर ०० चौमी |
| ४ | २८३ | ०० हे ४६ आर ०० चौमी |
| ५ | २८४ | ०० हे ४८ आर ०० चौमी |
| ६ | २८५ | ०० हे ५४ आर ०० चौमी |
| | एकूण | १० हे १० आर ०० चौमी |

तसेच खालील परिशिष्ट "ब" मध्ये नमूद केलेल्या मौजे रुई,ता.राहाता येथील जमीनी त्यांचे प्रत्यक्षात नावावर नसलेल्या परंतु त्या जमीनी संबंधात राधा कालियनदास दर्यानानी चॅरिटेबल ट्रस्ट,मुंबई यांना असलेले कायदेशीर अधिकार संस्थानला देण्याबाबत प्रस्तावित केलेले आहे.

**परिशिष्ट ब-**

| अ.नं. | गट नंबर | क्षेत्र<br>हे.आर.चौमी | कब्जेदार सदरी असलेली नावे |
|---|---|---|---|
| १ | २९४ | ०५.९०.०० | राजेंद्र चांदमल भनसाळी/सुभाष चांदमल भनसाळी |
| २ | २७३ | ०१.९२.०० | भिमबाई बाबुराव कहांडळ |
| ३ | २७४ | ००.७४.०० | एकनाथ सहादू पठारे/शिवनाथ सहादू पठारे/रेल्वेकडे |
| ४ | २८८ अ | ०३.०६.०० | लखीचंद कचरदास भंडारी |
| ५ | २८८ ब | ००.५४.०० | पुष्पाताई लखीचंद भंडारी |
| ६ | २८८ क | ००.९७.०० | पुष्पाताई लखीचंद भंडारी |
| | एकूण | १३.१३.०० | |

२) उपरोक्त परिशिष्ट अ मधील जमीन गट नं.२९३ क्षेत्र ७ हे.३२ आर इतके दर्यानानी ट्रस्टने संस्थानला दि.०१/१२/२००९ रोजी नोंदणीकृत बक्षिसपत्रान्वये दिलेले आहे. परिशिष्ट अ मधील उर्वरित जमीनीचे संबंधात न्यायालयात वाद सुरु असल्याने सदर जमीनींचे बक्षिसपत्र होवू शकलेले नाही.

३) उपरोक्त परिशिष्ट ब मधील जमीनींचे मूळ मालकाशी राधा कालियनदास दर्यानानी चॅरिटेबल ट्रस्ट,मुंबई यांनी सन १९८७-८८ मध्ये जमीन खरेदीचा करार केलेला होता.

४) तद्नंतर मुळ मालक श्री.लखीचंद कचरदास भंडारी व इतर यांनी त्रयस्थ इसम श्री.संग्राम माधवराव देशमुख यांचेबरोबर उक्त जमीनीचा व्यवहार ठरवून त्यांना विसार पावती करुन दिली.

५) सदर व्यवहारासंबंधात श्री.संग्राम माधवराव देशमुख यांनी दै.सार्वमत व दै.लोकमत मध्ये जाहीर नोटीस प्रसिध्द केली. त्यास अनुसरुन राधा कालियनदास दर्यानानी चॅरिटेबल ट्रस्ट यांनी हरकत घेतली. त्यामुळे श्री.संग्राम माधवराव देशमुख यांनी श्री.भंडारी/भनसाळी व दर्यानानी चॅरिटेबल ट्रस्ट यांचेविरुध्द मा.दिवाणी न्यायाधीश, व.स्तर,कोपरगाव यांचे कोर्टात स्पे.मु.नं. ४९/२००८ चा दावा दाखल केला. सदर दाव्यात दि.०५/०३/२०१२ रोजीच्या करारनाम्यानुसार वादी व प्रतिवादी क्रं.१ ते ५ यांचे दि.०६/०३/२०१२ रोजी तडजोड होवून दावा निकाली काढण्यात आला.

६) उपरोक्त दावा चालू असतांना अर्जदार यांनी संस्थानकडे सदर जमीनी खरेदी करणेकामी दि.१७/११/२०११ रोजी अर्ज केलेला होता. त्या अनुषंगाने सदर जमीनीचे किंमतीबाबत दि.२४/०९/२०११ मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील विषय नं.१७ मधील निर्णय क्रं.७५९ प्रमाणे खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे.

"उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होवून यापूर्वी मा.व्यवस्थापन मंडळाने दि.१०/१०/२०१० रोजीचे सभेत घेतलेल्या निर्णयास अनुसरुन दर्यानानी ट्रस्ट यांची वर नमूद केलेली जमीन सर्व कायदेशीर बाबींची पडताळणी व पुर्तता करुन रु.५५,००,०००/- प्रति एकर या दराने खरेदी करण्यात यावी. याकामी विहीत पध्दतीने संस्थान वकीलामार्फत जमीनीचा सर्च रिपोर्टसह अभिप्राय घेणेत यावा तसेच वकीलामार्फत जमीनीबाबत कोणत्याही व्यक्तीची/संस्थेची हरकत नाही याबाबत वृत्तपत्रात जाहीर नोटीस प्रसिध्द करुन जमीनी खरेदीस कोणाचीही हरकत नाही,याबाबत पडताळणी करण्यात यावी. दर्यानानी ट्रस्ट,संबंधीत जमीन मालक व इतर हितसंबंधीत व्यक्ती/संस्था यांचेत असणारे सर्व न्यायालयीन दावे निपटल्यानंतर जमीन मालकांनी संस्थानकडे जमीन विक्रीचा स्वतंत्ररित्या प्रस्ताव सादर करावा. त्यानुसार जमीनीचे खरेदीखत नोंदणीचे वेळेस जमीनीच्या एकूण किंमतीच्या ८० टक्के रक्कम अदा करणेस व उर्वरित २० टक्के रक्कम जमीनीस संस्थानचे नाव लागलेनंतर संस्थानमार्फत रितसर शासकीय मोजणी करुन ताब्यात मिळणारे जमीनीच्या प्रमाणात रक्कम जमीन मालकांना अदा करणेस तसेच जमीन खरेदीकामी मुद्रांक व नोंदणी शुल्क,सरकारी मोजणी शुल्क,वकील फी आदी अनुषंगिक योग्य त्या समावेशक खर्चास मान्यता देण्यात यावी,असे ठरले". असे बाबतचा निर्णय झालेला आहे.

सदर निर्णयाच्या अनुषंगाने दि.१४/०१/२०१२ रोजीच्या दै.सार्वमत व दै.पुण्यनगरी आणि दि.१५/०१/२०१२ रोजीच्या दै.गावकरी या स्थानिक वृत्तपत्रात जाहीर नोटीस प्रसिध्द करण्यात आल्या. त्यास अनुसरुन १) श्री.राजीव गणपत मयेकर यांनी हरकत घेवून जमीन मालक यांनी त्यांना २००७ साली विसार पावती करुन दिलेचे नमूद केलेले आहे. तसेच २) श्री.राजेंद्र चंदनमल भनसाळी यांनी हरकत घेवून उक्त वडीलोपार्जित जमीनीचे अद्यापपावेतो वाटप झालेले नसलेचे नमूद केलेले आहे. ३) मॅनेजर,साई नागरी सहकारी पतपुरवठा संस्था यांनी हरकत घेवून उक्त जमीनी जमीन मालक यांनी त्यांचे पतसंस्थेस नजर गहाणखत करुन दिलेले आहे. आणि ४) राधाबाई कालियनदास चॅरिटेबल ट्रस्ट,मुंबई यांनी हरकत घेवून त्यात उक्त जमीनीसंबंधात न्यायालयात वाद न्यायप्रविष्ट आहे. त्याचे निराकरण झालेशिवाय जमीन मालकांना उक्त जमीनी खरेदी देता येणार नाही,असेबाबत नमूद केलेले आहे.

उपरोक्त निर्णयात नमूद केलेप्रमाणे उक्त जमीनींचा सर्च रिपोर्टसंबंधात संस्थान पॅनलवरील वकील ॲड.जे.के.गोंदकर यांनी उपरोक्त हरकतीचा विचार करता सदर जमीनीबाबतचे दावे मा.न्यायालयात न्यायप्रविष्ट असल्याने सदर बाबीचे प्रथम निराकरण झालेशिवाय उपरोक्त जमीन मालकांच्या जमीनी संस्थानकरीता खरेदी करणे योग्य व उचित आणि कायदेशीर होणार नाही, त्यामुळे सदर जमीनींचा ३० वर्षांचा सर्च रिपोर्ट तुर्त देणेचे कारण नाही,असेबाबत त्यांचेकडील दि.०७/०२/२०१२ रोजीच्या पत्रान्वये कळविलेले आहे.

७) तद्नंतर सदर जमीनींचे किंमतीबाबत दि.१७/०९/२०१३ रोजीच्या मा.व्यवस्थापन समितीच्या सभेतील विषय नं.४ मध्येनिर्णय क्रं.६१६ प्रमाणे निर्णय झाला की, "सदरहू जमीनीचा शासनाच्या रेडी रेकनरप्रमाणे रेट घेण्यात यावा व त्यानुसार

सुधारीत प्रस्ताव तयार करुन तो व्यवस्थापन समितीसमोर निर्णयार्थ सादर करण्यात यावा,असे ठरले."
सदर निर्णयाप्रमाणे उक्त जमीनींचे मुल्यांकन मिळणेकामी मा.मुद्रांक जिल्हाधिकारी तथा सहजिल्हा निबंधक, अहमदनगर यांचेकडेस पत्रव्यवहार करणेत आला. तथापि दरम्यानचे काळात श्री.संग्राम माधवराव देशमुख यांनी मे.दिवाणी न्यायालय,व.स्तर,कोपरगाव यांचे कोर्टात स्पे.मु.नं.५९/२०१२ चा दाखल केलेला असलेने सदर निर्णयाप्रमाणे कार्यवाही पूर्ण झाली नाही.

८) तद्नंतर दि.०४/०२/२०१४ रोजीच्या मा.व्यवस्थापन समितीच्या सभेत निर्णय क्रं.८९ अन्वये प्रमाणे, "साईभक्तांना सोयी-सुविधा पुरविणेसाठी प्रस्तावित जमीनीची संस्थानला आवश्यकता असून जर सर्व पक्षकार एकत्रितपणे मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठासमोर संस्थानला जमीन देणेकामी लेखी देत असतील तर तसा प्रस्ताव मा.खंडपीठासमोर सादर करता येईल. मात्र तत्पूर्वी याकामी मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठामध्ये संस्थानच्या वतीने काम पाहणारे ॲड.चौकीदार यांचा सल्ला घेण्यात यावा,असे ठरले."

सदर निर्णयाप्रमाणे ॲड.चौकीदार यांचेकडेस पत्रव्यवहार करणेत आलेला आहे व वेळोवेळी स्मरणपत्र देण्यात आले. तथापि त्यांचेकडून कोणत्याही प्रकारचे अभिप्राय प्राप्त झालेले नाहीत.

९) उपरोक्त स्पे.मु.नं.४९/२००८ मधील दि.०६/०३/२०१२ रोजी झालेल्या तडजोडीप्रमाणे व त्यातील दि.०५/०३/२०१२ रोजीच्या करारनाम्यानुसार मूळ जमीन मालक यांनी उपरोक्तजमीनी संस्थानला विकत घेण्यास सहकार्य केले नाही व करारनाम्यानुसार कार्यवाही करणेस अडथळे निर्माण केले आणि ॲड.रविराज लालाजी गोतीस यांनी त्यांचे जाहीर न केलेल्या पक्षकारासाठी दावा मिळकत मूळ जमीन मालक यांचेकडून खरेदी घेणेबाबतचे विधान केले व त्यांना त्यापोटी विसार दिल्याचे विधान केले म्हणून श्री.संग्राम माधवराव देशमुख यांनी

मे.दिवाणी न्यायाधीश,व.स्तर,कोपरगाव यांचे कोर्टात सौ.पुष्पाताई लखीचंद भंडारी,श्री.लखीचंद कचरदास भंडारी, श्री.राजेंद्र चंदनमल भनसाळी,श्री.सुभाष चंदनमल भनसाळी,श्रीमती राधाबाई कालियनदास दर्यानानी चॅरिटेबल ट्रस्ट,श्री.अभिजित जितेंद्र शहा,श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी आणि अॅड.रविराज लालाजी गोतीस यांचेविरुध्द दि.२६/०९/२०१२ रोजी स्पे.मु.नं.५९/२०१२ चा दावा दाखल केलेला आहे.

१०) सदर दाव्याचे कामकाज अद्याप चालू असून त्यात उपरोक्त वादी व प्रतिवादी नं.१ ते ६ यांनी या दाव्यात तडजोड करण्याचे निश्चित करुन दाव्यातील जमीनी संस्थानला कायम खरेदी देण्यास संमती दिली आहे व तडजोडीचा मसुदा तयार करुन तो उपरोक्त वादी,प्रतिवादी यांना मान्य आहे. तडजोडीचे मसुद्याबरोबर संस्थानने प्रत्येकाला किती रक्कम द्यावयाची आहे याचा तक्ता तयार केलेला आहे व या पत्रानुसार वर्तन करण्याची तसेच स्पे.मु.नं.५९/२०१२ यात हुकूमनामा करुनघेण्याची उपरोक्त वादी, प्रतिवादी या सर्वांची जबाबदारी आहे. तरी सदरचा तडजोडीचा मसुदा तपासून त्यास मान्यता द्यावी व तडजोडीवर संस्थानच्या जबाबदार प्रतिनिधीमार्फत सही करावी,असेबाबतचा अर्ज श्री.संग्राम माधवराव देशमुख व इतर ६ यांनी दि.०४/०३/२०१६ रोजी इकडेस सादर करुन त्यासोबत तडजोडीचा मसुदा,श्री.अभिजित जितेंद्र शहा यांचे संमतीपत्र व इतर कागदपत्रे आणि कोर्ट हुकूमाच्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती सादर केलेल्या आहेत.

११) त्या अनुषंगाने उपरोक्त जमीनीबाबतचे मुळ जमीन मालक व इतर आणि अर्जदार यांनी त्यांचे उपरोक्त वाद मे.कोर्टासमोर एकत्र येवून मिटवावेत व Clear Title झाल्यानंतर संबंधीत जमीन मालक यांनी त्यांचे मर्जीनुरुप संस्थानकडे सदर जमीनीच्या खरेदीबाबतचा प्रस्ताव सादर करावा,असेबाबत अर्जदार यांना दि.०७/०७/२०१६ रोजीच्या पत्रान्वये अलाहीदा कळविणेत आलेले आहे. त्यानंतर देखील अर्जदार यांनी वारंवार अर्ज केलेले आहेत. त्यांना उपरोक्तप्रमाणे अलाहीदा कळविणेत आलेले आहे.

१२) प्रस्तुत जमीनी संदर्भात मे.दिवाणी न्यायाधीश,व.स्तर,कोपरगाव यांचे कोर्टात स्पे.मु.नं.५९/२०१२ चा दाखल असून त्यात श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी,ता.राहाता,जि.अहमदनगर तर्फे कार्यकारी अधिकारी श्री.किशोर रामराव मोरे यांना प्रतिवादी नं.७ म्हणून प्रतिवादीपणात सामील केलेले आहे. प्रस्तुत प्रकरणी संस्थान पॅनलवरील वकीलअॅड.जे.के.गोंदकर हे मे.कोपरगाव येथील कोर्टात संस्थानतर्फे कामकाज पाहात असलेने प्रस्तुत दाव्यासंदर्भात त्यांचेबरोबर चर्चा करणेत आलेली आहे.

१३) दरम्यानचे काळात त्रयस्थ इसम श्री.संग्राम माधवराव देशमुख यांनी दि.१३/११/२०१७ रोजी इकडेस अर्ज सादर करुन त्यासोबत उपरोक्त तडजोडीचा मसुदा सादर करुन जमीनी संस्थानच्या ठरावाप्रमाणे संस्थानने खरेदी घेणेबाबतचा अर्ज सादर केलेला आहे. तसेच जमीन मालक श्री.लखीचंद कचरदास भंडारी व इतर ३ यांनी शासनाकडे दि.१३/०९/२०१७ रोजी अर्ज सादर केलेला आहे.

१४) अर्जात नमूद केलेल्या मौजे रुई येथील जमीन गट नं.२८८/अ,२८८/ब,२८८/क आणि गट नं.२९४ एकूण क्षेत्र १०.२३ हेक्टर हे संस्थानला दानपत्राद्वारे प्राप्त झालेल्या गट नं.२९३ क्षेत्र ७ हेक्टर ३२ आर या क्षेत्रालगत आहे. (सोबत समजुतीसाठीचा कच्चा नकाशा जोडला आहे.)

१५) सदरच्या जमीनी महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग,मंत्रालय,मुंबई यांचेकडील शासन निर्णय क्रं.टीपीएस १६१३/५१/प्र.क्र./०५/२०१३/नवि-९ दि.२८/०८/२०१४ अन्वये कृषी विभागातून वगळून रहिवास विभागात समाविष्ट करणेत आलेल्या आहेत.

१६) सदर जमीनींचे सन २०१७-१८ चे बाजारमुल्य खालीलप्रमाणे होत आहे.

श्री.भंडारी/भनसाळी यांची रुई येथील जमीनीचे बाजारमुल्य दर्शविणारा व त्यांनी सुचित केलेला दर दर्शविणारा तक्ता

| गट नं. | क्षेत्र हे.आर | सन २०१७-१८ चे बाजारमुल्य रु. | बाजारमुल्याप्रमाणे प्रति एकर होणारा दर | श्री.भंडारी यांनी सुचित केलेला दर प्रति एकर | रु.५५,००,०००/- प्रति एकरप्रमाणे होणारी एकूण किंमत |
|---|---|---|---|---|---|
| २८८/अ | २.९२ | रु.४,५४,५४,५००/- | रु.६२,२६,६४०/- | रु.५५,००,०००/- | रु. ४,०१,५०,०००/- |
| २८८/ब | ०.५० | रु.१,१०,५६,५००/- | रु.८८,४५,२००/- | रु.५५,००,०००/- | रु. ६८,७५,०००/- |
| २८८/क | ०.९१ | रु.१,७७,७२,३००/- | रु.७८,१२,०००/- | रु.५५,००,०००/- | रु. १,२५,१२,५००/- |
| २९४ | ५.९० | रु.८,६१,३१,५००/- | रु.५८,३९,४४०/- | रु.५५,००,०००/- | रु. ८,११,२५,०००/- |
| | एकूण | रु.१६,०४,१४,८००/- | -- | -- | रु.१४,०६,६२,५००/- |

१७) जमीन मालक श्री.लखीचंद कचरदास भंडारी व इतर यांनी शासनाकडेस केलेला दि.१३/०९/२०१७ रोजीच्या अर्जाच्या अनुषंगाने मा.कार्यासन अधिकारी,विधी व न्याय विभाग यांनी त्यांचेकडील पत्र क्रं.सासंवि-१०१७/ संक्र/१६६९/कार्यासन-१६ दि.३१/१०/२०१७ अन्वये "अर्जदारांची मौजे रुई येथील गट

नं.२८८ पैकी व गट नं.२९४ पैकी या वडीलोपार्जित मालकी हक्काच्या वहीवाटीच्या जागा असून सदर जागा खरेदी करणेबाबतचा ठराव संस्थानच्या दि.२४ सप्टेंबर २०११ रोजीच्या बैठकीत घेण्यात आला. तथापि आजतागायत सदर व्यवहार झालेला नाही. संस्थानशी सदर जमीनींचा व्यवहार करण्याचे निश्चित झाल्यामुळे विकासक जास्त मोबदल्यात सदर जमीन घ्यावयास तयार असूनही अर्जदार विकासकाशी सदर जमीनीचा व्यवहार करत नाहीत. संस्थानला सदर जमीनीचा व्यवहार करावयाचा नसल्यास त्याबाबतचे पत्र अर्जदारास द्यावे,अशी विनंती अर्जदारांनी उक्त अर्जान्वये केली आहे." तरी प्रस्तुत प्रकरणी आपला अहवाल शासनास सादर करण्यात यावा, वगैरेबाबत नमूद केलेले आहे.

**विभागाचा अभिप्राय-** मा.कार्यासन अधिकारी,विधी व न्याय विभाग यांचेकडील पत्र क्रं.सासंवि-१०१७/ संक्र/१६६९/ कार्यासन-१६ दि.३१/१०/२०१७ रोजीचे पत्राचे अनुषंगाने सदर जमीनीचे किंमतीबाबत दि.२४/०९/२०११ रोजीचे व्यवस्थापन समितीचे सभेतील विषय नं.१७ मधील निर्णय क्रं.७५९ प्रमाणे म्हणजेच "मा.व्यवस्थापन मंडळाने दि.१०/१०/२०१० रोजीचे सभेत घेतलेल्या निर्णयास अनुसरुन दर्यानानी ट्रस्ट यांची वर नमूद केलेली जमीन सर्व कायदेशीर बाबींची पडताळणी व पुर्तता करुन रु.५५,००,०००/- प्रति एकर या दराने खरेदी करण्यात यावी. याकामी विहीत पध्दतीने संस्थान वकीलामार्फत जमीनीचा सर्च रिपोर्टसह अभिप्राय घेणेत यावा तसेच वकीलामार्फत जमीनीबाबत कोणत्याही व्यक्तीची/संस्थेची हरकत नाही याबाबत वृत्तपत्रात जाहीर नोटीस प्रसिध्द करुन जमीनी खरेदीस कोणाचीही हरकत नाही,याबाबत पडताळणी करण्यात यावी. दर्यानानी ट्रस्ट, संबंधीत जमीन मालक व इतर हितसंबंधीत व्यक्ती/संस्था यांचेत असणारे सर्व न्यायालयीन दावे निपटल्यानंतर जमीन मालकांनी संस्थानकडे जमीन विक्रीचा स्वतंत्ररित्या प्रस्ताव सादर करावा. त्यानुसार जमीनीचे खरेदीखत नोंदणीचे वेळेस जमीनीच्या एकूण किंमतीच्या ८० टक्के रक्कम अदा करणेस व उर्वरित २० टक्के रक्कम जमीनीस संस्थानचे नाव लागलेनंतर संस्थानमार्फत रितसर शासकीय मोजणी करुन ताब्यात मिळणारे जमीनीच्या प्रमाणात रक्कम जमीन मालकांना अदा करणेस तसेच जमीन खरेदीकामी मुद्रांक व नोंदणी शुल्क,सरकारी मोजणी शुल्क, वकील फी आदी अनुषंगिक योग्य त्या समावेशक खर्चास मान्यता देण्यात यावी." या निर्णयाप्रमाणे कार्यवाही करणेकामी मान्यता मिळणेसाठी शासनाकडे अहवाल सादर करणेच्या निर्णयार्थ सादर.

यावेळी मुख्यकार्यकारी अधिकारी यांनी अशी माहिती दिली की, शेती महामंडळाची जमीन खरेदीचा प्रस्ताव, शासनाकडे प्रस्तावित आहे, त्यामुळे खाजगी जमीनींच्या खरेदीपेक्षा सरकारी जमीन प्राधान्याने खरेदी कराव्यात.

**निर्णय क्र.९९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, शेती महामंडळाची जागा खरेदी करणेबाबतचा प्रस्ताव व्यवस्थापन समितीने मान्य करुन शासन परवानगीसाठी पाठविणेत आलेला आहे. परंतु मौजे रुई, ता.राहाता, जि.अहमदनगर येथील जमीन गट नं.२८८अ, २८८/ब, २८८/क व गट नं.२९४ पै. एकूण क्षेत्र १०.२३ हेक्टर क्षेत्र हे यलो झोनमध्ये असून तेथील संस्थान मालकीच्या जमीनी लगत आहे व शेती महामंडळाकडून खरेदी करावयाच्या जमिनींपेक्षा कमी भावाने मिळत आहे. तसेच संस्थानने प्रस्तावित जमीन खरेदी केल्यास, राधा कालियनदास दर्यानानी चॅरिटेबल ट्रस्ट यांची याव्यतिरिक्त तेथे असलेली उर्वरित जमीन संस्थानला विनामुल्य दान देण्याची शक्यता आहे. याकरीता सदरहू क्षेत्र शासनाची मान्यतेने कायम खरेदी करुन घेण्यात यावे. त्यासाठी दि.२४.०९.२०११ रोजीचे सभेतील निर्णय क्र.७५९ ची अंमलबाजावणीसाठी प्रस्ताव सादर करणेत यावा, असे ठरले.**

**(कार्यवाही- प्र.अधिक्षक, मालमत्ता विभाग)**

---

**विषय नं.२६** **संस्थान कायम कर्मचाऱ्यांच्या जादा वैद्यकिय बीलाचा परतावा आदा करणेस मंजुरी मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** <u>**व्यवस्थापन समितीचा ठराव क्र. –**</u>१) जा. नं. एसएसएस-वशी रुग्णालय ५८२-९७ दि. १६/०१/१९९९. २) मा. व्यवस्थापन समिति सभा दि. ०९/१२/२०१६ निर्णय क्र. ६९० (६) अन्वये रु. २०,०००/- पर्यंत मा. कार्यकारी अधिकारी यांचे अधिकारात तर त्यावरील खर्चाची बिले ही मा. व्यवस्थापन समितीचे सभेच्या मान्यतेने अदा करावी.

<u>प्रास्ताविक–</u> खालील संस्थान कर्मचा-यांची रु. २०,०००/- पर्यंतची खर्चाची मर्यादा संपल्यामुळे रु. २०,०००/- पेक्षा जास्त खर्चाचे बिले परतावा मिळणेकामी सादर केलेले आहेत.

<u>मागणी –</u> पुढील तक्त्यात नमुद केलेल्या कर्मचा-यांचे बिले परतावा मिळणेबाबत विनंती अर्ज.

| अ. नं. | कर्मचा-याचे नाव | कर्मचा-याशी नाते | आजाराचे नाव | डॉक्टरांचे नाव | रुग्णालयाचे नाव | एकूण मागणी रक्कम | एकूण देय रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | **अ. संस्थान रुग्णालयात उपचार घेतलेले** | | | | | | | |
| १ | श्री. रविंद्र बापू गावडे<br>विभाग- पाणी पुरवठा<br>हुद्दा- तारतंत्री | वडील व आई | HTN/ TURP | डॉ. जाधवर व डॉ. मुंदडा | श्री साईबाबा हॉस्पिटल | ३००९३.०० | ३००९३.०० | |
| २ | श्री. कांडेकर गंगाधर भिवसेन<br>विभाग- साईबाबा हॉस्पि.<br>हुद्दा- स्टाफ नर्स | स्वतः | Blood Pressure | डॉ. जाधवर | श्री साईबाबा हॉस्पिटल | ६७६८.०० | ६७६८.०० | |
| ३ | श्री. दिपक सुर्यकांत लोखंडे<br>विभाग- लेखाशाखा<br>हुद्दा- लिपिक | आई | Diabetes | डॉ. जाधवर | श्री साईबाबा हॉस्पिटल | ३५९९.०० | ३५९९.०० | |
| ४ | श्री. राहूल वामन गलांडे<br>विभाग- माहिती तंत्रज्ञान<br>हुद्दा- सिस्टम ॲडमिनीस्ट्रेटर | पत्नी | Lab Test | डॉ. गाडेकर | श्री साईनाथ हॉस्पिटल | ३६५००.०० | २९२००.०० | |
| | | | | | **अ - एकूण रक्कम** | ७६९६०.०० | ६९६६८.०० | |
| | **ब. संस्थान मान्य यादीतील हॉस्पिटलमध्ये रेफर केले होते.** | | | | | | | |
| ५ | श्री. बाळासाहेब बन्सी डांगे<br>विभाग-साईनाथ रूग्णालय<br>हुद्दा-ओ.टी. असिस्टंट | स्वतः | Ca | डॉ.राम नाईक | | दिनानाथ मंगेशकर हॉस्पिटल पुणे | ११५२९.०० | |
| ६ | श्री. सुशील सुरजमल बिर्ला<br>विभाग-साईनाथ रूग्णालय<br>हुद्दा-फार्मासिस्ट | स्वतः | Eye Operation | डॉ. अग्रवाल | | बॉम्बे हॉस्पिटल, मुंबई | ३०२२७.०० | |
| ७ | श्री. सोमनाथ निवृत्ती चौधरी<br>विभाग- साईबाबा रूग्णा.<br>हुद्दा- टेक्निशीयन | वडील | LEFT Renal Calculi, DJ Stent Insitu | डॉ. मुंदडा | | रुबी हॉल क्लिनिक, पुणे | २६४०७.०० | |
| ८ | श्री. राजेंद्र दत्तात्रय जोर्वेकर<br>विभाग-साईबाबा रूग्णा.<br>हुद्दा-फार्मासिस्ट | मुलगा | Left Leg DVT With Pulmonary Embolism | डॉ. मनोहर शिंदे | रुबी हॉल क्लिनिक, पुणे | १६०१७९.०० | १४५१३९.०० | |
| ९ | श्री. पोपट लक्ष्मन डांगे<br>विभाग- सा. भा. नि.<br>हुद्दा- मदतनीस | | Acute Gastroentritis/ IHD/DM/ ARF | डॉ. जाधवर | सह्याद्री हॉस्पिटल, नाशिक | ९७८९७.०० | ९२६१७.०० | |
| १० | श्री. कुमावत रविंद्र शिवाजी<br>विभाग- मंदीरविभाग,<br>हुद्दा- मदतनीस | वडील | Accident | डॉ. बो-हाडे | सह्याद्री हॉस्पिटल, नाशिक | ३२०१९३.०० | ३२०१९३.०० | |
| | | | | | **ब - एकूण रक्कम** | **६४६४३२.००** | **६२४६७५.००** | |
| | **क. संस्थान मान्य यादीतील नसलेले व रेफर नसलेले हॉस्पिटल** | | | | | | | |
| ११ | श्री. पद्माकर पांडूरंग आव्हाड<br>विभाग-प्रशासन शाखा | आई | Asthama /Kidney Stone | डॉ. नितीन जठार | चैतन्य हॉस्पिटल, | ३०५५२.०० | २४४४२.०० | रुग्णाचे वास्त व्य बाहेर |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | हुद्दा- झेरॉक्स ऑपरेटर | | | | | | | गावी |
| १२ | श्री. सुनिल सखाराम तांबे<br>विभाग- आय. टी.आय.<br>हुद्दा- निर्देशक | वडील | Cardioembolic Stroke,Right Stroke Atrial Fibrillation | डॉ. अदित्य मदामनकर | धन्वंतरी हॉस्पिटल | ५०४२८.०० | ३५११०.०० | असल्यामुळे ८०% रक्कम द्यावी असे मत |
| १३ | श्री. सुभाष श्रीराम शामकुवर<br>विभाग- साईबाबा हॉस्पि.<br>हुद्दा- आर.एम.ओ. | वडील | HTN/ Fracture | डॉ. सारडा बाभुळकर | सुश्रुत हॉस्पिटल, नागपूर | २४१२६४.०० | १८९३०७.०० | आहे. |
| | | | | **क - एकूण रक्कम** | | **३२२२४४.००** | **२४८८५९.००** | |
| | | | **अ+ब +क - एकूण रक्कम** | | | १०४५६३६.०० | ९४३२०२.०० | |

सदर बिलांची संस्थान वैद्यकीय देखभाल नियमावली सन १९९९ अन्वये छाननी केली असून देय होणारी एकूण रक्कम रु.९,४३,२०२/- इतकी आहे.

**विभागाचा अभिप्राय / स्पष्ट मत**– नियमावली प्रमाणे छाननी केली असुन तसेच रुग्णांना संस्थान मान्य यादीतील हॉस्पिटलमध्ये पुढील उपचाराकरीता पाठविण्यात आले व उपचार घेतले आहे. त्यामुळे संबंधीतांना देय होणारी रक्कम अदा करणेस हरकत नाही,असे मत आहे.

निर्णय क्र.१०० **यावर सविस्तर चर्चा होऊन, वरील प्रस्तावामध्ये नमुद केलेल्या कर्मचाऱ्यांनी सादर केलेल्या बीलांची वैद्यकीय देखभाल नियमावली सन- १९९९ अन्वये छाननी केली असून, त्यांची सत्यता पडताळून पाहीलेली असल्यामुळे, उपरोक्त तक्त्यामधील कर्मचाऱ्यांना देय असलेली रक्कम, त्यांना अदा करणेस मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

विषय नं.२७ **सन २०१७-१८ या वर्षाकरीता वार्षिक औषधे/ सर्जिकल साहित्य खरेदीमधील Oxygenator व Heart Valve Mechanical Bitcaflet संबंधीत निम्नतम दरधारकांचे साहित्याच्या गुणवत्तेबद्दलचा वापरणाऱ्या डॉक्टरांचे अभिप्रायाबाबत.**

प्रस्ताव- श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाकरीता सन २०१७-१८ या वर्षाकरीता लागणारे वार्षिक औषधे / सर्जिकल साहित्य व On Consignment Material खरेदीकामी तिस-यांदा दिलेल्या जाहिरातीस अनुसरुन फेर ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात येऊन त्यास अनुसरुन प्राप्त (PART A व B) मिळून एकुण १०७ ऑनलाईन ई-निविदा प्राप्त झाल्या होत्या. प्राप्त झालेल्या १०७ तांत्रिक ऑनलाईन ई-निविदा दि.०३/११/२०१७ रोजीचे मा.खरेदी समितीचे सभेपुढे समक्ष उघडण्यात येऊन त्यानंतर कागदपत्रांची छाननी करुन १६ निविदाधारक अपात्र ठरविण्यात येऊन उर्वरीत ९१ पात्र निविदाधारकांच्या ऑनलाईन कमर्शियल निविदा दि.०९/११/२०१७ रोजी उघडण्यात आल्या. कमर्शियल निविदांचा तुलनात्मक तक्ता तयार करण्यात येऊन दि.१३/११/२०१७ रोजी चे मा.उपसमितीचे सभेपुढे प्राप्त निम्नत्तम दरधारकांशी चर्चा/वाटाघाटी करण्यात आल्या होत्या.

सदर सभेमध्ये वैद्यकिय संचालक यांनी Oxygenator व Heart Valve Mechanical Bileaflet कामी गुणवत्तेबाबत शंका उपस्थित केल्याने दि.१४/११/२०१७ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र.१००५(०१) मध्ये Oxygenator व Heart Valve संबंधित निम्नत्तम दरधारकांचे साहित्याच्या गुणवत्तेबद्दल काही तांत्रिक मुद्दे उपस्थित झाल्याने त्याबाबत वैद्यकिय संचालक व संबंधित डॉक्टर यांचे अभिप्राय घेऊन अंतिम निर्णय घेण्यात यावा, असे आदेश देण्यात आलेले आहेत.

०१) Heart Valve Mechanical Bileaflet कामी प्राप्त दरांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे सादर केलेला आहे.

| Sr. No. | Name of Item | Rate Per in Rs. | GST | Make | BRAND NAME | MRP | Technical Description | Gauge/ Length/ Strength/ Pack Size if any Etc | Available certifications (WHO,GMP, CE, ISO, USFDA, etc) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 22.00 | HEART VALVE MECHANICAL AORTIC BILEAFLET (ALL TYPE) [Rotatable, Disc opening angle above 80, Pyrolite Carbons, Low profile, MR Compatible] (CE MARK / USFDA / INDIAN FDA / DCGI Approved only.) | | | | | | | | |

| Sr. No. | Name of Item | Rate Per in Rs. | GST | Make | BRAND NAME | MRP | Technical Description | Gauge/ Length/ Strength/ Pack Size if any Etc | Available certifications (WHO,GMP, CE, ISO, USFDA, etc) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **22.01** | **St Jude Medical India Pvt Ltd., Mumbai** | **43000.00** | **12** | **St Jude Medical India Pvt Ltd** | **Masters HP Mechanical Heart Valve** | **72384** | **Rotatable Disc Opening Angle above 80 Pyrolite Carbon Low Profile MR Compatible 20 Years Clinical experience** | **17 AHPJ-505** | **USFDA/CE /DCGI** |
| **22.02** | **St Jude Medical India Pvt Ltd., Mumbai** | **43000.00** | **12** | **St Jude Medical India Pvt Ltd** | **Masters Series Mechanical Heart Valve ( Expanded Cuff)** | **66000** | **Rotatable Disc Opening Angle above 80 Pyrolite Carbon Low Profile MR Compatible 20 Years Clinical experience** | **19mm, 21mm,23 mm,25mm AECJ-502** | **USFDA/CE /DCGI** |
| 22.01 | TTK Healthcare Ltd., Mumbai | 47072.00 | 12 | CARDIAMED | CARDIAMED ROTATING PROSTHETIC HEART VALVE | 92000 | HEART VALVE MECHANICAL AORTIC BILEAFLET, ROTATABLE, DISC OPENING ANGLE ABOVE 80, PYROLITE CARBONS LOW PROFILE, MR COMPATIBLE | 17mm, 19mm, 21mm, 23mm, 25mm | CE,ISO & DCGI APPROVED |
| 22.01 | Sarv Healthcare Pvt. Ltd., Mumbai | 48950.00 | 12 | | SORIN (LIVA NOVA) | 80000 | Bicarbon Slimline Aortic Valve is designed for supra annular which has unique curved Leaflet designed coating with pyrolitic carbon & decron sewing ring coated with carbofilm | 17 MM TO 25 MM ( Pack Size - 01 Unit ) | CE Certification |
| 22.03 | St Jude Medical India Pvt Ltd., Mumbai | 52000.00 | 12 | St Jude Medical India Pvt Ltd | Regent Aortic Mechanical Valve | 80000 | Rotatable Disc Opening Angle above 80 Pyrolite Carbon Low Profile MR Compatible 20 Years Clinical experience | 17mm, 19mm, 21mm,23 mm, 25mm AGN-751 | USFDA/CE /DCGI |
| 22.01 | India medtronic Pvt Ltd.,Mumbai | 52640.00 | 5640 | Medtronic OPHV | Medtronic OPHV 505DA 16 TO 505DA 26/501DA16 TO 501DA 26 | 85000 | Solid pyrolytic carbon orifice with strengthening band for thin but strong orifice & larger GOA. No recesses or cavities in the pivot area where thrombus can form. Bileaflet ,Rotatable, opening angle 85, low profile, MRI competible, having more than 20 years clinical experience, USFDA Approved | 1 unit | CE/US FDA Approved |
| 22.02 | Sarv Healthcare Pvt. Ltd., Mumbai | 52850.00 | 12 | | SORIN (LIVA NOVA) | 80000 | Carbomedic Aortic Valve is Mechanical bileaflet rotatable heart valve with titanium stiffening ring | 16 MM TO 25 MM ( Pack Size - 01 Unit ) | USFDA Certification |

| Sr. No. | Name of Item | Rate Per in Rs. | GST | Make | BRAND NAME | MRP | Technical Description | Gauge/ Length/ Strength/ Pack Size if any Etc | Available certifications (WHO,GMP, CE, ISO, USFDA, etc) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | |
| **23.00** | **HEART VALVE MECHANICAL MITRAL BILEAFLET (ALL TYPE) [Rotatable, Disc opening angle above 80, Pyrolite Carbons, Low profile, MR Compatible] (CE MARK / USFDA / INDIAN FDA / DCGI Approved only.)** | | | | | | | | |
| **23.01** | **St Jude Medical India Pvt Ltd., Mumbai** | **43000.00** | **12** | **St Jude Medical India Pvt Ltd** | **Masters Series Mechanical Heart Valve ( Expanded Cuff)** | **66000** | **Rotatable Disc Opening Angle above 80 Pyrolite Carbon Low Profile MR Compatible 20 Years Clinical experience** | **23mm, 25mm, 27mm, 29mm, 31mm, 33mm MECJ-502** | **USFDA/CE /DCGI** |
| 23.01 | TTK Healthcare Ltd., Mumbai | 47072.00 | 12 | CARDIAMED | CARDIAMED ROTATING PROSTHETIC HEART VALVE | 92000 | HEART VALVE MECHANICAL MITRAL BILEAFLET, ROTATABLE, DISC OPENING ANGLE ABOVE 80, PYROLITE CARBONS LOW PROFILE, MR COMPATIBLE | 25mm, 27mm, 29mm, 31mm, 33mm | CE,ISO & DCGI APPROVED |
| 23.01 | Sarv Healthcare Pvt. Ltd., Mumbai | 49850.00 | 12 | | SORIN (LIVA NOVA) | 80000 | Bicarbon Fitline Mitral Valve is designed for intra annular which has unique curved designed pyrolitic carbon leaflets & decron sewing ring coated with carbofilm | 23 MM TO 33 MM ( Pack Size - 01 Unit ) | CE Certification |
| 23.02 | St Jude Medical India Pvt Ltd., Mumbai | 52000.00 | 12 | St Jude Medical India Pvt Ltd | Masters Series Mechanical Heart Valve | 72384 | Rotatable Disc Opening Angle above 80 Pyrolite Carbon Low Profile MR Compatible 20 Years Clinical experience | 23mm, 25mm, 27mm, 29mm, 31mm, 33mm MJ-501 | USFDA/CE /DCGI |
| 23.01 | India medtronic Pvt Ltd.,Mumbai | 52640.00 | 5640 | Medtronic OPHV | Medtronic OPHV 500D M23 TO 500D M33, 501D M22 TO 501D M28 | 75000 | Solid pyrolytic carbon orifice with strengthening band for thin but strong orifice & larger GOA. No recesses or cavities in the pivot area where thrombus can form. Bileaflet ,Rotatable, opening angle 85, low profile, MRI competible, having more than 20 years clinical experience, USFDA Approved | 1 Unit | CE/US FDA Approved |
| 23.02 | Sarv Healthcare Pvt. Ltd., Mumbai | 52850.00 | 12 | | SORIN (LIVA NOVA) | 80000 | Carbomedic Mitral Valve is Mechanical bileaflet rotatable heart valve with titanium stiffening ring | 23 MM TO 33 MM ( Pack Size - 01 Unit ) | USFDA Certification |

वरीलप्रमाणे Heart Valve खरेदीकामी प्राप्त दर व तांत्रिक बाबींचा तक्ता डॉ. मिस्त्री व डॉ. ठाकरे यांनी तपासून दि.०२/१२/२०१७ रोजीचे पत्रान्वये खालीलप्रमाणे लेखी अहवाल सादर केलेला आहे. डॉक्टरांचे मते Mitral व Aortic Valve मध्ये खालील Specification असावेत असे कळविले आहे व त्याबाबत त्यांचा अभिप्राय देखील दिलेला आहे.

01) Rotatable Disc & Bileaflet

02) Opening angle above $80^0$

03) Low Profile

04) M.R.Compatible

05) 20 Year clinical experience

06) US FDA / CE / DC / GI approval

The said product St.Jude Mechanical heart Valve – Master HP series & Master series (expanded cuff) for Aortic & Mitral position can be used as it shows above mention criteria.

०२) तसेच Oxygenator खरेदीकामी सन २०१५-१६ या वार्षिक औषधे खरेदीमध्ये Oxygenator Adult करीता Terumo व Sarv (Sorin) यांनी रु.९६००/- इतके दर दिलेले होते व Oxygenator Semi Adult करीता Sarv (Sorin) व Medtronic यांनी रु.१२६७२/- इतके दर देऊ केलेले होते, त्यानुसार त्यांचेकडून मटेरीयल घेण्यात येत होते. त्यानंतर सन २०१७-१८ या वार्षिक औषधे खरेदीमध्ये विहित पध्दतीने ई-निविदा मागवून M/s.B.L.Lifesciences Pvt.Ltd., यांना Oxygenator Adult करीता रु.११३९९/- व Oxygenator Semi Adult करीता रु.१२४३६/- या दराने दि.२८/०७/२०१७ रोजी पुरवठा आदेश देण्यात आलेला होता, परंतु GST मुळे दर वाढल्यामुळे ते पुरवठा करण्यास तयार नव्हते, त्यामुळे पुन्हा फेर ई-निविदा मागविण्यात आलेल्या आहेत. त्यामधील Oxygenator खरेदीकामी प्राप्त दरांचा तुलनात्मक तक्ता पुढीलप्रमाणे सादर केलेला आहे.

| Sr. No. | Name of Item | Rate Per in Rs. | Total Amt.in Rs. | GST | Make | BRAND NAME | MRP | Technical Description | Gauge/ Length/ Strength/ Pack Size if any Etc | Available certifications WHO,GMP,CE, ISO, USFDA, etc) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **162** | **OXYGENATOR ADULT (Qty.1000)** | | | | | | | | | |
| 01 | India medtronic Pvt Ltd.,Mumbai | 12320 | 12320000 | 1320 | Medtronic | Affinity NT | 19008 | Affinity NT, Microporous Polypropylene Hollow Fibers, PRF type fiber for greater plasma break through resistance, VAVD compatible Surface area 2.5 m2, priming volume 270 ml (To be supplied directly from India Medtronic. Will need documents to create SAP account) | 1 Unit | CE/USFDA |
| 01 | Sarv Healthcare Pvt. Ltd., Mumbai | 12650 | 12650000 | 12% | | SORIN (LIVANOVA) | 21000.00 | Inspire 8 LPM oxygenator systems are the only low prime oxygenator rated upto 8 LPM maximum blood flow.They are capable of delivering powerful and consistent performance throghout the entire blood flow range and it also have longitudinal flow path, the highly efficient design allows to significantly reduce prime volume | Pack Size - 02 Units | SORIN (LIVANOVA) BRANDED |

| Sr. No. | Name of Item | Rate Per in Rs. | Total Amt.in Rs. | GST | Make | BRAND NAME | MRP | Technical Description | Gauge/ Length/ Strength/ Pack Size if any Etc | Available certifications WHO,GMP,CE, ISO, USFDA, etc) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **164** | **OXYGENATOR PEADIATRIC (SEMI ADULT) WEIGHT GROUP UPTO (20 TO 40KG.) D-905 (Qty.500)** | | | | | | | | | |
| **01** | **India medtronic Pvt Ltd.,Mumbai** | **12320** | **6160000** | **1320** | **Medtronic** | **Affinity NT** | **19008.00** | **Affinity NT, Microporous Polypropylene Hollow Fibers, PRF type fiber for greater plasma break through resistance, VAVD compatible Surface area 2.5 m2, priming volume 270 ml (To be supplied directly from India Medtronic. Will need documents to create SAP account)** | **1 Unit** | **CE/USFDA** |
| 01 | Sarv Healthcare Pvt. Ltd., Mumbai | 13850 | 6925000 | 12% | | SORIN (LIVANOVA) | 21000 | Inspire 6 LPM oxygenator systems are the only optimized adult oxygenator systems with a low blood contact surface area which can minimize impact on hemodilution and effectively control GME. Inspire Oxygenator longitudinal flow design maximizes blood exposure allowing full gas exchange performance upto 6 LPM. | Pack Size - 02 Units | SORIN (LIVANOVA) BRANDED |

वरीलप्रमाणे Oxygenator खरेदीकामी प्राप्त दर व तांत्रिक बाबींचा तक्ता संबंधित डॉक्टरांनी तपासून दिल्यानंतर दि.२५/११/२०१७ रोजीचे पत्रान्वये डॉ.नितिन ठाकरे (कार्डीयाक सर्जन) व परफ्युजनिस्ट श्री.म्हस्के यांनी खालीलप्रमाणे लेखी खुलासा दिलेला आहे.

"Since year 2014-15 we used 1326 nos.of Oxygenators. In which we found several of leakages in above mentioned Oxygenators.

Year 2014 = 10-12 – small leakages

Year 2015 = 15-18 – leaked & some complaints given to Store Manager.

So we are stop using same Oxygenators because of several leakages are harmful and dangerous for patient's life and in same Oxygenator we cannot use it as a Semiadult Oxygenator because of its high priming volume and high membrane surface area. It is also harmful for patient's life."

तसेच दि.०२/१२/२०१७ रोजीचे पत्रान्वये डॉ.महेश मिस्त्री((कार्डीयाक सर्जन) व परफ्युजनिस्ट श्री.नदीम यांनी खालीलप्रमाणे लेखी खुलासा दिलेला आहे.

"We are operating >1000 cases/per year in our Hospital, we are doing Congenital, adult & semi adult case ranging from 10kg to 100 kg, for this purpose we need different types of Oxgenators in paediatric, adult & semi adult depends on reservier & flow dinemics & BSA.

As per discussion & data given by the Store Department in year 2014 & 2015, utilization of Affinity oxygenator was approximately 1326. Among there following complaints given by perfusinist & users.

In Year 2014 = 10-12 – small leakages

In Year 2015 = 15-18 – leakages & some complaints given to Store Manager dated complaints 17-12-2014 / 13-05-2015 / 24-06-2015.

Due to above complaints the hospital stopped using Affinity NT Oxygenator for patient safety. Also same Oxygenator can't be used in semiadult < 40kg wt. layers priming volume requirement same affinity. NT cannot be used for same purpose (adult & semi adult)."

वरीलप्रमाणे दोन्ही कार्डीयाक सर्जन यांनी प्राप्त निम्नत्तम दरधारकाचे Oxygenator (Adult & Semi adult) leakage होण्याची तक्रार केलेली असून त्यांनी Oxygenator व Heart Valve Mechanical Bileaflet कामी दिलेला लेखी अहवाल मा.वैद्यकिय संचालक यांचेकडे सादर केलेला असून मा.वैद्यकिय संचालक यांनी दि.०२/१२/२०१७ रोजीचे पत्रान्वये त्यांचा अभिप्राय कळविलेला आहे.

तरी वरील प्रस्तावावर निर्णय होणेकामी सविनय सादर.

निर्णय क्र.१०१ **यावर सविस्तर चर्चा होऊन, Heart Valve Mechanical Bileaflet साठीच्या निविदा प्रक्रियेमध्ये प्राप्त निम्नतम दरधारकाची गुणवत्ता योग्य असल्याचा अभिप्राय संबंधीत डॉक्टरांनी दिला असल्याने, त्यांना पुरवठा आदेश देण्यात यावा.**

**तसेच Oxygenator साठीच्या निविदा प्रक्रियेमध्ये प्राप्त निम्नतम दरधारकाच्या साहित्याच्या दर्जाबाबत संबंधीत डॉक्टरांची साशंकता असल्यामुळे, सदर निविदा प्रक्रिया रद्द करणेत येऊन, नवीन निविदा प्रक्रिया राबवावी. या नवीन खरेदी प्रक्रियेमध्ये सध्याच्या निम्नतम दरधाकाने सहभाग घेतल्यास त्यास टेक्नीकल बीडमध्ये अपात्र करणेत यावे, असे ठरले.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

विषय नं.२८ **सन २०१५-१६ मधील (Annual Rate Contract) वार्षिक खरेदीमधील मंजूर दराने औषधे व सर्जिकल, लॅबोरॅटरी साहित्य अतिरिक्त खरेदीस कार्योत्तर मान्यता मिळणेबाबत.**

प्रस्ताव- <u>अधिनियम २००४ मधील तरतूद :- १७ (२) ण</u>

<u>व्यवस्थापन समितीचा ठराव क्र .:-</u>

(०१) मा.व्यवस्थापन समिती सभा दि.३०/०१/२०१५ निर्णय क्रमांक २६ Clause No.9 अन्वये मागणी केलेल्या औषधांच्या साठयापैकी रु.२५,०००/- पेक्षा अधिक रक्कमेच्या औषधांची अतिरीक्त मागणी करावयाची झाल्यास दैनंदिन कामाची गैरसोय होऊ नये, म्हणून ती मा. कार्यकारी अधिकारी यांचे मंजुरीने खरेदी करुन केवळ नोंद घेण्यासाठी/ माहितीस्तव मा.व्यवस्थापन समिती सभेपुढे नोंद घेण्यासाठी सादर करण्यात यावे, असे ठरले आहे.

(०२) दि.३०/११/२०१६ रोजीचे मा.व्यवस्थापन समिती सभेत निर्णय क्र.७५६(५) अन्वये श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाकरीता वार्षीक (सन २०१६-१७) या वर्षाकरीता लागणारे औषधे व सर्जिकल साहित्य खरेदी करणेकामी प्रस्तावात नमुद केलेल्या कार्यवाहीचे अवलोकन करणेत येऊन, रुग्णालय उपसमितीने खालीलप्रमाणे शिफारशी केल्या, त्या मान्य करण्यात आल्या आहेत .

बऱ्याचशा नामांकित रुग्णालयांमध्ये जनरीक औषधे वापरली जातात. त्यामुळे संस्थान रुग्णालयांकरीता प्राधान्याने जनरीक औषधे खरेदी करावीत. काही जनरीक औषधांचा रुग्णांवर प्रभाव होत नाही, असे डॉक्टर्स सांगतात, अशी औषधे संबंधीत कंपनीकडून बदलून घेण्यात यावी व तरीही तक्रारी आल्यास सदरहू औषध निर्माती कंपनीस काळया यादीत टाकण्यात यावे.

औषध खरेदी प्रक्रिया राबविणेपुर्वी कोकीळा बेन हॉस्पिटल, नागपुर, रुबी हॉल क्लिनिक, पुणे, माऊट अबु, राजस्थान अशा नामांकित तसेच राज्य शासन/ भारतीय लष्करांच्या रुग्णालयांमध्ये वापरण्यात येणाऱ्या औषधांची व औषध खरेदी प्रक्रियेची माहिती संकलीत करुन, उपकार्यकारी अधिकारी, मुख्यलेखाधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी, रुग्णालय व वैद्यकिय संचालक यांनी औषध खरेदी करणेकामी अटी/ शर्ती निश्चित करुन सभेसमोर प्रस्ताव सादर करावा. तोपर्यंत औषधांअभावी रुग्णांची गैरसोय होऊ नये, याकरीता सध्याचे मंजुर निम्नतम दराने औषधे खरेदी करण्यात यावीत, असे ठरले आहे.

<u>प्रास्ताविक :-</u> श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाकरीता दैनंदिन वापरासाठी लागणा-या औषधे, सर्जिकल साहित्य, लॅब केमीकल्स, कन्झुमेबल्स व किरकोळ साहित्य खरेदीकामी सन २०१५-१६ या वर्षाकरीता वार्षिक निविदेतील मंजुर दराने दि.२८/०७/२०१५ रोजी एकुण रक्कम रु.१६,७५,७२,९४७.४४ इतक्या रक्कमेचे आणि दि.१३/११/२०१५ रोजी रु.१६,३६,५५,५०८.२७ इतक्या रक्कमेचे पुरवठा आदेश देण्यात आलेले आहे. तसेच Re-Tender मधील ७३ आयटमकरीता तातडीची गरज पाहता३ लाखापेक्षा कमी रक्कमेच्या खरेदीकामी कोटेशन मागणी करुन दि.१०/११/२०१६ रोजी पुरवठा आदेश देण्यात आलेले आहेत.

त्यानुसार पुरवठा आदेशाप्रमाणे पुरवठाधारकांकडून मालाचा पुरवठा चालु आहे, तर त्यातील काही मालाचा पुरवठा पुर्ण झालेला आहे. त्यापैकी सध्या सोबतच्या यादीतील औषधे, सर्जिकल साहित्य, लॅब केमीकल्स, कन्झुमेबल्स व किरकोळ साहित्य इत्यादींचा औषधांचा भांडारात साठा शिल्लक नाही, सदर साठयाची वार्षिक मागणी पुर्ण झालेली आहे. तथापि सदरहू औषधे, सर्जिकल साहित्य, लॅब केमीकल्स, कन्झुमेबल्स व किरकोळ साहित्य हे दैनंदिन वापरासाठी आवश्यक असल्यामुळे तेंव्हा गरज पाहता काही औषधे / सर्जिकल साहित्य मंजुर दराने खरेदी करण्यात येत आहेत, तसेच काही औषधे खरेदी करण्यात आलेली आहेत. सदर औषधे / सर्जिकल साहित्य हे आपण जर मंजुर दराव्यतिरीक्त खरेदी केले तर त्यासाठी जास्त खर्च येऊन त्यात संस्थानचे नुकसान होणार आहे. त्यामुळे सदर मटेरीयल हे मंजुर दरानेच खरेदीचे प्रस्तावित करण्यात येत आहे. तसेच ब-याच ठिकाणी मागील खप पाहता तसेच पुढील वार्षिक खरेदीचा कालावधी बघता वार्षिक मंजुर नग संख्या व्यतिरीक्त जास्त नग संख्याची मागणी करण्यात आलेली आहे.

दि.०१/०१/२०१७ पासुन श्री साईनाथ रुग्णालयात मोफत सेवा देण्यात येत असल्यामुळे सध्या रुग्णांची संख्या दिवसेंदिवस वाढत असून त्यासाठी लागणारे औषधे / सर्जिकल साहित्य सुध्दा जास्त प्रमाणात लागत आहेत.

सन २०१७-१८ या वर्षाकरीता लागणारे औषधे, सर्जिकल साहित्य, लॅब केमीकल्स, कन्झुमेबल्स व किरकोळ साहित्य इत्यादी खरेदीकामी अंदाजे रक्कम रु.५५,९१,९१,८३६/- इतक्या रक्कमेचा प्रस्ताव मान्यतेसाठी सादर करण्यात आला होता, सदर प्रस्तावास दि.२५/०२/२०१७ रोजीचे मा.व्यवस्थापन समिती सभेत मान्यता मिळालेली असून त्याकामीची खरेदीबाबत पुढील कार्यवाही पुर्ण होऊन औषधे प्राप्त होण्यास बराच कालावधी लागणार होता, त्यामुळे रुग्णांना उपचारासाठी लागणा-या औषधांची गैरसोय होऊ नये म्हणून सोबतच्या यादीतील औषधे सन २०१५-१६ या वर्षातील मंजुर दराने खरेदी करुन देण्यात आलेली आहेत व याकामी मंजुर दराने पुर्णांकित रक्कम रु.२,०५,८२,२९६/-(अक्षरी रु.दोन कोटी पाच लाख ब्याऐंशी हजार दोनशे शहान्नव मात्र) इतका खर्च आलेला आहे.

दि.३०/०१/२०१५ रोजीचे मा.त्रिसदस्य समितीचे सभेत निर्णय क्र.२६ अन्वये वार्षिक औषधे खरेदीमधील औषधे व सर्जिकल साहित्य खरेदीकामी अंदाजे रक्कम रु.५५,७३,३६,३९२/- चे खर्चास मान्यता मिळालेली असून त्यास मा.उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठाची सिव्हील अप्लीकेशन नंबर ३४९५ दि.१३/०३/२०१५ अन्वये ई-निविदा मागवून खरेदीस मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार दि.२८/०७/२०१५ व दि.१३/११/२०१५ अन्वये PART “A” करीता एकुण रक्कम रु.३३,१२,२८,४५५.७१ इतक्या रक्कमेचे पुरवठा आदेश देण्यात आलेले असून PART “B” करीता On Consignment Basis वर दैनंदिन वापरात येणा-या Drug Eluting Stent, Valve, Pacemaker, PTCA Balloon, BMV Balloon साठी पुरवठा आदेश देण्यात आले होते. त्यान्वये आजपर्यंत दोन्ही मिळून (PART “A”व“B”[On Consignment Basis]) रु.४३,३८,८०,९९७/- इतक्या रक्कमेचे औषधे / सर्जिकल साहित्य खरेदी करण्यात आलेले आहेत, म्हणजेच मंजुर रक्कम रु.५५,७३,३६,३९२/- पैकी रु.१२,३४,५५,३९५/- इतकी रक्कम शिल्लक आहे, त्यामुळे आपणास अतिरीक्त खरेदी ही शिल्लक रक्कमेतुन करता येणार आहे. तसेच रु.५५,७३,३६,३९२/- ही रक्कम सन २०१५-१६ या वर्षाचे औषधे खरेदीसाठी मंजुर करण्यात आली होती, पण प्रत्यक्षात पाहता सदर रक्कमेतून दोन वर्षापासून मटेरीयल खरेदी करण्यात येऊन शिल्लक रक्कमेतून खरेदीचा प्रस्ताव आहे.

**मागणी** – सोबतच्या तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे.

**संस्थान अधिनियम / ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान:-** अधिनियमातील समितीचे कर्तव्ये व अधिकार क्र. १७-२ (ण) अन्वये मानवजातीच्या कल्याण करणा-या किंवा मानवाला आपत्तीमध्ये साहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल असा आहे. त्यानुसार संस्थानतर्फे दोन धर्मदाय रुग्णालये चालविण्यात येतात.

**विभागाचा अभिप्राय / स्पष्ट मत:-** श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये महाराष्ट्र शासनाच्या राजीव गांधी जीवनदायी योजनेअंतर्गत रुग्ण दाखल होत असतात. सदर योजनेअंतर्गत होणा-या शस्त्रक्रिया व उपचार चालु असताना रुग्ण पुर्ण बरा होऊन डिसचार्ज दिल्यापासून १ वर्षासाठी औषधे मोफत दयावी लागतात, त्यामुळे औषधांचा खप हा कधी कधी अचानक वाढतो. राजीव गांधी जीवनदायी योजनेअंतर्गत रुग्णांना दिलेल्या औषधांचा परतावा शासनाकडून संस्थानला मिळत असतो. त्यामुळे जशी जशी लागतील तशी तशी औषधे वार्षिक मंजुर दराने खरेदी करण्यात येतील. कारण एकाच वेळेस खरेदी करुन ठेवल्यास ती मुदतबाहय होण्याची शक्यता नाकारता येत नाही, त्यामुळे संस्थानचे मोठे अर्थिक नुकसान होण्याची शक्यता असते.

तसेच सन २०१७-१८ या वर्षाच्या पुढील वार्षिक औषधे, सर्जिकल साहित्य, लॅब केमीकल्स, कन्झुमेबल्स व किरकोळ साहित्य इत्यादी खरेदीकामी कालावधी लागणार होता, त्यामुळे रुग्णांना उपचारासाठी लागणा-या औषधांची गैरसोय होऊ नये तसेच डेंग्यु सारखे संसर्गजन्य आजार व संस्थान रुग्णालयामार्फत आयोजित कॅम्पव्दारे लागणा-या औषधे खरेदीकामी सोबतच्या यादीतील काही औषधे सन २०१५-१६ या वर्षातील मंजुर दराने खरेदी करुन देण्यात आलेली आहेत. तसेच रुग्णालयात काही औषधांची तातडीने आवश्यकता असल्यामुळे मंजुर दराने आवश्यकतेनुसार खरेदी करण्यात येत आहेत.

सन २०१७-१८ या वर्षाकरीता वार्षिक अंदाजपत्रकीय तरतुद ही औषधे / सर्जिकल साहित्य व On Cosignment Basis Item करिता एकुण रक्कम रु.५५,००,००,०००/- (अक्षरी रु. पंचावन्न कोटी मात्र) असून त्यापैकी रक्कम रु.३५,००,००,०००/- (अक्षरी रु.पस्तीस कोटी मात्र) औषधे / सर्जिकल साहित्यांकरिता असून दि.३०/११/२०१७ अखेर रक्कम रु.४४,५२,७८,२०१/- (अक्षरी रु. चौरेचाळीस कोटी बावन्न लाख अठ्ठयाहत्तर हजार दोनशे एक मात्र) इतकी औषधांची अंदाजपत्रकीय तरतुद शिल्लक आहे. तसेच उपरोक्त खरेदीतील औषधांच्या किंमती हया बाजारभावापेक्षा कमी आहे याची खात्री करुनच खरेदी करण्यात येत आहे.

तसेच सोबतच्या तक्त्यात नमुद केलेल्या औषधांची तातडीने आवश्यकता होती, कारण श्री साईनाथ रुग्णालयात मोफत सेवा देण्यात येत असल्यामुळे रुग्णांची संख्या दिवसेंदिवस खुपच वाढत आहे, तसेच राजीव गांधी रुग्णांना मोफत औषधे देणेकामी औषधे अपुरे पडत आहे.

तसेच सन २०१७-१८ या वार्षिक औषधे खरेदीमध्ये सोबतच्या यादीतील एकुण १५८ आयटमपैकी १४६ आयटमकरीता दि.२८/०७/२०१७ व दि.०७/१२/२०१७ रोजी पुरवठा आदेश देण्यात आलेले आहेत, तर उर्वरीत १२ आयटमकरीता फेर निविदेचा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर करण्यात आलेला आहे.

तरी सोबतच्या तक्त्यातील औषधे / सर्जिकल / लॅबोरॅटरी साहित्य मंजुर दराने कार्योत्तर खरेदीस व याकामी येणा-या पुर्णांकित रक्कम रु.२,०५,८२,२९६/- (अक्षरी रु.दोन कोटी पाच लाख ब्याऐंशी हजार दोनशे शहान्नव मात्र) चे खर्चाचा प्रस्ताव नोंद घेण्यासाठी सविनय सादर.

**निर्णय क्र.१०२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, सन २०१५-१६ मधील (Annual Rate Contract) वार्षिक खरेदीमधील मंजूर दराने औषधे व सर्जिकल, लॅबोरॅटरी साहित्य यांच्या अतिरिक्त केलेल्या खरेदीस व त्याकामी आलेल्या रु.२,०५,८२,२९६/- मात्रचे खर्चास कार्योत्तर मान्यता देण्यात आली. (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)**

---

**विषय नं.२९** **M/s Austin Healthcare, Pune यांचेकडून श्री क्षेत्र नाशिक येथे सिहस्थ कुंभमेळा पर्वणीच्या कालावधीत घेण्यात आलेल्या Glucon-D Powder चे बील अदा करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री क्षेत्र नाशिक येथे सिंहस्थ कुंभमेळा पर्वणी असल्यामुळे संभवित गर्दीचा विचार करता शिर्डीत भाविकांची होणारी वाढ लक्षात घेता श्री साईनाथ रुग्णालयाच्या प्रथमोपचार केंद्राने काही औषधे व सर्जिकल साहित्याची दि.२९/०६/२०१५ रोजी मागणी केलेली होती. त्यानूसार नजिकच्या अधिकृत विक्रते / पुरवठाधारक यांचेकडून दरपत्रक मागविण्यात आले होते. त्यास अनूसरुन दि०५/०८/२०१५ रोजीरक्कम रु.८,८८,९३७.२८ चे खर्चाचा प्रस्ताव ठेवण्यात आला होता.

तसेच सदर कालावधीत सन २०१५-१६ मधील वार्षिक औषधे व सर्जिकल साहित्य खरेदीची प्रक्रीया चालू असल्यामुळे तत्कालीन मा. कार्यकारी अधिकारी यांनी ज्या औषधे व सर्जिकल साहित्याकरीता सन २०१५-१६ मधील वार्षिक औषधे व सर्जिकल साहित्य खरेदीमध्ये पुरवठा आदेश देण्यात आलेले आहेत ती औषधे व सर्जिकल साहित्य सदर पुरवठा धारकाकडून त्याच मंजूर दराने सिंहस्थ कुंभमेळयासाठी खरेदी करण्यात येऊन ज्या औषधेवसर्जिकलसाहित्याकरीतापुरवठा आदेश देण्यात आलेले नाहीत त्याकरीता विहित पध्दतीने कोटेशन मागवून तुलनात्मक दरांच्या तक्त्यातील निम्नतम दराने पुरवठा आदेश देण्यात यावा असे तोंडी आदेश दिलेले होते. त्यानूसार ज्या औषधेवसर्जिकलसाहित्याकरीतापुरवठा आदेश देण्यात आलेले नाहीत त्याचे खरेदीच्या प्रस्तावास व रक्कम रु.२,७८,१०१/- चे खर्चास दि.०८/०९/२०१५ चे त्रि सदस्य समिती सभेमध्ये मान्यता मिळालेली आहे.

त्यानूसार सिंहस्थ कुंभमेळयासाठी M/s. Austin Healthcare, Pune यांचेकडून त्यांना वार्षिक दिलेल्या पुरवठा आदेशातील मंजूर दराने Glucon –D Powderकरीता १०००० नगाची मागणी केलेली होती. त्यानूसार M/s. Austin Healthcare, Puneयांचेकडून बील नं.३४० दि.०३/०९/२०१५ अन्वये १०००० नगाची रु.१,३४,३२५/- इतक्या रक्कमेत खरेदी केलेली आहे.

परंतू श्री क्षेत्र नाशिक येथील सिंहस्थ कुंभमेळा पर्वनी काळात शिर्डी येथे भाविकांची गर्दी न झाल्यामुळे आपण मागणी केलेल्या Glucon –D Powder चा खप होणार नसल्यामुळे M/s. Austin Healthcare, Pune यांना सदर Glucon –D Powder परत घेऊन जाणे बाबत विंनती केली असता त्यांनी सदर Glucon –D Powder आपली तातडीची मागणी पाहता कंपनीने विशेष बाब म्हणून पाठविलेआहे. त्यामुळे ते विमानाद्वारे तातडीने पाठविले आहे, त्यामुळे ते आम्ही परत घेऊ शकत नाही असे कळविले होते.

परंतु जास्तीचा साठा पाहता Glucon –D Powder परत करणेकामी M/s. Austin Healthcare, Pune यांना वेळोवळी पत्र पाठविण्यात आले होते तसेच दूरघ्वनीद्वारे देखील कळविण्यात आलेले होते. त्यान्वये मे.ऑस्टीन हेल्थकेअर, पुणे यांचे प्रतिनिधी शिर्डी येथे येऊन तत्कालीन मा.कार्यकारी अधिकारी सो. व वैद्यकिय संचालक सो. यांना भेटले असता त्यांच्यामध्ये सदर बाबत खालीलप्रमाणे चर्चा / विनिमय झालेला आहे. "प्राप्त पावडरचा साठा जास्त असून तो साठा जोपर्यंत आमच्याकडे खप होत नाही अथवा खप करुन मुदतबाहयतेच्या अगोदर उर्वरीत साठा परत करण्यात येऊन वापरलेल्या साठयाचे बील अदा करण्यात येईल" असे ठरले होते. त्याप्रमाणे M/s. Austin Healthcare, Pune, पुणे यांनी पाठविलेल्या पावडरचा साठा संपलेला असून त्यांनी त्या मटेरीयलच्या पेमेंटची मागणी केलेली आहे.

तेंव्हा M/s. Austin Healthcare, Pune यांनी नाशिक येथे सिंहस्थ कुंभमेळयासाठी येणा-या भाविकांसाठी पुरवठा केलेल्या Glucon D– १०००० नग केलेल्या खरेदीस व याकामी आलेल्या रक्कम रु.१,३४,३२५/- चे खर्चास कार्योत्तर मान्यता असावी.

निर्णय क्र.१०३ **यावर सविस्तर चर्चा होऊन, M/s Austin Healthcare, Pune यांचेकडून श्री क्षेत्र नाशिक येथे सिहस्थ कुंभमेळा पर्वणीच्या कालावधीत घेण्यात आलेल्या Glucon-D Powder चे रु.१,३४,३२५/- मात्र बील त्यांना आदा करणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

विषय नं.३० **माहे सप्टेबर, ऑक्टोबर २०१७ मधील जमा- खर्च तक्त्याची नोंद घेणेबाबत.**

प्रस्ताव- लेखाशाखा विभागामार्फत दरमहा संस्थानला सर्व मार्गाने जमा होणा-या व संस्थानकडुन खर्च होणा-या रकमांचा एकत्रित जमा खर्च तक्ता तयार करण्यात येतो. सदर जमा व खर्चाच्या आकडेवारीचा तक्ता मा.व्यवस्थापन समितीच्या सभेसमोर नोंद घेण्यासाठी सादर करण्यात येत असतो.

त्या अनुषंगाने माहे सप्टेबर, ऑक्टोबर - २०१७ या कालावधीतील मासिक जमा-खर्चाचे तक्ते तयार करण्यात आले असून ते मा. व्यवस्थापन समितीचे सभेसमोर नोंद घेणेसाठी सादर करणे आवश्यक आहे. त्यास अनुसरून माहे सप्टेबर व ऑक्टोबर २०१७ या महिन्याचा जमा-खर्चाचा तपशील खालीलप्रमाणे–

| महिना | जमा | खर्च |
|---|---|---|
| सप्टेबर २०१७ | ३५,०६,२४,९७६ | २०,६२,४८,३९० |
| ऑक्टोबर २०१७ | ३८,०६,९४,००२ | २३,५१,४२,७७२ |

तरी लेखापुस्तकाप्रमाणे माहे सप्टेबर व ऑक्टोबर २०१७ या कालावधीतील जमा खर्चाची नोंद घेण्यासाठी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सादर.

निर्णय क्र.१०४ **यावर सविस्तर चर्चा होऊन, माहे सप्टेबर, ऑक्टोबर २०१७ मधील जमा-खर्च तक्त्याचे अवलोकन करणेत येऊन, त्याची नोंद घेण्यात आली.** (कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)

---

विषय नं.३१ **श्री साईबाबा व श्री साईनाथ रक्तपेढीमध्ये नोव्हेंबर, २०१७ महिन्यात वैद्यकिय बिलात देण्यात आलेल्या सवलतीस मान्यता मिळणेबाबत.**

प्रस्ताव- श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये गरीब व गरजु रुग्णांना वैद्यकिय बिलात सवलत देण्या संबंधित मा.व्य.स.निर्णय क्र.५१९/ दि.२४.०७.२०११ संमत झाला आहे. वैद्यकिय बिलात सवलत देण्याचे अधिकार उप.वै.संचालक/ वै.संचालक यांना देण्यात आलेले आहेत त्यांचे गैर हजेरीत वै.प्रशासक/जनसंपर्क अधिकारी यांना अधिकार सुपुर्त् करण्यात येऊन रुग्णांना मासिक वैद्यकिय बिलात सवलत देण्यात येते.

जनसंपर्क अधिकारी/ सोशल वर्कर हे रुग्णांची आर्थिक परिस्थीती जाणून घेतात व आवश्यक कागदपत्रांसह सवलत मंजुरी करीता प्रस्तावीत करतात. अशा प्रकारे हॉस्पिटलमध्ये वैद्यकिय बिलात सवलत देण्याकरीता स्वतंत्र विभाग कार्यरत आहे. निर्णय क्र.५६४/२६.०६.२०१४ अन्वये प्रत्येक महिन्यात देण्यात आलेल्या वैद्यकिय सवलतीस मा.कार्यकारी अधिकारी यांची मान्यता घेण्यात येऊन आर्थिक वर्षाच्या शेवटी

एकत्रित अहवाल मा.व्य.स.चे सभे समोर नोंद घेण्यासाठी सादर करण्यात यावा असे ठरले आहे.माहे सप्टेंबर २०१७ चे अहवालत माहे नोव्हेंबर २०१७ मध्ये श्री साईबाबा हॉस्पिटलला ओपीडी १३,७८० पैकी३, ९६१ व आयपीडी १,१२० पैकी६७८ रुग्णांना वैद्यकिय बिलात एकुण रु.९८,०४,८४१/-इतकी सवलत देण्यात आली व श्री साईनाथ रक्तपेढीमध्ये गरीब व गरजु रुग्णांना वैद्यकीय बिलात सवलत देण्या संबंधीत मा.व्य.स.निर्णय क्रं.३४६/ दि.१८-१९.०८.२००१संमत झाला आहे, जा.नं.एसएसएस/एसएसएच/३३१/२०१७ दि.३०.०३.२०१७ आदेश. दि.०६.०३.२०१० ची सिकल सेल आजाराच्या रुग्णांना मोफत रक्त देणेबाबत टिपणी प्रमाणे एकुण **३४८** रुग्णाना रक्कम **रु.५,७४,१००/-** इतकी मोफत/सवलत देण्यात आली आहे. सवलत/मोफतचे विवरण खालील प्रमाणे-

**(अ) श्री साईबाबा हॉस्पिटल**

| अ.नं. | रुग्णांची गटवारी | लाभार्थी संख्या | एकुण बिल रक्कम | बिलापोटी मिळालेली रक्कम | बिलात दिलेली सवलत |
|---|---|---|---|---|---|
| १ | गरीब/दारिद्रय रेषेखालील रुग्णांना दिलेली सवलत रक्कम | २०४ | १७,३६,९९७/- | - | १७,३६,९९७/- |
| २ | आर्थिक दृष्टया दुर्बल घटकातील रुग्णांना दिलेली सवलत रक्कम | ४४१ | ३३,६९,२७९/- | १५,२८,२१६/- | १८,४१,०६३/- |
| ३ | सकृत दर्शनी गरीब रुग्णांना दिलेली सवलत रक्कम | ०८ | ६६,८५७/- | ४४,०००/- | २२,८५७/- |
| ४ | कुत्रा, साप, माकड चावलेले रुग्ण, साई भक्त, साध्वी कन्या कुमारी, आश्रम, डायलेसिस, हिमोफिलीया, शालेय पोशन आरोग्ययोजना इ. | ५९३ | २८,२०,९९९/- | १६,३३,०७४/- | ११,८७,९२५/- |
| ५ | राजीवगांधी आरोग्य योजना आयपीडी रुग्णांना दिलेली सवलत | ४०३ | १,८८,३३,११७/- | १,५९,८२,०५८/- | २८,५१,०५९/- |
| ६ | राजीवगांधी आरोग्य योजना ओपीडी रुग्णांना दिलेली सवलत | २,९९० | १५,९०,८४०/- | - | १५,९०,८४०/- |
| | **एकुण** | **४,६३९** | **२,८४,१८,०८९/-** | **१,९१,८७,३४८/-** | **९२,३०,७४१/-** |

**(ब) श्री साईनाथ रक्तपेढी**

| अ.नं. | रुग्णांची गटवारी | लाभार्थी संख्या | एकुण बिल रक्कम | बिलापोटी मिळालेली रक्कम | बिलात दिलेली सवलत |
|---|---|---|---|---|---|
| १ | थॅलेसिमिया | ४१ | ५३,८००/- | - | ३५,८००/- |
| २ | हिमोफिलीया | ० | - | - | - |
| ३ | सिकल सेल ॲनेमीया फ्रि | ० | - | - | - |
| ४ | फ्रि डन बाय एमएडी/एमएस | ११ | १०,८००/- | - | १२,६००/- |
| ५ | व्हॉलंटरीब्लड डोनेशन फ्रि | ३६ | ४,४००/- | - | २,८००/- |
| ६ | राजीव गांधी आरोग्य योजना | १२८ | २,६८,९००/- | - | १,९४,७००/- |
| ७ | संस्थानएम्प्लॉयी फ्रि | ८ | १२,६००/- | - | ६,२००/- |
| ८ | कॉन्ट्रक्टएम्प्लॉयी फ्रि | ५ | ८.४००/- | - | ३.६००/- |
| ९ | श्री साईनाथ हॉस्पिटल फ्रि | ११९ | २,१५,२००/- | - | १,२२,०००/- |
| | **एकुण** | **३४८** | **५,७४,१००/-** | - | **३,७७,७००/-** |
| | **एकुण अ+ब** | **४,९८७** | **२,८९,९२,१८९/-** | **१,९१,८७,३४८/-** | **९८,०४,८४१/-** |

अशाप्रकारे माहे नोव्हेंबर २०१७ मध्ये वैद्यकिय बिलात विहित पध्दतीने देण्यात आलेल्या रु.९८,०४,८४१/- सवलतीस मान्यता असावी.

**निर्णय क्र.१०५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा व श्री साईनाथ रक्तपेढीमध्ये माहे नोव्हेंबर, २०१७ मध्ये वैद्यकिय बिलात देण्यात आलेल्या सवलतीचे अवलोकन करणेत येऊन, त्यास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.३२** **श्री साईबाबा व श्री साईनाथ रक्तपेढीमध्ये डिसेंबर, २०१७ महिन्यात वैद्यकिय बिलात देण्यात आलेल्या सवलतीस मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये गरीब व गरजु रुग्णांना वैद्यकिय बिलात सवलत देण्या संबंधित मा.व्य.स.निर्णय क्र.५१९/ दि.२४.०७.२०११ संमत झाला आहे. वैद्यकिय बिलात सवलत देण्याचे अधिकार उप.वै.संचालक/ वै.संचालक यांना देण्यात आलेले आहेतत्यांचे गैर हजेरीत वै.प्रशासक/जनसंपर्क अधिकारी यांना अधिकार सुपुर्त करण्यात येऊन रुग्णांना मासिक वैद्यकिय बिलात सवलत देण्यात येते.

जनसंपर्क अधिकारी/सोशल वर्कर हे रुग्णांची आर्थिक परिस्थीती जाणून घेतातव आवश्यक कागदपत्रांसह सवलत मंजुरी करीता प्रस्तावीत करतात. अशा प्रकारे हॉस्पिटलमध्ये वैद्यकिय बिलात सवलत देण्याकरिता स्वतंत्र विभाग कार्यरत आहे. निर्णय क्र.५६४/२६.०६.२०१४ अन्वये प्रत्येक महिन्यात देण्यात

आलेल्या वैद्यकिय सवलतीस मा.कार्यकारी अधिकारी यांची मान्यता घेण्यात येऊन आर्थिक वर्षाच्या शेवटी एकत्रित अहवाल मा.व्य.स.चे सभे समोर नोंद घेण्यासाठी सादर करण्यात यावा असे ठरले आहे. माहे सप्टेंबर २०१७ मध्ये देण्यात आलेल्या वैद्यकिय सवलतीस मान्यतेचे प्रस्तावावर मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दर महा मा.व्य.समिती सभेसमोर सादर करण्यास शेरा दिला आहे. त्याप्रमाणे माहे डिसेंबर २०१७ मध्ये श्री साईबाबा हॉस्पिटलला ओपीडी १३,६१३ पैकी ३,७११ व आयपीडी १,११३ पैकी ६२५ रुग्णांना वैद्यकिय बिलात एकुण **रु.८५,६८,२६०/-** इतकी सवलत देण्यात आली व श्री साईनाथ रक्तपेढीमध्ये गरीब व गरजु रुग्णांना वैद्यकिय बिलात सवलत देण्या संबंधित मा.व्य.स.निर्णय क्र.३४६/दि.१८-१९.०८.२००१ संमत झाला आहे, जा.नं.एसएसएस/एसएसएच/३३१/२०१७ आदेश. दि.०६.०३.२०१० ची सिकल सेल आजाराच्या रुग्णांना मोफत रक्तदेणेबाबत टिपणी प्रमाणेमाहे डिसेंबर २०१७ मध्ये एकुण २४६ रुग्णांना रक्कम **रु.३,६२,७००/-** इतकी मोफत/ सवलत देण्यात आली आहे. सवलत/मोफतचे विवरण खालील प्रमाणे-

**अ) श्री साईबाबा हॉस्पिटल**

| अ.नं. | रुग्णांची गटवारी | लाभार्थीसंख्या | एकुण बिल रक्कम | बिलापोटी मिळालेली रक्कम | वैद्यकिय बिलात दिलेली सवलत |
|---|---|---|---|---|---|
| १ | गरीब/दारिद्रय रेषेखालील रुग्णांना दिलेली सवलत रक्कम | १८० | १४,५२,९६७/- | - | १४,५२,९६७/- |
| २ | आर्थिक दृष्टया दुर्बल घटकातील रुग्णांना दिलेली सवलत रक्कम | ३६१ | ३०,७२,२७०/- | १३,६९,७१२/- | १७,०२,५५८/- |
| ३ | सकृत दर्शनी गरीब रुग्णांना दिलेली सवलत रक्कम | ०९ | १४,८५०/- | - | १४,८५०/- |
| ४ | कुत्रा, साप, माकड चावलेले रुग्ण, साई भक्त, साध्वी कन्या कुमारी, आश्रम, डायलेसिस, हिमोफिलीया, शालेय पोशन आरोग्य योजना इ. | ६४१ | २८,४७,९१४/- | १६,६०,४१३/- | ११,८७,५०१/- |
| ५ | राजीवगांधी (महात्मा फुले) आरोग्य योजना आयपीडी रुग्णांना दिलेली सवलत | ३८२ | १,८६,९१,०३४/- | १,५९,३२,३२०/- | २७,५८,७१४/- |
| ६ | राजीवगांधी (महात्मा फुले) आरोग्य योजना ओपीडी रुग्णांना दिलेली सवलत | २,७६३ | १४,५१,६७०/- | - | १४,५१,६७०/- |
| | **एकुण अ** | **४,३३६** | **२,७५,३०,७०५/-** | **१,८९,६२,४४५/-** | **८५,६८,२६०/-** |

**(ब) श्री साईनाथ रक्तपेढी**

| अ.नं. | रुग्णांची गटवारी | लाभार्थी संख्या | एकुण बिल रक्कम | बिलापोटी मिळालेली रक्कम | वैद्यकिय बिलात दिलेली सवलत |
|---|---|---|---|---|---|
| १ | थॅलॅसिमिया | ३६ | ३४,८००/- | - | ३४,८००/- |
| २ | हिमोफिलीया | ० | - | - | - |
| ३ | सिकल सेल ॲनेमीया फ्रि | ० | - | - | - |
| ४ | फ्रि डन बाय एमडी/एमएस | ५ | ५,२००/- | - | ५,२००/- |
| ५ | व्हॉलंटरीब्लड डोनेशन फ्रि | २१ | २,३००/- | - | २,३००/- |
| ६ | राजीव गांधी (महात्मा फुले) आरोग्य योजना | १०४ | २,२१,२००/- | - | २,२१,२००/- |
| ७ | संस्थान एम्प्लॉयी फ्रि | ७ | ८,६००/- | - | ८,६००/- |
| ८ | कॉन्ट्रक्ट एम्प्लॉयी फ्रि | २ | १,८००/- | - | १,८००/- |
| ९ | श्री साईनाथ हॉस्पिटल फ्रि | ७१ | ८८,८००/- | - | ८८,८००/- |
| | **एकुण ब** | **२४६** | **३,६२,७००/-** | - | **३,६२,७००/-** |
| | **एकुण अ+ब** | **४,५८२** | **२,७८,९३,४०५/-** | **१,८९,६२,४४५/-** | **८९,३०,९६०/-** |

उपरोक्त प्रमाणे श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रक्तपेढीमध्ये माहे डिसेंबर २०१७ मध्ये वैदयकिय बिलात विहित पध्दतीने देण्यात आलेल्या रु.८९,३०,९६०/- सवलतीस मान्यतेसाठी मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर.

निर्णय क्र.१०६ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा व श्री साईनाथ रक्तपेढीमध्ये माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वैद्यकिय बिलात देण्यात आलेल्या सवलतीचे अवलोकन करणेत येऊन, त्यास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

<u>यानंतर मा.अध्यक्ष महोदय यांचे परवानगीने आयत्या वेळेच्या विषयांवर चर्चा सुरु करणेत आली.</u>

आयत्या वेळेचा
विषय नं.०१ **श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्ष सन २०१७-२०१८ चे कालावधीत माहे जानेवारी व फेब्रुवारी- २०१८ मध्ये नागपुर व विदर्भ या ठिकाणी आयोजीत करण्यात आलेल्या श्रींचे पादुका दर्शन सोहळयाचे कार्यक्रमास मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूदः-**

१) अधिनियमाचे कलम १७ मधील पोट कलम (१) अन्वये,राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दीष्टये साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितची कर्तव्ये असतील.

२) अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १ (ग) अन्वये, भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे.

३) अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १(ख) रुढी व प्रथांनुसार, मंदिरातील धार्मिक विधी, पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करणे व पार पाडणे.

४) अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १ (ड) श्रीसाईबाबांच्या शिकवणीचा प्रचार करणे.

**मा. व्यवस्थापन समिती ठरावः-** मा. व्यवस्थापन समितीचे दि.०८/०९/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.७६९ नुसार श्री सदगुरू चॅरीटेबल ट्रस्ट्, नागपूर यांना दि.२५ जानेवारी,२०१८ ते ०६ फेब्रुवारी, २०१८ या कालावधीमध्ये नागपुर व विदर्भ येथे श्रींचे पादुका उपलब्ध करून देण्यास मान्याता देण्यात आलेली आहे.

**प्रस्तावना**– श्री साईबाबा यांच्या समाधीस दि.१८ ऑक्टोबर, २०१८ रोजी १०० वर्षे पूर्ण होत आहेत. यानिमित्त श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्यातर्फे दि.०१ऑक्टोबर, २०१७ ते दि.१८ ऑक्टोबर,२०१८ या कालावधीमध्ये श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्ष साजरे केले जाणार आहे. त्या अनुषंगाने प्रचार व प्रसारासाठी देश विदेशांमध्ये ठिकठिकाणी श्रींच्या पादुका दर्शन सोहळा आयोजन करण्यात येत असून, मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णयानुसार दि.२५/०१/२०१८ ते दि.०६/०२/२०१८ रोजी **नागपूर व विदर्भ** येथे साई पादुका दर्शन सोहळा आयोजित करण्यात आलेला आहे.

तसेच मा. व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार नियोजीत पादुका दर्शन सोहळयाचे ठिकाणी पहाणी करणेकामी संस्थान समिती सदस्य व संस्थान अधिकारी यांनी श्रींचे पादुका दर्शन सोहळयाचे नियोजीत ठिकाणी पहाणी करण्याचे ठरलेले आहे. त्यानुसार श्री. एस.व्ही. गमे, प्रशासकीय अधिकारी यांनी दि.११/०१/२०१८ ते १७/०१/२०१८ या कालावधीमध्ये नियोजीत ठिकाणी व मा. अध्यक्ष महोदय यांचे सूचनेप्रमाणे पहाणी केलेली आहे. तसेच त्यांनी आपला स्पष्ट अहवाल दि.२०/०१/२०१८ रोजी सादर केलेला आहे.

तथापी श्री सदगुरू चॅरीटेबल ट्रस्ट, नागपूर यांनी दि.२३/०४/२०१७ रोजी ई-मेल पत्राद्वारे कार्यक्रमांची तपशिलवार माहिती सादर कलेली आहे. सदरहू कार्यक्रमांमध्ये मा. अध्यक्ष महोदय यांचे सूचनेप्रमाणे समावेश करण्यात आलेला असून, त्यानुसार दि.२४/०१/२०१८ पासून नागपूर व विदर्भ येथे श्रींचे पादूका दौ-यास सुरवात झालेली आहे.

प्रस्तावः- श्री सदगुरू चॅरीटेबल ट्रस्ट, नागपूर यांनी कळविलेले नुसार व मा. अध्यक्ष महोदय यांचे निर्देशान्वये दि. दि.२५ जानेवारी,२०१८ ते ०६ फेब्रुवारी, २०१८ या कालावधीमध्ये नागपुर व विदर्भ येथे श्रींचे पादुका दर्शन सोहळयाचे तपशिलवार कार्यक्रमांची रूपरेषा खालील तक्त्यात दर्शविलेली आहे.

| अ.नं. | दिनांक | कार्यक्रमांचे ठिकाण | सहआयोजकांचे नांव |
|---|---|---|---|
| ०१. | २५ ते २७ जानेवारी,२०१८ | चिटणवीस पार्क महाल, नागपूर | श्री सदगुरू चॅरिटेबल ट्रस्ट |
| ०२. | २८ जानेवारी,२०१८ | दसरा मैदान, भंडारा | श्री साई सेवक, भंडारा |
| ०३. | २९ जानेवारी, २०१८ | कुशिष लॉन, सिव्हील लाईन, गोंदिया | श्री साई समिती, गोंदिया |
| ०४. | ३० जानेवारी, २०१८ | अ) साई मंदिर, वडसा | श्री साई मंदिर, वडसा |
| | | ब) श्री साई मंदिर, चामोर्सी रोड, गडचिरोली | श्री साईबाबा उत्सव समिती, गडचिरोली |
| ०५. | ३१ जानेवारी, २०१८ | श्री साई मंदिर, पुलगांव | साईधाम चैरी ट्रस्ट, पुलगांव |
| ०६. | ०१ फेब्रुवारी, २०१८ | चांदा क्लब ग्रांउड, चंद्रपूर | श्री साई पालखी उत्सव समिती, चंद्रपूर |
| ०७. | ०२ फेब्रुवारी, २०१८ | श्री साई मंदिर, महात्मा गांधी रोड, वर्धा | श्री साईबाबा सेवा मंडळ, वर्धा |
| ०८. | ०३ फेब्रुवारी, २०१८ | श्री साई मंदिर, बाजुरीया नगर, यवतमाळ | श्री साई मंदिर उत्सव समिती, यवतमाळ |
| ०९. | ०४ फेब्रुवारी, २०१८ | श्री अच्युत महाराज समाधी स्थळ, शेंदुर | श्री अच्युत महाराज सेवा मंडळ, शेंदुर |

| | | | |
|---|---|---|---|
| | | जनाबाजार | जनाबाजार |
| | | श्री साई मंदिर ग्रांउड, इर्व्हिन रोड, अमरावती | श्री साई सेवा उत्सव मंडळ, अमरावती |
| १०. | ०५ फेब्रुवारी, २०१८ | श्री मांगीलाल बाजुरीया प्रांगण, अकोला | श्री साई सेवा मंडळ, अकोला |
| ११. | ०६ फेब्रुवारी, २०१८ | दादासाहेब हावरे महाविद्यालय प्रांगण, पथरोड | श्री साई भक्त, पथरोड |
| | | श्री सदगुरू देवनाथ आश्रम, अजनगावं सुर्जी | देवनाथ महाराज आश्रम सेवा समिती |

तरी श्री सदगुरू चॅरीटेबल ट्रस्ट, नागपूर यांनी कळविलेले नुसार व मा. अध्यक्ष महोदय यांचे सूचनेप्रमाणे व उपरोक्त तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे नागपूर (विदर्भ) येथील श्रींचे पादुका दर्शन सोहळयास दि.२४/०१/२०१८ पासून सुरवात झालेली असून, सर्व समिती सदस्य यांचे नागपूर व विदर्भ श्रींचे पादुका दर्शन सोहळा तपशिलवार माहिती निर्देशनास आणून देणेकामी सविनय सादर.

निर्णय क्र.१०७ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्ष सन २०१७-२०१८ चे कालावधीत माहे जानेवारी व फेब्रुवारी- २०१८ मध्ये नागपुर व विदर्भ या ठिकाणी आयोजीत करण्यात आलेल्या श्रींचे पादुका दर्शन सोहळयाचे कार्यक्रमांचे अवलोकन करणेत येऊन, त्यास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- समाधी शताब्दी कक्षप्रमुख)

---

आयत्या वेळेचा
विषय नं.०२ **श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्ष सन २०१७-१८ चे कालावधीत माहे मार्च-२०१८ मध्ये कर्नाटक राज्यात पादुका दर्शन सोहळा आयोजन करणेबाबत.**

प्रस्ताव- **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूदः-**

१) अधिनियमाचे कलम १७ मधील पोट कलम (१) अन्वये,राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दीष्टये साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितची कर्तव्ये असतील.

२) अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १ (ग) अन्वये, भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे.

३) अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १(ख) रुढी व प्रथांनुसार, मंदिरातील धार्मिक विधी, पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करणे व पार पाडणे.

४) अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १ (ड) श्रीसाईबाबांच्या शिकवणीचा प्रचार करणे.

**प्रस्तावना**– श्री साईबाबा यांच्या समाधीस दि.१८ ऑक्टोबर, २०१८ रोजी १०० वर्षे पूर्ण होत आहेत. यानिमित्त श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्यातर्फे दि.०१ऑक्टोबर, २०१७ ते दि.१८ ऑक्टोबर,२०१८ या कालावधीमध्ये श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्ष साजरे केले जाणार आहे. त्या अनुषंगाने प्रचार व प्रसारासाठी देश विदेशांमध्ये ठिकठिकाणी श्रींच्या पादुका दर्शन सोहळा आयोजन करण्यात येत आहे.

मा. व्यवस्थापन समितीचे दि.०८/०९/२०१७ रोजीचे सभेत यावर सविस्तर चर्चा होऊन तामिळनाडू, पॉडेचेरी, मध्यप्रदेश, गुजरात व महाराष्ट्र येथे माहे-नोव्हेबर, डिसेंबर-२०१७ व जानेवारी, फ्रेबुवारी-२०१८ या महिन्यांमध्ये श्रींचे पादुका दर्शन सोहळा आयोजित करणेस मान्यता देण्यात आलेली होती त्यानुसार उपरोक्त ठिकाणी पादुका दर्शन सोहळा संपन्न झालेला आहे. तसेच यापूर्वी मा. व्यवस्थापन समितीचे सभेत दि. २३/१०/२०१७ रोजीचे सभेत आखिल भारतीय शिर्डी साईबाबा मंदिर विकास समिती, बेळगांव यांचेसह बंगलौर व तुमकुर यांचे प्रतिनीधी उपस्थित होते. त्यावेळी झालेल्या चर्चेस अनुसरून खालील निर्णय क्र.८९२ व ८९३ झालेले आहेत.

निर्णय क्र.८९२- आखिल भारतीय शिर्डी साईसंघा, बंगलौर व साईभक्त श्री. भास्करण यांचे श्री साई मंडळ, मल्लेश्वरम, बंगलौर, तसेच शिर्डी साईनाथ सेवा समिती, तुमकुर यांना फेब्रुवारी-२०१८ च्या शेवटच्या आठवडयामध्ये पादुका दर्शन सोहळयासाठी श्रींच्या पादुका उपलब्ध करून देण्यात याव्यात. यासाठी पादुका

दर्शन सोहळा आयोजित करणेकामी प्राप्त झालेले उपरोक्त अर्ज, पादुका दर्शन सोहळ्याच्या अर्जांची छाननी करणेकामी गठीत करणेत आलेल्या समितीसमोर सादर करावा व या समितीने पादुका दर्शन सोहळ्याची रूपरेषा ठरवून, त्याचा प्रस्ताव पुढील सभेसमोर सादर करावा, असे ठरलेले आहे.

तसेच निर्णय क्र.८९३- उपरोक्त निर्णयानुसार बंगलौर व तुमकुर येथे माहे- फेब्रुवारी-२०१८ च्या शेवटच्या आठवडयामध्ये पादुका दर्शन सोहळ्यासाठी श्रींच्या पादुका उपलब्ध करून देण्याचे ठरलेले आहे, त्याच वेळेस शिर्डी साईबाबा मंदिर विकास समिती, बेळगांव यांनाही श्रींच्या पादुका उपलब्ध करून देण्यात याव्यात, यासाठी पादुका दर्शन सोहळा आयोजित करणेकामी प्राप्त झालेला उपरोक्त अर्ज, पादुका दर्शन सोहळ्याच्या अर्जांची छाननी करणेकामी गठीत करणेत आलेल्या समितीसमोर सादर करावा व या समितीने पादुका दर्शन सोहळ्याची रूपरेषा ठरवून, त्याचा प्रस्ताव पुढील सभेसमोर सादर करावा असे ठरले.

तथापि मा. व्यवस्थापन समितीचे दि.०८/०१/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र.७३ नुसार पादुका दर्शन सोहळ्यासाठी प्राप्त होणा-या अर्जांची छाननी करणेसाठी मा. व्यवस्थापन समितीच्या दि.२०/०८/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.६८७ मध्ये ठरलेनुसार गठीत करणेत आलेली समिती रद्द करणेत आली व पादुका दर्शन सोहळ्याचे आयोजनासाठी येणा-या अर्जांची छाननी यापूढे स्थानिक उपसमिती सभेसमोर करणेत यावी, असे ठरले आहे.

तथापि आखील भारतीय शिर्डी साई संघ, श्री.अभिषेक कुमार, यांनी मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांना अग्रेषीत केलेल्या दि.२६/०१/२०१८ रोजीचे पत्रामध्ये नमूद केले आहे की, आखील भारतीय शिर्डी साई संघातर्फे गेल्या १० वर्षापासून विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे. त्यासाठी पादुका दर्शन सोहळा आयोजन करणेसाठी परवानगी मिळावी व त्यासाठी मा. सुरेश बाबु यांनी शिफारस केलेली आहे.

**प्रस्तावः-** मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णयानुसार कर्नाटक राज्यातील बंगलौर-तुमकुर-बेळगांव या ठिकाणी माहे-फेब्रुवारी-२०१८ च्या शेवटच्या आठवडयामध्ये पादुका दर्शन सोहळ्यासाठी श्रींच्या पादुका उपलब्ध करून देण्याचे ठरलेले आहे. कर्नाटक राज्यातील खालील प्रमाणे संपूर्ण माहितीसह प्रस्ताव प्राप्त झालेले असून, त्याचा तपशिल खालील तक्त्यात दर्शविलेला आहे.

| अ.नं. | शहर | मंदिर / ट्रस्टचे नांव | आयोजकांचे नांव | अपेक्षित भक्त संख्या | आयोजकांकडून अंदाजे करण्यात येणारा खर्च | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१. | तुमकुर | श्री शिर्डी साईनाथा सेवा समिती, | श्री गुरूसिध्दप्पा | १ ते २ लाख | १५ लाख | |
| ०२. | बिदर | साईबाबा मंदिर, बिदर | श्री संजय जाधव | २५ हजार | ३ ते ४ लाख | |
| ०३. | बंगलौर | आखील भारतीय शिर्डी साई संघ | श्री. अभिषेक कुमार | ३ ते ४ लाख | ५० लाख | |
| ०४. | बेंगलोर | श्री साई मंडळी, मल्लेश्वरम | श्री. भास्करण साहेब | १ लाखाचे पूढे | आवश्यक तेवढा | |
| ०५. | मंगलोर | श्री शिर्डी साईबाबा मंदिर, लेडी हिल्स, मंगलोर, | विश्वास कुमार दास | २० हजार | २० ते २५ लाख | |
| ०६. | बेळगांव | शिर्डी साईबाबा मंदिर अभिवृध्दी सोसायटी | कृष्णा कांगलकर | ३० हजार | १२ लाख | |
| ०७. | बेळगांव | श्री ओम साई समाज साईमंदिर तिलकवाडी | श्री. सदानंद प्रभु | ३५ हजार | आवश्यक तेवढा | |
| ०८. | कोडवरू, उडपी | शिर्डी साईबाबा मंदिर | श्री. दिवाकर शेट्टी | ६० हजार | ४० ते ५० लाख | |

तरी मार्च-२०१८ मध्ये श्रींचे पादुका दर्शन सोहळ्याचा कार्यक्रम आयोजन होणेसाठी,

१) उपरोक्त तक्त्यातील कर्नाटक राज्यातील शहरांची व आयोजकांची नांवे निश्चित करणेस.

२) कर्नाटक राज्यातील श्रींचे पादुका दर्शन सोहळ्यासाठी तारखांची निश्चिती करणेस.

सदरहू प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपूढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.१०८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, समाधी शताब्दी निमित्ताने कर्नाटक राज्यामध्ये पादुका दर्शन सोहळा आयोजित करणेसाठी प्राप्त झालेल्या अर्जधारकांना पादुका दर्शन सोहळ्याच्या अर्जांची छाननी करणेसाठी गठीत करणेत**

**आलेल्या समितीसमोर चर्चेसाठी बोलविणेत येऊन, पादुका दर्शन सोहळयासाठीची ठिकाणे निश्चित करावीत व त्या ठिकाणांची पहाणी केल्यानंतर पादुका दर्शन सोहळयाची रुपरेषा ठरविणेत यावी, असे ठरले.**

(कार्यवाही- समाधी शताब्दी कक्षप्रमुख)

---

आयत्या वेळेचा

विषय नं.०३ **आयकर कायदा, १९६१ च्या तरतुदीनुसार दिनांक ३१.०३.२०१७ अखेर एकूण शिल्लक असलेल्या अखर्चीत उत्पन्न विनियोगाबाबत.**

प्रस्ताव- श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांस सर्व माध्यमांव्दारे मिळणारे उत्पन्न् हे आयकर कायदा, १९६१ चे कलम १०( २३)(सी)(v) ११ अन्वये संपूर्ण करमुक्त आहे. कलम ११(२) मधील तरतूदींनुसार संबंधित आर्थिक वर्षात मिळालेल्या एकूण उत्पन्नापैकी एकूण ८५ उत्पन्न हे त्याच आर्थिक वर्षात खर्च करणे बंधनकारक आहे. तथापि ते खर्च न झाल्यास या उत्पन्नापैकी अखर्चित राहीलेली रक्कम पुढील ५ वर्षात खर्च करता येईल व दरम्यान या रकमेची आयकर कलम ११(५) अन्वये विहित पध्दतीने गुंतवणूक करावी लागेल. त्यास अनुसरुन आयकर विवरण पत्रे दाखल करावी लागतात. अशा प्रकारे विविरण पत्रे भरण्यात आली असुन सदर रक्कम व ती खर्च करण्याचे आर्थिक वर्ष खालीलप्रमाणे आहे.

| आर्थिक वर्ष | शिल्लक अखर्चीत उत्पन्न रु. | खर्च करण्याची अंतिम मुदत |
|---|---|---|
| २०१२-१३ | १,५५,००,५३,९२९.०० | ३१.०३.२०१८ |
| २०१३-१४ | ३,४३,९१,४२,४२५.०० | ३१.०३.२०१९ |
| २०१४-१५ | २,३०,८४,२६,८४३.०० | ३१.०३.२०२० |
| २०१५-१६ | २,२४,५५,८९,३७७.०० | ३१.०३.२०२१ |
| २०१६-१७ | ३,०२,३२,७६,६०२.०० | ३१.०३.२०२२ |
| **एकुण** | **१२,५६,६४,८९,१७६.००** | |

अशाप्रकारे संबंधीत आर्थिक वर्षात एकूण उत्पन्नाच्या ८५ % रक्कम खर्च न झाल्यामुळे एकूण अखर्चित उत्पन्न वाढत गेले असुन दि.३१.३.२०२२ अखेर रु.१२५६.६४ कोटी अखर्चित उत्पन्न विहित पध्दतीने खर्च करण्यासाठी उपलब्ध आहे. पैकी रु.१५५ कोटी दि.३१.३.२०१८अखेर खर्चकरणे आवश्यक आहे.

दि.१.४.२०१७ ते ३१.१०.२०१७ अखेर कालावधीत पैकी रु.४० कोटी खर्च झाल्याबाबत प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करण्यात आला होता. यावर शिर्डी नगरपंचायतीच्या हद्दीतील रस्त्यांच्या कामासाठी व काही रक्कम संस्थानसाठी शेती महामंडळाची जमीन खरेदी करण्यासाठी वापरण्यात यावी असा निर्णय संमत झाला होता. बाबत दि.३१.१२.२०१७ अखेर आढावा घेता अखर्चीत उत्पन्नापैकी रु.६० कोटी रक्कमेचा विनियोग झालेला असुन उर्वरीत रु.९५ कोटी शिल्लक आहेत, सदर रक्कम दि.३१.०३.२०१८ अखेर संस्थानच्या उद्दीष्ट कामांकरीता खर्च होणे आवश्यक आहे. अन्यथा शिल्लक राहिलेल्या अखर्चीत उत्पन्नावर आयकार कायदयातील तरतुदीनुसार महत्तम दराने आयकर आकारणी होण्याची शक्यता टाळता येत नाही.

तरी बाबत धोरणात्मक निर्णय होऊन दि.३१.०३.२०१८ अखेर शिल्लक असलेल्या रु.१२५६.६४ कोटी उपलब्ध असलेल्या अखर्चित उत्पन्नाचा विनिययोग दि.३१.०३.२०२२ अखेरव दि.३१.०३.२०१८ अखेरच्या अखर्चित उत्पन्नापैकी संस्थान उद्दिष्ट कामांकरीता झालेल्या रु.६० कोटी व्यतीरिक्त शिल्लक रक्कम रु.९५ कोटी रक्कमेचा प्रत्यक्ष विनियोग दि.३१.०३.२०१८ अखेर संस्थान उद्दिष्ट कामांकरीता होणेबाबत धोरणात्मक निर्णय होणेकामी प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीसमोर सादर.

निर्णय क्र.१०९ **यावर सविस्तर चर्चा होऊन, आयकर कायदा, १९६१ च्या तरतुदीनुसार दिनांक ३१.०३.२०१७ अखेर एकूण शिल्लक असलेल्या अखर्चीत उत्पन्न विनियोग करणेसाठी लेखापरिक्षक अथवा आयकर सल्लागार यांचा अभिप्राय मागविणेस यावा, असे ठरले.** (कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)

---

आयत्या वेळेचा

विषय नं.०४ **श्री रामनवमी उत्सव- २०१८ करीता मंदिर व मंदिर परिसरामध्ये विद्युत रोषणाई करणेसाठी (१) श्री.निलेश सुरेश नरोडे, मु.पो.शिंगवे, (२) श्री.गणेश सिताराम शेटे, शनि शिंगणापुर व (३) श्री.द्वारकामाई मंडळ, मुंबई यांचे प्राप्त झालेल्या अर्जावर निर्णय होऊन, त्यांना विद्युत रोषणाई करणेकामी परवानगी देणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम २००४ मधील तरतूद क्र.२१-१ (क) नुसार समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा नियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही एक प्रयोजनासाठी करण्यात येईल :-

(क). मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन.

वरील अधिनियमास अनुसरुन खालीलप्रमाणे प्रस्ताव सादर करीत आहोत.

**प्रस्ताव** :- श्री साईबाबा संस्थानमार्फत दरवर्षी श्री रामनवमी उत्सव साजरा केला जातो. श्री रामनवमी उत्सवामध्ये श्री व्दारकामाई मंडळ, मुंबई यांचेमार्फत भव्य अशी विद्युत रोषणाई केली जाते. तसेच देखावा गेटची उभारणी करुन त्यावर लाईट इफेक्टव्दारे प्रकाश झोत मारुन देखावा गेट आकर्षकरित्या प्रकाशित केले जाते.

यावर्षी श्री रामनवमी उत्सवामध्ये विद्युत रोषणाई करीता ०१). श्री.निलेश सुरेश नरोडे, मु.पो.शिंगवे, ०२). श्री.गणेश सिताराम शेटे, शनि शिंगणापूर व ०३). श्री व्दारकामाई मंडळ, मुंबई यांचे अर्ज प्राप्त झाले आहेत. यापैकी

(०१). श्री.निलेश सुरेश नरोडे, मु.पो.शिंगवे यांनी श्री रामनवमी उत्सवामध्ये मंदिर व मंदिर परिसरामध्ये विनामुल्य विद्युत रोषणाई करण्याची तयारी दर्शविली आहे. परंतू त्यांनी विद्युत रोषणाई ०३ दिवसाकरीता (दि.२४, २५ व दि.२६-०३-२०१८)१२५ केव्हीए जनरेटरसेट भाडोत्री लावणेकरीता संस्थानकडून जनसेट भाडे रु. २४,०००/- मिळावे म्हणून कळविले आहे. ( डिझेल संस्थानला पुरवावे लागेल) यामध्ये देखावा समाविष्ट नाही.

(०२). श्री.गणेश सिताराम शेटे, शनि शिंगणापूर (श्री शनेश्वर लाईट डेकोरेटर्स) यांनी पूर्वी शिर्डी महोत्सवात मोफत विद्युत रोषणाई केलीअ सन श्री रामनवमी उत्सवा दरम्यान शनि शिंगणापूर येथे शनि अमावस्या असल्यामुळे त्यांनी संस्थानकरीता श्री रामनवमी उत्सवामध्ये पुर्ण क्षमतेने विद्युत रोषणाई करता येणार नसल्याचे कळविले आहे. ते फक्त लेंडीबागेमध्ये विद्युत रोषणाई विनामोबदला करु शकतील असे कळविले आहे. यामध्ये देखावा समाविष्ट नाही. तसेच

(०३) श्री व्दारकामाई मंडळ, मुंबई यांनी विद्युत रोषणाई करणे करीता मुंबई येथून विद्युत रोषणाईचे मटेरियल आणणेकरीता ०८ भाडोत्री ट्रक्स व एक संस्थान ट्रक मागणी केलेली आहे. तसेच याव्यतिरिक्त देखाव्यासाठी व विद्युत रोषणाईसाठी ७ ते ८ लाख रुपये खर्च अपेक्षित असल्याचे कळविले होते.

परंतु दि.२३/०१/२०१८ रोजी श्री द्वारकामाई मंडळ,मुंबई चे अध्यक्ष, श्री.विलास महाडीक यांनी संस्थानचे वरीष्ठ अधिका-यांची भेट घेऊन श्री रामनवमी उत्सव-२०१८ करीता विद्युत रोषणाई व देखावा करणेकामी संस्थानने परवानगी दयावी अशी विनंती केली. त्यावेळी तुमचे म्हणणे व मागणी काय आहे हे संस्थानला लेखी स्वरुपात दयावे, असे श्री.महाडीक यांना सांगण्यात आले.त्यानुसार दि.११-०१-२०१८ रोजी पत्राव्दारे कळविलेल्या खर्चातील विगतवारी करुन त्यांनी दि.२३-०१-२०१८ रोजी पुन्हा एक पत्र सादर केले आहे. त्यामध्ये श्री साई मंदिर व मंदिर परीसरात सजावट व विद्युत रोषणाईकरीता श्री साईबाबा संस्थानला खालील गोष्टींची पुर्तता करणेकामी विनंती केलेली आहे.

**अ). श्री व्दारकामाई मंडळ, मुंबई यांनी श्री रामनवमी उत्सव-२०१८ करीता कळविलेला खर्च :-**

| अ.क्र. | तपशिल | येणारा खर्च |
|---|---|---|
| १ | साहित्याची ने-आण करण्याकरीता हूड असलेल्या ८ (आठ) ट्रक आणि श्री साईबाबा संस्थानचा मोठा ट्रक | - |
| २ | २३० कलाकारांचे जाणे येणे सह एस.टी.प्रवास भाडे (येणे व जाणेसह) रु. ४०७ x २३० x २ | रु. १,८७,२२०/- |
| ३ | उत्सवाचे शेवटचे दिवसापर्यंत भाडोत्री लाकडी फळयांचे भाडे, फ्रेम कपडा, फायबर मटेरियल लाकडी फ्रेम, सिरीज, वायर, स्पॉटलाईट, हॅलोजन, मेटल हॅलाईट वगैरे | रु. २,४०,०००/- |
| ४ | मुख्य देखाव्यासाठी प्लॅस्टर पॅरीस आणावे लागते. त्याचे ६०० गोण्यांचे रु. ९०/- प्रमाणे. | रु. ०,५४,०००/- |
| ५ | मुख्य देखावा उत्सवानंतर काही दिवस भक्तांना पाहण्यासाठी ठेवावा लागतो. त्यानंतर देखावा काढणेसाठी आणाव्या लागणा-या कलाकारांचे गाडीभाडे परतीसह = ४० x रु. ४०७/- x २ | रु. ०,३२,५६०/- |
| ६ | मुख्य देखावा उत्सवानंतर काही दिवस भक्तांना पाहण्यासाठी ठेवावा लागतो. त्याकाळातील फळयांचे, व इतर फोकस लाईटचे एकुण भाडे रु. ७०,०००/- होते. | रु. ०,३५,०००/- |

| | | |
|---|---|---|
| | त्यापैकी निम्मी ५० टक्के रक्कम आम्ही डेकोरेटरस वर्गणी करुन आदा करु व राहिलेली ५० टक्के रक्कम रु. ३५,०००/- इतकी संस्थानकडून मिळावी. | |
| ७ | फळया, पीओपी, मोल्डींग्ज व इतर साहित्य हमाली, उतराई, भराई, चढाई (मुंबई व शिर्डी) (येतेवेळेस सामान मुंबई येथून भरणे, शिरडीला खाली करणे, उत्सव संपल्यानंतर सामान शिरडी येथून भरणे, मुंबईला खाली करणे.) | रु. ०,१५,०००/- |
| | **एकुण खर्च :-** | **रु. ५,६३,७८०/-** |

**ब). याव्यतिरिक्त श्री व्दारकामाई मंडळ, मुंबई यांनी मागणी केल्याप्रमाणे ०८ नग भाडोत्री ट्रक, १२५ केव्हीए क्षमतेचे ०३ नग भाडोत्री जनसेट तसेच जनरेटरसेटसाठी लागणारे इंधन यासाठी खालीलप्रमाणे अंदाजे खर्च येऊ शकतो.**

| अ.क्र. | तपशिल | अपेक्षित खर्च |
|---|---|---|
| १ | ०८ नग भाडोत्री ट्रकसाठी अपेक्षित खर्च ( रु. ३०,०००/- x ०८ भाडोत्री ट्रक ) | रु. २,४०,०००/- |
| २ | ०३ भाडोत्री जनरेटरसेटकरीता अपेक्षित खर्च (०४ दिवस) | रु. १,२०,०००/- |
| ३ | भाडोत्री जनरेटरसेटकरीता अपेक्षित इंधन खर्च | रु. ०,९०,०००/- |
| | **एकुण खर्च रक्कम :-** | **रु. ४,५०,०००/-** |

श्री रामनवमी उत्सव-२०१८ करीता श्री व्दारकामाई मंडळ, मुंबई यांचेकडून विद्युत रोषणाई व देखावा उभारणीकामी उपरोक्तप्रमाणे (अ) रक्कम रुपये ५,६३,७८०/- + (ब) प्रमाणे रक्कम रुपये ४,५०,०००/- अशी एकुण रक्कम रु.१०,१३,७८०/- इतका अंदाजे खर्च येणे अपेक्षित आहे.

याव्यतिरिक्त संस्थानचा ०१ मोठा ट्रक ०४ ते ०५ वेळेस मुंबई येथे वेगवेगळया दिवशी विद्युत रोषणाईचे साहित्य आणणे व पोहोच करणेकामी पाठवावा लागणार आहे. तसेच संस्थानमार्फत देखावा उभारणीकामी गोल्टे – १४ फूटी ४० नग, १६ फूटी ५० नग, १८ फूटी ४० नग, बांबू १५ ते १६ फूटाचे १५० नग पुरवावे लागणार आहे. तसेच २३० कलाकारांसाठी त्यांनी निवासासाठी साईबाबा भक्तनिवासस्थान (५०० रुम) येथील ए विंगला २५ खोल्या व रोषणाईचे साहित्य ठेवणेसाठी अंदाजे ४० x २० फूटाचा एक हॉल मंदिराच्या परिसरामध्ये विनामुल्य मिळावा अशी श्री व्दारकामाई मंडळ, मुंबई यांनी मागणी केलेली आहे. तसेच २३० कलाकारांसाठी ०३ वेळेचा चहा, सकाळचा नाष्टा व ०२ वेळचे जेवणाची सोय संस्थानमार्फत विनामुल्य करावी असे कळविले आहे.

**मागणी** :- तरी ०१). श्री.निलेश सुरेश नरोडे, मु.पो.शिंगवे, (मंदिर व मंदिर परिसरात विद्युत रोषणाई करणारे) ०२). श्री.गणेश सिताराम शेटे, शनि शिंगणापूर (फक्त लेंडीबागेत विद्युत रोषणाई करणारे) व ०३). श्री व्दारकामाई मंडळ, मुंबई (मंदिर व मंदिर परिसरात विद्युत रोषणाई करणारे व देखावा उभे करणारे) या विद्युत रोषणाई करणा-या डेकोरेटर्स यांचे पैकी कोणत्या डेकोरेटर्स कडून विद्युत रोषणाई करुन घ्यावी याबाबत मा.व्यवस्थापन समितीचे सभेमध्ये चर्चा होऊन निर्णय होणेस विनंती.

**सदरहू विषयावरील चर्चेच्या वेळी मुख्यकार्यकारी अधिकारी यांनी, श्री व्दारकामाई मंडळ, मुंबई हे गेल्या अनेक वर्षापासुन मंदिर व मंदिर परिसरात विद्युत रोषणाई करतात व देखावा उभारतात. सदरहू काम ते विनामुल्य करतात, परंतु त्यासाठी संस्थानला अंदाजे रु.१० लाख मात्र पर्यंत खर्च येतो, ही बाब सभेच्या निदर्शनास आणून दिली.**

**निर्णय क्र.११०** **यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, श्री व्दारकामाई मंडळ, मुंबई हे गेल्या अनेक वर्षापासुन प्रत्येक उत्सवामध्ये मंदिर व मंदिर परिसरात विद्युत रोषणाई करतात व देखावा उभारतात. चालू वर्ष हे समाधी शताब्दी वर्ष असल्या कारणाने त्यांचे विनंतीप्रमाणे, त्यांना मंदिर व मंदिर परिसरात विद्युत रोषणाई व गेट नं.४ समोर देखावा उभारणेस परवानगी देण्यात यावी. तसेच याकामी येणाऱ्या अंदाजे रु.१० लाख मात्रचे खर्चास मान्यता देण्यात यावी. प्रस्तावातील उर्वरित दोन्ही अर्जदारांना, इतर सणांच्या वेळी विद्युत रोषणाई करणेस मान्यता देण्यात यावी.**

(कार्यवाही- विद्युत विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.०५** **नवीन कला, वाणिज्य व विज्ञान शाखेचे वरिष्ठ महाविद्यालय सुरु करणेकामी आवश्यक खर्चाबाबत.**

**प्रस्ताव-** मा.व्यवस्थापन समितीचे दि.२३-२४/०५/२०१७ चे सभेतील निर्णय क.४४४ अन्वये संस्थानचे कला, वाणिज्य, विज्ञान शाखेचे वरिष्ठ महाविद्यालय सुरु करणेस तसेच त्यासाठी राहाता तालुक्याचा बृह्द आराखडयात समावेश करणेकामी सावित्रीबई फुले पुणे विद्यापीठ यांचेकडे पाठपुरावा करणेत येऊन, पुढील शैक्षणिक वर्षामध्ये शासन मान्यता मिळवून वरिष्ठ महाविद्यालय सुरु करता येईल, अशी कार्यवाही करणेत यावी, असे निर्देश दिलेले आहेत.

त्यानुसार मा.कुलगुरु, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांना श्री साईबाबा संस्थानचे कला, वाणिज्य व विज्ञान शाखेचे वरिष्ठ महाविद्यालय सुरु करणेकरिता राहाता तालुक्याच्या बृह्द आराखडयात समावेश करण्याबाबत प्रस्ताव सादर करण्यात आलेला होता. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठामार्फत सन २०१८-१९ करिता नवीन महाविद्यालय सुरु करणेकामी तयार करण्यात आलेल्या बह्रद आराखडयामध्ये राहाता तालुक्यासाठी ०२ कला, वाणिज्य, विज्ञान शाखेचे महाविद्यालय सुरु करणेबाबत समावेश करण्यात आलेला आहे. सदरचे Notification जाहिरात क्रमांक ५०/ दि.१२.०९.२०१७ अन्वये विद्यापीठाचे संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आलेले होते.

सदर Notification मध्ये असलेल्या धोरणात्मक बाबींवर निर्णय होणेकामी सविस्तर प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेत सादर करण्यात आला असता, मा.व्यवस्थापन समितीचे दि.२५.०९.२०१७ चे सभेतील निर्णय क्र.८४६ नुसार "महाविद्यालयाचे नाव श्री साईबाबा कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय असे ठरविणेत आले. सदर प्रस्तावीत इमारत/जागा म्हणून तात्पुरत्या स्वरुपात साई धर्मशाळा येथील २ इमारती नमुद करणेत याव्यात तसेच प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे व शासन निर्णय क्र.१५.०९.२०१७ नुसार कार्यवाही करणेकामी मुख्य कार्यकारी अधिकारी यांना अधिकारी प्रदान करणेत येऊन, वरिष्ठ महाविद्यालय सुरु करणेसाठी आवश्यक असलेल्या आकृतीबंधाबाबतचा सविस्तर प्रस्ताव पुढील सभेसमोर सादर करणेत यावा" असे ठरले. तसेच याकामी येणा-या सर्वसमावेशक खर्चास मान्यता देण्यात आली.

सदर Notification नुसार इकडील जा.क्र.एसएसएस/साप्रशा/आस्था/३४९७/२०१७ दि.२९ सप्टेंबर, २०१७ अन्वये मुदतीत ऑनलाईन तसेच दि.०३.१०.२०१७ रोजी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ येथे समक्ष जाऊन परिपुर्ण प्रस्ताव ०४ प्रतींमध्ये दाखल करण्यात आलेला आहे. त्यानंतर सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाकडील संदर्भ क्र.CA/२०६४ दि.१०.११.२०१७ रोजीचे पत्रान्वये नवीन महाविद्यालय प्रस्तावासंदर्भात प्रत्यक्ष प्रस्तावित ठिकाणास/ महाविद्यालयास भेट देऊन पाहणी करुन अहवाल सादर करण्याबाबत तज्ञ समितीची नियुक्ती केलेली होती.

सदर तज्ञ समितीने दि.२२.११.२०१७ रोजी शिर्डी येथे येऊन समक्ष येऊन, प्रस्तावित ठिकाणास तसेच उपलब्ध सोईसुविधांबाबत आढावा घेतलेला आहे. त्यांचेकडून उपलब्ध सोईसुविधांबाबत सकारात्मक प्रतिसाद मिळालेला होता. त्यामुळे नवीन वरिष्ठ महाविद्यालयासाठी आवश्यक शिक्षक व शिक्षकेतर आकृतीबंधास मान्यता मिळणेकामी तसेच सदरचा प्रस्ताव मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडे पाठविणेस मान्यता मिळणेकामी इकडील कार्यालयामार्फत दि.२८.११.२०१७ रोजी टिपणी सादर केली असता, त्यावरील वरिष्ठांचे मौखिक सुचनेनुसार पुन्हा दि.०६.१२.२०१७ रोजी फेर प्रस्ताव सादर करुन, वरिष्ठ महाविद्यालयासाठी आवश्यक आकृतीबंधाबाबत मार्गदर्शन मिळणेकामी इकडील जा.क्र.एसएसएस/ साप्रशा/ आस्था/ ४७६६-६८/२०१७ दि.११ डिसेंबर, २०१७ अन्वये मा.कुलसचिव, मा.उपकुलसचिव (शैक्षणिक विभाग) व मा.शिक्षण संचालक (उच्च शिक्षण), पुणे यांना पत्र पाठविण्यात आलेले आहेत. मात्र त्यांचेकडून आजपावेतो कोणत्याही स्वरुपाचा प्रतिसाद मिळालेला नाही.

आता सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे यांचेकडील संदर्भ क्र.सीए/८७ दि.१८.०१.२०१८ रोजीचे पत्रान्वये त्यांनी श्री साईबाबा संस्थानने शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून नवीन महाविद्यालय / संस्था सुरु करण्यास परवानगी मिळणेबाबत सादर केलेल्या अर्ज/प्रस्तावावर विद्यापीठ अधिकार मंडळाने प्राधान्य क्र.०१ शिफारशीनुसार प्रमाणपत्र देऊन महाराष्ट्र शासनास जा.क्र.सीए/२१४५ दि.२९.१२.२०१७ चे पत्राद्वारे मान्यता देणेबाबत शिफारस केलेली आहे.

सबब सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षाकरिता नवीन वरिष्ठ महाविद्यालयास मान्यता मिळणेबाबत केवळ औपरचारिकता शिल्लक राहिलेली आहे.

**त्यामुळे संस्थानचे नवीन वरिष्ठ महाविद्यालय सुरु करणेकामी खालीलप्रमाणे बाबींवर निर्णय होणे अपेक्षित आहे.**

- तसेच विज्ञान शाखेकरिता प्रयोगशाळा साहित्य खरेदी व अनुषंगिक खर्चाबाबत "परिशिष्ठ अ" जोडलेले आहे.

- त्या बरोबरच तीन्ही शाखेंकरिता आवश्यक फर्निचर खरेदी व अनुषंगिक खर्चाबाबत "परिशिष्ठ ब" जोडलेले आहे.
- तसेच संगणक प्रयोगशाळा तयार करणेसाठी साहित्य खरेदी व अनुषंगिक खर्चाबाबत "परिशिष्ठ क" जोडलेले आहे.
- ग्रंथालयासाठी कला, वाणिज्य व विज्ञान शाखेचे पुस्तके खरेदी करणे व अनुषंगिक खर्चाबाबत "परिशिष्ठ ड" जोडलेले आहे.
- क्रिडा साहित्य खरेदी करणे व त्या अनुषंगिक खर्चाबाबत "परिशिष्ठ इ" जोडलेले आहे.
- वरिष्ठ महाविद्यालयासाठी आवश्यक शैक्षणिक साहित्य (फळे, नोटीस बोर्ड वगैरे) खरेदी व अनुषंगिक खर्चाबाबत "परिशिष्ठ ई" जोडलेले आहे.
- तसेच विद्यापीठामध्ये वरिष्ठ महाविद्यालयाचा प्रस्ताव दाखल करतांना मा.व्यवस्थापन समितीचे दि.२५.०९.२०१७ चे सभेतील निर्णय क्र.८४६ नुसार सदर प्रस्तावीत इमारत/जागा म्हणून तात्पुरत्या स्वरुपात साई धर्मशाळा येथील २ इमारती नमुद करणेत आलेली आहे. मात्र प्रत्यक्षात वरिष्ठ महाविद्यालय सुरु करणेसाठी जाग निश्चित करणे आवश्यक आहे.
- प्रस्तावित वरिष्ठ महाविद्यालयाचे इमारतीमध्ये सी.सी.टी.व्ही.कॅमेरे बसविणे. वरिष्ठ महाविद्यालयासाठी कॅन्टीन सुविधा सुरु करणे. प्रस्तावित इमारतीचे वाहनतळामध्ये पार्किंग शेड उभारणे.
- प्रति माह शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांचे वेतनावर होणारा खर्च तसेच इतर अनुषंगिक बाबींवर होणा-या खर्चासाठी अंदाजपत्रकीय तरतुद करणे.

तरी उपरोक्त नमुद कामांसाठी खालीलप्रमाणे अंदाजे खर्च अपेक्षित आहे.

| अ.क्र. | खर्चाचा तपशिल | अंदाजे एकुण खर्च |
|---|---|---|
| ०१. | कर्मचारी वेतन, भत्ते व अनुषंगिक वार्षिक खर्च | रु.६,००,००,०००/- |
| ०२. | प्रयोगशाळा साहित्य खरेदी खर्च | रु.२२,१८,५००/- |
| ०३. | फर्निचर साहित्य खरेदी खर्च (बॅंच, कपाट, खुर्ची व इतर) | रु.१,०१,४०,०००/- |
| ०४. | संगणक व अनुषंगिक साहित्य खरेदी खर्च | रु.२५,९०,०००/- |
| ०५. | ग्रंथालयासाठी पुस्तके खरेदी खर्च | रु.९,२५,०००/- |
| ०६. | क्रिडा साहित्य खरेदी खर्च | रु.१,८३,०००/- |
| ०७. | शैक्षणिक साहित्य खरेदी खर्च | रु.७,६०,०००/- |
| | **एकुण अंदाजे खर्च** | **रु.७,६८,१६,५००/-** |
| | **पुर्णांकित एकुण अंदाजे खर्च** | **रु.८,००,००,०००/-** |

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे यांचेकडून संस्थानचे वरिष्ठ महाविद्यालयास मान्यता मिळालेनंतर परिशिष्ठ "अ" ते "ई" मध्ये नमुद केलेले साहित्य विहित पद्धतीने खरेदी करता येईल, असे नम्र मत आहे. तसेच सन २०१८-१९ चे अंदाजपत्रकामध्ये वरिष्ठ महाविद्यालयासाठी आवश्यक कर्मचारी वेतन, भत्ते व अनुषंगिक खर्चाबाबत तरतुद करता येईल.

तरी उपरोक्त प्रमाणे कार्यवाही करणेस तसेच सदरच्या खर्चास मान्यता मिळणेस विनंती.

निर्णय क्र.१११ **यावर सविस्तर चर्चा होऊन, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे यांचेकडून संस्थानचे वरिष्ठ महाविद्यालयास मान्यता मिळालेनंतर परिशिष्ठ "अ" ते "ई" मध्ये नमुद केलेले साहित्य विहित कार्यपध्दतीने खरेदी करणेस व सन २०१८-१९ चे अंदाजपत्रकामध्ये वरिष्ठ महाविद्यालयासाठी आवश्यक कर्मचारी वेतन, भत्ते व अनुषंगिक खर्चाबाबत तरतुद करणेस तसेच याकामी येणाऱ्या सर्वसमावेशक खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, सामान्य प्रशासन)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०६** **श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालयाचे मुख्याध्यापक पद पदोन्नतीने भरणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी संचालित शैक्षणिक संकुलामधील श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालयाच्या मुख्याध्यापिका श्रीमती निता बबनराव चव्हाणके या दि.३१.१२.२०१५ रोजी विहित वयोमानानुसार सेवानिवृत्त झालेल्या होत्या. श्रीमती चव्हाणके यांचे सेवानिवृत्तीनंतर पदोन्नतीने मुख्याध्यापक पद मिळणेबाबत ०४ सहा.शिक्षक, यांनी अर्ज केलेले होते. पदोन्नतीने मुख्याध्यापक पद मिळणेकामी अर्ज केलेल्या

श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर विभागाकडील ०३ सहा.शिक्षक यांची सेवाजेष्ठता व गोपनीय अहवालाची प्रतवारी खालीलप्रमाणे :-

| अ.क्र. | अर्जदार शिक्षकाचे नांव | नेमणूक दिनांक व सेवा जेष्ठता क्रमांक | शिक्षण | पाच वर्षांचे गोपनीय अहवालाची प्रतवारी | | सरासरी प्रतवारी |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | सन | प्रतवारी | |
| ०१. | श्री.वाणी बाजीराव कनलाल | दि.०४.०७.१९९४ (सेवा जेष्ठता क्रमांक १) | बी.एस्सी., बी.एड. | २०१०-११ | B | B+ |
| | | | | २०११-१२ | B+ | |
| | | | | २०१२-१३ | B+ | |
| | | | | २०१३-१४ | B+ | |
| | | | | २०१४-१५ | A | |
| ०२. | श्री.वरघुडे गंगाधर विश्वनाथ | दि.०४.०७.१९९४ (सेवा जेष्ठता क्रमांक २) | बी.ए., बी.एड. डी.एस.एम. | २०१०-११ | A | A |
| | | | | २०११-१२ | A | |
| | | | | २०१२-१३ | A | |
| | | | | २०१३-१४ | A | |
| | | | | २०१४-१५ | A | |
| ०३. | श्रीमती मिरजकर जहॉआरा शहाबुद्दीन | दि.१७.०६.१९९६ (सेवा जेष्ठता क्रमांक ३) | एम.ए.बी.एड. (Phy.),एम.एड., डी.एस.एम., इंग्रजी टायपिंग ३० श.प्र.मि., MS-CIT | २०१०-११ | B+ | A |
| | | | | २०११-१२ | A | |
| | | | | २०१२-१३ | A | |
| | | | | २०१३-१४ | A | |
| | | | | २०१४-१५ | A | |

तसेच पदोन्नतीने मुख्याध्यापक पद मिळणेकामी अर्ज केलेल्या श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालयाकडील ०१ सहा.शिक्षक यांची सेवाजेष्ठता व गोपनीय अहवालाची प्रतवारी खालीलप्रमाणे :-

| अ.क्र. | अर्जदार शिक्षकाचे नांव | नेमणूक दिनांक व सेवा जेष्ठता क्रमांक | शिक्षण | पाच वर्षांचे गोपनीय अहवालाची प्रतवारी | | सरासरी प्रतवारी |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | सन | प्रतवारी | |
| ०१. | श्री.अरुण बाबुराव घोडके | दि.०१.०७.१९९६ (सेवा जेष्ठता क्रमांक २२) | एम.ए.बी.एड. (English) | २०१०-११ | - | A+ |
| | | | | २०११-१२ | A+ | |
| | | | | २०१२-१३ | A+ | |
| | | | | २०१३-१४ | A+ | |
| | | | | २०१४-१५ | A+ | |

श्री.अरुण बाबुराव घोडके, सहा.शिक्षक हे सध्या श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालयाकडे कार्यरत असून, श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालयाकडील सेवाजेष्ठता याद्या स्वतंत्र ठेवण्यात आलेल्या आहेत. श्री.घोडके हे कनिष्ठ महाविद्यालयाकडील सेवाजेष्ठतायादीमध्ये २२ व्या क्रमांकावर आहेत.

श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालयाकडील मुख्याध्यापक पद पदोन्नतीने भरणेकामी संस्थानचे कायदेशीर सल्लागार ॲड. अशोकराव पाटील, अहमदनगर यांचेकडून कामगार विभागामार्फत कायदेशीर अभिप्राय मागविण्यात आला होता. ॲड. अशोकराव पाटील, अहमदनगर यांनी खालीलप्रमाणे अभिप्राय दिलेला होता.

With reference to your letter dt.06/10/2015 seeking my opinion for appointment of Head of Shri Saibaba Kanya Vidya Mandir I would like to invite your attention to rule No.3 (4) of MEPS Rules 1981 which provides that. In the case of girls Secondary School or Junior College of Education for women, the senior most lady teacher fulfilling the conditions laid down in clause (b) of sub rule (1) and having satisfactory record of service,

shall be appointed as the Head of that school irrespective of her seniority vis-a-vis the male teachers.

Therefore in my opinion Smt.Mirajkar though she is junior to male candidate needs to be promoted on the post of Head of Shri Saibaba Kanya Vidya Mandir.

If required, it is also advisable to clarify the position by visiting the office of Deputy Director of Education.

उपरोक्त अभिप्रायामध्ये त्यांनी महाराष्ट्र खाजगी शाळेतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली १९८१ मधील नियम ३ (४) मधील तरतुदीकडे लक्ष वेधून, सदर तरतुदीनुसार श्रीमती मिरजकर यांना पदोन्नतीने मुख्याध्यापक नेमणेस हरकत नाही, असे कळविलेले आहे, मात्र गरज असल्यास मा.शिक्षण उपसंचालक यांचा अभिप्राय घेणेबाबत सुचित केलेले आहे.

मात्र दरम्यानचे काळात इकडील कार्यालयाकडील दि.२४.१२.२०१५ रोजीचे टिपणीवरील मान्यतेनुसार जा.क्र.एसएसएस/ साप्रशा/आस्था/३६९८/२०१५ दि.३० डिसेंबर, २०१५ चे आदेशान्वये श्रीमती जहॉआरा शहाबुद्दीन मिरजकर यांचेकडे श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालयाच्या मुख्याध्यापक पदाचा अतिरिक्त कार्यभार सोपविण्यात आला.

ॲड.अशोकराव पाटील, अहमदनगर यांनी सुचित केलेनुसार इकडील कार्यालयाकडील दि.२५.०५.२०१६ रोजीचे मंजुर टिपणीनुसार जा.क्र.एसएसएस/वशी-०१/११४६/२०१६ दि.१०.०६.२०१६ अन्वये शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग यांचेशी पत्रव्यवहार करुन, त्यांना सर्व वस्तुस्थिती कळविण्यात येऊन, (कनिष्ठ महाविद्यालयामध्ये मुले व मुली सहशिक्षण घेत असलेबाबत) श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालयाचे मुख्याध्यापक पद पदोन्नतीने भरणेकामी सेवाज्येष्ठ शिक्षकाची नेमणूक करावी अगर जेष्ठतम महिला शिक्षिकेची नेमणूक करावी याबाबत अभिप्राय मागविण्यात आला होता. त्यानुसार मा.विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग यांनी त्यांचेकडील जा.क्र.शिउसं/उमावि-२/पुवि/१५६३९/२०१६ दि.०२.०७.२०१६ रोजीचे पत्रान्वये खालीलप्रमाणे अभिप्राय दिलेला आहे.

"महाराष्ट्र खाजगी शाळेतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली १९८१ मधील नियम-३(४) मधील तरतुदीनुसार मुलींच्या माध्यमिक शाळेच्या बाबतीत किंवा महिला विद्यालयाच्या बाबतीत पोटनियम-१ खंड (ब) मध्ये ठरवून दिलेल्या शर्ती पुर्ण करणा-या व समाधानकारक सेवा विषयक पुर्ववत असलेल्या जेष्ठतम शिक्षकेस पुरुष शिक्षकाच्या तुलनेने संबधित महिला कर्मचा-याची सेवाजेष्ठता लक्षात घेऊन शाळेची/विद्यालयाची मुख्याध्यापक/प्राचार्य म्हणून नियुक्ती करता येईल.

माध्यमिक शाळा संहिता नुसार माध्यमिक शाळेचे मुख्याध्यापक हेच उच्च माध्यमिक शाळेचे/कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य म्हणून काम करत असतात. उच्च माध्यमिक विभागाकडील प्राचार्यांच्या कामासाठी संबधित मुख्याध्यापकाच्या वेतनच्या ग्रेड पे मध्ये १००/- (रु.शंभर) वाढ त्यांना दिलेली असते. त्यामुळे आपल्या संस्थेच्या श्री साईबाबा कन्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालयाच्या मुख्याध्यापक पदी वरील सर्व नियमांच्या अधीन राहुन सेवाजेष्ठता यादीतील सेवाजेष्ठ महिलेची नियुक्ती मुख्याध्यापक/प्राचार्य म्हणून करता येईल" असे नमुद केलेले आहे.

श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर विभागाकडील सेवाजेष्ठता, गोपनीय अहवालाची प्रतवारी, ॲड.अशोकराव पाटील, अहमदगनर यांचा अभिप्राय तसेच विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे यांचा अभिप्राय या सर्व बाबींचे अवलोकन करुन महाराष्ट्र खाजगी शाळेतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली १९८१ मधील नियम ३ (४) मधील तरतुदीनुसार श्री साईबाबा कन्या विद्या मंदिरकडील जेष्ठतम शिक्षिका श्रीमती जहाँआरा शहाबुद्दीन मिरजकर यांची कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालयाच्या मुख्याध्यापक पदी पदोन्नतीने नेमणूक करणेबाबतचा विषय मा.व्य. समितीचे सभेत सादर करण्यात आलेला होता.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.०९.१०.२०१६ चे सभेतील निर्णय क्र.६९३ अन्वये *"श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालयाचा शैक्षणिक दर्जा टिकून राहणेसाठी तेथे योग्य गुणवत्ता धारण करणारा मुख्याध्यापक असावा, असे समितीचे मत झाले, याकरिता येथील मुख्याध्यापक पद जाहिरात देऊन गुणवत्तेच्या आधारे भरणे शक्य आहे काय, याबाबत मा.विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग यांचा अभिप्राय घेण्यात यावा, तोपर्यंत सदरहू प्रस्ताव स्थगित ठेवणेत यावा"* असे ठरले.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.०९.१०.२०१६ चे सभेतील निर्णय क्र.६९३ अन्वये मा.विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग यांना जा.क्र.एसएसएस/साप्रशा/आस्था/३९७१/२०१६ दि.२९ ऑक्टोबर, २०१६

अन्वये अभिप्राय मिळणेबाबत पत्र देण्यात आलेले होते. त्यानुसार मा.विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, यांनी त्यांचेकडील दि.१७.११.२०१६ रोजीचे पत्रान्वये आपल्या संस्थेत माध्यमिक शाळा संहिता मधील नियम क्रमांक ६१.१ अ मधील तरतुदीनुसार पात्र उमेदवार नसेल तरच मुख्याध्यापक पद जाहिरात देऊन भरता येईल, असा अभिप्राय दिलेला आहे.

मात्र दरम्यान मा.व्यवस्थापन समितीचे दि.३०.११.२०१६ चे सभेतील निर्णय क्र.७५५ पुढीलप्रमाणे पारित झालेला आहे. "मा.व्यवस्थापन समितीचे दि.०९.१०.२०१६ चे सभेतील निर्णय क्र.६९३ पुढीलप्रमाणे वाचण्यात यावा, श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालयाकडील मुख्याध्यापक पद पदोन्नतीने भरणेबाबतच्या प्रस्तावामध्ये मा.विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग यांचा अभिप्राय नोंदविण्यात आलेला आहे. याकरिता पुन्हा मा.विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे यांचा अभिप्राय मागविणे आवश्यक नाही, त्यामुळे सदरहु प्रस्ताव फेरचर्चेसाठी पुढील व्यवस्थापन सभेसमोर सादर करणेत यावा" असे ठरले.

त्यानुसार सदरचा प्रस्ताव पुन्हा मा.व्यवस्थापन समितीचे सभेत फेरसादर केला असता, मा.व्यवस्थापन समितीचे दि.२२.१२.२०१६ चे सभेतील निर्णय क्र.९१८ पुढीलप्रमाणे पारित झालेला आहे. यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर विभागाकडील सेवाजेष्ठता, गोपनीय अहवालाची प्रतवारी, ॲड.अशोकराव पाटील, अहमदनगर यांचा अभिप्राय तसेच विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे यांचा अभिप्राय या सर्व बाबींचे अवलोकन करुन महाराष्ट्र खाजगी शाळेतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली १९८१ मधील नियम ३(४) मधील तरतुदीनुसार तसेच शिक्षण संचालक, पुणे विभाग यांचेशी दुरध्वनीद्वारे केलेल्या चर्चेनुसार, जेष्ठतम शिक्षिका श्रीमती जहॉआरा शहाबुद्दीन मिरजकर यांची कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालयाच्या मुख्याध्यापक पदी पदोन्नतीने नेमणूक करणेस मान्यता देण्यात आली.

मा.व्यवस्थापन समितीच दि.२२.१२.२०१६ चे सभेतील निर्णय क्र.९१८ अन्वये श्रीमती जहॉआरा शहाबुद्दीन मिरजकर यांची जा.क्र.एसएसएस/साप्रशा/आस्था/३६३२/२०१६ दि.०७ जानेवारी, २०१७ अन्वये श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालयाच्या मुख्याध्यापक पदी पदोन्नतीने ९३००-३४८०० + ग्रेड पे रु.४८००/- या वेतनश्रेणीत मुळवेतन रु.१९,०६०/- + ग्रेड पे रु.४८००/- प्रमाणे एक वर्षाच्या परिविक्षाधीन कालावधीसह नेमणूक करण्यात आलेली आहे. श्रीमती मिरजकर यांचा परिविक्षाधीन कालावधी दि.०६ जानेवारी, २०१८ रोजी सपलेला असल्याने, त्यांना मुख्याध्यापक, श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालय, या पदावर कायम करावयाचे आहे.

मात्र श्रीमती मिरजकर यांचे कामकाजाबाबत शिक्षक, विद्यार्थीनी, ग्रामस्थ यांनी विविध तक्रारी केलेल्या आहेत. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे –

| अ.क्र. | श्रीमती मिरजकर यांचे विरुद्ध झालेल्या तक्रारींचा तपशिल | त्यावर झालेली कार्यवाही | झालेली शिक्षा/ निकाल |
|---|---|---|---|
| ०१. | दि.११.०७.२०१६ रोजी श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर विभागाकडील सहा.शिक्षक श्री.गंगाधार विश्वनाथ वरघुडे व श्री.सुजय आनंदराव बाबर यांनी स्वतंत्र अर्ज करुन, श्रीमती मिरजकर या मनमानी पद्धतीने तासिकांचे वाटप करत असलेबाबत तसेच विद्यार्थीनींचे हित न पाहाता अहितकारक निर्णय घेत असलेबाबत, तसेच स्वतःकडे अतिरिक्त कार्यभार असतांनाही स्वतःचे अध्यापनाचा कार्यभार कमी करुन घेतला, अशा प्रकारे मनमानी कारभार करुन सर्वच शिक्षकांना मानसिक त्रास देत असलेबाबत तक्रार केलेली होती. | याबाबत प्रशासकीय अधिकारी यांचे कक्षात श्रीमती मिरजकर व तक्रारदार शिक्षक यांना समक्ष बोलवून, सामंजस्याने प्रकरण मिटविण्यास सुचना दिल्या. | श्रीमती मिरजकर यांना मनमानी न करणेबाबत तोंडी समज दिलेली होती. |
| ०२. | श्री.विनोद साहेबराव ढाकणे, श्री.किरण आनंदराव बोरुडे व श्री.दिपक हिरामण शेजवळ, सर्व रा.शिर्डी यांना माहे-जुन-२०१७ मध्ये प्रत्येकी स्वतंत्र तक्रार अर्ज करुन, श्रीमती मिजरकर यांचे पती श्री.खलिल सय्यद हे शालेय प्रशासनात व इतर बाबतीत हस्तक्षेप करत असलेबाबत तक्रार केलेली होती, तसेच श्रीमती मिरजकर यांचे पती आपल्या पत्नीच्या पदाचा गैरवापर करुन संस्थान मधील भक्तांना व्हीआयपी दर्शन/ आरती उपलब्ध करुन आर्थिक लाभ उठवतात, श्रीमती मिरजकर यांना | याबाबत दि.२२.०७.२०१७ रोजी प्रशासकीय अधिकारी यांचे कक्षात श्रीमती मिरजकर, तक्रारदार ग्रामस्थ व इतर शिक्षक यांची समक्ष सुनावणी घेण्यात आली. सुनावणी दरम्यान तक्रारदार यांनी श्रीमती मिरजकर यांचे पती श्री.खलील सय्यद यांनी कन्या शाळेमध्ये येऊन, शिक्षकांची मिटींग घेत असलेबाबतची व्हीडीओ क्लिप सादर केली होती. | त्यामुळे सदर सुनावणीमध्ये श्रीमती मिरजकर यांचे पती श्री.खलिल सय्यद हे दोषी आढळून आल्याने, श्रीमती मिरजकर यांना लेखी समज देऊन, त्यांचे पती श्री.खलिल सय्यद यांना यापुढे शालेय |

| | | | |
|---|---|---|---|
| | वेळोवेळी हजारो रुपये ॲडव्हान्स घेऊन, कोणत्याही प्रकारचे कोटेशन न मागविता समक्ष जाऊन खरेदी केलेली आहे, श्रीमती मिरजकर यांचे पती रोज सकाळी पचिंग मशिनजवळ बसतात, त्यामुळे महिला शिक्षिकांची कुचंबना होती, तसेच ते दिवसभर शाळेच्या परिसरातच बसून असतात, त्यामुळे मुलींना खेळण्यास कुचंबना वाटते, श्रीमती मिरजकर यांचे पती महिला शिक्षिकांशी व विद्यार्थीनीशी विनाकारण बोलण्याचा प्रयत्न करतात त्यांचेशी लगट करण्याचा प्रयत्न करतात, संस्थानची बदनामी करण्याच्या दृष्टीने शाळेची अनावश्यक माहिती सोशल मिडीयावर टाकून कर्मचा-यांच्या मनात भिती निर्माण करतात, रोजंदारी व कंत्राटी शिक्षक व इतर कर्मचारी यांचेवर दबाव आणून त्यांचेकडून आर्थिक लाभ मिळवतात व या सर्व प्रकारात श्रीमती मिरजकर या आपल्या पतीस साथ देतात वगैरे मुद्दे नमुद करुन तक्रार अर्ज केलेले होते. | | कामाकाजात हस्तक्षेप न करणेबाबत कळविण्यात आलेले आहे. |
| ०३. | श्रीमती मिरजकर या प्र.मुख्याध्यापिका असतांना त्यांनी माहे मे-२०१६ मध्ये दि.२०.०५.२०१६ ते २२.०५.२०१६ व दि.२४.०५.२०१६ रोजी रजा/सुट्टी उपभोगल्या होत्या व त्यानंतर दि.२८.०५.२०१६ रोजी रजा अर्ज मंजुरीसाठी सादर केला होता. | त्यामुळे तत्कालीन मा.कार्यकारी अधिकारी साहेब यांनी श्रीमती मिरजकर यांना समज देण्याबाबत निर्देश दिलेले होते, | त्यानुसार त्यांना समज देण्यात आलेली होती |
| ०४. | श्रीमती मिरजकर यांनी प्र.मुख्याध्यापिका म्हणून कार्यभार ताब्यात घेतल्यानंतर सेवानिवृत्त मुख्याध्यापिका श्रीमती चव्हाणके यांचेशी चार्ज देवाण-घेवाण करतांना जाणीवपुर्वक गैरवर्तन केले, त्यांना तास तास बसवून ठेवणे, स्वतः घरी निघून जाणे, कार्यालयातील कर्मचा-यांना जाणीवपुर्वक दुसरे काम सांगून श्रीमती चव्हाणके यांना असहकार्य केले याबाबत श्रीमती चव्हाणके यांनी दि.२५.०४.२०१६ रोजी लेखी तक्रार केलेली होती. तसेच श्रीमती मिरजकर यांचे कनिष्ठ महाविद्यालयाचा चार्ज घेतांना श्री.शिवगजे, सहा.शिक्षक यांचेशी देखील शाब्दीक वादावादी झाली होती. | त्यामुळे अशा परिस्थितीमध्ये प्रशासनामार्फत अंतर्गत लेखापरिक्षण विभागाचे प्रमुख व एक कर्मचारी यांना सबंधीत ठिकाणी पाठवून त्यांचेमार्फत चार्ज देवाण घेवाणची प्रक्रिया पार पाडण्यात आलेली होती. | ------ |
| ०५. | इ.१० वी अ च्या सुमारे ४२ व इ.१० वी ब च्या ४९ विद्यार्थीनीनीं वेगवेगळे अर्ज करुन, श्रीमती मिरजकर मॅडम यांनी दि.२२.०९.२०१७ रोजी वर्गात येऊन, जबरदस्तीने, धमकी देऊन मुलींकडून स्वतः बद्दल चांगले लिहून घेतले. मुलींचा वेळोवेळी अपमान केला, त्यामुळे काही मुलींना शाळा सोडावी लागली, मुली बाहेर उभ्या राहिल्या तर "तुम्ही मुलांना पाहायला उभ्या राहिलात का" असे बोलून अपमानित करत, तसेच मी तुम्हांला ८ वी ला असतांना फार छान शिकवत होते, असे लिहिण्यास सांगितले अशा वेगवेगळ्या तक्रारी मुलींनी केलेल्या आहेत. | त्याबाबत श्रीमती मिरजकर यांना प्रशासनामार्फत कारणे दाखवा नोटीस पाठवून खुलासा घेण्यात आला. | याबाबत त्यांना लेखी समज देण्यात आलेली आहे. |
| ०६. | तसेच इ.०८ वी मधील ५३ विद्यार्थ्यांनी श्रीमती मिरजकर यांच्या विरुद्ध अर्ज देऊन शाळा सुरु झाल्यापासून श्रीमती मिरजकर मॅडम यांचे आजपर्यंत इंग्रजी विषयाचे १० ते ११ तासच झालेले आहे, तसेच झालेल्या तासांमधूनही अनुक्रमणिके प्रमाणे न शिकवता | त्याबाबत श्रीमती मिरजकर यांना प्रशासनामार्फत कारणे दाखवा नोटीस पाठवून खुलासा घेण्यात आला. | याबाबत त्यांना लेखी समज देण्यात आलेली आहे. |

| | | | |
|---|---|---|---|
| | कोणताही धडा व कविता केव्हांही घेण्यात येतात. त्यांनी शिकवलेले समजण्यात खुप अवघड वाटते, मॅडम आमचे म्हणणे ऐकुण घेत नाही, काही विचारावयास गेला की, तुमच्यामुळे माझा वेळ वाया गेला, तुम्हांला छोट्या छोट्या गोष्टया कळत नाही का असे बोलून रागवतात. त्यामुळे त्यांचेबद्दल आमचे मनात खुप भिती आहे. रोज तास होत नाही व ज्या दिवशी तास होतो त्या दिवशी मॅडम १००० शब्द, १०० वाक्य, १५० शब्द लिहून पाठ करणे इत्यादी अभ्यास देतात, त्यामुळे इतर विषयांचा अभ्यास करण्यास वेळच मिळत नाही मात्र मॅडम पुढच्या तास जेव्हां होईल तेव्हा अभ्यास पुर्ण नसेल तर या शाळेत मुलींची खुप गर्दी झाली, बाजार भरला, तुमचे दाखले देऊन गर्दी कमी केली जाईल असा दम देतात. मुलींची आर्थिक समस्या समजून घेत नाहीत, तसेच शाळा भरायाच्या आधी थ्रो बॉलची प्रॅक्टीस करण्यासाठी गेलेल्या मुलींची दप्तरे वर्गाबाहेर फेकुन देऊन, मुलींना तासभर वर्गाबाहेर उभे केले. तसेच माझ्या मनात आले तर तुमचा खेळाचा त्रास सुद्धा बंद करु शकते, अशा विविध तक्रारी करण्यात आलेली होत्या. | | |
| ०७. | श्री.अंजिक्यदेव रामचंद्र गायकवाड, सहा.शिक्षक, श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर, शिर्डी यांनी दि.१९.०९.२०१७ रोजी श्रीमती मिरजकर यांनी विद्यार्थीनीशी अयोग्य वर्तन केलेबाबत तक्रार केली होती. | त्याबाबत श्रीमती मिरजकर यांना प्रशासनामार्फत कारणे दाखवा नोटीस पाठवून खुलासा घेण्यात आला. | याबाबत अर्जदार शिक्षक व श्रीमती मिरजकर असे दोघांनाही लेखी समज देण्यात आलेली आहे. |
| ०८. | श्री.अंजिक्यदेव रामचंद्र गायकवाड, सहा.शिक्षक, श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर, शिर्डी यांनी दि.२०.११.२०१७ रोजीचे तक्रार अर्जान्वये "दिवाळीच्या सुट्टीमध्ये श्रीमती मिरजकर या इ.७ वी च्या वर्गात शिकणा-या सानिया पठाण या विद्यार्थीनीच्या घरी गेल्या व तेथे त्यांनी विद्यार्थिनीच्या पालकांना सांगितले की, गायकवाड सर तुमच्या मुलीसोबत चांगले वर्तन करत नाहीत, ते तिच्याशी अयोग्य भाषेत बोलतात त्याचं व्यक्तित्व चांगल नाही. ते तुमच्या मुलीकडे वाईट नजरेने बघतात, यावर त्या मुलीला पालकांनी याबाबत विचारणा केली असता मुलींनी यामध्ये काहीही तथ्य नसल्याचे सांगितले. त्यामुळे पालकांनी श्रीमती मिरजकर यांना आम्ही तुम्ही म्हणता तस लिहून देणार नाही, यावर विनंती करुन श्रीमती मिरजकर म्हणाल्या की, तुम्हाला काय करायचे तुम्ही फक्त सही करुन द्या बाकीचे आम्ही पाहू. तुमच्या मुलीची संपुर्ण जबाबदारी आम्ही घेऊ. तुम्ही काळजी करु नका. परंतू पालक तयार झाले नाहीत व त्यांनी दिवाळी सुट्टी संपल्यानंतर झालेल्या प्रकार मला सांगितले. श्रीमती मिरजकर यांनी गलिच्छ पातळीवर उतरुन माझी बदनामी करण्याचा कट रचला होता. सुड बुद्धीने पेटलेल्या मुख्याध्यापिका जर या थराला जाऊ शकतात तर भविष्यात पैसे देऊन मुलींकडून कट कारस्थान करु शकतात ही गोष्ट अजिबात नाकारता येणार नाही. यात शाळा व संस्थानाची बदनामी होऊ शकते, त्यामुळे श्रीमती मिरजकर यांना कडक शासन | याबाबत श्रीमती मिरजकर यांना प्रशासनामार्फत कारणे दाखवा नोटीस पाठवून खुलासा घेण्यात आलेला आहे. | कार्यवाही चालु आहे. |

| | | | |
|---|---|---|---|
| | होणे गरजेचे असल्याचे" नमुद केलेले आहे. | | |
| ०९. | त्यानंतर दि.०८.१२.२०१७ रोजी श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर विभागाकडील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी एकत्रित अर्ज करुन, श्रीमती मिरजकर यांनी श्री.गायकवाड सर यांच्या बद्दल सुड भावनेने पेटून अतिशय गलिच्छ पातळीवर उतरुन कट कारस्थान केले. भविष्यात श्रीमती मिरजकर यांचेकडून अशा प्रकारे सुड भावनेने इतर शिक्षकांच्या बाबतीत घडू शकते, त्यामुळे श्रीमती मिरजकर मॅडम यांचेपासून आमची सुरक्षितता व्हावी, म्हणून अर्ज केलेला आहे. | नोंद घेतली. | कार्यवाही चालु आहे. |
| १०. | जिल्हाध्यक्ष, स्वाभिमानी रिरपब्लिकन पक्ष तथा युथ रिपब्लिकन, अहमदनगर यांनी त्यांचेकडील दि.१५.११.२०१७ रोजीचे अर्जान्वये श्री साईबाबा कन्या विद्यालय, शिर्डी येथील मुख्याध्यापिका श्रीमती जहॉआरा शहाबुद्दीन मिरजकर यांनी शासनाने निर्देशित केल्याप्रमाणे ७ नोव्हेंबरला विद्यार्थी दिवस साजरा न केल्याने त्यांचेवर गुन्हा दाखल करणेबाबत मागणी केलेली आहे. तसेच त्यांनी अर्जात श्रीमती मिरजकर यांनी महाराष्ट्र शासनाच्या आदेशाचा व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा अपमान केलेला आहे, असे नमुद केलेले आहे. | याबाबत श्रीमती मिरजकर यांना प्रशासनामार्फत कारणे दाखवा नोटीस पाठवून खुलासा घेण्यात आलेला आहे. | कार्यवाही चालु आहे. |
| ११. | श्री.विश्वास दादासाहेब माघाडे, मु.पो.गोगलगाव, ता.राहाता यांनी दि.१२.०८.२०१७ रोजी अर्ज करुन, श्री साईबाबा संस्थानच्या श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती जहॉआरा मिरजकर यांनी डमी विद्यार्थी बसवून एम.एड. केल्याने त्यांच्यावर गुन्हा दाखल करणेबाबत मागणी केलेली आहे. त्यांनी सदर तक्रार अर्जाच्या प्रती मा.सहसंचालक, म.रा., पुणे, मा.कुलगुरु, पुणे विद्यापीठ, मा.शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, म.जिल्हादंडाधिकारी, अहमदनगर, पोलीस निरिक्षक शिर्डी पोलीस स्टेशन यांना दिलेल्या आहेत. तसेच याबाबत विविध वृत्तपत्रांमध्ये, सोशल मिडीयामध्ये बातम्या प्रसारीत झालेल्या होत्या. | त्यामुळे श्री.माघाडे यांचे तक्रार अर्जानुसार श्रीमती मिरजकर यांचेकडून त्यांचे एम.एड. बाबत माहिती घेण्यात आलेली असून, त्यांचे एम.एड.प्रमणापत्राच्या सत्यता पडताळणीबाबत सबंधीत शिक्षण संस्थेस इकडील जा.क्र. एसएसएस/साप्रशा/ आस्था/ ३२४४/२०१७ दि.२० सप्टेंबर, २०१७ अन्वये पत्र पाठविण्यात आलेले आहे. | मात्र अद्याप सबंधीत संस्थेकडून कोणत्याही प्रकारचे उत्तर अथवा प्रतिसाद मिळालेला नाही. त्यांचेकडून उत्तर येणे बाकी आहे. |
| १२. | श्री.भास्कर वाघ, रा.शिर्डी यांनी दि.२२.०९.२०१७ रोजीचे तक्रार अर्जान्वये श्री साईबाबा संस्थानच्या कन्या शाळेत मुख्याध्यापिका जहॉआरा शहाबुद्दीन मिरजकर यांनी जंतनाशक गोळ्या वाटप न करता राष्ट्रीय कार्यात व विद्यार्थ्यांचे आरोग्याकडे दुर्लक्ष केल्याने गुन्हा दाखल करणेची मागणी केलेली आहे. श्री.वाघ यांनी सदर तक्रार अर्जाच्या प्रती मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, मा.आरोग्य मंत्री, महाराष्ट्र राज्य, मा.विरोधी पक्षनेते, महाराष्ट्र राज्य, मा.अध्यक्ष, श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, मा.जिल्हाधिकारी, अहमदनगर व मा.जिल्हा आरोग्य अधिकारी, अहमदनगर, मा.तालुका आरोग्य अधिकारी यांना दिलेल्या आहेत. | त्याबाबत श्रीमती मिरजकर यांचा लेखी खुलासा घेण्यात येऊन, त्यांच्या खुलाश्यामधील मजकुराप्रमाणे आरोग्य अधिकारी, राहाता तालुका यांना इकडील जा.क्र.एसएसएस/साप्रशा /आस्था/४३१५/२०१७ दि.१७ नोव्हेंबर, २०१७ अन्वये पत्र देऊन, त्यांचे स्पष्टीकरण मागविलेले आहे. | आरोग्य अधिकारी, राहाता तालुका यांचेकडून उत्तर येणे बाकी आहे. |
| १३. | श्री.गंगाधर विश्वनाथ वरघुडे, सहा.शिक्षक श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर यांनी त्यांचे दि.०६.०७.२०१७ रोजीचे अर्जान्वये श्री साईबाबा संस्थानच्या कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालयाच्या मुख्याध्यापक पदी नेमणूक करतांना सेवाज्येष्ठता डावलून कनिष्ठ शिक्षिकेला देण्यात आलेली नेमणूक रद्द करावी आणि | त्यामुळे श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालयाकडील मुख्याध्यापक हे पद पदोन्नतीने नेमणेबाबत जा.नं.एसएसएस/ साप्रशा/आस्था/ ३२१२/ २०१७ दि. १८ सप्टेबर २०१७ रोजीचे पत्रान्वये मा.शिक्षण उपसंचालक, शिक्षण | मा.शिक्षण उपसंचालक, पुणे यांचेकडून उत्तर येणे बाकी आहे. |

| | | | |
|---|---|---|---|
| | माझ्यावर झालेला अन्याय दुर करुन माझी मुख्याध्यापक पदी नेमणूक करणेबाबत विनंती केलेली आहे. सदर अर्जामध्ये त्यांनी श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालय ही शाळा फक्त मुलींची/महिलांची नसून मुलामुलींची (Co-Education) शाळा असल्याचे नमुद केलेले आहे. तसेच त्यांनी अर्जासोबत श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालयाचे सन २०१४-१५, २०१५-१६ व सन २०१६-१७ चे स्कुल रिपोर्ट कार्ड सादर केलेले आहे, सदर रिपोर्टकार्डमध्ये Type of School – Co-Educational असे नमुद केलेले आहे. तसेच सदरचे रिपोर्ट कार्ड हे इ.०५ ते इ.१२ वी.असे एकत्रित आहे. | उपसंचालक कार्यालय, पुणे यांचेकडून लेखी मार्गदर्शन व अभिप्राय मिळणेबाबत पुनश्च विनंती केलेली आहे, | |

वरील अ.क्र.०१ ते १० मुद्यांचे अवलोकन करता श्रीमती मिरजकर या प्र.मुख्याध्यापिका असतांना किंवा परिविक्षाधीन कालावधीमध्ये असतांना त्यांचे कार्यपद्धतीबाबत शिक्षक, विद्यार्थीनी तसेच ग्रामस्थांनी वेळोवेळी तक्रार अर्ज केलेले आहेत. त्यांचे काही तक्रार अर्जांबाबत अद्याप कार्यवाही चालु आहे. तसेच अ.क्र.११ ते १३ मधील मुद्यांचे अवलोकन करता सदर मुद्यांबाबत विविध विभागांकडून अभिप्राय येणे बाकी आहे.

त्यामुळे श्रीमती मिरजकर यांचे परिविक्षाधीन कालावधीबाबत निर्णय होणेकामी इकडील कार्यालयामार्फत दि.२४.०१.२०१८ रोजी सविस्तर टिपणी सादर केली असता, सदर टिपणीवर वरिष्ठांकडून पुढीलप्रमाणे निर्देश देण्यात आलेले आहेत.

कन्या शाळेत महिला मुख्याध्यापक असावा या तरतुदीचा आधार घेत श्रीमती मिरजकर या सेवाज्येष्ठता यादीमध्ये अ.क्र.३ वर असतांनाही ज्येष्ठता डावलुन त्यांची मुख्याध्यापक पदी नियुक्ती झाली आहे. मात्र श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालय या शाळेचा दर्जा "मुलींची शाळा" असा नसून "सह-शिक्षण" असा आहे. त्यामुळे शाळा संहितेनुसार "सह-शिक्षण" दर्जा असलेल्या शाळेत महिला मुख्याध्यापक असावी अशी तरतुद नाही. त्यामुळे श्रीमती मिरजकर यांची नियुक्ती रद्द करुन, सेवाज्येष्ठतेनुसार मुख्याध्यापक नियुक्ती करावी, तसेच ज्या तक्रारींबाबत विविध विभागांच्या अभिप्राय येणे बाकी आहे, त्या तक्रारी गंभीर स्वरुपाच्या असल्याने त्यामध्ये तथ्य असल्याचे सकृतदर्शनी दिसून येत आहे त्यामुळे उत्तराची वाट पाहणे गरजेचे नाही. असे निर्देश दिलेले आहेत.

(अ) सबब उपरोक्त वस्तुस्थितीचा विचार करता श्रीमती जहॅआरा शहाबुद्दीन मिरजकर यांची नियुक्ती रद्द करुन श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालयाकडील सेवाज्येष्ठतेनुसार मुख्याध्यापक नियुक्ती करणे संयुक्तिक राहील, असे नम्र मत आहे.

(ब) श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालयाकडील सेवाज्येष्ठता सुची पाहाता श्री.बाजीराव कणलाल वाणी, सहा.शिक्षक हे सेवाज्येष्ठतेमध्ये प्रथम क्रमांकावर आहेत. शासनाने दि.१३ जून, २००५ चे शासन निर्णयानुसार २००४-०५ पासून नियुक्त होणा-या मुख्याध्यापकांसाठी यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचा "शालेय व्यवस्थापन पदविका अभ्यासक्रम" (डी.एस.एम.) बंधनकारक केलेला आहे. मात्र श्री.वाणी यांनी सदरचा अभ्यासक्रम पुर्ण केलेला नाही. तसेच श्री.बाजीराव कणलाल वाणी यांचेवर सेवेत असतांना पुढीलप्रमाणे आरोप झालेले असून सद्यस्थितीमध्ये त्यांची विभागीय चौकशी सुरु आह

| अ.क्र. | श्री.बाजीराव कणलाल वाणी यांचे विरुद्ध झालेल्या तक्रारींचा तपशिल | त्यावर झालेली कार्यवाही | झालेली शिक्षा/ निकाल |
|---|---|---|---|
| ०१. | दि.०८.०७.२००५ व दि.०१.०८.२००५ रोजी कन्या विद्या मंदिर विभागाकडील महिला शिक्षिका सौ.वैशाली नं.देशमुख यांनी श्री.वाणी हे वारंवार त्रास देत असलेबाबत तक्रारी केलेल्या आहेत. ज्यामध्ये त्यांनी वर्गाबाहेर येऊन उभे राहणे, त्यांचे मागे मागे फिरणे, शाळा सुटल्यानंतर स्टॅण्डवर त्यांचे मागे जाणे, एकटक पाहणे असे प्रकार करत असलेबाबत नमुद केलेले आहे. | याबाबत तत्कालीन विश्वस्त डॉ.गोंदकर साहेब यांनी दोहोंनाही समजावून सांगून तक्रारीबाबत समझोता करुन विषय संपुष्टात आणला होता. त्याबाबतचा अहवाल उपलबध आहे. | प्रकरण दप्तरी दाखल करण्यात आलेले आहे. |
| ०२. | श्री.वाणी यांनी प्रथम सत्र परिक्षेच्या इ.१० अ चा निकाल ठरलेल्या तारखेस दि.०३.१२.२०१६ रोजी विद्यार्थीनींना वाटप केला नाही. इ.९ वी अ च्या विज्ञान विषयाच्या मार्कांची यादी त्या वर्गशिक्षकांना | याबाबत त्यांना नोटीस देऊन त्यांचा खुलासा घेण्यात आलेला आहे. | समज देण्यात आलेली होती. |

| | | | |
|---|---|---|---|
| | न दिल्याने त्या वर्गाचाही निकाल विद्यार्थीनींना देता आला नाही. श्री.वाणी यांच्या बेजबाबदार वागण्यामुळे विद्यार्थीनींचे शैक्षणिक नुकसान होत असून या विद्यार्थीनींची एस.एस.सी. बोर्डाची परिक्षा दोन महिन्यावर आलेली असतांनाही त्यांचा विज्ञान विषयाचा अभ्यासक्रम ५०% सुद्धा शिकवून झालेला नाही. | | |
| ०३. | श्री.वाणी यांचेविरुद्ध महिला शिक्षिका व विद्यार्थीनींनी अनेकवेळा प्राचार्या यांचेकडे तोंडी तक्रारी केलेली आहे, तरी श्री.वाणी यांच्या या बेजबाबदार व अयोग्य वर्तणुकीमुळे शालेय वातावरण दुषित झालेले आहे. तसेच अभ्यासक्रमाबाबत वर्षा विसे व इतर ३१ विद्यार्थीनींनी अर्ज दिलेला आहे. | श्री.वाणी यांनी गंभीर गैरशिस्त वर्तन केल्याचे आढळून आल्याने, घटनेचे व शिस्तभंगाचे गांभिर्य विचारात घेता जा.क्र.एसएसएस/साप्रशा /वशी-७ए/३६४१/२०१७ दि.०९.०१.२०१७ अन्वये त्यांना तात्काळ **संस्थानचे सेवेतून सेवानिलंबीत करण्यात आले होते.**<br><br>**तसेच सदर गैरशिस्त वर्तनाबाबत श्री.वाणी यांचे विरुद्ध आरोपपत्र तयार करण्यात आलेले असून श्री.ए.एम.देशमुख, नाशिक यांचेमार्फत त्यांचे विभागीय चौकशीचे कामकाज सुरु आहे.**<br><br>श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी सेवा (शिस्त व अपील) विनियम २०१३ चे विनियम ४ उपकलम ५ (क) नुसार श्री.बाजीराव वाणी यांची जा.क्र.एसएसएस/साप्रशा/वशी-७ए/३२१६/२०१७ दि.१८.११.२०१७ अन्वये श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर मध्ये सहा.शिक्षक या पदावर पुढील आदेश होईपावेतो पुनःस्थापना करण्यात आलेली आहे. | कार्यवाही चालु आहे. |
| ०४. | दि.०७.०१.२०१७ रोजी इ.९ वी अ च्या वर्गाचा प्रथम सत्राचा निकाल वाटप करण्यात आला. त्यावेळेस विद्यार्थिनींचे पालक निकाल घेण्यासाठी बोलावले होते. शाळेत आलेल्या पालकांनी श्री.वाणी यांच्या विषयी तक्रारी केली. पालकांपैकी श्री.ज्ञानेश्वर केशवराव गायके यांनी दि.०७.०१.२०१७ रोजी तक्रार अर्ज दिलेला असून त्यात त्यांनी श्री.वाणी यांची भाषा मुलींशी असभ्य, अश्लील, गलीच्छ भाषा वापरतात, मुलींनी त्यांच्या विषयी तक्रा केल्यास दमदाटीचा भाषा वापरतात. पालकांना दमदाटी करतात, अशा प्रकारच्या तक्रारी केलेल्या आहेत व तक्रारींची दखल न घेतल्यास उपोषणास बसू असे कळविलेले आहे. | | |
| ०५. | इ.९ वी अ ची विद्यार्थीनी मानसी विजय पाटील हिने विज्ञान विषय शिक्षक श्री.वाणी यांचे विषयी तक्रार केलेली असून , त्यात तिने श्री वाणी हे मुलींना घाणेरडे बोलतात, प्रार्थना चालु असतांना मानसी पाटील हिस तोंडातून रक्त पडे पर्यंत माराहाण केली, दमदाटी करतात, नोकरीची गरज नाही अशा प्रकारची भाषा वापरतात अशा प्रकारची तक्रार केलेली आहे. | | |
| ०६. | श्री.वाणी हे वर्गात अश्लील शब्द वापरुन बोलल्याबाबत इ.९ वी अ च्या विद्यार्थीनी पल्लवी चव्हाण व इतर ६ यांनी दि.०९.०१.२०१७ रोजी तक्रार अर्ज दिला आहे. | | |
| ०७. | कु.प्रियंका राऊत व इत ६ विद्यार्थीनींनी श्री.वाणी यांचे गैरवर्तनुकीसबंधी लेखी तक्रार केलेली आहे. | | |
| ०८. | इ.१० वी अ च्या विद्यार्थीनींनी श्री.वाणी हे वर्गशिक्षक असून ते विद्यार्थीनींनी विचित्र शब्द वापरतात अशी तक्रार केलेली आहे. | | |
| ०९. | प्राचार्या श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर यांनी श्री.वाणी यांचा दि.०९.०१.२०१७ रोजी गैरवर्तन रिपोर्ट पाठविला असून, त्यात त्यानी श्री.वाणी यांनी शनिवार दि.०७.०१.२०१७ रोजी दुपारी १२.३५ वा. मा.मुख्याध्यापकांचे कार्यालयात त्यांचेविषयी तक्रार असणा-या पालकांशी वाद घातला, त्यांना धमकी दिली, असभ्य भाष वापरली, तसेच प्राचार्यांनी त्यांना समजवण्याचा प्रयत्न केल असता त्यांनाही मोडून ठेवीन तुम्ही मला शिकवू नका असा दम दिला व मा.अध्यक्ष व मा.कार्यकारी अधिकारी यांचाही एकेरी उल्लेख करुन, त्यांना मी घाबरत नाही अशा प्रकारे गैरवर्तन केले असून, श्री.वाणी यांनी त्यांचा अभ्यासक्रम पुर्ण केला नाही, तसेच वर्गात विद्यार्थीनींना अश्लील शब्द वापरुन बोलतात अशी मुलींची तक्रार आहे. त्यांच्या विषयी महिला शिक्षिका व मदतनीस यांची सुद्धा तक्रार आहे, त्यांनाही ते अश्लील शब्द वापरुन बोलतात, त्यामुळे शाळेत सर्वजण दडपणाखाली वागत आहेत, असे नमुद केलेले आहे. | | |

**(क)** श्री.गंगाधर विश्वनाथ वरघुडे, सहा.शिक्षक हे श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालयाकडील सेवाज्येष्ठता सुचीमध्ये दुस-या क्रमांवर असून मुख्याध्यापक पदासाठी आवश्यक असलेली शैक्षणिक अर्हता

त्यांनी प्राप्त केलेली आहे. तसेच त्यांनी यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचा "**शालेय व्यवस्थापन पदविका अभ्यासक्रम**" (डी.एस.एम.) पुर्ण केलेला आहे. त्यांचे वैयक्तिक धारणी व सेवापुस्तकाची पडताळणी केली असता, त्यांचे विरुद्ध कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा गैरशिस्त वर्तन रिपोर्ट झालेला नाही. तसेच त्यांना आजपावेतो एकही कारणे दाखवा नोटीस देण्यात आलेली नाही.

तरी उपरोक्त वस्तुस्थितीचे अवलोकन करता परिच्छेद "**अ**" मध्ये नमुद केलेनुसार श्रीमती जहॉंआरा शहाबुद्दीन मिरजकर यांची मुख्याध्यापक पदी केलेली नियुक्ती रद्द करुन, शाळा संहितेमधील निकष, शैक्षणिक पात्रता व सेवाज्येष्ठता या सर्व बाबींचा विचार करता श्री.गंगाधर विश्वनाथ वरघुडे, सहा.शिक्षक यांची श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालयाच्या मुख्याध्यापक पदी नियुक्ती करणेबाबत निर्णय होणेस विनंती.

निर्णय क्र.११२ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालयाचे मुख्याध्यापक पद पदोन्नतीने भरणेकामी मा.शिक्षण, उपसंचालक यांचा अभिप्राय घेण्यात येऊन, सदरहू प्रस्ताव फेरसादर करणेत यावा, असे ठरले.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, सामान्य प्रशासन)

---

आयत्या वेळेचा

विषय नं.०७ **भूसंपादन कक्षाकडील कंत्राटी पध्दतीने कार्यरत कर्मचाऱ्यांचे वेतनाबाबत.**

प्रस्ताव- सन २००० सालापासून संस्थानचे भूसंपादन विषयक कामे करण्यासाठी उपविभागीय अधिकारी यांचे अधिनिस्त भूसंपदान कक्ष व सदर कक्षाकडे कंत्राटी पध्दतीने कर्मचारी नेमण्यात आलेले होते. सदर कक्षाकडील कर्मचा-यांना मा.व्यवस्थापन समितीचे मान्यतेने वेळोवेळी प्रत्येक एका वर्षासाठी मुदतवाढ देण्यात आलेली आहे. सदर कक्षाकडील कर्मचा-यांची मुदत दि.३०/०४/२०१७ रोजी संपुष्टात येत असल्याने, उपविभागीय अधिकारी, शिर्डी भाग यांचेकडील दि.१४/०२/२०१७ रोजीचे पत्रास अनुसरुन विषयांकीत कक्षास व कक्षाकडील कंत्राटी कर्मचा-यांचा मुदतवाढीचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे दि.०९/०३/२०१७ रोजीचे सभेपुढे सादर करणेत आलेला होता. त्यावर निर्णय क्र.१९७ अन्वये, संबधीत कक्षास व कार्यरत कंत्राटी कर्मचा-यांनी मागील दोन वर्षामध्ये केलेल्या कामाची सविस्तर माहिती आगामी सभेपुढे सादर करणेत येऊन केवळ ०३ महिने कालावधीची मुदतवाढ देणेत येत आहे. असा निर्णय संमत झालेला होता. त्यानुसार संबधीत कर्मचा-यांना तीन महिनेसाठी मुदतवाढ देणेत येऊन उपविभागीय अधिकारी यांचेकडून भूसंपादन कक्षामार्फत केलेल्या मागील ०२ वर्षाच्या कामाची माहिती मागविणेत आलेली होती.

उपविभागीय अधिकारी, शिर्डी भाग यांनी सादर केलेल्या अहवालानुसार भूसंपदन कक्षामार्फत केलेल्या कामाची माहिती मा.व्यवस्थापन समितीचे दि.२५/०७/२०१७ रोजीचे सभेपुढे सादर करणेत आली. त्यावर उपविभागीय अधिकारी यांचे कार्यालयामध्ये संस्थानमार्फत नेमलेल्या कंत्राटी कर्मचा-यांनी मागील पूर्ण वर्षामध्ये कोणतेही उल्लेखनीय काम केलेले दिसून येत नाही. यामुळे कक्षामध्ये पुर्वीप्रमाणे ०१ कुशल कर्मचारी पुर्वीप्रमाणेच ११ महिन्यासाठी नेमूण उर्वरित सर्व कर्मचारी बंद करण्यात यावे असा निर्णय समंत झालेला होता.

उपरोक्त निर्णयानुसार मा.उपविभागीय अधिकारी, शिर्डी भाग, यांचे कार्यालयाकडे ०१ कुशल कंत्राटी कर्मचारी दि.०१/०८/२०१७ रोजी पासून पुढे ११ महिने कालावधीसाठी पुरविणे बाबत तसेच उर्वरित कर्मचारी कमी करणेबाबत दि.१२/०८/२०१७ रोजी कार्यालयीन टिपणी व आदेश सादर करणेत आलेला होता. सदरहू टिपणीवर SDO यांचेकडे संस्थानचा कोणताही भूसंपादन प्रस्ताव प्रलंबित नाही, त्यामुळे संस्थानने मनुष्यबळ पुरविण्याची आवश्यकता नाही असे मत नोंदवून त्यास मान्यता दिलेली होती. त्यानुसार दि.२७/०९/२०१७ रोजीचे आदेशाने उपविभागीय अधिकारी,यांचे कार्यालयाकडील कंत्राटी कर्मचा-यांना माहे-ऑगस्ट व सप्टेंबर २०१७ अखेर मुदतवाढ देणेत येऊन दि.०१ ऑक्टोबर, २०१७ पासून विषयांकीत भूसंपादन कक्ष बंद करण्यात येत असल्याचा आदेश पारित करणेत आला.

त्यांनतर उपविभागीय अधिकारी यांनी दि.०९/१०/२०१७ रोजीचे पत्राने, श्री साईबाबा समाधीच्या शताब्दी मोहोत्सवानिमित्त या कार्यालयाकडे आपत्ती व्यवस्थापन व इतर महत्वाची जबाबदारी जिल्हा प्रशासनाने सोपविलेली आहे. ती कामे वेळेत व बिनचुक पार पाडण्यासाठी उपलब्ध कर्मचा-यांकडून हे शक्य नाही म्हणून शताब्दी मोहोत्सवाच्या आपत्ती व्यवस्थापन व त्या अनुषंगीक कामे पार पाडणेसाठी ०२ कुशल व ०१ अकुशल कर्मचारी उपलब्ध करुन देणेबाबत कळविणेत आले. तसेच दि.०२/११/२०१७ व दि.०३/१२/२०१७ रोजीचे पत्राने पत्राने संबधीत कंत्राटी कर्मचा-यांचे माहे-ऑक्टोबर व नोव्हेंबर २०१७ चे वेतन अदा करणेबाबत संबंधित ठेकेदारांना आदेश होणेबाबत कळविलेले होते. त्याबाबत इकडील दि.१२/१२/२०१७

रोजीचे इकडील पत्राने उपविभागीय अधिकारी, शिर्डी यांना "आपले कार्यालयाकडे संस्थानचा कोणाताही भूसंपादन प्रस्ताव प्रलंबित नाही, त्यामुळे संस्थानला आपले कार्यालयास मनुष्यबळ पुरविण्याची आवश्यकता नाही. याबाबत भविष्यात आवश्यकता वाटल्यास तशी तजविज करणेत येईल. तसेच भूसंपादन कक्षाकडे कार्यरत असलेल्या संबधीत कंत्राटी कर्मचा-यांनी दि.०१ ऑक्टोबर, २०१७ पासून संस्थानने नियुक्त केलेल्या संबधीत ठेकेदार किंवा कामगार विभागाचे सुचनेप्रमाणे संस्थानचे इतर आवश्यक त्या विभागांकडे रुजू होऊन काम करणे आवश्यक होते. तथापी, संबधीत कंत्राटी कर्मचा-यांनी मुदतवाढ संपलेनंतर कुठलाही आदेश नसतांना परस्पर आपल्या कार्यालयाकडे अनाधिकृतपणे काम केलेले असल्याने त्यांचे माहे-ऑक्टोबर, नोव्हेंबर २०१७ चे तसेच त्यापुढील कालावधीचे वेतन अदा करण्यात येणार नाही." असे कळविणेत आलेले आहे.

त्यानंतर उपविभागीय अधिकारी, शिर्डी भाग यांनी दि.०५/०१/२०१८ रोजीचे पत्राने पुनःश्च, आपले संस्थानचे या कार्यालयात कार्यरत असलेल्या ०२ कुशल व ०१ अकुशल कर्मचारी यांचे माहे ऑक्टोबर, २०१७ व नोव्हेंबर, २०१७ चे वेतन अदा करणेबाबत आपणास विनंती करण्यात आली आहे. परंतु अद्यापही सदर कर्मचा-यांचे वेतन अदा करण्यात आलेले नाही. त्यांनतर दि.२२/१२/२०१७ रोजीचे पत्राने सदरहू कर्मचा-यांना आपले कार्यालयाकडेस हजर होणेकामी कार्यमुक्त करण्यात आलेले आहे. तसेच आपलेशी दि.२६/१२/२०१७ रोजी समक्ष दुरुध्वनीवरुन व समक्ष झालेल्या चर्चेनुसार सदर कर्मचारी यांचे माहे ऑक्टोबर २०१७, नोव्हेंबर २०१७ व दि.२१/१२/२०१७ पर्यंतचे त्यांचे हजर रजिष्टर मधील हजर दिवसांचे संस्थानचे नियमानुसार होणारे वेतन अदा करणेस नम्र विनंती असे कळविलेले आहे.

उपविभागीय अधिकारी, शिर्डी भाग यांना दि.१२/१२/२०१७ रोजीचे पत्राने संबधीत कंत्राटी कर्मचा-यांनी मुदतवाढ संपलेनंतर कुठलाही आदेश नसतांना परस्पर आपल्या कार्यालयाकडे अनाधिकृतपणे काम केलेले असल्याने त्यांचे माहे-ऑक्टोबर, नोव्हेंबर २०१७ चे तसेच त्यापुढील कालावधीचे वेतन अदा करण्यात येणार नाही." असे कळविणेत आलेले आहे. तथापी उपविभागीय अधिकारी यांनी दि.०९/१०/२०१७ रोजीचे पत्राने कळविलेनुसार, श्री साईबाबा समाधीच्या शताब्दी मोहोत्सवानिमित्त उपविभागीय अधिकारी, भाग शिर्डी यांचे कार्यालयाकडे आपत्ती व्यवस्थापन व इतर महत्वाची जबाबदारी जिल्हा प्रशासनाने सोपविलेली होती. ती कामे वेळेत व बिनचुक पार पाडण्यासाठी उपलब्ध कर्मचा-यांकडून हे शक्य नसल्याने संबधीत कर्मचा-यांनी शताब्दी मोहोत्सवाच्या आपत्ती व्यवस्थापन व त्या अनुषंगीक कामे पार पाडणेसाठी भूसंपादन कक्षाकडेच काम केलेले असल्याचे कळविले आहे. सध्या संबधीत कर्मचारी दि.२२/१२/२०१७ पासून संस्थानकडे हजर झालेले असून आवश्यक त्या विभागाकडे काम करत आहे. सबब, उक्त पार्श्वभूमीचे अनुषंगाने उपविभागीय अधिकारी, भाग शिर्डी यांचे कार्यालयाकडे काम केलेल्या ०२ कुशल व ०१ अकुशल कर्मचारी यांचे माहे ऑक्टोबर २०१७, नोव्हेंबर २०१७ व दि.२१/१२/२०१७ पर्यंतचे संस्थान नियमानुसार होणारे वेतन अदा करणेस मान्यता असावी, हि विनंती.

**निर्णय क्र.११३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेल्या पार्श्वभूमीचे अनुषंगाने उपविभागीय अधिकारी, भाग शिर्डी यांचे कार्यालयाकडे काम केलेल्या ०२ कुशल व ०१ अकुशल कर्मचारी यांचे माहे ऑक्टोबर २०१७, नोव्हेंबर २०१७ व दि.२१/१२/२०१७ पर्यंतचे संस्थान नियमानुसार होणारे वेतन आदा करणेस मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, सामान्य प्रशासन)

---

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.०८** **दर्शनरांग व्यवस्थापन अंतर्गत कार्यान्वित करणेत आलेल्या मोफत दर्शन पास (Time Base) कार्यप्रणाली आधारप्रणालीशी जोडणे (लिंक करणे) बाबत.**

**निर्णय क्र.११४** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली. (कार्यवाही- माहिती तंत्रज्ञान विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.०९** **शासकीय विभागांनी करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठीच्या कार्यपध्दती धोरणामध्ये सुधारणा केंद्र शासनाने विकसीत केलेल्या गव्हर्नमेंट ई-मार्केटप्लेस (GeM) पोर्टलची कार्यपध्दती राज्य शासनास वस्तू व सेवा खरेदीसाठी स्विकृत करणेबाबतचे शासन निर्णयाबाबत.**

**प्रस्ताव-** महाराष्ट्र शासनाने शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-२०१६/प्र.क्र.२१५/उद्योग-४ दिनांक २४ ऑगस्ट, २०१७ अन्वये शासकीय विभागांनी करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठीच्या कार्यपद्धती धोरणामध्ये सुधारणा केंद्र शासनाने

विकसित केलेल्या गव्हर्नमेंट ई-मार्केटप्लस (GeM) पोर्टलची कार्यपद्धती राज्य शासनास वस्तू व सेवा खरेदीसाठी स्विकृत करणेबाबतचा शासन निर्णय पारित केलेला आहे.

महाराष्ट्र शासनाने शासन निर्णय क्रमांक-भांखस-२०१४/ प्र.क्र.८२/ भाग-III/ उदयोग-४ दि.३०.१०.२०१५ नुसार शासकिय विभागांनी करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठीच्या कार्यपध्दतीची नियमावली लागु केलेली होती, सदर नियमावली संस्थानलाही लागू होती. तथापि सदर खरेदी नियमावली, महाराष्ट्र शासनाने शासन निर्णय क्रमांक-भांखस-२०१४/प्र.क्र.८२/भाग-III/उदयोग-४ दि.०१.१२.२०१६ नुसार, शासकीय विभागांनी करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठीच्या कार्यपध्दतीची सुधारीत नियमावली लागु केली होती. सदर शासन निर्णयान्वये उदयोग ऊर्जा व कामगार विभागाने निर्गमित केलेले सर्व शासननिर्णय/परिपत्रके अधिक्रमित करण्यात येऊन सदर नियमपुस्तिकेला मान्यता देऊन सर्व खरेदीदार विभागांनी त्यांना लागणा-या वस्तूंची खरेदी या नियमपुस्तिकेत दिलेल्या कार्यपध्दतीनुसार दि.०१.१२.२०१६ पासुन लागु केलेली होती.

सदर शासननिर्णयातील अ.नं.२ व नियमपुस्तिकेतील परिच्छेद २.४ (५) मध्ये नमूद केल्यानुसार, 'विधानसभेच्या कायदयाखाली स्थापित कोणतीही संस्था किंवा मंडळ किंवा महामंडळ किंवा प्राधिकरण किंवा सोसायटी किंवा न्यास किंवा स्वायत्त संस्था (नाव कोणतेही असले तरी) किंवा राज्य शासनाच्या मालकीची किंवा नियंत्रणाखाली असलेली कोणतीही संस्था,' यांनाही लागू केलेली आहे. म्हणजेच संस्थानलाही ही सुधारीत नियमपुस्तिका या निर्णयान्वये लागू झालेली होती. याबाबत मा.व्यवस्थापन समितीचे सभेत या नियमावलीप्रमाणे कामकाज करणेबाबत वेळोवेळी निर्णय झालेले आहेत. त्यास अनुसरुन सदर नियमावलीनुसार खरेदीचे कामकाज संस्थानकडून चालु आहे.

वरील बाबीचा विचार करता केंद्र शासनाने विकसित केलेल्या गव्हर्नमेंट ई-मार्केटप्लस (GeM) पोर्टलची कार्यपद्धती राज्य शासनास वस्तू व सेवा खरेदीसाठी स्विकृत करणेबाबतचे नियमावलीनुसार खरेदीचे कामकाज संस्थानलाही राबविणे बंधनकारक आहे.

वर नमुद दिनांक २४.०८.२०१७ चे शासन निर्णयामध्ये अ.नं.१ मध्ये खालील बाब नमुद आहे.

"गव्हर्नमेंट ई-मार्केटप्लस (GeM) पोर्टलवर खरेदीसाठी उपलब्ध असलेल्या वस्तू व सेवांचे दोन किंवा त्यापेक्षा जास्त पुरवठादार असतील तर सदरच्या वस्तू व सेवांची गव्हर्नमेंट ई-मार्केटप्लस (GeM) पोर्टलवर खरेदी करण्यास, खरेदी धोरण दिनांक ०१.१२.२०१६ मधील परिच्छेद २.४ मध्ये नमुद केलेल्या लक्ष्यांकित विभागांना/कार्यालयांना बंधनकारक करण्यात येत आहे."

सदर २.४ (५) नुसार संस्थानचे पुनर्घटन विधानसभेच्या कायद्याखाली झाल्यामुळे सदर पोर्टलची कार्यपद्धती वापरणे संस्थानला बंधनकारक आहे.

केंद्र शासनाने विकसित केलेल्या गव्हर्नमेंट ई-मार्केटप्लस (GeM) पोर्टलची कार्यपद्धती राज्य शासनास वस्तू व सेवा खरेदीसाठी स्विकृत करणेबाबतचे दिनांक २४.०८.२०१७ चे शासन निर्णयामध्ये प्रामुख्याने खालील बाबींचा समावेश आहे.

०१. संस्थानची शासनाच्या ई मार्केटप्लस या पोर्टलवर ई-मेलसह नोंदणी करणे,

०२. सदर पोर्टलवर उपलब्ध असलेल्या वस्तु व सेवा रु.५,०००/- ते रु.५०,०००/- पर्यंतची खरेदी योग्य दर्जा, विनिर्देश व पुरवठा कालावधीची पुर्तता करणा-या पुरवठादाराकडून करणे,

०३. रु.५०,०००/- पेक्षा जास्त व रु.३ लाखपर्यंत असेल तेव्हा गव्हर्नमेंट ई-मार्केटप्लस (GeM) पोर्टलवर उपलब्ध असलेल्या अशा वस्तू व सेवांची खरेदी योग्य दर्जा, विनिर्देश व पुरवठा कालावधीची पुर्तता करणा-या निम्नतम (एल-१) पुरवठादारांकडून व किंमतीच्या वाजवीपणाची खातरजमा करुन स्पर्धात्मक निविदेशिवाय खरेदी करणे,

०४. खरेदीदार विभागास गव्हर्नमेंट ई-मार्केटप्लस (GeM) पोर्टलवर उपलब्ध असलेल्या वस्तु व सेवांची रु.३लाख व त्यावरील खरेदी सदर पोर्टलवरील पुरवठाधारकांकडून वस्तु व सेवांची गुणवत्ता, विनिर्देश आणि पुरवठा कालावधी इ. आवश्यक बाबी तपासून स्पर्धात्मक ऑनलाईन निविदाव्दारे किंवा रिव्हर्स ऑक्शन पद्धतीने खरेदी करणे,

०५. ई-मार्केटप्लस (GeM) पोर्टलवर उपलब्ध असलेली वाहने (मोटार) खरेदी करणे, त्यामुळे मोटार वाहने (कार) खरेदी ही वाहन उत्पादक/वितरक यांच्या दरपत्रकांमार्फत खरेदी करणे, अशा सर्व खरेदीचा तपशिल खरेदीदार विभागाच्या संकेतस्थळावर व ई-निविदेच्या पोर्टलवर प्रसिद्ध करणे,

०६. सदर शासन निर्णयातील सुधारणांव्यतिरीक्त इतर सर्व तरतुदी शासनाच्या सुधारीत खरेदी नियमावलीप्रमाणे राबविणे,

सदर शासन निर्णयाची प्रत माहिती व तात्काळ संदर्भासाठी यासोबत सादर केली आहे. यामध्ये केंद्र शासनाने विकसित केलेल्या गव्हर्नमेंट ई-मार्केटप्लस (GeM) पोर्टलची कार्यपद्धती राज्य शासनास वस्तू व सेवा खरेदीसाठी स्विकृत करणेबाबतचे नियमावलीमध्ये वरील बाबींबाबतची सविस्तर माहिती नमुद केलेली आहे.

तरी वरील बाबी विचारात घेता शासकीय विभागांनी करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठीच्या कार्यपद्धती धोरणामध्ये सुधारणा केंद्र शासनाने विकसित केलेल्या गव्हर्नमेंट ई-मार्केटप्लस (GeM) पोर्टलची कार्यपद्धती, महाराष्ट्र शासनाप्रमाणे संस्थानला वस्तू व सेवा खरेदी करणेसाठी GeM पोर्टलवर माहिती घेतली असता, याकामी Nodal Officer नेमुन शासनाचे NIC संस्थेकडून शासकीय E-mail ID प्राप्त करुन घेणे गरजेचे आहे. ही कार्यवाही सध्या सुरु आहे. याप्रमाणे नोंदणी व उचित पूर्तता झालेनंतर सदर पोर्टलवर खरेदीची कार्यवाही सुरु करण्यात येईल हे मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे अवलोकनार्थ सादर.

निर्णय क्र.११५ **यावर सविस्तर चर्चा होऊन, शासकीय विभागांनी करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठीच्या कार्यपध्दती धोरणामध्ये सुधारणा केंद्र शासनाने विकसीत केलेल्या विकसीत केलेल्या गव्हर्नमेंट ई-मार्केटप्लेस (GeM) पोर्टलची कार्यपध्दती राज्य शासनास वस्तू व सेवा खरेदीसाठी स्विकृत करणेबाबतचे शासन निर्णयाचे अवलोकन करणेत येऊन, त्याप्रमाणे कार्यवाही करणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, खरेदी विभाग)

---

आयत्या वेळेचा

विषय नं.१० **सन २०१८-१९ अखेर (दि.०१.०३.२०१८ ते दि.२८.०२.२०१९) अखेर साईआश्रम भक्तनिवास व साईधर्मशाळा विभागातील इमारत व इमारत परिसरातील यांत्रिकीकरणासह हाऊसकिपींग, विद्युत, प्लंबींग इ.मेन्टनेन्स/ स्वच्छता तसेच द्वारावती विभागाकडील हाऊसकिपींग/ स्वच्छता कामे आऊटसोर्सिंग पध्दतीने करुन घेणेस न्युनतम निविदाधारकास कार्यादेश देणेकामी मा.व्यवस्थापन समितीची कार्योत्तर मान्यता मिळणेबाबत.**

प्रस्ताव- **अधिनियम २००४ मधील तरतुद:-**

१) २१ चा (१) (ग) – साईभक्तांना मंदिरात श्रींच्या दर्शनासाठी व प्रार्थनेसाठी किंवा कोणतीही धार्मिक सेवा किंवा समारंभ करण्यासाठी सोयी /सुविधा पुरविणे.

२) (ख) साईभक्तांना राहण्यासाठी व वापरकरण्याकरीता विश्राम गृहे बांधणे व त्याची देखभाल करणे....

प्रस्तावीक:- श्रींचे दर्शनासाठी राज्यभरातून, देशभरातून, देश-विदेशातून येणा-या साईभक्तांचे निवासाचे सोयीसाठी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी मार्फत व्दारावती भक्तनिवास,साईआश्रम भक्तनिवास, साई धर्मशाळा या विभागात साईभक्तांची निवासव्यवस्था करण्यात येते. या विभागातील निवासी साईभक्तांना अधिकाधिक चांगली सेवा सुविधा उपलब्ध व्हावी याकरीता साईआश्रम भक्तनिवास व साईधर्मशाळा विभागातील यांत्रिकीकरणासह हाऊसकिपींग विद्युत, प्लंबींग इ. मेन्टनन्स/स्वच्छतेची व व्दारावती विभागातील इमारत व परिसराची स्वच्छता इत्यादी कामे आऊटसोर्सिंग पध्दतीने करुन घेतली जातात.

साईआश्रम भक्तनिवास,साई धर्मशाळा व व्दारावती भक्तनिवास या तिनही विभागाचे हाऊसकिपींगचे काम बी.व्ही.जी.इंडिया लि पुणे यांना दि.१/७/२०१७ ते दि.३०/६/२०१८ अखेर देण्यात आले होते.

दि.२०/१२/२०१७ रोजी समक्ष झालेल्या चर्चेत बी.व्ही.जी.इंडिया लि.पुणे यांनी यापुर्वी करप्रणालीमध्ये आम्हास सर्व्हीस कर लागू नव्हता. मात्र जीएसटी करप्रणाली दि.०१/०७/२०१७ पासून नव्याने अंमलात आली असून, त्याबाबत एप्रिल २०१७ मध्ये कुठलेही दर निश्चित नसल्याने, आम्ही टेंडरमध्ये जीएसटीचा विचार केलेला नव्हता. ई-निविदेतील वाणिज्यिक बीड (BQO) मध्ये दर भरतांना जीएसटी शिवाय दर सादर केले होते, असे बी.व्ही.जी.यांचे प्रतिनिधींनी सांगितले.

दि.२५/१२/२०१७ रोजीचे पत्राने बी.व्ही.जी.इंडिया लि पुणे यांनी दि.२०/१२/२०१७ रोजी झालेल्या चर्चेनुसार आम्ही दि.२८/२/२०१८ पर्यंत काम सुरु ठेवत आहोत,मात्र त्यानंतर आमचे कंपनीमार्फत सुरु असलेली कामे दि.१/३/२०१८ पासून बंद करण्यात येतील असे जाहीर करत आहोत,असे म्हटले होते.

त्यास अनुसरुन उपरोक्त तिनही विभागाचे हाऊसकिपींगची कामे सन-२०१८-२०१९ (दि.१/३/२०१८ ते दि.२८/२/२०१९) या एक वर्ष कालावधीसाठी आऊटसोर्स पध्दतीने करणेकामी मा.व्यवस्थापन समितीचे दि.८/१/२०१८ रोजीचे सभेत विषय नं.३८ अन्वये विषय सादर करण्यात आला होता.यावर सविस्तर चर्चा होऊन निर्णय क्र.३८ अन्वये. दि.१/३/२०१८ ते दि.२८/२/२०१९ या एक वर्ष कालावधीकरीता साईआश्रम भक्तनिवास, साई धर्मशाळा विभागातील यांत्रिकीकरणासहहाऊसकिपींग, विद्युत, प्लंबींगइ.मेन्टेनन्स/ स्वच्छता कामे आऊटसोर्सिंग पध्दतीने करुन घेणेकामी, साईआश्रम भक्तनिवास, साई धर्मशाळा व व्दारावती भक्तनिवास विभागातील यांत्रिकीकरणासह हाऊसकिपींग/ स्वच्छतेची व मेन्टनन्सची कामे आऊटसोर्सिंग पध्दतीने करुन

घेणेकामी, विहित पध्दतीने ई-निविदा मागविणेस व त्याकामी येणा-या एकत्रित रक्कम रू. - १६,१२,७९,७००/- (अक्षरी रुपये – सोळा कोटी, बारा लाख,एकोणऐंशी हजार, सातशेमात्र) चे खर्चास मान्यता देण्यात आली.

तसेच मा.व्यवस्थापन समितीच्या दि.७/८/२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्र.४७७ नुसार सर्व निवासस्थानांच्या हाऊसकिपींग/ स्वच्छता कामांच्या एकत्रित निविदा काढण्यात याव्या असे ठरले होते, सदरहू निर्णय रद्द करण्यात येऊन प्रस्तावित तीनही विभागांकरीता तीन सूवतंत्र ई-निविदा मागविण्यात याव्यात, असे ठरले.

मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार व दि.२२/१/२०१८ चे मंजुर टिपणी अन्वये तिनही विभागाकरिता स्वतंत्रपणे ई –निविदा मागविणेकामी दि.२५/१/२०१८ रोजी तिनही विभागांच्या स्वतंत्रपणे ई निविदा सुचना जाहिरात प्रसिध्द करण्यात आल्या.

**ई निविदा सुचना तपशिल खालीलप्रमाणे**

| अ.नं. | तपशिल | माहिती |
|---|---|---|
| ०१ | निविदा ऑन लाईन डाऊनलोडींग करण्याची तारीख | दि. २५/०१/२०१८ रोजी सकाळी ११-०० वा. पासुन |
| ०२ | निविदा ऑन लाईन दाखल करण्याची अंतिम तारीख | दि. ०८/०२/२०१८ रोजी सांयकाळी०५-०० वा. पर्यंत |
| ०३ | प्रि बिड मिटींग दिनांक व मिटींगचे ठिकाण- | दि. ३०/०१/२०१८ रोजी सकाळी ११-०० वा. |
| ०४ | तांत्रीक निविदा उघडण्याची तारीख १२/०२/२०१८ (शक्य झाल्यास) | |

निविदा ऑन लाईन दाखल करण्याची अंतिम तारीख ८/२/२०१८ ठेवण्यात आली असून दि.१२/२/२०१८ रोजी तांत्रिक निविदा खरेदी समिती सभेसमोर उघडण्यात येतील. त्यातील पात्र निविदा धारकांच्या वाणिज्यिक निविदा मा.उप उपसमितीचे सभेसमोर उघडण्यात येतील. असे म्हटले आहे.

**विभागाची मागणी :-** सध्या तिनही विभागांचे हाऊसकिपींगचे काम करणारी बी.व्ही.इंडिया लि,पुणे ही आऊटसोर्स एजन्सी दि.२८/२/२०१८ पर्यंतच काम करणार असल्याने दि.०१/०३/२०१८ पासून पुढील एक वर्ष कालावधीसाठी नव्याने निविदाधारकास कार्यादेश देणे गरजेचे आहे.

**विभागांचा अभिप्राय/ स्पष्ट मत:** तिनही विभागांचे हाऊसकिपींगचे काम करणारी बी.व्ही.इंडिया लि,पुणे ही आऊटसोर्स एजन्सी दि.२८/२/२०१८ पर्यंतच काम करणार असल्याने दि.०१/०३/२०१८ते दि.२८/२/२०१९ या एक वर्ष कालावधीसाठी नव्याने निविदाधारकास कार्यादेश देणे गरजेचे आहे. त्यासाठी कालावधी कमी असल्याने मा.उप समितीचे सभेसमोर पात्र निविदाधारकांच्या वाणिज्यिक निविदा उघडून न्युनतम निविदाधारकास कार्यादेश देता येईल.व सदरचा विषय मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर कार्योत्तर मान्यतेसाठी सादर करता येईल.

तरी मा.उप समितीचे सभेसमोर पात्र निविदा धारकांच्या वाणिज्यिक निविदा उघडून न्युनतम निविदाधारकास कार्यादेश देणेस व केलेल्या कार्यवाहीस मा.व्यवस्थापन समितीची मान्यता घेणेकामी सदरचा विषय मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर निर्णयार्थसादर.

निर्णय क्र.११६ **यावर सविस्तर चर्चा होऊन, सन २०१८-१९ (दि.०१.०३.२०१८ ते दि.२८.०२.२०१९) अखेर साईआश्रम भक्तनिवास व साईधर्मशाळा विभागातील इमारती व इमारत परिसरातील यांत्रिकीकरणासह हाऊसकिपींग, विद्युत, प्लंबींग इ.मेन्टनेन्स/ स्वच्छता तसेच द्वारावती विभागाकडील हाऊसकिपींग/ स्वच्छता कामे आऊटसोर्सिंग पध्दतीने करुन घेणेकामी प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे कार्यवाही करणेस मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, द्वारावती भक्तनिवास)

---

आयत्या वेळेचा

विषय नं.११ **सन २०१८-१९ या एक वर्ष कालावधीसाठी साईआश्रम भक्तनिवास व साईधर्मशाळा या दोन्ही विभागांकडील इमारतीमध्ये व परिसरात पेस्ट कंट्रोल, रोडेंट कंट्रोल, फॉगिग ट्रिटमेंट (धुरीकरण) व डास आळी प्रतिबंधक औषध फवारणी (Anti Larval) करणेकामी दैनिक वर्तमान पत्रात जाहिरात प्रसिध्द करुन, ई-निविदा मागविणेस तसेच येणाऱ्या खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

प्रस्ताव- **अधिनियम २००४ मधील तरतूद:-** अधिनियमाचे कलम- (१)१४/२ घ- भक्तांच्या सुरक्षिततेसाठी किंवा सोयीसाठी आवश्यक ते तातडीचे दुरुस्ती काम किंवा उपाययोजना हाती घेणे.(२) पोट कलम (१) (ख) भक्तांना राहण्याकरीता व वापर करण्याकरीता विश्रामगृह बांधणे व त्यांची देखभाल करणे.

**व्यवस्थापन समितीचा ठराव :- निरंक**

**प्रस्ताविक:-** श्रींच्या दशर्नासाठी येणा-या साईभक्तांचे निवासासाठी साईआश्रम भक्तनिवास या विभागाकडे १२ इमारती असुन, १ इमारतीमध्ये १२८ रुम याप्रमाणे एकुण १२ इमारती मध्ये १५३६ रुम्स आहेत.

तसेच साईधर्मशाळा विभागात एकुण ६ इमारती आहेत. यापैकी १ इमारत साईबाबा संचलित कनिष्ठ महाविद्यालयास विद्यार्थांचे शैक्षणिक कामासाठी वापरण्यास देण्यात आलेली आहे. व उर्वरीत ५ इमारतीमध्ये एका इमारतीत ३२ हॉल प्रमाणे एकुण १६० हॉल आहेत, सदरील हॉलमध्ये सहली, ग्रुपने येणारे साईभक्त, अंध/ अपंग तसेच हॉस्पीटल मधील रुग्णांचे नातेवाईक, साई प्रसादालय परिसरातील साईभक्त इत्यादींची निवास व्यवस्था करण्यात येत आहे.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.२५/०२/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र. २९ नुसार - सन २०१७ -१८ या आर्थिक वर्षासाठी साईआश्रम भक्तनिवास व साईधर्मशाळा या दोन्ही विभागाकडील इमारतीमध्ये व परिसरात पेस्ट कंट्रोल, रोडेंट कंट्रोल,फॉगींग टिट्रमेट (धुरीकरण)व डास आळी प्रतीबंधक औषध फवारणी (Anti Larval) करणेकामी, गुणवत्ता व दर यांच्या आधारे, विहीत पध्दतीने ई – निविदा व त्याकामी साई आश्रम भक्तनिवास यांचा रु.९,७३,९५०.५० व साई धर्मशाळा यांचा रु.५,३२,९१९.३३ इतका खर्च असा एकुण रु. १५,०६,८६९.८३ पुर्णाकिंत रक्कम रु. १५,०७,०००/- मात्र (अक्षरी रु. पंधरा लाख सात हजार मात्र) येणा-या वार्षिक कामाचे खर्चास मान्यता देण्यात आली होती.

त्या अनुषंगाने मे. पेस्ट कंट्रोल एम. वॉल्श, मुंबई यांना जा.नं.एसएसएस/वशी-साईधर्मशाळा/ ४०७९/ २०१७ दि.०४/११/२०१७ अन्वये दि.०१/११/२०१७ ते दि.२८/०२/२०१८ या कालावधीत दोन औषध फवारणी करणे कामी ( चार महिने ) कार्यादेश देण्यात आलेला आहे. कार्यदेशाची मुदत २८/०२/२०१८ अखेर सपुंष्ठात येत आहे.

सन २०१७-१८ मध्ये पेस्ट कंट्रोल करणेकामी साईआश्रम भक्तनिवास यांना रु.१,४९,२००/- तसेच साई धर्मशाळा यांचा रु.३,०००/- असा एकुण १,५२,२००/- मात्र विभागामार्फत खर्च झालेला आहे. तसेच मे.पेस्ट कंट्रोल एम.वॉल्श, मुंबई यांना २ औषध फवारणी करीता रु. २,९५,४३४/- असा दोन्ही विभागा करीता रु. ४,४७,६३४/-इतका इतका खर्च येणार आहे. एकुण उर्वरीत रु. १०,५९,३६६/- इतकी रक्कम शिल्लक आहे.

सन २०१८-१९ सालासाठी दि.०१/०४/२०१८ ते दि.३१/०३/२०१९ अखेर एक वर्ष कालावधीसाठी दोन्ही विभागाचे नव्याने एकत्रित पेस्ट कंट्रोल करणे कामी येणा-या खर्चास मा.व्यवस्थापन समितीची मान्यता घेणे आवश्यक आहे. तरी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे मान्यतेकामी सादर करता येईल.

| अ.नं | विभागाचे नांव | अंदाजे वार्षिक रक्कम | जीएसटी रक्कम १८ % | एक वर्ष कालावधी साठी अंदाजित एकूण रक्कम (पुर्णाकिंत) |
|---|---|---|---|---|
| १. | साईआश्रम भक्तनिवास | ९,७०,००० | १,७४,६०० | ११,४४,६०० |
| २. | साई धर्मशाळा | ५,४०,००० | ९७,२०० | ६,३७,२०० |
| | **एकूण रक्कम** | **१५,१०,०००** | **२,७१,८००** | **१७,८१,०००** |

साई आश्रम भक्तनिवासस्थान विभागासाठी अंदाजे खर्च रु. ९,७०,०००/- (अक्षरी रु. नऊ लाख सत्तर हजार मात्र) तसेच साई धर्मशाळा विभागासाठी अंदाजे खर्च रु. ५,४०,०००/- दोन्ही विभागा मिळुन एकत्रित अंदाजे खर्च रु. १५,१०,०००/- तसेच त्यावर + GST ची रक्कम वेगळी द्यावी लागणार आहे. त्यानुसार GST ची रक्कम रु. २,७१,८००/- मिळुन एकुण रु. १७,८१,०००/- ( अक्षरी रु. सतरा लाख ऐक्यांशी हजार मात्र) खर्चास मान्यता घ्यावी लागणार आहे.

**मागणी:-** सन २०१८-१९ करीता दि. ०१/०४/२०१८ ते दि. ३१/०३/२०१९ या एक वर्ष कालावधीसाठी साई आश्रम भक्तनिवास व साई धर्मशाळा या दोन्ही विभागाकडील इमारतीमध्ये व परिसरात पेस्टकंट्रोल, रोडेंट कंट्रोल, फॉगींग टिट्रमेंट (धुरिकरण) व डास आळी प्रतिबंधक औषध फवारणी (Anti Larval) करणे कामी येणा-या खर्चास तसेच जाहिरात व ई - निविदेचा मसुदा मान्यतेसाठी व दैनिक वर्तमान पत्रात जाहिरात देऊन ई- निविदा मागविणेस मान्यता मिळणे बाबत.

**संस्थान अधिनियम / ठराव नुसार अनुमान :-** मा.व्यवस्थापन समितीचे मान्यतेनुसार कार्यवाही करता येईल.

**विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मत -** श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्ष दि.०१ ऑक्टोबर २०१७ ते दि. १८ ऑक्टोबर २०१८ (विजयादशमी) या कालावधीत साजरे होत आहे. या कालावधीमध्ये लाखो साईभक्त श्री साई समाधीचे दर्शनार्थ शिर्डीस येत असुन येणा-या साईभक्तांना ढेकुण,डास,झुरळे इ.चा त्रास होऊ नये याकरीता संस्थानचे निवासस्थानामध्ये वेळोवेळी औषध फवारणी होणे गरजेचे आहे. साईआश्रम भक्तनिवास आणि साई

धर्मशाळा या निवासस्थानामध्ये किटकनाशक औषध फवारणी तातडीने पुर्ण करुन साईभक्तांना सेवा पुरविणे आवश्यक आहे.

अ) साई आश्रम भक्तनिवासस्थान विभागासाठी अंदाजे खर्च रु. ९,७०,०००/- (अक्षरी रु. नऊ लाख सत्तर हजार मात्र) तसेच साई धर्मशाळा विभागासाठी अंदाजे खर्च रु. ५,४०,०००/- दोन्ही विभागाचां मिळुन एकत्रित अंदाजे खर्च रु. १५,१०,०००/- तसेच त्यावर + GST ची रक्कम वेगळी द्यावी लागणार आहे. त्यानुसार GST ची रक्कम रु.२,७१,८००/- मिळुन एकुण रु. १७,८१,०००/- ( अक्षरी रु. सतरा लाख ऐक्यांशी हजार मात्र) खर्चास मान्यता मिळणेस.

ब) सन २०१८-१९ करीता दि. ०१/०४/२०१८ ते दि. ३१/०३/२०१९ या एक वर्ष कालावधीसाठी किटक नाषक औषध फवारणी करुन घेणेकामी जनसंपर्क विभागामार्फत शासकीय दराने एकत्रित ई-निविदा जाहिरात राज्यस्तरीय मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद ,नागपुर या शहरासह अहमदनगर जिल्हातील दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करणेस व त्याकामी येणाऱ्या या खर्चास.

क) EDP मॅनेजर यांचेमार्फत महाराष्ट्र राज्याच्या www.mahatendres.gov.in संकेतस्थळावर ई-निविदा सुचना जाहिरात व त्या संदर्भातील Documents Upload करणेस.

ड) माहिती तंत्रज्ञान विभागामार्फत संस्थानचे संकेतस्थळावर ई- निविदा सुचना जाहिरात प्रसिध्द करणेस.

ई) साईभक्तांना ढेकुण,डास,झुरळे इ.चा प्रार्दुभाव होऊ नये म्हणुन कार्यदेशाची मुदत संपेपर्यंत अथवा ई-निविदा प्रक्रीया पुर्ण होईपर्यंत मागील ठेकेदारास (पेस्ट कंट्रोल एम वॉल्श, मुंबई) यांचे कडुन मागील मंजुर दरात औषध फवारणी करता येईल.

तरी उपरोक्त ‘अ’, ‘ब’ ‘क’, ‘ड’ व ‘ई’ प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.११७ **यावर सविस्तर चर्चा होऊन, सन २०१८-१९ या एक वर्ष कालावधीसाठी साईआश्रम भक्तनिवास व साईधर्मशाळा या दोन्ही विभागांकडील इमारतीमध्ये व परिसरात पेस्ट कंट्रोल, रोडेंट कंट्रोल, फॉगिग ट्रिटमेंट (धुरीकरण) व डास आळी प्रतिबंधक औषध फवारणी (Anti Larval) करुन घेणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रु.१७,८१,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- प्र.अधिक्षक, साईधर्मशाळा)**

---

आयत्या वेळेचा

विषय नं.१२ **अॅग्रो इनपुट डिलर्स असो. दिल्ली यांचे दि.१७.०३.२०१८ ते १८.०३.२०१८ रोजी होणाऱ्या अधिवेशनासाठी साईआश्रम भक्तनिवास विभागातील खोल्या आरक्षणाबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियमः-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी अधिनियम २००४:- २१ (१) (ग) “ भक्तांना मंदिरात देवतेच्यादर्शनासाठी व प्रार्थनेसाठी किंवा धर्मिक सेवा किंवा समारंभ करण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे.” व (२) पोट-कलम (१) (ख) “ भक्तांना राहण्याकरिता व वापर करण्याकरिता विश्रामगृहे बांधणे व त्याची देखभाल करणे.”

**मा.व्यवस्थापन समिती ठरावः- निरंक.**

**प्रस्ताविकः**-दि.२९/०१/२०१८ रोजीच्या पत्रान्वये अॅग्रो इनपुट डिलर्स असोसिएशन, नवी दिल्लीयांनी भारतभर कार्यरत असणा-या कृषी विक्रेते संघटनेने दि.१७/०३/२०१८ ते दि.१८/०३/२०१८ अखेर दोन दिवस सदर संघटनेचे महाअधिवेशन शिर्डी येथे आयोजित करण्यात आले असलेबाबत कळविण्यात आले आहे.
याकामी, संपुर्ण भारतातुन १५०० लोक उपस्थित राहणार असुन दोन दिवसांसाठी (एसी ३०० व नॉनएसी २००) अशा एकूण ५०० खोल्या सशुल्क मिळणेची विनंती केली आहे.

**प्रस्तावः**-उपरोक्त संदर्भीय पत्रात,दि.१७/०३/२०१८ ते दि.१८/०३/२०१८ अखेर दोन दिवसांसाठी सदर कार्यक्रमात सहभागी होणा-या १५०० व्यक्तींसाठी (एसी ३०० व नॉनएसी २००) अशा एकूण ५०० खोल्या सशुल्क देणेबाबत विनंती केली असुन त्यानुसार खोल्या उपलब्ध करुन दिल्यास होणारा सेवा आकाराचा तपशील पुढील प्रमाणे आहे.

| खोली प्रकार | आरक्षित खोल्या | सेवाआकार(२४ तासांकरीता) (०३ व्यक्तींसाठी) | व्यक्ती संख्या | एक दिवसाचा सेवाआकार | दोन दिवसाचा सेवाआकार |
|---|---|---|---|---|---|
| AC | ३०० | ५०० | ९०० | १,५०,०००/- | ३,००,०००/- |
| NAC | २०० | २०० | ६०० | ४०,०००/- | ८०,०००/- |

| एकुण | ५०० | --- | १५०० | १,९०,०००/- | ३,८०,०००/- |
|---|---|---|---|---|---|
| | | | **अक्षरी-तीन लाख ऐंशी हजार रुपये मात्र** | | |

**विभागाचे स्पष्ट मत/अभिप्रायः**-प्रस्तावितमागणी प्रमाणे साईआश्रम भक्तनिवास विभागात यापुर्वी दि.१९/०२/२०१६ रोजी निवासी संपादक सकाळ पेपर्स प्रा.लि, यांचे मागणी नुसार सरपंच परिषदेसाठी ५०० खोल्या आरक्षित ठेवण्यात आल्या होत्या तसेच, दि.१७/०२/२०१६ रोजी भौतिकोपचार तज्ञांच्या राष्ट्रीय परिषदेसाठी १२८ एसी खोल्या सशुल्क देण्यात आल्या, दि.२२/१२/२०१६ रोजीचे मा.व्यवस्थापन समिती सभेतील निर्णय क्र.९४६ अन्वये दि.०२/०५/२०१७ ते दि.०७/०५/२०१७ अखेर गायत्री परिवार, मुंबई यांना ६०० साध्या खोल्या सशुल्क देण्यात आल्या होत्या. त्यानुसार, उपरोक्त तक्त्यात नमुद ५०० खोल्यांमध्ये (२०० नॉनएसी व ३०० एसी)प्रत्येकी तिन व्यक्ती याप्रमाणे १५०० व्यक्तींची निवासव्यवस्था करावयाचे झाल्यास,

१) सदर ॲग्रो इनपुट डिलर्स असोसिएशन,नवी दिल्लीयांचेकडून५०० खोल्यांमध्ये (२०० नॉनएसी व ३०० एसी) खोल्यांसाठी दोन दिवसांसाठी **३,८०,०००/- (अक्षरी-तीन लाख ऐंशी हजार रुपये मात्र)** सेवा आकार घेणेस,

२) माहीती तंत्रज्ञान विभागामार्फत दि.१७/०३/२०१८ ते दि.१८/०३/२०१८ दोन दिवस (२०० नॉनएसी व ३०० एसी) अशा एकूण ५०० खोल्यांचे ऑनलाईन आरक्षण बंद करुन आरक्षित करणेस,

३) सदर संस्थेस दि.१७/०३/२०१८ ते दि.१८/०३/२०१८ अखेर (२०० नॉनएसी व ३०० एसी) अशा एकूण ५०० खोल्या आरक्षित करणेत आले असलेबाबत पत्रान्वये कळविणेस.

उपरोक्त ०१ व ०३ बाबीस मान्यता मिळणेकामी सदरचा विषय मा.व्यवस्थापन समिती सभेसमोर निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.११८ **यावर सविस्तर चर्चा होऊन, ॲग्रो इनपुट डिलर्स असो. दिल्ली यांना, त्यांचे अधिवेशन कालावधीमध्ये दि.१७.०३.२०१८ ते १८.०३.२०१८ पर्यंत साईआश्रम भक्तनिवास विभागामधील २०० साध्या व ३०० वातानुकुलीत खोल्या सशुल्क उपलब्ध करुन देण्यात याव्या, त्यासाठी वरीलप्रमाणे ५०० खोल्यांचे सदरहू कालावधीमध्ये ऑनलाईन आरक्षण बंद करणेत यावे, असे ठरले.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, साईआश्रम भक्तनिवास)

---

आयत्या वेळेचा

विषय नं.१३ **शिर्डी बसस्थानक भक्तनिवास येथे सोलर हॉट वॉटर सिस्टीम बसविणेकामी उघडण्यात आलेल्या ई-निविदांमधील निम्नतम दरधारकास कार्यादेश देणेस मान्यता मिळणेबाबत.**

प्रस्ताव- **अधिनियम २००४ मधील तरतुद** :- कलम 14(2) (घ) भक्तांच्या सुरक्षिततेसाठी किवा सोयीसाठी आवश्यक ते तातडीचे दुरुस्तीचे किवा उपाययोजना हाती घेणे.

**प्रस्तावना** :- मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक ३०/११/२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ८०० अन्वये शिर्डी बसस्थानक भक्तनिवासस्थान येथे सोलर हॉट वॉटर सिस्टीम बसविणेकामी येणा-या खर्चास मान्यता देण्यात आली आहे. सदर मान्यतेनुसार महाराष्ट्र शासनाच्या www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर ई-निविदेची जाहीरात अपलोड करण्यात आली होती. त्याचप्रमाणे मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद व नगर येथील वर्तमानपत्रात जाहीरात प्रसिद्ध करणेत आलेली होती. त्यानुसार प्राप्त तीन निविदांचे तांत्रिक बीड दिनांक २२.३.२०१७ रोजी उघडणेत आले. त्यातील आवश्यक तांत्रिक बाबी तपासल्या असता तिनही निविदा प्रात्र असलेने सदर निविदांचे अर्थिक ( Financial ) बीड दिनांक ३.४.२०१७ रोजीचे खरेदी समितीचे सभेमध्ये उघडणेत आले. त्यात खालीलप्रमाणे दर प्राप्त झाले.

| Sr. No. | Description | M/s. Skylark Thermal Energy Systems, Pune | M/s. Jain Irrigation Systems Ltd., Jalgaon | Bunt Solar India Pvt. Ltd., Bangalore |
|---|---|---|---|---|
| 1. | Supply, Installation, Testing & Commissioning of Solar Water Heating System Capacity 14000 Ltrs. at Shirdi Bus Stand Bhaktniwas | 47,27,380/- | 26,25,430/- | 29,78,740/- |

उपरोक्त आर्थिक (Financial Bid) बीडमधील दरानुसार शिर्डी बसस्थानक भक्तनिवासस्थान येथे सोलर हॉट वॉटर सिस्टीम बसविणेकामी मे. जैन इरिगेशन सिस्टीम्स लि., जळगांव यांचे दर रुपये २६,२५,४३०/- मात्र निम्नतम असल्याने त्यांना दिनांक २५.४.२०१७ रोजीचे मा. स्थानिक उपसमिती सभेपुढे चर्चा व वाटाघाटीसाठी बोलिवणेत आले. उपसमितीने त्यांचे बरोबर दर कमी करणेबाबत चर्चा केली असता त्यांनी रक्कम रु. २५,४३०/- मात्र सुट देऊन रुपये २६,००,०००/- अंतिम दर देऊ केले. यावर सविस्तर चर्चा होऊन शिर्डी बस स्थानक भक्तनिवास येथे सोलर हॉट वॉटर सिस्टीम बसविणेकामी मे. जैन इरिगेशन सिस्टीम लि. जळगाव यांचे रु. २६,००,०००/- अंतिम दर स्विकारणेत येऊन त्यांना कार्यादेश देणेत यावा असी उपसमितीने शिफारस केली. परंतु दिनांक २८.४.२०१७ रोजीचे मा. व्यवस्थापन समितीचे सभेत सदर इतिवृत्तास पुष्ठी देत असताना, शिर्डी बसस्थानक इमारतीचा अद्ययावत ग्रंथालय अथवा इतर विषयासाठी वापर करावा, असे ठरले. सदरच्या निर्णयानुसार सबब सदरहू विषय तुर्त स्थगित ठेवणेत आला. सदरच्या निर्णयानुसार निम्नत्तम दर धारकास कार्यादेश देणेची कार्यवाही स्थगित ठेवणेत आलेली आहे.

1. दिनांक २५.७.२०१७ रोजीचे मा. व्यवस्थापन समिती दिनांक सभेतील निर्णय क्रं. ६२९ अन्वये शिर्डी बसस्थानकमधील संस्थान मालकीच्या मोठया हॉल्सचा लायब्ररी, कलादान, आर्ट प्रदर्शन, क्लोकरुम व संस्थान प्रकाशित प्रकाशनांची विक्री करणे अशा कारणासाठी वापर करायचा समितीचा मानस असून याबाबत यथावकाश निर्णय घेण्यात येईल. व **उर्वरीत लहान हॉल व साध्या खोल्याचा निवासी वापर करणेत यावा असे ठरले**. सदरच्या निर्णयानुसार मोठे हॉल वगळता उर्वरीत ६ लहान हॉल व १४ खोल्या यामध्ये सुमारे १५०– १६० साईभक्त राहण्याची सोय होणार असल्याने त्यांचे करीता सुमारे ४५०० लिटर क्षमतेची सोलर यंत्रणेची आवश्यकता आहे.
2. दिनांक २३.९.२०१७ रोजीचे मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्रं. ४१० अन्वये श्री साईबाबा भक्तनिवास स्थान येथिल संस्थान कर्मचारी सोसायटीने स्थापिक केलेला बॉयलर बंद करुन भक्तांना २४ तास गरम पाणी पुरवठा करणेसाठी सध्याच्या सोलर यंत्रणेमध्ये मेकॅनिकल विभागामार्फत आणखी वाढ करुन गरम पाणी साठवण क्षमता वाढविणेस मान्यता देणेत आलेली आहे.

   प्रत्यक्ष पाहणी केली असता साईबाबा भक्तनिवास इमरतीच्या टेरेसवर १५ हजार लिटर क्षमतेचे सोलर हॉट वॉटर यंत्रणा बसविता येईल.
3. दिनांक ३/१/२०१८ रोजी मा. व्यवस्थापन समिती सभेतील निर्णयावर करणेत आलेली कार्यवाहीबाबत मा. मुख्यकार्यकारी अधिकारी महोदया यांचे अध्यक्षेखाली झालेल्या सभेमध्ये शिर्डी बसस्थानक येथे मोठे हॉल वगळून इतर रुम करीता सोलर हॉट वॉटर सिस्टीम बसविणेकामी मा. व्यवस्थापन समितीचे सभेसमोर फेर प्रस्ताव सादर करणेबाबत निर्देश देणेत आलेले आहे.

**मागणी:-**

१) शिर्डी बसस्थानक भक्तनिवासस्थान येथे एकुण १४ हजार लिटर क्षमतेची सोलर हॉट वॉटर यंत्रणा बसविणेकामी निविदा प्रसिद्ध करणेत आली होती. उपरोक्त अ. नं. १ नुसार मोठे हॉल वगळता लहान हॉल व रुम्स करीता ४५०० लिटर क्षमतेची यंत्रणा बसविता येईल.

२) नं. २ नुसार श्री साईबाबा भक्तनिवास स्थान येथे झालेल्या निविदा प्रक्रियातील उर्वरीत ९५०० लिटर क्षमतेचे सोलर हॉट वॉटर यंत्रणा बसविता येईल.

३) शिर्डी बस स्थानक भक्तनिवास स्थान येथे सोलर हॉट वॉटर यंत्रणा बसविणेकामी राबविणेत आलेल्या ई निविदेत दिलेल्या दरात सदरची यंत्रणा बसविणेकामी मे. जैन इरिगेशन सिस्टीम लि. जळगाव यांना विचारणा केली असता, त्यांनी दिनांक २७.१.२०१८ रोजीचे ई मेल पत्राद्वारे "सदरची निविदा प्रक्रिया होऊन बराच कालावधी झालेला आहे. मात्र कार्यादेश दिलेस दिलेल्या रक्कम रु.२६,००,०००/- मात्रचे दरात काम करणेत तयार आहे." असे कळविलेले आहे.

**विभागाचा अभिप्राय/ मत :-** शिर्डी बसस्थानक भक्तनिवासस्थान येथील मोठे हॉल वगळता लहान हॉल व खोल्या मध्ये राहणा-या साईभक्तांकरीता आंघोळी करीता कायम स्वरुपी गरम पाणी उपलब्ध होणेकरीता सोलर हॉट वॉटर यंत्रणा बसविणे आवश्यक आहे. तसेच साईबाबा भक्तनिवासस्थान येथील संस्थान कर्मचारी सोसायटीचा बॉयलर बंद करण्यात आलेला असल्याने भक्तांची गैरसोय होऊ नये याकरीता तेथील सोलर हॉट वॉटर साठयात वाढ करणे आवश्यक आहे. त्यामुळे शिर्डी बसस्थानक भक्तनिवासस्थान येथे सोलर हॉट वॉटर यंत्रणा बसविणेकामी राबविणेत आलेल्या ई निविदा प्रक्रियातील निम्नत्तम दर धारक मे. जैन इरिगेशन सिस्टीम लि. जळगाव यांना कार्योदेश देता येईल.

तरी उपरोक्त अ. नं. १ ते ३ बाबत निर्णय होणेकामी मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.११९ **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावातील विभागाचा अभिप्रायाचा विचार घेता, शिर्डी बसस्थानक भक्तनिवास येथे सोलर हॉट वॉटर सिस्टीम बसविणेकामी मे. जैन इरिगेशन सिस्टीम लि. जळगाव यांचे रु.२६,००,०००/- मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, असे ठरले.**

(कार्यवाही- मेकॅनिकल विभागप्रमुख)

---

आयत्या वेळेचा

विषय नं.१४ **श्री साईबाबांच्या दर्शनासाठी आलेल्या मान्यवर देणगीदार भक्तांच्या देणगीद्वारे संस्थानला मिळालेल्या महत्वाच्या वस्तू/ मशिनरी व प्रकल्पांबाबत.**

निर्णय क्र.१२० सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली. (कार्यवाही- जनसंपर्क अधिकारी)

---

आयत्या वेळेचा

विषय नं.१५ **संस्थान मालकीचे शिर्डी येथील सर्व्हे नं.२ पै. चे क्षेत्रातील मंदिर परिसर गेट नं.१ लगत साईभक्तांचे सोयीसाठी मोबाईल कॅमेरा क्लोकरुम सुविधा पुरविणेकामी ११x८ फुट अशी जागा वापरास मिळणेबाबत मा.चेअरमन, श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप. सोसायटी लि., शिर्डी यांचे दि.०२.०१.२०१८ रोजीचे पत्र.**

प्रस्ताव- **अधिनियमातील तरतूद -** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, (शिर्डी) अधिनियम २००४ चे कलम १७(३) मध्ये विश्वस्तव्यवस्थेमध्ये निहित झालेली कोणतीही स्थावर मालमत्ता राज्य शासनाच्या लेखी पूर्वमंजूरीने असेल त्याखेरीज समितीकडून एक वर्षापेक्षा अधिक मुदतीकरीता भाडेपट्टयाने देण्यात येणार नाही किंवा गहाण टाकण्यात येणार नाही, विकण्यात येणार नाही किंवा अन्यथा अन्य संक्रमित करण्यात येणार नाही,अशी तरतूद आहे.

**प्रस्ताव** –संस्थान मालकीचे शिर्डी येथील सर्वे नं.२ पै.चे क्षेत्रातील मंदिर परिसर गेट नं.१ लगत साईभक्तांचे सोयीसाठी मोबाईल कॅमेरा क्लोकरुम सुविधा पुरविणेकामी ११x८ फूट अशी जागा श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप.सोसायटी लि.शिर्डी यांना वापरास देणेबाबत..

**प्रस्तावना -** मा.चेअरमन,श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप.सोसायटी लि.शिर्डी यांनी त्यांचेकडील उपरोक्त संदर्भांकित पत्रान्वये, मंदिर परिसर गेट नं.१ परिसरात साईभक्तांना आपले मोबाईल कॅमेरा ठेवण्यासाठी क्लोकरुमची सोय नसल्याने जनसंपर्क कार्यालयात येणा-या तसेच गेट नं.१ मधून प्रवेश करणा-या साईभक्तांची गैरसोय लक्षात घेवून मा.मुख्य कार्यकारी अधिकारी मॅडम यांनी केलेल्या सूचनेनुसार संस्थेने दि.०१/०१/२०१८ रोजी साईभक्तांचे सोयीसाठी गेट नं.१ येथील संस्थानचे पादत्राणेगृहालगत मोबाईल कॅमेरा क्लोकरुम सुविधा सुरु करणेत आली आहे. त्यामुळे साईभक्तांची मोठी सोय झाली आहे. संस्थेने आपल्या सूचनेनुसार गेट नं.१ लगत सुरु केलेली मोबाईल कॅमेरा क्लोकरुम सुविधा साईभक्तांच्या सोयीसाठी नेहमीच सुरु ठेवून संस्थेस साईभक्तांची सेवा करण्याची संधी द्यावी. संस्था संस्थानचे नियमाप्रमाणे सदर जागेचे जागा भाडे भरण्यास तयार आहे. तरी गेट नं.१ लगत सुरु केलेली मोबाईल कॅमेरा क्लोकरुम सुविधा नियमित सुरु ठेवण्यात यावी. सदर जागा ११x८ फूट अशी एकूण ८८ चौ.फूट असून मौजे शिर्डी येथील संस्थान मालकीचे सर्वे नं.२ पैकीचे क्षेत्रात आहे, असेबाबत इकडेस विनंती केलेली आहे.

उपरोक्त गेट नं.१ चे परिसरात साईभक्तांना मोबाईल कॅमेरा ठेवण्यासाठी क्लोकरुमची सोय नसल्याने जनसंपर्क कार्यालयात येणा-या तसेच गेट नं.१ मधून प्रवेश करणा-या साईभक्तांची गैरसोय लक्षात घेवून सदर ठिकाणी दि.०१/०१/२०१८ पासून श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप.सोसायटी, शिर्डी यांचेमार्फत मोबाईल कॅमेरा क्लोकरुम सुविधा सुरु करण्यात आलेली आहे.

**विभागाचा अभिप्राय-** श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप.सोसायटी, शिर्डी यांना संस्थान मालकीचे सर्वे नं.२ पै.चे क्षेत्रात गेट नं.१ लगत ११x८ फूट ही जागा मोबाईल कॅमेरा क्लोकरुम ही सुविधा साईभक्तांना पुरविणेसाठी सार्वजनिक बांधकाम विभाग निश्चित करील त्या भाडेदराने व विद्युत बील मीटर रिडींगप्रमाणे वेगळे आकारुन दि.०१/०१/२०१८ ते दि.३०/११/२०१८ या ११ महीन्यांचे कालावधीसाठी लिव्ह अॅण्ड लायसन्स कराराने वापरास देणेबाबतचा व त्याप्रमाणे करारनामा करुन घेणेसाठीच्या निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.१२१ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप.सोसायटी, शिर्डी यांना संस्थान मालकीचे सर्वे नं.२ पै.चे क्षेत्रात गेट नं.१ लगत ११x८ फूट जागा साईभक्तांना मोबाईल-कॅमेरा क्लोकरुम सुविधा पुरविणेसाठी सार्वजनिक बांधकाम विभाग निश्चित करील त्या भाडेदराने व विद्युत बील मीटर रिडींगप्रमाणे वेगळे**

**आकारुन दि.०१/०१/२०१८ ते दि.३०/११/२०१८ या ११ महीन्यांचे कालावधीसाठी लिव्ह ॲण्ड लायसन्स तत्वावर वापरास देणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, मालमत्ता विभाग)

---

आयत्या वेळेचा

**विषय नं.१६** **दर्शनरांग व्यवस्थापन कार्यप्रणाली (टाईमबेस) मे.त्रिलोक सिक्युरिटी सिस्टीम इंडीया यांना त्यांचे कर्मचाऱ्यांचे निवासव्यवस्थेकामी शांतिनिकेतन इमारतीतील ३ रुम लिव्ह ॲण्ड लायसन्स कराराने वापरास देणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियमातील तरतूद -** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,(शिर्डी) अधिनियम २००४ चे कलम १७(३) मध्ये विश्वस्तव्यवस्थेमध्ये निहित झालेली कोणतीही स्थावर मालमत्ता राज्य शासनाच्या लेखी पूर्वमंजूरीने असेल त्याखेरीज समितीकडून एक वर्षापेक्षा अधिक मुदतीकरीता भाडेपट्टयाने देण्यात येणार नाही किंवा गहाण टाकण्यात येणार नाही, विकण्यात येणार नाही किंवा अन्यथा अन्य संक्रमित करण्यात येणार नाही,अशी तरतूद आहे.

**प्रस्ताव-** दर्शनरांग व्यवस्थापन कार्यप्रणाली (टाईमबेस) मे.त्रिलोक सिक्युरिटी सिस्टीम इंडीया यांना त्यांचे कर्मचा-यांचे निवास व्यवस्थेकामी शांतीनिकेतन इमारतीतील ३ रुम लिव्ह ॲण्ड लायसन्स कराराने वापरास देणेबाबत.

**प्रस्तावना**– साईभक्तांच्या होणा-या गर्दीचे नियोजनासंदर्भात दर्शनरांग व्यवस्थापन (Time base) कार्यप्रणाली कार्यान्वीत करणेकामी मे.त्रिलोक सिक्युरिटी सिस्टीम इंडीया लि.यांना कार्यप्रणाली कार्यान्वीत करणेकामीचा कार्यादेश देणेचा निर्णय मा.व्यवस्थापवन समितीचे दि.१६/०८/२०१६ रोजीच्या बैठकीत निर्णय क्रं.५८० प्रमाणे करणेत आलेला आहे. सदर निर्णयाप्रमाणे जा.नं.एसएसएसटी/वशी-आय.टी./२४६५/२०१६ दि.१७/०८/२०१६ अन्वये पुढील ५ वर्षाकरीता कार्यादेश देणेत आलेला आहे.

मे.त्रिलोक सिक्युरिटी सिस्टीम इंडीया लि. यांनी त्यांचेकडील दि.०३/०१/२०१७ रोजीचे मेलद्वारे शांतीनिकेतन इमारतीमधील फक्त ६ खोल्या त्यांचे कर्मचा-यांच्या निवास व्यवस्थेसाठी वापरास मिळणेबाबत विनंती केलेली आहे. त्यास अनुसरुन संस्थानच्या सामान्य प्रशासन विभागाने त्यांचेकडील आदेश क्रं.एसएसएस/ साप्रशा/ ३६५६/२०१७ दि.११/०१/२०१७ अन्वये मे.त्रिलोक सिक्युरिटी सिस्टीम इंडीया लि. यांचे प्रतिनिधींचे निवासव्यवस्थेसाठी संस्थानचे शांतीनिकेतन इमारतीमधील खोली क्रं.१,२,३,६,७ व किचन रुम संस्थान नियमानुसार होणारे भाडे व मीटर रिडींग प्रमाणे होणारा विद्युत आकार लेखाशाखा विभागाकडे जमा करणेबाबत यापूर्वीच आदेश केलेले असून माहीती व तंत्रज्ञान विभागाचे समन्वयाने करारनामा करुन घेणेबाबत मालमत्ता विभागास यापूर्वी आदेशित केलेले आहे.

तद्रुषंगाने इकडील दि.१३/०१/२०१७ रोजीच्या टिपणीप्रमाणे मे.त्रिलोक सिक्युरिटी सिस्टीम इंडीया लि.यांचेकडून दि.०२/०२/२०१७ रोजी लिव्ह ॲण्ड लायसन्स करारनामा करुन घेणेत आलेला आहे.

दरम्यानचे काळात मे.त्रिलोक सिक्युरिटी सिस्टीम इंडीया लि.यांनी त्यांना संस्थानचे शांतीनिकेतन इमारतीमध्ये वापरण्यास देण्यात आलेल्या ६ रुम पैकी वास्तव्यासाठी ३ रुम पुरेशा असलेबाबत व ३ रुम खाली करणेबाबत संस्थानचे माहिती व तंत्रज्ञान विभागाकडे दि.३१/०८/२०१७ रोजीच्या पत्रान्वये कळविलेले आहे. सदर पत्राच्या अनुषंगाने माहिती व तंत्रज्ञान विभागाने दि.२५/०९/२०१७ रोजीच्या कार्यालयीन टिपणीप्रमाणे मे.त्रिलोक सिक्युरिटी सिस्टीम,तिरुपती यांनी उक्त पत्रामध्ये नमूद केलेप्रमाणे कर्मचा-यांच्या निवासासाठी देण्यात आलेल्या ६ रुमपैकी ३ रुम (६,७ व किचन रुम) सशुल्क वापरासाठी कायम ठेवून उर्वरित ३ रुम खाली करुन घेणेबाबत साईप्रसाद निवासस्थान विभागास सुचित केलेले असून या संदर्भात नव्याने करारनामा करणेबाबत मालमत्ता विभागास सुचित केलेले आहे.

दि.०२/०२/२०१७ रोजी केलेल्या लिव्ह ॲण्ड लायसन्स करारनाम्याची मुदत दि.१७/१२/२०१६ ते दि.१६/११/२०१७ या ११ महीन्यांसाठी नमूद केलेली आहे. मे.त्रिलोक सिक्युरिटी सिस्टीम इंडीया यांनी उपरोक्त ६ रुमपैकी ३ रुम दि.०३/१०/२०१७ रोजी खाली केलेल्या आहेत. दि.१७/१२/२०१६ ते दि.०३/१०/२०१७ ही ९ महीने १५ दिवसाची मुदत वजा जाता उक्त करारनामा संपुष्टात येणेसाठी (दि.०४/१०/२०१७ ते दि.१६/११/२०१७ या कालावधीत) १ महीना १२ दिवसांचा कालावधी राहतो. मात्र सदर करारनाम्यातील मुदत दि.१६/११/२०१७ रोजी अलाहीदा संपुष्टात आल्याने उपरोक्त ३ रुमसाठीचा उर्वरित १ महीना १२ दिवस या कालावधीसाठीचा लिव्ह ॲण्ड लायसन्स करारनामा मुदत संपुष्टात आल्यानंतर करणे योग्य ठरणार नाही.

माहीती तंत्रज्ञान विभाग यांचेकडील दि.१५ सप्टेंबर २०१७ रोजीच्या कार्यालयीन टिपणीचे अवलोकन केले असता "मे.त्रिलोक सिक्युरिटी सिस्टीम इंडीया लि.तिरुपती यांनी त्यांचेकडील दि.३१/०८/२०१७ रोजीच्या

पत्रान्वये त्यांचे कर्मचा-यांचे निवासासाठी देण्यात आलेल्या ६ रुमपैकी ३ रुम (६,७ व किचन रुम) सशुल्क वापरासाठी कायम ठेवून उर्वरित ३ रुम खाली करुन देणेत येत असलेचे नमूद केलेले असलेचे दिसून येते.”

**विभागाचा अभिप्राय-** उक्त संस्थेस यापूर्वी सदरच्या रुम ११ महीन्याच्या लिव्ह ॲण्ड लायसन्स कराराने अलाहीदा वापरास दिलेल्या आहेत व पुढील ११ महीन्याची मुदत वाढवून दिल्यास सदरचा कालावधी १ वर्षापेक्षा जास्त होत असल्याने त्यासाठी पुढील ११ महीन्यांची मुदत वाढवून देणेकामीचा प्रस्ताव शासनाचे विधी व न्याय विभाग यांचेकडेस मान्यतेसाठी सादर करता येईल.

उक्त संस्थेचे दि.३१/०८/२०१७ रोजीच्या पत्राचे अनुषंगाने व उपरोक्त कार्यादेशाचे अवलोकन करता उक्त संस्थेस त्यांच्या कर्मचारी निवासासाठी उपरोक्तप्रमाणे शांतीनिकेतन या इमारतीमधील खोली क्रं.६,७ व किचन रुम या ३ रुम पुढील ११ महीन्याचे कालावधीसाठी म्हणजेच दि.१७/११/२०१७ ते दि.१६/१०/२०१८ या ११ महीन्यांचे कालावधीसाठी लिव्ह ॲण्ड लायसन्स कराराने वापरास देणेकामी व त्यांचेकडून संस्थान नियमाप्रमाणे दरमहा भाडे रु.१८,०००/- व मीटर रिडींगप्रमाणे विद्युत बील वेगळे आकारणेकामी मान्यता मिळणेसाठीचा प्रस्ताव श्री साईबाबा संस्थान अधिनियम २००४ चे कलम १७(३) मधील तरतुदीनुसार शासनाकडे सादर करणेच्या निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.१२२ **यावर सविस्तर चर्चा होऊन, मे.त्रिलोक सिक्युरिटी सिस्टीम इंडीया यांना त्यांचे कर्मचाऱ्यांचे निवासव्यवस्थेकामी शांतिनिकेतन इमारतीमध्ये दिलेल्या ६ खोल्यांपैकी ३ खोल्या ताब्यात घेऊन, उर्वरित क्रं.६, ७ व किचन या ३ खोल्या पुढील दि.१७/११/२०१७ ते दि.१६/१०/२०१८ या ११ महीन्यांचे कालावधीसाठी संस्थान नियमाप्रमाणे दरमहा सेवाआकार रु.१८,०००/- व मीटर रिडींगप्रमाणे विद्युत बील आकारुन लिव्ह ॲण्ड लायसन्स तत्वावर देणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, मालमत्ता विभाग)

---

आयत्या वेळेचा

विषय नं.१७ **श्रींचे दर्शनाकरीता येणाऱ्या साईभक्तांना गुलाब फुलांचे गुच्छ, बुके विक्री सुरु करणेकामी शिर्डी नगरपंचायतेने तयार केलेल्या नियमावलीवर चर्चा होणेबाबत.**

**प्रस्ताव-** मा.व्यवस्थापन समितीचे दि.२३/१०/२०१७ रोजीचे सभेतील विषय नं.०२, निर्णय क्र.८५१ अन्वये, मंदिर परिसरामध्ये फुले, गुच्छ, बुके व श्रीफळ यास बंदी केल्यास, अनेकांचा राजगार बंद होईल, परंतु फुले, गुच्छ वगैरे विक्री करणारे विक्रेते शिर्डी बाहेरील असून त्यामधील बरेचशे गुन्हेगार प्रवृत्तीचे आहेत. ते साईभक्तांना त्रास देतात, जबरदस्तीने फुले, गुच्छ वगैरे विकत घेणेस भाग पाडतात या बाबींचा तसेच शिर्डी ग्रामस्थांनी दिलेल्या लेखी पत्राचा विचार करता मंदिर परिसरामध्ये फुले, गुच्छ, बुके व श्रीफळ स्विकारणेस बंदी करणेत यावी. त्याचप्रमाणे साईभक्तांच्या श्रध्देप्रमाणे फुलांचे हार स्विकारणेत यावे, परंतु शिर्डी नगरपंचायतीने फुलांच्या हारांची, त्यांच्या आकारानुसार दुकानदारांना किंमत ठरवून द्यावी, असे ठरले.

मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार मंदिर परिसरात फुले, फुलांचे गुच्छ, बुके, श्रीफळ स्विकारणेस / मंदिर परिसरात आणणेस बंदी करण्यात आलेली आहे.

परंतु यानंतर अनुक्रमे श्री शाकीर पठाण व इतर यांचा दि.१४/११/२०१७ चा अर्ज, श्री सयाजी साहेबराव पवार, साई अर्पण गुलाब विक्रेता संघ, शिर्डी यांचा दि.१५/१२/२०१७ चा अर्ज प्राप्त झाले असुन अर्जामध्ये गुलाव विक्री करणेस परवानगी मिळणेस कळविले आहे. तसेच श्री.बाळासाहेब दत्तात्रय भालेराव, स्वाभीमानी शेतकरी संघटना, जिल्हा कार्यकारणी सदस्य रा. राजुरी, ता.राहाता, जिल्हा. अ.नगर तसेच श्री.विठ्ठलराव कचरु शेळके, स्वाभीमानी शेतकरी संघटना, जिल्हा उपाध्यक्ष, रा.वाकडी (खंडोबाची), ता.राहाता, जिल्हा. अ.नगर यांनी दि.०८/०१/२०१८ रोजीचे विनंती अर्जांन्वये गुलाब फुले विक्रीवर घातलेली बंदी उठविणेबाबत लेखी कळविलेले आहे.

त्याकामी शिर्डी नगरपंचायत शिर्डी यांनी नियमावली तयार करुन दिलेली असुन त्यात संस्थानचे कामकाजाचे दृष्टीने आवश्यक बदल करुन नियमावलीचा तपशिल खालीलप्रमाणे.

***नियमावली***

१. पुष्पगुच्छ विक्री व्यवसाय करतांना सर्व रस्ते व फुटपाथ साईभक्तांना व वाहनांना जाणे-येणेकरीता मोकळे ठेवावेत.

२. पुष्पगुच्छ व्यवसायाचा निर्माण होणारा कचरा, कचरा कुंडीतच टाकणे बंधनकारक राहील. व्यवसायापासुन निर्माण होणारा ओला व सुका कचरा विलगीकरण करुनच, नगरपंचायत घंटागाडीतच टाकावा अन्यत्र कोठेही टाकु नये.

३. व्यवसाय करतांना गुटखा, तंबाकु, पान इ. खाऊन रस्त्यावर थुंकु नये व इतरांनाही थुंकु देऊ नये.

४. प्रत्येक पुष्पगुच्छ विक्री व्यवसायधारकांनी शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांनी दिलेले स्वतःचे ओळखपत्र सोबत ठेवुन, साईभक्तांना दिसेल अशा ठिकाणी लावणे बंधनकारक राहील.

५. व्यवसायाकरीता टेबल, खुर्ची, बाकडे, छत्री इ. वस्तु लावु नये.

६. सर्व साईभकतांशी नम्रतेने वागावे. साईभक्तांनी विचारण्यात आलेली माहीती योग्य प्रकारे सांगुन मदत करावी.

७. व्यवसायाचा परीसर नेहमी स्वच्छ ठेवावा व ग्राहकांना अस्वच्छता करु देऊ नये.

८. श्री साईबाबांचे दर्शनाकरीता आलेल्या व्ही.आय.पी., व्ही.व्ही.आय.पी., व्यक्ती व इतर मान्यवरांचे दौ-यावेळी शिर्डी नगरपंचायत, शिर्डी व श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांनी आवाहन करेल त्यावेळी व्यवसाय बंद ठेवावा लागेल.

९. पुष्पगुच्छ विक्री व्यवसाय करीत असतांना शिर्डी नगरपंचायत,शिर्डी यांनी ठरवुन दिलेल्या किंमतीतच वस्तु/माल योग्य विक्री करावी लागेल. मनमानी किंमतीने विक्री करुन, साईभक्तांची फसवणुक केल्यास कायदेशिर कारवाईस समोरे जावे लागेल.

१०. साईभक्तांना वस्तु खरेदी करणेकरीता कुठलीही सक्ती करु नये. व्यवसाय होणेकरीता पायी चालणारे साईभक्तांच्या वाहनांमागे धावु नये.

११. साईभक्तांना वस्तु/माल खरेदी न केल्यास दमबाजी, आरेरावीची भाषा वापरु नये.

१२. श्रींचे मंदिर परीसर तसेच नगरपंचायत हददीतील सार्वजनिक जागेवर/रस्त्यांवर आरडा-ओरडा व गोंधळ करु नये.

१३. श्री साईबाबांचे समाधी मंदिर, व्दारकामाई मंदिर, चावडी मंदिर, गुरुस्थान मंदिर, मंदिर परीसरातील गेट नं.-१ , गेट नं.-२, गेट नं.-३, गेट नं.-४ व गेट नं.-५ समोर फुले विक्री व्यवसाय करु नये.

१४. श्री साईबाबा संस्थानचे सर्व निवासस्थानांचे गेटसमोर व्यवसाय करु नये.

१५. व्यवसाय करणा-या व्यक्तींनी शिर्डी पोलीस स्टेशनचा चारीत्र पडताळणी दाखला नगरपंचायत, शिर्डी तसेच श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी येथे सादर करणे बंधनकारक राहील.

१६. व्यवसाय करणा-या व्यक्तींमध्ये गुन्हेगारी प्रवृत्तीची इसम असल्यास इतर व्यवसायकांनी सदर बाब तातडीने शिर्डी पोलीस स्टेशन, शिर्डी, नगरपंचायत, शिर्डी तसेच श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी संरक्षण विभागास निर्दशनास आणुन द्यावी.

१७. नियमानुसार नगरपंचातद्वारे किंवा मक्तेदाराद्वारे आकारली जाणारी फी भरणे बंधनकारक राहील. रस्ता अडवून व्यवसाय करणे, अस्वाच्छता करणे किंवा उपरोक्त नियम न पाळणे साठी वेगळी दंडाची आकारणी केली जाईल.

१८. व्यवसाय करतांना प्लास्टीक पिशव्यांचा वापर करु नये.

१९. व्यवसाय करणेकरीता कुठल्याही जागेवर हक्क सांगता येणार नाही.

२०. नागरीकांचे व्यवसाय, कार्यालय, शासकीय कार्यालय, सार्वजनीक शौचालय अशा ठिकाणी जाणेसाठी कुठलाही रस्ता पुष्पगुच्छ विक्री करणा-यांना अडविता येणार नाही.

२१. शिर्डी पोलीस स्टेशन, शिर्डी, नगरपंचायत, शिर्डी तसेच श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी व इतर शासकीय विभागांनी वेळोवेळी दिलेल्या सुचनांचे पालन करणे बंधनकारक राहील.

२२. व्यवसाय करतांना कुठल्याही ठिकाणी अस्वअच्छता पसरविल्यास नगरपंचायत, शिर्डी यांचेमार्फत तातडीने व्यवसाय बंद करुन, कारवाई /दंड करण्यात येईल.

२३. व्यवसाय करणा-या व्यक्तींनी स्थानीक पदाधिका-यांचे (नगरसेवक/सरपंच) शिफारस पत्र सादर करणे बंधनकारक राहील.

२४. व्यवसाय करणा-या व्यक्तींनी आपली संपुर्ण माहीती शिर्डी नगरपंचायत,शिर्डी यांनी ठरवुन दिलेल्या विहीत नमुन्यातील फॉर्ममध्ये परीपुर्ण भरुन देणे बंधनकारक राहील. तसेच सदरचे विहीत नमुन्यातील फॉर्म शिर्डी पोलीस स्टेशन,शिर्डी व श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी (संरक्षण कार्यालय) येथे सादर करावे लागेल.

२५. व्यवसाय करणा-या व्यवसायधारकांचे किमान वय १८ वर्ष किंवा त्यापेक्षा जास्त असणे बंधनकारक राहील.

२६. व्यवसाय करतांना प्रती दिवस १० गुलाब विक्रेते यांनी साईसेवक म्हणुन सेवा करणे बंधनकारक राहील.

२७. उपरोक्तपैकी कोणत्याही नियमांचे काटेकोरपणे पालन न केल्यास तातडीने व्यवसाय बंद करुन, पुढील कायदेशिर कारवाई केली जाईल.

तरी मंदिर परिसरात फुले, फुलांचे गुच्छ, बुके, श्रीफळ स्विकारणेस/ मंदिर परिसरात आणणेस पुर्ववत सुरु करणेकामी शिर्डी नगरपंचयतने दिलेल्या नियमावलीवर सविस्तर चर्चा होऊन फुल विक्रेते यांना संस्थान, शिर्डी पोलीस स्टेशन व शिर्डी नगरपंचायत यांचे संयुक्तीक संमतीने मान्यता देणेबाबत निर्णय होणेस विनंती.

**सदरहू विषयावरील चर्चेच्या वेळी मुख्यकार्यकारी अधिकारी यांनी सभेस कळविले की, उपरोक्त नियमावली शिर्डी नगरपंचायतीने तयार केलेली असून, त्यामधील सर्व नियम संस्थानला बंधनकारक नसावेत.**

निर्णय क्र.१२३ **यावर सविस्तर चर्चा होऊन, फुल विक्रेत्यांना परवाना, ओळखपत्र, ड्रेसकोड असावा तसेच त्यांनी साईभक्तांना त्रास देऊ नये या बाबी संस्थानला अपेक्षीत आहेत. त्यासाठी प्रस्तावित नियमावलीमधील अ.नं.१ ते ८, १० ते १४, १६, २०, २१ या नियमांना मान्यता देण्यात आली व अ.नं.२४ मध्ये नमुद केलेल्या फार्मची पडताळणी संस्थानच्या संरक्षण विभागाने करावी. उर्वीरत बाबींची जबाबदारी शिर्डी नगरपंचायतीने घ्यावी. अंतीम करण्यात आलेल्या नियमावलीप्रमाणे फुल विक्रेत्यांवर निगरानी शिर्डी नगरपंचायतीने करावी. तसेच एखाद्या फुल विक्रेत्याबद्दल तक्रारी आल्यास, त्याचा परवाना रद्द करणेबाबत संस्थानने नगरपंचायतीस कळविल्यास सदर परवाना तात्काळ रद्द करणे नगरपंचायतीस बंधनकारक राहील, असे ठरले.** (कार्यवाही- संरक्षण विभागप्रमुख)

---

आयत्या वेळेचा

विषय नं.१८ **श्री साईबाबा समाधी शताब्दी निमित्त श्री साईनाथ रुग्णालयात प्लॅस्टिक सर्जरी शिबीराचे आयोजन करणेसाठी येणाऱ्या अंदाजित रु.१० लाख मात्र खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

प्रस्ताव- **अधिनियम २००४ मधील तरतुद**– कलम १७ (१) व १७ (२)(ण) मानव जातीच्या कल्याण करणा-या किंवा मानवाला आपत्तीमध्ये सहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल.

**व्यवस्थापन समिती ठराव क्र.**– मा.व्यवस्थापन समिती सभा दि.२०/०८/२०१७, निर्णय क्र.६८२.

**प्रास्ताविक-** महासंत श्री साईबाबा यांनी मंगळवार दि.१५ ऑक्टोबर १९१८ या दिवशी विजयादशमीच्या मुहुर्तावर देहसमाप्ती करुन अनंताकडे प्रयाण केले. श्री साईबाबांच्या महानिर्वाणास दि.१८ ऑक्टोबर, २०१८ रोजी १०० वर्ष पूर्ण होत आहेत. साईनाथांचा भक्तगण आज भारतासह संपूर्ण जगभरात विपुल संख्येने पसरलेला आहे. त्यांच्यादवारे साईतत्वज्ञान आणि शिकवणीचा प्रसार तमाम विश्वात होत आहे. म्हणुनच श्री साईनाथांची शंभरावी पुण्यतिथी केवळ तीन दिवसांचा उत्सव म्हणुन साजरी न करता शंभराव्या पुण्यतिथी अगोदरचे संपुर्ण वर्ष श्री साईसमाधी शताब्दी वर्ष म्हणुन साजरे करण्याचा निर्णय श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीच्या व्यवस्थापन समितीने घेतला आहे. दि.०१ ऑक्टोबर २०१७ ते दि.१८ ऑक्टोबर,२०१८ हे वर्ष म्हणजे साईसमाधी शताब्दी वर्ष असुन हे संपुर्ण वर्ष उत्सावी वातावरणात साजरे करण्याचा संकल्प संस्थानने घेतला आहे. हा उत्सव फक्त संस्थानपुरता मर्यादित नसुन जगभरातल्या समस्त साईभक्तांचा उत्सव आहे. प्रत्येक साईभक्ताच्या उपास्य दैवताच्या स्मरणाची ही महापर्वणी आहे. आपण सर्व साईच्या १०० व्या पुण्यतिथीचे साक्षीदारच नव्हे तर ती साजरी करणारे त्यांचे अनुयायी आहेत. हे आपणा सर्वांचे महदभाग्य आहे.

साईसमाधी शताब्दी सोहळा अधिक संस्मरणीय आणि अर्थपुर्ण व्हावा या उद्देशाने श्री साईबाबा संस्थानच्या रुग्णालये विभागाने शताब्दी वर्षात मोफत प्लॅस्टिक सर्जरी शिबीर आयोजन करण्याचा मानस व्यक्त केला आहे. तरी यानिमित्ताने दि.१८/०३/२०१८ ते दि.२२/०३/२०१८ या कालावधीत शिर्डी येथे सदरहु शिबीर घेणेचे नियोजन आहे. प्लॅस्टिक सर्जिरी शिबीरासाठी विविध ०८ देशातुन १० प्लास्टीक सर्जन सहभाग नोंदविणार आहेत. श्री साईनाथ रुग्णालयांत जनरल ओटी असुन त्यामध्ये ३ ऑपरेशन थिएटर कार्यान्वित आहेत.प्लास्टीक सर्जरी वेळी (गायनिक इमर्जन्सी सोडून) इतर सर्व सर्जरी बंद ठेवुन प्लास्टीक सर्जरीसाठी जनरल ऑपरेशन थिएटरमधील तीनही टेबल सुसज्ज ठेवावेत.

डॉ. राम चिलगर, प्लास्टीक सर्जन, औरंगाबाद यांनी मा.उपसमिती सभेत श्री साईबाबा समाधी शताब्दी निमित्त श्री साईनाथ रुग्णालय,शिर्डी येथे प्लास्टिक सर्जरी शिबीर घेण्याचा मानस व्यक्त केलेला आहे. त्यांनी याबाबत सभेसमोर संदर्भ क्रं.३ ने लेखी पत्र दिले.त्यानुसार सविस्तर चर्चा होऊन, ' डॉ.राम चिलगर,प्लास्टिक सर्जन,औरंगाबाद यांचे सहयोगाने श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवाच्या अनुशंगाने श्री साईनाथ रुगणालय,शिर्डी येथे प्लास्टिक सर्जरी शिबीराचे आयोजन करणेकामी येणा-या खर्चाचा सविस्तर प्रस्ताव

मंजुरीसाठी मा.व्यवस्थापन समिती सभेसमोर सादर करणेत यावा', असे मा.व्यवस्थापन समिती सभा दि.०८/१२/२०१७ निर्णय क्रं.१०६५ निर्णय झालेला आहे.

मोफत प्लॅस्टिक सर्जरी शिबीर पार पाडण्यासाठी बांधकाम विभाग, विदयुत विभाग, जनसंपर्क कार्यालय, कॅन्टीन विभाग, ध्वनीक्षेपण, सीसीटीव्ही, वाहन, श्री साईप्रसादालय, कामगार विभाग,प्रकाशने विभाग, उदीप्रसाद,मध्यवर्ती औषध भांडार, बगीचा विभाग, मंदीर विभाग, स्पिक ॲण्ड स्पिन लि.इ. विभागांनामार्फत संबंधीत कामे करुन घेणे आवश्यक आहे.

**संस्थान अधिनियम / ठराव यानुसार अनुमान-** मा.व्यवस्थापन समिती सभा दि.०८/१२/२०१७, निर्णय क्र.१०६५. यावर सविस्तर चर्चा होवुन श्री साईबाबा शताब्दी निमीत्ताने डॉ.राम चिलगर प्लॅस्टिक सर्जन, औरंगाबाद यांचे सहयोगाने साईनाथ रुग्णालयामध्ये प्लॅस्टिक सर्जरी शिबीराचे आयोजन करणेस व त्याकामी येणा-या अंदाजे रु.१०,००००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.तसेच सदरहु शिबीराचे नियोजनाबाबतचा सविस्तर प्रस्ताव पुढील सभेत सादर करणेत यावा असे ठरले.

**विभागाचा स्पष्ट अभिप्राय-** दि.१८/०३/२०१८ ते दि.२२/०३/२०१८ अखेर मोफत प्लॅस्टिक सर्जरी शिबीरासाठी संदर्भ क्र.०३ अन्वये डॉ.राम चिलगर,प्लास्टिक सर्जन, एलरीओ कॉस्मेटीक ॲण्ड प्लास्टिक सर्जरी क्लिनीक, औरंगाबाद यांचे दि.१०/११/२०१७ रोजीचे पत्राने शिबीर घेण्याबाबत परवानगी मागितलेली आहे.

डॉ. राम चिलगर यांच्या मार्फत शिबीरासाठी प्रसिध्दी, नाव नोंदणी, नाकाची प्लास्टिक सर्जरी, जळीत रुग्णांवर शस्त्रक्रिया (Burn Contracture) हत्ती रोगावर शस्त्रक्रिया असे विविध अजारांवर शस्त्रक्रिया व्दारे उपचार करणार आहेत. तसेच अशा प्रकारचे शस्त्रक्रियेसाठी खाजगी रुग्णालयात शस्त्रक्रिया नुसार जास्तीचा खर्च आकारणी करण्यात येतो.

ग्रामीण भागातील रुग्णांना अशा प्रकारचे शस्त्रक्रिया करण्यापासुन वंचित राहतात. त्यामुळे श्री साईबाबा संस्थानच्या श्री साईनाथ रुग्णालयात अशा प्रकारच्या शस्त्रक्रिया मोफत आयोजित करणे आवश्यक वाटते. ज्यामुळे जास्तीत जास्त गरीब व गरजु रुग्णांना याचा फायदा होईल.

मोफत प्लॅस्टिक सर्जरी शिबीरामध्ये किमान १०० रुग्णांना लाभ देण्याचा मानस दर्शविलेला आहे. सदर शिबीरामध्ये दाखल झालेल्या रुग्णांची योग्य ती चाचणी स्वतः डॉ. राम चिलगर यांचेकडून करण्यात येणार असुन त्यानंतर निवड करण्यात आलेल्या रुग्णांवर शस्त्रक्रिया करणेकामी डॉ.राम चिलगर व बाहेरच्या देशातील सहा डॉक्टर्स यांचेकडुन रुग्णांवर शस्त्रक्रिया करणेत येणार आहेत.

मोफत प्लॅस्टिक सर्जरी शिबीरामध्ये खुर्च्या, जाहिरातीसाठी फ्लेक्स बोर्ड, वृत्तवाहीनीवरील बातम्या, वृत्तपत्रात जाहिराती व येणा-या मान्यवर तथा डॉक्टर्स यांच्या साठी वाहन व्यवस्था, व्हि.आय.पी. भोजन व्यवस्था, दर्शन व्यवस्था, निवास व्यवस्था, औषध व्यवस्था इत्यादीची संस्थान मार्फत मोफत व्यवस्था करण्यात यावी लागणार आहे. तसेच शिबीरासाठी येणारे डॉक्टर्स हे परदेशी (अमेरिका, इटली, ग्रीस, पेरु, चायना, सिंगापुर, तैवान, फिलीपीन्स) असलेमुळे त्यांची जेवणाची व नाष्टयाची सोय बाहेरील हॉटेलमध्ये करणे गरजेचे आहे. तसेच शिबीरकामी एकुण ३ ऑपरेशन थिएटरची आवश्यकता असलेमुळे गायनिक विभागातील इमर्जन्सी केसेस सोडून इतर सर्व ऑपरेशन थिएटर (इ.एन.टी व ऑप्थल सोडून) प्लॅस्टिक सर्जरी शिबीरकामी वापरणेस व रुग्णालयांतील कन्सलटंन्ट डॉक्टरांची देखील शिबीरकामी डयुटी लावणेस मान्यता असावी.

सदर शिबीर प्रसंगी डॉ.राम चिलगर यांचेशी झालेल्या चर्चेनुसार शिबीराचे उद्घाटन तथा समारोप कार्यक्रम दि.२०/०३/२०१८ रोजी आयोजित करावे असे सुचित केलेले आहे.

तसेच संस्थानच्या इतर विभागाकडुन शिबीरासाठी लागणा-या अनुषंगीक बाबींची पुर्तता होणेस विनंती.

दि.१८/०३/२०१८ ते दि.२२/०३/२०१८ रोजी मोफत प्लॅस्टिक सर्जरी शिबीराच्या अनुषंगाने खालील विभागांमार्फत कार्यवाही होणे तसेच येणा-या सर्व अनुषंगीक खर्चास मान्यता मिळणे आवश्यक आहे.

| अ.नं. | विभाग | विभागांमार्फत करावयाचे कामाचा तपशिल | विभागांमार्फत करणेत येणारा अंदाजे खर्च रु. |
|---|---|---|---|
| ०१ | बांधकाम विभाग | १)दि.२०/०३/२०१८ रोजी उद्घाटनासाठी २० मान्यवरांसाठी स्टेज व्यवस्था ('६० X ९०' साईज).<br>२)३०० रुग्णांसाठी बैठक व्यवस्थेकामी ३०० खुर्च्या , ५ टी पॉय व कारपेटसहीत मंडप व्यवस्था करणे. | ५,५०,०००/- |
| ०२ | जनसंपर्क कार्यालय, श्री साईबाबा | वृत्तपत्र व वृत्तवाहिणीवर प्लॅस्टिक शिबीराची प्रसिदधी करुन गरजु रुग्णांना सहभागी होणेकामी आवाहन करणे. | ७,०००/- |

| | | | |
|---|---|---|---|
| | हॉस्पीटल | | |
| ०३ | विद्युत विभाग | शिबीर स्थळी मंडपामध्ये आवश्यकतेनुसार इलेक्ट्रीक पॉईंट व्यवस्था करणेत यावी. | १,५००/- |
| ०४ | कॅन्टीन विभाग | १)दि.१९/०३/२०१८ ते दि. २२/०३/२०१८ अखेर ०४ दिवसाकरीता मान्यवर तथा डॉक्टर्स यांच्यासाठी आवश्यकतेनुसार मोफत चहा/ बिस्कीट/ ची व्यवस्था करणे.<br>२) १ लिटर ३०० पाणी बाटली मोफत व्यवस्था करणे. | १०,०००/- |
| ०५ | ध्वनीक्षेपण विभाग | दि.२०/०३/२०१८ रोजी शिबीरस्थळी उद्घाटनासाठी साऊड सिस्टीम ची व्यवस्था करणे. | ८,०००/- |
| ०६ | सीसीटीव्ही विभाग | दि.२०/०३/२०१८ रोजी उद्घाटन कार्यक्रमासाठी फोटोग्राफरची व व्हिडीओ शुटींगची व्यवस्था करणे. | १०,०००/- |
| ०७ | वाहन विभाग | दि.१८/०३/२०१८ ते दि. २२/०३/२०१८ अखेर ०५ दिवसाकरीता मान्यवर तथा डॉक्टर्स यांच्यासाठी मागणीप्रमाणे मंदीर, प्रसादालय येथे ये-जा करण्यासाठी वातानुकुलीत वाहनाची व्यवस्था करणे. | - |
| ०८ | व्दारावती भक्तनिवास | एकुण २० डॉक्टर्स व इतर स्टाफसाठी विनामुल्य १० वातानुकुलीत रुम दि.१८/०३/२०१८ ते दि.२२/०३/२०१८ अखेर ०५ दिवसाकरीता विनामुल्य व्यवस्था करणे. | ५०,०००/- |
| ०९ | श्री साईप्रसादालय | १) दि.१८/०३/२०१८ ते दि.२२/०३/२०१८ अखेर ०५ दिवसाकरीता मान्यवर तथा डॉक्टर्स तसेच इतर स्टाफ (१०० व्यक्ती) यांना विनामुल्य नाष्टा पुरविणे.<br>२) दि.१८/०३/२०१८ ते दि.२२/०३/२०१८ अखेर ०५ दिवसाकरीता २०परदेशी डॉक्टरांकरिता प्रसाद भोजनाची व्हि.आय.पी कक्षात अथवा बाहेरील हॉटेलमध्ये व्यवस्था करणे. | ८०,०००/- |
| १० | जनसंपर्क कार्यालय | आवश्यकतेप्रमाणे मान्यवर तथा डॉक्टर्स यांच्यासाठी मोफत श्रींच्या दर्शनाची व्हि.आय.पी. दर्शन व्यवस्था करणे. | ३,०००/- |
| ११ | कामगार विभाग | १) दि.१९/०३/२०१८ ते दि.२१/०३/२०१८ अखेर०३ दिवसांकरिता शिबीराकामी सकाळ/दुपार/रात्री०३ सुरक्षारक्षक प्रत्येकी शिप्टकामी मिळावे. | १०,०००/- |
| १२ | मध्यवर्ती औषध भांडार | शिबीराकामी मागणीप्रमाणे लागणारे औषध, गोळया व इतर अनुषंगीक साहित्याची उपलब्धता करणे. | २,३५,०००/- |
| १३ | *बगीचा* विभाग | १) दि.२०/०३/२०१८ रोजी शिबीर स्थळी उभारणी करण्यात आलेल्या मंडप तथा स्टेज जवळ २०-२५ कुंडयांची व्यवस्था करणे.<br>२) दि. २०/०३/२०१८ रोजी स्वागत बुके १५ नग पुरविणे. | २,५००/- |
| १४ | *प्रकाशने विभाग* | शिबीरकामी येणा-या डॉक्टर्स व टेक्नीशियन यांचे सत्कारासाठी साईबाबांचे ३ डी फोटो -२० नग (प्रति नग ४०० रु.)मोफत मिळणेस विनंती. | ८०००/- |
| १५ | मंदीर विभाग | दि.२०/०३/२०१८ रोजी शिबीर उद्घाटन कामी पुजेच्या साहित्यासह पुजा-याची व्यवस्था करणे. | - |
| १६ | उदीप्रसाद विभाग, प्रशासन शाखा | शिबीरस्थळी डॉक्टर्स व मान्यवर यांना प्रसाद म्हणुन उदीप्रसाद पाकिट साधारण ५० पॅकेटची व्यवस्था करणेत यावी. | - |
| १७ | श्री साईनाथ रुग्णालय | शिबीरासाठी ऐनवेळी लागणा-या अनुषंगीक किरकोळ खर्चास मान्यता मिळावी. | २५,०००/- |
| | | **एकुण खर्च** | १०,००,०००/- |

सदर प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ व मान्यतेसाठी सादर.

निर्णय क्र.१२४ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा समाधी शताब्दी निमित्त श्री साईनाथ रुग्णालयात प्लॅस्टिक सर्जरी शिबीराचे आयोजन करणेस व त्यासाठी येणाऱ्या अंदाजित रु.१० लाख मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली. तसेच सदरहू शिबीराची वर्तमानपत्र, सोशल मिडीया, फिरती रिक्षा इ. द्वारे विस्तृत प्रसिध्दी करणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही- प्र.वैद्यकिय संचालिका, श्री साईनाथ रुग्णालय)

---

आयत्या वेळेचा

विषय नं.१९ **रक्तपेढींना द्यावयाचे अनुदानाच्या नियमावलीबाबत.**

प्रस्ताव- **अधिनियम २००४ मधील तरतुद**- कलम १७ (१) व १७ (२)(ण) मानव जातीच्या कल्याण करणा-या किंवा मानवाला आपतीमध्ये सहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल.

**व्यवस्थापन समिती ठराव क्र**- मा. व्यवस्थापन समिती सभा दि. २३-२४/०५/२०१७ रोजीच्या सभेतील विषय नं. ४६ निर्णय क्र. ४०२

**प्रास्ताविक** - उपरोक्त संदर्भानुसार थॅलॅसेमिया, हिमोफेलिया व सिकलसेल ॲनिमिया या आजारांच्या रुग्णांना मोफत किंवा सवलतीच्या दराने रक्तपुरावठा करणा-या रक्तपेढ्यांना आर्थिक अनुदान देता येईल. मात्र सदर अर्थिक अनुदान देण्यासाठी अभ्यासपुर्वक सविस्तर नियमावली तयार करण्यात येऊन शासनाच्या या संदर्भातील धोरणासहीत सदर विषय समितीसमोर सादर करण्यात यावा तसेच प्रस्तावीत रक्तपेढया व इतर रक्तपेढयांकडुन ही वैद्यकिय बाबींचा सविस्तर अहवालीची (जसे रक्तपिशव्याचा खर्च, वाटप, दर, शासकिय अनुदान मिळते काय?) मागणी करण्यात यावे असे ठरले.

**संस्थान अधिनियम / ठराव यानुसार अनुमान**- मा. व्यवस्थापन समिती सभा दि. २३-२४/०५/२०१७ रोजीच्या सभेतील विषय नं. ४६ निर्णय क्र. ४०२ निर्णयानुसार नियमावली तयार करणेबाबत तसेच लेखाशाखा विभागाकडील जा.नं.एसएसएसटी/वशी-लेखा-अनुदान/२८९४/२०१७, दि. ०८/१०/२०१७ चे पत्रान्वये सदरचा प्रस्ताव मा. छाननी समितीचे सभेसमोर सादर करावयाचा असल्याने रक्तपेढयांना द्यावयाच्या अनुदानासंबंधी नियमावली तयार करुन मा. व्यवस्थापन समितीचे सभेसमोर तात्काळ सादर करणेस कळविलेले आहे. रक्तपेढयांना द्यावयाच्या अनुदानासंबंधी खालीलप्रमाणे नियमावली तयार करणेत आलेली आहे.

**नियमावलीतील मुद्दे खालील प्रमाणे -**

१) रक्तपेढी ही धर्मादाय आयुक्त नोंदणीकृत असणे बंधनकारक असेल.
२) नफ्यात असणा-या रक्तपेढीस अनुदान देय होणार नाही.
३) रक्तपेढीने मागील ०३ वर्षांचा ऑडीट रिपोर्ट सादर करणे बंधनकारक असेल.
४) रक्तपेढीचा कारभार पारदर्शक असणे बंधनकारक असेल.
५) रक्तपेढीमध्ये पुर्णवेळ रक्तसंक्रमन अधिकारी (बी.टी.ओ.) उपस्थित असणे बंधनकारक असेल.
६) रक्तपेढीचे विश्वस्तांची नियुक्ती लोकशाही पध्दतीने झालेली असावी.
७) रक्तपेढीने आयकराचे 80 G प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक असेल.
८) ऑडीट वर्ग **"ब"** श्रेणी किंवा त्यावरील असणे बंधनकारक असेल.
९) प्रत्येक वर्षी ऑडीट अहवाल सादर करणे बंधनकारक असेल.
१०) अनुदान मागणीकामी रक्तपेढींचे विश्वस्तांचा सर्वानुमते ठराव असणे बंधनकारक असेल.
११) रक्तपेढीस जास्तीत जास्त वार्षिक रुपये ५ लाखापर्यंत अनुदान मिळेल.
१२) अनुदान मागील वर्षांसाठी एकदा व पुढे त्रैमासिक पध्दतीने पुरविले जाईल.
१३) थॅलॅसेमिया रुग्णांना थॅलॅसेमिया कार्ड व हयातीचा दाखला असणे बंधनकारक असेल.
१४) थॅलॅसेमिया रुग्णाकडे थॅलॅसेमिया कार्ड नसल्यास चालु तारखेचा डायग्नोसिस रिपोर्ट असणे बंधनकारक असेल.
१५) श्री साईबाबा संस्थानचे मा. विश्वस्त मंडाळातील सदस्य यांना रक्तपेढींची पहाणी व पडताळणी करणेचा अधिकार असेल.
१६) श्री साईबाबा संस्थानला रक्तपेढीचे विशेष ऑडीट करण्याचे अधिकार असतील.
१७) रक्तपेढीने रुग्णांची शासनास सादर केलेल्या माहितीचे एक प्रत श्री साईबाबा संस्थानकडे सादर करणे बंधनकारक असेल.
१८) श्री साईबाबा संस्थाने दिलेल्या अनुदानाचा वापर केल्याचे चार्टर्ड अकाऊँटंटचे प्रमाणपत्र संस्थानला सादर करावे लागेल.

१९) रक्तपेढीत काही गैरप्रकार आढळुन आल्यास त्यांना देण्यात आलेले अनुदान व्याजासह परत मागण्याचा अधिकार संस्थानला असेल.

२०) संस्थानचे सर्व नियम ज्या रक्तपेढयांना मान्य असतील व ते स्टॅम्प पेपरवर अधिकृत स्वाक्षरीनिशी देतील त्याच रक्तपेढयांना अनुदान देण्याबाबत संस्थान विचार करेल.

२१) शासनाकडुन रक्तपेढयांना रु. १००/- प्रती पिशवी याप्रमाणे अनुदान मिळते, तेवढाच हिस्सा संस्थानने रक्तपेढयांना द्यावा.

२२) ज्या रक्तपेढया मागील तीन वर्षामध्ये किमान दोन वर्षे नफ्यात आहेत त्यांना अनुदान देणेत येऊ नये.

**विभागाचा अभिप्राय**:- मा.संचालक, राज्य रक्त संक्रमण परिषद, मुंबई यांनी शासन निर्णय क्र.एमआयएस-१०९९/ १९३०/साआर-२५६/९९/प्रशासन-२, वैद्यकीय अधिक्षण व औषधी द्रव्य विभाग, मंत्रालय, मुंबई दि. ५ जानेवारी २००० मध्ये सर्व शासकीय, निमशासकीय, धर्मदाय संचलित रक्तपेढयांना राज्यातील थॅलेसेमिया आणि हिमोफेलिया रुग्णांना मोफत रक्तपुरवठा करणेबाबत कळविणेत आलेले आहे. त्यानुसार या कार्यालयाने राज्यातील सर्व वर उल्लेखित संस्थाना विषयांकित रक्तपुरवठा करणेबाबत बंधन घातले आहे. राज्य रक्त संक्रमण परिषदेमार्फत या बाबत रु.१००/- प्रती पिशवी अनुदान देण्यात येते, असे राज्य रक्त संक्रमण परिषद महाराष्ट्र राज्य यांनी क्र.रा.र.सं.प/थै.हि.मो.र.पु/२०१६/५००, दि. २१/०७/२०१६ रोजीच्या पत्राने रक्तपेढी प्रमुख धर्मादाय संस्थान संचलित रक्तपेढी, रेडक्रॉस संचलित रक्तपेढी यांना कळविलेल्या पत्रात म्हटले आहे.

तरी सदरची नियमावली मा. व्यवस्थापन समितीचे सभे समोर निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.१२५ **यावर सविस्तर चर्चा होऊन, रक्तपेढींना द्यावयाचे अनुदानाबाबची प्रस्तावित नियमावली समिती सदस्य मा.श्री.प्रताप भोसले यांना दाखवून, त्यांचे अभिप्रायासह सभेसमोर सादर करणेत यावी, असे ठरले.**

(कार्यवाही- प्र.वैद्यकिय संचालिका, श्री साईनाथ रुग्णालय)

---

आयत्या वेळेचा

विषय नं.२० **श्री साईनाथ रुग्णालयातील भुलतज्ञ व बाहेरील व्हिजीटींग ऑनकॉल भुलतज्ञ डॉक्टरांना दयावयाच्या दरांबाबत.**

प्रस्ताव- **अधिनियम २००४ मधील तरतुद** – कलम १७ (१) व १७ (२)(ण) मानव जातीच्या कल्याण करणा-या किंवा मानवाला आपत्तीमध्ये सहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल.

**व्यवस्थापन समिती ठराव क्र.** – मा.व्यवस्थापन समिती सभा दि.२४/०७/२०११, विषय नं.३४ निर्णय क्रं.५२५. व दि.१५/०७/२०१६ विषय नं.२५ निर्णय क्रं.६०६

**प्रास्ताविक-** समाजातील तळागाळातील गरीब व गरजु रुग्णांना वैद्यकीय सेवा मिळावी या उददेशाने सन १९६४ श्री साईनाथ रुग्णालयाची स्थापना करण्यात आली.या रुग्णालयांत रुग्णांच्या सेवेसाठी उत्तम पायाभुत सुविधा उपलब्ध करुन दिलेली आहे. रुग्णांचा वाढता ओघ लक्षात घेवुन धर्मशाळा इमारत नं.१ व २ या दोन्ही इमारतीत रुग्णालयाच्या वापरासाठी घेण्यात आलेले आहेत.

सद्यस्थितीत रुग्णालयात ३०० बेड कार्यरत आहेत.मा.व्यवस्थापन समिती सभा दि.२२/१२/२०१६ रोजीचे निर्णय क्रं.९४४ नुसार, दि.०१/०१/२०१७ पासुन रुग्णालयातील सर्व स्तरांतील रुग्णांना सर्व उपचार मोफत करणेत आलेले असुन सदर बाबत रुग्णालयांमार्फत कार्यवाही सुरु करणेत आली आहे.त्यानुसार रुग्णांलयांतील केसपेपर विभागातुन नवीन व जुने केसपेपरसाठी रु.१० /- इतकेशुल्क आकारुन रुग्णांना मोफत आरोग्य सेवा पुरविणेत येत आहे.

श्री साईनाथ रुग्णालयांत सध्या ॲलोपॅथी,होमिओपॅथी व आयुर्वेदिक पदधतीने उपचार घेणेची सुविधा उपलब्ध आहे.याचबरोबर सुसज्ज असे ०२ ऑपरेशन थिएटर्स कार्यान्वित आहेत.

१.ऑपरेशन थिएटर नं.१ - १.जनरल सर्जरी ऑपरेशन थिएटर – २ टेबल
२.आर्थो सर्जरी ऑपरेशन थिएटर- १ टेबल
३.स्त्रीरोग व प्रसुती विभाग ऑपरेशन थिएटर- २ टेबल

२. ऑपरेशन थिएअर नं.२- १. कान,नाक,घसा, ऑपरेशन थिएटर – २ टेबल
२.नेत्र शस्त्रक्रिया ऑपरेशन थिएटर – २ टेबल

वरील सर्व ऑपरेशन थिएटर्स ही सकाळी ८ ते सायंकाळी ४ यावेळेत पुर्ण क्षमतेने कार्यान्वित असणे आवश्यक आहे.रोज सकाळी ८ ते सायं.४ वाजेपर्यंत साधारणपणे २५ ते ३० ऑपरेशन्स होतात. परंतु भूलतज्ञ

डॉक्टरांच्या कमतेरतेमुळे रोज अंदाजे ५ ते ७ ऑपरेशन्स पुढे ढकलली जात असल्याने रुग्णांची गैरसोय होत आहे. व रुग्णालयाचे नुकसान होत आहे.

**श्री साईनाथ रुग्णालयांतील सन २००९ चे मंजुर आकृतीबंधाप्रमाणे भुलतज्ञ डॉक्टरांची संख्या व रिक्त पदे (२०० खाटांसाठी) खालीलप्रमाणे.**

| अ.नं. | पदनाम | मंजुर पदे | भरलेली पदे | रिक्त |
|---|---|---|---|---|
| १ | मेडीकल ऑफीसर भुलतज्ञ | ०१ | -- | ०१ |
| २ | कनिष्ट भुलतज्ञ | ०३ | ०३ | ०० |

**सद्यस्थितीला साईनाथ रुगणालयांत कार्यरत असलेले भुलतज्ञ डॉक्टर्स खालीलप्रमाणे.**

| अ.नं. | वैद्यकीय अधिकारी नांव | पदनाम |
|---|---|---|
| १ | डॉ.मनिषा लक्ष्मण शिरसाठ | ज्यु.भुलतज्ञ |
| २ | डॉ.गोविंद श्रीपतराव कलाटे | ज्यु.भुलतज्ञ |
| ३ | डॉ.महेंद्र विलासराव तांबे | ज्यु.भुलतज्ञ |

सदरचे तीनही भुलतज्ञ डॉक्टर्स हे ऑपरेशन थिएटर्स मधील होणा-या शस्त्रक्रिया व इर्मजन्सी रात्रीचेवेळी होणा-या शस्त्रक्रियेना भुल देणेच काम सद्यस्थितीला करीत आहेत.

परंतु डॉ.मनिषा लक्ष्मण शिरसाठ यांनी दि.१८/०१/२०१८ रोजीचे अर्जान्वये ,दि.२४/०१/२०१८ ते दि.१७/०२/२०१८ अखेर अशी एकुण २५ दिवसांच्या अर्जित रजेचा अर्ज सादर केला आहे.यासंबंधी डॉ.मनिषा यांचेशी वैद्यकीय अधिक्षिका यांनी तोंडी चर्चा केलेनंतर त्या सुटटी वरुन आलेनंतर महिना पुर्व नोटीस देऊन राजीनामा देणार असल्याचे सांगितले.

**संस्थान अधिनियम / ठराव यानुसार अनुमान-** १) मा.व्यवस्थापन समिती सभा दि.२४/०७/२०११, विषय नं.३४ निर्णय क्रं.५२५- यांवर सविस्तर चर्चा होऊन संस्थान नेमणुक असलेल्या भुलतज्ञांना त्यांचे डयुटी व्यतीरिक्त संध्याकाळी ६ ते १० यावेळेत आवश्यक असलेल्या मेडीयम ऑपरेशनसाठी रु.४५०/- व मेजर तातडीचे ऑपरेशनसाठी रु.८००/- याप्रमाणे दर (प्रत्येक ऑपरेशनसाठी) देणेस मान्यता देणेत आली.

२) मा.व्यवस्थापन समिती सभा दि.१५/०७/२०१६ विषय नं.२५ निर्णय क्रं.६०६ – यांवर सविस्तर चर्चा होवुन प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे रुग्णाची गैरसोय होऊ नये , याकरिता श्री साईनाथ रुग्णांलयातील भुलतज्ञांना संध्याकाळी ६ ते १० या वेळेत होणा-या सर्व केसेस व आवश्यक असलेल्या मेडीयम ऑपरेशनसाठी रु.६५०/- व मेजर/तातडीचे ऑपरेशनसाठी रु.१२००/- याप्रमाणे (प्रत्येक ऑपरेशनसाठी) दर देणेस मान्यता देणेत आलेली आहे.

**विभागाचा स्पष्ट अभिप्राय-** डॉ.मनिषा यांचे उपरोक्त कालावधीतील रजेमुळे श्री साईनाथ रुग्णालयातील शस्त्रक्रिया होणेकामी अडचण निर्माण होत आहे.त्यामुळे त्यांचे गैरहजेरीत उर्वरित दोन भुलतज्ञांवर अतिरिक्त कामाचा ताण पडत आहे. सद्यस्थितीला दोन भूलतज्ञ डॉक्टर्स व पाच ऑपरेशन थिएटर्स असे प्रमाण आहे.प्रसंगी नाईलाजास्तव काही विभागातील शस्त्रक्रिया स्थगित कराव्या लागत आहेत.त्यामुळे रुग्णांना सेवा देण्यात अडचण निर्माण होत आहे.

**करिता**

ऑपरेशन थिएटर नं.१ – सदर ऑपरेशन थिएटर मध्ये सर्जरी ,ऑर्थो ,गायनिक इ.तीन ऑपरेशन थिएटर कार्यान्वित आहेत.पैकी श्री साईनाथ रुग्णालयातील भुलतज्ञ डॉक्टर्स दोन ऑपरेशन थिएटर मधील शस्त्रक्रिया पार पाडत आहेत.परंतु तिस-या ऑपरेशन थिएटर मधील शस्त्रक्रिया स्थगित कराव्या लागत आहेत.याकरिता तिस-या ऑपरेशन थिएटर करीता या दोन भुलतज्ञांना पुर्वी निश्चीत केलेप्रमाणे मेडीयम ऑपरेशन साठी ६५०/- व मेजर / तातडीचे शस्त्रक्रियेसाठी रु.१२००/-  दर देता येईल. त्यांनी दोन ऑपरेशन थिएटरमधील शस्त्रक्रिया ॲडजस्ट करुन तिस-या थिएटर मधील शस्त्रक्रिया कराव्यात.

ऑपरेशन थिएटर नं.२- सदर ऑपरेशन थिएटर मध्ये ईएनटी,व ऑप्थल हे दोन थिएटर कार्यान्वीत आहेत.पैकी ऑप्थलमॉलॉजी विभागातील शस्त्रक्रिया या लोकल भुलेखाली केल्या जातात. अति जोखीमीच्या काही शस्त्रक्रियेसाठी यदाकदाचित पुर्ण भुलेची आवश्यकता पडते.तसेच ईएनटी विभागातील काही शस्त्रक्रिया या लोकल भुलेखाली केल्या जातात व काही शस्त्रक्रिया या(उदा.टॉन्सील सारख्या सर्जरी) या संपुर्ण भुलेखाली केल्या  जातात.करिता बाहेरुन एक व्हिजीटींग डॉक्टर  प्रति दिवशी बोलविणे आवश्यक आहे.

याअनुषंगाने ऑपरेशन थिएटर नं.१ मधील तिस-या ऑपरेशन थिएटरकरिता सद्यस्थितीला रुग्णांलयातील कायम भुलतज्ञांना वर नमुद केलेला दर देणे व ऑपरेशन थिएटर नं.२ करिता बाहेरुन ऑन कॉल बेसीस भुलतज्ञ डॉक्टर्स बोलविणे आवश्यक आहे. याकामी एका पेक्षा जास्त भुलतज्ञ डॉक्टरांचे पॅनेल बनविणे योग्य राहील.जेणेकरुन रुग्णांलयातील सर्व ऑपरेशन थिएटर्स पुर्ण क्षमतेने कार्यान्वीत होतील व रुग्णांचे नुकसान टळेल.

श्री साईनाथ रुग्णालयातील शस्त्रक्रियेकामी श्री साईनाथ रुग्णालयातील भुलतज्ञ डॉक्टरांचे सध्याचे दर व शासन परिपत्रकाप्रमाणे भुलतज्ञ डॉक्टरांचे दर खालीलप्रमाणे शासनाने प्रस्तावित केलेले आहेत.

| भुलतज्ञ डॉक्टर्स | मेजर /तातडीचे | मेडीयम/मायनर |
|---|---|---|
| श्री साईनाथ रुग्णालयातील भुलतज्ञ डॉक्टर्स | १२००/- | ६५०/- |
| बाहेरुन ऑन कॉल बेसीस वरील भुलतज्ञ डॉक्टर्स | २०००/- | १५००/- |

बाहेरुन ऑनकॉल बेसीस बोलविणेत येणा-या भुलतज्ञ डॉक्टरांना शासन परिपत्रक – Commissioner Health Services and Mission Director, National Health Mission Public Health Department, Government Of Maharashtra. No.SHS/HQAC/Specialist post/ ९०८२६-९२७ / 30/11/16. या अनुषंगाने प्रस्तावित केलेले दर देणे आवश्यक आहे.

पैकी श्री साईनाथ रुग्णालयातील कायम भुलतज्ञापैकी एखादा भुलतज्ञ रजेवर गेल्यास ऑपरेशन थिएटर नं.१ मधील शस्त्रक्रियेसाठी बाहेरुन ऑनकॉल बेसीस वर भुलतज्ञ डॉक्टर्स बोलविणे गरजेचे आहे. अशा प्रकारे एका वेळी एक किंवा दोन भुलतज्ञ डॉक्टर्स ऑनकॉल बेसीस बोलविणे आवश्यक आहे.तसेच महिन्यातील चार किंवा पाच पैकी दोन रविवारी होणा-या तातडीच्या शस्त्रक्रियेकामी श्री साईनाथ रुग्णालयातील भुलतज्ञ उपलब्ध राहतील व उर्वरित सर्व रविवारी होणा-या तातडीच्या शस्त्रक्रियेकामी बाहेरुन ऑनकॉल बेसीसवर बोलविणेत येणारे भुलतज्ञ डॉक्टर्स उपलब्ध राहतील.जेणेकरुन रुग्णालयाचे कामकाज सुरुळीत होईल.

तरी श्री साईनाथ रुग्णालयातील भुलतज्ञ डॉक्टरांची संपुर्ण पदे भरेपर्यंत गरजेनुसार आहे त्याच कायम भुलतज्ञ डॉक्टरांना अतिरिक्त (रुटीन / तातडीच्या शस्त्रक्रिया) दर देणेस तसेच व्हिजीटिंग पदधतीने (ऑन कॉल बेसीस) भुलतज्ञ डॉक्टर बोलविणेस,तसेच त्यांचे पॅनेल बनविणेस व वर प्रस्तावित केलेप्रमाणे दर देणेस मान्यता असावी.

सदर प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे मान्यतेसाठी व निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.१२६ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ रुग्णालयातील भुलतज्ञ डॉक्टरांची संपुर्ण पदे भरेपर्यंत गरजेनुसार आहे त्याच कायम भुलतज्ञ डॉक्टरांना अतिरिक्त (रुटीन / तातडीच्या शस्त्रक्रिया) दर देणेस व व्हिजीटिंग पदधतीने (ऑन कॉल बेसीस) भुलतज्ञ डॉक्टर बोलविणेस, तसेच त्यांचे पॅनेल तयार करणेत येऊन, त्यांना प्रस्तावित केलेप्रमाणे दर देणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- प्र.वैद्यकिय संचालिका, श्री साईनाथ रुग्णालय)

---

आयत्या वेळेचा

विषय नं.२१ **संस्थान रुग्णालयात कंत्राटी पध्दतीने तात्पुरत्या स्वरुपात ११ महिने कालावधीसाठी नेमणूक करण्यात आलेल्या वैद्यकिय अधिकाऱ्यांचा नेमणूक कालावधी संपुष्टात असलेबाबत.**

प्रस्ताव- **अधिनियम २००४ तदतुद-**

कलम १३(४) नुसार समितीस, संस्थान विश्वस्तव्यवस्थेचा कारभार कार्यक्षमतेने चालविणेसाठी आणि या अधिनियमान्वये तिची कर्तव्ये व कामे पार पाडण्यासाठी आवश्यक वाटतील अशा अधिका-यांची (कार्यकारीअधिका-यांव्यतिरीक्त) व कर्मचा-यांची नेमणूक करता येईल.

परंतु ज्या अधिका-याला किंवा कर्मचा-याला दरमहा दोन हजाररूपयांहून अधिक वेतन देण्यात येत असेल किंवा द्यावयाचे असेल, अशा कोणत्याही अधिका-याची किंवा कर्मचा-याची नेमणूक, समितीकडून, असे पद राज्य शासनाने मान्य केलेल्या कर्मचारी आकृतीबंधानुसार मंजुर करण्यात येईपर्यंत केली जाणार नाही. आकृतीबंधातील अटी-शती क्र ३- सदर पदांवर नव्याने नियुक्ती करतांना समितीने सदर पदाची आवश्यकता व अर्हता याबाबत विस्तृत प्रसिध्दी देऊन सदर पदांवर स्पर्धात्मक परीक्षा घेऊन नियुक्ती करावी तसेच अट शर्त अ नं ८ मध्ये समितीने शक्यतो आकृतीबंधातील पदे ही एकत्रित मानधनावर किंवा कंत्राटी पध्दतीने भरावी जेणेकरून व्यवस्थापन निधीवर भार पडणार नाही असे नमुद आहे.

**व्यवस्थापन समितीचा ठराव क्र-** मा व्यवस्थापन समिती दि. २५/०२/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र १६०.

श्री साईबाबा व श्री साईनाथ रूग्णालयात रूग्णांची गैरसोय होऊ नये याकरीता तात्पुरत्या स्वरूपात ११ महिने कालावधीसाठी वैद्यकीय अधिका-यांच्या नेमणूका करणेबाबतच्या उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.

**प्रस्तावना-** संस्थान रुग्णालयात राजीव गांधी योजनेअंतर्गत काही आजारांवर मोफत उपचार होत असल्याने तसेच अहमदनगर-मनमाड महामार्गावर दुसरे मोठे अद्यावत रुग्णालय नसल्याने संस्थान रुग्णालयात रुग्णांचा कायमच ओघ असतो. मात्र त्याप्रमाणात तज्ञ वैद्यकीय अधिकारी उपलब्ध नसल्याने सध्या कार्यरत वैद्यकीय अधिका-यांवर कामाचा बोजा वाढलेला आहे. श्री साईबाबा संस्थान रुग्णालयातील तज्ञ वैद्यकीय अधिका-यांची रिक्त पदे भरणेकामी वेळोवेळी जाहिराती प्रसिद्ध करूनही तज्ञ वैद्यकीय अधिकारी मिळत नाही. तसेच शासनाचे विधी व न्याय विभागामार्फत दि. २१-२३/०९/२०१६ या कालावधीत संस्थानचे विविध विभागांचे निरीक्षणामध्ये रुग्णालयाच्या आस्थापनेवरील सर्व संवर्गातील रिक्त पदे भरण्याची कार्यवाही तातडीने करण्यात यावी अशा सुचना केलेल्या असल्याने रुग्णालयाकडील रुग्णांवर उपचार करणेकामी कार्डीओलॉजिस्ट, न्युरोसर्जन, ॲनेस्थेसियालॉजिस्ट, वैद्यकीय अधिकारी (दंततज्ञ) व आरएमओ पदांवर वैद्यकीय अधिका-यांची आवश्यकता असल्याने कार्यालयात उपलब्ध असलेल्या अर्जांमधुन मा व्यवस्थापन समिती दि. २५/०२/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र १६० नुसार एकुण ०८ वैद्यकीय अधिका-यांच्या ११ महिने कालावधीसाठी तात्पुरत्या स्वरूपात कंत्राटी पध्दतीने नेमणूक करणेत आलेल्या होत्या. त्यातील डॉ अमोल डॅनिअल भालेराव, वरिष्ठ भुलतज्ञ व डॉ सतिष हरीकिसन पवार, कनिष्ठ भुलतज्ञ हे दोन्ही वैद्यकीय अधिकारी कामावर हजर झालेले नाहीत तसेच डॉ यशल विलास जाधव,दंतरोग तज्ञ यांचादि. ०१/०६/२०१७ पासून राजीनामा मंजूर झालेला आहे. तसेच डॉ तनय अजित पाडगावकर यांनी दि. १५/०१/२०१८ रोजीचे अर्जान्वये I shall be comleting my 11 months post on 31st Jan 2018. I don't wish to continue on the same position. However I would like to apply for position of visiting cardiologist with one day of the week being alloted to me for independent work if the Sansthan will have me for service. असे कळविलेले असुन सध्या खालील वैद्यकीय अधिकारी कार्यरत आहेत.

| अ. नं. | अर्जदाराचे नाव | पदाचे नाव | ११ महिने कालावधीसाठी दिलेला नेमणूक आदेश क्रमांक | नेमणूक संपुष्टात येत असल्याची तारीख |
|---|---|---|---|---|
| ०१ | डॉ. संजालिया मिलनकुमार किशोरभाई | न्युरोसर्जन | जा.नं.एसएसएस/एसएसबीएच/एचआर/ २८६०/२०१७ दि. ०६/०३/२०१७ | ०५/०२/२०१८ |
| ०२ | डॉ. विजयकुमार दादाराव कर्डीले | कनिष्ठ भुलतज्ञ | जा.नं.एसएसएस/एसएसबीएच/एचआर/ २८६४/२०१७ दि. ०६/०३/२०१७ | ०५/०२/२०१८ |
| ०३ | डॉ. पौर्णिमा उर्फ उज्वला रामराव शेळके | वैद्यकीय अधिकारी दंतरोग | जा.नं.एसएसएस/एसएसबीएच/एचआर/ २८६५/२०१७ दि. ०६/०३/२०१७ | ०५/०२/२०१८ |
| ०४ | डॉ. प्रियंका प्रकाश दहिफळे | निवासी वैद्यकीय अधिकारी | जा.नं.एसएसएस/एसएसबीएच/एचआर/ २८६७/२०१७ दि. ०६/०३/२०१७ | ०५/०२/२०१८ |

डॉ पोर्णिमा शेळके यांनी दि. १५/१२/२०१७ रोजीचे अर्जान्वये मुदतवाढ मिळणेबाबत विनंती केलेली आहे.

उपरोक्त तक्त्यातील दि. ०६/०३/२०१७ रोजी तात्पुरत्या स्वरूपात कंत्राटी पध्दतीने ११ महिने कालावधीकरीता नेमणूक केलेल्या वैद्यकीय अधिका-यांचा नेमणूक कालावधी **दि. ०५/०२/२०१८ अखेर** संपुष्टात येत आहे.

**मागणी-** कंत्राटी पध्दतीने ११ महिने कालावधीकरीता तात्पुरत्या स्वरूपात नेमणूक केलेल्या सध्या कार्यरत वैद्यकीय अधिका-यांना दि. १३/०२/२०१८ पासून ११ महिने कालावधीकरीता तात्पुरत्या स्वरूपात पुर्वीच्याच नेमणूक आदेशातील अटी शर्तीनुसार नेमणूक देणेबाबत.

**विभागाचा अभिप्राय / स्पष्ट मत–** उपरोक्त प्रस्तावातील वैद्यकीय अधिका-यांना त्यांचे नेमणूक आदेश संपुष्टात आलेनंतर ०७ दिवस सर्विस ब्रेक देऊन दि.१३/०२/२०१८ पासून पुढे ११ महिने कालावधी अथवा पुढील आदेश होईपावेतो यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत तात्पुरत्या स्वरूपात कंत्राटी पध्दतीने पुर्वीच्याच नेमणूक आदेशातील अटी शर्तीनुसार नेमणूक देणेबाबत निर्णय होणेस विनंती.

निर्णयास्तव सादर.

निर्णय क्र.१२७ **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावित वैद्यकीय अधिकाऱ्यांना त्यांचा नेमणूक आदेश संपुष्टात आलेनंतर ०७ दिवस सर्विस ब्रेक देऊन दि.१३/०२/२०१८ पासून पुढे ११ महिने कालावधी अथवा पुढील आदेश होईपावेतो यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत तात्पुरत्या स्वरूपात कंत्राटी पध्दतीने पुर्वीच्याच नेमणूक आदेशातील अटी शर्ती व वेतनावर नेमणूक देणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

आयत्या वेळेचा

विषय नं.२२ **श्री साईबाबा संस्थानचे श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयातील ११ महिने कालावधीसाठी कंत्राटी पध्दतीने कार्यरत परिचारक/परिचारीका यांचेबाबत.**

प्रस्ताव- श्री साईबाबा व श्री साईनाथ रूग्णालयात सन २००८ पासुन मा व्यवस्थापन समितीचे निर्णयास अनुसरून खालील परिचारक/ परिचारीकांना ११ महिने कालावधीसाठी तात्पुरत्या स्वरूपात कंत्राटी पध्दतीने वेळोवेळी नेमणूका दिलेल्या आहे.

| अ.नं | नाव | नेमणूक तारीख | हजर तारीख | ११ महिने मुदवाढ संपुष्टात येत असल्याची तारीख |
|---|---|---|---|---|
| १ | कु मनिषा स्टिफन आवारे | ३१/०१/२०१७ | १५/०१/२०१७ | १४/१२/२०१७ |
| २ | कु आशुमती संपत सदाफुले | ३१/०१/२०१७ | १७/०१/२०१७ | १६/१२/२०१७ |
| ३ | श्रीमती वैशाली भगवान महागडे | ३१/०१/२०१७ | १७/०१/२०१७ | १६/१२/२०१७ |
| ४ | श्री आशिष शरद सुर्यवंशी | ३१/०१/२०१७ | २१/०१/२०१७ | २०/१२/२०१७ |
| ५ | सौ आशा रमेश जगताप | २६/०४/२०१७ | १४/०२/२०१७ | १३/०१/२०१८ |
| ६ | कु प्रतिमा रामचंद्र कोळगे | २६/०४/२०१७ | १६/०२/२०१७ | १५/०१/२०१८ |
| ७ | श्री राहुल प्रकाश आहोळ | २६/०४/२०१७ | २५/०२/२०१७ | २४/०१/२०१८ |
| ८ | कु प्राजक्ता दिपक जाधव | २६/०४/२०१७ | १८/०४/२०१७ | १७/०३/२०१८ |
| ९ | श्रीमती कावेरी सुदाम म्हस्के | २६/०४/२०१७ | २७/०४/२०१७ | २६/०३/२०१८ |
| १० | सौ रूथ निलेश श्रीवास्तव | ०६/०५/२०१७ | ०७/०५/२०१७ | ०६/०४/२०१८ |
| ११ | कु कविता योसेफ पंडीत | १९/०७/२०१७ | १७/०७/२०१७ | १६/०६/२०१८ |

उपरोक्त परिचारीकांचा ११ महिने नेमणूक कालावधी त्यांचे नावासमोर दर्शविलेप्रमाणे संपुष्टात येत असल्याने त्यांना पुन्हा नेमणूका देणेकामीचा प्रस्ताव मा व्यवस्थापन समिती दि. ०८/१२/२०१७ रोजीचे सभेत सादर करणेत आला होता. त्यावर निर्णय क्र १०४९ नुसार,याकरीता व्यवस्थापन समितीचे उपाध्यक्ष मा. श्री चंद्रशेखर कदम यांचे अध्यक्षतेखाली समिती सदस्य मा. श्री भाऊसाहेब वाकचौरे व मा श्री प्रताप भोसले यांची समिती तयार करणेत आली. या समितीने प्रस्तावित परिचारक/ परिचारीकांना मुदतवाढ देणे योग्य होईल का, याची शहानिशा करून त्याचा अहवाल व्यवस्थापन समितीसमोर सादर करावा, असे ठरले.

उपरोक्त निर्णय क्र १०४९ नुसार, अहवाल सादर करणेबाबत जा.नं.एसएसएसएसएसबीएच/ एचआर/१८९०/२०१७ दि. ३०/१२/२०१७ पत्राअन्वये मा. श्री चंद्रशेखर कदम, उपाध्यक्ष, मा. श्री भाऊसाहेब वाकचौरे, विश्वस्त व मा श्री प्रताप भोसले, विश्वस्त श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांना, कळविलेले आहे.

आता, उपरोक्त प्रस्तावातील नमुद ११ महिने कालावधीकरीता कार्यरत परिचारीका यांचा दि. १९/०१/२०१८ रोजीचा अर्ज प्राप्त झाला असुन त्यामध्ये, आम्ही सर्व ११ महिने (फिक्स पे) स्टाफनर्स आपणास विनंतीपुर्वक अर्ज करतो की, आपण सांगितल्याप्रमाणे आम्ही आमची कोर्ट केस मागे घेतलेली असुन केस withdrawal copy सोबत जोडत आहेत. तरी आम्हाला ११ महिने ब्रेकनंतर पुन्हा duty Rejoin करून घेण्यात यावे, ही नम्र विनंती. असे नमुद केलेले आहे.

दि. ०८/१२/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र १०४९ नुसार, गठीत केलेल्या समितीकडून, व्यवस्थापन समितीसमोर सादर करावयाचा एकत्रित अहवाल अद्यापपावेतो व्यवस्थापन समितीसमोर सादर झालेला नाही.

७५ परिचारीकांची पदे भरणेकामी दि. २५/०६/२००८ रोजी देणेत आलेल्या जाहिरातीस अनुसरून दि. १७/०८/२००८ रोजी व्यवस्थापन समितीसमोर मुलाखती घेणेत आलेल्या आहेत. बिंदूनामावली नुसार खुला २७,

इमाव ५, भ ज ४, अ ज १ असे ३७ परिचारीकांना स्थायी स्वरूपात नेमणूक आदेश देणेत आलेले आहेत. अ ज, नि.ज (व्ही जे), विमाप्र या प्रवर्गातील उमेदवार उपलब्ध झाले नसल्याने २७ परिचारीकांना तात्पुरत्या स्वरूपात ११ महिने कालावधीसाठी नेमणूका देणेत आलेल्या आहेत. त्यापैकी सध्या ११ परिचारीका कार्यरत आहेत.

प्रस्तावातील नमुद परिचारक / परिचारीकांना ११ महिने कालावधीसाठी नेमणूक देणेकामी प्रत्येक वेळी मा व्यवस्थापन समितीचे सभेसमोर प्रस्ताव सादर करावा लागतो सदर प्रस्तावातील निर्णयानुसार ११ महिने कालावधीसाठी तात्पुरत्या स्वरूपात त्यांचे हजर तारखेनुसार ११ महिने कालावधी संपुष्टात आलेनंतर नेमणूक आदेश देण्यात येतो व त्यांनतर संबंधीत परिचारक/ परिचारीका कामावर हजर होतात. या कार्यवाहीमध्ये बराच कालावधी व वेळ जातो. रूग्णालयात परिचारीकांव्यतिरीक्त इतर पदांवर अशाप्रकारे संस्थानमध्येनेमणूका देणेत आलेल्या नाहीत.

तरी, प्रस्तावातील नमुद परिचारक/ परिचारीकांना बाह्ययंत्रणेद्वारे घेऊन प्रतिमहा रू.१५,४००/- एकत्रित वेतन देणेबाबत प्रस्तावीत करणेत येत आहे.

मा व्यवस्थापन समितीसमोर निर्णयास्तव सादर

**निर्णय क्र.१२८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२३** **श्री साईबाबा संस्थानमध्ये विविध कामांसाठी मागविण्यात आलेल्या ई-निविदा कार्यपध्दतीवर निर्णय होणेबाबत.**

**प्रस्ताव-** संस्थान मार्फत करण्यात येणा-या बांधकाम प्रकल्पांसाठी सार्वजनिक बांधकाम प्रकल्पांसाठी सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र शासन यांचे दर सुची (D.S.R./ S.S.R) नुसार अंदाजपत्रक तयार करुन खर्चास मान्यता घेवून रु.३.० लक्ष पर्यंत रकमेची कोटेशन व त्यापुढील रकमेसाठी ई-निविदा मागविण्यात येतात.

सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन निर्णय, क्रमांक: सीएटी/२०१७/प्र.क्र.०८/इमा-२ दिनांक १२ एप्रिल, २०१७ व शासन शुध्दीपत्रक क्रमांक सीएटी/२०१७/प्र.क्र.०८/इमा-२ मंत्रालय, मुंबई यांचे दि.२९ जून, २०१७ रोजी निर्गमीत करण्यात आले आहे.

सदर शासन निर्णयातील परिच्छेद क्र.२.९.१ मध्ये निकोप स्पर्धा व्हावी व जास्तीत जास्त स्पर्धात्मक देकार मिळावेत यासाठी खुल्या निविदा सूचना प्रसारित करुन निविदा मसुद्यामध्ये, निविदा सादर करणारे कंत्राटदार सार्वजनिक बांधकाम विभागामधील पंजीकृत कंत्राटदार असावेत (Registered with P.W.D.) ही अट वगळण्यात यावी आणि कुठलाही सक्षम कंत्राटदार निविदेतील अटी व शर्तीची पूर्तता करतील अशी अट नमूद करावी. अशा सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. यामध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहेत.

रुपये १.५० कोटी पर्यंतच्या रकमेच्या निविदांकरिता कंत्राटदार नोंदणीकृत (पंजीकृत) असण्याची अट अनिवार्य करण्यात यावी. तसेच रु.१.५० कोटी पर्यतच्या रकमेच्या निविदा B-1 नमुन्यात (D.S.R/S.S.R नुसार क्वांटीटी व दर नमूद करुन त्या रकमेवर कमी अथवा जास्त टक्के रक्कम ठेकेदार यांनी देकार सादर करणे) मागविण्यात याव्यात व रु.१.५० कोटी पेक्षा जास्त रकमेचा निविदा B-2 नमुन्यात ( Bill of Quantity मध्ये आयटेम नुसार क्वांटीटी नमूद करुन प्रत्यक आयटेमचे दर ठेकेदार यांनी नमूद करणे त्यानुसार एकत्रीत रक्कम देवून निविदा सादर करणे) मागविण्यात याव्यात असा शासन निर्णय झालेला आहे. त्यानुसार B-1 टेंडर १.५ कोटी पर्यत मागवितांना S.S.R. मधील दर नमूद करुन Percentage (%) या तत्वावर ई-निविदा मागविणेत याव्यात असे नमूद आहे.

उपरोक्त शासन निर्णयातील शासन निर्णयातील अ.क्र. ४.६.२ नुसार प्राप्त निम्नतम निविदेचा देकार निविदाधीन कामाच्या किमतीपेक्षा १०% पर्यत कमी दरांचा असेल तर ठेकेदारांनी निविदाधीन किमतीच्या १% एवढ्या किमतीची बॅंकेची प्रतिपूर्ती हमी परफॉर्मन्स सिक्युरिटी म्हणून निविदेच्या लिफाफा क्र.२ मध्ये सादर करावा. तसेच (Scan करुन ई-निविदेसोबत सादर करावी) (उदा. १% ते १०% कमी दर १% रक्कम )

शासन निर्णयातील.ञ अ.क्र. ४.६.३ नुसार प्राप्त निम्नतम निविदेचा देकार निविदाधीन कामाच्या किमतीपेक्षा १०% पेक्षा जास्त दराने कमी असेल तर देकार १०% पेक्षा जेवढ्या जास्त दराने आहे तेवढया रकमेचा वरील बाब-२ प्रमाणे बॅंकेची प्रतिपूर्ती हमी निविदे सोबत लिफाफा क्रमांक २ मध्ये सादर करावी (उदा. १४% कमी दर-१०% पर्यंत करीता -१% व (१४%-१०%)-४% असे एकूण ५%). ही रक्कम रुपये १०००/- पेक्षा कमी असल्यास किमान रुपये १०००/- (एक हजार) ची बॅंकेची प्रतिपूर्ती हमी सादर करणे अनिवार्य राहील अशी तरतूद आहे.

अ) निविदा मागविताना २०% रक्कम कमी करुन निविदा मागविल्यास उपरोक्त शासन निर्णयानुसार कार्यवाही करणेस अडचण येते

१. निविदा मागविताना २०% कमी नमूद केलेल्या रकमेच्या १०% पेक्षा कमी निविदाची देकार प्राप्त झाल्यास बँक प्रतीपुर्ती हमी घेण्यात येते.

२. राज्य दरसुची नुसार तयार केलेले अंदाजपत्रक अथवा बाजार भाव दराने केलेले अंदाजपत्रक या रकमेक्षा (२०% इतकी रक्कम कमी न करता) १०% अथवा त्यापेक्षा जास्त इतक्या रकमेची कमी निविदाची देकार प्राप्त झाल्यास बँक प्रतीपुर्ती हमी घेण्यात येते. यामध्ये कुठल्याही प्रकारची अडचण नाही.

ब) सावर्जनिक बांधकाम विभागाचे निर्णयानुसार

१. १.५ कोटी पर्यतच्या कामासाठी B-1 निविदा म्हणजे निविदा मागविताना BOQ मध्ये S.S.R नुसार क्वाटींटी, दर व एकूण रक्कम नमूद करणे व त्यावर कमी अथवा जास्त Persentage quote करणे अशी निविदा मागविणे, मा. व्यवस्थापन समितीचे दि.०८/१२/२०१७ रोजीचे सभेतील नि.क्र.१०७४ नुसार अंदाजपत्रकीय रकमेच्या २०% कमी रक्कम करुन निविदा मागविण्यात यावीत १.५ कोटी पेक्षा कमी रकमेच्या कामात BOQ मधील दर राज्य दरसुची पेक्षा २०% कमी करुन एकूण रक्कम २०% कमी येईल. त्यावेळी S.S.R. चे दरामध्ये व संस्थानतर्फे एकाच Specification साठी आलेल्या निविदा दरात तफावत दिसून येईल.

२. शासन निर्णय क्र.सीएट/२०१७/प्र.क्र.०८/इमा-२ मंत्रालय, मुंबई, ४०० ०३२ क्लॉज ६ ब मधील १.५ कोटी पेक्षा जास्त रकमेच्या कामासाठी B-2 निविदा (आयटेम रेट यामध्ये फक्त क्वांटीटी दिलेली असेल. दर ठेकेदार यांनी स्वतः भरावयाचे आहेत.) अशी निविदा मागविणेत यावी असे नमूद केले आहे.

मा. व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार २०% पेक्षा कमी दराचे अंदाजपत्रक तयार करुन निविदा मागविल्यास ठेकेदाराने हे कमी दराने निविदा सादर केल्यास उपरोक्त शासन निर्णयानुसार ठेकेदार यांना बँक गॅरंटी दयावी लागते.

तरी वर नमूद शासन निर्णयानुसार प्रचलीत e-SSR दराने तयार केलेल्या अंदाजपत्रकानुसार ई-निविदा मागवाव्यात अथवा मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार अंदाजपत्रकीय रकमेत २०% कपात करुन B-2 म्हणजे Item Rate पद्धतीने ई-निविदा मागवाव्यात किंवा कसे याबाबत निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.१२९** **यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, अंदाजपत्रकीय रकमेमधून २०% रक्कम कपात करुन B-2 म्हणजे Item Rate पद्धतीने व विशिष्ट स्वरुपाच्या कामांसाठी "C" स्वरुपाच्या Lumsum ई-निविदा मागविणेत याव्यात, असे ठरले.** (कार्यवाही- कार्यकारी अभियंता, बांधकाम)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२४** **दि.१७ ते १९ फेब्रुवारी २०१८ अखेर श्री साईबाबा समाधी मंदिर शताब्दी मंडपात शिवचरित्र वाचन सोहळा व सांस्कृतिक कार्यक्रमासाठी परवानगी मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूद:-**

१. अधिनियमाचे कलम १७ मधील पोट कलम (१) अन्वये,राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दीष्टये साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितची कर्तव्ये असतील.

२. अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १(ख) रुढी व प्रथांनुसार, मंदिरातील धार्मिक विधी, पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करणे व पार पाडणे.

३. अधिनियमाचे कलम १७ मधील पोट कलम २(ठ) अन्वये, श्री साईबाबांचे जीवन, त्यांचे कार्य, त्यांच्या लीला व त्यांची शिकवण यांबाबतच्या उपयुक्त माहितीचा प्रचार व प्रसार करील आणि श्री साई साहित्य ग्रंथालय चालवील व त्याचा विस्तार करील.

**प्रस्तावना:**- श्री.वैभव सुधाकर कोते, शिवजयंती उत्सव समिती शिर्डी शहर, शिर्डी यांनी अनुक्रमे दि.०४ व दि.०५ जानेवारी २०१८ रोजीचा अर्ज व ई-मेलद्वारे मा.मुख्य कार्यकारी अधिकारी महोदया यांना अग्रेषीत

केलेल्या पत्रात, शिवजयंती उत्सव समिती हे गावातील युवक तरुणांचे संघटन आहे. दरवर्षी या समितीकडून मोठया प्रमाणात शिवजयंती साजरी केली जाते. यावर्षी श्री साईबाबा समाधी शताब्दी उत्सवाच्या निमित्ताने शिवचरित्र वाचन व विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करुन शताब्दीचा प्रचार प्रसार करण्याचे ठरविले आहे. त्यासाठी श्री साईबाबा समाधी मंदिर शताब्दी मंडपाची जागा मिळावी, असे नमूद करुन सदरचा कार्यक्रम दि.१६ ते दि.१९ फेब्रुवारी २०१८ या ०४ दिवसाच्या कालावधीत सकाळी ७ ते ११ वाजेपर्यंत शिवचरित्र वाचन व दुपारी २.३० ते सायं. ५ वाजेपर्यंत सांस्कृतिक कार्यक्रम करण्यास परवानगी मिळणेबाबत विनंती केली आहे.

आता पुन्हा दि.०२/०२/२०१८ रोजी श्री.वैभव कोते, छत्रपती शासन संघटना, शिर्डी शहर यांनी मा.अध्यक्ष सो. यांना अग्रेषीत केलेल्या पत्रात खालीलप्रमाणे कार्यक्रम करण्यासाठी श्री साईबाबा समाधी मंदिर शताब्दी मंडप उपलब्ध करुन देणेबाबत विनंती केली आहे.

१) दि.१७/०२/२०१८ रोजी सकाळी ७ ते ११ - शिवचरित्र वाचन सोहळा
सायंकाळी ६ ते रात्री १० वाजेपर्यंत हळदी कुंकू कार्यक्रम.

२) दि.१८/०२/२०१८ रोजी
सकाळी ७ ते ११ - शिवचरित्र वाचन सोहळा
सायंकाळी ६ ते रात्री १० वाजेपर्यंत प्रसिद्ध चित्रपट अभिनेते श्री.राहुल सोलापूरकर यांचे शिवचरित्र व्याख्यान.

३) दि.१९/०२/२०१८ रोजी
सकाळी ७ ते रात्री १० - शिवचरित्र वाचन सोहळा समाप्ती
सकाळी १० ते १२ वाजेपर्यंत श्रींची पारंपारीक शोभायात्रा
दुपारी १ ते २ वाजेपर्यंत वाचकांसाठी सहभोजन.

**प्रस्ताव**:- श्री साईबाबा यांच्या समाधीस दि.१८ ऑक्टोबर २०१८ रोजी (विजयादशमी) १०० वर्षे पूर्ण होत आहेत. श्री साईबाबा संस्थानच्यावतीने दि.०१ ऑक्टोबर २०१७ ते दि.१८ ऑक्टोबर २०१८ हा कालावधी श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्ष म्हणून साजरा करीत आहे. या कालावधीमध्ये विविध प्रकारच्या धार्मिक, सांस्कृतिक, सामाजिक व प्रबोधनपर कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.०८/०१/२०१८ रोजीचे सभेत दि.११ ते १७ फेब्रुवारी २०१८ अखेर दुपारी २ ते ५ या कालावधीत नामवंत भागवत कथाकार श्रीमती प्रेमा पांडुरंग, श्रीपेरुंबुदुर, तामिळनाडू यांचा हिंदी भागवत कथेचा कार्यक्रम आयोजित करणेस मान्यता मिळालेली आहे.

तथापि, शिवजयंती उत्सव समितीने उपरोक्त पत्रात नमूद केलेप्रमाणे शिवजयंती उत्सव हे शिर्डीतील तरुणांचे संघटन आहे. सदरचा कार्यक्रम शिवजयंती व शताब्दी महोत्सवी वर्षाचे निमित्ताने भव्य स्वरुपात करण्याचा शिर्डीतील तरुणांचा मानस आहे.

**विभागाचा अभिप्राय** :- श्रीसाईबाबा समाधी मंदिर शताब्दी मंडपात उपरोक्त प्रस्तावनेत नमूद केलेल्या कार्यक्रमास खालीलप्रमाणे परवानगी देता येईल.

१) दि.१७/०२/२०१८ रोजी सकाळी ७ ते ११ या कालावधीत शिवचरित्र वाचनास व सायंकाळी आरतीनंतर हळदी कुंकू कार्यक्रमास.

२) दि.१८/०२/२०१८ रोजी सकाळी ७ ते ११- शिवचरित्र वाचनास व सायंकाळी आरतीनंतर प्रसिद्ध चित्रपट अभिनेते श्री.राहुल सोलापूरकर यांचे शिवचरित्र व्याख्यानास.

३) दि.१९/०२/२०१८ रोजी सकाळी ७ ते रात्री १०- शिवचरित्र वाचन व त्यानंतर शोभायात्रेस तसेच दुपारी १ ते २ वाजेपर्यंत वाचकांसाठी सहभोजनास.

तरी श्री.वैभव सुधाकर कोते, शिवजयंती उत्सव समिती, शिर्डी शहर यांचा प्रस्ताव निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.१३०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री.वैभव सुधाकर कोते, शिवजयंती उत्सव समिती, शिर्डी शहर दि.१७ ते १९ फेब्रुवारी २०१८ अखेर श्री साईबाबा समाधी मंदिर शताब्दी मंडपात शिवचरित्र वाचन सोहळा व सांस्कृतिक कार्यक्रमासाठी प्रस्तावात नमुद केलेल्या वेळेप्रमाणे परवानगी देण्यात यावी, असे ठरले.**

(कार्यवाही- समाधी शताब्दी कक्षप्रमुख)

---

आयत्या वेळेचा
विषय नं.२५ **आजचे व्यवस्थापन समिती सभेमध्ये मा.अध्यक्ष महोदय यांचे परवानगीने आयत्या वेळी खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आले.**

**निर्णय क्र.१३१** मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांनी श्रींचे समाधी शताब्दीचा आढावा घेऊन, बहूमोलाचे मार्गदर्शन केले तसेच समाधी शताब्दी निमित्ताने तयार करणेत आलेल्या कृती आराखडयामध्ये समाविष्ठ असलेल्या कामांना प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार श्री साईबाबा संस्थानचे मुख्यकार्यकारी अधिकारी यांना प्रदान केले. त्यामुळे समाधी शताब्दीच्या कामांची अंमलबजावणीकरीता गती मिळेल. यासाठी मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे अभिनंदनाचा ठराव घेण्यात येऊन, त्यांना धन्यवाद देण्यात आले. (कार्यवाही- समाधी शताब्दी कक्षप्रमुख)

---

**निर्णय क्र.१३२** श्री साईबाबा संस्थानच्या नुतनीकृत संकेतस्थळ व मोबाईल ॲप्लीकेशनच्या चाचणी आवृत्तीचे (बीटा व्हर्जन) उद्धाटण करणेत आले. यानंतर सदर संकेतस्थळाची समिती सदस्य व संस्थान अधिकारी यांनी तपासणी करुन, काही त्रुटी आढळल्यास त्याप्रमाणे सुधारणा करुन, अंतीम आवृत्तीचे साईभक्तांसाठी उपलब्ध करुन देण्याचे नियोजन करावे, असे ठरले. (कार्यवाही- माहिती तंत्रज्ञान विभागप्रमुख)

---

**निर्णय क्र.१३३** परब्रम्ह चॅरिटेबल ट्रस्ट, प्रकाशम, आंध्र प्रदेश यांनी श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवाच्या निमित्ताने शिर्डी येथे “श्री साईबाबा महा होम-हवन” हा जगातील सर्वात मोठा कार्यक्रम आयोजित करण्याचा माणस असून त्यासाठी नवीन साईप्रसादालयाशेजारील शेती महामंडळाची जमीन उपलब्ध करुन देणेबाबत आजचे सभेमध्ये पत्राद्वारे विनंती केली.

यावर चर्चा होऊन, नवीन साईप्रसादालयाशेजारील शेती महामंडळाची जमीन परब्रम्ह चॅरिटेबल ट्रस्ट, प्रकाशम, आंध्र प्रदेश यांनी घ्यावी. तथापि, त्यांना सदरहू जमीन उपलब्ध न झाल्यास, संस्थानने तहसिलदार, राहाता यांचेकडून आवश्यक ती जमीन अधिग्रहन करुन घ्यावी व यासाठी येणारा खर्च परब्रम्ह चॅरिटेबल ट्रस्ट, प्रकाशम, आंध्र प्रदेश यांनी करावा. तसेच गर्दी व्यवस्थापन व त्यानुशंगाने इतर कोणतीही जबाबदारी संस्थानची राहणार नाही, असे ठरले. (कार्यवाही- प्र.अधिक्षक, मालमत्ता विभाग/ समाधी शताब्दी कक्षप्रमुख)

---

**निर्णय क्र.१३४** समिती सदस्य मा.श्री.भाऊसाहेब वाकचौरे हे संस्थानचे कार्यकारी अधिकारी असताना, संस्थान नियमानुसार त्यांनी बडतर्फ केलेल्या कर्मचाऱ्याने दि.१७.११.२०१७ रोजी मा.श्री.वाकचौरे यांना पत्राद्वारे मला नुकसान भरपाई मिळावी, अशी नोटीस दिलेली होती. त्यावर मा.श्री.वाकचौरे यांनी सदरहू नोटीसीची प्रत दि.०२.१२.२०१७ रोजी संस्थानला देऊन, पुढील कार्यवाही संस्थानने करणेबाबत कळविले आहे.

यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानच्या कामकाजाचा भाग म्हणून केलेल्या कृतीबद्दल संस्थानचे विश्वस्त, अधिकारी व कर्मचारी यांचेविरुध्द न्यायालयीन प्रकरण उद्धवल्यास ते त्या पदावर असो किंवा नसो, त्यांना संस्थानचे ॲडव्होकेट पॅनेलवरील ॲडव्होकेटच्या सेवा संस्थान खर्चाने देण्यात याव्या, असे ठरले.

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, सामान्य प्रशासन/ विधी अधिकारी)

---

**निर्णय क्र.१३५** संस्थान परिसरामध्ये रक्तदात्यांचा व रक्तसंकलन करणेसाठी मागणी करण्यासाठी येणाऱ्या अर्जांचा प्रतिसाद पहाता, संस्थान निवासस्थाने, साईप्रसादालय परिसर व १६ गुंठे परिसर अशा, साईभक्तांच्या वर्दळीच्या ठिकाणी फिरते रक्तसंकन करणाऱ्या रक्तपेढयांना, रक्तसंकलनासाठी परवानगी देणेबाबतचा प्रस्ताव सभेसमोर सादर करणेत यावा, असे ठरले. (कार्यवाही- प्र.वैद्यकिय अधिक्षिका, श्री साईनाथ रुग्णालय)

---

**निर्णय क्र.१३६** संस्थानच्या माजी विश्वस्तांना त्यांचेसह, त्यांचे कुटूंबातील ४ व्यक्तींसाठी दर्शन व आरतीकरीता ओळखपत्र देण्यात यावे. यासाठीच्या नियमावलीचा सविस्तर प्रस्ताव सभेसमोर सादर करणेत यावा, असे ठरले.

(कार्यवाही- जनसंपर्क अधिकारी)

---

**निर्णय क्र.१३७** साईआश्रम भक्तनिवास व साईधर्मशाळा इमारतीचे देणगीदार साईभक्त श्री.के.व्ही. रमणी यांचे बंधू श्री.भास्करण यांनी या देणगीबाबतचा फलक सदरहू इमारतीचे परिसरामध्ये लावणेत यावा, अशी अपेक्षा व्यक्त केली असलेचे समिती सदस्यांनी निदर्शनास आणून दिली. याबाबतचा प्रस्ताव सभेसमोर सादर करणेत यावा, असे ठरले.

(कार्यवाही- कार्यकारी अभियंता, बांधकाम)

---

**निर्णय क्र.१३८** श्री शिवकृपानंद स्वामी यांचे समर्पण ध्यान योग शिबीर आयोजित करणेसाठी योग प्रभा भारती (सेवा संस्था) ट्रस्ट, पुणे यांचे प्रतिनिधी श्री.उमेश पै, श्री.गोविंद पर्वतकर व श्री.सुरेश पटेल हे आजचे सभेपुढे उपस्थित होते. त्याचेबरोबर चर्चा होऊन खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आले.

(१) शताब्दी महोत्सवाच्या कार्यक्रमामध्ये श्री शिवकृपानंद स्वामी यांच्या कार्यक्रमाचा समावेशक करणेत येऊन, त्यांचे नावे कार्यक्रम निश्चितीचे निमंत्रण पत्र देण्यात यावे.

(२) समर्पण ध्यान योग शिबीरासाठी लागणाऱ्या शेतीमहामंडळाचे जागेचे भाडे व स्टेज मंडपाच्या व्यवस्थेसाठीचा रु.१५ लाख मात्रचा खर्च पुर्वी निर्णय झालेप्रमाणे संस्थानने सहन करावा व त्याव्यतिरिक्त येणारा उर्वरित खर्च योग प्रभा भारती (सेवा संस्था) ट्रस्ट, पुणे यांनी करावा.

(३) सदरहू शिबीराचे प्रचार व प्रसाराचे बॅनर व पत्रके संस्थान परिसरात लावणेस मान्यता देण्यात यावी व सदरहू शिबीरासाठी येणाऱ्या साधकांसाठी दि.२२ एप्रिल, २०१८ ते दि.०१ मे, २०१८ या कालावधीत संस्थानचे साईआश्रम व द्वारावती या निवासस्थानांमध्ये साधारणत: ७५० साध्या/ वातानुकुलीत खोल्या आरक्षित ठेवणेत याव्यात. (कार्यवाही- समाधी शताब्दी कक्षप्रमुख)

---

वरील निर्णय क्र.७५ ते १३८ सर्वानुमते घेण्यात आले.

यानंतर सायंकाळी ०६.३० वाजता सभा समाप्तीची घोषणा करण्यात आली.

| | |
|---|---|
| स्वाक्षरित/- | स्वाक्षरित /- |
| श्रीमती रुबल अग्रवाल (भा.प्र.से.) | (सुरेश हावरे) |
| मुख्यकार्यकारी अधिकारी | अध्यक्ष |

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी**